म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. नं. १५८

# ...ारधर्म

समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ॥
तो दुरात्मा दुरभिमान । मत्सर करी ॥

REFBK-0005429

पं. रघुनाथशास्त्री कोकजे
तर्कसांख्यतीर्थ, धर्मपारीण

नि. ८२२

९३१

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणें.

श्री

धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः

# नवा आचारधर्म

REFBK-0005429

लेखक

पं. रघुनाथशास्त्री कोकजे

तर्कसांख्यतीर्थ, धर्मपारीण

( दर्शनाध्यापक व ग्रंथसंशोधक, कैवल्यधाम, लोणावळें )

सर्व हक्क लेखकानें राखून ठेविले आहेत.

नारळीपूर्णिमा, शके १८५८ | किंमत ३ रुपये | २ ऑगष्ट, सन १९३६

प्रकाशकः--
रघुनाथ गोपाळ कोकजे.
मु. पो. लोणावळें, जि० पुणें.

## ग्रंथकर्त्याची साहित्यसेवा

१ धर्मस्वरूपनिर्णय
२ उत्कर्षाचा राजमार्ग
३ नवा आचारधर्म
४ लघु-दर्शन-दीपिका अर्थात् प्राचीन बारा दर्शनांची तोंड ओळख ! ( छापत आहे ).
५ रामायणरहस्य ( पुढील वर्षी प्रसिद्ध होईल )
६ तर्कशास्त्रप्रवेश ( लवकरच प्रसिद्ध होईल )

## पुस्तकविक्रीचीं मुख्य स्थानें—

( १ ) ग्रंथकर्ता, लोणावळें.
( २ ) परचुरे पुराणिक आणि मंडळी मुंबई नं. ४
( ३ ) इंटरनॅशनल बुक् सर्व्हिस, पुणें नं. ४

मुद्रक—
गोपाळ बळवंत जोशी,
आनंद मुद्रणमंदिर, पुणें. २

# अर्पणपत्रिका

आखिल मानवांच्या उद्धारार्थ मूळ निर्माण झालेल्या
धर्मास त्याचें विशुद्ध उज्ज्वल स्वरूप प्राप्त
व्हावें म्हणून अहर्निश झटणाऱ्या
व म्हणूनच

तुका म्हणे करूनि दावी। त्याचे पाय माझे जीवीं॥
( यः क्रियावान् स पण्डितः। )

या न्यायानें संतांनीं वंदनीय ठरविलेल्या
खऱ्या धर्मसेवकांस व धर्मबांधवांस
सादर समर्पण !!

# निवेदन

हिंदु धर्मावर स्वकीयांचीं व परकीयांचीं कसकशीं आक्रमणें चालू आहेत याचें विवेचन प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणांत केलेलेंच आहे. या आक्रमणांचा प्रतिकार केवळ मूलभूत उदात्त तत्त्वांचा पाढा वाचीत गेल्यानें होणार नाहीं. त्याकरितां हिंदूंमध्यें आज प्रचलित असलेल्या आचारधर्माचें योग्य समीक्षण करून त्यांतलि उपयुक्त भागाचा प्रचार प्रत्यक्ष सुरू केला पाहिजे. धर्मोद्धारास अत्यावश्यक असलेलें हें कार्य साधण्याकरितांच प्रस्तुत ग्रंथ जनतेस सादर केला जात आहे. या ग्रंथांत मूर्तिपूजा, मंदिरें, उपवास, व्रतें वगैरे केवळ प्रचलित आचारांचाच विचार नसून सामुदायिक प्रार्थनादिनासारख्या कित्येक नव्यानें सुरू करण्यासारख्या आचारांचेंही वर्णन केलेलें आहे. तसेंच धर्मबांधवांची दृष्टि व्यापक व्हावी म्हणून आरंभीं व शेवटीं कित्येक व्यापक धर्मतत्त्वांची व्यवहार्य समीक्षा केलेली आहे. पृ. ३४० वर हा ग्रंथ प्रत्यक्ष आचरणांत कसा आणतां येईल हेंही दाखविलेलेंच आहे. यामुळें हा ग्रंथ केवळ विचारप्रवर्तक न राहतां आचारप्रवर्तकही होईल असा विश्वास वाटतो.

या ग्रंथाचें तन्त्र कसें बिकट आहे याची वरील वर्णनावरून कांहींशी कल्पना येईल ! हें बिकट तन्त्र सांभाळून ग्रंथ लेखन करणें किती अवघड आहे याची कल्पना आम्हास आहे. क्वचित् एखाद्या निर्णयावर मतभेद झाल्यास त्याबद्दलचा रोष सर्व ग्रंथावर होण्याचा संभव आहे हेंहीं आम्ही जाणून आहों. पण विचारी वाचक ग्रंथांतलि केवळ निर्णयच न पाहतां ते कोणत्या पद्धतीनें सिद्ध केलेले आहेत. याचाही विचार करतील व तेव्हांच त्यांस आमच्या पुढील खऱ्या अडचणी कळून येताली अशा विश्वासावरच हें धाडस करण्यास आम्ही उद्युक्त झालों आहों.

‘ सर्व जुनें कायम ठेवलें पाहिजे ’ अशा भावनेचे ‘ जुने ’, व ‘ जुनें सर्व फेकून दिलें पाहिजे ’ अशा मनोवृत्तीचे ‘ नवे ’ अशा दोघांचाही सकृद्दर्शनीं या ग्रंथावर रोष होईल हें आम्ही जाणून आहों. कारण बऱ्याच जुन्या रूढींस आम्ही टाकाऊ ठरविलेलें आहे हें जुन्यांस मानवणार नाहीं, तर कांहीं जुने आचार

कायम ठेवलेले आहेत हें नव्यांस पाहवणार नाहीं. पण या भावनामय वातावरणांतून सत्यसृष्टीच्या व्यवहारभूमिकेवर येऊन जर विचार केला जाईल तर वरील दोघांसही आमचें धोरण मनोरम वाटल्यावांचून राहणार नाहीं. ' अगदींच बहकत चाललेल्या नवतरुणांस थोडासा कां होईना पण आचारधर्म घालून दिला हें बरें झालें ' अशा दृष्टीनें या ग्रंथाकडे पाहिल्यास जुन्यांचें समाधान होईल; तसेंच ' बरींच जुनाट जळमटें झाडून टाकलीं हें बरें केलें ' अशा दृष्टीनें पाहिल्यास नव्यांचेंही समाधान झाल्यावांचून राहणार नाहीं. प्रत्यक्ष अनुभव काय येतो हें काळ सांगेलच ! असो.

ब्राह्मणांस आचरतां येईल तोच धर्म या संकुचित कल्पनेमुळें आपला धर्म सर्वसाधारण जनतेस हृदयंगम वाटत नाहीं. हिंदूंमध्यें ब्राह्मणेतर व हरिजन यांचें संख्याबल मोठें आहे. त्यांच्या मानानें ब्राह्मण अगदीं अल्पसंख्य आहेत. अर्थात् नव्या आचारधर्माची उभारणी करतांना या बहुसंख्य हिंदूंस उपेक्षून चालणार नाहीं, हें लक्षांत घेऊनच या आचारधर्माची उभारणी केलेली आहे. तरी ब्राह्मणांपासून हरिजनांपर्यंत सर्व हिंदुबांधवांनीं या योजनेकडे आपलेपणाच्या भावनेनें पाहणें आवश्यक आहे. अखिल हिंदूंच्या सर्वांगीण आचारसुधारणेचा हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें त्यांत अनेक प्रकारचा उणेपणा असणार हें स्वाभाविकच आहे. पण तो त्या त्या ज्ञातींतील पुढाऱ्यांनीं मनोभावानें साहय केल्यासच भरून येणें शक्य आहे. तरी या दृष्टीनें अखिल हिंदुबांधवांनीं या ग्रंथाचें परिशीलन करून स्वतःच्या सूचना प्रस्तुत लेखकाकडे पाठवाव्या अशी नम्र विनंति आहे.

या ग्रंथाची आवश्यकता अडीच वर्षांपूर्वीच धर्मस्वरूपनिर्णयाच्या २७३, २७४ व २९४ पृष्ठांवर स्वतः लेखकानें तसेंच त्याच ग्रंथाच्या प्रस्तावनेंत म. म. पाठक शास्त्रीनींहीं ( पृ. २१ वर ) दाखविलेलीच होती. सदर अपेक्षेची पूर्ति व्हावी म्हणून आजपर्यंत वाट पाहिली. परंतु तसा योग आला नाहीं. गेल्या दोन वर्षांत ज्या कित्येक चळवळी झाल्या त्यांमुळें या ग्रंथाची आवश्यकता मात्र अधिक तीव्रतेनें भासमान होऊं लागली. शेवटीं अधिक कालक्षेप करणें बरें नव्हे हें जाणून, तसेंच प्राचीन परंपरा, धर्मतत्त्व व आजच्या महाजनांची मनोभूमिका यांचा योग्य तो समन्वय करून स्वतःच हा ग्रंथ वाचकांस सादर केला आहे. जरी बाह्यतः हा ग्रंथ एका अल्पशक्ति लेखकाकडून प्रकाशित

होत आहे तरी यांतील उच्छिष्टें मोठमोठ्या अधिकारसंपन्नांचीं आहेत हें लक्षांत घेऊन वाचकांनीं निःशंकमनानें या ग्रंथाचा अंगीकार करावा.

**कैवल्यधाम** या संस्थेचे संचालक श्रीमत् **कुवलयानंद** यांचें सहानुभूतिपूर्ण प्रोत्साहन नसतें तर प्रस्तुत लेखकास या प्रकारची धर्मसेवा करतांच आली नसती. प्रस्तुत धार्मिक व आध्यात्मिक उन्नतीचें महत्त्व लक्षांत घेऊन त्यांच्या कडून लेखकास शक्य त्या सवलती मिळतात यामुळेंच, आश्रमाचा सेवाधर्म सांभाळूनही या प्रकारची धर्मसेवा करणें त्यास शक्य होत आहे. म्हणून प्रस्तुत लेखक त्यांचा सदैव ऋणी आहे.

प्रत्यक्ष ग्रंथलेखन चालू असतां तसेंच मुद्रणप्रत तयार झाल्यावर ती वाचून योग्य त्या सूचना करून हा ग्रंथ अधिक निर्दोष व उपयुक्त करण्याच्या कामीं अनेकांची मदत झालेली आहे. त्यांत विद्वरत्न दप्तरी, वेदान्तवाचस्पति भिडेशास्त्री, पं. स्वामी केवलानंद, श्री. ना. द. साठे व वि. य. मराठे बी. ए. यांची मदत विशेष उल्लेखनीय आहे. प्रस्तुत लेखक या सर्वांचा फारच आभारी आहे. सौ. सुशीलाबाई कोकजे यांनीं सूचि तयार करण्याचेकामीं आयत्या वेळीं तत्परतेनें मदत केली हें नमूद करण्यास आनंद वाटतो. आनंदमुद्रणालयाच्या मालकांनींही सहानुभूतीचें धोरण ठेवून छपाईचें काम शक्यतितक्या लवकर परन्तु काळजीनें केलें याबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे.

शेवटीं ज्यांच्या कृपेनें प्रस्तुत लेखकास प्राच्यविद्यामंदिराचें दर्शन घडलें, इतकेंच नव्हे तर या ग्रंथाचें अंतरंग अधिक उपयुक्त व आकर्षक होण्यास ज्यांच्या दीर्घव्यासंगाचा व सूक्ष्म विचारशक्तीचा उपयोग झाला तसेंच ज्यांच्या निरपेक्ष कृपावर्षावानेंच प्रस्तुत लेखकाचें कार्यक्षेत्र दिवसेंदिवस विस्तारत आहे त्या प. पू. गु. पं. नारायणशास्त्री मराठे ( परमहंस केवलानंदसरस्वती ) यांच्या चरणीं नम्र होऊन हें निवेदन संपवितों.

श्रावण शु.॥ १ शके १८५८
लोणावळें.

र. गो. कोकजे

परमहंस गु. स्वामी केवलानन्द (पं. नारायणशास्त्री मराठे) यांचा

# आशीर्वाद

ॐ

जें ध्येय गांठावयाचें त्याला गांठण्याचा प्रयत्न सफल होण्याची आशा ज्या मनुष्यव्यक्तीच्या आवांक्याप्रमाणें जेवढया काळावर पसरून राहते तेवढया त्या काळाचा भार त्या मनुष्यव्यक्तीवर असतो. अर्थात् त्या मनुष्यानें त्या काळामध्यें आपलें ध्येय गांठण्याचा प्रयत्न अखंड, अव्याहत, नी न कंटाळतां केलाच पाहिजे.

असा प्रयत्न करण्याचा काळ, भूतकाळ असूं शकत नाहीं हें उघडच आहे. वर्तमान काळ हा अत्यंतच अल्प असल्यानें तोही प्रयत्न करण्याचा काळ होऊं शकत नाहीं. परिशेषन्यायानें आणि योग्यतेनेंही भविष्यकाळ हाच प्रयत्न करण्याचा काळ असूं शकतो.

भविष्य काळाचा आरंभ मनुष्यव्यक्तीच्या अगदीं हातांतच आहे. पण त्या भविष्य काळाचा शेवटचा क्षण कोणता हें कांहीं मनुष्य निश्चित ठरवूं शकत नाहीं. कारण काळाचें सारखें परिवर्तन होत असतें. काळ परिवृत्त होणें म्हणजे जगत् परिवृत्त होणें. जगताचें, जगतांतील मानवसमाजाचें परिवर्तन सारखें चालू आहे. मानवांचें ज्ञान आणि त्याच्या इच्छा या नित्य परिवर्तन पावत आहेत. आणि त्याबरोबर प्रयत्न नी क्रिया यांतही परिवर्तन कळत वा न कळत होतच आहे. प्रयत्नाच्या दृष्टीनें भविष्य काळाची मर्यादा वस्तुतः मनुष्याला ठरविणें जवळजवळ अशक्यच आहे. तरी पण मनुष्य आपल्याकडून 'भविष्य काळ अमर्याद आहे' असें धरून चालतो आणि त्या धोरणानें आपलें प्रयत्न अखंड अन् अव्याहत चालवूं शकतो.

धर्म–वैदिकधर्म–श्रौतस्मार्तधर्म–पौराणधर्म–संप्रदायधर्म–मिश्रधर्म यांचेंही असेंच आहे.

आपली आशा सफळ होण्याचा जेवढा काल गृहीत धरला असेल त्या काळांत आशा सफळ होण्यासाठीं प्रयत्न करीत राहणें मनुष्याचें कर्तव्य होय मग त्याचें पर्यवसान कांहीं होवो.

धर्मपारीण, तर्कसांख्यतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे यांनीं विचारपूर्वक जो हा ग्रंथ प्रकाशित केला आहे तो, वरील सिद्धान्ताचें एक उदाहरणच आहे. जुनाच धर्म आणि त्याचा जुन्याच पद्धतीनें पण नव्या भाषेंत कच्चा आराखडा त्यांनीं तयार केला आहे. धर्मशास्त्रांतील बहुतेक प्रमुख प्रकरणें घेऊन त्यांतील प्रमुख अशीं आवश्यक कर्तव्यें संगतवार वर्णन करून सांगणारा हा ग्रंथ आहे. नित्य-नैमित्तिकादि कर्तव्यें कोणतीं नी कशीं करावयाचीं, याचें सर्व विवेचन करणारा हा ग्रंथ असल्यामुळें याला ' नवा धर्मसिंधु ' असें नांव देणें योग्य झालें असतें. पण आजच्या सुशिक्षितांत ' धर्मसिंधु 'चा प्रवाह अगदींच विरळ असल्यामुळें ' नवा आचारधर्म ' असें स्पष्ट नांव ग्रंथकर्त्यानें दिलें असावें असें दिसतें; व तें योग्यही आहे.

जवळच्या भविष्य काळामध्यें तरी ज्याचें अनुष्ठान करतां येईल असा धर्म किंवा निदान ज्यांना धर्म तर हवा परंतु तो आजच्या काळांतही करतां येण्यासारखा हवा असें वाटत असेल अशांना तरी आचरतां येण्यासारखा, वास्तविक जुनाच पण अंधश्रद्धेचा मात्र नव्हे असा धर्म या ग्रंथांत वर्णिला आहे. आतां तत्त्व मान्य, पण त्याचा तपशील काय असें म्हणावयास नको. ग्रंथरचना शक्य तितकी सोप्या भाषेंत केली आहे. असो.

आम्हीं या ग्रंथाचीं कांहीं प्रकरणें वाचलीं आहेत आणि कांहीं शब्दशः किंवा तात्पर्यशः ऐकलीं आहेत. त्यांत कांहीं असंमत होण्यासारखें आहे असें आम्हांला वाटलें नाहीं. निदान ' नवा धर्मसिंधु ' किंवा ' नवी स्मृति ' कशी करावी याला मार्गदर्शक होण्यासारखा हा ग्रंथ आहे. यांत मला संशय वाटत नाहीं.

( सही ) **स्वामी केवलानंद, वाई.**

# अनुक्रमणिका


अर्पणपत्रिका

निवेदन

गुरुवर्यांचा आशीर्वाद

अनुक्रमणिका

| | | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ लें | विषयजिज्ञासा | १ |
| ,, | २ रें | धर्मशास्त्राचा ओनामा ... ... | १० |
| ,, | ३ रें | धर्मसुधारणा आणि धर्मरक्षण ... | २६ |
| ,, | ४ थें | मूर्तिपूजा ... ... | ३५ |
| ,, | ५ वें | वर्णधर्माचें महत्त्व ... ... | ५१ |
| ,, | ६ वें | हिंदु मंदिरांची सुधारणा ... ... | ५७ |
| ,, | ७ वें | सामुदायिकप्रार्थनादिन ... ... | ७९ |
| ,, | ८ वें | सण, संस्कार आणि उत्सव ... ... | ८८ |
| ,, | ९ वें | भोजनविवेक ... ... | ११३ |
| ,, | १० वें | उपवास आणि व्रतें ... ... | १३० |
| ,, | ११ वे | मृत्यूनन्तर ... ... | १४९ |
| ,, | १२ वें | दिनक्रम ... ... | १६८ |
| ,, | १३ वें | जीवनव्यवसाय ... ... | १८६ |
| ,, | १४ वें | शिष्टाचार अथवा सामाजिक धर्म ... | २०४ |
| ,, | १५ वें | व्यसन आणि करमणूक ... ... | २१८ |
| ,, | १६ वें | शुभाशुभविचार ... ... | २२७ |
| ,, | १७ वें | शुद्धिविवेक आणि प्रायश्चित्त ... ... | २३५ |
| ,, | १८ वें | दयाधर्माचें रहस्य ... ... | २५० |
| ,, | १९ वें | दानविवेक ... ... | २७३ |
| ,, | २० वें | अपवादसमीक्षा ... ... | २८९ |
| ,, | २१ वें | हिंदुधर्माचें लक्षण व भवितव्य ... | २९७ |
| ,, | २२ वें | धर्मसुधारणेचा अभिनव मार्ग ... | ३१९ |
| ,, | २३ वें | उपसंहार ... ... | ३३६ |
| | | सूचि ... ... | ३४४ |

# नवा आचारधर्म

## प्रकरण पहिलें

### विषयजिज्ञासा

हिंदुधर्माची सध्यां फारच केविलवाणी स्थिति झालेली आहे. परधर्मीय त्यास नाना प्रकारांनीं जर्जर करीत आहेत हें प्रसिद्धच आहे; पण स्वधर्मीयांच्या अनास्थेचीही त्यांत भर पडलेली आहे हें पाहून मनस्वी खेद उत्पन्न होतो. स्वकीयांचे या धर्मावरील हल्ले अनेकमुखी आहेत. कोणी हिंदुमुसलमानांच्या एकीचें महत्त्व गाऊन, तर कोणी समाजसत्तावादाचें तत्त्वज्ञान पुढें करून त्याची उपेक्षा करीत आहेत. 'सध्यां राष्ट्र पारतंत्र्यांत असल्यामुळें स्वातंत्र्य मिळविणें हाच सर्वांचा धर्म आहे' असें अट्टाहासानें प्रतिपादून कित्येकांनीं हिंदुधर्माची रजाच ( तात्पुरती कां होईना ! ) घेतलेली आहे. विधवाविवाह, अस्पृश्योद्धार, सहभोजन यांपुरतेंच हिंदुधर्माचें पुराण ऐकविणारेही कित्येक धर्मबंधु आहेत. 'अस्पृश्योद्धाराखेरीज इतर सर्व चळवळी तूर्त तरी बंदच ठेविल्या पाहिजेत. कारण त्याशिवाय हिंदुधर्माची सुधारणा: होणारच नाहीं' असें कित्येक मानतात. कित्येकांनीं चातुर्वण्य व जातिभेद नष्ट झाल्याखेरीज अस्पृश्यता नष्ट होणें असंभवनीय समजून जातिभेदाचे खांचखळगे भरून काढण्याच्या उद्देशानें जातिविध्वंसनार्थ प्रयत्न चालविलेले आहेत. या दृष्टीनें रोटीबंदीचे व बेटीबंदीचे निर्बंध तोडून टाकण्याचा कित्येक प्रयत्न करीत आहेत. याहीपुढें जाऊन एका धर्मवीरानें [ १ ]

' अस्पृश्यता हिंदु समाजांतून नष्ट होणें शक्य नाहीं; म्हणून हा पहा मी परधर्मांत चाललों. मी हिंदूंमध्यें जन्मलों पण हिंदु राहून मरणार नाहीं. ' अशी जाहीर घोषणा करून आपल्या अनुयायांसह धर्मबाह्य होण्याचा घाट घातलेला आहे. अशा प्रकारें परधर्मीय, काँग्रेसभक्त, समाजसत्तावादी, अस्पृश्यांचे कैवारी, वगैरेंच्या गलबल्यांत सर्वसामान्य हिंदूंच्या आचारधर्माची गाळण उडून गेलेली आहे. नको तो धर्म व त्या धार्मिक चळवळी, अशीच आज सर्वत्र मनःप्रवृत्ति दिसून येते. मग धर्मसुधारणेचें कोडकौतुक कोण करणार ?

वरील सर्व मतवाद्यांचा हिंदुधर्माच्या स्वरूपाबद्दल आपापल्यापुरता निश्चयच असल्यामुळें त्यांच्यापुढें हिंदुधर्माच्या मूळ तत्त्वांचा पाढा वाचून तादृश फायदा होत नाहीं. गीतेच्या भाषेंत सांगावयाचें तर आज जिज्ञासु भक्तांची वाण असल्यामुळें ज्ञानी भक्तांची कोणास आवश्यकताच भासेनाशी झालेली आहे. सध्यां धार्मिक चळवळ्यांमध्यें आर्त व अर्थार्थी यांचाच विशेष संबंध येत असल्याचें दिसून येतें. उच्चवर्णीयांकडून पददलित होत असलेले अस्पृश्यच केवळ नव्हेत तर त्यांच्या हालअपेष्टांकडे पाहून कळवळा उत्पन्न होणारे स्पृश्य पुढारीही आर्त या शब्दांत घ्यावे. तसेंच संख्याबलरूपी अर्थ साधण्याकरितां शुद्धिसंघटनाची चळवळ करणारे अर्थार्थी या शब्दांत समाविष्ट करावे. म्हणजे ' उदाराः सर्व एवैते ' हेंच आमचें त्यांच्या बाबतींत मत असल्याचें लक्षांत येऊन त्यांच्या प्रामाणिक हेतूबद्दल गैरसमज पसरविण्याचा ग्रंथकर्त्याचा उद्देश नाहीं ही गोष्ट स्पष्ट होईल. असो. याप्रमाणें आजच्या धार्मिक चळवळ्यांमध्यें जिज्ञासु व ज्ञानी यांचें महत्त्व कमी असल्यामुळें खऱ्या धर्मसुधारणेची कशी गळचेपी होत आहे याचें प्रत्येक विचारी हिंदूनें निरीक्षण करण्याचा आतां प्रसंग येऊन ठेपला आहे.

अस्पृश्यता, पुनर्विवाह वगैरे विवक्षित क्षेत्रांमध्यें काम करण्यांत

गढून गेलेले कार्यकर्ते पुढें पुढें त्या विषयांत इतके अभिनिविष्ट होऊन जातात कीं हिंदुधर्माचीं इतर अंगें त्यांस अगदीं दिसेनाशीं होतात. त्यांनीं अंगीकारलेल्या विषयाच्या बाबतींत जनतेचा प्रचंड विरोध दिसून येतांच कार्यकर्त्यास हिंदुधर्माच्या सुधारणेविषयीं निराशा उत्पन्न होऊन एकतर तो धर्मकारणाचा संन्यास घेतो किंवा वैतागाच्या भरांत अविवेकानें भलत्याच अवयवावर शस्त्रक्रिया करून मूळ महादेहाच्या घातास कारणीभूत होतो.

ही दुरवस्था नष्ट करावयाची तर कार्यकर्त्यांनीं हिंदुधर्माच्या सामान्य तात्त्विक स्वरूपाची माहिती अवश्य करून घेतली पाहिजे. तसेंच प्रचलित हिंदुधर्मातील उपयुक्त ठरणाऱ्या आचारांचा उत्साहपूर्वक स्वीकार करून त्याचा आपल्या सुधारणेस कुशलतेनें कसा उपयोग करून घेतां येईल याकडे अधिक लक्ष पुरविलें पाहिजे. त्याशिवाय त्यांच्या सुधारणा सर्वसाधारण समाजांत दृढमूल होणार नाहींत.

स्पृश्य-अस्पृश्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, सुधारक-दुर्धारक यांना एकत्र आणण्याचे प्रसंग वारंवार आणल्याखेरीज एकमेकांचे गैरसमज दूर होणार नाहींत. रूढ आचारांपैकीं सामुदायिक स्वरूपाच्या आचारांचा या बाबतींत चांगला उपयोग होण्यासारखा आहे. म्हणून प्रत्येक धर्मसुधारकानें रूढ आचारांतील सामुदायिक स्वरूपाचा उपयुक्त भाग योग्य तें वळण देऊन प्रचलित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सामुदायिक हितावरच वैयक्तिक हित अवलंबून असतें. म्हणून सामुदायिक आचारांबरोबरच वैयक्तिक आचारधर्माचाही परिशोधनपूर्वक प्रचार सुरू करणें आवश्यक आहे.

**कांहीं एक नित्यनेमें विण ।**
**अन्न खाय तोचि श्वान ॥**

या समर्थांच्या उक्तींतील रहस्य लक्षांत घेण्याजोगें आहे. स्वातंत्र्याबद्दलच्या विपरीत कल्पनांच्या आहारीं जाऊन व पुढाऱ्यांतील मत-

भेदामुळें उत्पन्न झालेल्या अंदाधुंदीचा फायदा घेऊन वाटेल तसें वागल्यामुळें आज आमच्यांतील कणखरपणा नाहींसा झालेला आहे. नव्या पिढीचा सर्व उत्साह नव्या शिस्तीच्या अभावीं वायां जात आहे. बंधनापलीकडे जाण्याच्या नादांत स्वतःवर स्वतःच्या मनाचाही तांबा राहिलेला नाहीं. ही वस्तुस्थिति उपेक्षणीय नाहीं. परिस्थिति पालटलेली असेल तर नवीं बंधनें स्वीकारा; पण असलेलीं बंधनें तोडून टाकायचीं आणि नवीं कोणतींही मानावयाचीं नाहींत हा आत्मघातकी प्रकार केव्हांही अभिनंदनीय ठरणार नाहीं. म्हणून समाज संयम-प्रधान् व निष्ठावान् व्हावा; त्याची 'मला काय त्याचें?' ही वृत्ति नष्ट होऊन ऐक्य व संघटना वाढावी, असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं धर्मसुधारणेचा विधायक कार्यक्रम हातीं घेतल्यावांचून तरणोपाय नाहीं. ब्राह्मणसभा, हिंदुमहासभा यांनीं हें काम हातीं घेतलें तरी पुष्कळच सुधारणा घडून येईल यांत शंका नाहीं. परंतु या संस्थांचें सामर्थ्य तूर्त तरी मुख्यत्वेंकरून परधर्मीयांच्या हल्ल्यांचा प्रतीकार करणें व राजकीय हक्कांचें संरक्षण करणें यांतच खर्च होत असल्यामुळें त्यांसही या मूलभूत पायाकडे लक्ष देण्यास सवड नाहीं. अशा स्थितींत आमच्या धर्ममंदिराची उभारणी कशी करतां येईल?

यावर कित्येकांचें म्हणणें असें आहे कीं, "तुम्हीं नवीं बंधनें घालूं पाहतां हें बरोबर नाहीं. जुनीं बंधनें तोडून टाकलीं म्हणजे नवे मार्ग आपोआपच निघतात. त्याकरितां 'नव्या धर्मसिंधू'ची गरज नाहीं." पण हें विधान बरोबर नाहीं. मानवी जीवनाची सुधारणा अशी सहजा-सहजीं होत नाहीं. त्याकरितां विद्या, संयम, सहानुभूति इत्यादि सद्गुणांचें योग्य बीजारोपण प्रयत्नपूर्वक करावें लागतें. आजचे समाजशास्त्रज्ञही हेंच तत्त्व मान्य करतात. पुढील उताऱ्यांत रसेल हेंच म्हणत आहे:—

"There is no short-cut to the good life. Whether individual or social. To build up the good life, we

must build up intelligence, self-control and sympathy."
( What I believe P. 72 ).

अर्थात् योग्य विधायक प्रयत्नांच्या अभावीं उत्कर्षाचें शिखर गांठतां येणें शक्य नाहीं, ही गोष्ट प्रत्येक सुधारकानें लक्षांत घेऊन आपल्या सुधारणेचें क्षेत्र त्यानें विधायक व सर्वसाधारण आचारधर्मापर्यंत पोंचेल इतकें व्यापक करावयास नको काय ?

हें झालें धार्मिक प्रदेशांत चळवळ करणाऱ्यांविषयीं. जे हिंदुस्थानचा राजकीय उद्धार अपेक्षितात, तसेंच समाजसत्तावादाच्या धोरणानें जागृति करूं इच्छिणारांनींही हिंदूंच्या धार्मिक समजुती व आचारविचार यांचें योग्य परिशीलन केलेंच पाहिजे. तसें परिशीलन न करतांच उपाययोजना केली जाईल तर ती फार वेळ दृढमूल होणार नाहीं. भारतीयांचें बाह्य वर्तन आज कितीही पालटलेलें दिसलें तरी त्यांचें अंतरंग धर्माभोंवतीं धिरट्या घालीत असतें, हें डोळ्याआड करून भागणार नाहीं.* राष्ट्रीयतेस पोषक अशाच धर्मकल्पनांस चालना द्यावी, पण धर्मकारणच नको असें म्हणणें मात्र योग्य नव्हे.

पण कित्येक रशियाचें उदाहरण पुढें करून धर्मसुधारणेची उपेक्षाच नव्हे; तर

धर्मसुधारणा = समाजनाश

या समीकरणाचा बागुलबोवा पुढें करितात. पण अशानें हिंदवासीयांचा कार्यभाग होणार नाहीं. कार्ल मार्क्स हा स्वतः जर्मन होता, पण जर्मनींत त्याचें तत्त्वज्ञान दृढमूल झालें नाहीं. रशियांत शतकानुशतकें जी झार-शाही चालू होती तीमुळेंच क्रांतीस योग्य अशी भूमिका रशियांत तयार झालेली होती. या भूमिकेची अनकूलता होती म्हणूनच रशियां-तील राज्यक्रांति यशस्वी झाली. त्याचप्रमाणें रशियांतील धर्म

* या मुद्द्याचें विस्तृत विवेचन सह्याद्रीच्या सप्टेंबर १९३५ च्या अंकांत 'भारतीय संस्कृतीचें अंतरंग' या लेखांत केलेलें आहे.

इतका निकृष्टावस्थेस पोचला होता कीं, त्याचा नाश करणें हेंच उचित होतें. पण हिंदुस्थानाची व हिंदुधर्माची तशी स्थिति नाहीं. विशेषतः या धर्मास सांप्रत सत्तेचें पाठबळ नसल्यामुळें या धर्माची सुधारणा केल्यास तो भांडवलशाहीस प्रोत्साहन देईल हें अशक्य आहे. समतेस हा धर्म कसा विरोधी नाहीं हें पुढें पांचव्या प्रकरणांत दाखविलेलेंच आहे. अशा कित्येक गोष्टी लक्षांत घेतल्यास हिंदुधर्म समाजसत्तावादास किंवा साम्यवादास विरोधी नसून अत्यंत अनुकूलच आहे ही गोष्ट दिसून येईल. पण या मुद्द्याकडे दुर्लक्ष करून कित्येक अविचारी अंधानुकरणाच्या दुष्ट मोहास बळी पडून धार्मिक चळवळीस विरोध करीत आहेत हें दुर्दैव होय! आमच्या धर्माचें तात्त्विक स्वरूप 'धर्मस्वरूपनिर्णयां'त विस्तारानें विवेचिलेलेंच आहे. शिवाय पुढील प्रकरणांतही त्याचा थोडाबहुत खुलासा केलेला आहेच. प्रत्यक्ष धर्म-सुधारणेचा कार्यक्रम आम्हीं विस्तारानें येथें मांडलाच आहे. तेव्हां ज्यांना समाजसुधारणेच्या दृष्टीनें या सर्व कार्यक्रमांत समाजविरोध दिसत असेल त्यांनीं खरें म्हटलें तर आपली बाजू योग्यप्रकारें आमच्या निदर्शनास आणून परस्पर सलोखा संपादावा हेंच योग्य. जोंपर्यंत आत्यंतिक स्वरूपाचे उपाय योजतां येत नाहींत, तोंपर्यंत तरी आमच्या समाजसत्तावाद्यांस लोकांच्या हृदयांत गेलेल्या धर्मभावनांना उजळा देऊन त्यांत परिवर्तन करण्याचा कार्यक्रमच हातीं घ्यावा लागेल. तसें ते करतील तरच त्यांच्या सुधारणा हिंदुस्थानांत दृढमूल होतील.

सामाजिक घडामोडींस 'अर्थ' हा प्रयोजक आहे असें कित्येक म्हणतात, तर कित्येक तो 'काम' आहे असें मानतात. महर्षि व्यास या दोन्हींची योग्य व्यवस्था धर्मापासून होते असें सांगत आहेत.

**'धर्मादर्थश्च कामश्च'**

हें सूत्रमय वाक्य किती महत्वाचें आहे हें यावरून दिसून येईल! तेव्हां समाजव्यवस्थेंत क्रांति करूं इच्छिणारांनींही रशियाचें सर्व बाबतींत

अंधानुकरण करून वडाची साल पिंपळास लावून देण्याचा अविचार सोडून देऊन येथील भूमीचा नीट विचार केला तर त्यांसही निदान प्रथमचा कित्येक मैलांचा मार्ग धर्माच्या हातांत हात घालूनच आक्रमणें सोईचें पडेल. या दृष्टीनें पाहतां समाजसत्तावाद्यांसही विधायक धार्मिक आचारधर्माकडे लक्ष देणें आवश्यक आहे.

क्वचित् विधायक सुधारणेचें हें महत्त्व पटूनही त्याकडे दुर्लक्ष केलें जातें. आज कोणताही विधायक कार्यक्रम आखून दिला तरी तो केवळ चर्चेंतच राहून प्रत्यक्ष आचरणांत येणार नाहीं अशी कित्येकांस भीति वाटते. कित्येकांस कोणताही व्यावहारिक मार्ग आजच्या ऐकान्तिक तत्त्वचर्चेपुढें टिकूं शकणार नाहीं असेंही भय वाटतें. हीं दोन्हीं भयें खरींही आहेत. पण तेवढयानें कर्तव्यमार्ग आंखण्याचेंही काम करूं नये असें होत नाहीं. कितीही लोकविरोध झाला तरी नेटानें व निर्भयपणें या कर्तव्यमार्गाची आंखणी केलीच पाहिजे.

तत्त्व आणि परिस्थिति यांच्या समन्वयांतूनच कर्तव्यमार्ग जात असतो. या कर्तव्यमार्गाचा उपदेश करणारास दोहींकडून थपडा खाव्या लागणार हें उघडच आहे. सुवर्णमध्य हा सोन्याप्रमाणेंच एकंदरींत दुर्लभ असतो, असें म्हणवयास हरकत नाहीं. याचें उदाहरणच द्यावयाचें तर श्री. तात्यासाहेबांचें पुढील वाक्यच देतां येईल. लक्ष्मी–देवीदास–विवाहाबद्दल तात्यासाहेब केळकर आपलें मत पुढीलप्रमाणें व्यक्त करतातः—

" अशा तऱ्हेचे विवाह मुद्दाम करा अशी शिफारस मी कुणाला करणार नाहीं; पण समान संस्कृति असणाऱ्या वधूवरांनीं वर्णव्यवस्था अवगणून विवाह केल्यास त्याला मी फारसें नांव ठेवणार नाहीं. समान संस्कृति नसली तर अशा मिश्र विवाहाचे परिणाम विपरीत होतात. म्हणूनच माझी त्याला हरकत. एरवीं वर्णव्यवस्था झाली तरी एक सामाजिक व्यवस्थाच होय. इ. इ. " ( वनभोजन ६९ )

पण, परन्तु, तरी एरवींच्या मसाल्यानें ओतप्रोत भरलेलें या प्रकारचें पक्कान्न कित्येकांच्या तब्यतीस मानवत नाहीं. अशाच कांहीं कारणांमुळें प्रो. वा. म. जोशी यांनीं तात्यासाहेबांस पुढील प्रशंसापत्र बहाल केलें आहे. श्री. जोशी म्हणतातः—

" पुनर्विवाह व घटस्फोट यांना असलेली केळकरांची गुळमुळीत मान्यता निरपवाद अमान्यतेपेक्षां बरी असें पुष्कळांना वाटेल. पण मला ती एका अर्थीं अधिक वाईट अशी वाटते. याचें कारण या गुळ-मुळीत मान्यतेमुळें त्यांत कांहींतरी वाईट आहेच आहे असें ध्वनित होतें."

श्री. खांडेकरांनीं केळकरांच्या मनोवृत्तीचें विश्लेषण करून 'त्यांच्या मनाची घडण शास्त्रज्ञाची आहे, सेनापतीची नाहीं.' असें विधान करून या दोन विद्वानांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण तो बरोबर दिसत नाहीं. सेनापतीचें वर्तनही शास्त्रशुद्ध व तारतम्याचेंच असावें लागतें. कांहींएक विचार न करतां 'ऊठ सोव्या तुझें राज्य' अशा खाक्यानें वागणारास सेनापतित्व बहाल करणें म्हणजे माकडाच्या हातांत कोलीत देणेंच होय. युद्धास निघाल्यावरही कित्येक प्रसंगीं ढाल-तलवार टाकून देऊन पलायन करणेंच शहाणपणाचें ठरतें, †असें जें एका श्रेष्ठ कवीनें म्हटलें आहे त्याचा सेनापतीनें विचार करावयास नको काय ? तेव्हां ज्याच्यावर व्यवहार्य मार्ग सांगण्याची जबाबदारी पडते त्याच्या विवेचनांत 'पण परंतु' येणें अपरिहार्यच ठरतें. याप्रमाणें 'पण परंतू'चाच मार्ग व्यवहार्य ठरतो हें ज्यांस पटेल त्यांस ऐकांतिक उत्तरें हींच खरीं उत्तरें असें कधींही वाटणार नाहीं.

व्यवहाराचे प्रवाह कितीही उलटसुलट दिशेनें वहात असले तरी कुशल नावाडी ध्येयाचा ध्रुव पुढें ठेवून क्वचित् थोडे वळसे घेऊनही

---

† न हरजा मुरक्कब तवां ताखतन ।
कि जाहा सिपर बायद् अंदाखतन ।

आपलें ध्येय सुखानें प्राप्त करून घेऊं शकतो. म्हणून ज्याला सुधारणेची खरी कळकळ असेल त्यानें या 'पण–परंतू'स मुळींच न भितां कार्यक्रम आंखला पाहिजे. तसेंच सुधारकानें आपलें मुख्य कार्यक्षेत्र कोणतेंही असलें तरी धर्माच्या सामान्य तत्त्वांचा नेहमीं विचार बाळगला पाहिजे. विधवाविवाह सुरू झाले म्हणजे झालें, अस्पृश्योद्धार झाला, म्हणजे झालें असलें संकुचित धोरण त्यानें ठेवूं नये. प्रत्येक क्षेत्रांतील सुधारकानें सर्वसामान्य आचारधर्माच्या सुधारणेकडे बारकाईनें लक्ष दिलें पाहिजे. हौदांतील पाणी कायम रहावें अशी इच्छा असेल तर केवळ मोठीं भोकेंच बुजवून काम भागणार नाहीं. लहान छिद्रांतूनही पाणी झिरपून न जाईल याबद्दल तितकीच दक्षता बाळगली पाहिजे. कित्येक बेज-बाबदार उच्छृंखल चळवळ्ये "आज राष्ट्र आपत्तींत आहे. पारतंत्र्यांत कसला धर्म?" असें मानभावीपणानें प्रतिपादीत एका बाजूनें धर्म-कारणास विरोध करीत असतात, तर कित्येक "आमच्या पोटाचा प्रश्न सोडवीत असाल तर तुमच्या धर्माचा उपयोग; नाहींतर तुमचा उपदेश फुकट आहे" असा धाक घालून सुधारकास नाउमेद करण्याचा प्रयत्न करितात. पण याही धाकदपटशांस सुधारकानें भिऊन चालणार नाहीं. स्वतःची चळवळ राष्ट्रोन्नतीस खरोखरी पोषक आहे कीं नाहीं याची मात्र त्यानें डोळ्यांत तेल घालून पारख करीत असलें पाहिजे. असो.

या प्रकरणाच्या आरंभीं ज्या ज्या मतांचा उल्लेख केलेला आहे त्या सर्वांस धार्मिक आचार–सुधारणेकडे लक्ष देणें कसें आवश्यक आहे हें येथवर पाहिलें. तसेंच धार्मिक चळवळ फलद्रूप होण्याकरितां हिंदु-धर्माच्या तात्त्विक स्वरूपाचा प्रचार करून शिवाय परिशुद्ध आचारधर्म जनतेंत रूढ करण्याचाही प्रयत्न केला पाहिजे हेंही सिद्ध झालें. म्हणून येथें प्रथम धर्मशास्त्राचें सामान्य स्वरूप लक्षांत घेऊन मगच विशेष आचारांच्या विवेचनाकडे वळूं.

## प्रकरण दुसरें

# धर्मशास्त्राचा ओनामा

धर्मशास्त्र म्हणजे काय ?

धर्म म्हणजे काय, अधर्म कशास म्हणावें, हा धर्म कां व हा अधर्म कां वगैरे प्रश्नांचीं उत्तरें देऊन धर्माचरण करतांना कर्त्यानें तें कोणत्या प्रकारची मनोवृत्ति ठेवून करावें हें सांगणारें जें शास्त्र त्यास धर्मशास्त्र असें म्हणतात. आज जे स्मृति या नांवाचे ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांस धर्मशास्त्र असें म्हणण्यांत येतें. मनु, याज्ञवल्क्य वगैरे थोर ऋषींनीं या स्मृतिग्रंथांतून मनुष्याच्या आचरणाचे विस्तृत नियम सांगितलेले आहेत. पण प्रत्येक नियम सांगतांना तो कां आचरला पाहिजे हें सांगितलेंच आहे, असें नाहीं. ज्या आचारांचें तत्त्व सहज स्पष्ट आहे असें स्मृतिकारांस वाटलें, त्या आचारांची तात्त्विक पार्श्वभूमि स्मृतिकारांनीं दाखविली नाहीं. परंतु स्मृतिकारांनीं ती दाखविली नसली तरी अभ्यासकांनीं तिची उपेक्षा करावी असें मात्र स्मृतिकारांस वाटत नव्हतें. म्हणूनच मनुस्मृतींत ‘ हें ( मानवधर्मशास्त्र ) विद्वान् ब्राह्मणानें प्रयत्नपूर्वक अभ्यासून ( मगच ) शिष्यांना शिकवावें. * ’ असा स्पष्ट नियम घालून दिलेला आहे. आज कित्येक स्मृति केवळ नियमच सांगतांना दिसून येत असल्या तरी स्मृतिकारांस त्या नियमांच्या तात्त्विक पार्श्वभूमीचें किती महत्त्व वाटत होतें हें यावरून ध्यानांत येईल.

आज धर्मशास्त्राचें परंपराप्राप्त अध्ययन लुप्त झालेलें आहे. यामुळें या तात्त्विक प्रणालीचें संशोधनपूर्वक पुनरुज्जीवन करून ती ग्रंथ-

---

* विदुषा ब्राह्मणेनेदमध्येतव्यं प्रयत्नतः

शिष्येभ्यश्च प्रवक्तव्यं सम्यक् नान्येन केनचित् ॥ मनु. १-१०३

निविष्ट केल्यावांचून गत्यंतर नाहीं. तसें केल्यानेंच खरें धर्मशास्त्र कळून येईल.

**धर्म म्हणजे काय ?**

मनुष्याचें इहपर कल्याण साधून देणारें जें आचरण तोच धर्म होय. कायिक, वाचिक आणि मानसिक अशा तीन प्रकारच्या क्रिया मनुष्याकडून होत असतात. या सर्व क्रिया विशिष्ट बंधनें पाळून केल्या तरच त्या धर्म या सदरांत येतात. एकादें क्षुद्र लौकिक फळ लक्षांत घेऊन या तिहींची जी हालचाल होते ती साधारणतः काम, क्रोध किंवा लोभ यांस अनुलक्षून होत असते. पण या प्रकारानें मनुष्याची अवनति होते. काम, क्रोध व लोभ यांच्या अंकित होऊन जें आपण करितों किंवा बोलतों किंवा मनांत आणितों तें सर्व आपल्या नाशास कारणीभूत होतें. म्हणून हे तीन मनुष्याचे शत्रु म्हणजे साक्षात् नरकाचीं द्वारेंच आहेत असें गीतेंत ( गीता १६.२१ ) म्हटलेलें आहे. हे तीन शत्रु मनुष्याच्या ऐहिक व पारलौकिक उन्नतीस प्रतिबंध करणारे आहेत. मनुष्याचा स्वभाव लक्षांत घेतां हे शत्रु अजिबात नष्ट करतां येणें शक्य नसलें तरी त्यांवर विजय मिळवून त्यांस इच्छेप्रमाणें वागविणें शक्य आहे.

धार्मिक नियम पाळल्यास हे शत्रु अजिबात नष्ट न झाले तरी आपल्या ताब्यांत येऊन त्यांच्या घातकी प्रवृत्तीस आळा घालतां येतो. फार काय मोटारीचें चाक हातांत आल्यावर ज्याप्रमाणें ती वाटेल तशी वळवतां येऊन इष्ट स्थळ गांठण्यास साहाय्यभूत होते, त्याचप्रमाणें धार्मिक नियम पाळून हे विकार ताब्यांत आणल्यास मनुष्यास त्यांच्या मदतीनें उन्नतीचें शिखर गांठतां येतें‡. म्हणून मनुष्याच्या कामक्रोध-मोहास बंधनें घालून त्याच्या इहपर उन्नतीस कारणीभूत होणारा तो धर्म असें धर्माचें लक्षण करावयास हरकत नाहीं.

---

‡ विज्ञानसारथिर्यस्तु मनःप्रग्रहवान् नरः ।
सोऽध्वनः पारमाप्नोति तद्विष्णोः परमं पदम् ॥ कठ. ३.९

वरील लक्षणावरून धर्माचीं तीन फळें व्यक्त होतात. इंद्रियसंयम, ऐहिक उत्कर्ष व पारलौकिक उत्कर्ष हींच तीं फळें होत. या तीन फळांपैकीं पहिल्याचें महत्त्व तितकेंसें लक्षांत सहजासहजीं येत नाहीं. दुसऱ्याचें स्वरूप भ्रमामुळें भलतेंच भासत असतें. आणि तिसऱ्याच्या तर अस्तित्वाबद्दलच शंका येते. व क्वचित् त्याचें अस्तित्व मान्य असलें तरी बाह्य व्यवहारांत वागतांना त्याचा संबंध कसा आणतां येईल याबद्दल शंका उपस्थित होते. यास्तव या तिन्ही फळांचें अधिक स्पष्टपणानें वर्णन करणें जरूर आहे. आज धर्म हा पदार्थ कित्येकांस निरुपयोगी तर कित्येकांस घातुकच वाटतो. याचेंही कारण या फळांबद्दलचा गैरसमजच होय. या फळाचें योग्य विवेचन झाल्याशिवाय मनुष्य धर्मप्रवण होणार नाहीं. कांहीं फळ दिसून येत असेल तरच त्याकरितां मनुष्य आस्थेनें प्रयत्न करतो. निष्फळ दिसणाऱ्या गोष्टींकडे त्याचा स्वाभाविक ओढा नसतो. या सर्व दृष्टींनीं विचार करतां वरील तिन्ही फळांचें स्पष्ट स्वरूप जाणणें आवश्यक असल्यामुळें त्यांचाच आतां विचार करूः—

**धर्माचें फळ**

धार्मिक नियमांची योजना मनुष्यांत संयम उत्पन्न व्हावा म्हणून केलेली असते. अर्थात् धर्माचें एक फळ संयम हें आहे. आत्मसंयम, इंद्रियसंयम, मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह वगैरे शब्दांनीं याच संयमाचा बोध होतो. डोळे, कान वगैरे बाह्य पांच ज्ञानेंद्रियें व सहावें मन यांना ताब्यांत ठेवणें म्हणजेच संयम होय. चांगलें रूप, गोड आवाज वगैरे पुढें येतांच त्यांच्याकडे धाव घेणें हा इंद्रियांचा स्वभावच आहे. या इंद्रियांच्या स्वभावास अनुसरून जर मनुष्य वागूं लागला तर त्यास विश्रांति मिळूंच शकत नाहीं. कारण जगांत विषय अनंत आहेत. अशा प्रकारें इंद्रियांचे अधीन होणें मनुष्याच्या आत्यंतिक हितास (मोक्षास)

**संयम**

तर विरोधी आहेच; पण ऐहिक व्यवहारासही तें विरोधी आहे. विद्यार्थ्याला परीक्षेंत उत्तीर्ण होण्याकरितां सिनेमा, झोंप वगैरेंचा मोह सोडावा लागतो. तन्तुवाद्यें वाजविणारांस रात्रीच्या रात्री जागून काढाव्या लागतात. वैद्य, दुकानदार, यांस तर सर्व आळस टाकून रोगी व गिऱ्हाईक यांस जपावें लागतें. रोगी हाक मारील तेव्हां त्याकडे वैद्य जाणार नाहीं तर त्याचा धंदा चालणार नाहीं. दुकानदार 'दोन पैशांकरितां कोण वर चढून कांडेचिराईत काढण्याचा त्रास घेतो ?' असें म्हणेल तर त्याचा धंदा चालणार नाहीं. मोठमोठे संशोधक व तत्त्ववेत्ते मन व इंद्रियें ताब्यांत ठेवून एखाद्या ध्येयाकरितां प्रयत्न करितात म्हणूनच त्यांस त्यांच्या कार्यांत यश मिळतें. याच्या उलट ज्यांचीं इंद्रियें त्यांच्या ताब्यांत नसतात त्यांची व्यवहारांत फजिती होते. खादाड लोकांची कशी टिंगल होते हें कित्येकांस माहीत असेलच ! एखाद्याला एखादा नाद असला कीं, त्यांतच त्यास गुंतवून आपला कार्यभाग साधणारे धूर्त ज्यांनीं पाहिले असतील त्यांस संयमरहित लोकांची कशी फजिती होते हें कळून आल्याशिवाय राहणार नाहीं. यावर कोणी म्हणतील कीं, आम्ही सर्व विषय टाकून दिले पाहिजेत असें धर्मशास्त्राचें म्हणणें आहे काय ? तर तसें नाहीं. विषयांच्या ठिकाणीं आसक्त होऊं नका, एवढेंच धर्मशास्त्र सांगतें. 'कामात्मता न प्रशस्ता' या वचनांतही विकारांत गढून जाऊं नका एवढेंच सांगितलेलें आहे. परिमित विषयसेवन हें शास्त्रकारांनीं त्याज्य ठरविलेलें नाहीं §. विषयांच्या ताब्यांत न जातां विषयांचें सेवन केल्यानें मनुष्याचें कल्याणच होतें. अतिशय खाणें व अजिबात न खाणें हीं दोन्ही टोकें

§ शब्दादिष्वव्यसनमिन्द्रियजयः **इति केचित्** । अविरुद्धा प्रतिपत्तिर्न्याय्या । शब्दादिसंप्रयोगः स्वेच्छया **इत्यन्ये** । रागद्वेषाभावे सुखदुःखशून्यं शब्दादिज्ञानमिन्द्रियजयः **इति केचित्** ।
(योगभाष्य २-५५)

सोडून देऊन शरीरांतील उत्साह व आरोग्य वाढेल एवढेंच खाणें हा मध्यम मार्ग धर्माचा आहे. हा मध्यम मार्ग संयमनाशिवाय शक्य नाहीं. आहाराप्रमाणेंच विहार, निद्रा वगैरेंचेंही समजावें. काम, क्रोध, लोभ वगैरे मनुष्यांतील स्वाभाविक शक्तींना योग्य वळण देऊन गुणोत्कर्ष साधणें हें मनुष्याचें कर्तव्य होय. हें वळण संयमाशिवाय शक्य नाहीं. म्हणून संयमाची अत्यंत आवश्यकता आहे. हा संयम एकदम साधणें अशक्य असलें तरी योग्य साधनांचा अवलंब करून तो साध्य करून घेतां येतो.

**संयमाचें साधन**

कोणतेंही इंद्रिय कोणत्याही विषयाकडे जाऊं द्यावयाचें नाहीं व मनानेंही कांहीं विचार करावयाचा नाहीं हें कसें शक्य आहे? तेव्हां अशा तऱ्हेनें इंद्रियें आवरून धरतां येणार नाहींत. इंद्रियें आवरण्याचा खरा मार्ग एखाद्या चांगल्या कामांत तीं गुंतविणें हाच आहे. मनांत वाईट विचार येऊं नयेत अशी इच्छा असेल तर एखाद्या चांगल्या विषयांत मन गुंतविलें पाहिजे. असा दुसरा विषय त्यापुढें न ठेवतां नुसतेंच मन आवरूं म्हटलें तर तें जमणार नाहीं. धार्मिक आचार पाळले म्हणजे त्या त्या इंद्रियास उच्च विषय मिळतात. व मग तीं क्षुद्र विषयांकडे धाव घेत नाहींत. रोजचे किंवा मधून मधून धर्मांत जे आचार पाळावयास सांगितलेले आहेत त्यांच्या योगानें मनास उच्च विषय मिळून ते क्षुद्र विषयांत आसक्त होत नाहींत व यामुळें आपोआपच संयम होऊं लागतो. अशा प्रकारचा संयम धर्माचरणानें साध्य होत असल्यामुळें तो धर्माचें एक महत्त्वाचें फळ आहे.

अंतःसमाधान किंवा आत्मतुष्टि अर्थात् श्रेष्ठ प्रकारचें सुख संयमाशिवाय अशक्य आहे. अर्थात् खऱ्या सुखाची इच्छा करणारानेंही संयमाचा मार्ग स्वीकारलाच पाहिजे. धर्माचरणाचें वैयक्तिक फळ अन्तःसमाधानच आहे. [ धर्मस्वरूपनिर्णय पृ. २३८. ] त्या समाधानाचें

संयम हेंच प्रमुख साधन आहे. म्हणून इंद्रियसंयमरूपी साधनाचाच येथें उल्लेख केला आहे. त्यानें प्राप्त होणाऱ्या अन्तःसमाधानाचा येथें शब्दानें उल्लेख केलेला नसला तरी तो येथेंही अभिप्रेतच आहे. हें चाणाक्ष वाचकांनीं ध्यानांत बाळगावें.

**ऐहिक उत्कर्ष**

आतां धर्माच्या दुसऱ्या फळाचा विचार करूं. ऐहिक उत्कर्ष हेंही धर्माचेंच एक फळ आहे. ' धर्मादर्थश्च कामश्च ' म्हणजे पैसा व कामतृप्ति हीं धर्मापासून मिळतात असें महर्षि व्यासांनीं सांगितलें आहे. अर्थात् धर्माचा इहलोकाशीं कांहींएक संबंध नाहीं अशी जी कित्येकांची समजूत आहे ती बरोबर नाहीं. व्यक्तीचा व समाजाचा ऐहिक उत्कर्ष धर्मानें साध्य झालाच पाहिजे. तसें होत नसेल तर धर्मांत कांहींतरी चूक होत आहे हें लक्षांत घेऊन धर्मनियमांत बदल केला पाहिजे. इतर धर्म बायबल, कुराण यांसारख्या एकेका ग्रंथावर अवलंबून आहेत. याचें कारण ते परलोकप्रधान आहेत. इहलोकाचा विचारच त्यांनीं फारसा केलेला नाहीं. हिंदुधर्म ऐहिक भरभराटीचाही विचार करीत असल्यामुळें बदलत्या परिस्थितीस अनुसरून त्यास नव्या नव्या स्मृति बनवाव्या लागल्या. अनंत वेद व अनंत स्मृति या धर्मांत प्रमाण मानल्या जातात, याचें कारण तो इहलोकाचाही विचार करितो हेंच होय. केवळ परलोकाचाच हिंदुधर्मांत विचार केलेला असता तर इतके धर्मग्रंथ हिंदुधर्माच्या परंपरेंत निर्माण झालेच नसते.

पाण्यांत घाण टाकूं नये.
रस्त्यांत लघवी करूं नये.
विद्वान् मनुष्याला दान करावें.
आई, बाप व गुरु यांची सेवा करावी.
ओझेवाल्यास वाट द्यावी.

असले कित्येक नियम स्मृतिग्रंथांत दिलेले आहेत. त्यांचा उद्देश ऐहिक

सुखशांति किंवा भरभराट हाच दिसून येत नाहीं काय? धर्माचा याप्रमाणें ऐहिक उत्कर्षाशीं महत्त्वाचा संबंध आहे हें विसरून चालणार नाहीं.

**उत्कर्षाचें स्वरूप**

महाभारतांत जीं धर्माचीं तीन लक्षणें दिलेलीं आहेत त्यांकडे लक्ष दिल्यास ऐहिक उत्कर्षाचें स्वरूप लक्षांत येतें तीं लक्षणें पुढीलप्रमाणें:—

॥ यः स्यादहिंसासंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥
॥ यः स्याद्धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥
॥ यः स्यात् प्रभवसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥

या तीन वाक्यांत ‘ अहिंसा ’ ‘ धारण ’ आणि ‘ प्रभव ’ अशीं धर्माचीं तीन लक्षणें दिलेलीं आहेत. कोणाचाही द्वेष न करितां सर्वांविषयीं प्रेमभावना ठेवणें यास ‘ अहिंसा ’ असें म्हणतात. परस्परांविषयीं द्वेष-भावना कमी होऊन प्रेमभाव वाढत जाणें हें ऐहिक उत्कर्षाचें पहिलें अंग होय. समाजाचा किंवा व्यक्तीचा निरनिराळ्या हानींपासून बचाव करणें यास ‘ धारण ’ असें म्हणतात. आनुवंशिक रोग निरनिराळ्या सांथी, लोकसंख्येची बेसुमार वाढ अथवा अत्यंत अल्पता, वगैरे गोष्टी समाजास हानिकारक होतात. त्या नाहींशा होणें हें उत्कर्षाचें दुसरें अंग होय. संपत्ति, सत्ता, यश आणि नीति यांची समाजांत वाढ होणें यास ‘ प्रभव ’ असें म्हणतात. प्रभवाचीं हीं चार अंगें समाजास प्राप्त व्हावयाचीं तर निर्भयपणा, तेजस्वीपणा, बुद्धिमत्ता, चतुराई, स्वार्थत्याग सहकारिता, सहिष्णुता, सत्याभिमान वगैरे गुणांची वाढ झाली पाहिजे. असले दैवी गुण ( गीता अ. १६ ) वाढल्यानेंच समाजाची भरभराट होत असते. याप्रमाणें अहिंसा, धारण व प्रभव हीं ऐहिक उत्कर्षाचीं तीन अंगें आहेत. त्यांस धरून असेल तो धर्म व त्याविरुद्ध असेल तो अधर्म होय. म्हणून

( १ ) ज्यायोगें समाजांत परस्पर प्रेमभावना कमी होऊन द्वेष-भावना वाढत जाईल,

( २ ) ज्यायोगें समाजांत रोग वगैरेंचा प्रादुर्भाव होऊन त्याच्या स्थैर्यास बाध येईल,

( ३ ) ज्यायोगें संपत्ति, सत्ता, यश व नीति यांस बाध येऊन निर्भयता, तेजस्वीपणा वगैरे सद्गुणांची पिछेहाट होईल,

अशा प्रकारचे सर्व नियम व आचार अधर्म होत. तसेंच याच्या उलट:—

( ४ ) द्वेषभावना कमी करून प्रेमभावना वाढविणारे,

( ५ ) रोगराई कमी करून आरोग्य व स्थैर्य वाढविणारे,

( ६ ) संपत्ति, सत्ता, निर्भयता, तेजस्वीपणा यांस प्रोत्साहित करणारे,

सर्व नियम व आचार धर्म होत हें सिद्ध होतें. असो. येथपर्यंत धर्माच्या दोन फळांचें विवेचन केलें. आतां तिसऱ्या फळाचा विचार करूं.

**पारलौकिक उत्कर्ष**

मरणोत्तर मनुष्यास जें फळ भोगावयास मिळतें तें दोन प्रकारचें असतें. स्वर्गांत भोगावयाचे उपभोग हा त्याचा एक प्रकार असून दुसरा मोक्षरूप असतो. यासच अपवर्ग असेंही म्हणतात. या दोन पारलौकिक फळांपैकीं पहिलें फळ (म्हणजे स्वर्गलोक) शास्त्रकारांनीं † कमी दर्जाचें ठरविलेलें आहे. कारण त्यांत खरें सुख लाभत नाहीं. पण मोक्ष मात्र सर्व दृष्टींनीं उच्च मानला गेला आहे. मोक्षावस्था प्राप्त झाल्यावर मानव पूर्णपणें आनंदी व दुःखविमुक्त होत असतो. हा मोक्ष प्राप्त करून घेणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे.

† 'प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपाः ।'
'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति.'
'त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।'

हा मोक्ष प्राप्त करून घ्यावयाचा तर प्रथम इंद्रियें व मन यांचा संयम साधावा लागतो. तसेंच ज्ञानविज्ञानावांचून मनःसंयम पूर्ण होत नाहीं; म्हणून ज्ञानविज्ञानपूर्वक कुटुंब, समाज, देश यांची सेवा करणें हा मोक्षाचा मार्ग आहे.

**मोक्षाचें साधन**

धर्मशास्त्रकारांनीं 'देवऋण, ऋषिऋण, व पितृऋण यांची प्रथम फेड करून मगच मोक्षार्थ प्रयत्न करावा; तसें न करतां अगोदरच मोक्षार्थ यत्न करणारा अधोगतीस जातो' § असें निक्षून सांगितलें आहे तें याच कारणास्तव. सुरेश्वराचार्यांनीं 'ऋणानीति ह्यपस्मृतिः' (संबंधवार्तिक श्लो. ४३७) असें म्हणून या स्मृतिवचनांस हरताळ फासला आहे. पण तें योग्य नव्हे. प्राचीन शास्त्रकारांनीं—

**लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः।**
**उभयत्र सुखोदर्क इह चैव परत्र च॥**

(शांतिप. अ. २५९.)

अशांसारख्या कित्येक वचनांत ऐहिक उन्नतीकरितांच धर्माचरण असून त्यानेंच स्वर्ग व मोक्ष सिद्ध होतात असें स्पष्ट सांगितलेलें आहे. एवंच, समाजाच्या सुस्थितीकरितां प्रयत्न करणें हें पारलौकिक हिताच्या दृष्टीनेंही आवश्यकच ठरतें. एखाद्या पारलौकिक आचारामुळें ऐहिक प्रगतीला बाध येत असेल तर अशावेळीं पारलौकिक आचारांचा त्याग करावा असें शास्त्रकार सांगतात. (धर्मस्वरूप निर्णय पृ. २१७ ते २२१ पहा) या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्यास धार्मिक नियम यथायोग्य पाळल्यानेंच मोक्षाची पात्रता येत असते हें सिद्ध होतें. मोक्षाच्या दृष्टीनें धार्मिक नियम कमी दर्जाचे आहेत असें मानणें कां बरोबर नाहीं हें यावरून दिसून येईल. असो. याप्रमाणें धर्माचीं तिन्ही ध्येयें पाहून झालीं व

§ ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत्।
अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानः पतत्यधः॥ मनु. ६.३५.

त्यांच्यांत परस्परविरोध नाहीं हेंही पाहून झालें. आतां धर्माच्या आवश्यकतेचा विचार करूं.

**धर्माची आवश्यकता**

धर्माचीं हीं तीन ध्येयें लक्षांत घेतलीं म्हणजे धर्माची आवश्यकताही आपोआपच सिद्ध होते. ईश्वर किंवा आत्मा न मानणारादेखील समाजोत्कर्ष मानतोच. म्हणून त्याकरितां कां होईना त्याला धर्म आवश्यक वाटणारच ! आज अनेक वेळां धर्म अनावश्यक किंवा घातुक वाटतो याचें कारण आजचे रूढ धार्मिक आचार खऱ्या धर्मास सोडून आहेत, हेंच होय. धर्मशास्त्रवेत्त्यांनीं तात्त्विक पद्धतीचा अवलंब करून जर चालू रूढींचें नीट संशोधन केलें व नव्या कालास अनुसरून धर्माची घडी बसविण्याचा प्रयत्न केला तर धर्माची आवश्यकता आजही दृग्गोचर झाल्यावांचून राहाणार नाहीं.

**धर्म व समाजशास्त्र**

कोणी म्हणतात धर्म जर समाजाच्या उत्कर्षास कारणीभूत होत असेल तर त्याचा समाजशास्त्रानें* विचार करावा. पण हें म्हणणें सर्वांशीं खरें नाहीं. समाजाची सुव्यवस्था हें धर्माच्या तीन फळांपैकीं एक फळ आहे. तेवढेंच कदाचित् समाजशास्त्रीय नियमांनीं साध्य होईल. परंतु संयम व पारलौकिक उत्कर्ष हीं फळें समाजशास्त्रीय नियमांनीं साध्य होणार नाहींत. जिवंत मनुष्याला ज्याप्रमाणें निर्वाहाची चिंता असते त्याचप्रमाणें मेल्यावर आपलें काय होईल याविषयींहि काळजी असते. मेल्यावर काय होईल हें समाजशास्त्र सांगू

---

* खरें समाजशास्त्र धर्मशास्त्राचा विरोध करणेंच शक्य नाहीं, किंबहुना तें धर्मशास्त्रास पोषकच असणार ! अर्थात् आमच्या मतें या दोन शास्त्रांत विरोध नाहीं. तथापि आजच्या संकुचित अर्थानेंच समाजशास्त्राचा विचार येथें देणें योग्य वाटल्यावरून तसल्या अर्थानेंच ' समाजशास्त्र ' हा शब्द या ठिकाणीं वापरलेला आहे.

शकत नाहीं. शिवाय समाजशास्त्र वाईट प्रवृत्तीस आळा घालूं शकत नाहीं. एखादी गोष्ट समाजास घातुक आहे, म्हणून ती त्याज्य होय, असें समाजशास्त्र सांगतें. पण समाजाची एवढी कळकळ प्रत्येकास नसल्यामुळें समाजशास्त्रोक्त नियमांचें परिपालन तत्परतेनें होऊं शकत नाहीं.

**धर्म आणि कायदा**

कोणी म्हणतील तत्परतेनें सदाचरण घडवून आणण्यास कायदा समर्थ आहे. वाईट मार्गानें जाणारास दंड होतो असें कळलें म्हणजे आपोआप तो मार्ग लोक सोडून देतील. तात्पर्य, सदाचरणप्रसार व दुराचरण प्रतिबंध हीं दोन्ही कार्यें कायद्यानें होण्यासारखीं असल्यामुळें त्यासाठीं धर्माची गरज नाहीं असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे. त्यास उत्तर असें:-- कायद्याचें क्षेत्र एका दृष्टीनें फारच संकुचित असतें. प्रत्येक दुर्वर्तन कायद्याच्या क्षेत्राखालीं येतेंच असें नाहीं. मानसिक विचारात्मक कोणतेंच दुर्वर्तन कायद्याच्या कक्षेंत येत नाहीं. वाचिक अपराधांपैकीं फारच थोडे अपराध कायद्याखालीं येतात, हें कायदेपंडितास अवगत आहेच ! प्रत्यक्ष दुर्वर्तनापैकीं देखील साक्षी पुरावा असलेलेंच दुर्वर्तन कायद्याप्रमाणें शासनास योग्य ठरतें. तेव्हां सर्व दुर्वर्तनांस कायदा आळा घालूं शकत नाहीं हें उघड आहे. आतां क्षणभर सर्व दुर्वर्तनें कायद्याच्या कक्षेखालीं येतात असें गृहीत धरलें तरीहि चांगल्या गोष्टी कायदा शिकवील हें शक्य नाहीं. सकाळीं उठून स्नान करावें असा कायदा करतां येणें शक्य नाहीं. तात्पर्य, वाईट वर्तनास आळा घालणें कायद्यास शक्य असलें तरी चांगल्या प्रवृत्ति सुरू करणें त्याच्या कक्षेंत येऊं शकत नाहीं. आतां क्षणभर असेंही मानूं कीं, चांगल्या प्रवृत्तीस वाढविणारेही कायदे केले आहेत व त्यांची अंमलबजावणीही कसोशीनें करण्याइतकी शासनसंस्था खंबीर आहे. तर मग धर्माची जरूर कोठें आहे ? या प्रश्नाचें उत्तर

लक्षांत येण्यास या दोहींच्या भाषेंतील व मनोवृत्तींतील फरक समजून घ्यावा लागेल. 'सकाळीं उठून स्नान न केल्यास अमुक शिक्षा होईल' ही कायद्याची भाषा असेल. या भाषेंत प्रेम तर नाहींच, उलट दरारा किंवा धाक आहे, केवळ धाकानें केलेलें चांगलें कर्मही कर्त्याचा संकोच करणारें असतें. त्यांत समाधान किंवा उत्साह नसतो. याच्या उलट धर्मशास्त्राची भाषा असते. 'अमुक करावें' व 'अमुक करूं नये.' असें धर्मशास्त्र सांगतें हें सांगतांना असें असें वागण्यांत तुझें हित आहे असेंच धर्मशास्त्र जाणवीत असतें. कसल्यातरी दडपणामुळें केलेलें कर्म व स्वतःच्या हिताचें म्हणून केलेलें कर्म यांतील फरक मानसशास्त्रदृष्ट्या लक्षांत घेण्याजोगा आहे. तो लक्षांत घेतला म्हणजे कायद्यापेक्षां धर्मशास्त्रच खरी भरीव सुधारणा कशी करूं शकेल हें लक्षांत येईल. 'देवी टोंचून न घेणारास पन्नास रुपये दंड होईल' अशी दवंडी पिटली गेली म्हणजे लोक टोंचून घेतातच ! पण 'होय, बरोबर आहे रे ! गांवांत देवीची साथ नाहीं हें खरें; पण आसपासच्या गांवांत सुरू झालेली आहे, म्हणून अगोदरपासूनच काळजी घेतलेली बरी.' असें आप्तानें सांगितलें म्हणजे जें समाधान होतें तें नुसत्या दवंडीनें लाभत नाहीं. म्हणून धर्म आणि कायदा यांच्या ध्येयांत फरक नसला तरी शिकवणुकींत फरक आहे हें मान्य केलें पाहिजे. धर्मशास्त्र हें कायदा किंवा समाजशास्त्र यांच्या विरोधी नाहीं. उलट त्यांस अत्यंत उपयुक्तच कसें आहे हें यावरून लक्षांत येईल.

धर्मांत ग्रंथप्रामाण्याला महत्त्व आहे तें या आप्तोक्तत्वामुळेंच आहे.

**धर्म आणि ग्रंथप्रामाण्य**

आपला ज्यांच्यावर किंवा ज्यांच्या सद्धेतूवर विश्वास असेल त्यांचें सांगणें आपण तत्काळ मानतों. त्यांचें म्हणणें खोटें असेल असें आपणांस वाटतच नाहीं. मनु, याज्ञवल्क्य यांच्याबद्दलचा आपला आदरच त्यांचीं वाक्यें प्रमाण मानावयास लावतो. ते खोटें सांग-

तील असें आपणांस वाटतच नाहीं. ते आप्त आहेत याबद्दल आपला ठाम विश्वास असतो. ग्रंथकार आपल्याहून अधिक जाणणारा व आपला हितकर्ता आहे अशी श्रद्धा असली कीं, त्याच्या ग्रंथाला प्रामाण्य येतें. धर्मग्रंथास प्रामाण्य येतें तें या प्रकारानें. कायद्याचें प्रामाण्य त्याच्या मागील दण्डशक्तीवर अवलंबून असतें; पण धर्मग्रंथाचें प्रामाण्य ग्रंथकारावरील श्रद्धेवर अवलंबून असतें.

**धर्म आणि तर्क**

पण या प्रामाण्यापुढें तर्कानें कांहीं बोलूं नये असें नाहीं. ऋषि हे आप्त आहेत. त्यांस कां? असें विचारल्यास राग येतो असें मानण्याचें कारण नाहीं. अर्थात् आज ते हयात नसले तरी त्यांच्या वचनांचा चिकित्सापूर्वक आपण छडा लाविल्यास कांहीं बिघडणार नाहीं. आपण आजारी असलों व कोणाचें औषध घ्यावें याबद्दल आपल्या दोन आप्तांत मतभेद पडला तर त्यांपैकीं कोणाचें म्हणणें ग्राह्य मानावें हें आपण चर्चा करूनच ठरवितों कीं नाहीं? तशी चर्चा केली तर आप्त रागावतात काय? तसेंच धर्मग्रंथांचें आहे. त्यांत विरोध दिसून आला किंवा त्यांच्या विधानांबद्दल आपणांस शंका आली तर 'अब्रह्मण्यम्' म्हणून हलकल्लोळ माजविण्याचें कारण काय? धर्मांत तर्कबुद्धीचा प्रवेश कसा शास्त्रशुद्ध आहे हें धर्मस्वरूपनिर्णयाच्या तेराव्या प्रकरणांत दाखविलेलेंच आहे. जिज्ञासूंनीं तें तेथेंच पाहावें.

**धर्म व परिस्थिति**

ऐहिक उत्कर्ष हेंही धर्माचें फळ आहे हें वर दाखविलेंच आहे. अर्थात् ज्या मानानें परिस्थितींत बदल होईल त्या मानानें धर्माच्या कांहीं नियमांत बदल करावयास पाहिजे हें उघडच आहे. पण धर्मांत बदल करणें म्हणजे धर्म बुडविणें असा भ्रम कित्येक पसरवितात हें बरोबर नाहीं. जुनीं निरुपयोगी किंवा उन्नतीस प्रतिबंधक बंधनें शिथिल करून नवीं प्रस्थापित केल्याशिवाय कोणाचीही उन्नति होणार नाहीं. सुधारकांनीं या

दोहोंपैकीं पहिलें बन्धनविमोचनाचें काम जितक्या जोमानें केलें तितक्या नेटानें नवीन बंधनें रूढ करण्याचें केलें नाहीं.* कदाचित् त्या काळची परिस्थिति तशी असेल. पण सुधारणेच्या एकाच अंगावर अधिक भर दिला गेल्या कारणानें धर्मसुधारणा म्हणजे धर्माचा सत्यनाश असा सामान्य जनतेनें ग्रह करून घेतला असला तर त्यांस फारसा दोष देतां येणार नाहीं. परंतु आजच्या नव्या सुधारकांनीं मात्र सुधारणेच्या वरील दोन्ही अंगांस सारखेंच महत्त्व देऊन चळवळ केली पाहिजे. तसें होईल तरच परिस्थितीप्रमाणें धर्म सुधारणें म्हणजे वारा वाहील तशी पाठ फिरविणें असा अर्थ करून धर्मसुधारणेची निंदा करण्यास कोणीही धजणार नाहीं.

**या ग्रंथाचें प्रयोजन**

सुधारणेची आजपर्यंत दुर्लक्षिलेली विधायक बाजू पुढें आणण्याकरितां हा ग्रंथ आहे. आजपर्यंत परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें जी धर्मसुधारणेची चळवळ कांहींशी एकांगी राहिलेली होती तीस दुसऱ्या अंगाची जोड देऊन ती पूर्ण करण्यापलीकडे या ग्रंथाचा हेतु नाहीं. तसेंच या ग्रंथांतील प्रतिपादनही निराळ्या पद्धतीचें आहे. सामान्य जनता बुद्धिस्वातंत्र्याच्या विरुद्ध असते.

**'परतन्त्रप्रज्ञास्तु प्रायेण जनाः'**

असें श्रीमच्छंकराचार्यांनींही याचकरितां म्हटलें आहे. विशेषतः धर्मशास्त्राचा विषय पुढें आला म्हणजे पुरुषबुद्धीस गुंडाळून ठेवून अंधश्रद्धेच्या तंत्रानें वागणेंच ती योग्य समजते. अशा लोकांस केवळ सामाजिक उत्कर्षाच्या तत्त्वावर उपदेश केल्यास तो तितकासा गळीं उतरत

---

* या मुद्द्याची यथायोग्य सिद्धि करणारे आगरकर वगैरेंचे उतारे पुढें बाविसाव्या प्रकरणांत दिलेले आहेत. ते पाहून या विधानाची सत्यासत्यता वाचकांनीं ठरवावी.

नाहीं. अशा वेळीं प्राचीन स्मृतिग्रंथांतील आज्ञांचें विश्लेषण ‡ करून जर तेंच मत प्रतिपादिलें तर तें अधिक उपयुक्त ठरतें. या ग्रंथांतील विवेचन ही बहुजनसमाजाची मनोवृत्ति लक्षांत घेऊनच केलेलें आहे.

**धर्म कोणाकरितां ?**

मागें दाखविलेलें धर्माचें ध्येय व त्याचा निरनिराळ्या शास्त्रांशीं असलेला संबंध लक्षांत घेतला म्हणजे धर्म दुबळ्यांकरितां, म्हाताऱ्या-कोताऱ्यांकरितां आहे ही प्रचलित समजूत कशी चुकीची आहे तें लक्षांत येईल. तसेंच धर्माचें फळ तर्कशुद्ध असल्यामुळें भोळ्या-भाबड्यांकरितांही तो नाहीं हेंही कळून येईल. गेल्या कित्येक शतकांत धर्माबद्दल अनेक विपरीत कल्पना प्रसृत झालेल्या आहेत. तसेंच कित्येक घातक बंधनेंहि चालू ठेवण्याचा अट्टाहास रूढिनिष्ठांनीं केला. यामुळें धर्म आणि ऐहिक जीवित यांचा कांहींएक संबंध नाहीं; अशी सामान्य जनतेची दिशाभूल झाली. गेल्या शतकापर्यंत चिकित्सायुगाचा फारसा प्रादुर्भाव आर्यावर्तांत झालेला नव्हता. यामुळें तरुण पिढींत तसल्याही धर्माचा कांहीं बोज शिल्लक राहिलेला होता. परंतु आतां ईश्वर, अदृष्ट, स्वर्ग, नरक, पूर्वज यांचा धाक लयास गेलेला असल्यामुळें धर्माचें अधिष्ठान प्रस्तुत चालू जीवितांत आहे हें दाखविल्याशिवाय आजच्य युगांत धर्म जगणें शक्य नाहीं. तसेंच पुराण, कीर्तन, विधवा, म्हातारे यांच्या बाहेर धर्माची आवश्यकताही सिद्ध होणार नाहीं. धर्माचें वर दाखविलेलें फळ लक्षांत घेतल्यास मात्र तरुण पिढीस धर्माचें महत्त्व

‡ प्राचीन स्मृतिग्रंथांतील स्वतःस अनुकूल तेवढयाच वचनांचा उपन्यास करून बाकीचीं विरोधी वचनें गुलदस्तांत ठेविलीं जावीं असें आमचें धोरण नाहीं. या प्रकारच्या धोरणानेंही योग्य तो परिणाम होत नाहीं. म्हणून अनुकूल व प्रतिकूल सर्व वचनांची नीट तात्त्विक उपपत्ति लक्षांत येईल अशा प्रकारचेंच तत्त्वविवेचन आम्हीं ठिकठिकाणीं दिलेलें आहे. ‘ आज्ञांचें विश्लेषण ’ या शब्दयोजनेचें हेंच रहस्य आहे.

पटल्यावांचून राहणार नाहीं. या ग्रंथांतील विवेचन आजचें युग व तरुण पिढी लक्षांत घेऊनच मुख्यत्वेंकरून केलेलें आहे. तरी हा धर्म आपल्याकरितां नाहीं अशी खोटी समजूत त्यांनीं करून घेऊं नये.

संकुचित मनोवृत्तीच्या, अंधश्रद्धाप्रधान, आळशी, भोंदू, अनन्यगतिक लोकांकरितां तसेंच इंद्रियांच्या सर्वस्वीं ताब्यांत गेलेल्या व त्यांतच भूषण मानणाऱ्यांकरितां हा धर्म नाहीं. ज्यांना आपण उदार मनाचे, चिकित्साप्रधान, उद्योगी, सत्यभक्त, गुणानुरागी, दुर्गुणद्वेषी, कर्तव्यपरायण व निर्भय व्हावें, तसेंच शरीर व इंद्रियें यांवर पूर्ण ताबा ठेवून वैयक्तिक व सामाजिक उत्कर्ष साधावा अशी इच्छा असेल त्यांच्याकरितांच हा धर्म उपयुक्त आहे. इतरांस *तो रुचणार नाहीं, व पचणारही नाहीं. असो.

धर्म व त्याचें फळ यांचें स्वरूप या प्रकरणांत संक्षेपानें पाहून झालें. आतां धर्मसुधारणेचें स्वरूप पाहूं.

---

* (१) यो दुर्बलो निरुत्साहो दाम्भिकः कृपणस्तथा।
न तस्याऽयं धर्ममार्गः समुन्नत्यै भविष्यति ॥
(२) निर्भयोदारसत्त्वस्तु यश्च स्याद्विजितेन्द्रियः।
तस्यैवायं धर्ममार्गः समुन्नत्यै भविष्यति ॥
रघुनाथः (तत्त्वस्मृतौ)

## प्रकरण तिसरें

# धर्मसुधारणा आणि धर्मरक्षण

कोणत्याही वस्तूची सुधारणा करणें म्हणजे तिच्यांतील कार्यक्षमता वाढेल असें करणेंच होय. मोडलेली खुर्ची आपण सुधारतों, घराचा जीर्णोद्धार करतों यांत आपणांस कांहीं गैर वाटत नाहीं. किंबहुना त्यांच्या बाबतींत सुधारणा आवश्यकच समजली जाते. पण धर्मसुधारणेचें नांव काढतांच कित्येकांच्या भावनांस धक्काच बसतो. त्यांस या विषयाची चर्चा करणेंही प्रशस्त वाटत नाहीं. फार काय

**धर्मसुधारणा = धर्मविध्वंस**

हें समीकरण कित्येकांच्या मनांत इतकें रुजून गेलेलें असतें कीं सुधारणेस अनुकूल असे जुन्याच ग्रंथांतील स्पष्ट आधार दाखविले तरी त्यांची खात्री होत नाहीं. त्यांस फसवाफसवीचा जबर संशय येतो. अशा पूर्वग्रहानें पछाडलेल्या जनतेच्या मनोभूमिकेंत सुधारणेचें बीज लवकर मूळच धरीत नाहीं. मग सुधारणेचा वृक्ष तेथें कसा वाढीस लागणार ? म्हणून पुढील ग्रंथास प्रारंभ करण्यापूर्वीं सुधारणेचा खरा अर्थ व तिचा धर्मरक्षणाशीं संबंध या गोष्टींचा विचार केला पाहिजे.

कित्येकांस जुनीं बंधनें उध्वस्त करून टाकणें एवढेंच धर्मसुधारणेचें स्वरूप वाटत असतें. वाटेल त्या ठिकाणीं जेवणें, जेवतांना भक्ष्याभक्ष्यविचार न ठेवणें, पोषाख बोलणें चालणें वगैरे बाबतींत रूढीस सोडून वागणें, एवढेंच त्यांच्या मनांत सुधारणेचें स्वरूप असतें. नवीन बंधनें रूढ करण्याचा ते कधीं विचारही करीत नाहींत. मग प्रयत्न दूरच ! नव्या योग्य रूढि प्रचलित करण्याचा तुम्ही प्रयत्न कां करीत नाहीं ? असा या लोकांस प्रश्न केला तर त्यावर त्यांचें " नवे मार्ग आवश्यकतेप्रमाणें आपोआपच निघत असतात; त्यांकरितां विशेष खटपट करण्याचें कारण

नाहीं. " त्यांचें ठराविक उत्तर असतें. पण खऱ्या धर्मसुधारकांनीं या विचारसरणीस योग्य समजणें बरोबर नाहीं.

मोटार, आगगाड्या यांसारख्या बाह्य साधनांचें फळ प्रत्यक्ष व तत्काळ दिसणारें असल्यामुळें तसल्या साधनांचीं प्रशंसा करण्याचें कारण पडत नाहीं. पण अन्तःशुद्धि, सरळपणा, सत्यनिष्ठा वगैरे दैवी गुण व त्यांचें फळ इतकें स्पष्ट दिसणारें नसल्यामुळें त्यांचें महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करावाच लागतो. तसेंच उन्नतीस पोषक असलेल्या गुणांचा जेथें कायद्यानेंही प्रसार करतां येत नाहीं तेथें तो आपोआप होईल असें मानणें म्हणजे मनुष्यस्वभावाचें अज्ञानच प्रकट करणें नव्हे काय ? मागील प्रकरणांत उन्नतीचा अर्थ सांगतांना दैवी गुणांचें महत्त्व दाखविलेंच आहे. त्यांची वाढ आपोआप होणार नाहीं. त्याकरितां कांहीं बंधनें अवश्य स्वीकारलीं पाहिजेत. तीं न स्वीकारतां असलेलीं मात्र तोडण्याचा एकांगी प्रयत्न केल्यामुळेंच सुधारक या शब्दाला रूढीनें ' स्वैर वर्तनाचा ' असा अर्थ आला आहे. सुधारणेचें नांव काढतांच कित्येक साशंक होतात, याचें कारण ही विध्वंसप्रधान सुधारणाच होय ! पण खरी सुधारणा अशी एकांगी नसते. विध्वंसनाबरोबरच विधायक कार्यही करून दाखविणारीच सुधारणा खरी सुधारणा होय !

समाजाचा उत्कर्ष साधणें हें धर्माचें ध्येय आहे हें मागील प्रकरणांत दाखविलेंच आहे. त्यास अनुकूल असलेले रूढ आचार मोडण्याचें कारणच नाहीं. परन्तु जे तसे नसतील त्यांस चालू ठेवणें म्हणजे धर्माचा ऱ्हासच करणें होय ! ज्या काळीं ते ते आचार रूढ झाले त्या वेळच्या विशिष्ट परिस्थितीमुळें त्यावेळीं ते योग्य ठरले असले तरी आज ते तसे ठरतीलच असें नाहीं. कारण आज पुष्कळ बाबतींत बदल झालेला आहे. म्हणून कोणती सुधारणा ग्राह्य व कोणती अग्राह्य, तसेंच जुन्यापैकीं कोणतीं बंधनें कायम ठेवावयाचीं व कोणतीं मोडून त्यांऐवजीं नवीं रूढ करावयाचीं हें ठरविण्यापूर्वी हा परिस्थितींतील फरक नीट समजून घेतला

पाहिजे. या भेदाची नीट कल्पना नसल्यामुळेंच ग्रंथोक्त धर्म आजही तंतोतंत पाळतां येईल असें कित्येकांस वाटतें. कित्येकांस सुधारणा अनवश्यक तर कित्येकांस ती स्वैराचाररूपिणी वाटते. याचें कारण या परिस्थितींतील तफावतीचें अज्ञानच होय. तें नष्ट व्हावें व सुधारणेची आवश्यकता प्रत्ययास यावी म्हणून येथें प्रथम आजच्या युगांतील मुख्य मुख्य बदलाचें निरीक्षण करूं.

( १ ) पूर्वीं प्रवासाच्या सोई आजच्याप्रमाणें नसल्यामुळें तसेंच उदरंभरणार्थ दूरदेशीं जाण्याचा प्रसंग फार करून येत नसल्यामुळें साधारणतः आपापल्या गांवांत व कुटुंबांतच बहुजनसमुदाय रहात असे. यामुळें त्याचा बाहेरील जगाशीं फारसा संबंधच येत नसे. ( २ ) स्वतःच्या कुटुंबांतच राहून जन्म जात असल्यामुळें कुटुम्बांतील प्रमुख सांगेल तेवढें काम केलें म्हणजे बाकी कुटुम्बपोषणाची वगैरे कसलीच चिंता नसे. ( ३ ) वडील मंडळींची आज्ञा मोडण्यापासून कोणताच फायदा होण्यासारखा नव्हता. ( ४ ) व्यवसाय कोणता करावा हें जवळजवळ ठरलेलेंच असल्यामुळें नोकरीसंशोधनांत शक्तिव्यय करावा लागत नसे. ( ५ ) बेकारीची चिन्ता नसल्यामुळें व विवाह पालकांच्याच इच्छेवर सर्वस्वीं अवलंबून असल्यामुळें अविवाहितपणाचें वय आजच्याप्रमाणें वाढलेलें नव्हतें. ( ६ ) एकत्रकुटुम्बपद्धतीमुळें व शिक्षणाच्या अत्यल्प प्रसारामुळें विचारस्वातंत्र्याचा प्रश्नच उपस्थित होत नव्हता. ( ७ ) उच्चवर्णीयांतच शिक्षणप्रसार होता. यामुळें अस्पृश्यांपर्यंत पोंचलेल्या आजच्या शिक्षणामुळें उत्पन्न झालेले नवीन प्रश्न त्यावेळच्या समाजनियंत्यांपुढें आलेलेच नव्हते. ( ८ ) शिक्षण-प्रसार, विभक्तकुटुंबपद्धति, विचारस्वातंत्र्य, जीवनकलहाची तीव्रता, विवाहाचें वाढतें वय यांमुळें गेल्या हजार दीड हजार वर्षांत बसविलेली घडी विस्कळित झालेली असून त्यामुळें मनोभूमिकेंत बराच फरक पडलेला आहे. ( ९ ) मनोभूमिकेंतील बदलाप्रमाणेंच आगगाड्या, मोटारी

या प्रवासाच्या साधनांनीं व खाणावळी उपहारगृहें यांच्या प्रसारानें बाह्य राहणींतही फरक पडत चाललेला आहे. (१०) यांत्रिक सुधारणेनें मजुरांचे बनणारे संघ व परदेशाशीं होत असलेली आयात-निर्यात यांमुळें व्यवसायजीवनवार फारच निराळीं नियंत्रणें उद्भूत झालेलीं आहेत. (११) विमा कंपन्या, बोलपट, छापखाने, वर्तमानपत्रें यांसारख्या नव्या धंद्यांच्या प्रसारामुळें जुन्या धर्मसिंधूंत नसलेल्या नव्या विधिनिषेधांची आवश्यकता उत्पन्न झालेली आहे. (१२) मूळच्या धर्माची रचना झाली त्याकाळीं व त्यानंतरही कित्येक शतकें जगांत दुसरे कोणीच आर्यांइतके संस्कृतिसंपन्न नव्हते. यामुळें इतर राष्ट्रांतील लोकांकडे व अन्य धर्मीयांकडे आर्य ऋषींनीं तुच्छतेच्या दृष्टीनेंच पाहिलेलें आहे. पण आतां परधर्मीयांशीं हरघडी संबंध येतो. केवळ विरोधीच नव्हे तर शासक, बरोबरीचे मित्र, सहव्यवसायी, शेजारी अशा अनेक प्रकारांनीं आज परधर्मीयांशीं संबंध येतो. अशा वेळीं 'यवनांची भाषा बोलूं नये.' (न वदेत् यावनीं भाषाम्) असले जुने नियम पाळून वागणें व स्वतःची आढ्यता किंवा तुसडेपणा व्यक्त करणें म्हणजे अज्ञानानें स्वतःच्या धर्माची बदनामी करून स्वतःची बाह्य प्रगति थांबविणेंच होय. (१३) देशावर देशस्थांची वस्ती, तर कोकणांत चित्पावन, कऱ्हाडे व देवरुखे यांची वस्ती; त्या त्या ब्राह्मणांचा स्वतःच्या परिचयाच्या ब्राह्मणांखेरीज इतर ब्राह्मणांशीं वर्षानुवर्ष संबंधच येत नसे; मग पंक्तिव्यवहार कोठून रूढ होणार ? पण आज केवळ पंचद्रविड ब्राह्मणच नव्हे तर पंचगौड, पंचसारस्वत यांच्याशींही संबंध येतो. फार काय एकाच दालनांत ब्राह्मण, कायस्थ, शेणवी, अस्पृश्य, ब्राह्मणेतर, ख्रिश्चन, पारशी मुसलमान अशा विभिन्न जातींच्या व धर्मांच्या पण शिक्षण, व्यवसाय व आर्थिक दृष्टीनें सारख्याच योग्यतेच्या कारकुनांस वर्षानुवर्ष खुर्चीला खुर्ची लावून काम करावें लागतें. कोठें तो ब्राह्मण म्हणतांच ठराविक तीन चारच पोटजातींचा बोध होणारा काळ व कोठें आतांचा सर्व

हिंदूशींच नव्हे तर अहिंदूंशींही रोज सहकारिता करणें आवश्यक पडणारा समय ? याप्रमाणें कित्येक महत्त्वाचे फरक आज उपस्थित झालेले आहेत व याशिवाय ( १४ ) स्वधर्मीय व स्वसंकृतीचा अभिमानी राजा नसणें,(१५) कायदेमंडळांत इतर धर्मीयांसही बरोबरीनें अधिकार असणें इत्यादि प्रसिद्ध परिवर्तनांचें विस्तारभयास्तव येथें वर्णन केलेलें नसलें तरी चाणाक्ष वाचकांच्या तीं लक्षांत येतील असा भरंवसा वाटतो. आजचा आचारधर्म ठरवितांना हा परिस्थितींतील पालट ध्यानांत घेतला पाहिजे.

आजपर्यंत अनेक स्मृतिकारांनीं जो आचारधर्मांत बदल केलेला आहे, तो त्या त्या काळची विभिन्न परिस्थिति लक्षांत घेऊनच केलेला आहे. अर्थात् सनातन धर्माच्या कोणत्याही अंगांत बदल करण्यास परंपरेचा आधार नाहीं असें मानण्याचें कारण नाहीं. महाराष्ट्रांतील तत्त्ववादी पक्षाच्या पंडितांनीं आजवर सनातनधर्माच्या आचारांत कसकसें परिवर्तन झालेलें आहे हें दाखविलेलेंच आहे. त्याची पुनरुक्ति येथें करण्याचें कारण नाहीं. परंतु त्यामुळें प्रत्येक आचारांत परिवर्तन करणें हेंच या पक्षाचें ध्येय आहे अशी जी कित्येकांची समजूत झालेली आहे ती कशी चुकीची आहे हें समजावें म्हणून परिवर्तनाचें मूळ तत्त्व ध्यानांत येण्यापुरतेंच येथें विवेचन देतों.

पराशरस्मृतीचें प्रयोजन सांगतांना माधवाचार्यांनीं या परिवर्तनाच्या तत्त्वाचें स्पष्ट विवेचन केलेलें आहे. सदर स्मृतीवरील आपल्या टीकेस प्रारंभ करतांना त्यांनीं प्रथम बरेंच प्रास्ताविक विवेचन केलेलें आहे. या विवेचनांतच ' कलियुगांतील लोकांचें अल्प सामर्थ्य व पापबाहुल्य हीं लक्षांत घेऊन पराशरानें पूर्वींच्या ग्रंथकारांनीं सांगितलेल्या आचारांचा, व्रतांचा व प्रायश्चित्तांचा संकोच केला.¶ ' असें रहस्यमय विधान

¶ कलौ हि पापबाहुल्यं दृश्यते स्मर्यतेऽपि च ।
नराः प्रायोऽल्पसामर्थ्यास्तेषामनुजिघृक्षया ।
समकोचयदाचारं प्रायश्चित्तं व्रतानि च ॥
पराशर माधव 1.1

माधवाचार्यांनीं केलेलें आहे. प्रत्यक्ष पराशरस्मृतीकडे पाहिलें तरी त्यांचें विधान सत्यास धरून असल्याचेंच दिसून येतें. कारण त्यांत कित्येक बंधनें शिथिल करून अनेक नव्या सवलती दिलेल्या आहेत.

पण कित्येक संकोच शब्दाचा हा खरा अर्थ न समजून घेतांच नव्या सवलती देण्यास स्मृतिशास्त्र विरुद्ध आहे असें प्रतिपादन करितात. बंधनांची संख्या वाढवून मनुष्याच्या सवलतींचा संकोच करणें एतद्रूपीच परिवर्तन स्मृतिकारांस इष्ट असून त्यांचीं बंधनें कमी करून त्यांस सवलती देणें, अर्थात् विकासरूपी परिवर्तन करणें स्मृतिकारांस मान्य नाहीं असें या पक्षांतील लोकांस वाटत असतें. त्यांच्याच भाषेंत हें मत ‘स्मृतिकारांस संकोचरूपी परिवर्तन मान्य असून विकासरूपी परिवर्तन मान्य नाहीं’ अशाप्रकारें प्रतिपादण्यांत येतें. याचें उदाहरण म्हणून ते विवाहविषयक निर्बंधांचें देत असतात. पूर्वींच्या स्मृतिकारांनीं ब्राह्मणानें चारी वर्णांच्या स्त्रिया कराव्या असें सांगितलें आहे. पण नंतरच्या स्मृतिकारांनीं फक्त ब्राह्मणीशींच विवाह करावा असें म्हटलें आहे. अशा प्रकारचें संकोचरूपी परिवर्तन स्मृतिकारांनीं कोठें कोठें मान्य केलें असलें तरी अधिक सवलती देण्याचें धोरण त्यांनीं मान्य केलेलें नाहीं असें कित्येक रूढिवाद्यांचें म्हणणें आहे; पण तें बरोबर नाहीं. अगदीं पराशर स्मृतींचेंच उदाहरण घेतलें तरी *पूर्वस्मृतिकारांनीं ब्राह्मणांस वर्ज्य ठरविलेल्या कृषीस त्यानें मोकळीक दिलेली आहे. तेव्हां संकोच शब्दाचा आचारांचा संकोच असा अर्थ न घेतां आचारांस मर्यादित करणाऱ्या बंधनांचा संकोच असाच अर्थ घेतला पाहिजे. अधिक बंधनें

* ‘हिंसाप्रायां पराधीनां कृषिं यत्नेन वर्जयेत्’ (मनु. १०.८३)
या वचनांत ब्राह्मणानें कृषिकर्म करूं नये असें स्पष्ट विधान आहे. याच्या उलट
षट्कर्मसहितो विप्रः कृषिकर्म च कारयेत् । पराशर २.२
या वचनांत तें करण्याची परवानगी दिलेली आहे !

सांभाळून कलींतील अल्पसामर्थ्याच्या मानवांस धर्माचरण अशक्य असल्यामुळें कित्येक जुनीं बंधनें रद्द करणें तसेंच नवीं शक्त्यनुसार घालणें या दोन्ही प्रकारांस स्मृतिकारांची मान्यता दिसून येते. याचमुळें कृतयुगांतील पातित्य न यावें म्हणून ज्या देशांत पतित रहात असेल तो देश सोडावा, हा नियम रद्द ठरवून कलियुगांत फक्त पतितांचाच त्याग करावा असा नियम पराशरांनीं* घालून दिलेला आहे. तसेंच इतर युगांत पतिताचें अन्न घेतल्यानें, त्याशीं संभाषण केल्यानें, त्याचें दर्शन केल्यानेंही पाप लागतें असें सांगून कलियुगांत फक्त स्वतः वाईट कर्म केल्यासच पाप लागतें असें § म्हटलें आहे. हे सर्व प्रकार लक्षांत घेतले म्हणजे संकोच शब्दाचा खरा अर्थ कोणता हें कळून येतें.

स्मृतिकारांनीं मानवांस अधिकाधिक बंधनांनीं जखडून टाकून त्यांच्या आचारस्वातंत्र्याचा संकोचच फक्त केलेला आहे असें नाहीं. त्यांनीं कित्येक बंधनांची दोरी आवश्यकतेप्रमाणें सैल किंवा घट्टहि केल्याचें दिसून येतें. उ० कलियुगाच्या आरंभीं अग्निहोत्र व संन्यास हीं वर्ज्य ठरविलेलीं असूनही

**यावद्वर्णविभागोस्ति यावद्वेदः प्रवर्तते ।**
**संन्यासं चाग्निहोत्रं च तावत् कुर्यात् कलौ युगे ।**
( देवलः )

अशा वचनांनीं तीं पुन्हा सुरू करण्याची परवानगी दिल्याचें दिसून येतें. या सर्व गोष्टी जमेस धरल्यास कांहीं बंधनें शिथिल करणें व एकदां प्रचालित केलेलीं लोकहितविघातक ठरल्यास रद्द करणें वगैरे सर्व

---

* त्यजेद्देशं कृतयुगे त्रेतायां ग्राममुत्सृजेत् ।
द्वापरे कुलमेकं तु कर्तारंच कलौ युगे ॥ परा. १. २४

§ कृते संभाषणात् पापं त्रेतायां चैव दर्शनात् ।
द्वापरे चान्नमादाय कलौ पतति कर्मणा ॥ १. २५

प्रकारांस ‘ संकोच ’ हा पारिभाषिक शब्द योजिलेला असल्याचें दिसून येईल !

केवळ हें तत्त्व लक्षांत घेऊनच आम्ही पुढील ग्रंथांत कित्येक आचारांचा संकोच तर कित्येकांचा विकास केलेला आहे. त्यांतही जेथें जेथें विकास केलेला दिसून येईल तेथें तेथें प्रायः कलिवर्ज्यामुळें बंद पडलेली प्रथाच पुन्हा सुरू केलेली आहे असें समजावयास हरकत नाहीं. अर्थात् पुढील विवेचनांत परंपरेचा भंग झालेला आहे अशी कोणास शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

कलिवर्ज्यांच्या प्रामाण्याविषयीं प्राचीन पंडितांतच मतभेद आहेत. तसेंच कलिवर्ज्यप्रकरणांतील निषिद्ध गोष्टींत वेळोवेळीं कशी भर पडत गेलेली आहे हें विद्वद्रत्न दप्तरी यांनीं ( धर्मरहस्य पृ. २४१ वर ) दाखविलेंच आहे. कलींत वर्ज्य ठरविलेले हे आचार केवळ लोकहिता-कडे नजर देऊनच तसे ठरविले असल्याचें कलिवर्ज्यप्रकरणांतील शेवटच्याच श्लोकांत स्पष्ट दाखविलें आहे. तेव्हां त्याच लोकहिता-कडे लक्ष देऊन आजही आचारांचें परिशोधन केल्यास तें परंपरेस धरूनच होणार आहे. एवंच धर्मरक्षणास धर्मसुधारणा आवश्यक आहे हें प्राचीन प्रणालीवरूनच सिद्ध होतें.

सध्यां आपल्या समाजामध्यें सुधारणेबाबत दोन प्रकारच्या भयांनीं स्थान केलेलें आहे. कित्येकांस प्राचीन ग्रंथांचा आश्रय घेतला तर चालू प्रगतीस अडथळा येईल अर्थात् ‘ अभिक्रमनाश ’ होईल अशी भीति वाटते. उलट सुधारणेबरोबर वाहूं लागल्यास सबगोलंकाराचा ‘ प्रत्यवाय ’ उत्पन्न होईल असें भय [illegible]त्र्यांस वाटतें. या दोन्ही भयांचा नाश होईल असाच मार्ग आम्ही ज[illegible] पुढें ठेवीत आहों. श्रीकृष्णांनीं गीतेंत सांगितल्याप्रमाणेंच ‘ नेहाभिक्र[illegible]शोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ’ अशाप्रकारचा प्रगतीस पोषक पण प्रत्यवायर[illegible]हित असा मार्ग जनतेपुढें

सांभाळून कलींतील अल्पसामर्थ्यांच्या मानवांस धर्माचरण अशक्य असल्यामुळें कित्येक जुनीं बंधनें रद्द करणें तसेंच नवीं शक्त्यनुसार घालणें या दोन्ही प्रकारांस स्मृतिकारांची मान्यता दिसून येते. याचमुळें कृतयुगांतील पातित्य न यावें म्हणून ज्या देशांत पतित रहात असेल तो देश सोडावा, हा नियम रद्द ठरवून कलियुगांत फक्त पतितांचाच त्याग करावा असा नियम पराशरांनीं* घालून दिलेला आहे. तसेंच इतर युगांत पतिताचें अन्न घेतल्यानें, त्याशीं संभाषण केल्यानें, त्याचें दर्शन केल्यानेंही पाप लागतें असें सांगून कलियुगांत फक्त स्वतः वाईट कर्म केल्यासच पाप लागतें असें § म्हटलें आहे. हे सर्व प्रकार लक्षांत घेतले म्हणजे संकोच शब्दाचा खरा अर्थ कोणता हें कळून येतें.

स्मृतिकारांनीं मानवांस अधिकाधिक बंधनांनीं जखडून टाकून त्यांच्या आचारस्वातंत्र्याचा संकोचच फक्त केलेला आहे असें नाहीं. त्यांनीं कित्येक बंधनांची दोरी आवश्यकतेप्रमाणें सैल किंवा घट्टहि केल्याचें दिसून येतें. उ० कलियुगाच्या आरंभीं अग्निहोत्र व संन्यास हीं वर्ज्य ठरविलेलीं असूनही

**यावद्वर्णविभागोस्ति यावद्वेदः प्रवर्तते ।**
**संन्यासं चाग्निहोत्रं च तावत् कुर्यात् कलौ युगे ।**
( देवलः )

अशा वचनांनीं तीं पुन्हा सुरू करण्याची परवानगी दिल्याचें दिसून येतें. या सर्व गोष्टी जमेस धरल्यास कांहीं बंधनें शिथिल करणें व एकदां प्रचालित केलेलीं लोकहितविघातक ठरल्यास रद्द करणें वगैरे सर्व

---

* त्यजेद्देशं कृतयुगे त्रेतायां ग्राममुत्सृजेत् ।
द्वापरे कुलमेकं तु कर्तारंच कलौ युगे ॥ परा. १. २४

§ कृते संभाषणात् पापं त्रेतायां चैव दर्शनात् ।
द्वापरे चान्नमादाय कलौ पतति कर्मणा ॥ १. २५

प्रकारांस ‘ संकोच ’ हा पारिभाषिक शब्द योजिलेला असल्याचें दिसून येईल !

केवळ हें तत्त्व लक्षांत घेऊनच आम्ही पुढील ग्रंथांत कित्येक आचारांचा संकोच तर कित्येकांचा विकास केलेला आहे. त्यांतही जेथें जेथें विकास केलेला दिसून येईल तेथें तेथें प्रायः कलिवर्ज्यामुळें बंद पडलेली प्रथाच पुन्हा सुरू केलेली आहे असें समजावयास हरकत नाहीं. अर्थात् पुढील विवेचनांत परंपरेचा भंग झालेला आहे अशी कोणास शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

कलिवर्ज्यांच्या प्रामाण्याविषयीं प्राचीन पंडितांतच मतभेद आहेत. तसेंच कलिवर्ज्यप्रकरणांतील निषिद्ध गोष्टींत वेळोवेळीं कशी भर पडत गेलेली आहे हें विद्वद्रत्न दप्तरी यांनीं ( धर्मरहस्य पृ. २४१ वर ) दाखविलेंच आहे. कलींत वर्ज्य ठरविलेले हे आचार केवळ लोकहिताकडे नजर देऊनच तसे ठरविले असल्याचें कलिवर्ज्यप्रकरणांतील शेवटच्याच श्लोकांत स्पष्ट दाखविलें आहे. तेव्हां त्याच लोकहिताकडे लक्ष देऊन आजही आचारांचें परिशोधन केल्यास तें परंपरेस धरूनच होणार आहे. एवंच धर्मरक्षणास धर्मसुधारणा आवश्यक आहे हें प्राचीन प्रणालीवरूनच सिद्ध होतें.

सध्यां आपल्या समाजामध्यें सुधारणेबाबत दोन प्रकारच्या भयांनीं स्थान केलेलें आहे. कित्येकांस प्राचीन ग्रंथांचा आश्रय घेतला तर चालू प्रगतीस अडथळा येईल अर्थात् ‘ अभिक्रमनाश ’ होईल अशी भीति वाटते. उलट सुधारणेबरोबर वाहूं लागल्यास सबगोलंकाराचा ‘ प्रत्यवाय ’ उत्पन्न होईल असें भय दुसऱ्यांस वाटतें. या दोन्ही भयांचा नाश होईल असाच मार्ग आम्ही जनतेपुढें ठेवीत आहों. श्रीकृष्णांनीं गीतेंत सांगितल्याप्रमाणेंच ‘ नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ’ अशाप्रकारचा प्रगतीस पोषक पण प्रत्यवायरहित असा मार्ग जनतेपुढें

ठेवण्याचा येथें प्रयत्न करावयाचा आहे. याच मार्गानें गेल्यास धर्मसुधारणा सामान्यजनतेंत मान्यता पावणें शक्य आहे.

जनतेवर चिडून किंवा सर्वस्वीं लोकक्षोभाचें भय बाळगून ज्याप्रमाणें सुधारणेचें गाडें पुढें जात नाहीं, त्याचप्रमाणें जनतेच्या पूर्वजांस वेळीं अवेळीं शिव्या देऊनही काम भागत नाहीं. प्राचीन परंपरेचें योग्य परिशीलन करून तसेंच जनतेंत सर्वमान्य ठरलेल्या शास्त्रग्रंथांचें रहस्योद्ग्राही दृष्टीनें अवलोकन करून सुधारणा रूढ करण्याचा प्रयत्न केल्यासच ती दृढमूल होणें शक्य आहे. समाजांत मान्यता पावलेल्या धर्मशास्त्राकडे सर्वस्वीं पाठ फिरवून केलेलें विवेचन कितीही शास्त्रशुद्ध असलें तरी परंपरेच्या ओलाव्याच्या अभावीं जनतेच्या हृदयप्रदेशांत तें लवकर मूळ धरीत नाहीं. पुढील सर्व सुधारणा विवेचितांना आम्हीं हेंच धोरण ठेवलेलें आहे.

या सर्व सूचना ध्यानांत घेऊन आतां कोणकोणत्या आचारांत कसकशा सुधारणा करणें आवश्यक आहे याचा विचार करूं. प्रथम मूर्तिपूजा विचारांत घेतली पाहिजे.

# प्रकरण चवथें

## मूर्तिपूजा

आज आपल्या समाजांत जे कित्येक धार्मिक आचार तुरळक तुरळक चालू आहेत, त्यांत मूर्तिपूजेला महत्त्वाचें स्थान आहे. आजची धार्मिक भावना श्रौत व स्मार्त कर्मांपेक्षां मूर्तिपूजेस अधिक मान देत असल्याचें दिसून येतें. आज श्रौत यज्ञयाग तर मागेंच पडले आहेत. पण स्मृत्युक्त संध्या, वैश्वदेव न करणारे देखील मूर्तिपूजेबद्दल विशेष काळजी घेतात असें दिसून येतें. मुंबईसारख्या महाग वस्तींतही वेळांत वेळ काढून देवपूजा करून जेवणारे श्रद्धाळु पुष्कळ आहेत. ही गोष्ट लक्षांत घेतल्यास मूर्तिपूजा किती दृढमूल झालेली आहे हें दिसून येईल. अलीकडे क्वचित् धातुमय मूर्तींच्या प्रतिमा कोणी कोणी ठेवीत नाहींत; पण निदान दत्ताची तसबीर तरी असतेच ! आणि रोज नाहीं तरी गुरुवारीं सायंकाळीं तिची पुष्पहार व नैवेद्यपूर्वक पूजा होतेच ! घरांत याप्रमाणें धातुमय किंवा चित्रमय प्रतिमांचें पूजन सुरू आहे. मंदिरांत पाषाणमय मोठ्या प्रतिमेची पूजा चालू असते. या मंदिरांतून देवदर्शनार्थ येणाऱ्या लोकांकडे लक्ष दिल्यास मूर्तिपूजा किती दृढमूल झालेली आहे हें लक्षांत येतें. ही स्थिति लक्षांत घेतल्यास मूर्तिपूजा अजिबात नष्ट करण्याची खटपट करण्यापेक्षां तिची सुधारणा करणेंच इष्ट आहे, ही गोष्ट कोणाही चाणाक्ष मनुष्याच्या लक्षांत येईल ! व म्हणूनच मूर्तिपूजेंतील मूळतत्त्व व तिचा योग्य विधि येथें समजावून सांगण्याचा आमचा विचार आहे.

मूर्तिपूजेचा ऐतिहासिक दृष्टीनें विचार करतांना प्रथम हें दिसून येतें कीं, आजची षोडशोपचारपूजापद्धति फार प्राचीन नाहीं. ऋग्वेदांत निरनिराळ्या देवतांचें स्तुतिप्रचुर वर्णन आहे, व त्यांस प्रार्थनाही

केलेल्या दिसून येतात. पण स्तुति व प्रार्थना यांपलीकडे आज जो गंध पुष्प धूप दीप वगैरेंनीं नटलेला व आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान वगैरेंनीं युक्त असा पूजाप्रकार रूढ झालेला आहे, त्याचा मागमूसही वेदांत दिसून येत नाहीं. देवता प्रसन्न व्हावी या भावनेनें तिची स्तुति करणें, तिच्या उद्देशानें एखाद्या खाद्य वस्तूचें अग्नींत हवन करणें, व मागाहून प्रार्थना करणें, एवढेंच मूळ वैदिक काळच्या पूजेचें स्वरूप होतें. वेदांनंतरच्या सूत्रांकडे व स्मृतिग्रंथांकडे पाहिलें तरी हेंच दिसून येतें. त्यांत संध्यावैश्वदेव वगैरे नित्यकर्मांचा जसा एकमतानें पुरस्कार आहे तसा मूर्तिपूजेचा-किंवा आजच्या व्यावहारिक भाषेंत बोलावयाचें तर देवपूजेचा-मुळींच केलेला नाहीं हें नीट लक्षांत घतलें पाहिजे.

आमच्या प्राचीन ग्रंथकारांनीं याप्रमाणें मूर्तिपूजेची आवश्यकता तर प्रतिपादिलेली नाहींच. उलट 'प्रतिमास्वल्पबुद्धीनाम्' म्हणजे 'मंद बुद्धीच्या लोकांचा देव मूर्तींत असतो' असें स्पष्ट म्हटलेलें आहे. अर्थात् मूर्तिपूजेचें कोठें कोठें प्राचीन ग्रंथांत* वर्णन सांपडलें तरी तें उच्च वर्णीयांकरितां (शिक्षितांकरितां) नाहीं हें प्रथम ध्यानांत धरलें पाहिजे. या विधानास भरपूर पुरावे देण्यासारखे आहेत. परंतु येथें एकच पुरावा दिला म्हणजे पुरे होईल! अल्बेरुनी या अरबी प्रवाशानें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलेल्या हिंदुस्थानांतील मूर्तिपूजेच्या प्रकारांचें वर्णन देतांना प्रथम पुढीलप्रमाणें प्रस्तावना केलेली आहे. सदर प्रवासी म्हणतोः—

Since, however, here we have to explain the system and the theories of the Hindus on the subject

---

* याज्ञवल्क्यस्मृति, बौधायनगृह्यसूत्रवगैरे दोन तीन ठिकाणीं मूर्तिपूजेचें वर्णन सांपडतें. पण तेथील वर्णन अगदीं साधें व आलेल्या मान्य व्यक्तीचा सादरसत्कार व्यक्त होईल एवढ्याच स्वरूपाचें आहे. आजचें कृत्रिम व मन्त्रावर भर देणारें स्वरूप त्या ग्रंथकारांसही माहीत नव्हतें असें दिसून येतें.

( Idol-worship ), we shall now mention their ludicrous views; but we delare at once that they are held only by the common uneducated people. For those who march on the path to liberation, or those who study philosophy and theology, and who desire abstract truth which they call sara, are entirely free from worshipping anything but God alone, and would never dream of worshipping an image manufactured to represent Him. ( Alberuni's India, Vol. I p. 112 ).

या उताऱ्यांत अल्बेरुनीनें 'सामान्य व अशिक्षित लोकांत प्रचलित असलेल्या मूर्तिपूजेबद्दलच्याच कल्पना देऊन....उच्च विचारांचे लोक या मूर्तिपूजेपासून पूर्णपणें अलिप्त होते, असें स्पष्ट विधान केलेलें आहे. अल्बेरुनी हिंदुस्थानांत अकराव्या शतकांत आला होता. अर्थात् अकराव्या शतकापर्यंत आज सर्वत्र प्रचलित असलेली मूर्तिपूजा उच्च वर्णियांत प्रसृत झालेली नव्हती हें दिसून येतें !

चालू मूर्तिपूजेस जसा परंपरेचा आधार नाहीं त्याचप्रमाणें तात्त्विक आधारही नाहीं. धर्माचीं जीं फळें दुसऱ्या प्रकरणांत दाखविलेलीं आहेत त्यांपैकीं एकही फळ चालू मूर्तिपूजेनें साध्य होत नाहीं. सामाजिक हिताचा व उत्कर्षाचा या वैयक्तिक पूजेशीं कोणताच संबंध नाहीं, हें उघडच आहे. परंतु वैयक्तिक उन्नतीशींही तिचा संबंध नाहीं. जन्मभर घरांतील देवांची पूजा करणारे किंवा रोज नवीन लिङ्ग तयार करून पार्थिव पूजा करणारे अधिक शांत मनाचे किंवा अधिक एकाग्र चित्ताचे बनतात असें दिसत नाहीं. उलट त्यांचे ठिकाणीं कर्मठपणा, क्रोध, दंभ इतरदेवताद्वेष वगैरे दुर्गुण मात्र वाढत जातात. अर्थात् आजच्या रूढ मूर्तिपूजेच्या प्रकारास परंपरेप्रमाणेंच तत्त्वाचाही आधार नाहीं, ही गोष्ट सिद्ध होत आहे. कित्येकांस हें विवेचन वाचून प्रार्थना-

समाज व आर्यसमाज यांची आठवण होईल. कित्येकांस तर त्यांच्याप्रमाणेंच आम्हीही मूर्तिपूजेचे वैरी आहों असें वाटण्याचा संभव आहे. याकरितां त्या दोन समाजांच्या मूर्तिपूजाविषयक विचारसरणीचा थोडक्यांत परामर्श घेऊं.

प्रार्थनासमाज व आर्यसमाज यांनीं चालू मूर्तिपूजेचें महत्त्व कमी करण्याचा बराच प्रयत्न केला. मूर्तिपूजा व सगुणोपासना यांस सारखेंच लेखून त्यांनीं मूर्ति व मंदिरें यांवर हल्ला करण्यास सुरवात केली. 'मूर्तिपूजा ही मानवी मनाची अवनति करणारी असल्यामुळें ती नष्ट होईल तरच हिंदुधर्माचा उद्धार होणें शक्य आहे' असा या नव्या धर्म' सुधारकांचा ग्रह झाल्यामुळें मूर्तिपूजा—मग ती कोणत्याही स्वरूपांत असो—नष्ट झाली तरच हिंदुधर्माचा तरणोपाय आहे असें त्यांस वाटूं लागलें. त्यांच्या विचारसरणीचा परिचय व्हावा म्हणून येथें त्यांचे मूर्तिपूजेवरील आक्षेप विचारांत घेतले पाहिजेत. ते आक्षेप असेः—

( १ ) मूळ वेदांत मूर्तिपूजा नव्हती.

( २ ) 'एको देवः सर्वभूतेषु गूढः' हें जर तत्त्वतः मान्य करावयाचें तर मग सामान्य जनासाठीं निरनिराळ्या गुणांनीं युक्त देव कल्पावयाची काय आवश्यकता ?.... सामान्य जन सर्वत्र आहेत....मग इस्लामांतील अगदीं सामान्य मनुष्याला निराकार अल्लाची कल्पना होणें जड वाटूं नये आणि आम्हांलाच....भासावी काय ?" ( सुबोधपत्रिका. )

( ३ ) मूर्तिपूजेमुळें सर्वव्यापी देवाप्रमाणेंच उपासकाचाही संकोच होऊन अवनति होते.

( ४ ) मंदिरांची स्थापना होते. पुजारी व मुरळ्या यांचे वाईट संबंध सुरू होतात.

( ५ ) 'मूर्खस्य प्रतिमापूजा', 'मूर्तिपूजाऽधमाधमा' अशीं निषेधक वचनें आहेत.

या पांच आक्षेपांपैकीं चवथा मंदिरांबद्दलचा आहे. तो जरी खरा असला तरी मूर्तिपूजेशीं त्याचा साक्षात् संबंध नाहीं हें वाचकांनीं लक्षांत घेतलें पाहिजे. मंदिरांत संपत्ति एकत्र जमते व तिचा दुरुपयोग होतो हें खरें आहे. पण त्याकरितां मूर्तिपूजा नष्ट करण्याचें कारण नाहीं. मंदिरांची व्यवस्था विशेषतः निधींची व्यवस्था नीट ठेवली म्हणजे झालें. पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत मंदिरांच्या सुधारणेबद्दल विवेचन केलेलेंच आहे. त्यावरून या अनिष्ट प्रकारास कसा आळा घालावा हें लक्षांत येईलच ! म्हणून वरीलपैकीं चवथा आक्षेप सोडून बाकीच्यांचा क्रमानें आतां विचार करूं.

पहिला आक्षेप केवळ ऐतिहासिक स्वरूपाचा आहे. एखादी गोष्ट वेदांत नसली तर तेवढ्यावरून ती त्याज्य ठरविणें युक्तीस सोडून आहे. आजचे इमारतींचे प्रकार, विजेचें बटन दाबतांच प्रकाशित होणारे दिवे, काडी ओढतांच पेटणारा विस्तव हे प्रकार वेदांत नव्हते. तथापि ते आपण उपयोजीत असतोंच ना ? तसेंच ते वेदांत नव्हते म्हणून गर्ह्य मानतों काय ? मग मूर्तिपूजा तरी वेदांत नाहीं म्हणून गर्ह्य कां समजली जावी ? म्हणून रूढ असलेल्या मूर्तिपूजेच्या युक्तायुक्ततेचा विचार करतांना ती वेदांत होती कीं नव्हती हा ऐतिहासिक प्रश्न उपस्थित करणें बरोबर नाहीं.

आतां दुसऱ्या आक्षेपाकडे वळूं. परमेश्वराचें निराकार स्वरूप इतर धर्मांतील सामान्य जनतेस जर जाणतां येतें तर हिंदूंनाच कां येऊं नये ? असा त्या आक्षेपाचा मथितार्थ आहे. अर्थात् यावर उत्तर अनुभवानेंच देतां येणें शक्य आहे. जे निराकाराची उपासना करतात असें वरवर पाहाणारास भासतें, ते खरोखर त्याचीच उपासना करतात काय हें आक्षेपकांनीं चौकसून पहावें. पण इतकें लांब कशास जायला हवें ?

**क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्।** ( गी. १२।५ )
या वचनांत स्वतः भगवंतांनींच अव्यक्तोपासनेचें काठिन्य कबूल केलेलें

आहे. अर्थात् अव्यक्तोपासना सर्वांस साधते असें समजणें अनुभवास धरून नाहीं. ज्या परधर्मांत सगुणोपासना नाहीं त्या धर्मांपैकींच कांहीं मुसलमान कवींचे पुरावे आम्ही या ठिकाणीं मुद्दाम हजर करतों. महंमदानुयायी कवि म्हणतातः—

**बुत-परस्ती को तो इस्लाम नहीं कहते हैं।**
**मातक़िद कौन है ' मीर ' ऐसी मुसलमानी का ॥**
**हर सुबह उठ बुतों से मुझे राम राम है।**
**ज़ाहिद तेरी नमाज़ को मेरा सलाम है॥**
**इन बुतों को तो मेरे साथ मुहब्बत होती।**
**काश बनता मैं बरहमन ही मुसलमों के यवज़ ॥**

महंमदाचेच भक्त या कवनांत मूर्तिपूजेच्या धिक्काराबद्दल मुसलमानी धर्मास दूषण देत आहेत. या प्रकारचे पुरावे लक्षांत घेतले म्हणजे निराकाराची उपासना इतर धर्मांतील सामान्य जनांस करतां येते हें गृहीत प्रमेयच कसें चूक आहे हें लक्षांत येऊन ती साध्य होईपर्यंत सामान्य जनांस मूर्तिपूजा (प्रतिमोपासना) आवश्यक आहे हेंही सिद्ध होतें.

तिसऱ्या आक्षेपांत मूर्तिपूजेमुळें उपासकाची भावना संकुचित होते असें म्हटलेलें असून त्याचें कारण सर्वव्यापी परमेश्वराला लहानशा मूर्तींत पाहून त्याचा संकोच करणें हें दिलेलें आहे. आतां या बाबतींत अधिक तात्विक चर्चेंत न शिरतां आम्ही एकच प्रश्न विचारतों. तुकाराम, गोरा कुंभार, रामदास, ज्ञानेश्वर वगैरे साधुसंत मूर्तिपूजक नव्हते काय ?

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी।
कर कटावरी ठेवोनियां ॥
गळां तुळशीमाळ कासे पीतांबर।
आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥

अशा सगुण साकार मूर्तींच्या ध्यानापासूनच तुकारामानें आपली उन्नति करून घेतली ना ? मग मूर्तिपूजा संकोचक आहे असें कसें म्हणतां येईल ?

महंमदानुयायी कविजन व तुकारामासारखे संतजन यांचे मूर्तिपूजेच्या बाबतींतील विचार वर आपण पाहिलेच. याच विषयावर अगदीं आधुनिक विचारही कोणत्या दिशेनें वाहात आहेत हें लक्षांत यावें म्हणून पुढील आंग्ल-ज्ञानकोशांतील उतारा वाचकांस सादर करणें आवश्यक वाटतें--

In an age when the study of religion was practically confined to Judaism and Christianity, idolatry was regarded as a degeneration from an uncorrupt primeval faith, but the comparative and historical investigation of religion has shown it to be rather a stage of an upward movement, and that by no means the earliest.

( IDOLATRY, Encyclopaedia Britanica )

या उताऱ्यांत तुलनात्मक व ऐतिहासिक अशा दोन्ही दृष्टींनीं विचार करून मूर्तिपूजा ही मानवास उन्नत करणाऱ्या सोपानावरील एक पायरी आहे असें म्हटलेलें आहे. या सर्व मुद्द्यांचा विचार केल्यास वरील तिसरा आक्षेप बरोबर नसल्याचें सिद्ध होतें. आतां शेवटच्या आक्षेपाकडे वळूं.

शेवटच्या आक्षेपांत दोन संस्कृत वचनें उद्धृत केलेलीं आहेत. त्यांपैकीं ‘ मूर्खस्य प्रतिमापूजा ’ या वचनांत ‘ प्रतिमापूजन, ज्याला सूक्ष्म बुद्धि नाहीं अशा मूर्खांकरितां आहे. ’ असें म्हटलेलें आहे. तें

सर्वस्वीं योग्यच होय. ज्याला सूक्ष्म बुद्धि नाहीं त्याला निराकाराचें ध्यान शक्य नसल्यामुळें त्याला प्रतिमापूजाच योग्य आहे असें म्हणण्यांत मूर्तिपूजा त्याज्य कशी ठरते हें आम्हांस तरी कळत नाहीं. ‘ मूर्तिपूजाऽधमाऽधमा ’ या वचनाचीही तीच गत आहे. उत्तम, मध्यम, अधम आणि अधमाधम असे उपासनेचे प्रकार सांगून त्यांत मूर्तिपूजा शेवटच्या दर्जाची ठरविलेली आहे. यांतही कांहींच अयुक्त नाहीं ! मूर्तिपूजा हें अत्यन्त कनिष्ठ प्रकारचें साधन आहे हें मागें दाखविलेंच आहे. अर्थात् वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांनीं मूर्तिपूजेचें स्तोम माजविण्याचें कारण नाहीं, हें आम्हांसही कबूल आहे. तसेंच मूर्तिपूजकांनींही षोडशोपचार पूजेंतच सर्व उपासना येते असें समजून स्वतःच्या प्रगतीचा मार्ग खुंटवूं नये हेंही आम्हांस मान्य आहे. कारण बाह्य उपचारांस महत्त्व नाहीं; पण याचा अर्थ मूर्तिपूजा सर्वांशीं त्याज्य किंवा अवनतिकारक आहे असा मात्र कधींच करतां येणार नाहीं.

मूर्तींची बाह्य षोडशोपचार पूजा याप्रमाणें महत्त्वाची नसली तरी उपासना-ध्यानरूपी आभ्यंतरपूजा मात्र अत्यंत महत्त्वाची आहे. ज्यांस मानसध्यान साधत नाहीं त्यांनीं बाह्य प्रतीक म्हणून राम, कृष्ण, विष्णु यांच्या मूर्ति घेतल्या तर त्यांत कांहीं बिघडलें असें होत नाहीं. सर्वच सारख्या योग्यतेचे नसतात. म्हणून मंदाधिकाऱ्यांकरितां प्रतीकांची सवलत ठेविली न जाईल तर आध्यात्मिक मार्गावर त्यांस एकदम जातां येणें शक्य नाहीं. डॉ. वा. अ. सुखठणकर यांचें “ रविवारचें धर्मपर व्याख्यान बहुतेक श्रोत्यांना दुर्बोध होतें. देवबापाला नमस्कार करून जेवणास सुरवात करणाऱ्या लहान मुलापासून अमृतस्वरूपी परमात्म्याच्या ठायीं जीवात्मा स्थिर करणाऱ्या संतांपर्यंत सर्वांची आध्यात्मिक क्षुधा शमविण्यासाठीं यथायोग्य अन्नपूर्णता करणें हें काम धर्मसंस्थेचें आहे. ” ( सुबोधपत्रिका ) हें विधान ज्या प्रार्थनासमाजीयांस

संमत असेल त्यांचा तरी या विषयांत आमच्याशीं मतभेद होणार नाहीं अशी आशा आहे. असो. आतां ज्यांस मूर्तिपूजा आवश्यक आहे त्यांनीं ती करतांना कोणकोणत्या गोष्टी ध्यानांत घेतल्या पाहिजेत याचा विचार करूं.

मूर्तिपूजकानें पहिली गोष्ट ध्यानांत घ्यावयाची ती ही कीं, मूर्तिपूजा हें साध्य नसून तें एक उपासनेचें साधन आहे. सर्वव्यापी तत्त्वाची उपासना केल्यानें मनुष्याचें मन उच्च व व्यापक बनतें; परंतु सर्व-व्यापक तत्त्वाचें आकलन सहसा होत नसल्यामुळें बाह्य प्रतीकांची जरूरी भासते. या बाह्य प्रतीकांच्या ठिकाणीं चित्त लवकर स्थिर व्हावें म्हणून पुष्पमाला वगैरेंनीं त्यांस आकर्षकपणा आणावा लागतो. आजच्या रूढ षोडशोपचारांचें मूळ ज्याप्रमाणें मागें दाखविल्याप्रमाणें आलेल्याचें स्वागत करण्याच्या भावनेंत आहे, त्याचप्रमाणें मूर्तीकडे चित्त चटकन् आकर्षित व्हावें म्हणून तिच्या आकर्षकता-संपादनांतही आहे असें दिसून येईल. प्रशान्त स्थानाचा मनाच्या एकाग्रतेस अत्यंत उपयोग असल्यामुळें मूळ स्वतंत्र देवघराची कल्पना निघालेली आहे. एवंच सर्वव्यापी परमात्म्याची उपासना ज्यांस शक्य नाहीं त्यांच्याकरितां—म्हणजेच सर्वसाधारण जनतेकरितां—परमात्म्याच्या उपासनेचें द्वार म्हणून बाह्य प्रतीकाची आवश्यकता आहे. आणि एवढ्याच रूपानें मूर्तिपूजा शास्त्रकारांस मान्य आहे. मूर्तीची बाह्य पूजा वाढविण्यांत अर्थ नसून आपल्याला तिचें ध्यान करणें सुलभ जावें, तिच्यावर चित्त लवकर एकाग्र व्हावें म्हणूनच जेवढे बाह्य उपचार आवश्यक असतील तेवढे करावे. पण त्यांचें स्तोम माजविण्याचें कारण नाहीं.

योगशास्त्राच्या ग्रंथांत समाधीची पहिली पायरी म्हणून धारणा व ध्यान यांचा उपदेश केलेला आहे. एखाद्या बाह्य ठिकाणीं चित्त स्थिर करणें यास धारणा असें नांव आहे. या चित्तस्थैर्याचें फारच महत्त्व आहे. योगसूत्रांत या चित्तस्थैर्याचे अनेक उपाय सांगून शेवटीं ‘ कोण-

त्याही प्रिय वस्तूचें ध्यान करून चित्तस्थैर्य साधावें‡' असें सांगितलें आहे. त्याप्रमाणें पाहिलें तरी उपासनेचें बाह्य प्रतीक म्हणूनच मूर्तीस किंमत आहे असेंच सिद्ध होतें. या मूर्तीची उपासनाही कायम एकाच स्वरूपाची करण्यास सांगितलेलें नाहीं. प्रथम शंखचक्रादियुक्त मूर्तीचें ध्यान करून मग त्या साधनांनीं रहित अशा केवळ मूर्तीचें ध्यान करण्याविषयीं जुन्या ग्रंथांची आज्ञा आहे.*

धारणा किंवा ध्यानरूपी उपासना सुलभ व्हावी म्हणून मूर्तीची आवश्यकता असली तरी मूर्ति म्हणजे देव नव्हे हें उपासकानें पक्कें लक्षांत बाळगलें पाहिजे. तसेंच प्राणप्रतिष्ठेनें मूर्तींत जीव येत नाहीं, अर्थात् निजण्याकरितां पलंग, थुंकण्याकरितां पिकदाणी वगैरे मोळसट प्रकार चालू ठेवण्याचें कारण नाहीं. प्राणप्रतिष्ठेनें मूर्तींत जीव येत

---

‡ यथाभिमतध्यानाद्वा । यो. सू. १-३९

योगभाष्य—यदेवाभिमतं तदेव ध्यायेत्। तत्र लब्धस्थितिकमन्यत्रापि स्थितिपदं लभत इति ।

भावागणेशवृत्तिः—किंबहुना यदेवाभिमतं हृदि हरिहरमूर्त्यादिकं तदेवादौ ध्यायेत् ।

मणिप्रभा—किंबहुना यदेवेष्टं शिवरामकृष्णादिरूपं तदेव ध्यायेत् तत्र लब्धस्थितिकं अन्यत्रापि स्थितिं लभते ।

* विष्णु वगैरे मूर्तीचें ध्यान प्रथम —

'प्रलम्बाष्टभुजं विष्णुमथवापि चतुर्भुजम् ।
शार्ङ्गचक्रमहाखड्गशङ्खाक्षवलयान्वितम् ।
चिन्तयेत्तन्मयो योगी समाधायात्ममानसम्' ॥

याप्रमाणें शङ्खचक्रादियुक्त करून नंतर—

'ततः शङ्खमहाचक्रशार्ङ्गादिरहितं बुधः ।
चिन्तयेद् भगवद्रूपं प्रशान्तं साक्षसूत्रकम्' ॥ वि. पु. ६।७।८६

याप्रमाणें शंखादिरहित अशा केवळ मूर्तीचें व मग क्रमाक्रमानें एकएक अवयव कमी कमी करीत शेवटीं अत्यन्त सूक्ष्माचें ध्यान करण्यास सांगितलें आहे.

नाहीं याचे दाखले सोमनाथ व काशीविश्वेश्वर यांचे इतिहास देतील; ते पहावे. तुकाराम महाराजही

पाषाण देव पाषाण पायरी ।
पूजा एकावरी पाय ठेवी ।
सार तो भाव सार तो भाव ।
अनुभवीं देव तेचि झाले ॥

वगैरे उक्तींत हेंच सांगतात. म्हणून मूर्तींत मंत्रांनीं जीवचैतन्य उत्पन्न होतें¶ असें मानून विशेषतः मंदिरांत जे कित्येक हास्यास्पद प्रकार चालू असतात त्यांस ताबडतोब आळा घातला पाहिजे.

पूजेचा किंवा उपासनेचा मुख्य विषय परमात्माच असल्यामुळें त्याची ज्या प्रतीकाच्या आधारानें पूजा करावयाची तें प्रतीक अमुकच असलें पाहिजे याबद्दल आग्रह नाहीं. कोणत्याही दैवी विभूतीचें प्रतीक घेऊन पूजा करण्यास हरकत नाहीं. (गीता. ७-२१) मात्र एका प्रतीकाची पूजा करणें म्हणजे दुसऱ्या प्रतीकाचा तिरस्कार करणें असें समजूं नये. म्हणून एका प्रतीकाच्या भक्तानें दुसऱ्या प्रतीकाचा किंवा त्याच्या भक्ताचा द्वेष करणें हें केव्हांही समर्थनीय नाहीं. मूर्तिपूजा या द्वेषभावास कारणीभूत होते असें इतिहासावरून दिसून आलेलें आहे. पण तत्वतः तसें नाहीं. तरी हा द्वेषभाव पूजकानें टाकून द्यावा.

सर्वव्यापी परमात्म्याकडे एकदम चित्त एकाग्र होत नाहीं म्हणून प्रतीकें अस्तित्वांत आलीं. अर्थात् बाह्य प्रतीक उपासनेस साधनभूत आहे हें लक्षांत घेऊन बाह्य प्रतीकाशिवाय ध्यान साधूं लागतांच तें सोडून दिलें पाहिजे. बाह्य प्रतीकाशिवाय जर चित्त एकाग्र होत असेल

---

¶ प्रतिष्ठापनाविधीचा मूळ उद्देश 'हा सामान्य दगड नसून यामध्यें प्रत्यक्ष देवता येऊन राहिलेली आहे' ही भावना दृढ करणारा समारंभ एवढाच आहे.

तर तें केव्हांही उत्तमच असल्यामुळें अशी अवस्था प्राप्त झाल्यावर प्रतीकपूजेंत गुरफटून राहून उन्नति थांबविणें योग्य नाहीं.

ध्यानाचें किंवा एकाग्रतेचें साधन म्हणूनच प्रतीकपूजा करावयाची असते. म्हणून एकाच वेळीं २०-२५ देवांची एकाच देव्हाऱ्यांत पूजा करणें कोणत्याही कारणास्तव युक्त नव्हे. जुन्या घराण्यांतून कुळ-परंपरांगत देवतांची संख्या वाढीस लागते व तें सर्व देव धुऊन जाग्या-वर ठेवण्यासच १५-२० मिनिटें लागतात. पण कोणत्याही तात्त्विक दृष्टीनें विचार करतां हें बरोबर नाहीं. ज्या मूर्तीची देव म्हणून स्थापना केली ती काढून कशी टाकावी असा कित्येकांस प्रश्न पडतो व त्यामुळेंच ही देवांची संख्या फुगत जाते. पण मूर्तींत देवत्व नसतें हें लक्षांत घेतलें म्हणजे तो प्रश्न आपोआप सुटेल! प्राणप्रतिष्ठित गणपतींतील देवत्व ' गच्छ गच्छ सुरश्रेष्ठ ' असें म्हणून अक्षता फेकतांच निघून जातें ना? मग तसेंच याही ठिकाणीं कां होऊं नये? पण दिवसेंदिवस असे देव्हारे व अशीं घराणीं लुप्तच होत चाललेलीं आहेत. तसेंच अगदीं अलीकडल्या पिढींत धातुमय प्रतिमा नियमानें पुजणारे भक्तही फारसे दिसून येत नाहींत. म्हणून या प्रथेबद्दल याहून अधिक न लिहितां नव्या युगास अनुसरून मूर्तिपूजा कशी करावी हेंच आतां पाहूं.?

नव्या पिढीनें आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीनें जपावर अधिक भर द्यावा. तोही रामनामाचा न करतां सूर्यासारख्या प्रत्यक्ष प्रतापी व तेजस्वी देवतेचा करावा. त्याकरितां गायत्रीमंत्र शुद्ध शिकून घ्यावा. तो मंत्र जपतांना सूर्याचें ध्यान करावें. जुन्या सर्व प्रतीकांपेक्षां सूर्य ही एकच देवता नव्या हिंदूंनीं पसंत करून सकाळसंध्याकाळ तिला अर्घ्य देऊन गायत्री जपाचे वेळीं तिचेंच ध्यान करावें. हीच वैयक्तिक मूर्तिपूजा आज प्रभावी ठरूं शकेल. बाह्य मूर्तीची भक्तिभावानें पूजा करावी व मग देवासकट सगळें सोवळ्यांत बंद करून तें गांठोडें पेटींत बंद करून

दुसऱ्या गांवास जावें हा प्रकार आज अगदीं कसासाच वाटतो. पण या सूर्योपासनेच्या प्रकारांत असला वेडगळपणा मुळींच नाहीं. तुम्ही कोठेंही जा भगवान् सूर्यनारायण तेथें आहेच! त्याच्या प्रभावाची प्रचीतिही क्षणोक्षणीं येणारीच असल्यामुळें त्याचें देवत्व स्वतःसिद्धच आहे. तात्पर्य, सर्व हिंदूंनीं यापुढें याप्रमाणें 'सविता' हाच एक आपला देव आहे असें समजून साष्टांग नमस्कार, संध्येंतील अर्घ्य व जप या तीन उपचारांनीं त्याची पूजा करावी. मन्वादि जुन्या स्मृतींत संध्या, वैश्वदेव यांस जितकें महत्त्व दिलेलें आहे तितकें देवपूजेस नाहीं. अर्थात् बाह्य रूढ मूर्तीपूजा नष्ट होऊन आम्ही वर दिलेला प्रकार रूढ झाला तर जुन्या परंपरेचें एक तऱ्हेनें पुनरुज्जीवनच झालें असें म्हणतां येईल!

आजच्या सर्व शिक्षितांनीं 'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि' असें म्हणून प्रत्यक्ष भगवंतांनीं उपदेशिलेला जपयज्ञाचा प्रकार अमलांत आणावा व चालू* मूर्तिपूजेस फाटा द्यावा. जप म्हणजे नुसती वटवट नव्हे तर त्या त्या मंत्राचा अर्थ मनांत आणून आपण तसें होण्याबद्दलची भावना दृढ करणेंच होय. सूर्याचा जप करावयाचा म्हणजे त्याच्याप्रमाणें आपण तेजस्वी आहोंत अशी भावना दृढ करावयाची. आजच्या सर्व शिक्षितांस ही सूर्योपासना अगदीं साधण्यासारखी आहे. सूर्य ही देवताही प्राचीन काळापासून मान्यता पावलेली आहे.

**अग्नौ क्रियावतां देवो दिवि देवो मनीषिणाम्।**
**प्रतिमा स्वल्पबुद्धीनां योगिनां हृदये हरिः॥**

या वचनांत विचारवंतांचा देव द्युलोकांत असतो असें म्हणून सूर्याचेंच माहात्म्य वर्णिलेलें आहे. म्हणून आज प्रत्येक हिंदूनें या सूर्योपासनेचाच पुरस्कार करावा अशी आमची विनंति आहे.

---

* मंदिरांत सामुदायिक रूपानें होणारी पूजा कशी योग्य आहे हें पुढील प्रकरणांत दाखविलेंच आहे.

उपनिषदांत‡ सूर्य हें अग्नीचेंच एक रूप असून वायु हेंही त्याचेंच दुसरें रूप आहे असें म्हटलें आहे. कात्यायन महर्षींनीं ऋक्संहितेच्या सर्वानुक्रमामध्यें 'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च' हें प्रमाण देऊन ऋग्वेदांतील सर्व देवतांचा अंतर्भाव सूर्य या एकाच देवतेंत होतो असें स्पष्टपणें विधान केलें आहे. अर्थात् जुन्या प्रणालीप्रमाणेंच अग्नि, वायु, व सूर्य हीं तिन्ही एकाच देवतेचीं स्वरूपें आहेत हें सिद्ध होतें. म्हणून उपनयन–विवाहप्रसंगीं अग्नीची उपासना केली तरी ती सूर्याचीच उपासना ठरते. तसेंच चित्तैकाग्र्याकरितां प्राणायाम करणेंसुद्धां सूर्योपासनेंतच येतें. याप्रमाणें पाहिल्यास सूर्योपासना कशी व्यापक स्वरूपाची आहे हेंही लक्षांत येईल. आजच्या भौतिक शास्त्राप्रमाणें पाहिलें तरी सूर्य हें विश्वाचें जीवन आहे, हा सिद्धान्त सर्वमान्य आहे. तेव्हां रोजच्या वैयक्तिक उपासनेंत बाह्य प्रतीकांस इतःपर स्थान न देतां या प्रकारच्या सूर्योपासनेस तें द्यावें हेंच उचित होय.

या वैयक्तिक पूजेशिवाय दुसरी बाह्य पूजाही प्रत्येक हिंदूनें केली पाहिजे. ती म्हणजे

**'स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः'**

या वचनांत सांगितलेली कर्तव्यपालनरूपी बाह्य पूजा होय. ठराविक वेळीं सूर्याची १५-२० मिनिटें उपासना केली व बाकीचा दिवस मन मानेल तसे व्यवहार करण्यांत घालविला तर तें धर्मसंमत आहे असें कोणीही समजूं नये. स्वतःच्या वांटणीस आलेलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावणें, ज्या समाजांत आपण जन्मास आलों त्याच्या उत्कर्षार्थ मन लावून प्रयत्न करणें ही परमात्म्याची खरी पूजा आहे. हें कर्तव्य चुकवून केलेली वैयक्तिक उपासना निष्फल होय. वर जी सूर्योपासना सांगितलेली आहे ती ही कर्तव्यकर्मपूजा कामक्रोधरहित होऊन नीट-

‡ स ( अग्निः ) त्रेधात्मानं व्याकुरुतादित्यं तृतीयं वायुं तृतीयं स एष प्राणस्त्रेधा विहितः । बृह. १.२.३

पणें साधावी म्हणूनच होय. या कर्तव्यकर्मपूजेसच वर्णधर्म असें प्राचीन नांव असून या वर्णधर्माचें विवेचन पुढील प्रकरणांत केलेलेंच आहे. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास ( १ ) नित्य आवश्यक धार्मिक कार्यक्रमामध्यें षोडशोपचार मूर्तिपूजेस स्थान देऊं नये; ( २ ) वर दिलेल्या तीन प्रकारच्या सवित्याची वरील उपचारांनीं पूजा मात्र तत्परतेनें करावी, हे दोन सिद्धांत सिद्ध होतात.

या ठिकाणीं कोणी असा प्रश्न उपस्थित करील कीं, यापुढें पाद्य, स्नान, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्यपूर्वक मूर्तिपूजा नष्ट करावी कीं काय? तर असें नाहीं. प्रत्येकानें व्यक्तिशः ती रोज करूं नये एवढेंच वर दाखविलें आहे. मंदिरांतील भव्य मूर्तीची पूजा मोठ्या थाटानें व्हावी असेंही त्याबरोबरच आमचें म्हणणें आहे. अर्थात् रूढ मूर्तिपूजेची प्रथा मंदिरें, सामुदायिक उत्सव व संस्कार यांसारख्या प्रसंगीं चालू ठेवण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं. मात्र अशा प्रकारची मूर्तिपूजा हें मंदिराचें किंवा उत्सवाचें महत्त्वाचें अंग नव्हे. मंदिरें, उत्सव व संस्कार यांची आकर्षकता वाढविण्याकारितांच त्यांत पूजेचा विधि ठेवावयाचा असतो हें ध्यानांत घेतलें म्हणजे झालें.

आम्ही मूर्तिपूजेचे अंध अनुयायी नाहीं; तसेंच व्यर्थ द्वेष्टेही नाहीं. म्हणून मंदिरांतून ही पूजा चालू राहिल्यास 'अब्रह्मण्यम्' झालें असें आम्ही म्हणणार नाहीं. तसेंच निरनिराळे सण, उत्सव व संस्कार यांच्या निमित्तानेंही केव्हां केव्हां षोडशोपचार पूजेचा अवलंब करावा लागतो, त्यासही आमचा विरोध नाहीं. तसेंच एखाद्यानें देवाची तसबीर घरांत ठेविली व तिच्यावर केव्हां हार घातला तर तेवढ्यानें 'अब्रण्यम्' झालें असें मानण्याचें कारण नाहीं. ज्यांना या निरुपद्रवी भावनांची उपयुक्तता वाटत नाहीं त्यांनीं त्या उपेक्षणीय समजाव्या म्हणजे झालें. पण त्याकरितां मूर्तिपूजेवरच शस्त्र उगारणें उचित नव्हे. हें कोणाही चतुर वाचकास कळून येण्याजोगें आहे.

येथपर्यंत आज रूढ असलेल्या वैयक्तिक मूर्तिपूजेची निष्फळता* दाखवून त्याबद्दल कोणती उपासना आवश्यक आहे याचा विचार केला. आतां गीतेंत 'स्वकर्मणातमभ्यर्च' म्हणून वर्णिलेल्या महत्त्वाच्या कर्ममय पूजेकडे अर्थात् वर्णधर्माकडे वळूं.

## शुद्धिपत्र

| पृ. | ओ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४२ | १५ | अभ्यंतर | आभ्यंतर |

*" वरवर पाहणारे लोक जुना धर्म व प्रार्थनासमाज ह्यांतील फरक म्हणजे प्रार्थनासमाज मूर्तिपूजा मानीत नाहीं, अवतार व ग्रंथप्रामाण्य त्यास कबूल नाहीं, एवढाच समजतात. परंतु ह्या बाबी वास्तविक गौण व आकस्मिक आहेत." हे डॉ. य. वा. भांडारकर यांचे उद्गार ज्या प्रार्थनासमाजीयांस मान्य असतील त्यांस हा 'निष्फळता' शब्द अयोग्य वाटणार नाहीं असें वाटतें. 'सर्वप्रकारची मूर्तिपूजा ही घातुकच आहे' असें प्रार्थनासमाजाचेंही मूलभूत तत्त्व नसावें असें या उताऱ्यावरून वाटतें.

## प्रकरण पांचवें

# वर्णधर्माचें महत्त्व

आज हिंदुधर्म म्हणजे वर्णाश्रमधर्म अशीच प्रायशः समजूत आहे. पण स्मृतींतील वर्णधर्म व आश्रमधर्म आज कोणीच पाळीत नाहीं. आश्रमांपैकीं वानप्रस्थ व संन्यास आतां मागेंच पडले आहेत. ब्रह्मचर्याश्रमही यथोचित आज आचरला जात नाहीं. गुरुगृहीं निदान बारा वर्षें राहून नियमपूर्वक विद्यासंपादन आज कोणीही करीत नाहीं. शिक्षक व विद्यार्थी यांचा केवळ शाळेंतच संबंध येतो. अशा स्थितींत विद्यार्थ्यांच्या शारीरिक व नैतिक उन्नतीची जबाबदारी शिक्षकांवर राहिलेली नाहीं. याप्रमाणें तिन्ही आश्रम आज जवळजवळ लुप्तच झालेले आहेत. गृहस्थाश्रम मात्र अजूनही चालू आहे. आपापल्या वर्णास अनुसरून व्यवसाय करावे व केवळ स्वकुटुंबीयांचेंच नव्हे तर विद्यार्थी, संन्यासी वगैरे सर्वांचेंच पोषण करावें हा गृहस्थाश्रमाचा मूळ हेतु आहे. याप्रमाणें गृहस्थाश्रमांतच मुख्यत्वेंकरून वर्णधर्माचा संबंध येतो. पण आज गृहस्थ, संन्यासी व ब्रह्मचारी यांच्या धार्मिक आचरणांत व समजुतींत जसा भ्रान्त मतांचा भरणा दिसून येतो, तसाच वर्णधर्माच्या बाबतींतही प्रकार झालेला आहे.

समाजाचें व राष्ट्राचें कांहींही होवो, रोजचा पूजापाठ, संध्या, वैश्वदेव, सोवळें-ओवळें संभाळलें म्हणजे झालें गृहस्थपणाचें सार्थक, अशीच सांप्रत समजूत रूढ झालेली आहे. आपलीं मुलें कशीं वागतात, घरांत येणाऱ्या अतिथींशीं कशी वागणूक ठेवावी, आपण धंदा कोणता करावा व मिळविलेल्या संपत्तीचा कसा विनियोग करावा, ज्या राष्ट्रांत व समाजांत आपण जन्मास आलों त्याची सेवा करणें आपलें कर्तव्य आहे कीं नाहीं, वगैरे कोणत्याच गोष्टींचा विचार सध्यां केला जात नाहीं.

या विचारशून्यतेमुळें आजचा गृहस्थ अगदीं कर्तव्यशून्य व राष्ट्रघातक बनलेला आहे. खऱ्याखोट्या चुगल्या करून तसेंच स्वबांधवांवर अरेरावीनें सत्ता गाजवून संपत्ति मिळविली जाते व तिचा विनियोग केवळ वैयक्तिक सुखसोयींकडे केला जातो. धार्मिक म्हणविणारा जेवणावळी, देवळें, पूजापाठ, वगैरे बाबतींत खर्च करून स्वतःच्या धार्मिकतेची जाहिरात फडकावतो, तर दुसरा स्वतःची चैन एवढेंच ध्येय समजून दुसऱ्यांच्या उपयोगी मुळींच पडत नाहीं. परंतु हे दोन्ही मार्ग चुकीचे आहेत.

वर्णधर्माप्रमाणें प्राप्र झालेला व्यवसाय प्रामाणिकपणें व कर्तव्यबुद्धि जागृत ठेवून करणें हाच परम धर्म आहे.

**'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः'**
**"यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः" ॥**

गीता. १८. ४६.

या वचनांत भगवंतांनीं हेंच सांगितलें आहे. स्वतःच्या योग्यतेस अनुसरून प्राप्त झालेलें कर्तव्य बजावण्याचा कसून प्रयत्न करणें हा परमधर्म आहे. या कर्तव्यास पराङ्मुख होऊन पारलौकिक किंवा वैयक्तिक आचारांचें स्तोम माजविणें सर्वथा धर्मशास्त्राविरुद्ध आहे.

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समाः ।**

ईशावास्यो या सुप्रसिद्ध कठोपनिषदांतील वाक्यांत हेंच तत्त्व सांगितलेलें आहे. ज्या समाजांत किंवा राष्ट्रांत आपण जन्मास आलों त्याची सेवा करणें हें मनुष्याचें परम कर्तव्य आहे. रामचन्द्रांनीं दोन प्रसंगीं वैयक्तिक धर्मापेक्षां वर्णधर्म कसा श्रेष्ठ आहे हें स्पष्टपणें दाखवून दिलेलें आहे.

रामचन्द्र जेव्हां पित्याच्या आज्ञेस अनुसरून वनांत जाऊं लागले तेव्हां कौसल्येनें त्यांस विरोध केला. त्यावेळीं अनेक मार्ग सुचवितांना 'येथेंच राहून तूं माझी शुश्रूषा कर; हाच श्रेष्ठ धर्म आहे' (वा. रा. २.२१.२३) असाही एक मार्ग कौसल्येनें सुचविला. त्यास उत्तर देतांना

रामचन्द्रांनीं 'आज ( अरण्यांत जाण्यामुळें ) जे गुण मला प्राप्त होतील ते उद्यां कोण देईल ?' असा प्रश्न करून राष्ट्रोपकारक गुणसंग्रह संपादन करण्यचा प्रयत्न करणें हें वैयक्तिक धर्मापेक्षां श्रेष्ठ असल्याचें दाखविलें आहे. अरण्यकाण्डांतील [सर्ग ९।१०] प्रसंग तर याहूनहीं स्पष्ट आहे. सीतेनें 'तुम्ही आयते अरण्यांत आलेच आहां व आतां राज्याची कामगिरीही नाहीं; तर शास्त्रत्यागपूर्वक मुनिधर्माची दीक्षा घेऊन श्रेष्ठ धर्माचें आपण अनुसरण करावें.' असा उपदेश रामचन्द्रास केला होता. पण यावर रामचन्द्रांनीं वर्णधर्माचें महत्त्व सांगून ऋषिरक्षण व यज्ञप्रसारास मदत हाच श्रेष्ठ धर्म असल्याचें स्पष्ट करून दाखविलें आहे.

वरील दोन्ही उदाहरणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत. लक्ष्मणानें विवाहित असूनही पत्नीचा त्याग केला व वर्णधर्मास महत्त्व देऊन रामचन्द्रांच्या बरोबर वनवास पतकरून आर्यसंस्कृतीचा दक्षिणेंत प्रसार केला. प्रत्येक मनुष्याचें वर्णधर्मपरिपालन हें याप्रमाणें आद्य कर्तव्य आहे. या वर्णधर्माचें तात्त्विक स्वरूप आतां पाहूं.

राष्ट्राचा बुद्धिभ्रंश करणारीं व्यसनें पसरविण्याचा धंदा व्यवसाय म्हणून करणें वर्णधर्मांत येऊं शकत नाहीं, हें उघडच आहे. राष्ट्राच्या व समाजाच्या उत्कर्षास अनेक सद्गुणांची आवश्यकता असते. तसेंच कित्येक दुर्गुणांचा ऱ्हासही त्या दृष्टीनें आवश्यक असतो. मुख्यत्वेंकरून या सद्गुणांचा तीन वर्गांत समावेश करतां येइल ! ते वर्ग असे—

१ शम, दम, तप, शुद्धता, सरळपणा, ज्ञान इ.

२ शौर्य, धैर्य, दक्षता, सत्ता इ.

३ पक्का माल तयार करणें व त्याची आयात-निर्यात करणें.

४ शेतकी वगैरे साधनांनीं कच्चा माल उत्पन्न करणें.

वर्णधर्म या चार वर्गांतील गुणांचें वर्धन करण्याकरितां आहे. स्वतःचा निर्वाह चालू असतांच त्या त्या राष्ट्रोपयोगी गुणांच्या अभिवृद्धीचाही

प्रयत्न व्हावा या उद्देशानेंच त्या त्या गुणांच्या अभिवृद्धीस अनुकूल अशी कर्मांची विभागणी वर्णधर्मात केलेली आहे. विशिष्ट गुण व त्यास अनुलक्षून व्यवसाय ( कर्म ) हीं लक्षांत घेऊनच चातुर्वर्ण्याची घटना झालेली आहे.

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।**

या प्रसिद्ध श्लोकार्धातील गुण व कर्म या शब्दांचे हेच अभिप्राय आहेत.

चातुर्वर्ण्याचें हें तात्त्विक स्वरूप बृहदारण्यकोपनिषदांत ( अ. १-४-११ ते १३ पहा ) विस्तारानें दाखविलेलें आहे. त्यांत शूद्रवर्णास इतर वर्णांच्या बरोबरीनें लेखलेलें आहे. शूद्रवर्णाचें हें इतर तुल्यत्व कालांतरानें विलयास गेलें, व शूद्र हें नांव निंद्राव्यंजक मानलें जाऊं लागलें. गीतेंतील शूद्रवर्णाचें कार्यक्षेत्र ( परिचर्या किंवा सेवा ) त्याला असें हीन स्वरूप दिलें गेल्यानंतरचें आहे. या महत्त्वाच्या मुद्द्याचें विवेचन वेदान्तवाचस्पति सदाशिवशास्त्री भिडे यांनीं आपल्या बृहदारण्यकोपनिषदावरील भाष्यांत ( पृ. ८७ ) विस्तारपूर्वक केलेलें आहे, तें वाचकांनीं अवश्य पहावें. छांदोग्योपनिषदांतही ( पृ. १९९ ) याच विषयावर त्यांनीं लिहिलेलें आहे. असो. आमच्या चातुर्वर्ण्याचें हें वास्तविक स्वरूप आहे.

या मूळ चातुर्वर्ण्यात उच्चनीचत्वाच्या कल्पनेस स्थान नव्हतें. पुरुषसूक्तांत जें चातुर्वर्ण्याचें वर्णन केलेलें आहे तें रूपकात्मक आहे. शरीराच्या धारणेस ज्याप्रमाणें चार अवयव सारखेच आवश्यक असतात, त्याचप्रमाणें चारी वर्णांची समाजधारणेस सारखीच आवश्यकता आहे असें सांगण्याचा त्या रूपकाचा उद्देश आहे. त्या रूपकाचा हा खरा अभिप्राय ध्यानांत न आल्यामुळें ब्राह्मण श्रेष्ठ व शूद्र कनिष्ठ असला भलताच अर्थ मध्यंतरीं रूढ झाला व त्यामुळें उच्चनीचत्वाच्या, व्यवसायबंदीच्या, रोटीबंदीच्या, बेटीबंदीच्या व स्पर्शबंदीच्या कल्पना भलत्याच प्रमाणांत वाढत जाऊन आज आम्ही संकुचित वृत्तीचे,

आळ्यताखोर, हेकेखोर व असंघटित बनलेले आहों. वर्णधर्म आज याच-मुळें तिरस्करणीय बनलेला आहे. या सर्व कल्पना इतक्या दृढमूल झालेल्या आहेत कीं, त्यांचा उच्छेद कसा करावा याविषयीं पुढारीवर्गा-तही कित्येक वेळां निराशा दिसून येते. कित्येक तर या बंदीस वैता-गून धर्मत्यागासही प्रवृत्त होतात. परंतु अशानें कार्यभाग साधणार नाहीं. वर्णधर्माच्या वर दाखविलेल्या विशुद्ध स्वरूपाचा प्रसार जारीनें सुरू करणें हाच त्यावरील रामबाण उपाय होय.

उच्चनीचत्वाच्या कल्पनेंतील अशास्त्रीयता वर दाखविलेलीच आहे. व्यवसायबंदी आतां कायद्यानेंच बंद झालेली* आहे. रोटीबंदी व स्पर्शबंदीबद्दल पुढें दोन प्रकरणांत विवेचन केलेलेंच आहे. राहतां राहिली बेटीबंदी. या बंदीचा विध्वंस करण्याचा खरा व्यवहार्य मार्ग म्हणजे पोटजातींचें एकीकरण हाच आहे. निदान पुढारलेल्या वर्गांनीं तरी या बाबतींत पोटजाति मोडण्याचें कंकणच बांधलें पाहिजे. या मार्गानें आजच्या शेंकडों जातींच्या चार अथवा पांच जाति करतां आल्या म्हणजे पुढें त्यांची एक जात सहज करतां येईल ! पोटजातींच्या एकीकरणास परंपरेचा आधार आहे इतकेंच नव्हे, तर बहुजनसमाजाचा पाठिंबाही आहे. तरी मधली पायरी म्हणून पोटजातींचें एकीकरण हा विषय पुढाऱ्यांनीं आज प्रथम हातीं घेतला पाहिजे. असो.

वर्णधर्माच्या विकृत स्वरूपानें उत्पन्न झालेल्या सध्यांच्या सर्व अ-शास्त्रीय कल्पना व रूढि राष्ट्रनिष्ठा किंवा समाजनिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न निश्चयपूर्वक करून नष्ट केल्या पाहिजेत. वैयक्तिक पूजापाठ व सोवळें-ओवळें यांचें वर्णधर्मापेक्षां अधिक महत्त्व नाहीं. जप, तप, त्याग वगैरे वैयक्तिक धर्मांचें महत्त्व, वर्णधर्मोक्त समाजसेवा उत्कृष्टपणें बजावण्याचें सामर्थ्य प्राप्त व्हावें म्हणूनच आहे. वर्णधर्माचें हें श्रेष्ठत्व हिंदूंच्या

* शिक्षणव्यवसायास जातवारीचें तत्त्व लागू केल्यामुळें कसें नुकसान होत आहे याचें पुढें तेराव्या प्रकरणांत वर्णन केलेलें आहे तें या ठिकाणीं वाच-कांनीं लक्षांत घ्यावें.

मनोभूमिकेंत रुजेल तरच आज हिंदूंत शिरलेले दुर्गुण नष्ट होतील, हें प्रत्येक धर्माभिमान्यानें लक्षांत बाळगिलें पाहिजे.

मनूनें या वर्णधर्माचें महत्त्व फारच उत्कृष्ट रीतीनें दाखविलेलें आहे. कोणत्याही वर्णानें स्वकर्तव्याच्या सिद्ध्यर्थ अविश्रांत श्रम करणें हेंच त्या त्या वर्णाचें तपाचरण होय असें त्यानें सांगितलें आहे.

**ब्राह्मणस्य तपो ज्ञानं तपः क्षत्रस्य रक्षणम् ।**
**वैश्यस्य तु तपो वार्ता तपः शूद्रस्य सेवनम् ॥**

मनु ११–२३५.

या श्लोकांत 'चारही वर्णांनीं अनुक्रमें ज्ञान, रक्षण, व्यापार व सेवा* ह्यांच्याकरितां अविश्रांत खटपट करणें हें त्या त्या वर्णाचें तपच होय' असें सांगितलेलें आहे तें या दृष्टीनें फारच महत्त्वाचें कसें हें आतां कळून येईल. वर्णधर्म याप्रमाणें मनुष्यास उदार वृत्तीचा व कर्तव्यपरायण बनवितो. अशा श्रेष्ठ वर्णधर्माचें यथायोग्य आचरण करणें हीच परमात्म्याची कर्ममय उपासना असून ती प्रत्येक हिंदूनें तत्परतेनें केली पाहिजे. प्रत्येक पूजेला विधि असतो, त्यांप्रमाणें या कर्ममय पूजेलाही विधि असून त्याचें विवेचन गीतेच्या १७ व्या अध्यायांत आहे. प्रस्तुत लेखकानें 'उत्कर्षाचा राजमार्ग' या पुस्तकाच्या १७ ते १९ पृष्ठांवर याच मुद्द्याचें स्पष्टीकरण केलेलें आहे. जिज्ञासूंनीं तें तेथेंच पहावें. असो.

मानसिक व शारीरिक दोन्ही प्रकारच्या वैयक्तिक उपासनांचें स्वरूप येथपर्यंत पाहून झालें. आतां सामुदायिक उपासनेचीं स्थानें जीं मंदिरें त्यांचा विचार करूं.

---

* उपनिषत्कालीं शूद्रांचें कर्म सेवा हें नव्हतें हें मागें (पृ. ५४) दाखविलेंच आहे. अर्थात् गीतेप्रमाणेंच मनुस्मृतींतीलही हें शूद्रांचें व्यवसायपरिवर्तन मागाहूनचें आहे हें वाचकांनीं येथेंही लक्षांत घेतलें पाहिजे.

## प्रकरण सहावें

# हिंदु मंदिरांची सुधारणा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें.

हिंदु मंदिरांतील एकंदर कार्यक्रम केवळ आंधळेपणानें चाललेला असतो. मंदिर म्हणजे काय, त्याचा उद्देश काय, तो साध्य होण्याकरितां व्यवस्था कशी ठेवावी, मंदिरांतील शिस्त कोणत्या प्रकारची असावी, कार्यक्रम कोणते करावे, वगैरे कोणत्याही विषयाचा शास्त्रीय पद्धतीनें विचारच केला जात नाहीं. फार काय, मंदिरांची व्यवस्था हा शास्त्रीय विचारांचा प्रदेश आहे हें बहुधा कोणाच्या स्वप्नींही नसतें. एखाद्याजवळ भरपूर पैसा असला किंवा झोळीचें बळ असलें कीं तो देऊळ बांधण्याचा घाट घालतो व क्रमाक्रमानें सर्व तयारी होऊं लागते. या मंदिराचा जनतेस कांहीं उपयोग होईल कीं नाहीं, जनतेस या मंदिरापासून कोणत्या गोष्टींची अपेक्षा आहे, इत्यादि प्रश्नांचा विचारही मंदिर बांधणारा करीत नाहीं. मंदिर बांधतांना व बांधल्यावर कांहीं बाबतींत मात्र शास्त्रांची साक्ष घेतली जाते. मंदिराचें दार कोणत्या दिशेस असावें, प्रतिष्ठापना कोणत्या दिवशीं करावी, मूर्तीचा आकार केवढा असावा, वगैरे विषयांत जुन्या लिखित ग्रंथांचा पाठपुरावा केला जातो. पण याखेरीज दुसऱ्या कोणत्याही विषयाचा शास्त्रीय दृष्टीनें विचारच केला जात नाहीं. मंदिरावर आम्ही सांगतों या तऱ्हेचें विवेचन देणारा शास्त्रीय ग्रंथच नाहीं. मग ही नवी दृष्टि जनतेस कशी यावी? मूळ संस्कृतांतच जर मंदिरशास्त्रावर ग्रंथ नाहीं तर मराठींत तरी कोठून येणार? पण आजपर्यंत अशा तऱ्हेचा विचार कोणीं केलेला नसला तरी आज तो करणें अत्यंत आवश्यक आहे. म्हणून मंदिरशास्त्राचें किंवा देवालय–शास्त्राचे नियम स्थूल रूपानें येथें पाहिले पाहिजेत. तत्पूर्वी मंदिरांची वर्तमानस्थिति लक्षांत घेऊं.

मंदिरांचा शास्त्रीय विचार आवश्यक वाटावा म्हणून प्रथम त्यांत किती प्रकारची अव्यवस्था दिसून येते हें पाहिलें पाहिजे. कित्येक मंदिरें इतकीं लहान असतात कीं त्यांत धड १० लोकांसही बसण्यास जागा नसते. एखादा मंदिर बांधून जातो पण मूर्तीची पूजा अर्चा करण्याची कायमची व्यवस्था करीत नाहीं. त्यामुळें मंदिर बांधणारा निवर्तल्यावर मूर्तीची पूजा होत नाहीं. जेथें मूर्तीच्या पूजाअर्चेची दाद लागत नाहीं तेथें मंदिराची झाडलोट व स्वच्छता यांकडे कोण लक्षपूर्वक पाहणार ? अशाप्रकारें अव्यवस्था होत गेल्यामुळें कित्येक मंदिरें मोडकळीस आलीं आहेत तर कित्येक जमीनदोस्तही झालेलीं आहेत. कांहीं मंदिरांस उत्पन्न चांगलें असूनही त्यांची व्यवस्था नीट रहात नाहीं. वाई क्षेत्रांतील ढोल्या गणपतीचें देऊळच घ्या ! सदर देऊळ वाई क्षेत्रांतील जीं कित्येक प्रमुख देवळें आहेत त्यांपैकीं एक असून स्वच्छतेच्या दृष्टीनें मात्र अगदीं निराशाजनक आहे. सदर देवळाच्या सभामंडपांत गाईम्हशींबरोबरच लंबकर्णही लोळत असतात, याचा कोणीच विचार करीत नाहीं. मुंबईतील प्रसिद्ध उदाहरण द्यावयाचें तर महालक्ष्मीच्या देवळाचें देतां येईल ! सुदैवानें या मंदिरास फारच रमणीय स्थान मिळालेलें आहे. कितीही नास्तिक मनुष्य असला तरी त्या मंदिराच्या पिछाडीचा देखावा गच्चीवरून पाहून क्षणभर द्रवल्याशिवाय राहणार नाहीं. पण साक्षात् मंदिर व त्यापुढील रस्ता हीं पाहिल्यावर मन उद्विग्न झाल्यावांचून राहणार नाहीं. ठाकुरद्वार नाक्याच्या आसपास एकदोन व शिवाय मुंबईतच इतर ठिकाणीं सात आठ अशीं मंदिरें आहेत कीं डोळे व नाक शाबूत असलेला कोणीही मनुष्य तेथील दृश्य पाहून उद्विग्न झाल्यावांचून राहणार नाहीं.

**मंदिरांच्या दुर्दशेचें दिग्दर्शन**

गेल्या वर्षीं प्रस्तुत लेखकास कांहीं कामानिमित्त नाशिक क्षेत्रीं जावें लागलें होतें. त्यावेळीं सहज मनांत आलें कीं, ज्या ठिकाणीं अस्पृश्यांनीं

रणसंग्राम करून धर्मभक्ति कसास लावण्याचा प्रयत्न केला, तें प्रसिद्ध काळ्या–रामाचें मंदिर प्रत्यक्ष पहावें. त्याप्रमाणें

**कांहीं अनुभव**

तिकडे मोर्चाही वळविला. बरोबर एक दोन आधुनिक सुशिक्षित होते. मंदिरांत शिरल्यावर माझा मित्र व मी यांमध्यें पुढील संवाद झालाः—

मित्रः—काय हो! सत्याग्रह करणारे अस्पृश्य आंधळे होते कीं काय?

मी—कां बुवा? शंका कां आली?

मित्र—अहो येथें ठिकठिकाणीं शेण व मूत इतकें तुंबलेलें आहे कीं त्यांच्या घाणीनें जीव नकोसा झाला आहे. कोणी समंजस स्पृश्यही या मंदिरांत प्रवेश करूं इच्छिणार नाहीं. अशा स्थितींत अस्पृश्यांनीं येथें प्रवेश करण्याचा अट्टाहास धरावा हें आश्चर्य नव्हे काय?

मीः—हेंच तुमचें नडतें! तुम्ही येथें देवदर्शनास येतां कीं स्वच्छता पाहण्यास?

मित्रः—अहो, येतों आम्ही देवदर्शनार्थच. पण देवाचें दर्शन घेण्याकरितां उघडलेल्या डोळ्यांस ही घाण दिसते त्यास काय करावें?

हा संवाद अधिक लांबविण्याचें येथें कांहीं प्रयोजन नाहीं. पण त्यावरून आर्यांचा पहिला नियम जो "शौचम्" म्हणजे स्वच्छता त्याबाबतींतही आमचीं मंदिरें किती मागासलेलीं आहेत, हें दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं.

कांहीं मंदिरांत खुशाल पत्त्यांचे डाव चालतात. कित्येक ठिकाणीं मधल्या वेळीं डाळतांदूळ निवडण्याचेंही काम चालू असतें. मंदिराच्या अंगणाचा सुकवणें घालण्याकडेही कित्येक ठिकाणीं उपयोग केला जातो. दुपारच्या वेळीं गांवकुटाळक्या करण्याचा व पानविड्यांचा-धुव्वा उडविण्याचा तर मंदिर म्हणजे ठराविक अड्डाच! घरांत लहान मुलें त्रास देतात म्हणून कित्येक वृद्ध लोक वामकुक्षीकरितां मंदिरांतील

सभामंडपाचा उपयोग करतात. सदर वेळीं पाय कुणीकडे करावे याचेंही कित्येकांस तारतम्य रहात नाहीं. त्यांतून दिवस उन्हाळ्याचे असले तर पहावयासच नको! हें सर्व झालें मंदिर चालू नसतां होणाऱ्या अव्यवस्थेबद्दल!

मंदिर चालू असतांना जे प्रकार घडतात त्यांची गणती करणेंही कठिण आहे. मंदिर चालू असतांना पहिली गोष्ट 'गलबला' ही दिसून येते. मंदिरांत केवळ दहाच लोक असले तरी त्यांची कांहीं-तरी बोलाचाली झाल्यावांचून राहणार नाहीं. कांहीं वेळां हा गलबला नामोच्चाराचाही असूं शकतो. पण सार्वजनिक ठिकाणीं येऊन मोठ्यानें नामसंकीर्तन करण्याचें प्रयोजन काय? मोठ्यानें नामसंकीर्तन घरां-तही होऊं शकतें. बरें, मंदिरासारख्या पवित्र ठिकाणीं येऊन तें करा-वयाचें तर तें मनांत केल्यानेंही देवास पोंचूं शकतें. पण इतका विचार आहे कोणास! एकानें घंटा वाजवून 'रामाहो' केलें कीं दुसरा त्या-हीपेक्षां जोरानें घंटा वाजवून मोठ्या आवाजांत 'राजा रामचंद्र की जय' असें गरजणार. देवळांत कांहीं कार्यक्रम चालू असला म्हणजे तर खाजगी गप्पासप्पांचें पेवच फुटतें. मंदिर हें सार्वजनिक प्रार्थनेचें किंवा उपदेशग्रहणाचें ठिकाण आहे, तेव्हां त्या ठिकाणीं प्रत्येकानें त्या उद्देशास बाध न येईल अशा प्रकारें वागलें पाहिजे याची अंधुकही जाणीव नसल्याचा हा परिणाम आहे.

ही जाणीव नसल्याचा केव्हांकेव्हां किती वाईट परिणाम होतो याचें उदाहरण म्हणून प्रत्यक्ष पाहिलेली पुढील गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे:—

धुळें येथील एका मंदिरांत दोन वर्षांपूर्वी म. म. पाठकशास्त्री यांचीं चातुर्मास्यानिमित्त प्रवचनें चालू होतीं. प्रवचनकारांच्या विद्वत्तेबद्दल व अधिकाराबद्दल शहरांतील सुशिक्षितांत चांगलाच आदर असल्या-मुळें बहुतेक सर्व वकील, शिक्षक, डॉक्टर वगैरे मंडळी प्रवचनास

उपस्थित असत ! प्रवचन नियमित वेळीं सुरू होऊन नियमित वेळीं संपत असे. परंतु वेळ सकाळची असल्यामुळें कित्येक भक्त त्याच वेळीं दर्शनाकरितां येत असत. एवढा मोठा वजनदार श्रोतृवर्ग व अधिकारी प्रवचनकार यांच्या कार्यांत घंटेचा आवाज करण्याची व चालू गाड्यास प्रतिबंध करण्याची कोणास छाती होईल ? कल्पनेनें देखील तसें वाटत नाहीं. पण प्रत्यक्ष दृश्य कसें दिसलें तें पाहा ! कित्येक हरीचे लाल खुशाल मोठ्यानें घंटा वाजवून व मोठ्यानें नामोच्चार करून दर्शन घेतच होते. दुसऱ्या दिवशीं सूचक म्हणून तेथील एका वकीलानें सर्व घंटांस फडकीं बांधून ठेविलीं. त्याचा पुष्कळच परिणाम झाला. पण त्यांतही एक बळकट धर्मभावनेचा वीर ( ! ) आढळलाच. त्यानें त्या घंटेस बंधमुक्त करून मोकळ्या मनानें ( नव्हे, हातानें ) घंटा वाजविलीच.

मंदिर हें सार्वजनिक उपासनेचें स्थान असल्यामुळें तेथें गेल्यावर प्रत्येक उपासकानें इतरांस त्रास न होईल व मंदिराच्या शांततेस व स्वच्छतेस बाध न येईल अशा प्रकारें वागलें पाहिजे, याची जाणीवच आम्हांला नाहीं.

या प्रकारच्या सर्व दुरवस्था नष्ट करण्याकरितां मंदिर म्हणजे काय, त्याचा उपयोग काय, तें आकर्षक कसें होईल वगैरे प्रश्नांचा नीट विचार झाला पाहिजे. मुलास शाळेंत घालतांना ज्याप्रमाणें तेथील शिस्तीबद्दल त्यास प्रथम सूचना दिल्या जातात, त्याचप्रमाणें दर्शनास जाणाऱ्यांस वारंवार मंदिरांत पाळावयाच्या शिस्तीचे धडे दिले गेले पाहिजेत. हा सर्व विचार करण्यापूर्वीं हिंदुधर्माचा मंदिराशीं कोणत्या प्रकारचा संबंध आहे तें लक्षांत घेतलें पाहिजे. म्हणून प्रथम त्याच विषयाचा विचार करूं.

मुसलमानी धर्मांत मशिदीस किंवा ख्रिस्ती धर्मांत चर्चला जें महत्त्व आहे तें हिंदुधर्मांत मंदिरास नाहीं हें प्रथम लक्षांत ठेविलें पाहिजे.

अमुकवारीं मशिदींत जमून प्रार्थना केलीच पाहिजे असा मुसलमानी धर्मांत दण्डक आहे, तसा आपल्या धर्मांत नाहीं.

**मंदिरें आणि हिंदुधर्म**

ख्रिस्ती धर्मांत तर बाप्तिस्मा, विवाह, मृत्यु वगैरे प्रत्येक प्रसंगीं चर्चमध्यें ज़ावेंच लागतें. अर्थात् त्या त्या धर्मांच्या धार्मिक विधींचा याप्रमाणें त्या त्या धर्मांच्या मंदिराशीं संबंध निगडित आहे. हिंदूंचें तसें नाहीं. श्रुति, स्मृति किंवा सूत्रें यांमध्यें जें धार्मिक संस्कारांचें किंवा विधींचें वर्णन आहे त्यांचा मंदिराशीं कोणत्याच प्रकारचा संबंध नाहीं. हल्लीं विवाहप्रसंगीं वरातीच्या वेळीं, तसेंच उपनयनप्रसंगीं भिक्षावळीच्या वेळीं, वाटेंत एखाद्या मंदिरांत जाऊन नमस्कार करण्याचा रिवाज आहे पण तो लौकिकस्वरूपाचाच आहे. विवाहसंस्कारांतील मुख्य विधि जें कन्यादान, पाणिग्रहण, सप्तपदी वगैरे त्यांचा मंदिराशीं कांहींच संबंध नसतो, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. मंदिरें याप्रमाणें हिंदुधर्माशीं निगडित नाहींत हें मान्य केलें म्हणजे तें हिंदुधर्माचें अपरिवर्तनीय असें मूलभूत अंग नव्हे हें मान्यच करावें लागतें. अर्थात् मूळ ज्या हेतूनें मंदिरें अस्तित्वांत आलेलीं असतील तो हेतु पूर्णपणें सिद्धीस जात नसल्यास किंवा मूळ हेतूहून अधिक महत्त्वाचें कार्य मंदिराचें सहाय्यानें करून घेण्याकरितां चालू मंदिरसंस्थेच्या कार्यप्रणालींत कांहीं फेरफार केल्यास त्यामुळें मूळ हिंदुधर्मावरच घाला आला असें मानण्याचें कारण नाहीं.

**मंदिरांची आवश्यकता**

मंदिरें आमच्या धर्माच्या मूलभूत आचारांत समाविष्ट होत नसलीं, तसेंच वर दाखविल्याप्रमाणें तीं अनेक दोषांनीं पूर्ण असलीं तरी तीं नष्ट व्हावीं असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. ज्याला धार्मिक शिक्षण व धार्मिक शांत वातावरण यांची गरज नसेल त्यानें पाहिजे तर मंदिरें मोडून टाका असें म्हणावें. पण ज्याला या दोहोंची पर्वा आहे व विशेषतः मानवी स्वभावाचें आकलन आहे

त्याच्या कानांस ' मंदिरें नष्ट करा ' हे शब्द तापलेल्या सळईप्रमाणें त्रासदायक झाल्याशिवाय राहणार नाहींत. आशेच्या मागें धांवून तसेंच काम-क्रोधाच्या चक्रांत गिरक्या खाऊन त्रासलेल्या जीवास शांत, शिव व सुंदर असें विसाव्याचें स्थान नसावें असें कोण म्हणेल ? आज हिंदूंचे प्रतिपक्षी इतर धर्म, आपआपल्या मंदिरांत जमून आपलीं मनें परस्परसहानुभूतीच्या ओलाव्यानें स्नेहमय करीत असतां, हिंदूंनीं असलेलीं मंदिरें नष्ट करण्याचा उद्योग आरंभावा, यासारखी भयंकर कल्पना दुसरी कोठें तरी आढळेल काय ? कोणी कांहींही म्हणो, जोंपर्यंत हिंदुसंस्कृतीचे अभिमानी जिवंत आहेत आणि जोंपर्यंत कांहीं मनुष्यांना ते केवळ हिंदु आहेत, एवढ्याच कारणास्तव कांहीं सुख-दुःखें अनुभवावीं लागत आहेत, तोंपर्यंत तरी हिंदुमंदिरें नष्ट करणें शहाणपणाचें नाहीं. असो.

**मंदिरांचें ध्येय**

मंदिरांच्या सुधारणेचा विचार करावयाचा तर प्रथम मंदिरांचें ध्येय किंवा उद्देश कोणता हें पाहिलें पाहिजे. मंदिरें बांधणाऱ्याच्या मनांत जरी प्रथम 'आपली धार्मिक म्हणून ख्याति व्हावी ', ' आपणास परलोकीं सुख प्राप्त व्हावें' असले स्वार्थी विचार येत असले तरी तेवढ्यानें त्याच्या मनाचें खरें समाधान होत नाहीं. आपण बांधलेल्या मंदिरांत येऊन अनेक भक्तांनीं भजन करावें व स्वतःचा उद्धार साधावा अशीही त्याची इच्छा असते. अर्थात् आपलें मंदिर आपल्याचकरितां न राहतां इतरांसही त्याचा उपयोग होऊन त्यांस धार्मिक वळण लागावें हाच तें बांधणाराचा गुप्त हेतु असतो. हेंच अलीकडच्या भाषेंत सांगावयाचें तर ' मंदिरें मनुष्याचें मन सुसंस्कृत करून त्यास धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत ' असें सांगतां येईल ! पण हा मंदिरांचा मूळ उद्देश लक्षांत न घेतांच मंदिरांतील व्यवस्था ठेवली गेल्यामुळें आज मंदिरें म्हणजे निरुपयोगी अडगळ असें वाटूं लागलें आहे. खरोखर मंदिरांचें हें

ध्येय लक्षांत घेऊन जर आपण मंदिरांत कसें वागावें याची शिस्त ठरविली व त्याची अंमलबजावणी केली तर आपल्या मंदिरांची मागें दाखविलेली दुरवस्था दिसून येणार नाहीं. शांतता, स्वच्छता आणि धार्मिक शिक्षण या तीन ध्येयांच्या सिद्धीकरितां आटोकाट प्रयत्न मंदिरांचे मालक करतील तर आज कित्येक नास्तिक म्हणून गाजलेले लोकही देवळांचे उंबरठे झिजविल्यावांचून राहणार नाहींत. या तिन्ही गोष्टी मंदिरांत चालू करून त्यांची आकर्षकता वाढविणें म्हणजेच मंदिरांची सुधारणा करणें होय.

**मंदिरें आणि शांतता**

बाह्य शांततेच्या दृष्टीनें आम्हां हिंदूंस मंदिरांची मुळींच काळजी नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. मंदिरांच्या आवारांत शिरल्यापासून तों बाहेर येईपर्यंत प्रत्येकानें कसलाही आवाज करावयाचा नाहीं अशी खूणगांठ बांधून ठेविली तर तें अशक्य नाहीं. पण एवढाही संयम आमच्यामध्यें नाहीं. खालील सहा प्रकारांनीं मंदिरांतील शांततेचा भंग होत असतो:—

१ घंटा वाजविणें.

२ टाळी वाजविणें.

३ मोठ्यानें नामोच्चार करणें.

४ गप्पा मारणें.

५ गर्दी मोडण्याकरितां ‘ बाजूला व्हा ’ वगैरे शब्द उच्चारणें.

६ जवळच्या रस्त्यावरील रहदारीचा घरघराट.

या सहा प्रकारांपैकीं शेवटच्या प्रकारानें उत्पन्न होणारा शांतताभंग थांबविणें शक्य नाहीं. अर्थात् तशा प्रकारच्या वर्दळीपासून दूरवरच मंदिराकरितां जागेची निवड केली पाहिजे. हमरस्त्यावर मंदिर बांधणेंच असेल तर आवाजास प्रतिबंधक अशी कांहीं आधुनिक शास्त्रीय योजना तरी अवलंबिली पाहिजे. मुंबईतील झावबाचें राममंदिर बांध-

तांना या गोष्टीचा विचार झालेला नव्हता असें दिसतें. चौथा व पांचवा प्रकार बंद होण्यास मंदिरांचें महत्त्व लक्षांत घेऊन कडक शिस्तीचाच अवलंब केला पाहिजे. मंदिराचा उद्देश व त्याकरितां मंदिराचें गांभीर्य राखण्याचा प्रयत्न प्रत्येकानें कसकसा केला पाहिजे हें जनतेंत प्रसृत होईल तरच हे दोन्ही प्रकार बंद होतील ! कीर्तन चालू असतां खुशाल लोडास टेंकून घोरणारांस किंवा आपसांत डुढ्ढाचार्याप्रमाणें गप्पा मारणारांस त्यांच्या वर्तनाची लाज वाटेल असें इतरांनीं केलें तरच या प्रकारास आळा बसणें शक्य आहे.

पहिल्या तीन प्रकारांबद्दल लिहिणें मात्र इतकें सोपें नाहीं. त्यासंबंधीं स्पष्ट लिहिल्यास कित्येकांच्या धार्मिक भावनांस धक्का बसण्याचा संभव आहे. पण विचारी तत्त्वनिष्ठांस पुढील विवेचन पटेल असें वाटतें. टाळ्या, घंटा किंवा कित्येक ठिकाणीं चुटक्या वाजविणें हें जें आवश्यक समजलें जातें त्याचा हेतु परमेश्वराचें आपणाकडे लक्ष वेधून घेणें हा असतो. पण तात्विक दृष्टीनें विचार करावयाचा तर सर्वज्ञ परमेश्वराचें लक्ष घंटा अगर टाळीचा आवाज झाला तरच भक्ताकडे वेधतें असें मानणें अत्यंत हास्यास्पद नाहीं काय ? तेव्हां घंटेच्या आवाजाची आवश्यकता आहे असें सिद्ध होत नाहीं. मूर्तीसमोर उभें राहून मूक भावानें तिची प्रार्थना करणें व शेवटीं नुसतेंच डोकें नम्र करून हात जोडणें किंवा साष्टांग नमस्कार घालणें एवढ्यांत सर्व येतें. व या सर्व प्रकारांत आवाज मुळींच होत नाहीं. म्हणून ज्यांना शास्त्रीय पद्धतीनें खरोखरीचें दर्शनच घ्यावयाचें असेल—दंभ नको असेल—त्यांनीं शांततेचा भंग न करतां याप्रमाणें वंदन करावें व बाजूला व्हावें. हा सर्व श्रेष्ठ मार्ग होय ! घंटा, टाळ्या व नामोच्चार यांची हौस ज्यानें त्यानें आपापल्या घरांत भागवून घ्यावी. घरांतून मारलेली हांकही परमेश्वरास ऐकूं जाते. ज्यांना मंदिरांतच नामसंकीर्तन करण्याची इच्छा असेल त्यांनीं कीर्तनांत हरिदास सांगतात तेव्हां किंवा भजन चालू तेव्हां आपली इच्छा भागवून घ्यावी.

कित्येक वेळां एकाच आवारांत अनेक मंदिरांचा समावेश असल्या-मुळें व प्रत्येक ठिकाणीं निरनिराळे कार्यक्रम चालू असल्यामुळें शांतता भंग होतो. उ० मुंबईतील आत्मारामबोवाचें राममंदिर ऊर्फ ठाकुरद्वारवरील काळ्या रामाचें मंदिरच घ्या! या मंदिराच्या आवारांत सूर्यनारायणाचें मंदिर असून त्यामध्यें स्वतंत्र कार्यक्रम चालू असतात. एका आवारांत अनेक मंदिरें ठेवणें कसें शास्त्रविरुद्ध आहे याचें विवेचन पुढें येईलच. येथें फक्त शांततारक्षणाच्या दृष्टीनेंच विवेचन केलेलें आहे.

**एकाच आवारांत अनेक मंदिरें**

मनःशांतीचा बाह्य शांततेशीं निकटचा संबंध असल्यामुळें ज्या-प्रमाणें मंदिरांत बाह्य शांततेला जपलें पाहिजे त्याच-प्रमाणें मनःशुद्धीचा बाह्यशुद्धीशीं संबंध असल्यामुळें मंदिरांत बाह्यस्वच्छता राखण्याचाही आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. मंदिराच्या आवारांत शिरल्या-पासून तों बाहेर पडेपर्यंत ज्याप्रमाणें मौन पाळावयाचें त्याचप्रमाणें मंदिराचें सर्व आवार व खुद्द मंदिरही आपल्यामुळें अस्वच्छ न होईल याबद्दल प्रत्येक भक्तानें काळजी घेतली पाहिजे. मंदिराच्या आवारांत कोठेंहि कोणत्याही प्रकारची घाण सांचून राहणार नाहीं याविषयीं मंदिराच्या अधिकाऱ्यांनींहि डोळ्यांत तेल घालून जपलें पाहिजे.

**मंदिरें आणि स्वच्छता**

मंदिरांत पुढील सहा कारणांमुळें अस्वच्छता माजते:—

१ रोजच्या रोज झाडलोट न करणें.

२ दर्शनार्थ येणारांनीं फराळाचे वगैरे कागद फेंकणें.

३ पान थुंकणें.

४ विडी ओढून काड्या, काड्यांच्या पेट्या व थोटकें फेंकणें.

५ बाहेरील किंवा मंदिरांतीलच गाईचें शेण आणि घुमटांत राह-णारे पक्षी यांनीं केलेली घाण.

६ देवांवर अव्यवस्थितपणानें फेंकलेले तांदूळ, फुलें, पाणी, बेल यांचा राडा.

वरील सहा प्रकारांपैकीं पहिल्या चार प्रकारांबद्दल विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. मंदिरें कशाकरितां आहेत व त्यांत दर्शन घेणारांनीं कोणत्या भावनेनें जावयाचें असतें हें लक्षांत घेतलें म्हणजे मंदिरांत पान तोंडांत असतांना कां जाऊं नये हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. मंदिराकडे पाहण्याची सध्यांची दृष्टि एकदां बदलली म्हणजे हे प्रकार आपोआप बंद झाल्यावांचून राहणार नाहींत.

कै. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांचें नेपाळ दरबारांत कीर्तन चालू असतां तेथील राजेसाहेब लोडाशीं बसून हुक्का पीत होते. श्री. पलुस्करांच्या तें ध्यानांत येतांच त्यांच्या सात्त्विक संतापास जोर चढून "भगवंताच्या दरबारांत येऊन तुम्ही चैन करतां धिक्कार असो तुम्हांला !!' असे त्यांनीं प्रत्यक्ष राजाला उद्देशून उद्गार काढले. राजानें झालेल्या प्रकाराबद्दल ताबडतोब दिलगिरी प्रदर्शित करून हुक्का बाजूस सारला ! याच प्रकारची चीड प्रत्येक मंदिराच्या व्यवस्थापकांत व उपदेश करणाऱ्या हरिदासपुराणिकांत असेल तर पानविडीच्या वासाचें व तन्मूलक अस्वच्छतेचें मंदिरांतून उच्चाटन व्हावयास वेळ लागणार नाहीं. मंदिरें चैनीची वृत्ति वाढविण्याकरितां नसून ती संपुष्टांत आणण्याकरितां असल्यामुळें निदान मंदिरांत तरी हे प्रकार करूं नयेत हें पटण्यास फारसें विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं.

**देवळांत गोशाळा**

पांचव्या प्रकाराबद्दल मात्र स्पष्ट लिहिलेंच पाहिजे. गाई या गोमाता म्हणून हिंदुधर्मीयांस पूज्य आहेत यांत शंकाच नाहीं. पण याचा अर्थ त्यांनीं थेट मूर्तीपर्यंत शिरकाव करून घेऊन तिच्या पायावरील फुलापानांचा आस्वाद घ्यावा असा होत नाहीं. देवळाचें कुंपण मजबूत असेल तर बाहेरच्या गाईचें आक्रमण टाळतां येईल, पण जेथें देवळाच्या आवारांतच

गोशाळा असते तेथें त्यांचें स्वच्छतेवरील आक्रमण कसें टाळतां येईल ? याचें स्पष्ट उदाहरण पाहिजे असल्यास काशी क्षेत्रांतील खुद्द विश्वेश्वराचें देऊळच पहावें. सदर मंदिराचें आवार फारसें मोठें नाहीं. पण त्यांत नेहमीं एकदोन तरी सांड किंवा गाई वावरतांना दिसतातच. या गाई तेथील सांबाच्या पिण्ड्यांवरील तांदूळ, बेल व तुळशी चाटीत चाटीत खुशाल हिंडत असतात. या प्रकारामुळें अस्वच्छता किती माजते हें लक्षांत घेतल्यास मंदिरांतील हा प्रकार ताबडतोब बंद करावा असेंच कोणीही म्हणेल !

गोरक्षण या कार्याच्या बाबतींत आमची पूर्ण सहानुभूति आहे. तथापि मंदिराच्या आवारांत गोमातांनीं संचार करावा व कित्येक वेळां देवळाचा सभामंडप त्यांचें वसतिगृह बनावें हें योग्य नव्हे.

मंदिराच्या घुमटांत राहणारीं पांखरें कशी घाण करतात हें प्रसिद्धच आहे. पण ती क्षम्य आहे असें न समजतां त्या पांखरांस तेथें रहावयास न मिळेल याबद्दल कसून प्रयत्न केला पाहिजे. मंदिरें हीं माणसांकरितां आहेत हें तत्त्व एकदां मान्य केलें म्हणजे तेथें गाई व पांखरें यांची गैरसोय झाल्यास त्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं.

वर दिलेल्यापैकीं सहाव्या प्रकारच्या अस्वच्छतेबद्दल मात्र जरा

**मंदिरें आणि वैयक्तिक पूजा**

विस्तारानें लिहिलें पाहिजे. मंदिर हें सार्वजनिक पूजेचें स्थान. ज्याला वैयक्तिक पूजा फुलें वगैरे घालून करणें असेल त्यास ज्याच्या त्याच्या घरीं मोकळीक आहेच. त्याकरितां सार्वजनिक मंदिरांत जाण्याचें कारण नाहीं, हें कोणासही कबूल करावें लागेल. घरीं स्वस्थपणानें देवासमोर बसून मनोभावानें पूजा केल्यानें जें अंतःसमाधान मिळेल तें चार तांदुळाचे दाणे व दोन फुलांच्या पाकळ्या किंवा एखादें तुळशीपत्र पाण्यासह देवावर उडवून मिळणार नाहीं हें कोणाही प्रांजल मनुष्यास कबूल करावेंच लागेल. पण एवढा विचार कोण करतो ? आंघोळ करून येतां

येतां वाटेंत देऊळ लागलें कीं थोडें थांबावें. एखादें फूल किंवा तुळशी-पत्र देवाच्या उद्देशानें फेकून ( मग तें कोठेंही पडो ! ) जवळच्या झारीं-तील पाणीही त्याप्रमाणेंच उडवून पुढें सरकावें व पुन्हां देऊळ लागतांच त्याचप्रमाणें कवायतीची पुनरावृत्ति करावी अशीच प्रथा सर्वत्र दिसून येते. दोन प्रहरानंतर जेव्हां आमचा महिलावर्ग दर्शनास जातो तेव्हां तो पाणी घेऊन जात नाहीं हें खरें, पण तेव्हांही फेकलेले तांदूळ कोठें पडतात याचा विचार केला जात नाहीं. या सर्व प्रकारानें फायदा तर बाजूसच राहतो उलटा सर्व मंदिरभर कचरामात्र होतो. सुदैवानें मुंबईस व कोठें कोठें इतर ठिकाणींही तांदूळ वगैरे टाकण्याकरितां पेट्या ठेवण्याची चाल पडलेली आहे व ती एकापरी योग्यच आहे. पण अनेक प्रकारच्या तांदुळांची ही एकच केलेली खिचडी शेवटीं कोणाच्या पोटांत जाते याचा तपास केल्यास देवळांत जातांना बरोबर तांदूळ नेण्यापेक्षां पैसाच नेणें बरें असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. पैसे देण्यानें मंदिरास मदत होऊन मंदिराची स्वच्छता बिघडविल्याचें पाप लागणार नाहीं.

असो. वर जीं शांतता, स्वच्छता आणि धार्मिक शिक्षण हीं तीन मंदिरसंस्थेचीं ध्येयें सांगितलीं आहेत त्यांपैकीं पहिल्या दोन ध्येयांचा येथपर्यंत विचार झाला. आतां तिसऱ्या मुख्य ध्येयाचा विचार करूं.

**मंदिरें आणि धार्मिक शिक्षण**

मंदिराचा मुख्य उद्देश धार्मिक शिक्षण हाच असला पाहिजे. तो सिद्धीस जावा म्हणूनच शांतता व स्वच्छता यांची आवश्यकता आहे. फार पूर्वकाळीं धार्मिक शिक्षण गुरुगृहींच मिळत असे. प्रत्येक त्रैवर्णिकाला विद्यार्थिदशेंतच धार्मिक शिक्षणाचे सप्रयोग पाठ मिळत असत. यामुळें तेव्हां आतांसारखीं सार्वजनिक मंदिरें नव्हतीं, तरी धर्मशिक्षणाची आबाळ होत नसे. पण पुढें पुढें जेव्हां गुरुगृहीं राहणें बंद पडून उपनयनाचा नुसता फार्स होऊं लागला तेव्हां सामान्य

जनतेच्या धर्मशिक्षणाची गैरसोय होऊं लागली. तसेंच यज्ञयाग बंद झाल्यामुळें धार्मिक उत्सव करण्याच्या इच्छेचीही कुचंबणा होऊं लागली व शेवटीं या दोन्ही आकांक्षा पूर्ण करण्याकरितां मंदिरसंस्था अस्तित्वांत आली. आज जीं जुनीं मंदिरें आहेत त्यांकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास हेंच दिसून येईल ! त्यांत पालखी, अबदागीर वगैरे उत्सवोपयोगी साधनांची ज्याप्रमाणें तरतूद केलेली असते, त्याचप्रमाणें वर्षभर पुराण सांगणाऱ्या पुराणिकबोवाच्या तसेंच मधून मधून होणारे उत्सव साजरे करणाऱ्या हरिदासाच्याही वर्षासनाची सोय केलेली असते. यावरून धार्मिक उत्सव व धार्मिक शिक्षण या दोन ध्येयांनीं मंदिरसंस्था प्रचारांत आली हें समजून येतें.

मंदिरसंस्थेच्या या दोन मूळ हेतूंकडे लक्ष दिल्यास हिंदुधर्मांत नसलेली पण मागाहून उत्पन्न झालेली ही मंदिरसंस्था आवश्यक म्हणूनच उत्पन्न झाली असेंच कोणीही म्हणेल ! तसेंच आजपर्यंतच्या धार्मिक समजुतीप्रमाणें कीर्तनें, प्रवचनें व पुराणें यांच्या द्वारानें हिंदु मंदिरांनीं धर्मशिक्षणाचें काम उत्कृष्टपणें बजाविलेलें आहे ही गोष्ट प्रत्येकास कबूल करावी लागेल. कीर्तन, पुराण यांबद्दल जनतेंत सध्यां तादृश आदर नाहीं ही गोष्ट खरी असली तरी प्रत्येक गोष्टीबद्दल चिकित्सापूर्वक संशोधन करण्याची प्रवृत्ति वाढत असल्यामुळें मंदिरांत त्या प्रवृत्तीस पोषक असें धर्मशिक्षण मिळण्याची व्यवस्था होईल तर आजही मंदिरांची आवश्यकता भासल्यावांचून राहणार नाहीं.

आज मंदिरांत जें धर्मशिक्षण मिळतें तें जुन्याच श्रद्धाप्रधान पद्धतीनें मिळत असल्यामुळें स्वाभाविकच त्यास जुनेपाने म्हातारे व म्हाताऱ्याच पसंत करूं शकतात. यामुळेंच नवतरुण व सुशिक्षित वर्ग मंदिरांत येईनासा झाला आहे. पण त्या श्रद्धाप्रधान पद्धतीऐवजीं हल्लींच्या काळाचा ओघ लक्षांत घेऊन जर कोणी चिकित्साप्रधान विवेचनास सुरवात केली तर आजही सुशिक्षितांची मंदिरांत गर्दी झाल्याखेरीज रहा-

णार नाहीं. नवीन पद्धतीनें जुने सिद्धांत प्रतिपादणाऱ्या कित्येक विद्वानांच्या प्रवचनांस आजही सुशिक्षितांची गर्दी दिसून येते हें याचेंच प्रत्यंतर होय !

या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्यास चिकित्साप्रधान धर्मशिक्षणास प्राधान्य देऊन मंदिरांची पुनर्घटना करणें किती आवश्यक आहे हें कळून आल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणूनच धर्मशिक्षण हेंच मंदिरांचें प्रधान ध्येय होय असें वर म्हटलें आहे.

**धर्मोपदेश आकर्षक केव्हां होईल ?**

जुन्या पद्धतीनें धर्मशिक्षण आकर्षक होत नाहीं हें सिद्धच आहे. मंदिर प्रशांत व कितीही स्वच्छ असलें तरीही जर त्यांत लोकांच्या आकांक्षेस अनुसरून उपदेश न दिला जाईल तर तें नव्या पिढीस आकर्षक होणें शक्य नाहीं. काहीं लोक नव्या तऱ्हेचा उपदेश म्हणजे नवे दृष्टांत देऊन केलेला उपदेश असा अर्थ समजतात. टेलिफोन, वायरलेस, रेडिओ यांचे दृष्टांत प्रवचनांत आले कीं तें प्रवचन नवें असा कित्येकांचा ग्रह असतो. पण तो बरोबर नाहीं. दृष्टांत हे केवळ समजुतीकारितां द्यावयाचे असतात. ते जितके प्रचलित असतील तितके चांगलेच ! पण केवळ नव्या दृष्टांताच्या जोरावर नव्या विचारी जनतेचें आकर्षण करण्याची हांव धरणें व्यर्थ आहे.

‘ जाय जिणें हें सर्वहि जाईल, रथ गज धेनु तुरंग ।
यमराजाचे दूत निघाले कोठें छपर पलंग । ’

‘ सर्वे न कोणी यायाचा ’

असले सिद्धांत नव्या दृष्टांतांनींही पटवितां येतील. पण प्रत्यक्ष व्यवहारांत हरिदासबुवा व श्रोते ते कितपत वठवूं शकतील याचा विचार प्रथम केला पाहिजे. ज्या श्रोत्यांत कोणीही संन्यास घेण्यास तयार नाहीं हें पक्कें माहीत आहे, त्यांच्यापुढें हें पुराण वाचणें म्हणजे बेजबाब-

दारीचे गोंधळ समाजांत माजविण्यास प्रोत्साहन देणेंच होय! तसेंच 'पापोऽहं पापकर्माहं पापात्मा', 'मनुष्य हा पापाचा पुतळा आहे' 'शरीर घाणीचें आगर' असला ख्रिस्ती तत्त्वज्ञानास शोभेलसा उपदेश देऊन श्रोत्यांस अधिक दुर्बल व भित्रे बनविण्याऐवजीं:

* 'आनंदाध्येय खल्विमानि भूतानि जायन्ते'
'अयं मे हस्तो भगवानयं भगवत्तरः'

असा प्रोत्साहक व जयिष्णु उपदेश करणें किती वाजवी होईल याचा विचार उपदेशकानें करावयास नको काय?

'अधिकार तैसा करूं उपदेश'

हें संतवचन किती उपदेशक पाळतांना दिसून येतात? हें संतवचन नीट ध्यानांत घेऊन मंदिरांतील धर्मोपदेश चालू राहील तर प्रवचनास आजही गर्दी लोटल्याशिवाय राहणार नाहीं.

आपलें जीवन उज्ज्वल कसें करावें, शेजाऱ्यांशीं कसें वागावें, एक-मेकांस साह्य करून आपलीं व दुसऱ्याचीं दुःखें कशीं कमी करावीं, आपली प्रजा अधिक संस्कृतिसंपन्न व सुदृढ व्हावी याकरितां आपण काय केलें पाहिजे, आपल्या धर्माचीं मूलभूत तत्त्वें कोणतीं, आपले सध्यांचे धार्मिक आचार त्यास अनुसरूनच आहेत ना, वगैरे विषयांची जर मंदिरांत चर्चा होऊं लागेल तर तसलें धर्मशिक्षण आजही आकर्षक झाल्यावांचून राहणार नाहीं. व नवे लोक प्रवचनास येत नाहींत म्हणून ओरड करण्याचाही प्रसंग येणार नाहीं.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगांकडे या दृष्टीनें पाहिल्यास कितीतरी बोध होण्यासारखा आहे. त्यांनीं त्या वेळच्या चुकीच्या व अनीतिकारक अतएव समाजविध्वंसक आचारविचारांवर खरमरीत टीका केली आहे. तेंच आजच्या समाजाकडे नीट पाहून—निरखून पाहून—आजच्या

---

* या सर्व प्राण्यांची उत्पत्ति आनंदापासूनच होत असते. माझा हा हात भाग्यशाली असून हा (दुसरा) त्याहूनही अधिक भाग्यवान् आहे.

उपदेशकांनीं करावयास नको काय ? नवें युग, नवे शोध लक्षांत घेऊन, तसेंच नव्या युगाची आकांक्षा व प्राचीन तात्त्विक सिद्धांत यांचा योग्य समन्वय करून हिंदूंस योग्य मार्गाचा उपदेश करणारे उपदेशक निर्माण झाल्याशिवाय मंदिरांचें ध्येय–' धर्मशिक्षण '–मूर्त स्वरूपास येणार नाहीं.

**मंदिरांची आकर्षकता कशी वाढवावी ?**

मंदिरांत पुरेशी शांतता असली, तें स्वच्छ असलें आणि त्यांत वर सांगितलेल्या प्रकाराची धर्मोपदेशाची व्यवस्था असली तरी तें सर्वांसच आकर्षक होईल असें नाहीं. 'यदि सन्ति गुणाः ....विकसन्त्येव ते स्वयम्' हें तत्त्व कांहीं खोटें नव्हे. पण सध्यां व्यवहारच असा झालेला आहे कीं, चांगल्या मालालाही जाहिरातीची आवश्यकता लागते. कारण एवढ्या उच्च दर्जाची गुण-ग्राहकता सर्वच ठिकाणीं नसते. म्हणून मंदिराची बाह्य दृष्टीनें आक-र्षकता वाढविणें हें धार्मिकांचें कर्तव्य आहे. त्या दृष्टीनें मंदिरांत कोण-कोणत्या सुधारणांची आवश्यकता आहे हें येथें थोडक्यांत पाहूं.

**भव्यपणा**

मंदिरें हीं परमात्म्याचीं राहण्याचीं स्थानें व परमात्मा हा आपल्या-हून सर्व दृष्टींनीं मोठा या दोन कल्पना पुढें ठेविल्या, कीं मंदिर भव्य असलें पाहिजे हें निराळें सांगावयासच नको ! मंदिर इतकें भव्य असलें पाहिजे कीं, त्यांत शिरतांच आपण सामान्य घरांत शिरलेले नसून एका निराळ्याच–लोकविलक्षण–ठिकाणीं आलेले आहोंत असें भक्तास वाटलें पाहिजे. भव्य मंदिरांत वातावरणही गंभीर व उदात्त असेंच असतें व एकतऱ्हेनें तें परमेश्वराच्या असामान्यतेचा प्रत्यय करून देत असतें. मंदिर जितकें भव्य किंवा प्रशस्त असेल तितकें तें अधिक आकर्षक होईल कीं नाहीं याचा अनुभव घेऊनच निर्णय करावा. या मंदिराच्या भव्यपणास शोभेल असेंच प्रशस्त आवार मंदि-रास असलें पाहिजे. या आवाराच्या जागेंत फुलझाडें व शोभेचीं झाडें

तसेंच जलदेवतेचें नृत्य दाखविणारें कारंजें असावें. फुलझाडांतही जितके प्रकार साधतां येतील तेवढे साधावे. हेतु हा कीं, त्यायोगें पूजेच्या फुलांची सोय होऊन शिवाय निसर्गांतील परमेश्वराचें रचनाचातुर्यही सहजासहजीं प्रतीत व्हावें.

प्रत्यक्ष मंदिरांतही ज्या देवतेचें तें मंदिर असेल त्याचीच सर्वत्र प्रतीति येईल असें करावें. उदाहरणार्थ, रामाचें मंदिर असेल तर भिंतीवर निरनिराळे रामायणांतील उद्बोधक प्रसंग चित्रित करावे. देऊळ शंकराचें असल्यास '*अपि कौपीनवान्छम्भुस्तथापि परमेश्वरः' हें तत्त्व उत्कृष्टपणें रेखाटावें. श्रीकृष्णाच्या मंदिरांत जनकादिक प्रसिद्ध कर्मयोग्यांचीं चित्रें रेखाटावीं. याप्रमाणें आवारांत शिरतांच उच्च व प्रशांत वातावरणांत शिरलेलें मन मंदिरांतील देवतेशीं तन्मय होईल असें करावें. त्यांत विसंगतता होईल असें करूं नये. त्या त्या देवतेचीं प्रधान उपदेशवाक्येंही ठिकठिकाणीं लावून ठेवावीं ! तात्पर्य, मंदिराच्या एकंदर रचनेची ठेवणच एकाग्रतेला व धर्मोपदेशाला पोषक अशी करावी.

**मंदिरें आणि देवतांची संख्या**

एका मंदिरांत किती देवतांच्या मूर्ति असाव्या याचाही विचार एकाग्रतेच्या दृष्टीनें करावयास पाहिजे. एकाच मंदिरांत राम, कृष्ण, विष्णु, गणपति, शिव वगैरे जितक्या अधिक देवतांचा समावेश होईल तितक्या मानानें अधिक भक्तांचें आकर्षण होऊन संघटनाही वाढेल असें वरवर विचार करणारास वाटेल, पण तें तितकेंसें बरोबर नाहीं. त्या त्या सगुण रूपानें सर्वाधार परमेश्वराचीच उपासना करावयाची अशी ज्याची भावना असेल त्यास प्रतीक कोणतेंही चालेल ! रामदास पंढरीच्या पांडुरंगास भेटावयास गेले तेव्हां त्यांस तेथें रामचंद्राचेंच दर्शन झालें असें भक्तलोक सांगतात त्यांतील रहस्य हेंच आहे. अशा भक्तांस कोणतेंही प्रतीक चालूं शकतें. तेव्हां

* शंकर स्वतः लंगोटी नेसणारा असूनही सर्वसमर्थ आहे.

त्यांच्याकरितां अनेक मूर्तींची एका मंदिरांत आवश्यकता नाहीं. आतां जे देवतांमध्यें परस्पर विरोध मानतात त्यांचा प्रश्न बाकी राहिला ! असे भक्त आपल्या उपास्य देवतेखेरीज इतरांस तुच्छ मानणार आणि जर कां त्यांची उपास्य देवता बाजूस पडून दुसरीच मध्यभागीं आलेली असेल तर मग विचारावयासच नको ! त्यांची मनःशांति ढळून जावयाची. तात्पर्य, दोन्ही दृष्टींनीं विचार केला तरी एका मंदिरांत अनेक देवता असण्यांत तात्त्विक दृष्ट्या व व्यावहारिक दृष्ट्या कांहींच फायदा नाहीं हें सिद्ध होतें. या दृष्टीनें विचार केल्यास मुंबईसारख्या शहरांत जवळच स्वतंत्र दत्तमंदिर असूनही मुरलीधराच्या किंवा रामाच्या मंदिरांत त्यास उपदेवता म्हणून बसविणें कसें अशास्त्रीय आहे हें कळून येईल.

देवळांतील मुख्य मूर्ति किती उंचावर असावी याविषयीं एवढेंच सुचवावयाचें कीं, ती मंदिराच्या कोणत्याही कोपऱ्यांतून शांतपणें व धक्काबुक्की न करतां पाहतां येईल इतक्या उंचीवर असावी. मध्यें खांब आडवे न येतील अशी मंदिराच्या सभामंडपाची रचना असावी. तसेंच पायांत पादत्राणें घालूनही कोणास दर्शन घ्यावयाचें असल्यास तशीही बाजूस सोय ठेवावी. मंदिराच्या उत्पन्नावर तसेंच कार्यप्रणालीवर एखाद्या व्यक्तीची मालकी न राहतां एखाद्या सार्वजनिक संस्थेचा ताबा असावा, वगैरे कित्येक गोष्टी सहज लक्षांत येण्याजोग्या असल्यामुळें त्यांचा येथें उल्लेख करीत नाहीं.

**संघटनेची आवश्यकता**

आमचें हें वर्णन व धोरण पाहून कित्येक म्हणतील कीं, पैशाच्या अभावीं हें होणार कसें ? भव्य मंदिर, भव्य पटांगण, बाग या गोष्टी एकत्र मिळविल्या तर आकर्षकता येईल यांत शंका नाहीं. पण हें सर्व करण्यास जो पैसा लागेल तो कसा मिळवावा हें मात्र लेखकानें सांगितलें नाहीं. पण तेंच आतां सांगावयाचें आहे. छोट्या छोट्या

व कसातरी गुजारा करणाऱ्या शंभर मंदिरांऐवजीं मागें सांगितलेल्या प्रकारचें एक मंदिरही धर्मशिक्षणाच्या व धार्मिक वातावरणाच्या दृष्टीनें अधिक परिणामकारक आहे. गांवांतील रोग्यांच्या संख्येच्या मानानें डॉक्टरांची संख्या असेल तर त्यांत डॉक्टर व रोगी या दोघांचेंहि कल्याण असतें. पण जर या दोहींची संख्या प्रमाणांत नसेल तर आरोग्य वाढण्याऐवजीं आरोग्यनाश व बेकारी यांचेंच साम्राज्य वाढतें. त्याचप्रमाणें आजचीं मंदिरें संटघनेच्या तत्त्वांवर न चालतां परस्परांशीं अलिप्त राहून आपलें कार्य चालवीत असल्यामुळें त्यांस ‘ परस्परं भावयन्तः ’ या भगवन्तांनीं सांगितलेल्या श्रेयस्साधनाचा फायदा मिळत नाहीं. जें तें मंदिर स्वतंत्रपणें आपला मार्ग आक्रमीत असतें. याचा परिणाम अगदींच प्रतिकूल होतो.

**मंदिरांच्या चालकांस विनंति**

हल्लीं निदान शहरांतून तरी मंदिरांची संख्या भरमसाट वाढलेली आहे. ठाकुरद्वार रोडनें जावें व किती मंदिरांची पुनरावृत्ति निष्कारण झालेली आहे, तें ज्याचें त्यानेंच ठरवावें. काळाराम, गोराराम, व हरिभाऊचा राम यांनीं त्रिकोणांत अगदीं जवळ जवळ बसून रामभक्तांचा तिसरा हिस्सा आकर्षित करण्यापेक्षां हे सर्व एकाच मंदिरांत समाविष्ट होतील तर भव्यता, ऐक्य व खर्चास लागणारा पैसा या सर्व दृष्टींनीं किती सोईचें होईल ?

सध्यां मंदिरांच्या अनियमित वाढीमुळें कोणत्याच मंदिरास पुरेसा पैसा मिळत नाहीं. दंग्याच्या प्रसंगीं कोणत्या मंदिराचें रक्षण करावें व कोणत्याचें नाहीं हें सुचत नाहीं. व आकर्षकता आणि भव्यपणा मुळींच राखतां येत नाहीं. म्हणून निदान शहरांतून तरी यापुढें मंदिरांची संख्या न वाढेल अशाविषयीं काळजी घेणें आवश्यक आहे. कित्येक ठिकाणीं अस्पृश्यांकरितां म्हणून निराळीं मंदिरें बांधण्यांत येत आहेत. पण या उद्देशानें लाख लाख रुपये खर्चून जीं मंदिरें बांधलीं गेलीं

आहेत त्यांचें वास्तविक स्वरूप आज कसें आहे हें नीट पाहून मगच या प्रकारास प्रोत्साहन देणें बरें. अस्पृश्यांची उन्नति, त्यांची आर्थिक स्थिति सुधारल्यानेंच होईल. यादृष्टीनें केवळ अस्पृश्यांसच काम मिळेल असे कारखाने वगैरे काढणेंच अधिक उपयुक्त होईल ! त्यायोगें त्यांचा सामाजिक दर्जा वाढून अस्पृश्यताही नष्ट होईल. निराळीं मंदिरें बांधण्यापासून यांपैकीं कोणताही फायदा होणार नाहीं. केवळ पैशाचा अपव्यय व असलेल्या मंदिरांच्या अडगळींत एका नव्या इमारतीची भर घातल्याचा दोष मात्र लागेल ! तरी कोणत्याही सबबीवर यापुढें शहरांत लहानसहान मंदिरांची संख्या वाढवूं नये. तर असलेलीं मंदिरें कमी करून त्यांच्या ऐवजीं एखादेंच भव्य व आकर्षक मंदिर तयार होईल अशाविषयीं कसून प्रयत्न करावा.

मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरांतून इतर धर्मीयांचीं मंदिरें किती भव्य असतात ! पण हिंदूंचीं इतकीं मंदिरें असूनही तशा दर्जाचें एकही हिंदु मंदिर दिसून येऊं नये ही किती खेदाची गोष्ट आहे ? ही दुरवस्था मंदिरांच्या चालकांस जाणवत असेल तर त्यांनीं नसत्या शंका मनांत न घेतां व नसते अभिमान सोडून देऊन एक दिलानें संघटनेस तयार व्हावें. तसें होईल तरच मंदिरांच्या सुधारणेस मूर्त स्वरूप येईल.

जातां जातां एका प्रश्नाची चर्चा केली पाहिजे. मंदिरांत जाण्यास अस्पृश्यांस प्रत्यवाय आहे काय ? हाच तो प्रश्न होय. या प्रश्नास "नाहीं" असें आमचें सरळ उत्तर आहे. मागील प्रकरणांत मूर्तिपूजा अशिक्षितांकरितां आहे हें दाखविलेंच आहे. मंदिरांचें धार्मिक-शिक्षण प्रमुख कार्य आहे हें या प्रकरणांत दाखविलें आहे. शिवाय—

१ पावित्र्य बाह्यशुद्धि व अंतःकरणशुद्धि यांवरच अवलंबून आहे.

२ आपला धर्म मूळ अखिल मानवांकरितां आहे.

हे पुढील प्रकरणांत विस्तारानें सिद्ध केलेले दोन सिद्धांत लक्षांत घेतले

म्हणजे अस्पृश्यांस मंदिरप्रवेशाची बंदी करणें कसें अशास्त्रीय आहे हें दिसून येईल! मूळ तत्त्व न पाहतां केवळ रूढीचेच दास बनलेले लोक शास्त्राच्या नांवाखालीं हा अशास्त्रीय प्रकार चालू ठेवूं पहात आहेत हें सर्वथा गर्ह्य आहे. याहून या विषयांत येथें कांहींच सांगण्याचें कारण नाहीं.

ज्यांना आम्ही केलेली तत्त्वमीमांसा मान्य असूनही परंपरेच्या आधारावांचून कसेंसेंच वाटत असेल त्यांनीं म. म. पाठकशास्त्री यांच्या 'अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ' या ग्रंथांतील बारावा भाग अवश्य पहावा! त्यांत सर्व शंकांचें यथायोग्य निरसन केलेलेंच आहे.

## प्रकरण सातवें

# सामुदायिकप्रार्थनादिन

धर्मग्रंथांत जे कित्येक धार्मिक आचार सांगितलेले आहेत ते बहुधा वैयक्तिक आहेत. संध्या, जप, पूजा यांसारखे आचार तर वैयक्तिक आहेतच; पण दान, सन्मान वगैरे सामाजिक धर्मदेखील एकापरी वैयक्तिकच आहेत. कारण त्यांत समुदायास एकदम भाग घेतां येत नाहीं. दसरा, दिवाळी, संक्रांत वगैरे सण सामुदायिक या सदरांत येतात हें खरें आहे. तसेंच रामनवमी, गणेशोत्सव यांसारख्या उत्सवांतही सामुदायिक रूपानें हिंदूंस भाग घेतां येतो. तथापि वर्षाच्या ३६० दिवसांत अशा ३–४ दिवसांची दाद लागेल असें वाटत नाहीं. म्हणून ठराविक दिवशीं एकत्र जमून सर्व धार्मिक हिंदूंस निदान अर्धा तास तरी धार्मिक वातावरणांत घालवितां येईल अशी सामुदायिक योजना आज आवश्यक आहे.

**आठवड्याचा धार्मिक दिवस**

खिस्ती, यहुदी, मुसलमानी वगैरे कित्येक धर्मांत आठवड्यांतून एक दिवस विशेष पवित्र म्हणून ठरविलेला असतो. त्यादिवशीं लौकिक व्यवहार न करतां परमेश्वराच्या सान्निध्यांत दिवस घालवावा अशी त्यांच्या धर्माची शिकवण आहे. ख्रिश्चन धर्म, ज्यू लोकांचा धर्म व मुसलमानी धर्म क्रमानें रविवार, शनिवार व शुक्रवार यांस आपला धार्मिक दिवस म्हणून समजतात. मि. गंगाप्रसाद यांनीं आठवड्याच्या धार्मिक वारांची ही प्रथा मुसलमानी धर्मांत ज्यूंच्या अनुकरणानें आलेली आहे असें म्हटलें आहे. ते म्हणतात:—

“ The setting apart of one day in the week for the special service of God is also an institution of the

Jews who keep Saturday sacred. The Christians have Sunday for their Sabbath day. Mohomed has imitated these religions in this respect; but for the sake of distinction he has ordered his followers to observe Friday."

( The Fountainhead of Religion p. 11 )

बायबलमध्यें सहा दिवसांत सर्व सृष्टि उत्पन्न केल्यावर प्रभु सातव्या दिवशीं झोंपला; म्हणून या सातव्या दिवशीं कोणताही व्यवसाय न करतां तो दिवस ईश्वराचे सान्निध्यांत घालवावा अशी या दिवसाची उपपत्तीही दिलेली आहे. या उपपत्तीच्या युक्तायुक्ततेचा विचार येथें करण्याचें कारण नाहीं. परन्तु या आचारापासून कोणते फायदे होतात हें पाहणें आवश्यक आहे.

सर्व धर्मबांधवांनीं एकत्र जमून प्रार्थना इत्यादि धार्मिक कार्यक्रम केल्यामुळें संघटनेस बळ येतें, हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. एकत्र प्रार्थना वगैरे करतांना जें गांभीर्य सर्वत्र पसरलेलें असतें त्याचाही परिणाम मनावर होत असतो. म्हणून ठराविक दिवशीं ठराविक ठिकाणीं हिंदूंनीं समुदायानें एकत्र जमून प्रार्थनेचा कार्यक्रम साजरा केल्यास त्याचा अन्तःकरणांतील धर्मभावना वाढविण्यास, तसेंच संघटनेच्या दृष्टीनेंही फारच उत्तम परिणाम झाल्यावांचून राहाणार नाहीं. म्हणून इतर धर्मांचें या बाबतींत अनुकरण करून हिंदु धर्मीयांनींही असा एक दिवस पाळावा हें उचित होय. हा प्रघात अर्थातच नवीन पाडावयाचा असल्यामुळें, कोणत्या दिवशीं जमावयाचें ? कोठें जमावयाचें ? जमून काय करावयाचें ? असे अनेक प्रश्न उपस्थित होणार! म्हणून या कार्यक्रमाबद्दलची आमची योजना संक्षेपानें या प्रकरणांत वाचकांस सादर करण्याचा आमचा विचार आहे. तत्पूर्वी अशा प्रार्थनेचें महत्त्व लक्षांत घेतलें पाहिजे.

सामुदायिक प्रार्थनेचें महत्त्व अनुभवानेंच कळणें शक्य आहे. ज्यानें अशी प्रार्थना केलेली नाहीं त्यास तें कळणें शक्य नाहीं. सर्व धर्मबांधवांनीं एकत्र जमावें व त्यांचें संघटन व्हावें हा तिचा आनुषंगिक हेतु होय. तिचें मुख्य फळ तें नव्हे. एकटा मनुष्य कितीही नियमबद्धतेनें चालत असला तरी प्रेक्षकावर त्याचा परिणाम होत नाहीं. पण चारच इसमांची टोळी नियमबद्धतेनें चालत असली तर प्रेक्षकाचें मन तिकडे वेधल्यावांचून रहात नाहीं. तसेंच एकटा मनुष्य चालू लागला तर लवकरच थकून जातो. पण तोच एखाद्या जमावांतून चालला असेल तर, त्यास लवकर थकवा येत नाहीं; हा नित्याचा अनुभव आहे. जी गोष्ट चालण्याची तीच प्रार्थनेची. सध्यां कोठें कोठें शाळांतून अशी प्रार्थना रोज चालू असते. तेथें अशा प्रार्थनांचा इष्ट परिणाम व्यक्त होत नाहीं, हेंही तितकेंच खरें आहे. पण त्याचें कारण निराळें आहे. शाळेंतील प्रार्थनेच्या वेळीं सर्व शिक्षक हजर नसतात. याचा वाईट परिणाम मुलांच्या मनावर झाल्यावांचून रहात नाहीं. एकतानतेचा व गांभीर्याचा विरोध करणाऱ्या अशा अनेक अडथळ्यांमुळेंच शाळांतून चालू असलेल्या सामुदायिक प्रार्थना निष्फळ दिसतात. पण हा दोष प्रार्थनापद्धतीचा असून प्रार्थनेचा नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. असो. सामुदायिक प्रार्थनेच्या आवश्यकतेबद्दल याहून अधिक न लिहितां आतां तपशीलाकडेच वळूं.

**सामुदायिक प्रार्थनेचें महत्त्व**

या प्रार्थनेकरितां दिवस कोणता असावा याचा आतां विचार करूं. रविवार प्रार्थनेचा दिवस असावा असें कोणीही चटकन् या प्रश्नाचें उत्तर देईल! व रवि किंवा सूर्य हें आपलें धर्मदृष्ट्या श्रेष्ठ दैवत (पृ. ४६) असल्यामुळें त्यांत कांहीं वावगेंही नाहीं. परंतु दुसऱ्या दृष्टीनें विचार केला म्हणजे, सर्वांसच हा वार सोईचा होईल असें

**दिवस कोणता असावा?**

दिसत नाहीं. इतर दिवसांत नोकरीमुळें जीं कित्येक कामें करतां येत नाहींत, तीं या दिवशीं करण्याचा कित्येकांचा प्रघात असतो. कित्येक तर या दिवशीं परगांवींही जात असतात. शिवाय नवीनच रूढ करावयाच्या या प्रार्थनेंत दर आठवड्यास येण्यास लोक तयार होतील असें दिसत नाहीं. कदाचित् 'आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः' या न्यायानें प्रारंभींचे तीन चार वार लोक जमतीलही; परंतु पुढें पुढें अनास्था वाढत जाईल! म्हणून 'अल्पारंभः क्षेमकरः' या न्यायानें आरंभीं महिन्यांतून एकच दिवस या कार्यक्रमार्थ योजावा. महिन्यांतून एक दिवस जरी पुढील कार्यक्रम यथासांग पार पाडतां आला तरी तूर्त पुष्कळ आहे. एक वर्षाच्या अनुभवानें जर तो १५ दिवसांनीं करावा असें वाटेल तर महिन्यांतून दोनदांही करावयास हरकत नाहीं. पण आधीं पंधरा दिवसांनीं करावयाचें ठरवून मग तो महिन्यानें करण्याचा प्रसंग येईल तर मात्र तें बरें नव्हे. म्हणून तूर्त महिन्यांतून एकच दिवस या कार्यक्रमाकरितां योजावा.

आतां महिन्यांतून हा दिवस कोणता असावा याचा विचार करूं. तारीख किंवा वार यावरून दिवस ठरविला जाऊं नये हें उघड आहे. परंपरेचा अभिमान लक्षांत घेतां तिथींवरून दिवस ठरविणेंच युक्त होय. पूर्णिमा व अमावास्या या तिथींचें आपल्या वैदिक धर्मांत फारच प्राचीन कालापासून महत्त्व आहे. दर्शपूर्णमास—याग पूर्वीं याच तिथींवर केले जात. तेव्हां या दोन तिथींपैकीं अमावास्याच (दर्श) या प्रार्थनेकरितां योजावी, असें आम्हांस वाटतें. या दिवशीं व्यापारी वर्ग आपलीं दुकानें बंद ठेवीत असतो. एरवीं कोणत्याही दिवशीं त्यांस सुटी नसते. हें लक्षांत घेतल्यास व्यापारीवर्गाची यांत गैरसोय मुळींच नाहीं हें दिसून येईल! नोकरवर्गास दर अमावास्येस सुटी मिळेलच असें नाहीं. हें खरें, पण त्यांची नोकरीची वेळ चुकवून कार्यक्रमाची वेळ ठरविली म्हणजे झालें. तात्पर्य, दर महिन्याची अमावास्या हा

दिवस सामुदायिक प्रार्थनेकरितां ठरविणें योग्य दिसतें. अमावास्येच्या दिवशीं चंद्र व सूर्य दोघेही एकत्र रहात असल्यामुळें अमावास्येच्या रात्रीं विशेष पावित्र्य (ब्रह्मचर्य व वक्तशीरपणा यांचे योगानें) राखावें असें आपस्तंबानें‡ सांगितलें आहे. अमावास्येच्या रात्रीं प्राण्याची हिंसा करूं नये असें उपनिषत्कारही* सांगतात. अमावास्येचें हें प्राचीन महत्त्व लक्षांत घेतल्यास त्याच दिवशीं सामुदायिक प्रार्थनादिन साजरा करणें कसें योग्य आहे हें कोणासही कळून येण्यासारखें आहे. तथापि ग्रामस्थांनीं दुसराही एखादा अधिक सोईचा दिवस ठरविल्यास कांहीं बिघडणार नाहीं.

**कार्यक्रमाचा वेळ**

कार्यक्रमाचा दिवस ठरल्यावर तो कोणत्या वेळीं व किती मर्यादेत करावा हे प्रश्न येतात. यांपैकीं दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर अर्धा तास असें आहे. आजची एकंदर मानसिक चंचलता लक्षांत घेतां अर्धा तासही संयम करून विशिष्ट शिस्तींत हिंदुधर्मबांधव वागतील तरी पुष्कळच आहे. अर्ध्यातासाहून हा कार्यक्रम कधींही लांबवूं नये. याहून जास्त लांबविल्यास चलबिचल सुरू होऊन कार्यक्रमाचा विचका होईल. तरी अर्ध्या तासांतच हा कार्यक्रम आटोपण्याकडे कटाक्ष ठेवावा.

केवळ अर्धाच तास कार्यक्रम ठेवल्यास दुसरीही एक सोय होईल! दिवस सुटीचा नसला तरीही नोकरपेशाच्या लोकांस कार्यक्रमास हजर राहाणें त्यामुळें सोईचें होईल! कार्यक्रमाची वेळ सकाळीं ८ ते ९ च्या दरम्यान कोणताही अर्धा तास निश्चित करावी. ग्रामस्थांच्या सोयीकडे

---

‡ दिवाऽऽदित्यः सत्वानि गोपयति नक्तं च चन्द्रमाः। तस्मादमावास्यायां निशायां स्वाधीय आत्मनो गुप्तिमिच्छेत्। प्रायत्य-ब्रह्मचर्य-काले-चर्यया च ॥ २१ ॥ स ह ह्येतां रात्रिं सूर्याचन्द्रमसौ वसतः ॥ २२ ॥

आपस्तंब ध. सूत्र १.३१

* तस्मादेतस्यां रात्र्यां प्राणभृतः प्राणं न विच्छिन्द्यात्। बृ. १.५.१४)

लक्ष देऊन सकाळचा किंवा संध्याकाळचा अर्धा तास निश्चितपणें ठरवून ठेवावा व सहसा त्यांत बदल न करण्याची खबरदारी घ्यावी. कार्यक्रमाची सुरवात एका मिनिटानेंही उशिरां न होईल व तो ठराविक वेळीं सुरू होऊन ठराविक वेळींच समाप्त होईल याविषयीं दक्ष असलें पाहिजे.

**कार्यक्रमाचें स्थळ**

आतां प्रत्यक्ष कार्यक्रमाचें स्वरूप जाणण्यास वाचक उत्कण्ठित झाले असतील; परंतु तें सांगण्यापूर्वी कार्यक्रमाचें स्थळ कोणतें असावें याबद्दल चर्चा करणें आवश्यक आहे. उगाच एखाद्या कोपऱ्यांतील जागा ठरवूं नये हें सांगणें नकोच! शक्य तों कोणालाही १० मिनिटांपेक्षां अधिक वेळ जावयास लागणार नाहीं इतक्या अदमासानें जागा ठरवावी. एखाद्या प्रशस्त मंदिराचीच जागा या कामाकरितां मिळेल तर अधिक उत्तम! मंदिर न मिळाल्यास दुसरीही जागा चालेल! थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे लोकसमुदाय मावेल अशी प्रशस्त व शक्यतोंवर प्रशान्त जागा असावी.

**कार्यक्रमाची रूपरेषा**

आतां अर्धा तास पर्यंत सर्वांनीं जमून काय करावें, याचा विचार करूं. प्रार्थना करणाऱ्यांनीं ठराविक वेळेच्या पूर्वीच हजर व्हावें. सदर जागेंत येतांना सर्वांनीं अगोदरच तोंडाला कुलूप घातलेलें असावें. कार्यक्रम सुरू झाल्यावर गलबला शांत होतो असा साधारण नियम असतो. पण येथें तसें करूं नये. इमारतींत शिरावयाचें तें पुन्हां बाहेर पडेपर्यंत बोलावयाचें नाहीं अशा निश्चयानेंच शिरावें.

ठराविक वेळ सूचित होण्याकरितां मोठी घंटा असल्यास तिचा आवाज करावा. नसल्यास कसला तरी कर्कश आवाज करूं नये. त्यानंतर पुढील कार्यक्रम येणेंप्रमाणें असावा.

( १ ) सहनाववतु वगैरे शान्ति १ मिनिट.

( २ ) ऋग्वेदांपैकीं सूर्यासंबंधीं एखादें सूक्त ४ मिनिटें.
( ३ ) मराठी किंवा हिंदी दोन प्रार्थनापर पदें १० मिनिटें.
( ४ ) एखाद्या चरणावर किंवा कथेवर निरूपण १० मिनिटें.
( ५ ) तुकारामादिकांचा अभंग ३ मिनिटें.
( ६ ) 'आब्रह्मन् ब्राह्मणो' यासारखा एखादा वैदिक अनुवाक् २ मिनिटें.

या शेवटच्या कार्यक्रमानंतर ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः असें प्रार्थना करणारांनीं म्हणावें व तें होतांच सर्व श्रोत्यांनीं नमन करून मूकभावानें इमारतीच्या बाहेर यावें. वरील कार्यक्रमांपैकीं तिसरा व पांचवा हे कार्यक्रम दोघां तिघांनीं एकदम म्हणून साजरे केल्यास अधिक बरें होईल! तसेंच यांपैकीं एखाद्या कार्यक्रमाबद्दल 'रघुपति राघव राजाराम' यासारखें एखादें भजनही केव्हां केव्हां ठेवावयास हरकत नाहीं.

**प्रार्थना करणारे**

वरील कार्यक्रम पाहिल्यास त्यांत तीन प्रकारच्या मनुष्यांचा समावेश पाहिजे हें दिसून येईल! एक वैदिक, दुसरा गवई व तिसरा प्रवचनकर्ता हेच ते तीन जण होत. हे तिन्ही गुण एकामध्येंच असतील तर उत्तमच! नसतील तर मात्र त्या त्या कामाकरितां योग्य त्या निरनिराळ्या इसमांची निवड करावी. वैदिक पहिला, दुसरा व सहावा हे कार्यक्रम उत्तमरीतीनें पार पाडीलच! या कार्यक्रमाकरितां वैदिक नच मिळेल तर दुसऱ्यानें हें काम करावयास हरकत नाहीं. मात्र 'मी जातिवन्त वैदिक नाहीं.' या सबबीवर अशुद्धपणा करून चालणार नाहीं. वेदांतील भाग परंपरासिद्ध पद्धतीनें म्हणण्याची व्यवस्था असेल तरच तो म्हणावा. अन्यथा तो कार्यक्रम गाळून त्याऐवजीं दुसरा अनुसरावा. येन केन प्रकारेण प्रत्येक पोटकार्यक्रम झालाच पाहिजे असला कट्टरपणा स्वीकारून कोणत्याही कार्यक्रमाची हानि करूं नये.

योग्य आवाजांत पदें म्हणणारे वा भजन सांगणारे न मिळतील तर कसा-तरी तो कार्यक्रम पार पाडूं नये. गवयानें पदें अगदीं साध्या रीतीनें म्हणावीं. अर्थविघातक पदच्छेद न करतां तसेंच तानबाजी न गाजवितां बिन साथीनें किंवा फार तर साध्या तंतुवाद्याच्या साथीनें पदें म्हणावीं. थोडक्यांत सांगावयाचें तर भजनास गायनाच्या जलशाचें रूप प्राप्त न होईल याविषयीं सावधगिरी बाळगावी. याचप्रमाणें इतर कार्यक्रमाचें-ही समजावें.

**व्यवस्थापक मंडळाचें कर्तव्य**

कार्यक्रमाची एकंदर व्यवस्था गांवांतील सद्गृहस्थांच्या मंडळाकडे असावी. त्या मंडळाच्या सभासदांनीं कार्यक्रमांस हजर राहण्याच्या बाबतींत बिलकुल चुकारपणा करूं नये. तसेंच कार्यक्रमाचें इतिवृत्त लिहून तें गांवांत वाचनालय असल्यास तेथें वाचावयास ठेवावें. हें इतिवृत्त अगदीं सत्यपूर्ण असावें. ज्या ठिकाणीं कार्यक्रम व्हावयाचा असेल त्या जागीं तीन चार (आवश्यकतेप्रमाणें) सीलबंद पेट्या ठेवण्याची व्यवस्था ठेवावी. कार्यक्रमांत भाग घेतलेल्या प्रत्येक श्रोत्यानें व वक्त्यानें जातांना अगर येतांना त्यांत एक नाणें अवश्य टाकलेंच पाहिजे असा नियम ठेवावा. निदान एक पैसा तरी टाकलाच पाहिजे असें ठरवावें. तेवढाही देण्याचें सामर्थ्य नसल्यास स्वतःच्या नांवाची चिठ्ठी पेटींत टाकावी. म्हणजे नाणीं व चिठ्या मोजून एकंदर श्रोतृसमुदाय त्या दिवशीं किती जमला होता हें ठरविण्यास सोपें जाईल. कार्यक्रम होतांच पंचांनीं सर्व चिठ्या व नाणीं मोजून श्रोतृसंख्या ठरवावी व जमलेला गल्ला योग्य ठिकाणीं ठेवण्याची व्यवस्था करून घरीं जावें.

**आग्रहाची विनंति**

व्यवस्थापकमंडळानें या बाबतींत मुख्य गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, व्यवस्थेंत उच्चनीचतेच्या कल्पनेस मुळींच वाव देऊं नये. मनुष्य एरवीं कोणत्याही

दर्जाचा व कोणत्याही जातीचा असो, परमात्म्याजवळ सर्व सारखे ही भावना दृढ होईल. याबद्दल व्यवस्थापकांनीं विशेष कसोशीनें प्रयत्न करावा. तसेंच या कार्यक्रमांत भाग घेण्याविषयीं सामान्य दर्जाच्या लोकांत अगोदर चळवळ न करतां प्रथम ती वकील, डॉक्टर, वैद्य, व्यापारी, शिक्षक, घरमालक वगैरे वर्गांत करावी. या वर्गांतील लोक असल्या कार्यक्रमांत भाग घेऊं लागले म्हणजे 'इतरे जनाः' आपोआपच प्रवृत्त होतील ! असो. याशिवाय कित्येक सूचना देतां येतील; परन्तु त्या प्रत्यक्ष कार्यक्रम सुरू केल्यावर कोणाच्याही सहज लक्षांत येण्याजोग्या आहेत म्हणून त्यांचा येथें विचार करण्याचें कारण नाहीं.

## प्रकरण आठवें

# सण, संस्कार आणि उत्सव

हिंदु धर्मांत सामुदायिक स्वरूपाचे जे आचार आज रूढ आहेत त्यांचा सण, संस्कार व उत्सव या तिहींत समावेश करतां येईल. एक-मेकांच्या घरीं सहसा न जाणारेही दसरा-संक्रातीस सोनें किंवा तिळ-गूळ देण्यास जातात. निदान लग्नमुंजीच्या वेळीं तरी आपण एकमेकां-च्या घरीं जातोंच जातों. गणपति-उत्सव वगैरे प्रसंगीं एकमेकांच्या घरीं न गेलों तरी एखाद्या ठिकाणीं जमून परस्पर सहाकारितेनें कामें करतों. म्हणून सण, संस्कार आणि उत्सव हे सामुदायिकधर्म आहेत असें एका अर्थानें म्हणावयास हरकत नाहीं. मूलतः प्रत्येकाचें रूप व ध्येय जरी निराळें असलें तरी या दृष्टीनें त्याचें स्वरूप एकच असल्यामुळें हिंदूंच्या सामुदायिक प्रार्थनादिनाची नवी प्रथा विचारांत घेतल्यावर या प्राचीन सामुदायिक आचारांचीही विचारपूस करणें क्रमप्राप्तच आहे.

सर्वच सण आतां पाळले जात नसले तरी पाडवा, दसरा, दिवाळी, संक्रांत यांसारखे सण अजूनही पाळले जातात. होळीचा सणही कोणत्या ना कोणत्या रूपानें पाळला जातोच! अशा स्थितींत या सणांकडे जरा सुधारणेच्या अभिनव दृष्टीनें पाहिल्यास तें अधिक उपयुक्त होईल!

कोणते सण पाळावे याविषयीं मतभेद होण्याचें कारण नाहीं. पाडवा, दसरा, दिवाळी, संक्रांत, शिमगा हे वार्षिक सण सर्व हिंदूंनीं पाळावेच; पण यांशिवायही कांहीं सण पाळावयाचे असल्यास त्यांत कांहीं बिघड-णार नाहीं. 'अधिकस्याधिकं फलं' हा न्यायच आहे. या मुख्य सणां-पैकीं दसरा व संक्रांत हे सण आपण एकमेकांच्या भेटी घेऊन साजरे करीत असतोंच! त्यांत संक्रांतीच्या दिवशीं मुद्दाम आपण होऊन ज्याच्याशीं आपलें भांडण झालें असेल त्याच्याकडे जावें. एकदां भांडण

झालें म्हणजे एकमेकांच्या गांठीभेटी बंद होतात व मग गैरसमज वाढत जाऊन विनाकारण तेढ पक्की होत असते. समाजांतील मोठ्या पक्ष-भेदाचा प्रारंभ वैयक्तिक भांडणांत असतो हें ज्यांस माहीत आहे त्यांस या प्रथेचें महत्त्व पटण्यास उशीर लागणार नाहीं. मात्र गांवांतील चार शिष्ट लोकांनीं समंजसपणानें या प्रकारास मदत करून भांडण मिटण्या-ऐवजीं अधिक न वाढेल असें करावें. 'तिळगुळ घ्या गोडसें बोला, मागचें विसरून जा!' असें एकानें म्हणावें व दुसऱ्यानें 'अहो हें काय! मीच तुमच्याकडे यायला पाहिजे होतें. विकाराच्या भरांत मी तें बोलून गेलों याबद्दल मी तुमची क्षमा मागतों!' असें म्हणून त्याचा सत्कार करावा. या प्रकाराचा जितका अधिक प्रसार होईल तितकें हिंदूंतील संघटन वाढत जाऊन हिंदुसमाज बलसंपन्न होईल हें काय सांगावयास पाहिजे?

सध्यां आपलें राष्ट्र हलाखीच्या स्थितींत आहे. यामुळें दिवाळीचा सण यथायोग्यप्रकारें साजरा करतां येणार नाहीं हें उघड आहे. जर लक्ष्मीच नष्ट झाली तर पूजन तरी कशाचें करावयाचें? तथापि परस्पर सहकारिता वाढण्याच्या दृष्टीनें लक्ष्मीपूजनार्थ धर्मबंधूंस बोलावून पान-सुपारी करणें वगैरे जे कित्येक प्रकार चालू आहेत ते योग्यप्रकारें करणें इष्टच आहे. मात्र अत्तरें, दारूसामान यांच्या रूपानें या सुमुहूर्तावर जो लक्षावधि पैसा परदेशांत पाठविला जातो त्यास आळा घालणें आव-श्यक आहे.

गुढी पाडव्याच्या दिवशीं मागील प्रकरणांत वर्णिलेल्या प्रमुख मंदि-रावर किंवा एखाद्या सार्वजनिक ठिकाणीं जमून * ध्वजारोपण करावें व

* हिंदूंचा ध्वज कसा असावा याबद्दल सध्यां चर्चा चालू आहे. तिचा परा-मर्श येथें स्थलाभावास्तव घेतां येत नाहीं. म्हणून कुण्डलिनीच्या गूढ शोधांत न शिरतां सूर्याचें चित्र हिंदूंच्या ध्वजावर असावें असें सुचवून या विषयाची रजा घेणें भाग आहे. सूर्याचें हिंदूंस किती महत्व आहे हें मागें ( पृ. ४८ ) दाखविलेंच आहे.

सर्व धर्मबांधवांनीं त्याभोंवतीं जमून वैदिक व लौकिक गीतांनीं परमेश्वराची प्रार्थना करावी.

शिमग्याच्या सणाबद्दल सध्यां सर्वत्र ओरड होत असून या सणांतील अश्लील गोष्टी बंद पाडण्याचा कित्येक समाजधुरीण प्रयत्नही करीत आहेतच! कित्येकांचें या अश्लीलतेचें समर्थनही विचारांत घेण्याजोगें आहे. ते म्हणतात, एकसारखें बंधन स्वीकारल्यामुळें त्याविरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ति होणें स्वाभाविक आहे. अपशब्द उच्चारण्याची बंदी झाल्यानें अपशब्दोच्चाराच्या इच्छेस प्रतिबंध होतो. या प्रतिबंधाच्या प्रतिक्रियेंतून होळीच्या सणाची उत्पत्ति झालेली आहे. अश्लीलतासमर्थक याप्रमाणें मानसमंथन करून शिमग्यांतील अश्लीलतेचें समर्थन करीत असतात. अकरा महिने बांधून ठेवलेल्या जिभेस एक महिना तरी स्वैरसंचार करण्यास मिळाला पाहिजे अशी त्यांची ( त्यांच्या मताप्रमाणें ) रास्त मागणी आहे.

या समर्थनांत दोन ढोबळ चुका आहेत. एक ऐतिहासिक व दुसरी आनुभविक. होळीची ऐतिहासिक उपपत्ति वर दिलेल्या कारणांत नाहीं तेव्हां ऐतिहासिक दृष्टीनें तिचें समर्थन करणें शक्य नाहीं. आतां मानसमंथनाचा जो पुरावा उपस्थित केला गेला आहे तो कसा अनुभवाविरुद्ध आहे तें पाहा! असे कित्येक लोक आजही दाखवितां येतील कीं, ज्यांच्या तोंडून शिमग्यांतील शिव्या कधींच निघत नाहींत. बरें, हे लोक केवळ प्रतिबंधक नियमांच्या जबरदस्तीमुळें असें करतात असेंही म्हणतां येत नाहीं. कारण शिमग्यांत शंखध्वनि करावा अशी लिखित शास्त्राची परवानगी असूनही ते तो करींत नाहींत व केलाच तर एकदां केवळ शास्त्र म्हणून करतात, हेंही पुष्कळांस ठाऊक असेल. प्रतिबंधानें प्रतिकारशक्ति बळावते हें जितकें खरें आहे तितकेंच दीर्घकालीन प्रतिबंधानें प्रतिकाराची इच्छाही नष्ट होते हेंही सत्य आहे. अलीकडील Abnormal psychology चे अभ्यासक ही मानस-

शास्त्रीय गोष्ट लक्षांत घेत नाहींत ही गोष्ट निराळी. तेव्हां सर्वांसच या अश्लीलतेची आवश्यकता आहे हें सिद्ध होत नाहीं. आतां जे या वर्गांत समाविष्ट होत नाहींत अर्थात् ज्यांस अशा गोष्टी करण्याची इच्छा होते पण शास्त्रनिर्बंधामुळें ज्यांस त्या करतां येत नाहींत त्यांचा विचार करूं. असे लोक अनिवार्य इच्छेचे असतील तर ते अकरा महिने थांबणारच नाहींत. बरें, निवार्य इच्छेचे असतील तर त्यांच्या ठिकाणीं विवेकाचा प्रादुर्भाव झालेला असणार. विवेकानें अश्लीलतेचें समर्थन करणें शक्य नसल्यामुळें ज्यांनीं अकरा महिने विवेक केला ते बाराव्या महिन्यांत उतावळे न होतां त्यांची अश्लीलतेच्या विरुद्धच प्रवृत्ति बनेल. तात्पर्य, हिंदूंमध्यें या सणाच्या निमित्तानें अश्लीलता व्यक्त झालीच पाहिजे असें म्हणणें समर्थनीय नाहीं. मग या सणाचा अजिबात लोप करावा काय ? तर नाहीं आज अनेक प्रकारांनीं या सणाचा उपयोग करून घेतां येणें शक्य आहे.

असंस्कृत लोकांस संस्कृत करण्याचे कामीं या सणाचा उपयोग करून घ्यावा. अस्पृश्यांचे वस्तींत मुद्दाम जाऊन त्यांस स्वच्छतेची राहणी शिकविणें, त्यांच्या गलिच्छ आचारविचारांबद्दल त्यांस विवेकपूर्ण प्रत्यक्ष समजूत देणें, वगैरे कार्यें या सणांत केलीं पाहिजेत. खेडेगांवांतून या दिवसांत सर्वांनीं एकत्र जमून आट्यापाट्या, खोखो वगैरे खेळ खेळण्याचा परिपाठ आहे तोही आवश्यक आहे. स्पृश्य व अस्पृश्य हे बरोबरीनें खेळूं लागले व तेही एका धार्मिक दिवशीं जुन्या परंपरेस अनुसरून खेळूं लागले तर तें सर्व दृष्टीनें उत्कर्षास कारणीभूत झाल्यावांचून राहाणार नाहीं, हें या संबंधांत ध्यानांत ठेवलें पाहिजे. तसेंच 'एप्रिल फूल' म्हणून जो पाश्चात्यांत प्रकार आहे त्याचा नर्म–हास्य–विनोद या रूपांत योग्य प्रमाणांत उपयोग या सणांत करून घेतल्यास तें अधिक उपयुक्त होईल असें वाटतें. या नव्या धोरणानें हा सण नीट विचारपूर्वक चालू केल्यास तो उद्बोधक होईल यांत संशय नाहीं.

भाऊबीज हा सण सर्व हिंदूंत पाळला जातोच ! ज्यांना बहीण नाहीं. ते मानीव बहिणीस ओवाळणी घालतात हें युक्तच आहे. पण विधवा बहिणीची ओवाळणी नाकारली जाते हें योग्य नाहीं. बहिण–भावंडां-मधील विशिष्ट प्रेमास प्रोत्साहन देणारा हा सण आहे. बहीण विधवा झाली तरी बहीणच असते. तसेंच विधवा अशुभ नसते हें पुढें सोळाव्या प्रकरणांत दाखविलेलेंच आहे. तरी विधवा बहिणीसही ओवाळून आपल्या भावाचें सर्वांदेखत स्वागत करण्याचा पूर्ण अधिकार आहे हें लक्षांत घ्यावें. व त्या अधिकाराची पायमल्ली करणारी कोण-तीही रूढि धर्मविरुद्ध अतएव त्याज्य समजण्यांत यावी.

याप्रमाणें मुख्य सणाचें वर्णन केलें आहे. सणाच्या दिवशीं परस्पर सहकारिता दृढ होईल अशा तऱ्हेचें कोणतेंही कृत्य करण्यास हरकत नाहीं. फार काय, तें केलेंच पाहिजे हें लक्षांत घेऊन संघटनात्मक सार्व-जनिक कार्यक्रमाची आखणी करावी. पाडव्याच्या दिवशीं काय करावें हें वर सांगितलेंच आहे. दसऱ्याचे दिवशीं सीमोल्लंघनास सर्वांनीं एक-दमच निघावें. संक्रांतीचे दिवशीं तिळगूळ सार्वजनिक मंदिरांत वांटावा. अशा प्रकारचे कार्यक्रम मुद्दाम ठेवावें. याप्रमाणें सणांचा विचार करून आतां संस्कारांकडे वळूं.

उपनयन आणि विवाह हेच संस्कार सध्यां विशेष तत्परतेनें पाळले जातात. संस्कारांचा मूळ हेतु वैयक्तिकच आहे. उपनयन हा बटूचा व विवाह हा वधूवरांचा संस्कार. अर्थात् यांत समाजाचा संबंध काय ? असें वाटणें स्वाभाविक आहे. पण असें नाहीं. हे संस्कार वैयक्तिक तर खरेच, परंतु ते एका दृष्टीनें सामाजिकही आहेत. प्राथमिक शिक्षण आज सक्तीचें केलेलें आहे. क्षिक्षण विद्यार्थ्यानें व्यक्तिशः घ्यावयाचें असतें हें खरें, पण प्रत्येक मुलानें शिक्षण घेतलेंच पाहिजे यावर ज्या कारणास्तव समाजाचा कटाक्ष असतो त्याच कारणास्तव उपनयन हा संस्कार सामाजिक बनलेला आहे. आज उपनयनांचें खरें स्वरूप नष्ट झालेलें

असल्यामुळें लोकांस त्याचें सामाजिक रूप कळेनासें झालें आहे ही गोष्ट निराळी; पण समाजांत अनुपनीत मनुष्य असणें हें अशिक्षित मनुष्य असण्याइतकेंच घातुक असल्यामुळें आजही उपनयनास सामाजिक रूप येण्यास कांहींच हरकत नाहीं. मात्र त्यांत थोडी सुधारणा पाहिजे.

पूर्वीं उपनयन म्हणजे बापानें मुलास गुरुगृहीं नेऊन शिक्षणाकरितां तेथें ठेवणें असा अर्थ होता. पण आज तशी व्यवस्था नाहीं. अर्थात् मुख्य हेतूच्या दृष्टीनें आज उपनयन शक्य नाहीं. तसेंच बारा किंवा चोवीस वर्षें विध्याध्ययन करून मग समावर्तन किंवा सोडमुंजहि शक्य नाहीं. मुंज झाल्यावर १५।२० दिवसांतच सोडमुंज करण्याची रूढि पडलेली आहे ती याचमुळें. अशा स्थितींत परिस्थिति व परंपरा या दोहींकडे लक्ष देतां पुढील पद्धत अनुसरणें योग्य दिसतें.

लहानपणचें अनिर्बंध वर्तन सोडून संयमयुक्त राहणीनें राहाण्याचा निश्चय करणें हा या संस्काराचा प्रधान हेतु समजावा ! अमुक तऱ्हेनें वाग असें नुसतें एकव्यानें केव्हांतरी सांगण्यापेक्षां विशिष्ट वेळीं समारंभ करून अग्नि व ब्राह्मण यांच्या सान्निध्यांत तोच उपदेश केल्यास त्याचा परिणाम अधिक होतो. आपल्या आप्तांतील एक बालक आपलें बाल्य सोडून देऊन आतां श्रेष्ठ वागणुकीचा धडा घेणार म्हणून त्यास आशीर्वाद देण्याकरितां ओळखीच्या आप्तेष्टांनीं जमून बटूचा उत्साह वाढवावा. नंतर १५ दिवस तरी शाळेंत वगैरे न जातां संध्या पुरुषसूक्त वगैरे शिकण्यांत घालवावें व मग समावर्तन ( सोडमुंज ) करावें. हल्लीं मुंजींत भिक्षावळीची म्हणून जी मिरवणूक काढतात ती अशास्त्रीय आहे. ब्रह्मचर्यव्रताच्या स्वरूपाचा त्याच दिवशीं दागिने व जरीचे कपडे घालून घात करूं नये. सूत्रोक्त मौंजीबंधनसंस्कार अमलांत येईल तर या गोष्टी अर्थातच मागें पडतील ! मात्र सूत्रोक्त संस्कार म्हणजे सामर्थ्य असून कमी खर्चांत कार्य उरकण्याची परवानगी असा अर्थ घेऊं नये. कित्येक सधन गृहस्थ या सुधारणेचा उपयोग खर्चाची बचत करण्या-

कडे करतात, आणि वर असें करण्यांत आपण सुधारणा केली असें समजतात. पण तें बरोबर नाहीं. मोठें ब्राह्मणभोजन वगैरे प्रकारांत जो पैसा खर्च करावयाचा त्याऐवजीं तेवढीच रक्कम एखाद्या प्राचीनविद्या-प्रधान संस्थेस देणगी म्हणून द्यावी म्हणजे झालें. सामर्थ्य असून अशा पवित्र संस्काराचे वेळीं योग्य मार्गांत व्यय न करणें कोणत्याही प्रकारें समर्थनीय नाहीं.

जी गोष्ट उपनयनाची तीच गोष्ट विवाहाची! विवाह हा केवळ दोघांचाच प्रश्न आहे असें आज कित्येक मानतात. पण हें विवाह-संस्थेच्या अज्ञानाचें द्योतक आहे. पतिपत्नींचा वैषयिक आनंद एवढेंच विवाहाचें ध्येय असतें तर गोष्ट निराळी होती. पण विवाहाचा एवढा एकच हेतु नाहीं. अपत्योत्पादन हाही विवाहांतील एक प्रमुख हेतु असून विवाह ही सामाजिक बाब ठरते. आधुनिक नवनीतीचा आचार्य रसेल पुढील उताऱ्यांत हीच गोष्ट मान्य करीत आहे. तो म्हणतो:—

Marriage is something more serious than the pleasure of two people in each other's company, it is an institution which, through the fact that it gives rise to children, forms part of the intimate texture of society, and has an importance extending far beyonnd the personal feelings of the husband and the wife.

( Marriage and Morals. p. 63 ).

गृहस्थाश्रमाचें संपूर्ण विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि हा संस्कार एका अर्थानें सामुदायिक कसा आहे हें मुद्दाम येथें दाखविलें आहे.

या समारंभांत सर्व निमंत्रित मंडळींनीं भाग घ्यावा! तो गरीब आहे त्याकडे कशाला जा असें मनांत आणून टाळूं नये. तसेंच या समारंभास जातांना सामर्थ्य असून रिक्त हस्तानें जाऊं नये. या बाब-

तींत गुजराथ्यांच्या चांदल्याची पद्धत अनुकरणीय आहे. ज्याप्रमाणें आर्थिक त्याचप्रमाणें शारीरिक मदतीचीहि या कार्यास जरूरी असते. ती स्वयंस्फूर्तीनें आप्तवर्गानें केली पाहिजे.

यासंबधांत पूर्वीची चाल अशी होती कीं, आप्तांतील पुरुष काय किंवा बायका काय, लग्नघरीं काम केल्याखेरीज जेवत नसत. वृद्ध लोक एकंदर कार्यक्रमाकडे लक्ष ठेवून आल्यागेल्यांच्या स्वागताकडे लक्ष ठेवीत व बाकीचे बैठका घालणें, पानें मांडणें, रांगोळ्या घालणें वगैरे व्यवस्था पहात. अशीं अनेकविध कामें स्वयंस्फूर्तीनें करण्यापासून महत्त्वाचें शिक्षण मिळतें. तसेंच निरपेक्षपणें आपल्या आप्तांस मदत करण्यांत कमीपणाही नसतो. पण कित्येकांस हा विचारच रहात नाहीं. ते नसते मानापमान उकरून काढून बखेडा माजवितात. पण हें सर्व कोत्या समजुतीचें द्योतक आहे. आपल्या आप्ताला शारीरिक मदत करण्याची संधि आलेली असतां ती फुकट घालविणें यासारखा वेडेपणा नाहीं. तसेंच जेवणावळीनंतर पानें उचलणें व शेण लावणें यांसारखीं कामें करण्याकरितां नोकर ठेवावे लागतात हें बरें नाहीं. पूर्वकाळच्या महिला उष्टीं काढणें हें आपलें कर्तव्य समजत असत व तत्परतेनें हें काम बजावीत. आजच्या कित्येक सुशिक्षित महिला हें काम करण्यास लाजतात. इतकेंच नव्हे तर एखादी जुन्या वळणाची बाई उष्टीं काढू लागली तर तिला हंसतात. हा सर्व अविवेकाचा परिणाम आहे. स्त्रियांनींच उष्टीं काढावीं असा याचा अर्थ घेऊन आम्ही समान हक्काला विरोधी आहों कीं काय असला प्रश्न उपस्थित करून या ठिकाणीं मूळ विषय बाजूला सोडण्याचें कारण नाहीं. ज्यांना वेळ असेल त्यांनीं हें काम करावें. त्याकरितां नोकर ठेवून खर्च पडण्याची पाळी येऊं नये एवढेंच दाखविण्याचा उद्देश आहे. यायोगें गरिबांना मदत होऊन त्यांचा या प्रसंगानिमित्त होणारा बराचसा खर्च वांचेल. तात्पर्य, ज्याप्रमाणें सणांत सर्व हिंदूंनीं त्याचप्रमाणें संस्कारप्रसंगींही सर्व नाते-

वाईकांनीं व परिचितांनीं आस्थेनें व उच्चनीच भाव सोडून वागावें. अशा वेळीं श्रीमंत लोकांनीं संधि साधून मुद्दाम केर काढून बैठका घालणें, पाणी भरणें वगैरे हलकीं वाटणारीं कामें करून आपण संपत्तीमुळें गर्विष्ठ झालेले नसून इतरांच्या मदतीकरितांच ती जणूं ठेव म्हणून बाळगतों या तत्त्वाची प्रचीति दिल्यावांचून राहूं नये. असो.

विवाहांतील एकंदर सोहळ्यांपैकीं कोणते ग्राह्य व कोणते अग्राह्य यांचें संपूर्ण विवेचन येथें करणें स्थलसंकोचास्तव शक्य नाहीं. शिवाय विड्या तोडणें, घास देणें वगैरे कित्येक प्रकार आतां मागेंही पडूं लागले आहेत हें इष्ट आहे. विवाहित, अविवाहित, सपत्नीक, विधुर, लहान–मोठे सर्वच जेथें आहेत त्याठिकाणीं एखाद्या विशिष्ट मनोवृत्तीच्याच लोकांस उत्तेजित करणारा प्रकार करण्यापासून फायदा तर कोणताच नाहीं. उलट हसेंच फार होतें. पूर्वीं वधूवरांच्या लहान वयांत हे प्रकार होत असत. त्यामुळें त्यांत अनौचित्य तरी दिसून येत नव्हतें. पण आतां वयें व त्यामुळें मनोवृत्तिही बदललेल्या आहेत, हें लक्षांत घेतलें पाहिजे. म्हणून असले उत्तेजक सोहळे आतां बंद करावे.

वरातीबद्दल सध्यां कित्येक ठिकाणीं तरुणांत असंतोष दिसून येतो; पण आमच्या मतें वधूला घेऊन घरीं येतांना ज्ञातींतील स्त्री-पुरुषांसमवेत समारंभानें यावें हेंच प्रशस्त ! विवाहसंस्कार हा उपनयनाहून निराळ्या प्रकारचा आहे हें लक्षांत घेतां त्यांत वैराग्य न दिसणारा एखादा प्रकार झाला तर तो पाहिजेच आहे. वरातीचा प्रकार आम्हांस योग्य वाटतो याचा अर्थ त्यावर बेसुमार खर्च करावा असा आहे असें मात्र कोणीं समजूं नये. स्त्रीपुरुषांच्या विशिष्ट पद्धतीनें रचलेल्या जमावाबरोबर वधूवरांनीं घरांत प्रवेश करावा एवढाच मुख्य मुद्दा आहे एवढा मोठा समाज मुक्यानें चालला तर तें बरें दिसत नाहीं, म्हणून पुढें मंगलवाद्यें वाजणें आवश्यक आहे. ताशासारख्या कर्कश वाद्यांचा मंगलवाद्यांत समावेश होत नाहीं हें मात्र येथें लक्षांत बाळगावें.

विवाहविधीहि सूत्रोक्तच करावा. त्यांत मंडपशोभा, वरात, अहेर, वगैरे कांहीं थोड्या लौकिक गोष्टींचाही अवश्य समावेश करावा. आमचें एकंदर धोरण ज्यांच्या लक्षांत येईल त्यांस तारतम्यानें या गोष्टींचा विचार ठरवितां येईलच. विवाहांगभूत भोजनसमारंभाबद्दल सध्यां कित्येकांचा मतभेद होत चाललेला आहे. हा समारंभ गाळून त्याऐवजीं एखाद्या संस्थेस देणगी द्यावी असें कित्येक हल्लीं म्हणूं लागले आहेत. एकंदरीनें भोजनसमारंभच गाळावे असें या लोकांचें मत असल्या-मुळें याबद्दलचा विचार स्वातंत्र्यानेंच करावा हें बरें. म्हणून पुढें भोजन-विवेक या प्रकरणांत याबद्दलचा विचार केलेला आहे तो वाचकांनीं तेथेंच पहावा. विवाहाचा विधि सौत्र पद्धतीनेंच करावा हें वर सांगितलें आहेच. पण याही शिवाय कित्येक सुधारणा या बाबतींत केल्या पाहिजेत. त्यांचा आतां विचार करूं.

" पुनर्विवाहाचा कायदा, संमति वयाचा कायदा, शारदा ॲक्ट, यांसारखे कायदे झालेलेच आहेत. आतां केवळ घटस्फोटाची सुधारणा केली म्हणजे झालें " असा आज सुधारक म्हणविणारांचा ग्रह झालेला दिसतो. पण अशा कितीही मलमपट्ट्या लावल्या तरी वैदिक विवाह-पद्धति आज कार्यक्षम ठरणार नाहीं. त्याकरितां फारच निराळीं बंधनें मान्य केलीं गेलीं पाहिजेत, ही गोष्ट सहसा कोणाच्या लक्षांत येत नाहीं. आमच्या मतें हिंदु-विवाह-पद्धतीची खरी सुधारणा व्हावयाची तर पुढील बंधनांचा ताबडतोब अंमल सुरू होणें आवश्यक आहे. म्हणून समाजसुधारणेची खरी कळकळ असणारांनीं पुढील विवेचनाकडे जरूर लक्ष द्यावें. परंपरेचा अभिमान बाळगणारांस येथें हें सांगणें उचित वाटतें कीं, त्यांस सर्वस्वीं वंद्य वाटणारे आजचे रूढ विवाह–निर्बंध आजच्या जगांत हास्यास्पद ठरत चाललेले आहेत. आजच्या रूढ विवाहनिर्बंधांचा रोख फक्त महिलावर्गाकडेच आहे. पुरुष या बंधनां-तून सहज निसटून जाऊं शकतो. ही परिस्थिति नव्या तरुणांस अगदीं

निंद्य वाटते. या गोष्टीचा त्यांनीं अधिक गंभीरपणें विचार करणें आवश्यक आहे. आजच्या विवाहबंधनांच्या या एकांगीपणामुळेंच आज हिंदु संस्कृतीबद्दल इतर बाबतींत आदर बाळगणारे आर्यभूमीचे सुपुत्र वैदिक पद्धतीनें लग्नें न करतां नोंदणीच्या कायद्याखालीं तीं करण्यास प्रवृत्त होत आहेत. ही आपत्ति आमचे रूढिवादी बांधव लक्षांत घेतील तर पुढील विवेचन त्यांसही मान्य होण्यास मुळींच हरकत पडणार नाहीं. पुढील नियमांत रूढीनें दिलेल्या कित्येक सवलती काढून टाकून आजचा विवाह-व्यवहार संकुचित करण्याचाच आम्हीं प्रयत्न केलेला आहे. त्यांच्याच भाषेंत सांगावयाचें तर येथें आम्ही संकोचरूपी परिवर्तनासच ( पृ. ३१ पहा ) मान्यता दिलेली असल्यामुळें निदान पुढील विवेचनांत तरी लिखित-शास्त्र-व्याघात आहे असें त्यांनीं मानण्याचें कारण नाहीं. असो. आतां आजच्या विवाह–निर्बंधांतील दोष व त्यांवरील उपाय यांचा विचार करूं.

आज हिंदु समाजांत विशेषतः उच्च वर्णीयांत जीं विवाहविषयक बंधनें कायद्यानें मान्य केलेलीं आहेत त्यांचा पुरुषवर्गास गैरफायदा घेतां येतो. पुनर्विवाहाच्या कायद्यानें विधवांच्या बाबतींत एक पक्षपात नाहींसा झाला असला तरी सधवांच्या बाबतींत फार काळापासून चालू असलेल्या अन्यायाकडे मात्र अद्यापही समाजधुरीणांचें लक्ष जाऊं नये याचें सखेद आश्चर्य वाटतें. पहिली पत्नी हयात असतां दुसरी सवत तिच्या छातीवर आणून बसविण्याचा निंद्य प्रकार फार पूर्वीपासून चालू आहे. त्यास आजही आळा पडलेला नाहीं. पण नवे उपद्रव मात्र सुरू झालेले आहेत. आजपर्यंत विवाहित सवत तरी घरांत येत असे. पण आतां तोही निर्बंध राहिलेला नाहीं. जिच्याशीं विवाह केलेला नाहीं अशी रखेली घरांत येते व तिची सेवा करण्याचा प्रसंग धर्मपत्नीवर येतो. कित्येक वेळां निर्लज्ज पतिराज तिच्याशीं भगिनीभावानें वागण्याचा तिला मानभावी उपदेश करून पतिव्रतेच्या जखमेवर मिठाचें पाणी घालीत

असतात. घरच्या गृहस्वामिनीस या रखेलीचें दास्य करण्याचा प्रसंग यावा, त्यास कायद्यानें प्रतिबंध न व्हावा, शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं हें सर्व उघड्या डोळ्यांनीं पहावें, या सर्व गोष्टी आम्हां हिंदूंस अत्यंत लाजिरवाण्या आहेत. त्याहूनही अधिक लाजिरवाणी गोष्ट म्हणजे 'हे सर्व अनाचार धर्मशास्त्रसंमत आहेत' अशी समजूत प्रसृत होऊन त्यामुळें आमच्या पूर्वकालीन धर्मप्रवर्तकांची होणारी बदनामी ही होय! विशुद्ध व सर्वश्रेष्ठ धर्माची ही व्यर्थ अवहेलना सहन न झाल्यामुळेंच या ठिकाणीं या विषयाबद्दल चार शब्द तरी लिहिल्यावांचून राहवत नाहीं.*

आम्हीं वर दाखविलेलें वैषम्य कोणाच्या लक्षांत येत नाहीं असें नाहीं. पण घटस्फोटाचा कायदा हाच त्यावर तोडगा आहे असें समजून 'असेल कायदा जरी। बसेल आळा तरी' अशा वृत्तीनें कित्येक लोक स्वस्थ बसले आहेत. पण घटस्फोटाच्या कायद्यानें या प्रकारास आळा बसणें शक्य नाहीं. पूर्वविवाहित पत्नीस घरांतल्या घरांत बाह्य सुखसोयी देऊनही संसारसुखापासून तिला वंचित करतां येतें. या तिच्या हक्काची पायमल्ली कोर्टांत साक्षीपुराव्यानें सिद्ध करणें किती बिकट आहे याची ज्यांस कल्पना असेल ते घटस्फोटाचा कायदा सकलदुःखहर्ता आहे असें कधींही मानणार नाहींत. तर मग या रोगावर औषध कोणतें?

या रोगावर प्राचीन ग्रंथांतच एक मात्रा सांगितलेली आहे. तिलाच काय

* विवाहसंस्थेबद्दल सध्यां इतकीं मतमतांतरें माजलीं आहेत कीं, त्यांचा साकल्यानें विचार करावयाचा तर त्याकरितां स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल! 'आधुनिक गृहस्थाश्रम' या ग्रंथांत तो विचार करण्याचा विचार आहे. पण प्रस्तुत लेखकाचें अल्प सामर्थ्य, इतर कार्यव्यापृति, तसेंच या प्रकारच्या विधायक सुधारणेबद्दल जनतेची उपेक्षाबुद्धि, वगैरे अडचणी लक्षांत घेतां सदर ग्रंथ केव्हां प्रकाशित होईल हें आजच सांगतां येण्यासारखें नाहीं. म्हणून अगदीं तांतडीच्या ज्या सुधारणा आवश्यक वाटल्या त्या येथेंच संक्षेपानें दिल्या आहेत.

द्याचीं नीट पुटें देऊन समानतेच्या योग्य अनुपानासह चळवळीचे वळसे देऊन ती जनतेच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला जाईल तर आजही या रोगाचें निर्मूलन होईल! मात्रा थोडी जालीमच वाटेल पण आज फारच गुणकारी ठरेल. तरी सर्व धर्मबांधवांनीं हें औषध जरूर सेवन करण्याजोगें आहे असें सुचवून प्रथम कांहीं प्राचीन वाक्येंच येथें उद्धृत करतों.

‘ कामे नातिचरामि ’

‘ सत्यां तु धर्मशीलायां प्रजावत्यां स्वयोषिति ।
नान्यां समुद्वहेत् भार्यामित्यापस्तम्ब उक्तवान् ॥

(आर्यविद्यासु. पृ. १३१)

अशा कित्येक वचनांत विवाहित पत्नीचें अतिक्रमण करून दुसऱ्या स्त्रीशीं ( विवाहित किंवा अविवाहित ) वैषयिक संबंध ठेवणें निषिद्ध ठरविलेलें आहे. आज हीं प्राचीन योग्य बंधनें आपण झुगारून दिलेलीं आहेत. तीं आवश्यक तेवढा फरक करून रूढ केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. याकरितां ‘ एक पत्नी हयात असतां दुसऱ्या स्त्रीशीं विवाह करणें किंवा तशा स्त्रीशीं विवाहाशिवाय संबंध ठेवणें हा गुन्हा आहे ’ अशा अभिप्रायाचा स्पष्ट कायदा होणें जरूर आहे. विवाहित स्त्रीचा व्यभिचार आजच्या ग्रंथोक्त नियमांत व कायद्यांतही गुन्हा मानलाच गेला आहे. याचा तुल्य न्यायानें पुरुषांवरही अंमल होणें जरूर आहे. तसेंच एकाच्या विवाहित पत्नीशीं दुसऱ्यानें व्यभिचार करणें हा जर गुन्हा ठरतो तर दुसऱ्या स्त्रीच्या पतीशीं संबंध जोडणाऱ्या स्त्रियांसही अपराधी कां गणलें जाऊं नये ? म्हणून वर दाखविलेल्या कायद्याबरोबरच ‘ एका स्त्रीशीं विवाहित झालेल्या पुरुषांशीं ती हयात असतां दुसऱ्या स्त्रीनें विवाह किंवा विवाहाशिवायच संबंध ठेवणें हा त्या स्त्रीच्या बाबतींत गुन्हा होय’ असाही दुसरा कायदा होणें जरूर आहे. अशा दुधारी शस्त्राशिवाय या अडचणींतून मार्ग निघणें शक्य नाहीं.

कांहीं स्मृतींत पहिली पत्नी वांझ असल्यास दुसरी करण्याचें सांगि-

[stamp]

तलेलें आहे. पण आजचें युग निराळें आहे. 'पुं' नरकाचें खरोखरी भय बाळगून त्याच्या निवारणार्थ अपत्य व त्याकरितां विवाह इतक्या तत्त्वनिष्ठेनें पाणिग्रहण करणारे किती असतात याचा प्रामाणिकपणें विचार करूनच या प्राचीन ऋषींच्या वचनांचा आधार घेणें उचित होईल. तसेंच पतिपत्नींपैकीं कोणाच्या वैगुण्यामुळें अपत्योत्पत्ति होत नाहीं हें ठरविणेंही अवघड आहे. तरी सर्व नव्या जुन्या धर्माभिमान्यांनीं एकमतानें या दोन्ही कायद्यांचा-आवश्यक तेवढा फेरफार करून-प्रसार करणें आवश्यक आहे. स्त्रियांचा योग्य तऱ्हेनें सत्कार न केला तर संसाराचें नुकसान होतें असें सांगणारे* स्मृतिकार त्यांचा हल्लीं होणारा हा अपमान केव्हांही धर्म्य मानणार नाहींत. तो धुऊन काढून जर समानतेच्या तत्त्वावरील कायद्यांनीं त्यांचें योग्यप्रकारें पूजन केलें जाईल तर मनूनें सांगितल्याप्रमाणें खरोखरी शापदग्ध झालेलें भारतवर्षरूपी गृह पुनः उत्कर्षाचें मनोहर मंदिर झाल्यावांचून रहाणार नाहीं.

हिंदु विवाहाच्या बाबतींत या सुधारणेशिवायही अनेक सुधारणा आवश्यक आहेत. प्रौढविवाह या नांवाखालीं प्रथमविवाहाचेंच वय बेसुमार वाढत आहे. स्त्रीनें किंवा पुरुषानें पहिला पति किंवा पहिली पत्नी वारल्यास किती दिवसांनीं दुसरा विवाह करावा याला कोणताच नियम राहिलेला नाहीं. चार मुलांच्या बापासही सुशिक्षित गणल्या जाणाऱ्या कुमारिका माळ घालीत आहेत. पहिली बायको हयात असूनही पुनर्विवाह या नांवाखालीं विधवेचें पाणिग्रहण केलें जात आहे. असे अनेक गर्ह्य प्रकार आज आपण उघड्या डोळ्यांनीं पहात आहों. कायद्याच्या

---

* जामयो यानि गेहानि शपन्त्यप्रतिपूजिताः ।
तानि कृत्याहतानीव विनश्यन्ति समन्ततः ॥ मनु ३–५८.
शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तद्गृहम् ।
* * *
यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।

भयाखेरीज कशानेंही त्यास आळा घातला न जावा हें स्वातं-त्र्याच्या गप्पा मारणारांस व विसाव्या शतकाचा उदोउदो करणारांस लाजिरवाणें वाटलें पाहिजे. पूर्वींचे लोक स्वर्ग, नरक व धर्माधर्म यांच्या आज्ञेनें वागत म्हणून आपण त्यांस असंस्कृत समजतों. पण उठल्या सुटल्या कायद्याचा आश्रय घेतल्याशिवाय ज्यांस कसल्याच बाबतींत प्रगति करतां येत नाहीं त्यांची गणना कशांत करावी? तरी हा प्रकार ज्यांस खरोखरच स्पृहणीय वाटत नसेल त्यांनीं आम्हीं उपसंहारांत दाखविलेली स्वयंशासनाची पद्धत स्वीकारून खऱ्या सुधारणेचा पाया घालावा हेंच उचित होय. असो. या प्रकारच्या व्यापक सुधारणांची विस्तारभयास्तव येथेंच रजा घेऊन आतां ब्राह्मणांतील कांहीं पोटजातींत असलेल्या एकदोन रूढींचा परामर्ष घेऊं.

ऋग्वेदी देशस्थांमध्यें मामेबहिणीशीं वगैरे विवाह करण्याची चाल आहे. ती चाल कितीही प्राचीन असली तरी तिचा त्याग केला पाहिजे. कारण सपिंडाशीं विवाह करूं नयेत याबद्दल सर्वच प्राचीन ग्रंथकारांचा कटाक्ष दिसतो. 'असपिण्डाम्' असें विशेषण बहुधा प्रत्येक सूत्रांत व स्मृतींत कन्येस दिलेलें आढळतें. तत्त्वतःही ज्यांच्याशीं लहानपणापासून संबंध येणार त्या स्त्रीपुरुषांत पतिपत्नीसंबंधानें पाहण्याच्या दृष्टीची शक्यताही नसावी हेंच योग्य होय! ऋग्वेदी देशस्थांची संख्याही कांहीं कमी नाहीं. अर्थात् त्यांनीं हा प्रघात आतां सोडून द्यावा हेंच उचित! भगिनीदृष्टीच्या वर्तुळाचा परिघ जितका वाढेल तितका अभीष्टच आहे. या दृष्टीनें मातेकडील पांच व पित्याकडील सात पिढ्या वर्ज्य करण्याचा स्मृतिकारांचा आदेश आजही मान्य करणें आवश्यक ठरतें.

मामेबहिणीशीं विवाह करण्याची पद्धत पूर्वीं चित्पावन, कऱ्हाडे व देवरुखे यांमध्येंही होतीच! त्या चालीचा अवशेष सोडमुंजींत काशीयात्रेस निघालेल्या भाच्यास मागें फिरविणाऱ्या मामाच्या वाक्यांत आजही दिसून येतो. पण या प्राचीन रूढीचा वरील तिन्ही जातींनीं

आज त्याग केलेला आहे. त्याचप्रमाणें ऋग्वेदीदेशस्थ वगैरे जातीं-मींही या रूढीचा त्याग करावा हें उचित होय.

शुक्ल यजुर्वेद्यांमध्यें मातुलगोत्र वर्ज्य करण्याची चाल आहे. ती त्यांनीं सोडली तर बरें होईल! कारण एखाद्दुसरा अपवाद सोडून दिल्यास बाकी सर्व ग्रंथकार मातुलगोत्र वर्ज्य करण्यास सांगत असल्याचें दिसून येत नाहीं.

लग्नमुंजींच्या मुहूर्ताबद्दलही येथें हें सांगणें जरूर आहे कीं, आज हे मुहूर्त ठरवितांना गुरुबल, शुक्रास्त तसेंच अमुक महिने वर्ज्य आहेत कीं नाहींत वगैरे जो विचार केला जातो तो प्राचीन संप्रदायास सोडून आहे. ज्योतिषशास्त्राचा विशेष पगडा जेव्हां धर्मशास्त्रावर बसला तेव्हांच या विधिनिषेधांस बेसुमार महत्त्व आलें. प्राचीन सूत्रग्रंथांचें अवलोकन केल्यास त्यांत दिवस चांगला म्हणजे अभ्राच्छादित वगैरे नसावा व त्या दिवशींचें नक्षत्र शुभ असावें (पुण्याहे पुण्ये नक्षत्रे) या दोन बाबीं-वरच सूत्रकारांचा कटाक्ष होता असें दिसून येतें. साधारण पावसाळ्याचे दिवस कोणताही समारंभ करण्यास गैरसोईचे म्हणूनच श्रावणादि मास वर्ज्य ठरले गेले. अर्थात् हा सोईचा प्रश्न आहे. पण धर्मशास्त्र नक्षत्र शुभ असल्यावर कोणत्याही महिन्यांत विवाहादि करण्यास प्रतिकूल नाहीं*. तेव्हां इतर सर्व जुळून आलेलें असेल तर केवळ मुहूर्त लाभत

* आज श्रावणादि मास विवाहास वर्ज्य समजले जातात. त्याविरुद्ध निर्णय-सिंधूंतच बौधायन-आपस्तंब-वात्स्य वगैरे मुनींचीं वचनें दिलेलीं आहेत. शिवाय पुढील वचनेंही या बाबतींत लक्षांत घेण्याजोगीं आहेतः—

सार्वकालिकमेके विवाहम्। आ. गृ. १।४।२
सर्वे मासा विवाहस्य। बौ. गृ. १।१।१८

तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चंद्रबलं तदेव।
विद्याबलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेङ्घ्रियुगं स्मरामि॥

या सुप्रसिद्ध श्लोकांत तर (परमशुभ) परमात्म्याचें स्मरण ज्या वेळीं होईल त्यावेळीं सर्व शुभ योग असतात असें म्हटलेलें आहे. त्याचेंही रहस्य ध्यानांत घेण्यासारखें आहे.

नाहीं म्हणून विवाहादि पुढें ढकलणें युक्त नव्हे. प्राचीन परंपरेस मान म्हणून फक्त शुभ नक्षत्र पहावें. तसेंच सोईच्या दृष्टीनें पावसाळ्याचे दिवस शक्य तों वर्ज्य करावे म्हणजे बाकी ज्योतिषोक्त भानगडींत पडण्याचें कारण नाहीं. सोहेर–सुतकांच्या अडचणींमुळें जीं विघ्नें येतात त्यांबद्दल पुढें अकराव्या प्रकरणांत विवेचन केलेलेंच आहे तें पहावें.

वधूवरांच्या पत्रिका पाहून त्यांचे ग्रह जमविण्याचा खटाटोप करण्यापेक्षां त्यांचे परस्परांबद्दलचेच ग्रह पाहून विवाह जमविणें इष्ट आहे. प्राचीन संप्रदायही हेंच सांगतो. आपस्तंबानें §‘ डोळे व मन जिच्यावर आसक्त होतील तिलाच पसंत करावी. ’ असें निक्षून सांगितलें आहे. आज डोळ्यांनीं पसंती करण्याची रूढी पडत चाललेलीच आहे. पण केवळ १०–१५ मिनिटांच्या परीक्षेनें (?) मनाची पसंती कशी ठरवितां येणार? तसेंच आजच्या समानतेच्या युगांत प्रौढ उपवर युवतींस जुन्या पद्धतीनेंच वधूपरीक्षा देणें भाग पडतें त्यांतही बदल होणें अवश्य आहे. या दृष्टीनें पालकांच्या देखरेखीखालीं वधूवरांस एकमेकांबद्दलची मनपसंती ठरवितां येईल असा नवा वधूवरपरीक्षेचा आपल्या समाजास मान्य होईल असा प्रकार रूढ करणें आवश्यक आहे. लहानपणीं परस्परांच्या मनांत लवचिकपणा असतो. प्रौढपणीं त्याचें प्रमाण कमी कमी होत जातें. या दृष्टीनें निदान प्रौढ शिक्षित वधूवरांस तरी एकमेकांच्या मनाची परीक्षा करण्याची सवड देणें इष्ट आहे. त्यांतून कांहीं अनिष्ट उत्पन्न न व्हावें म्हणून एकांतवर्जनाची अट ठेवावी म्हणजे झालें. असो. याप्रमाणें विवाहसंस्काराविषयीं कोणतें धोरण ठेवावें हें पाहून झालें.

येथपर्यंत आज विशेष रूढ असलेल्या उपनयन व विवाह या संस्कारांचा विचार केला. याशिवाय डोहाळजेवण, बारसें, उष्टावण, वगैरे कित्येक संस्कार बायकांत रूढ आहेत. त्यांचाही विचार या

§ यस्यां मनश्चक्षुषोर्निर्बंधः तस्यां ऋद्धिः । नेतरदाद्रियेत । आप. १।३।२ १

प्रकरणांत करणें आवश्यक आहे असें वाटेल ! पण सर्व संस्कारांवर परीक्षणात्मक लिहावयाचें तर येथें फारच जागा लागेल; शिवाय हे बायकांतील आचार इतके निरुपद्रवी आहेत कीं, स्त्रीदाक्षिण्य दाखवून त्यांस आपण ‘ जसे तुमचे कुलाचार असतील त्याप्रमाणें ते संस्कार करीत जा. ’ असें म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. उपनयन व विवाह या संस्कारांत मात्र वर दाखविलेली तारतम्याची दृष्टि ठेवावी म्हणजे झालें. अंत्येष्टीबद्दल पुढें स्वतंत्र प्रकरण आहेच. तेव्हां त्याबद्दल येथें लिहिण्याचें कारण नाहीं. याप्रमाणें संस्कारांविषयीं पाहून झाल्यावर आतां उत्सव या सामुदायिक धर्माकडे वळूं.

उत्सवांचे अनेक प्रकार आहेत. रामजन्म, कृष्णजन्म यांसारखे जुने धार्मिक उत्सव रूढ आहेतच ! गणेशोत्सवाबद्दल लिहिण्याचें कारण नाहीं. लोकमान्यांच्या प्रोत्साहनामुळें हा उत्सव वर्षानुवर्ष वाढतच आहे. याशिवाय शिवाजी, तुकाराम, रामदास, लोकमान्य वगैरेंच्या जयंत्या किंवा पुण्यतिथ्या आपण करतोंच ! हे सर्वच उत्सव सर्वांनीं करावे किंवा याहूनही अधिक करावे याबद्दल आम्ही कांहींच नियम घालूं इच्छित नाहीं. तो त्या त्या गांवांतील रहिवाश्यांचा प्रश्न आहे. कोंकणांत गांवाचा म्हणून एखादा वार्षिक उत्सव होत असतो. सर्व गांव या उत्सवांत आनंदानें भाग घेतो. मुंबईहून कित्येक लोक मुद्दाम रजा काढून या उत्सवाकरितां जात असतात. याच प्रकारच्या प्रेमानें व आस्थेनें कोणताही उत्सव झाला पाहिजे.

अशा प्रकारच्या उत्सवांत विशेष सुधारणा पाहिजे ती कार्यक्रमाची व उपदेशपद्धतीची ! जुन्या चालीप्रमाणें कीर्तनें अवश्य चालूं ठेवावीं. पण त्यांत नव्या युगास अनुसरून उदात्त धर्मतत्त्वांचा उपदेश असावा. रामनवमीच्या दिवशीं रामजन्माचें आख्यान सांगणें व त्याच्या जन्माचा व बारशाचा सोहळा प्रत्यक्ष करून दाखविणें अगदींच हास्यास्पद आहे. असले सोहाळे करणें कोणत्याही दृष्टीनें उपयुक्त नाहीं. तरी

राम–कृष्ण वगैरेंच्या जयन्त्या साजऱ्या करतांना उत्सवमूर्तीस पाळण्यांत घालून जन्मनिमित्तक सोहाळे प्रत्यक्ष करून दाखविण्याचा कार्यक्रम यापुढें गाळून टाकावा. प्रत्यक्ष शरीरानें लहान मोठीं कामें करणें व समभावानें वागून ऐक्याचा पाया दृढ करणें हे जसे दोन उत्सवाचे हेतु त्याचप्रमाणें विशिष्ट ज्ञानप्रसार हाही उत्सवाचा हेतु असतो. या दृष्टीनें रामजयन्तीचे उत्सवांत रामायणावर, कृष्णजयंतीस भागवतावर किंवा महाभारतावर, गीताजयन्तीस गीतेवर, शिवजन्मोत्सवास राजकारणावर याप्रमाणें उत्सवदेवतेशीं संबद्ध अशा विषयांवर कीर्तनांत उपदेशरूपानें किंवा व्याख्यानांनीं ऊहापोह होईल तरच नव्या युगांत हे उत्सव प्रभावशाली होतील.

सध्यां व्याख्यानबाजी फारच झाल्यामुळें म्हणा, चांगले वक्ते मिळत नसल्यामुळें म्हणा किंवा तात्त्विक विचारांकडील लोकांच्या उपेक्षावृत्तीनें म्हणा; व्याख्यानाचा कार्यक्रम व्यवस्थापकांस ठेवणें जड जाऊं लागलें आहे ही गोष्ट खरी आहे. पण असें आहे म्हणून व्याख्यानप्रवचनांचा कार्यक्रम अजिबात गाळणें मात्र योग्य नाहीं. चांगल्या वक्त्याची निवड करून, तसेंच त्याच्या मागें किंवा पुढें मनोरंजनात्मक कार्यक्रम न ठेवण्याची खबरदारी घेऊन व्याख्यानाकडे लोकांचा ओढा वाढेल असें केलें पाहिजे.

पण ही साधी कारणमीमांसाही कित्येकांच्या लक्षांत येत नाहीं. गणेशोत्सवाच्या कार्यक्रमाबद्दल चर्चा चालू असतां 'सटरफटर पुष्कळ कार्यक्रम करण्यापेक्षां शंभर दीडशें रुपये खर्चून बोलपटनटीच्या गाण्याचा एकच दणदणीत (?) प्रोग्रॅम करावा' अशी एकानें सूचना मांडली व आश्चर्य असें कीं, सूचकांचें तर्कशास्त्र मान्य होण्यास वेळ लागला नाहीं. मुंबई व पुणें येथील गणशोत्सवाचे कार्यक्रम पाहिल्यास या उत्सवाकडे लोक कोणत्या दृष्टीनें पाहतात हें दिसून येईल ! लोकमान्यांनीं मूळ कोणत्या हेतूनें या उत्सवास चालना दिली व त्याचें

रूप कोणतें रूढ होत आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. पोवाडे, नकला, जलसे, मेळे व फार झालें तर कीर्तन याशिवाय दुसरे कार्यक्रमच बहुधा होत नाहींत.

गेल्या वर्षीं गणेशोत्सवांत एका जवळजवळ हजार विद्यार्थी असलेल्या हायस्कूलांत व्याख्यान देण्याचा प्रस्तुत लेखकास प्रसंग आला होता. परंतु व्याख्यानास सुमारें शंभर दीडशेंच विद्यार्थी हजर होते. मुद्दामच त्यावेळीं सातव्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांच्या संख्येबद्दल चौकशी करून त्यांपैकीं किती हजर आहेत हें पाहाण्याकरितां त्यांस हात वर करण्यास सांगितलें. २०० विद्यार्थी सातवींत असून फक्त चारच हात वर दिसले ! मागाहून चौकशी करतां सर्व शिक्षकही उत्सवास हजर नव्हते, असें दिसून आलें. विद्याध्ययनार्थ जमलेल्या विद्यार्थ्यांत व्याख्यानाबद्दल एवढी अनास्था असावी हें शोचनीय आहे. वक्त्यांकडेही याचा बराचसा दोष असतो विद्यार्थ्यांसमोर काय बोलावें याचें तारतम्य ते ठेवीत नाहींत. असो. चुका दोन्हींकडून होत आहेत व त्या होत राहाणारच ! पण मुख्य मुद्दा विसरून चालणार नाहीं.

या उत्सवास केवळ जलशाचें स्वरूप आलेलें असून तें अनिष्ट आहे हें अलीकडे पुष्कळांच्या लक्षांत येऊं लागलेलें आहे. दरवर्षीं गणेशोत्सवानंतर वर्तमानपत्रांतूनही या अनिष्ट वळणाचा उल्लेख करून निषेध केला जातो. पण पुढील वर्षीं पुन्हां 'येरे माझ्या मागल्या' असें झाल्याशिवाय रहात नाहीं. कित्येकजण तर या नव्यानें रूढ झालेल्या प्रकारास आळा घालतां येणें शक्य नाहीं असें समजून आहे यांतच समाधान मानीत आहेत. पण आपणच नव्यानें सुरू केलेल्या रूढि जर आपणांस मोडतां न येतील तर परंपरागत रूढींचा तरी भंग आपणांस कसा शक्य होईल ? खरोखर असल्या नव्यानेंच प्रचलित झालेल्या रूढींस आपल्याला आळा घालतां येऊं नये हें आपल्या तत्त्वनिष्ठेस अत्यंत लाजिरवाणें आहे. तरी ज्यांस यापुढें हा लज्जास्पद दोष कृतीनें धुऊन

काढावा असें वाटत असेल त्यांनीं या उत्सवांतील दोषांचा नीट विचार करून त्यावर जालीम उपाय योजले पाहिजेत.

या दृष्टीनें विचार करावयाचा तर प्रथम आजच्या गणेशोत्सवांत दोष कोणकोणते आहेत त्यांचा विचार केला पाहिजे. म्हणून त्यांचाच प्रथम विचार करूं.

१ दिवस पावसाळ्याचे असल्यामुळें आयत्या वेळीं पाऊस येऊन कार्यक्रमाचा विचका होतो.

२ आधींच भाद्रपद महिना आरोग्यदृष्ट्या कनिष्ठ. त्यांतच जागरण व अनियमितपणा यांच्या साडेसातीची भर पडून आजारास अगत्यपूर्वक आपणहोऊन आमंत्रण देण्याचा प्रसंग येतो.

३ घरांतील गणपतिपूजन व सार्वजनिक गणपतीचें पूजन अशीं दोन्ही एकदमच येत असल्यामुळें एकही पूजा नीटपणें घडत नाहीं.

४ विद्यार्थ्यांच्या मागें परीक्षेचा काच नसल्यामुळें स्वयंसेवकांचीं कामें तेच करतात. यामुळें नोकरपेशाच्या व कामधंद्यांतील लोकांस स्वयंसेवकी करण्याचा अवसर मिळत नाहीं. यामुळें या लोकांस सार्वजनिक कामें मिळून मिसळून अंगमेहनतीनें करण्याची कधींच संवय होत नाहीं.

५ उत्सवांच्या भरमसाट वाढीमुळें व जवळ जवळ अनेक उत्सव होत असल्यामुळें करमणुकीच्या कार्यक्रमांस ऊत येऊन त्यामुळें गंभीर कार्यक्रमांस श्रोते मिळत नाहींत.

६ मेळेबाजीमुळें मुलांस जाग्रणें होऊन त्यांची नैतिक व शारीरिक अवनति होते.

७ मनोरंजनाकडे अधिक लक्ष दिल्यामुळें धार्मिक शिक्षणाकडे जनतेचें लक्ष लागत नाहीं.

८ जेथें उच्च विषयांवर व्याख्यानें होतात तेथें रोज निरनिराळे

वक्ते व विषय नेमलेगेल्यामुळें श्रोत्यांची अवस्था 'नळी फुंकिली सोनारें' या म्हणीप्रमाणें होते.

९ चाळी, संस्था, यांच्या उत्सवांबरोबरच शाळांचेही उत्सव होत असल्यामुळें विद्यार्थ्यांचें चित्त द्विधा होतें.

१० वर्षांतून फक्त एकदांच उत्सव होत असल्यामुळें त्याचा परिणाम वर्षभर टिकून राहात नाहींत.

येणेंप्रमाणें मुख्यतः दहा दोष आजच्या गणेशोत्सवांत दिसून येतात. हे सर्व दोष मुंबई, पुणें यांसारख्या शहरांखेरीज इतर शहरांतील उत्सवांत दिसून येत नसले तरी ५ वा, ६ वा, ९ वा सोडून बाकीचे दोष सर्वव्यापी आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. वरील सर्वच दोष मनुष्यकृत नसून त्यांपैकीं कांहीं नैसर्गिकही ( उदाहरणार्थ १ व २ ) आहेत; तरी आतां या सर्व दोषांवरील उपायांचा विचार करूं.

वरील दहा दोषांपैकीं पहिले दोन अपरिहार्य आहेत असें कित्येकांस वाटेल; पण तसें नाहीं. गणेशजयन्ति फक्त भाद्रपदांतच असते असें नाहीं. माघ शुद्ध चतुर्थीसही गणेशजयन्ति करण्याची प्राचीनच चाल आहे. गणपतिपुळें वगैरे प्रमुख गणेशक्षेत्रांत त्याचप्रमाणें गणपतीच्या जुन्या देवळांतही माघांतच उत्सव करण्याची चाल अद्यापही चालू आहे. आपणही त्याच चालीचा अवलंब केल्यास कोणासही कांहीं बिघडलें असें वाटण्याचें कारण नाहीं. प्रकृतीच्या दृष्टीनें माघांतील थंडीचे दिवस चांगलेच! अर्थात् जाग्रणें व अनियमितपणा यांचा पचनशक्तीवर भाद्रपदाइतका वाईट परिणाम त्यावेळीं होणार नाहीं. पावसाचें भय नसल्यामुळें आयत्यावेळीं कार्यक्रमांत बाध येऊन विरस होण्याचें कारण नाहीं. घरोघर ज्यांस गणपति आणावयाचे असतील त्यांस ते भाद्रपदांत आणण्याची मोकळीकच असल्यामुळें माघांतील सार्वजनिक उत्सवांच्या वेळीं वरील तिसऱ्या अनुक्रमांकांत दाखविलेली

अडचण उपस्थित होण्याचें भय नाहीं. याप्रमाणें वरील एक ते तीन अडचणी हल्लींचे सार्वजनिक उत्सव माघांत घेतल्यास दूर होतील.

माघाच्या सुमारास वार्षिक परीक्षेचे दिवस जवळ येतात. यामुळें विद्यार्थ्यांस या उत्सवास साह्य करतां न येऊन त्यामुळें मोठीच आपत्ति येईल असें क्षणभर वाटण्याचा संभव आहे. पण ही इष्टापत्तिच आहे. विद्यार्थ्यांस अंगमेहनतीनें स्वयंसेवकी करण्याचे प्रसंग पुष्कळ येतात. पण नोकरीपेशांतील लोकांसच ते मिळत नाहींत. जोंपर्यंत विद्यार्थी मोकळे असतील तोंपर्यंत कितीही ठरविलें तरी स्वयंसेवकी त्यांच्यावरच पडणार ! ही आपत्ति टाळून नोकरीपेशाच्या लोकांवरच स्वयंसेवकी यावी अशी इच्छा असेल तर विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या वेळींच एखादा तरी उत्सव ठेवला गेला पाहिजे. माघांत उत्सव ठेविल्यास हें आपोआपच होईल ! नोकरीपेशाच्या वर्गास बरोबरीनें उच्च-नीच कामें करण्याची संवय लागून त्यांच्यामध्यें परस्पर सहकारानें वागण्याची वृत्ति उत्पन्न व्हावी असें ज्यांस मनापासून वाटत असेल त्यांस वरीलपैकीं चवथा दोषही माघांत उत्सव घेतल्यानेंच नष्ट होण्यासारखा आहे हें लक्षांत येईल ! याप्रमाणें हल्लींचा उत्सव माघांत घेतल्यास वरील चार दोषांचें निराकरण होईल.

आतां विद्यार्थ्यांकरितां कोणता उत्सव असावा याचा विचार करूं. तसेंच लहान मुलें न मिळाल्यामुळें भेळ्यांचें काय करावें ? असे दोन प्रश्न येथें उपस्थित होतात त्यांचीं उत्तरें पाहूं. आश्विन महिन्यांत जसें नवरात्र प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणें प्राचीन पद्धतीच्या विद्यार्थ्यांत सरस्वत्युत्सव करण्याची जुनीच प्रथा आहे. यावेळीं वेदांपासून तों कामशास्त्र, अर्थशास्त्र, वास्तुविद्येपर्यंत जेवढे म्हणून ग्रंथ मिळतील तेवढे सर्व एकत्र मांडून त्यांमध्यें सरस्वतीदेवीचें आवाहन करावयाचें असतें. पहिल्या दिवशीं आवाहन, दुसऱ्या दिवशीं पूजन, तिसऱ्या दिवशीं बलिदान ( नैवेद्य ) व चवथ्या दिवशीं विसर्जन असा एकंदरीनें चार

दिवसांचा या उत्सवाचा कार्यक्रम असतो. या उत्सवाचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न आज कोठें कोठें सुरू झालेला आहे. पण अजून तो सार्वत्रिक नाहीं. म्हणून गणेशोत्सवाऐवजीं आमच्या शाळांतून हा उत्सव सुरू होईल तर ते अनेक दृष्टींनीं उपयुक्त आहे. या उत्सवांतील व्याख्यानांत वेदादि ग्रंथांचा व प्राचीन अर्थशास्त्र, संगीत वगैरे विद्यांचा परिचय सामान्य जनतेस करून देणारींच व्याख्यानें प्रामुख्यानें असावीं. शाळेबाहेर उत्सव असेल तेव्हांही व्याख्यानविषयांचें हेंच धोरण असावें. या प्राचीन प्रथेचा पुनरुद्धार केल्यास वर दाखविलेल्या अनेक अडचणी दूर होतील ! मेळ्यांचे कार्यक्रम दिवाळीच्या सणांत केले पाहिजेत. दिवाळी सर्व हिंदूंत पाळली जाते. यावेळीं शाळांना सुटीही असते. लोकांचा उत्साहही वाढता असतो. अशा सणाची शोभा त्याचवेळीं मेळ्यांचे कार्यक्रम घेतल्यानें अधिक वाढेल हें उघडच आहे. तरी यावेळीं मेळ्यांचे कार्यक्रम घेतले जावे. सध्यां मेळबाजीचा जो खेळखंडोबा चालू आहे तो मात्र बंद होणें आवश्यक आहे. म्हणून या बाबतींत पालकांनीं लक्ष घालून मेळप्रवर्तकांशीं विचारविनिमय करावा. मेळ्यांत किती वयाचीं मुलें सामील असावीं, पद्यें व संवाद कसे असावे, त्यांचे एका दिवशीं अधिकांत अधिक किती कार्यक्रम ठेवावे, रात्रीं किती वाजेपर्यंत त्यांस जागवावें वगैरे विषयांबद्दल नीट चर्चा होऊन कांहीं एक नक्की धोरण ठरविणें आवश्यक आहे. तसें न ठरविलें जाईल तर या मेळेबाजीचें बाण्डगूळ मूळ उत्सवाच्या हेतूस सत्वहीन केल्यावांचून राहणार नाहीं. असो. वर जे गणेशोत्सवाच्या चालू प्रथेमुळें उत्पन्न झालेले दहा दोष दाखविलेले आहेत, त्यांपैकीं कित्येकांचें निराकरण या प्रकारानें होईल ! बाकी किरकोळ दोष कसे घालवावे हें सहज समजण्यासारखें असल्यामुळें त्यांचें येथें वर्णन देण्याचें कारण नाहीं.

सण, संस्कार व उत्सव या रूढ असलेल्या सामुदायिक आचारांत कोणकोणत्या सुधारणा पाहिजेत हें पाहून झालें. नव्या सामुदायिक

प्रार्थनादिनाबद्दल मागील प्रकरणांत विवेचन केलेलेंच आहे. आतां या सामुदायिक समारंभांमध्यें भोजनाचा कार्यक्रम ठेवावा किंवा नाहीं व ठेवल्यास सहभोजन ठेवावें काय याचाही विचार करणें आवश्यक आहे. तसेंच याच अनुषंगानें खाद्याखाद्य विचारही विचारांत घेतला पाहिजे म्हणून ' भोजनविवेक ' प्रकरणाकडेच आतां वळूं या !



## प्रकरण नववें

# भोजनविवेक

मनुष्याच्या ज्या मूलभूत गरजा आहेत त्यांत अन्न ही मुख्य आहे. जन्मास आल्याबरोबर अन्नाची मागणी फार तीव्रतेनें केली जाते. तेव्हां अन्नाच्या आवश्यकतेबद्दल अर्थात् भोजनाच्या आवश्यकतेबद्दल विस्तारानें लिहिण्याचें कारण नाहीं. उदरंभरण हा भोजनाचा मुख्य उद्देश असला तरी त्याहून दुसरा त्याचा हेतु नाहीं असें मात्र नाहीं. क्षुधाशांति हा भोजनाचा जसा वैयक्तिक हेतु त्याचप्रमाणें दुसराही एक सामाजिक हेतु आहे. 'सहनौ भुनक्तु' ही प्रार्थना या दुसऱ्या हेतूंतूनच निघालेली आहे. 'माझी रोजची भाकरी मला दे.' असली मागणी देवाजवळ करणें यांत विशेष कांहीं नाहीं. पण सहउपभोगाची इच्छा व्यक्त करणें यांत एक सामाजिक तत्त्व आहे. या तत्त्वामुळेंच भोजन हा केवळ वैयक्तिक विषय न राहतां केव्हां केव्हां सामाजिक चर्चेचा विषय होत असतो. भोजनाचा या दोन्ही प्रकारांनीं या प्रकरणांत विचार करावयाचा आहे.

भोजनाच्या वर दिलेल्या दोन प्रयोजनांपैकीं पहिल्याचा विचार करतांना काय खावें, किती खावें, केव्हां खावें वगैरे प्रश्नांचा विचार करावा लागेल; तर दुसऱ्याचा विचार करतांना पांक्त कोण, अपांक्त कोण, भोज्यान्न कोण व अभोज्यान्न कोण असल्या बाबींचा विचार करावा लागेल. म्हणून या सर्व प्रश्नांचा आतां क्रमाक्रमानें विचार करूं.

काय खावें, याचा विचार करतांना जुन्या धर्मग्रंथांकडे स्वाभाविकच लक्ष जातें. त्यांत कांदा, लसूण यांसारखे पदार्थ तर निषिद्ध मानलेले आहेतच; पण मुळा, तोंडलें, गाजर, वांगें यांसारखेही कित्येक पदार्थ

त्याज्य मानलेले आहेत. टमाटो प्रकृतीच्या दृष्टीनें अत्यंत हितकारक म्हणून ठरलेला आहे, व तो सर्वस्वीं नवाच असल्यामुळें त्याचा निषेध-ही जुन्या धर्मशास्त्रांत आढळून येत नाहीं. पण तो दिसायला मांसा-सारखा दिसतो, एवढ्याच कारणास्तव कित्येक निषिद्ध मानतात. वाई-सारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं टमाटो हा पदार्थ अजूनही किती निषिद्ध मानला जातो याचें प्रत्यंतर येतें. या सर्व जुन्या विधिनिषेधांबद्दल आम्हांला येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं आतां आहारशास्त्राचें नव्या तऱ्हेनें संशोधन केलें पाहिजे. गीतेंत सात्त्विक, राजस, तामस असें तीन प्रकारचें आहाराचें वर्गीकरण केलेलें आहे. आज शरीराच्या पोष-णास व वाढीस कोणकोणतीं द्रव्यें कारणीभूत होतात याचा शोध लाग-लेला असून त्या दृष्टीनें तर्कशुद्ध आहार ( Rational diet ) कसा असावा याबद्दल कित्येक महत्त्वाचे शोध लागलेले आहेत. प्रत्येक अन्नाचें वर्गीकरण करून त्यांतील Vitamine, Protein, Fat, Carbohydrate यांच्या प्रमाणांवर त्यांचें ग्राह्यत्व अग्राह्यत्व ठरविलें जातें. याच शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून आपल्याकडील निर-निराळ्या पदार्थांचें परीक्षण होणें आवश्यक आहे. तसें शास्त्रीय परीक्षण करून जे पदार्थ निषिद्ध ठरतील तेवढेच वर्ज्य करावे. तात्पर्य नव्या शास्त्रीय शोधांचा फायदा घेऊनच आतां नव्या आहारशास्त्राचे नियम ठरविले पाहिजेत.

हे ठरवितांना जुने नियमही विचारांत घ्यावे. ते सर्व चूकच आहेत असें म्हणून चालणार नाहीं. फार काय भात, भाजी, पोळी वगैरे नित्याचें व पिढ्यान्‌पिढ्या पचनीं पडलेलें जेवण एकदम कोणी मूर्ख-पणाचें ठरवूं पाहील तर त्याच्या शहाणपणाची कींवच करावी लागेल. तेव्हां नव्या तऱ्हेनें संशोधन करावें असें आम्ही म्हणतों याचा भल-ताच अर्थ कोणी घेऊं नये. आहाराबद्दलचे ब्रह्मचारी व संन्यासी यांस

सांगितलेले नियम पुष्कळ अंशीं यथायोग्यच आहेत असें दिसून येईल ! मात्र त्यांचे नियम गृहस्थाश्रम्यांनीं पाळलेच पाहिजेत असें नाहीं. कित्येक व्रतांमध्यें कांहीं पदार्थ वर्ज्य सांगितले आहेत त्यांचाही विचार होणें आवश्यक आहे. तात्पर्य, संशोधन करतांना जुने नियम सर्वस्वीं चूक आहेत किंवा ते तंतोतंत बरोबर आहेत यांपैकीं कोणतेंही मत प्रथम गृहीत धरून चालूं नये एवढेंच आमचें म्हणणें आहे.

हॉटेल व खाणावळींत हल्लीं जेवणाचा प्रसंग येतो. तो टळणें शक्य नाहीं. परन्तु या बाबतींतही कित्येक सुधारणा आवश्यक आहेत. शिळे-पाकें ( यातयाम ) व घाणेरडें अन्न ( अमेध्य ) दिसून आल्यास जेव-णारांनीं त्याचा योग्य तो प्रतिकार केला पाहिजे. खाणावळींत नाना-प्रकारचे लोक येणार तेव्हां भांड्यांची शुद्धि योग्यप्रकारें न राखल्यास रोगप्रसार झपाट्यानें होत जाईल. शहरांतून याचें प्रत्यंतर येतच असतें. अशा स्थितींत खाणावळींच्या अंतर्बाह्य स्वच्छतेकडे सुशिक्षितांनीं लक्ष द्यावयास नको काय ? पण या साध्या गोष्टीकडेही योग्य लक्ष पुरविलें जात नाहीं. ‘ हॉटेलें व खाणावळी यांतील जेवणारांस हितोपदेश ’ या नांवाचें एक प्रकरणच Health through Rational diet या ग्रंथांत Dr. Arnold Larand M. D. यांनीं दिलेलें आहे तें या ठिकाणीं सर्वांनीं लक्षांत घेतलें पाहिजे. रोजच्या भोजनांत स्वच्छता व आरोग्य यांकडे लक्ष देऊन वागावें हें संक्षेपानें पुढील एका प्रकरणांत विवेचिलेंच आहे. तेव्हां त्या विषयावर येथें विवेचन न करतां या प्रक-रणाच्या आरंभीं दिलेल्या दुसऱ्या प्रश्नाकडे वळूं.

आजच्या धार्मिक समजुती व रूढी यांकडे लक्ष दिल्यास काय खावें, केव्हां खावें असल्या प्रश्नांस महत्त्व नसून कोणाच्या पंक्तीला, किंवा कोणाच्या हातचें, जेवावें यासच फार महत्त्व आलेलें असल्याचें दिसून येतें. पंचहौद मिशनमधील चहाच्या पेल्याच्या वादळाची

ज्यांस माहिती असेल त्यांस या विधानाचें सत्यत्व कळून येईल! ज्या कारणास्तव त्यावेळीं ग्रामण्यप्रकरणानें पुण्यापासून काशीपर्यंत, तसेंच रानडे–टिळकांपासून शंकराचार्यांपर्यंत खळबळ उडवून दिली तें परधर्मीयांकडील चहापान व पावभक्षण आज राजरोस चालू आहे. या बाबतींत टिळकांच्या काळापुढें सामान्य जनता गेलेली आहे असें सकृद्दर्शनीं वाटतें. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. घरांत कांद्यासारख्या ग्रंथनिषिद्ध वस्तूंचें भक्षण करण्यांत व हॉटेलांतून इराणी आचाऱ्यानें सिद्ध केलेले पदार्थ मोकळ्या मनानें घशाखालीं दडपणारे आंतून निराळ्याच भावनेनें आविष्ट झालेले असतात. त्यांच्या अंतरंगाचा ठाव घेतल्यास

(१) अपांक्तपंक्तिभोजन,

व (२) अब्राह्मणानें शिजविलेल्या अन्नाचें भक्षण,

या दोन्ही गोष्टी धर्मदृष्ट्या अत्यंत गर्ह्य आहेत हेच सिद्धांत आजही रानडे-टिळककालीन सनातन्यांच्या समजुतीप्रमाणें तेथें ठळकपणें कोरलेले दिसतील! याचीं ठळक उदाहरणें पाहिजे असतील तर कोल्हापूर-साहित्यसंमेलनांत गाजलेला भावे-भोपटकर--भोजनवाद, गेल्या वर्षी रायगड उत्सवाची झालेली दैना, ठिकठिकाणीं सहभोजनोत्तर उडणारा हलकल्लोळ, मांसाहाऱ्यांच्या पंक्तीला जेवल्यास ' आपल्या पानांत मांस पडून अब्रह्मण्यम् होण्याच्या आपत्ती ' ची तार्किक पुरावा म्हणून एका सनातनी सुधारकानें (?) केलेली मांडणी वगैरे हकीकती डोळ्यांपुढें आणाव्या!

हे सर्व प्रकार लक्षांत घेतले म्हणजे भोजनव्यवहाराचा धर्मशास्त्रदृष्ट्या सुशिक्षितांत देखील किती अल्प प्रमाणांत विचार झालेला आहे हें लक्षांत येईल! आज या बाबतींत रूढि कितीहि बदललेली असली

तरी मनोभूमिका विचारानें बदललेली नाहीं. म्हणून या बाबतींतील तत्त्वविवेचन उघड करणें आवश्यक आहे.

आतां कोणाच्या पंक्तीला जेवावें व कोणाच्या जेवूं नये, तसेंच कोणाच्या हातचें खावें व कोणाच्या हातचें खाऊं नये या प्रश्नांचा विचार करूं. हे प्रश्न खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही प्रसंगीं उत्पन्न होतात. पैकीं खाजगी प्रश्नांचा निर्णय त्या त्या व्यक्तीच्या इच्छेवर सोंपविणेंच रास्त होईल. माझ्या घरांत येणाऱ्या पाहुण्यास मी माझ्या पंक्तीस घेऊन जेवावें कीं नाहीं हा माझा वैयक्तिक प्रश्न आहे. त्यांत वास्तविक नियम घालण्याची जरूरच नाहीं. ब्राह्मणच घेतले फार काय कोकणस्थ देशस्थ वगैरे त्यांपैकीं कोणताहि पोटभेद घेतला तरी त्या त्या पोटभेदांतींल जे लोक परिचयांत येतील, ज्यांच्याशीं आपला घनिष्ठ संबंध येईल त्यांसच आपण घरीं जेवणास बोलावितों. म्हणजे प्रत्येक पांक्त मनुष्यास आपण घरीं बोलावून त्याच्याशीं पंक्तिव्यवहार करतोंच असें नाहीं. यावरून प्रत्येकाच्या घरांतील पंक्तिव्यवहार किती मर्यादित स्वरूपाचा असतो हें लक्षांत येईल. अशा मर्यादित पंक्तिव्यवहारास व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्व लागू केल्यास अनर्थ ओढवेल असें मानणें बरोबर नाहीं. विजातीयांशीं रोटीव्यवहार केल्यास तो बेटीव्यवहारांत परिणत होईल अशी कित्येकांस भीति वाटते. पण ती निराधार होय. कोकणस्थ, देशस्थ वगैरे कित्येक ब्राह्मण पोटजातींत कित्येक पिढ्यांपासून रोटीव्यवहार रूढ असूनही त्यांच्यामध्यें अद्याप सर्रास बेटीव्यवहार सुरू झालेला नाहीं ही एकच गोष्ट वरील आक्षेपास उत्तर देण्यास समर्थ आहे. तात्पर्य, घरोघरीं होणाऱ्या भोजनव्यवहारांत घरांतील मालकास मतस्वातंत्र्य दिलें जावें हें उचित होय.

धर्मशास्त्राचें या भोजनव्यवहारांतील तत्त्वही हेंच सांगतें. आज आपण जातीबाहेरच्या व्यक्तीचें ( श्रेष्ठ समजल्या गेलेल्या जातींतील व्यक्तीनें कनिष्ठ समजल्या गेलेल्या जातींतील व्यक्तीच्या घरीं ) अन्न

खाणें गर्ह्य समजतों. पण प्राचीन ग्रंथांकडे लक्ष दिल्यास निराळाच प्रकार दिसून येतो. त्यांत ज्यांचें अन्न खावें म्हणून सांगितलेलें आहे अशा पुष्कळच जाती आहेत. दास,* गुराखी, अर्धेलीनें शेती करणारा कुणबी, न्हावी, कुंभार, नांगऱ्या यांचें अन्न खाण्यास हरकत नाहीं, असें सांगणारीं कित्येक वचनें जुन्या ग्रंथांत आहेत. त्यांचा गर्भितार्थ एवढाच आहे कीं, ज्यांच्याशीं प्रसंग नेहमीं पडतो त्यांच्या घरीं अन्नग्रहण करणें गैर नसून वाजवीच आहे. या सर्व गोष्टींचा नीट विचार केल्यास ज्या ठिकाणीं मनास संकोच किंवा अनौचित्य वाटणार नाहीं अशा ठिकाणीं भोजन करावें हा धर्मशास्त्रोक्त नियम व्यक्त होतो. आणि हाच नियम प्रमाण मानून यापुढें स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या घरीं भोजनव्यवहार करावा हें उचित होय. या दृष्टीनें परगांवीं अनोळखी स्वजातीयाकडे कसें तरी नातें जोडून भोजन करण्यापेक्षां खानावळींत किंवा प्रीतियुक्त परजातीयाकडेही भोजन करणें युक्त ठरतें. याप्रमाणें खाजगी भोजनसंबंधाचा विचार झाला. आतां व्यापक स्वरूपाच्या भोजनव्यवहाराकडे वळूं.

व्यापक स्वरूपाचे भोजनव्यवहार चार कारणांनीं होतात. तीं कारणें व त्यांचीं उदाहरणें पुढीलप्रमाणें:—

१ पुण्यसंपादनार्थ—सहस्रभोजन वगैरे.

२ संस्कारांगभूत—उपनयन, विवाह वगैरे प्रसंगीं होणारें ज्ञातिभोजन.

३ उत्सवनिमित्तक—भंडारा वगैरे.

---

* शूद्रेषु दास–गोपाल–कुलमित्रार्धसीरिणः ।
भोज्यान्ना नापितश्चैवं यश्चात्मानं निवेदयेत् ॥

याज्ञ. १.१६६

स्वदासो नापितो गोपः कुम्भकारः कृषीवलः ।
ब्राह्मणैरपि भोज्यान्नाः पञ्चैते शूद्रयोनयः ॥ देवलः

४ राष्ट्रकार्य–सामाजिक–परिषदादिनिमित्तक—राष्ट्रीय सभा, साहित्यपरिषद् वगैरेंच्या अधिवेशनांत होणारें सभासदांचें भोजन.

वरील चार प्रकारांपैकीं पहिले दोन प्रकार वैयक्तिक इच्छेवरच अवलंबून असतात. त्यांत सहस्रभोजनासारख्या* प्रसंगीं तर विजातीय पंक्तिव्यवहाराचा प्रश्नच उद्भवत नाहीं. दुसऱ्या प्रकारांत मात्र तसा संभव असतो. धंद्याच्या निमित्तानें सध्यां अनेक जातीयांशीं संबंध येतात. उपनयन, विवाहांच्या निमित्तानें आप्त मंडळीस एकत्र जमवून भोजन देणें जसें आवश्यक असतें तसेंच या प्रकारच्या विजातीय आप्तांसही मेजवानी देणें आवश्यक वाटतें. पानसुपारी व अल्पाहार या बाबतींत तर विधर्मीयांचा देखील मुंबईसारख्या ठिकाणीं जवळजवळ बरोबरीच्या नात्यानें सत्कार केलाच जातो, व त्यांत कांहीं गैरही नाहीं. राहिला प्रश्न विजातीय व विधर्मीयांच्या पंक्तीचा! मेजवानींत देखील अशांचा अंतर्भाव करावा कीं काय असा प्रश्न आहे. पैकीं विधर्मीयां-बद्दल आम्हीं नकारार्थींच उत्तर देतों. पानसुपारीचा प्रसंग निव्वळ सामाजिक असल्यामुळें त्यांत विधर्मीयांचा समावेश होण्यास हरकत नाहीं. पण भोजनाचें तसें नाहीं. तो कांहींसा परंपरेशींही संबद्ध आहे. अर्थात् ज्यांचें आपल्या धर्मावर प्रेम नाहीं अशा विधर्मीयांचा अशा समारंभांत अंतर्भाव करणें म्हणजे विनाकारण समरसतेंत बिघाड करण्यासारखें आहे. शिवाय विधर्मीयांचा भोजनप्रकारही आपल्याशीं जुळता असेलच असें नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्यास संस्कारांग-भूत भोजनसमारंभांत विधर्मीयांचा समावेश नसावा हेंच उचित होय.

* मागें दुसऱ्या प्रकरणांत धर्माचीं फळें दिलेलींच आहेत. त्यांपैकीं एकही फळ सहस्र–ब्राह्मण–भोजन घातल्यानें आज निष्पन्न होत असल्याचें दिसून येत नाहीं. म्हणून आज या प्रकारचीं सहस्रभोजनें पुण्यकारक ठरूं शकत नाहींत, हें सद्धर्माभिमान्यांनीं लक्षांत घेणें आवश्यक आहे.

आपल्याच धर्माचे परंतु विजातीय अशांचा अंतर्भाव करावा किंवा नाहीं याबद्दल आम्हीं एवढेंच सांगूं इच्छितों कीं, हा प्रश्न भोजनास बोलाविलेल्या इतर आप्तेष्टांच्या मनोवृत्ति ध्यानांत घेऊन सोडवावा. संस्कारासारख्या पवित्र धार्मिक समारंभांत भोजनासारख्या प्रसंगानें मतभेद पैदा व्हावा हें इष्ट नाहीं. संस्कारांगभूत भोजनसमारंभ म्हणजे समाजसुधारणेची अपूर्व संधि असा गैरसमज करून घेण्याचें कारण नाहीं. म्हणून संस्कारांगभूत भोजनास येणाऱ्या इतर आप्तेष्टांच्या मनोभूमिका लक्षांत घेऊनच विजातीयांच्या अन्तर्भावाचा निर्णय करावा. उगाच कोणाची मनोवृत्ति दुखविण्यांत अर्थ नाहीं.

येथें कित्येक सोवळ्या मनोवृत्तीच्या धार्मिकांसही हें सांगणें आवश्यक आहे कीं, त्यांनीं पंक्तिव्यवहाराबद्दलचे आपले रूढ ग्रह धर्मशास्त्राचा विचार करून नीट पारखून घ्यावे. पतिताच्या पंक्तीस भोजन केल्यानें दोष लागतो असें कांहीं स्मृतींत लिहिलेलें आहे. पण पतित कोणास म्हणावें याबद्दलचे स्मृतिकारांचें विवेचन लक्षांत घेतलें तर सध्यां त्यांच्या मताप्रमाणें पतित न ठरणारी एक तरी व्यक्ति सांपडेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. तसेंच स्मृतिकार एकदांच अशा पतिताशीं सहभोजन झाल्यास दोष सांगत नाहींत वगैरे गोष्टी लक्षांत घेतल्या तर आज पंक्तिव्यवहारांत या नसत्या तत्त्वशून्य भावनांच्या आहारीं जाऊन वितुष्ट माजविणें योग्य नाहीं हें दिसून येईल! इतक्याउपर पंक्तिव्यवहारानें दोष लागतोच अशी दृढ भावना असेल, तर 'दोघांच्या मध्यें केवळ पाण्याची रेघ ओढल्यानेंही त्या दोषाची निवृत्ति होते' हा स्मृतिकारांचाच नियम लक्षांत घ्यावा. ज्या दोषाची निवृत्ति एवढ्याशा साध्या उपायानें होते तो फार मोठा व भयंकर आहे असें धर्मशास्त्रकारही मानीत नसले पाहिजेत हें उघड आहे. अशा स्थितींत पंक्तिव्यवहाराकडे पाहाण्याची रूढ दृष्टि बदलून या पंक्तिव्यवहाराच्या बाबतींत फाजील चिकित्साखोरपणा सोडून दिला पाहिजे. एकंदरीनें एकपंक्ति-

भोजन हें जसें समाजसुधारणेचें महत्त्वाचें अंग नाहीं तसेंच तें महा-पापही नसल्यामुळें दोन्ही पक्षांतील लोकांनीं सामोपचारानेंच परस्परांशीं मिळतें घेऊन हे कार्यक्रम पार पाडावे. आजची परिस्थिति लक्षांत घेतां उभयपक्षीं या बाबतींत पुढील तीन नियम पाळले जाणें इष्ट वाटतें.

१ मुद्दाम एकपंक्तिभोजनांचे प्रसंग केवळ प्रतिपक्षास चिडविण्या-करितांच घडवून आणूं नयेत.

२ तसे प्रसंग आकस्मिकपणें किंवा अन्य कार्यनिमित्तानें प्राप्त झाल्यास नसत्या सोवळेपणाच्या कल्पनांस बळी न पडतां आलेल्या प्रसंगास तोंड द्यावें. फार तर मध्यें पाण्याची रेघ ओढावी.

३ असा पंक्तिव्यवहार सर्वस्वीं वाईटच असा ज्यांचा दृढविश्वासच असेल त्यांनीं मोठ्या भोजनसमारंभांत भागच घेऊं नये. अनिच्छेनें व अज्ञानानें त्यांच्यावर असा प्रसंग ओढवलाच तर प्रत्यक्ष भोजन चालू असतां कोणताही अतिप्रसंग न करतां घरीं येऊन प्रायश्चित्त घ्यावें. हे तीन नियम लक्षांत घेतल्यास आज या बाबतींत जे विनाकारण तंटे उपस्थित होतात त्यांस बराच आळा बसेल असें वाटतें.

संस्कारांगभूत भोजनाप्रमाणेंच उत्सवाच्या निमित्तानें होणाऱ्या भोजनसमारंभासही हेच नियम लागू करावे. उत्सवांत तर आपण सर्व एकाच परमेश्वराचे भक्त आहोंत या भावनेस प्राधान्य असल्यामुळें अशा प्रसंगीं जातिभेदाचा विचार होणें तत्त्वास सोडूनच नव्हे तर गर्ह्यच मानलें गेलें पाहिजे.

व्यापक स्वरूपाच्या भोजनसमारंभांचे वर चार प्रकार केले आहेत. त्यांपैकीं पहिल्या तीन प्रकारांचा येथपर्यंत विचार झाला. आतां चवथ्या प्रकाराकडे वळूं. राष्ट्रीयसभा, साहित्यपरिषद्, यांसारख्या कार्यक्रमांचे वेळीं भोजन होत असतें तें मुख्यतः शरीरयात्रेकरितांच होत असतें. 'कृतस्य कर्मणः सांगतासिद्ध्यर्थम्' तें नसतें हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. उपाशी राहून परिषदेचें काम होत नाहीं. म्हणून

जेवायचें एवढीच तेथें दृष्टि असते. व्यवस्थापक मंडळास प्रत्येकाच्या जातिभेदाकडे नजर देऊन नानाविध व्यवस्था ठेवतां येणें शक्य नसल्यामुळें एकपंक्तिभोजन साहजिकच प्राप्त होतें. अर्थात् कार्याकडे नजर दिल्यास अशा प्रसंगीं जातिभेदाचा विचार मनांत बाळगणें रास्त नव्हे. म्हणून अशा प्रसंगीं कोणत्याही प्रकारचा संकोच न बाळगतां प्रत्येक सभासदानें वागलें पाहिजे. त्यांत कोणत्याही प्रकारचें पाप तर नाहींच उलट भलत्याच वेळीं समाजहिताकडे दुर्लक्ष करून एकपंक्तिभोजनासारख्या क्षुल्लक विषयांत विचारशक्तीचा अपव्यय केल्याचें पाप मात्र त्यास लागणार नाहीं. याप्रमाणें खाजगी व व्यापक स्वरूपाच्या अशा उभयाविध भोजनप्रसंगांचें विवेचन करून झालें. त्यावरून पुढील तीन नियम योग्य असल्याचें दिसून येईल.

१ आपापल्या घरीं जो तो स्वतंत्र असल्यामुळें अशा खाजगी स्वरूपाच्या भोजनव्यवहारांत वैयक्तिक आवडीनिवडीस प्राधान्य दिलें जावें.

२ व्यापक स्वरूपाच्या भोजनप्रसंगीं कार्याकडे लक्ष देऊन तें न बिघडेल अशा प्रकारें वागावें. अशा वेळीं वैयक्तिक भावनांच्या आहारीं जाऊं नये.

३ अन्नशुद्धि, स्थलशुद्धि व पात्रशुद्धि यांकडे मात्र नेहमीं अवश्य लक्ष द्यावें.

कित्येक भोजनसमारंभांचाच विरोध करीत असल्याचें दिसून येतें. उपनयन, विवाह वगैरे प्रसंगांच्या निमित्तानें होणाऱ्या जेवणावळी टाळून त्यांत होणारा खर्च एखाद्या उपयुक्त संस्थेच्या मदतीस लावावा असें त्यांचें म्हणणें आहे. या म्हणण्यांत पुष्कळसें तथ्य आहे. परंतु याप्रमाणें उपदेश करणाऱ्यांनीं राजेरजवाडे, गव्हर्मेंट हाऊस, वगैरे ठिकाणीं होणारे भोजनसमारंभ तसेंच गॅदरिंग वगैरे निमित्तानें होणारे उपहार या सर्वांसच आळा घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसें होत

नसेल तर ' अजापुत्रं बलिं दद्यात् ' या न्यायानें केवळ धार्मिक भोजन-समारंभांवरच गदा घालणें योग्य होणार नाहीं. हे भोजनसमारंभ केवळ पोट भरण्याकरितां नसतातच. ओळखीच्या आप्तेष्टांनीं तास दोन तास एकत्र जमून सहानंदाचा अनुभव घ्यावा हाही त्यांतील गर्भित हेतु असतो. ' सहनौ भुनक्तु ' या वैदिक प्रार्थनेचा हाच मथितार्थ आहे. या गोष्टी लक्षांत घेतल्यास परिमित भोजनसमारंभ किती उप-युक्त आहेत हें दिसून येईल. म्हणून तूर्त तरी हे भोजनसमारंभ अजी बंद करावे असें आम्ही म्हणावयास तयार नाहीं. भोजनसमारंभ जरूर करावे. मात्र स्वतःचें आर्थिक सामर्थ्य लक्षांत घेऊन त्यावर खर्च करावा. उगाच भलत्या प्रमाणावर या बाबतींत खर्च न करण्याबद्दल दक्षता बाळगावी म्हणजे झालें.

भोजनप्रसंगीं शरीराची शुद्धता ठेवावी हें सांगणें नकोच. प्रत्यक्ष भोजनापूर्वी हात, पाय व तोंड स्वच्छ धुऊन मगच भोजनास आरंभ करावा हेंही सांगण्याचें कारण नाहीं. आतां भोजनाचे वेळीं पेहराव कोणता असावा याबद्दल विचार करूं. या संबंधानें रोजच्या भोजन-प्रसंगीं कसा पेहराव असावा हें पुढें बाराव्या प्रकरणांत सांगितलेलेंच आहे. येथें फक्त दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे सामुदायिक किंवा सांघिक भोजनांचाच विचार केला म्हणजे झालें. अशा प्रकारच्या भोजनांतही क्लबांतून होणाऱ्या पार्व्या किंवा हायस्कूल-कॉलेज गॅदरिंगच्या निमि-त्तानें होणारीं भोजनें अशा प्रसंगीं शक्य तितकें पोषाखांत सारूप्य ठेवण्याचें धोरण सर्वांनीं ठेवावें हें सांगावयास नकोच ! सामाजिक कार्यांच्या निमित्तानें होणाऱ्या भोजनसमारंभांत याप्रमाणें स्वच्छता व शिस्त यांकडे विशेष लक्ष दिलें जावें.

संस्कार व धार्मिक उत्सव यांच्या निमित्तानें होणाऱ्या भोजन समारंभांत रूढ पोशाख असावा असें आमचें मत आहे. आज या बाबतींत सर्वा-नींच जुने नियम सोडले नसल्यामुळें मोठी अव्यवस्था दिसून येते.

तिच्यामुळें कांहीं तोटा होतो असें नाहीं. पण उगीचच्या उगीच बेशिस्तपणा मात्र दिसून येतो. थोडा विवेक केल्यास तो टाळणेंही शक्य आहे. मग उगाच गैरशिस्तपणा दाखवून फायदा कोणता ? या दृष्टीनें विचार करून आम्ही असें सुचवितों कीं, अशा धार्मिक स्वरूपाच्या भोजन प्रसंगीं सोवळें नेसून व अंगावर उपरणें वगैरे घेऊनच सर्वांनीं जेवावयास बसावें. मुकटा वगैरे नसेल तर धोतरही चालेल. पण सदरा व पायजमा ही जोडी अशा वेळीं न वापरण्याची शिस्त पाळणें श्रेयस्कर आहे. ही शिस्त अंगवळणीं पडण्याकरितां भोजन-निमंत्रण-पत्रिकेंत ‘ सोवळें-भांडें बरोबर घेऊन येण्याची नम्र विनंति आहे, ’ असें वाक्य घालण्याची प्रथा पाडावी. या वाक्यांतील ‘ सोवळें ’ हा शब्द पारिभाषिक समजावा. म्हणजे रेशमी कदापासून तों धुतलेल्या वस्त्रापर्यंत कशाचाही त्यांत अंतर्भाव समजला जावा. पायजमा व सदरा यांचा मात्र त्यांत समावेश नसावा. पायजमा सदऱ्यांनीं हिंदुत्व नष्ट हातें असें नाहीं. परंतु शिस्त व प्राचीन परंपरा या दोन्हींचा विचार करून हा मार्ग सुचविलेला आहे.

भोजनाचें निमंत्रण आपण स्वीकारलेलें असून आपण अमुक वाजतां भोजनार्थ येणार आहों हें आगाऊ कळविण्याचा शिष्टाचार नव्यानें रूढ केला जाणें आवश्यक आहे. विशेषतः शहरवस्तींतून किती पान होणार हे यजमानास आगाऊ न अंदाजतां आल्यामुळें आयत्यावेळीं विनाकारण गोंधळ उडून जातो. बरें, प्रत्यक्ष जेवावयास जाणें यांत जर कमीपणा नाहीं तर तसें आगाऊ कळविण्यांतच कमीपणा वाटण्याचें कारण काय ? तरी हाही प्रकार आवश्यकतेनुसार सुरू करणें आवश्यक आहे.

धार्मिक भोजनसमारंभाचे वेळीं प्रारंभीं वैदिक अथवा लौकिक प्रार्थना होणें आवश्यक आहे. ‘ सदा सर्वदा ’ ‘ वदनि कवळ घेतां ’ वगैरे श्लोक म्हणून भोजनास प्रारंभ करण्याची पद्धत रूढ आहे ती

तर उत्तमच आहे. पण त्याच्या जोडीला ' यंतु नद्यो वर्षन्तु ' किंवा ' आब्रह्मन्ब्राह्मणो ' यांसारखें एखादे वैदिक प्रार्थनागीत म्हणणेंही आवश्यक आहे. जेवतांना आग्रह फार होतो व विनाकारण अन्न व्यर्थ जातें, हें सर्वांस माहीत आहेच. तरी याही बाबतींत दक्षता बाळगणें आवश्यक आहे. असो. या प्रमाणें साधारणतः सर्व बारीक सारीक नियम पाहून झाले. आतां मांसाहाराबद्दल थोडें लिहून हें प्रकरण संपवूं.

मांसाहाराबद्दल आज आपल्या समाजांत फारच मतभेद माजलेले आहेत. हिंदूंनीं मांसाहार करून क्रौर्य संपादन केलें तरच यापुढें त्यांचा निभाव लागेल हें या वादांतील एक टोंक असून दूध देखील तें प्राणिज म्हणून वर्ज्य करावें हें त्या वादाचें दुसरें टोंक आहे. कोणी कोणी क्रौर्य व शौर्य यांमध्यें भेद करून क्रौर्यास मांसाहार आवश्यक असला तरी शौर्यास तो नाहीं असें प्रतिपादतात. झांशीची राणी, थोरले बाजीराव पेशवे वगैरे उदाहरणें या पक्षांतील लोक पुढें करतात. या सर्व मतभेदांचा सांगोपांग विचार येथें देतां येणें शक्य नाहीं म्हणून

१ मांसाशन शास्त्रनिषिद्ध आहे काय ?

२ मांसाशनाचा अधिकार कोणास आहे ?

३ मांसाहारी व शाकाहारी यांत श्रेष्ठ कोण ?

या तीन प्रश्नांचाच येथें संक्षेपानें विचार करण्याचें योजिलें आहे.

शास्त्र म्हणजे श्रुतिस्मृति असा अर्थ घेतला तर प्राचीन श्रुतिस्मृतिग्रंथांत मांसाहारास भरपूर आधार आहे ही गोष्ट सूर्यप्रकाशा इतकी स्पष्ट* आहे. तेव्हां मांसाशन सुरू करा असें कोणी म्हणतांच जो परंपराद्रोहाचा बाऊ उभा करण्यांत येतो हें योग्य नव्हे. धर्माच्या मूल-

* धर्मरहस्य पृ. २६७ ते २७३, धर्मशास्त्रमंथन प्रकरण १२ वें, धर्मशास्त्र विचार पृ. १७४ ते १८७. इतक्या ठिकाणीं या विषयाची चर्चा तत्त्ववाद्यांनीं केलेलीच आहे. त्यांत प्राचीन सर्व आधार जवळ जवळ आलेलेच आहेत. म्हणून त्यांची पुनरावृत्ति येथें केलेली नाहीं.

तत्त्वांचा विचार केला तरीही आजची रूढि त्याज्यच ठरते. अहिंसा हें धर्माचें मूलतत्त्व आहे, हें खरें; पण त्याचा व्यवहार्य अर्थ कोणता हें पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत दिलेलेंच आहे. ' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ' हेंहि धर्माचें मूळ तत्त्वच आहे. तें सुस्थ व्हावें म्हणून जेवढा मांसाहार आवश्यक असेल तेवढा न करणें व शरीर दुर्बल ठेवणें ही गोष्ट धर्मतत्त्वांस सोडून आहे. तात्पर्य केवळ शरीररक्षणाकरतांच नव्हे तर तें अधिक बलयुक्त व्हावें याकरितांही मांसाहार करणें धर्म्य होय. याप्रमाणें पहिल्या प्रश्नाचें उत्तर संक्षेपानें पाहून झालें. आतां दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर पाहूं.

मांसाशन आज रूढीनें कित्येक जातींत रूढ आहे आणि रूढिवादी शास्त्री त्यांचें तें कृत्य शास्त्रनिषिद्धही मानीत नाहींत. पण तात्त्विक विचाराच्या अभावीं या बाबतींत बरेच घोटाळे माजलेले आहेत. ज्यांच्यामध्यें मांसाहार रूढ आहे ते मांसाहाराचें तत्त्व लक्षांत न घेतां वाटेल तेव्हां मांसाहार करतात. कधींच मांसाहार न करणारे, अशा लोकांस कनिष्ठ दर्जाचे मानीत असल्यामुळें असल्या लोकांच्या सान्निध्यांत मांसाहारी लोकांस आपला खाद्यव्यवहार संकोचामुळें चोरून करावा लागतो. मांसाहारास या प्रकारें कांहींसें अप्रतिष्ठित स्वरूप प्राप्त झालेलें असल्यामुळें, आरोग्य व बलवृद्धीच्या दृष्टीनें मांसाहार कसा करावा या विषयाची शास्त्रीय चर्चा हिंदु समाजांत कधींही होत नाहीं. यामुळें ज्यांच्यामध्यें मांसाहार रूढ आहे त्यांच्यांतही मांसाहाराचे वास्तविक फायदे दिसून येत नाहींत.

उलटपक्षीं जे मांसनिवृत्त आहेत ते मांसाहार म्हणजे महापाप असें मानून मांसाहाराचा शास्त्रीय विचार करणेंही धर्मविरुद्ध समजतात. कॉडलिव्हर ऑईल सारखे केवळ आरोग्यदृष्ट्या हितकर पदार्थही सेवन करण्यास तयार होत नाहींत. आजकाल कांहीं कॉलेजांतील तरुणांनीं सुधारणेच्या नांवाखालीं पूर्वजांची मांसनिवृत्तीची बेडी तोडून

मराठी ग्रंथ

हॉटेलमधून वगैरे मांसाहार करण्यास सुरवात केलेली आहे. पण तीही केवळ जिव्हेच्या स्वादाकरितां आहे. आरोग्य व बलवृद्धि या तत्त्वाकडे लक्ष देऊन नाहीं. आजच्या आपल्या समाजांतील मांसाहाराची अशी दुरवस्था आहे. अशा स्थितींत अधिक हिंदूंनीं मांसाहार करावा अशी नुसती घोषणा करून कार्यभाग होणें शक्य नाहीं. रूढीस मान देऊन त्या त्या जातींतील लोकांनीं मात्र मांसाहार करावा परंतु इतरांनीं करूं नये हा निर्णय या दृष्टीनें विचार केल्यास शास्त्रशुद्ध ठरत नाहीं. केवळ रूढीनें मांसाहाराचा अधिकार यापुढें ठरविला जाऊं नये. या पुढें पुढील तत्त्वप्रणाली लक्षांत घेऊन मांसाहाराचा अधिकार ठरविण्यांत आला पाहिजे.

मांसाहाराचा अधिकार यापुढें जातीवर अवलंबून ठेवूं नये. तर वैद्यशास्त्रांत सांगितलेल्या पद्धतीनें आवश्यकतेनुसार तो करण्याचा परिपाठ ठेवावा. जुन्या वैदिक ग्रंथांत शोकपीडित, भारवाही, प्रवासी, रुक्ष, अशक्त, वातरोगी, गर्भिणी, बाळंतीण वगैरे लोकांस मांसाहार अत्यंत आवश्यक आहे असें सांगितलेलें आहे. आजच्या शास्त्रांचा विचार करतांही हेंच खरें दिसतें.

दूध, उडीद वगैरे पदार्थ हे मांसाहाराच्या तोडीचे आहेत यांत शंकाच नाहीं. म्हणून या प्रकारच्या अन्नानेंच ज्यांस आरोग्य व बल प्राप्त होत असेल त्यांनीं मांसाहार घेण्याचें कारण नाहीं. पण या प्रकारच्या आहारानें जेथें काम भागत नाहीं, तेथें—जिव्हालौल्याकरितां नव्हे तर—आरोग्य व शक्ति यांच्या संपादनार्थ मांसाहार अत्यंत आवश्यक ठरतो. या दृष्टीनें

( १ ) अत्यंत क्षीणशक्ति झाल्यामुळें दुधासारखे पदार्थही पचत नाहींत अशा लोकांनीं, तसेंच ( २ ) शारीरिक सामर्थ्याचा विशेष व्यय करून काबाडकष्टाचीं कामें करणारांनीं मांसाहार केला पाहिजे. अशा लोकांनीं कोणत्या पद्धतीनें सदर आहार केला पाहिजे हें नीट

तज्ज्ञांकडून समजावून घ्यावें, व मग त्याचा प्रयोग करावा. दुसऱ्या प्रकरणांत धर्माचीं ध्येयें दिलेलीं आहेत. त्यांत शक्ति व आरोग्य यांचाही अंतर्भाव आहे. (पृ.१७ नि. ५) तरी या दोन ध्येयांकरितांच प्रामाणिकपणें मांसाहार केला जाईल तर तें धर्मबाह्य मानण्याचें कारण नाहीं. किंबहुना तें अत्यंत धर्म्यच होय.

वर मांसाशनाच्या अधिकाराबद्दल विवेचन केलेलेंच आहे, त्याप्रमाणें अधिकारी ठरणारास शाकाहाऱ्यापेक्षां कधींही कनिष्ठ मानतां येणार नाहीं. म्हणून अशा प्रकारच्या लोकांनीं मांसाहार शास्त्रोक्त पद्धतीनें केल्यास त्यांस शाकाहाऱ्याबरोबरीनें मान दिला पाहिजे.

पण आज इतक्या तात्त्विक दृष्टीनें मांसाहार करणारे फारच थोडे आहेत. जातीच्या रूढीचा फायदा घेऊन जिव्हेच्या चोजल्या करितां मांसाहार करणारेच फार. अशांचें मांसाशन आम्हीं समर्थनीय मानीत नाहीं. व्यर्थ किंवा चैनीकरितां हिंसा करणें हें धर्मदृष्ट्या समर्थनीय नाहीं. म्हणून जिलब्यांबरोबर कोळंबीची आमटीही भुरकणारे गलेलठ्ठ व स्थूलदेही कोणत्याही अर्थानें सुधारक नाहींत, असें आमचें स्पष्ट मत आहे.

वरील विवेचनावरून विनाकारण मांसाशन करणें धर्मदृष्ट्या कसें गर्ह्य आहे* हें दिसून येईल. आर्यसंस्कृतीनें मांसनिवृत्तीबद्दल खटपट करण्यांत कसें अनन्यसाधारण यश संपादन केलें आहे हें सांगतांना कविसम्राट् रवींद्रनाथ यांनीं आर्यांच्या सर्वत्र आत्मौपम्यबुद्धीनें पाहण्याच्या दृष्टीचें वर्णन करून पुढें

This was the reason why in India a whole people who once were meateaters gave up taking animal-

* न तादृशं भवत्येनो मृगहन्तुर्वधार्थिनः ।
यादृशं भवति प्रेत्य वृथा मांसानि खादतः ॥ मनु ५.३४

food to cultivate the sentiment of universal sympathy for life, an event unique in the history of mankind. ( Sadhana P. 9. )

असे आनंदाचे व अनन्यसाधारणतेचे द्योतक उद्गार काढले आहेत. त्यांचे हे बोल ज्यांस उद्बोधक वाटत असतील त्यांस हिंदूंपैकीं ज्या कित्येक जाति आज कित्येक पिढ्या मांसनिवृत्त आहेत त्यांनीं आपली मांसनिवृत्ति कायम ठेवणें कसें आवश्यक व इष्ट आहे हें कळून आल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून अशा धर्मबांधवांनीं स्वतः मांसप्रवृत्त न होतां इतरांस प्रेमानें मांसनिवृत्त करण्याचा प्रयत्न करून चालू तत्त्वहीन वृथा मांसाशनास आळा पडेल असा प्रयत्न करावा हेंच उचित होय.

चैनीखातर व रूढीच्या नांवावर चाललेला मांसाहार वर्ज्य करणें याप्रमाणें इष्ट असल्यामुळें तशाप्रकारें मांसाशन करणारांचें तें कृत्य समर्थनीय ठरणार नाहीं हें उघड आहे. पण तेवढ्यावरून त्यांच्याशीं कायमची असहकारिता पुकारून दुही माजवणें इष्ट नाहीं. म्हणून अशा मांसाहाऱ्यांशीं सर्वथैव असहकार न पुकारतां फक्त ज्यावेळीं त्यांचा तो प्रकार चालू असेल तेवढ्याच वेळेपुरतें त्यांच्याशीं असहकार्य करून स्वस्थ बसावें. कारण या पुढच्या काळांत खाण्यापिण्यासारख्या बाबीस फाजील महत्त्व देऊन निभाव लागणार नाहीं. निवृत्तमांसांनीं याप्रमाणें मांसाहारी धर्मबांधवांच्या बाबतींत ज्याप्रमाणें उदारता किंवा उपेक्षावृत्ति धारण करणें आवश्यक आहे त्याचप्रमाणें मांसहाऱ्यांनींही नसती फुशारकी मारून वृथा मांसाहाराचें समर्थन करण्याचें सोडून दिलें पाहिजे. असो.

शेवटीं अन्न व पाणी या दोन्ही बाबतींत स्वच्छता व आरोग्य याच बाबींकडे प्राधान्यानें लक्ष देऊन बाकीच्या बाबतींत घरांत काय किंवा बाहेर काय वर दाखविल्याप्रमाणें क्षमाशील व उदारवृत्तीनें वागावें हें सांगून आतां पुढील विषयाकडे वळूं.

---

९

## प्रकरण दहावें

# उपवास आणि व्रतें

वेदांत सांगितलेले मोठमोठे यज्ञयाग आतां होत नाहींत. स्मृतींतील अनेकविध श्राद्धकल्प तसेंच इतरही कित्येक आचार आतां मागेंच पडलेले आहेत. तथापि उपवासधर्म आजही चालू आहे. स्नान-संध्या न करणारे, फार काय इराण्याच्या दुकानांत चहा घेणारेदेखील उपवास करीत असल्याचें दिसून येतें. हिंदुधर्म सध्यां कोणत्या रूपानें रूढ आहे असें विचारल्यास 'उपवासरूपानें' असें उत्तर दिल्यास गैरवाजवी होणार नाहीं.

उपवासांप्रमाणेंच निरनिराळीं व्रतें हेंही चालू हिंदुधर्माचें लक्षण मानतां येईल. मात्र हीं व्रतें बहुधा स्त्रियांतच रूढ आहेत. ऋषिपंचमी व्रताची कहाणी पाहिली तर हें व्रत पुरुषांकरितांही आहे असें दिसून येतें. पण सध्यां रुढि अगदींच निराळी आहे. ऋषिपंचमीव्रताप्रमाणेंच सोळा सोमवार, हरितालिका, मंगळागौरी, शिवामूठ, वटसावित्री अशीं कित्येक व्रतें खास स्त्रियांकरितांच आहेत. खास पुरुषांकरितां मात्र एकही व्रत सध्यां रूढ नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

उपवास व व्रतें यांतील फरक दाखविणें सध्यां कठिण झालें आहे. कांहीं विशिष्ट विधि करणें व त्याचें अंग म्हणून कांहीं नियम पाळणें यास व्रत म्हणतात. उ० सत्यनारायण व्रत घ्या! सत्यनारायणाची पूजा करून पोथी ऐकणें व प्रसाद घेणें हा त्यांतील विधि. हें सर्व होईपर्यंत भोजन न करणें ( उपास करणें ) हें त्याचें केवळ अंग होय. असले व्रतांगभूत उपवास जुन्या ग्रंथांतूनही आढळतात.

रामायणांत राज्याभिषेक–पूर्वदिवशीं दशरथानें वसिष्ठास बोलावून

रामचंद्राकडून उपवास करविण्याविषयीं आज्ञा केली असें वर्णन आहे. त्याप्रमाणें वसिष्ठांनीं रामचंद्राकडे जाऊन त्यास उपास कसा दिला याचें वर्णन वाल्मीकिरामायणांत ( अयोध्या सर्ग ५ व ६ पहा ) सापडतें. त्यांत देवतापूजन व हवन करून शेषभक्षण, तसेंच पलंगावर न निजतां दर्भासनावर निजण्याचा उल्लेख आहे. या सर्व प्रकारास तेथें उपवास असें नांव दिलेलें आहे. निरनिराळ्या यज्ञांच्या निमित्तानेंही उपवास सांगितलेला आहे. ‘ उपवसथ ’ या शब्दाचा तेथें प्रयोग असून त्याच ठिकाणीं काय खावें याचीही चर्चा केलेली आढळते. सदर चर्चेच्या प्रारंभीं निरनिराळ्या ऋषींचीं मतें देऊन शेवटीं

**स यदेवाशितमनाशितं ( भवति ) तदश्नीयादिति ।**
**यस्य वै हविर्न गृह्णन्ति तदशितमनाशितम् ॥**

शत. ब्रा. १.१.१.८–९

असा सिद्धांत सांगितला आहे. त्यांत जें देवांस देण्याचें नसतें तें खावयाला हरकत नाहीं असें स्पष्ट विधान आहे. अर्थात् अरण्यांतील कंदमुळें खाऊनही वेदकाळीं उपोषण मोडत नसे असें दिसतें.

कांहीं न खाणें व खावयाचेंच झालें तर भुईमूग, वऱ्या, बटाटे यांसारखे पदार्थ खाऊन राहणें हाच आज रूढीप्रमाणें उपवास मानला जातो व त्यांतही पहिला पक्ष उच्च समजला जातो. निर्जळी म्हणजे पाणीही न पितां उपास करणें हा सर्वश्रेष्ठ मार्ग अशी समजूत आहे. या समजुतीस बळी पडून कित्येक सोसत नसूनसुद्धां उपास करितात. अशा निर्जळ्या एकामागून एक तीन चार आल्या म्हणजे तर विचारावयासच नको ! चार दिवस धड पूजा नाहीं, वाचन तर नाहींच नाहीं, अशा स्थितींत कण्हत कुंथत काढावयाचे; शेवटच्या दिवशीं दुसऱ्याच्या मदतीनें उपास सोडून अंथरूण धरावयाचें आणि वर धर्म केला असा अभिमान बाळगावयाचा असा सर्वत्र प्रकार रूढ झालेला आहे.

पण हें निरशनाचें महत्त्व प्राचीन काळच्या ग्रंथांत दिसून येत नाहीं. वेद व रामायण यांतील उतारे वर दिलेच आहेत. गीतेंत तर शरीराला कष्ट देऊन केलेलें तप तामस होय (गी. १७-१९) असें स्पष्ट सांगितलेलें आहे. लंघन करणारास योग प्राप्त होत नाहीं (६.१६) असेंही भगवंतानीं स्पष्ट सांगितलेलें आहे. याशिवाय कित्येक स्मृतिकारांनींही अनशनाचा निषेधच* केल्याचें दिसून येतें. तो लक्षांत घेतल्यास निर्जळी उपवासाची रूढ पद्धत सर्व प्राचीन ऋषींस संमत आहे असें दिसून येत नाहीं. त्या त्या दिवशीं जीं विशिष्ट कृत्यें सांगितलेलीं असतील तीं (उ. ग्रंथपठन, पूजन इ.) मुख्य समजून तीं योग्यतऱ्हेनें अधिक वेळ करतां येतील अशा तऱ्हेनें अनाहार किंवा अल्पाहार (सात्त्विक) यांची साधन म्हणून योजना करावी असाच मूळ हेतु दिसतो. तात्पर्य, उपवासांत ग्रंथवाचनादि विधायक गोष्टीस प्राधान्य असून मुळींच न खाणें वगैरेस अगदींच गौणत्व आहे.

पण आज खानपानाचें हें गौणरूप लयास जाऊन त्यासच उपवासांत प्राधान्य आलेलें आहे. याचें ठळक उदाहरण एकादशीचें देतां येईल! पुराणांतून एकादशीचें व्रत कसें करावें याविषयीं जें वर्णन सांपडतें त्यांत उपवासावरोबरच दशमीच्या दिवशीं रात्रीं पाळावयाचे नियम, एकादशीच्या दिवशीं दिवसा हरिकीर्तन व रात्रीं जागरण, तसेंच द्वादशीस करावयाची पारणा इतक्यांचा अंतर्भाव केलेला दिसून येतो. पण आज या सर्व गोष्टी बाजूस राहून, कांहीं न खाणें किंवा फराळाचें खाणें एवढेंच त्यांतील अंग (?) शिल्लक राहून एकादशीव्रतास उपवासाचें‡

---

* ब्रह्मचारी गृहस्थश्च योऽनश्नंस्तु तपश्चरेत्।
प्राणाग्निहोत्रलोपेन अवकीर्णी भवेत्तु सः॥ अपरार्क १.१०६

‡ उपवास किंवा उपास यांचा मराठींत जो रूढ अर्थ आहे त्यांस अनुसरून हा शब्द येथें वापरलेला आहे. या शब्दांचा स्मृतिशास्त्रोक्त खरा अर्थ पुढील परिच्छेदांत दिलेलाच आहे.

रूप आलें आहे. संकष्टीचें व्रत मात्र अजून कांहींसें पूर्ण स्वरूपांत रूढ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या दिवशीं चंद्रोदयाचे वेळीं स्नान करून तसेंच पूजा करून उपवास सोडण्याची प्रथा अद्याप रूढ आहे. पण कित्येक वेळां प्रवासांत असतांना पूजा वगैरे शक्य नसेल तेव्हांही केवळ उपवासावरच काम भागाविलें जातें. यावरून तें व्रतही लवकरच उपवासाशीं एकरूप होईल कीं काय, अशी भीति वाटते हरतालिका, ऋषिपंचमी, वटसावित्री वगैरे बायकांचीं व्रतें मात्र अजून केवळ उपासरूपी झालेलीं नाहींत. त्यांत उपवासाबरोबरच ( ऋषिपंचमी सोडून ) इतर पूजा वगैरे विधि कायम आहेत. पण गतानुगतिकत्वा मुळें त्यांस विकृत स्वरूप प्राप्त झालेलें आह. मुंबईसारख्या शहरांत ऋषींच्या भाजी–मीठ–वऱ्यांची जी रेलचेल होते ती पाहिली म्हणजे हा खेळखंडोबा लवकर बंद होईल तर बरें असें वाटतें. तात्पर्य, सध्यां व्रतवैकल्याचे जे प्रकार रूढ आहेत त्यांस परंपरेचा किंवा धर्मतत्त्वांचा कसलाच आधार दिसून येत नाहीं. म्हणून आतां अशा व्रतांचें तात्त्विक स्वरूप काय आहे हें पाहूं.

उपवास शब्दाचा सरळ अर्थ ( उप = जवळ + वास = राहणें ) जवळ रहाणें असा आहे. येथें कोणाजवळ रहावयाचें हें सांगितलेलें नाहीं त्याचें उत्तर—

***उपावृत्तस्य पापेभ्यो यस्तु वासो गुणैः सह ।**
**उपवासः स विज्ञेयः सर्वभोगविवर्जितः ॥**

याज्ञ. अपरार्क १–१५४

---

* या स्मृतिवचनाची मूलभूत श्रुति पुढीलप्रमाणें आहेः––

उभावग्नी उपस्तृणुते । देवता उपवसन्तु मे ।
अहं ग्राम्यानुपवसामि । मह्यं गोपतये पशून् । तै. ब्रा. ३.७.४.१८

या वचनाकडे लक्ष दिल्यास वरील स्मृतिवचनाचें महत्त्व किती आहे हे मार्मिक वाचकांस कळून येईल.

या श्लोकांत दिलेलें आहे. पापांपासून परावृत्त होऊन चांगल्या गुणांबरोबर वास करणें हा उपवास होय असें यांत म्हटलेलें आहे. आतां सत्य, अहिंसा, दम वगैरे अमूर्त गुणांशीं सहवास घडणें अशक्य असल्यामुळें त्या त्या गुणांच्या उत्कर्षाचीं कर्मे करणें किंवा तसल्या गुणवंतांचीं ( राम, कृष्ण, शिव वगैरेंचीं ) चरित्रें ऐकणें किंवा ऐकविणें अशा प्रकारच्या कार्यक्रमाचा समावेश उपवासांत करावा लागेल हें उघड आहे. उपवासाचें शास्त्रीय स्वरूप या प्रकारचें आहे.

चांगले गुण अंगवळणीं पडावे म्हणून कित्येक वेळां स्वतःवरच जबरदस्ती करावी लागते. थोडा त्रास पडला तरी हरकत नाहीं. पण अमुक एक गुण मी संपादन करणारच अशा निश्चयानें वागल्याशिवाय मनुष्याच्या ठिकाणीं चांगले गुण उत्पन्न होत नाहींत. या दृष्टीनें व्रतांचें महत्त्व फार मोठे आहे हें दिसून येईल. या व्रतांसच तप असें नांव आहे. § इंद्रियास आवरून धरून एखाद्या गुणाकरितां कसून प्रयत्न करणें यासच तप असें म्हणतात. व्रताचेंही हेंच रहस्य आहे. म्हणून प्राचीन वाङ्मयांत तपाबद्दल काय सांगितलें आहे तें पाहूं म्हणजे व्रतांचें शास्त्रोक्त रहस्य लक्षांत येईल. जुन्या ग्रंथांतून तपाचें महत्त्व फारच वर्णिलेलें आहे. त्यांत तपाचे योगानें स्वर्ग, यश, दीर्घायुष्य, भोग, फार काय कोणतीही गोष्ट तपानें मिळूं शकते असें म्हटलेलें आहे. *

**नाप्राप्यं तपसा किंचित्** । म. भा. १२।२९५।२३

म्हणजे तपानें अप्राप्य कांहींही नाहीं असेंही म्हटलेलें आहे. योग्य

---

§ इंद्रियाण्येव संयम्य तपो भवति नान्यथा ॥ म. भा. ३।२११।१८

* तपसा प्राप्यते स्वर्गस्तपसा प्राप्यते यशः ।
आयुःप्रकर्षो भोगाश्च लभ्यन्ते तपसा विभो ॥
तपसा लभ्यते सर्वम् ।
तपसा विंदते महत् ।

रीतीनें प्रयत्न केल्यास सर्व कांहीं प्राप्त होऊं शकतें असा या सर्व वचनांचा मथितार्थ आहे.

तप म्हणजे कांहीं तरी शरीरपीडाकारक कर्म अशी समजूत सध्यां पसरलेली आहे. व्रतांबद्दलही साधारणतः असेंच मानण्यांत येतें. निर्जळी एकादशी केल्यानें अधिक पुण्य लागतें अशी समजूत सर्वत्र रूढ आहे. परंतु या संबंधांत धर्मशास्त्रांचें मत अगदींच निराळें आहे.

**ब्रह्मचारी गृहस्थश्च योऽनश्नंस्तु तपश्चरेत् ।**
**प्राणाग्निहोत्रलोपेन अवकीर्णी भवेत्तु सः ॥**

या. अ. १-१०६

या वचनांत कांहीं न खातां जो तपाचरण करतो तो पापी होतो असें स्पष्टपणें म्हटलेलें आहे. ज्याप्रमाणें आहिताग्नि मनुष्यानें रोज सकाळ संध्याकाळ अग्नीमध्यें आहुति दिलीच पाहिजे; त्यांत खंड पाडतां नये. त्याचप्रमाणें शरीरांतील प्राणाग्नीस दोनदां अन्नाची आहुति दिलीच पाहिजे असा शास्त्रकारांचा नियम आहे. म्हणून तपाच्या निमित्तानें कांहीं न खाणें म्हणजे या शास्त्रोक्त प्राणाग्निहोत्राचें अतिक्रमणच करणें होय.

वरील श्लोकांत तप शब्द आहे. खालील वचनांत उपवास हा शब्द आलेला असून दोन वेळांच जेवणें, मध्यंतरीं कांहीं न खाणें, असें केल्यानें उपवासच घडतो असें म्हटलेलें आहे. तें वचन असें :—

**अंतरा प्रातराशं च सायमाशं तथैव च ।**
**सदोपवासी भवति यो न भुङ्क्ते कदाचन ॥**

तुकाराम महाराजांनीं तर

**राम म्हणे ग्रासोग्रासीं । तोचि जेवला उपवासी ॥**

असें म्हणून भगवत्स्मरणपूर्वक अन्न सेवन करणें यासच उपवास असें म्हटलें आहे. या प्रकारें विचार करतां जुन्या परंपरेंत आजच्या

रूढ निर्जळीला फारसें महत्त्व नव्हतें असें दिसून येतें. भगवद्गीतेंतही *जागोजागीं ऐकान्तिक अनशनाचा निषेधच दिसून येतो.

केवळ वचनांवरूनच आम्ही ही पद्धत त्याज्य ठरवितों असें कोणी समजूं नये. उपवास, व्रत किंवा तप यांचें तत्त्व लक्षांत घेतल्यासही हेंच सिद्ध होतें. स्वतःच्या ठिकाणीं इंद्रियसंयम आल्याखेरीज मनुष्यास कोणतीही सिद्धि प्राप्त होऊं शकत नाहीं ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. ज्याचीं इंद्रियें ताब्यांत नसतात तो विषयामागें धाऊन धावून थकून जातो, त्यास शांति मिळत नाहीं. ही गोष्ट अनुभव-सिद्ध असल्यामुळेंच शास्त्रांत वारंवार ¶ संयमाची महती सांगितलेली आहे. निरनिराळीं व्रतें व नियम मनुष्यांत संयम वाढावा म्हणून सांगितलेलीं असतात. मनुष्यानें नेहमीं संयम केला पाहिजे हें खरें; पण प्रकृति-स्वभावाच्या दुर्निवारतेमुळें तें नेहमीं शक्य होत नाहीं. म्हणून शास्त्रकारांनीं कांहीं दिवस ठरवून दिलेले आहेत. निदान त्या व्रतांच्या दिवशीं जरी इंद्रियांच्या आहारीं न जातां संयमपूर्वक राहण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा इष्ट परिणाम घडून येतो.

---

* ' न चैकान्तमनश्नतः ( योगोऽस्ति ) ' ६।१६

' अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः ।
दंभाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ १७।५
कर्शयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ।
मां चैवान्तः शरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥ १७।६
मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः ।
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ ' १७।१९

¶ इंद्रियाणां प्रसङ्गेन दोषमृच्छत्यसंशयम् ।
संनियम्य तु तान्येव सिद्धिं समधिगच्छति ॥ म. भा.
असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः । गीता ६।३६
प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ । गीता १६।१६

इंद्रियसंयमाचा खरा मार्ग कोणता हें मागें ( पृ. १४ पहा ) दाखविलेंच आहे. कांहीं बोलावयाचें नाहीं, कांहीं खायचें नाहीं म्हणजे झाला इंद्रियसंयम असें अदूरदृष्टीच्या लोकांस वाटतें. पण अशा प्रतिबंधक उपचारांनीं मन शांत होण्याऐवजीं कोंडलेल्या मांजराप्रमाणें चिडून जाऊन प्रतिक्रियेच्या तत्त्वाप्रमाणें अधिकच बेफाम बनत असतें. मुलें रडूं लागलीं किंवा निजत नसलीं म्हणजे भाबड्या आया त्यांस ' गप बसा ' असें दटावतात किंवा जोराजोरानें थोपटूं लागतात. या जबरीच्या प्रयोगांचा मुलांवर कसा उलटा प्रयोग होतो हें सर्वांस ठाऊक आहेच. अशा जबरदस्तीनें त्यांच्या मनाला होणारा त्रास कसा चुकावा ? मुलांस गप्प करणारी चतुर माता मात्र असले आदळआपटीचे प्रकार करीत नाहीं. मुलाचें लक्ष सहज वेधेल असें खेळणें ती मुलास देतें, किंवा ' तें बघ ' ' तें बघ ' असें म्हणून दुसऱ्या एखाद्या दृश्याकडे त्याचें लक्ष लागेल असें करते. झोप येण्याकरितां मंजुळ आवाजांत गाणें म्हणते. या सर्वांचा इत्यर्थ असा कीं, मनाला कोणता तरी दुसरा विषय मिळाल्याखेरीज तें पहिला विषय सोडीत नाहीं.

प्रो. फडके यांनीं मानसमंदिरांत ( पृ. ७ ) पातंजलयोगावर तसेंच एकंदर प्राचीन संस्कृत वाङ्मयावर आक्षेप घेतलेले आहेत. आजच्या हरदास पुराणिकांचें विकृत विवेचन लक्षांत घेतल्यास त्यांचे आक्षेप बरोबरच आहेत. पण मूळ संस्कृत वाङ्मयांत उच्च दर्जाचें ' मानस मंथन ' आहे याकडे त्यांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. त्याकडे त्यांचें लक्ष गेलें तर प्राचीन वाङ्मयांत केवळ मानसमंथनच नव्हे तर मार्गांतरा ( Sublimation ) चेंहि प्रतिपादन स्पष्टपणें त्यांस दिसून येईल !

व्रत व तप यांत केवळ अभावात्मक गोष्टींला प्राधान्य नसून पूजा, पोथी वाचणें, कीर्तन ऐकणें किंवा देवदर्शन घेणें फार काय जप करणें यांसारख्या मनःशांतिकारक विधायक क्रियांना शास्त्रकारांनीं प्राधान्य दिलेलें आहे

तें या मार्गांतराच्या प्रक्रियेकडे लक्ष देऊनच होय. अशा उच्च समाधान देणाऱ्या क्रियाकलापांत मन गुंतलें व रमलें म्हणजे आपोआपच जेवण नकोसें वाटतें, वायफळ बोलावेंसें वाटत नाहीं. व्रतांमध्यें किंवा तपामध्यें याप्रमाणें उपोषण किंवा मौन आपोआप झालें पाहिजे. त्याकरितां अट्टाहास करण्यांत कांहीं फायदा नाहीं. या दृष्टीनें विचार केल्यास व्रतें किंवा तप करतांना कशास प्राधान्य व कशास गौणत्व दिलें पाहिजे हें सहज कळून येईल.

व्रतांमध्यें मुळींच न खाणें हें ज्याप्रमाणें अयोग्य, त्याचप्रमाणें अति खाणें हेंहि गर्ह्य होय. अतिभोजनानें तमोगुण वाढून सुस्ती येते. मग पूजा, चिंतन, मनन वगैरे सत्त्वप्रधान कामें कोठून होणार ? पण याहि गोष्टीविरुद्ध आमचें आचरण घडत आहे. 'एकादशी आणि दुप्पट खाशी' अशी आमच्यांत म्हणच पडलेली आहे. कित्येक खाण्यांत अतिरेक करीत नाहींत, पण जें खातात तें अनारोग्य वाढविणारें खातात. वऱ्याचे तांदूळ, भुइमुगाचे दाणे, बटाटे, शिंगाडे वगैरे पदार्थ पित्तप्रकोप व वातकारक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचेच निरनिराळे पदार्थ तुपांत तळून किंवा भाजून खाण्यांत फायदा कोणता ? तसेंच साधें सात्त्विक अन्न न खातां पक्वान्नी थाटाचें जेवण जेवून पुनः वर आपण धार्मिक उपास करतों अशी मनाची फसवणूक करून घेणारांस काय म्हणावें हेंच कळत नाहीं. हरदासपुराणिकही या प्रकारावर प्रसंगीं टीका करतात; परंतु पुराणांतील वांगीं पुराणांतच राहून जेव्हां तेच निरशनाचे छत्तीस पदार्थ मोठ्या भक्तिभावानें (?) उपवास म्हणून उदराग्नीस अर्पण करितात तेव्हां इतरांवर त्या टीकेचा परिणाम न झाला तर त्यांत आश्चर्य कसलें ?

कित्येक आधुनिक सुशिक्षित म्हणविणारे निराळ्याच एका दृष्टीनें रूढ उपोषणाच्या आचाराचें समर्थन करतात. कोणी लंघनाचें तत्त्व पुढें करून, तर कोणी 'चेंज ऑफ डायेट' म्हणजे खाद्य वस्तूंतील बदल

मराठी ग्रंथ संग्रहालय

हा महासिद्धांत पुढें करून चालू रूढीचें समर्थन करतात. या नव्या समर्थनप्रकाराचाही थोडा समाचार घेतला पाहिजे. आरोग्यरक्षणार्थ लंघन आवश्यक असेल तेव्हां तें करावें याबद्दल कोणाचेंच दुमत होण्याचें कारण नाहीं. तसेंच एकाच प्रकारचें अन्न नेहमीं खात गेल्यानें जर प्रकृतीस खरोखरच अपाय होत असेल तर अन्नांत बदल करणें हेंही इष्टच आहे. अर्थात् आरोग्यदृष्ट्या जेव्हां आवश्यक असेल तेव्हां लंघन किंवा आहारपालट यांचा प्रयोग करणें आवश्यक आहे हें कोणीही मान्य करील ! पण प्रश्न उपस्थित होतो तो हा कीं, व्रतांचें व उपवासांचें हेंच मूळ प्रयोजन आहे काय ? आणि या प्रश्नांचें स्पष्ट उत्तर 'नाहीं' असें आहे. व्रतें किंवा उपवास शास्त्रकारांनीं कां घालून दिलेले आहेत याचें जें वर विवेचन केलेलें आहे त्यावरून ही नव्या (?) उपपत्तीची साल जुन्या व्रतांच्या पिंपळाला चिकटविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे स्वतःचें गाढ अज्ञान प्रकट करणेंच होय हें कोणासही मान्य करावेंच लागेल ! रूढीनें अंध झालेले जुने लोक अंधश्रद्धेनें ग्रस्त होऊन खऱ्या व्रततत्त्वांकडे दुर्लक्ष करतात, तर हे नवे जी उपपत्ति सुचली तीच व्रतांच्या माथीं मारून मोकळे होतात. पण हे दोन्ही मार्ग सारखेच निंद्य आहेत. खऱ्या तत्त्वनिष्ठानें त्या त्या धार्मिक आचारांचें तत्त्व ठरवितांना प्राचीन इतिहास व परंपरा यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. असो. येथपर्यंत व्रतांचें तत्त्व पाहून झालें. तसेंच खाण्यापिण्याच्या विचारांस त्यांत महत्त्वाचें स्थान नाहीं हेंही पाहून झालें. आतां व्रतांतील मुख्य भागाकडे वळूं.

प्रत्येक व्रतांत विशिष्ट देवतेला उद्देशून, दान वगैरेंचे विधि सांगितलेले असतात. तेवढा विशिष्ट भाग सोडून सर्व व्रतांस सामान्य असाच आचार याठिकाणीं सांगावयाचा आहे. व्रताच्या दिवशीं शरीराची, वाणीची व मनाची प्रवृत्ति कशी असली पाहिजे हें गीतेंत तीन प्रकारच्या तपांचें वर्णन करतांना सांगितलेलें आहे. वर तप म्हणजेच

व्रत हें दाखविलेलेंच आहे. म्हणून तेंच वर्णन या ठिकाणीं उद्धृत करतों. हे नियम नेहमींच पाळण्याकरितां गीतेंत सांगितले आहेत. व्रताच्या दिवशीं तरी त्यांची पाळणूक मोठ्या कसोशीनें केली गेली पाहिजे.

'शारीर तप' कशास म्हणावें हें गीतेनें पुढील श्लोकांत दाखविलें आहेः—

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥

गीता १७.१४

या श्लोकावरून देव, द्विज, गुरु, बुद्धिमान् यांची पूजा करणें, शुद्धता, सरळपणा, ब्रह्मचर्य व अहिंसा यांचें अनुष्ठान करणें, या गोष्टींस शारीर तप म्हटलेलें आहे असें दिसून येतें. कोणत्याही व्रताच्या दिवशीं याप्रमाणें संयमपूर्वक अहिंसा, शुद्धता व निष्कपटपणा अंगीं बाणवून देवादिकांची पूजा किंवा सन्मान करण्यांत शरीर झिजवावें.

मना चंदनाचेपरी त्वां झिजावें।
परी अंतरीं सज्जनां नीववावें ॥

या वचनाचाही हाच अभिप्राय आहे. नुसते उपासतापास करून शरीरास कष्ट देण्यास रामदास सांगत नाहींत. ज्यायोगें सज्जनांस समाधान वाटेल अशा रीतीनें शरीर झिजविणेंच त्यांस पसंत आहे. व्रत ज्यास करावयाचें असेल त्यानें त्या दिवशीं देवकार्य किंवा दुसरें कोणतेंही सत्कार्य केलें पाहिजे हें यावरून सिद्ध होतें.

वाणीचें तप कोणतें हें गीतेंतच पुढील श्लोकांत सांगितलेलें आहे:—

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १७-१५

या श्लोकावरून पुष्कळच बोध घेण्यासारखा आहे. कांहींही न बोलतां

खुणेनें व्यवहार करावे असें यांत म्हटलेलें नाहीं. तर खरें, दुसऱ्याचें ठिकाणीं उद्वेग उत्पन्न न करणारें, सत्य व प्रिय असूनही हितकारक असें भाषण करणें व वेदादि वाङ्मयाचें वाचन करणें यास वाचिक तप असें म्हटलेलें आहे. म्हणून व्रताच्या दिवशीं याप्रमाणें वाणीनें भाषण केलें पाहिजे. तसेंच कांहीं तरी उच्च वाङ्मय वाचलें पाहिजे. वेद, उपनिषदें, गीता यांसारखे ग्रंथ समजतील तर वाचावे. किंवा दासबोध, ज्ञानेश्वरी, तुकारामाचे अभंग, गीतारहस्य यांसारखे मराठी ग्रंथ वाचावे. किंवा कोणतेंही तात्त्विक स्वरूपाचें आधुनिक पुस्तक वाचावें. परंतु गोष्टी, कादंबऱ्या, विनोदी लेख, तसेंच चटोर वाङ्मय त्या दिवशीं वाचूं नये. वाचनाचा कंटाळा आल्यास फिरावयास जाऊन देवदर्शन घ्यावें, किंवा निसर्गाचें शान्त व गंभीर स्वरूप अवलोकावें. कोणत्याही व्रताची जी उद्दिष्ट देवता असेल तिचें चरित्र त्या त्या दिवशीं वाचावें. एकादशीच्या दिवशीं भागवत, शिवरात्रीच्या दिवशीं शिवपुराण किंवा शिवलीलामृत, तसेंच रामायण, महाभारत यांसारखे ग्रंथ वाचावे. याप्रमाणें व्रताच्या दिवशीं वाङ्मयतप आचरावें.

मानसिक क्रिया कोणकोणत्या कराव्या हेंही लक्षांत बाळगण्याजोगें आहे. गीतेंत यासंबंधानें पुढील श्लोक आहेः—

**मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः।**
**भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते॥**

गीता १७.१६

या श्लोकावरून मन शांत, शुद्ध व प्रसन्न ठेवणें तसेंच वाणी व मन ताब्यांत ठेवणें या गोष्टींची आवश्यकता दिसून येते. अर्थात् व्रताच्या दिवशीं नाटकें, सिनेमा ( विकारोद्दीपक ) पाहाणें हें गर्ह्य आहे. मन ताब्यांत ठेवणें याचा अर्थ तें गर्ह्य विषयांकडे जाऊं न देणें असा आहे. करितां व्रताच्या दिवशीं जलशास जाणें योग्य नव्हे.

कित्येक उपवासाचे दिवशीं रात्रिजागर म्हणून निरनिराळे खेळ

( सोंगट्या, पत्ते वगैरे ) खेळतात; मधूनमधून उत्साह प्राप्त व्हावा म्हणून चहाकॉफी झोंकतात. पण हें तत्त्वविरुद्ध आहे. चांगल्या करमणुकीनें ( भजन, कीर्तन, पुराणश्रवण, व्याख्यान ) जेवढा वेळ जागरण होईल तेवढा वेळ करावें. न होईल तर सरळ झोंपावें. उगाच पेंगत पेंगत व चहासारखे व्यसनी पदार्थ झोंकीत केलेलें जागरण तमोगुणवर्धक असल्यामुळें त्याज्य मानलें पाहिजे. मंगळागौर व हरितालिका जागवितांना ( ? ) आमच्या आर्यमहिला हे प्रकार करितात. त्यांनीं या गोष्टींचा विचार करावा. जुन्या बायकांप्रमाणें पाठांतर असेल तर ओंव्या व पदें म्हणून सहज वेळ घालवितां येईल ! व्रतें म्हणजे सण नव्हत हें लक्षांत घेऊन कोणत्याही सबबीवर व्रतास उत्सवाचें रूप आणूं नये. चार बायका किंवा पुरुष आपल्या घरीं चैनीखातर जमावे अशी इच्छा असेल तर दिवाळी, दसरा, संक्रांत यांसारख्या सणांच्या दिवशीं त्यांस बोलावून आनंदानें खेळ खेळावे. व्रतें आचरणें जसा धर्म आहे त्याचप्रमाणें सण साजरे करणेंही धर्मच आहे. मात्र दोहोंचा गडबडगुंडा करून टाकणें उचित नव्हे. व्रतांच्या दिवशीं संयमप्रधान वर्तणूक पाहिजे तर सणांमध्यें संग्रहप्रधान ती असली पाहिजे, हा फरक प्रत्येकानें लक्षांत घ्यावा. व्रतांच्या दिवशीं रात्रिजागराचे बाबतींत सध्यां तरी फरक होणें आवश्यक आहे असें वाटतें. आसुरी पद्धतीनें केलेलें जागरण पुढें कित्येक दिवस भोंवतें; याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. त्यापेक्षां १२॥ ते ४॥ पर्यंत झोंप ( देवतेसंनिध साध्या आंथरुणावर ) घेणेंच श्रेयस्कर होय. झोंप येत नसली तरी आडवें पडून चिंतन किंवा जप करावा. तसेंच उठल्याबरोबर भूपाळ्या वगैरे म्हणाव्या. या प्रकारानें तमोगुण न वाढून एका दिवसाच्या व्रताचा आठवडाभर दुष्परिणाम भोगण्याची पाळी येणार नाहीं. असो.

कोणतीं व्रतें करावीं व प्रत्येक व्रताचें स्वरूप आतां काय ठेवावें हें येथें सांगावयास पाहिजे होतें. पण तो ज्याच्या त्याच्या आवडीचा व सवडीचा

विषय आहे. म्हणून जास्तींत जास्त झेपतील तितकीं व्रतें करावीं असें सांगून प्रत्येक हिंदूनें कमींत कमी व्रतें कोणतीं करावीं तेवढेंच सांगतों. आषाढी, कार्तिकी या प्रसिद्ध एकादशा, ऋषिपंचमी व महाशिवरात्र हीं चार व्रतें प्रत्येक हिंदूनें करावीं. या चारी दिवशीं आहाराचे बाबतींत प्रकृतीस मानवेल त्याप्रमाणें निराहार, नुसतें दूध किंवा दूधभात * किंवा दूधकेळीं यांचें सेवन करावें. तोंडाचे चोजले पुरविणारे कोणतेही पदार्थ खाऊं नयेत. फक्त दोनदांच खावें. दिवसभर चरूं नये. चहा, कॉफी—कितीहि आवडती असली तरी—सोडून द्यावी. जे पदार्थ व्यसनांत जमा आहेत अशा कोणत्याही पदार्थाचें सेवन त्या दिवशीं करूं नये. अर्थात् धूम्रपानास या दिवशीं रजा दिलीच पाहिजे. वरील चार दिवसांखेरीज इतर दिवशीं कोणास व्रतें करावयाचीं असतील तर हरकत नाहीं; पण वरील नियम तंतोतंत पाळले पाहिजेत. फक्त जेवायचें नाहीं. पण चहा, चिरूट प्यायचे, दिवसभर फराळाच्या नांवावर चरत असावयाचें ही धर्मबाजी आहे. तिच्यांत कांहीं अर्थ नाहीं.

---

* वरील तत्त्व ज्यांस मान्य असेल त्यांस हा दूधभात जड जाणार नाहीं. तथापि वचनैकशरणांना तो धार्मिक भावना दुखविणारा वाटेल. तरी त्यांनीं

चरुभैक्ष्यं सक्तकणाः शाकं दधि घृतं पयः ।
श्यामाक–शालि–नविारा यावकं मूलतण्डुलम् ॥
हविष्यम् व्रतनक्तादावग्निकार्यादिके हितम् ॥ अग्नि. १७५ ॥

यांसारखीं व शिवाय निर्णयसिंधूंतही कित्येक ठिकाणीं याच प्रकारचीं वचनें आहेत. त्यांचा अर्थ पहावा म्हणजे खरा प्रकार कळून येईल ! संस्कृत न येणाऱ्या शंकितांनीं निर्णयसिंधु या ग्रंथाच्या भिषग्वर्य वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री नवरे यांच्या भाषांतरासह निर्णयसागरनें छापलेल्या प्रतीच्या द्वितिय आवृत्तींतील निदान १०६ पृष्ठ पाहावें. यापुढें जेथें जेथें निर्णयसिंधूतील पृष्ठांक या ग्रंथांत दिलेले आहेत ते सर्व याच प्रतींतील आहेत असें समजावे.

घरांतील मुलांस व आजाऱ्यांसही आम्हीं वर दिलेला भोजनाचा प्रकार हितावह होईल. उगाच दोन सैंपाक करण्याचा त्रासही पडणार नाहीं. तसेंच आपल्याला वगळून आपले बाबा कांहीं निराळें खात आहेत याचें वैषम्यही मुलांस वाटणार नाहीं. मुंजीच्या पूर्वीं मुलांस उपवास किंवा व्रतें करूं देऊं नयेत. नंतर याप्रमाणें सात्त्विक आहारावर करूं द्यावीं.

मुलांप्रमाणेंच स्त्रियांनाही उपवास करूं देऊं नयेत. जुन्या ग्रंथांत ' नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषणम् ' अशा कित्येक वचनांत पत्नीनें पतीच्या उपवासाहून वेगळा उपास करूं नये असें स्पष्ट म्हटलें आहे. ' पति जिवंत असतां जी स्त्री उपाशी राहून व्रताचरण करते ती पतीचें आयुष्य हरण करते ' असें दुसरें †विष्णुवचनहि स्पष्ट आहे. अर्थात् ज्या कित्येक विवाहित महिला अविचारानें उपासतापास करून पति व मुलें यांची हयगय करितात तें सर्वथा शास्त्रविरुद्ध आहे. जुन्या निबंधकारांनीं या वचनांचा समन्वय करून ' भर्त्याच्या अनुमतीशिवाय स्त्रियांनीं उपवास करूं नये ' असा निष्कर्ष काढला आहे. तो लक्षांत घेऊन जर कोणत्याही प्रकारें पत्नीच्या उपवासामुळें तिच्या प्रकृतींत किंवा कुटुंबाच्या स्वास्थ्यांत बिघाड होणार असेल तर पतीनें अशा उपवासांचा निक्षून विरोध करावा. धर्माची या बाबतींत मुळींच आडकाठी नाहीं. अर्थात् स्त्रियांविषयींचा हा अपवाद फक्त भक्षणापुरताच आहे. बाकीचे व्रताचे नियम त्यांनींहि पाळलेच पाहिजेत हेंही लक्षांत ठेवावें.

असो. वर्षांत अखिल हिंदूंकरितां चार व्रतें कोणतीं असावीं हें मागें सांगितलेंच आहे. एका वर्षांत व्रतांची चार ही संख्या इतकी माफक

† पत्यौ जीवति या नारी उपोष्य व्रतमाचरेत् ।
आयुष्यं हरते भर्तुर्नरकं चैव गच्छति ॥ निर्णयसिंधु पृ. ४५.

आहे कीं, त्यांचा त्रास कोणासही जाणवणार नाहीं. अर्थात् नव्या पिढीनेंही हे चार दिवस धर्मदाक्षिण्य म्हणून अवश्य पाळावे. एवढ्यानेंही जुन्या वळणाच्या लोकांचें समाधान होऊन ‘ नवी पिढी व्यसनें व इंद्रियें यांच्या तंत्रानें वागणारी नसून खरी स्वतंत्र आहे ’ हें विचारी लोकांच्या प्रत्ययास येईल!

वरील चार व्रतांपैकीं पहिलीं दोन विष्णूचीं व चौथें शंकराचें व्रत आहे हें प्रसिद्धच आहे. तिसऱ्या ऋषिपंचमीव्रताचें औचित्य मात्र लवकर लक्षांत येणार नाहीं; म्हणून त्याबद्दल थोडें विवेचन केलें पाहिजे. रजस्वलेच्या दोषनिवृत्तीकरितां हें व्रत आहे असें पुराणांचें मत दिसतें. एका कहाणीवरून पतीनेंच तें पाळलें पाहिजे असें दिसतें. ही कहाणींतील कथा भविष्योत्तर पुराणावरून घेतलेली आहे. तेव्हां ऋषिपंचमी ही केवळ स्त्रियांकरितां नसून पुरुषांकरितांही आहे. नव्या हिंदूंनीं आतां प्राचीन ऋषींचा स्मृतिदिन म्हणून हा दिवस पाळावा! * त्यांची भक्तिभावानें प्रार्थना करावी व चरित्र श्रवण करावें. अशा नव्या तऱ्हेनें हा दिवस पाळण्याचा प्रघात पाडावा! ऋषींचें अन्न-न नांगरतां उत्पन्न झालेलें धान्य वगैरे-आतां दुर्मिळ असल्यामुळें सात्त्विक व साधा आहार करूनच या दिवशीं रहावें. ठाकुरद्वारी-ऋषींच्या मीठवऱ्यांवर व भाज्यांवर उगाच भोळसटपणाचा आव आणून ताव मारूं नये.

वरील चार व्रतें प्रत्येक हिंदूनें पाळावीं. त्या त्या दिवशीं कार्यक्रम

---

* रजस्वलेच्या स्पर्शामुळें उत्पन्न होणाऱ्या दोषाची निवृत्ति व्हावी म्हणून पुराणांत हें व्रत सांगितलेलें आहे. पण त्यापेक्षां निराळयाच ध्येयानें या व्रताचें आचरण होणें युक्त आहे. या व्रताचें अभिनव स्वरूप कसें असावें याची थोडीशी कल्पना ‘ आर्यांच्या सणांचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास ’ या पुस्तकांत ( पृ. २७९ ) दिलेली आहे. ती वाचकांनीं अवश्य पहावी.

कोणते करावयाचे हें एकंदर नागरिकांच्या विचारानें व पूर्वोक्त नियमांस बाध न येईल अशा प्रकारें ठरवावें.

आतां प्रसंगानें सत्यनारायणव्रताविषयीं लिहितों. कारण आजकाल पुण्यामुंबईत त्याचा फारच प्रसार झालेला आहे. एका अर्थी हें स्तुत्य आहे; पण खऱ्या-खोट्या नवसांच्या पूर्तीकरितांहि व्रत हें आचरलें जातें, हें धार्मिक दृष्ट्या अभिनंदनीय नाहीं. व्रतांतील कथेकडे पाहिलें तरी 'पतिप्रेमामुळें प्रसाद विसरणाऱ्या स्त्रीसही जबर प्रायश्चित्त भोगावें लागलें' असलें गृहस्थाश्रमाची बदनामी करणारें कथानकही त्यांत आहे. असे कांहीं दोष या व्रतांत दिसून येतात. तथापि मजूर-वर्गांत या उत्सव-प्रधान व्रताचा फारच प्रसार झालेला आहे हेंहि दृष्टीआड करून चालणार नाहीं. पांढरपेशांत आज या व्रतासारखें सुटसुटीत व्रत दुसरें रूढ नाहीं हें लक्षांत घेतलें, तर ऐच्छिक म्हणून या उत्सवप्रधान व्रतास मान्यता दिली जावी हेंच योग्य दिसतें. त्यांतील मोळीविक्याची कथा आजच्या युगांतही उद्बोधक वाटेलच ! त्याहूनही राजानें गवळ्यांच्या प्रसादाचा अव्हेर केला म्हणून त्याचें राज्य नष्ट झालें ही कथा आजच्या समतायुगांत अधिक उद्बोधक वाटल्यावांचून राहणार नाहीं. केवळ याच कथा नेहमीं सांगण्याचा परिपाठ न ठेवतां इतरही भीष्मादि सत्यप्रतिज्ञांच्या कथा सांगण्याचा प्रघात पाडावा. तसेंच हें पुराण पूजेच्या घाईत न उरकतां रात्रीं स्वतंत्र-पणें ठेवावें. अशा सुधारणा करून हें व्रतही ऐच्छिक म्हणून चालू ठेवण्यास हरकत नाहीं.

येथें एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवली पाहिजे, ती म्हणजे नवसांची ! विशिष्ट कामनेकरितां अगोदर नवस करून ती पूर्ण होतांच नवस फेडा-वयाचा, अशी प्रथा सर्वत्र दिसून येते. तसेंच पुत्र प्राप्त व्हावा, पति दीर्घायुषी व्हावा म्हणूनही कित्येक व्रतें आचरलीं जातात. पण हें बरो-बर नाहीं. वर जें व्रतांचें संयम हें ध्येय सांगितलेलें आहे त्याकरितां

व्रताचरण करणें हाच खरा धर्म होय ! कोणत्याही लौकिक फळाकरतां नवससायासानें व्रताचरण करणें युक्त नव्हे. कारण हीं फळें योग्य प्रकारें बाह्य खटपट केल्यानेंच मिळत असतात.

**नवसें कन्या-पुत्र होती ।**
**तरि कां करणें लागे पति ॥**

हें तुकाराम महाराजांचें वचन या दृष्टीनें फारच महत्त्वाचें आहे. म्हणून असल्या क्षुद्र भोळेपणाच्या उद्देशांनीं व्रताचरण करूं नये.

संस्थेस सरळ मदत मिळेनाशी झाली म्हणजे नाटक कंपनीचा खेळ विकत घेण्याची पाळी येते; त्याचप्रमाणें मूळ संयमार्थ जेव्हां लोक व्रताचरण करीनासे झाले तेव्हांच हीं काम्य व्रतें पुढें आलीं. अर्थात् अशा प्रकारच्या व्रताचरणांचा धर्माच्या तात्त्विक प्रणालींत समावेश नाहीं हें ध्यानांत घेतलें पाहिजे.

असो. उपवास, तप व व्रत यांचा परस्परसंबंध दाखवून तत्त्वविवेचनपूर्वक त्याचें महत्त्वही वर्णन केलें. आवश्यक व्रतांची संख्याही दाखविली. आतां तपाचें ( अर्थात् पर्यायानें व्रतांचें ) महत्त्व वर्णन करणारीं थोडीं वचनें देऊन या विषयाची रजा घेऊं.

**उपभोगांश्च तपसा ( लभेत )** म. भा. १३।७।१४

' तप केल्यानें उपभोग मिळतात.' खरी चैन उपभोगण्याच्या दृष्टीनेंही संयमरूपी तप कसें आवश्यक आहे हें थोडा विचार केल्यानेंही कळून येण्यासारखें आहे.

**नाप्राप्यं तपसः किंचित् ।** म. भा. १२।२९५।२३

' तपानें अप्राप्य असें कांहींच नाहीं ' इंद्रियसंयमपूर्वक प्रयत्न केल्यास कोणतीही गोष्ट साध्य होते.

**' तज्जायः सर्व-धर्मेभ्यः स धर्मः पर उच्यते '**

' तें ( तप ) सर्व धर्मांहून श्रेष्ठ ( असन ) तप हाच श्रेष्ठ प्रकारचा

धर्म होय. ' व्रतांचें महत्त्व हल्लींही व्यवहारांत कायम आहे. पण त्याचें तप हें स्वरूप राहिलेलें नसल्यामुळें व्रतें सवंग झालेलीं आहेत व म्हणूनच त्यांची किंमत कमी झालेली आहे.

**तपो हि बलवत्तरम् ।** म. भा. १३।१२२।८

' तप हें अत्यंत बलवान् आहे. '

निरनिराळ्या व्रतांच्या रूपानें या सर्वश्रेष्ठ तपाचें आचरण जर हिंदूंकडून होत जाईल तर हिंदु बलवान् झाल्याखेरीज राहणार नाहींत. आपल्यामध्यें खरी तपश्चर्या कमी झालेली आहे. दुसऱ्याकरितां थोडीही झीज सोसण्यास आपण तयार नाहीं. एवढ्या तेवढ्या कारणांवरून आपल्यामध्यें तेढ वाढते. दुसऱ्यांच्या कृतींचा सहानुभूतीनें विचारच आपण करीत नाहीं. याचें खरें कारण ' मनःप्रसादः ' ' सौम्यत्वम् ' वगैरे दैवीगुण आपल्यामध्यें नाहींत, हेंच होय. व्रतांच्या आचरणानें ते आपणामध्यें आल्यास आपल्यांतील फाटाफूट लयास जाऊन आपलें सांघिक व मानसिक बळ वाढल्यावांचून राहणार नाहीं.

मराठी
ठाणे.

## प्रकरण अकरावें

# मृत्यूनंतर

जिवंतपणीं आचरण्याचे जे कित्येक धार्मिक विधि आज आपल्या समाजांत रूढ आहेत त्यांचा येथपर्यंत विचार केला. आतां आज रूढ असलेल्या मृतासंबंधींच्या आचारविचारांचा परामर्श घेऊं. मृत शरीराची व्यवस्था करणें, त्यासंबंधाचें सुतक पाळणें व मृतव्यक्तीस उद्देशून श्राद्ध करणें, अशा तीन विषयांचा या मृत्यूसंबंधानें विचार केला पाहिजे. म्हणून या तिन्ही विषयांचा आतां क्रमाक्रमानें विचार करूं. मृतशरीराच्या व्यवस्थेसंबंधानें अखिल हिंदूंमध्यें एकच एक नियम नाहीं. बऱ्याचशा जातींत जाळण्याचा प्रकार असला तरी पुरण्याची चालही अगदींच नाहीं असें नाहीं. स्मशानभूमीपर्यंत प्रेत नेतांना तें तिरडीवर बांधून नेण्याची पद्धत मात्र सार्वत्रिक दिसून येते. ब्राह्मणेतरांत प्रेत नेतांना तें भजन करीत नेण्याची चाल आहे. पुण्यांतील ' राम बोलो ' हें त्याचेंच विकृत स्वरूप आहे. ब्राह्मणांत मात्र जवळजवळ मुक्यानेंच प्रेत नेण्याची पद्धत आहे. अशा प्रकारें किरकोळ चाली पुष्कळच आहेत. त्यांतील कित्येक महत्त्वाच्या बाबींचाच विचार येथें करावयाचा आहे. अर्थात् ज्या कित्येक आचारांमुळें फारसें नफानुकसान होत नाहीं त्यांबद्दल येथें विवेचन करून विस्तार करण्याचें कारण नाहीं.

हा सर्व विचार करावयाचा तर प्रथम मृत्यु म्हणजे काय हा प्रश्न विचारांत घेतला पाहिजे. या प्रश्नाचें आर्यशास्त्रकारांचें उत्तर अगदीं निश्चित आहे. मृत्यु म्हणजे जीवाचा आत्यन्तिक नाश नव्हे, तर फक्त हा देह सोडून दुसरीकडे जाणेंच होय. ' ज्याप्रमाणें जुनें कपडे टाकून

आपण नवे कपडे घेतों त्याचप्रमाणें पहिलें शरीर टाकून दुसरें शरीर जीवात्मा घेत असतो ' ( गीता. २.२२ ) हें गीतेंतील रूपक फारच मार्मिक आहे. या श्लोकांतच नव्हे तर याच्या मागें व पुढें जे श्लोक गीतेंत आहेत, त्यांत जीव हा शरीराहून भिन्न आहे हें तत्त्व अगदीं स्पष्टपणें प्रतिपादिलेलें आहे. मृत्यूमळें जर कांहीं होत असेल तर हें विद्यमान शरीरच फक्त सोडावें लागतें. त्या शरीराचा मालक नष्ट होत नाहीं; तो नित्यच आहे. अर्थात् कोणताही प्राणी मेला तर त्याबद्दल शोक करण्याचें कारण नाहीं. ( गीता २.३० ) हा भगवंतांनीं निश्चयानें सांगितलेला उपदेश प्रत्येक हिंदूस आज अत्यंत मार्गदर्शक वाटेल यांत शंका नाहीं. कारण त्यामुळेंच हिंदूंस खरी निर्भयता उत्पन्न होऊन हिंदूंतील भित्रेपणा नाहींसा होईल.

शरीर म्हणजे देह; आत्मा नव्हे ! अर्थात् एकदां नष्ट झालेलें शरीर पुन्हां केव्हांही जिवंत होणें शक्य नसल्यामुळें मेलेल्या शरीरास जपणें हें आर्यधर्मसंमत होऊंच शकणार नाहीं. मुसलमान, ख्रिश्चन् वगैरे इतर धर्मांत जी प्रेतें पुरण्याची चाल आहे ती अत्यंत गैरसोयीची व अतात्त्विक आहे. कारण त्यांस हळूहळू स्मशानभूमि वाढवावी लागते. याच्या उलट हिंदूंना थोडी जागा पुरूं शकते. आरोग्यदृष्ट्याही पुरण्यापेक्षां जाळणेंच अधिक श्रेयस्कर आहे हें आधुनिक शास्त्रज्ञांनींही मान्यच केलेलें आहे. अर्थात् हिंदूंची दहनपद्धतिच श्रेष्ठ होय !

इतर धर्मांतील पुरण्याची पद्धत न्यायदिनाच्या ( The day of judgment ) आशेवर रूढ झालेली आहे. त्या दिवशीं देव पापपुण्याचा निवाडा करण्याकरितां भूतलावर उतरेल, व सदर वेळीं हीं थडग्यांतून झोंपीं गेलेलीं शरीरें उठून त्यापुढें उभीं राहतील, असें त्यांच्या धर्मग्रंथांत लिहिलेलें असल्यामुळेंच त्या काळापर्यंत शाबूत रहावें म्हणून

त्या धर्मातील लोक शरीर सुरक्षित ठेवण्याची एवढी काळजी घेतात. पण शरीर नश्वर असल्यामुळें हा आचार बरोबर नाहीं.

हिंदूंत बहुसंख्याक वर्गांत प्रेतदहनाची जी चाल आहे ती मात्र मूळ तत्त्वांस धरूनच आहे. सामान्य जनसमुदायापेक्षां निराळ्या तऱ्हेचा उच्च आयुष्यक्रम ज्यानें आचरून दाखविला त्याच्या देहाबद्दल शिष्यांत आदर उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. आणि केवळ याच भावनेमुळें अशा श्रेष्ठ व्यक्तींची समाधि बांधण्याचा प्रचार पडला असावा. अर्थात् अशा व्यक्ति विरळाच असणार. म्हणून त्या आचारास विरोध करण्याचें कारण नाहीं. तसेंच लहान मुलें पुरण्याचें कारणही याचप्रमाणें भावना किंवा सोय यांवर अवलंबून असावें. अर्थात् असले किरकोळ अपवाद उपेक्षणीय ठरवून सरसहा हिंदूंमध्यें प्रेतदहनाचाच सामान्य नियम प्रचारांत रहावा हें उचित दिसतें.

हिंदूंची दहनाची पद्धत फारच तात्त्विक व इतरांसही अनुकरणीय आहे हें जितकें खरें तितकेंच स्मशानभूमीच्या व्यवस्थेच्या बाबतींत हिंदुबांधवांसही इतर धर्मीयांचें अनुकरण करणें आवश्यक आहे, हेंही कबूल केलें पाहिजे. या दृष्टीनें रात्रीं अपरात्रीं तसेंच भर पावसांतही प्रेत दहन करणारांस ज्या कित्येक अडचणी येतात, त्या निवारण होतील अशा प्रकारची योजना ग्रामस्थांनीं व नगरवासीयांनीं केली पाहिजे. कित्येक शहरांतून या प्रकारच्या व्यवस्था सुरू आहेत. पण अद्याप या विषयाकडे लक्ष न पुरविलेलीं शहरें पुष्कळच आहेत. त्यांनीं ही गोष्ट लक्षांत घ्यावी म्हणून येथें मुद्दाम या गोष्टीचा उल्लेख केला आहे. स्मशानांत व्यवस्था कोणत्या असाव्या याचें तपशीलवार विवेचन करण्याचें कारण नाहीं. प्रत्येक शहरांत व गांवांत प्रेतवाहनाचें काम स्वयंस्फूर्तीनें व उत्साहानें करणाऱ्या लोकांस त्याची पूर्ण जाणीव असतेच !

प्रेतवाहन कोणीं करावें, या प्रश्नाचें आज विशेष महत्त्व आहे. पूर्वीं बहुधा कुटुंबांतच मृत्यूचा प्रसंग येत होता, तसेंच खेडेगांवांत वस्तीही पुष्कळ असे, यामुळें व ठराविक शिष्टाचारांच्या बंधनामुळें हा प्रश्न उपस्थितच होत नसे. कोणाच्याही घरीं असा दुःखद प्रसंग घडला तर शेजारचे आप्तेष्ट जमून त्यास मदत करणें हें आपलें कर्तव्य समजत असत. पण आतां परिस्थिति बदलली आहे. जीवनकलहाच्या निमित्तानें कुटुम्ब सोडून अन्यत्र वास करावा लागतो. तेथें प्रत्येकास नातलग कोठून मिळणार ? बरें, यदाकदाचित् जवळ बायकामुलें असलीं तरी तीं प्रसंगांत असल्यामुळें दुःखभार संभाळून हें काम करण्यास असमर्थ असतात. अर्थात् प्रेतवाहनाकरितां नातलगच पाहिजेत असें मानून अंगचोरपणा करणें आतां समर्थनीय ठरणार नाहीं.

मृत्यूच्या बाबतींतील आर्यांचें उच्च तत्त्वज्ञान वर दाखविलेंच आहे. त्याप्रमाणें पाहिल्यास मृतशरीराबद्दल आपणांस वास्तविक कोणतेंच भय वाटावयास नको. पण दुःखाची गोष्ट अशी कीं, मृतशरीराच्या बाबतींत सध्या जे आपणामध्यें आचार दिसून येतात ते अगदीं याच्या उलट आहेत. एखाद्या कुटुंबांत मृत्यु होतांच आपोआप शेजाऱ्यांनीं येऊन मदत करणें तर दूरच पण बोलाविल्यावरही कांहींतरी सबबीवर तें टाळण्याची अक्षम्य चूक कित्येक बांधवांकडून होत असते. मृत्यूची ओरड शेजारीं ऐकूं येतांच बेपर्वाईनें दारास कुलूप ठोकून चालते होणारे वीर (?) कित्येक ठिकाणीं दिसून येतात. अशा स्थितींत कोणीं अडथळा केलाच तर कोणी आईबाप जिवंत असल्याची तर कोणी पत्नि गर्भवती असल्याची सबब सांगून आपल्या कृत्याचें समर्थन धर्मशास्त्राच्या आधारानें करूं पाहतात. पण धर्मशास्त्राकडे एरवीं ढुंकूनही न पाहाणारे हे लोक याचवेळीं कसे धर्ममार्तंड बनतात याचें आश्चर्य वाटतें. खरोखर या लोकांनीं धर्मशास्त्राचा एकही ग्रंथ पाहि-

लेला नसतो. कारण हे नियम धर्मशास्त्रांत दिलेलेच नाहींत.* केवळ स्वतःची बेपरवाई व भ्याडपणा लपविण्याकरितांच या सबबी पुढें केल्या जातात. तरी यापुढें असल्या सबबी पुढें करून प्राप्त कर्तव्य टाळूं नये.

कित्येक वेळां अंगचुकार शिष्ट अशा प्रसंगीं हें काम निष्ठेनें करणाऱ्या एखाद्या इसमाचें नांव पुढें करून मोकळे होतात. पण हें युक्त नव्हे. असा मनुष्य असलें काम उत्साहानें करण्यास नेहमींच तयार असतो. हा त्याचा चांगुलपणा अनुकरणीय आहे हें लक्षांत घेऊन प्रत्येकानें त्याच्यावर पाळी न येईल असें करणें आवश्यक आहे. तसें न करतां कांहींशा हेटाळणीनें वरील उत्तर देणें माणुसकीस सोडून आहे. याप्रमाणें विचार केल्यास अशा प्रसंगीं कोणतीही पोचट सबब पुढें न करतां दुःखी कुटुंबास योग्य ती मदत देण्याची जबाबदारी प्रत्येक हिंदूनें स्वीकारली पाहिजे, हें प्रत्येक समंजस मनुष्यास कळून येईल!

हिंदूंच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें देह हा केवळ कपड्याप्रमाणें असला तरी आजन्म त्याच्याशीं संबंध येत असल्यामुळें तसेंच त्याच्याच द्वारानें सर्व व्यवहार होत असल्यामुळें त्याची इतर पदार्थांपेक्षां कांहीं निराळ्या प्रकारानें विल्हेवाट करणें औचित्यास धरून आहे. अर्थात् प्रेतास कांहीं

---

* मृताच्या क्रियांचे ' पूर्वाः क्रिया मध्यमाश्च तथा चैवोत्तराः क्रियाः ' असे तीन प्रकार सांगून त्यांपैकीं पहिली जी पूर्वा–क्रिया तिचें लक्षण–

' आदाहाद्द्वादशाहाच्च मध्येयास्तुः क्रिया नृप ।
ताः पूर्वाः.........'

असें विष्णुपुराणांत सांगितलें आहे. त्यांत प्रेतदाहापासूनच्या क्रियांचा समावेश होतो. अर्थात् अगदीं जुन्या धर्मशास्त्रावर बोट ठेवून वागावयाचें म्हटलें तरी साक्षात् प्रेतास अग्नि देण्यापूर्वींच्या--सामानाची जमवाजमव करणें, तिरडी बांधणें, खांदा देणें, सरण रचणें एथपर्यंतच्या--क्रिया करण्यास कोणासही आडकाठी नाहीं हें स्पष्ट होतें.

संस्कार करून त्यास अग्नि देणें यांत कांहींच वाईट नाहीं. तथापि या संस्कारांत कित्येक उद्वेगजनकही प्रकार आहेत. त्यांत शक्यतर * सुधारणा करणें आवश्यक आहे. या दृष्टीनें प्रेतयात्रा इतरांस भयानक न वाटेल अशा पद्धतीनें तिची व्यवस्था ठेवणेंच योग्य होईल. तसेंच प्रेत श्रृंगारतांना भेसूरपणा न येईल याकडे लक्ष दिलें पाहिजे. तसेंच 'रामबोलो'ची भेसूर आरोळी मारणेंही योग्य नाहीं. नीट तारतम्यानें विचार केला तर या सुधारणांचें आकलन सहज होण्यासारखें आहे. प्रेतवाहन खांद्यावरून करणें कठिण जातें म्हणून प्रेतवाहनास सोईची पडेल अशी गाडी प्रचारांत येईल तर तें अधिक बरें होईल ! जिवंतपणीं लोकांच्या खांद्यावरून जाण्यापेक्षां गाडींत बसून जाणेंच जर बरें वाटतें व दिसतें तर मेल्यावरच तें अपमानकारक वाटण्याचें कारण नाहीं.

सपत्नीक पुरुषाचा मृत्यु झाला तर जो आजपर्यंत गोंधळ उडत असे तो आतां केशवपनाची चाल मागें पडल्यामुळें बराच थांबला आहे, यांत शंका नाहीं. तथापि त्याचा एक अवशेष अजूनही शिल्लक आहेच. मृताच्या पत्नीचें सौभाग्यचिन्ह जें मंगळसूत्र तें बरोबर घेतल्याखेरीज प्रेतयात्रा सुरू न करण्याचा प्रघात कित्येक ठिकाणीं दिसून येतो. पण स्त्रियांचें समाजांतील स्थान आतां बदललेलें असल्यामुळें हा प्रकार यापुढें बंदच केला पाहिजे. आधीं मंगळसूत्रासच शास्त्राधार नाहीं असें कित्येकांच म्हणणें आहे. तेव्हां असल्या दुःखद प्रसंगीं नसता कठोरपणा स्वीकारून मृताच्या पत्नीजवळ मंगळसूत्र मागणें किंवा तिनें तें देणें या

---

* हा शब्द मुद्दामच घातलेला आहे. या सुधारणांबद्दल त्यावेळीं वाद करणें इष्ट नाहीं. तसेंच या सुधारणा पसंत असतील तरच प्रेतयात्रेस येऊं अशी पैजहोडहि घालण्याचें कारण नाहीं. तात्पर्य, या सुधारणांचा सामोपचारानें अंगीकार होईल असा प्रयत्न झाल्यास करावा.

गोष्टीची कांहींही जरूरी नाहीं. उलट एका प्रसिद्ध महाराष्ट्रीय सनातनी पुढाऱ्यानें मार्मिकपणा दाखवून ' पतिनिधनोत्तर पत्नीनें त्याच्या प्रेमाची खूण म्हणून मंगळसूत्र बाळगावें व जन्मप्राप्त कुंकूही पुसून टाकू नये. ' असे जे नियम सांगितले आहेत त्यांचाच सर्वांनीं प्रचार करावा हें अधिक इष्ट आहे. असो.

या प्रकरणाचे आरंभीं जे तीन विषय सूचित केलेले आहेत त्यांपैकीं एक येथें संपला. साक्षात् अन्त्यविधि कसा करावा ही गोष्ट ज्याच्या त्याच्या इच्छेची व भावनेची आहे. कर्त्याची मृतासंबंधीं ज्याप्रकारची भावना असेल त्याप्रमाणें तो वागेलच ! अर्थात् यांत सामान्य नियम घालण्याचें कारण नाहीं. व इतरांनींहि या विषयांत बारकाईनें लक्ष घालून ' त्यानें अमुक केलें नाहीं ' ' तमुक केलें नाहीं ' असली कुत्सित चिकित्सा करूं नये. साक्षात् प्रेतस्पर्श ज्यांस झाला असेल त्यांनीं स्वच्छता व आरोग्य या दृष्टीनें सचैल स्नान करणें जरूर आहे हें सांगावयास नकोच ! याप्रमाणें मृतशरीराच्या व्यवस्थेबद्दलचा विचार झाल्यावर आतां अशौच किंवा सुतक या विषयाकडे वळूं.

प्रेतसंस्काराचा कुटुंबाबाहेरील व्यक्तींशीं संबंध असतो. तसा सुतकाचा नाहीं असें अपाततः वाटेल; पण हल्लीं याचाही परिणाम केव्हां केव्हां व्यापक स्वरूपाचा दिसून येतो. शहरवस्तींत असे कित्येक व्यवसाय असतात कीं १०-१० दिवस त्यांची रजा घेणें शक्य नसतें. तसेंच या दहा दिवसांत दुसऱ्याकडे जाण्याचे प्रसंग पडतात. यावेळीं सुतक्याचा सत्कार नेहमींप्रमाणेंच करण्याचा शिष्टाचार पडत चाललेला कोठें कोठें दिसून येतो. सुतकी इसमाकडे अनेकांस कारणपरत्वें जावेंच लागतें. वकील, डॉक्टर वगैरेंचे धंदे त्यांच्या इच्छेवर अवलंबून नसल्यामुळें ते दहा दहा दिवस अकस्मात् बंद ठेवणें शक्य नसतें.

या अडचणी आजच उत्पन्न झाल्या आहेत असें नाहीं. पूर्वींही या बाबतींतील रूढींची नड भासत असेच ! एका गांवांतील मृताचा

गोतावळा पंचक्रोशींत पसरलेला असला म्हणजे तर विचारावयासच नको. पण एका गांवांत प्रायशः एकाच वंशांतील लोकांची वस्ती असे खेडेगांव अनेक आहेत. त्यांत एक मृत्यु होतांच सर्व गांव सुतकी होत असतो. बाहेरील पाहुण्यास गांवांत पाणी मिळण्याची मारामार तेथें जेवणाची सोय कोठून ? सर्व गांव स्वयंपाकाच्या दृष्टीनें मुलांमुलींच्या व माहेरवासिनींच्या हातांत ! त्या अल्पसंख्याकांवर व अजाणांवर सर्व गांवांतील उठाठेवी करण्याचा प्रसंग सारखा पडत गेल्यामुळें बिचारीं मेटाकुटीस यायचीं. शिवाय एक सुतक संपतांच दुसरें असेंही फार चालतें. तेव्हां हा आचार आजच नव्हे तर पूर्वीपासूनच जनतेस नडत आलेला आहे यांत शंकाच नाहीं.

लग्नमुंजींचे मुहूर्त ठरवितांना तर या प्रकारानें ज्या अडचणी उपस्थित होतात त्यांचा प्रतिकार करणें अशक्यच आहे. विशेषतः लग्नाचे वेळीं याचा प्रत्यय फार येतो. दोन्हीकडील गोतावळ्यांत सुतक–सोहेर नाहीं याची खात्री करून घ्यावी लागते. तशी खात्री नसेल तर एकानें मुद्दाम उचलून दुसरीकडे जावयाचें व ‘ कांहीं गडबड झाली तर तिकडे कळवूं नका ’ असा बांधबांस इषारा देऊन जावयाचें हा त्यावरील तोडगाही पुष्कळच प्राचीन काळापासून रूढ आहे.

कित्येक वेळां लग्न मोडण्यास टपून बसलेले लोक याच संधीचा फायदा घेऊन जेव्हां मृताची वार्ता लग्नमंडपापर्यंत आणतात तेव्हांच्या वकिली डावपेंचास तर हद्दच नसते. नोटीस बजावण्यास आलेल्या शिपायाशीं ज्या तऱ्हेनें वागतात तीच तऱ्हा यावेळीं अमलांत आणली जाते. अशा प्रकारच्या कावेबाजीचें किती वर्णन करावें ? शेजारच्या गांवांत कोणी अत्यवस्थ आजारी असेल तर त्याची अगोदरच बातमी आलेली असते. अशा स्थितींत त्या गांवाहून चिठ्ठी घेऊन कोणी आलेला असला तर त्यावर ‘ क्षेम ’ हीं अक्षरें नसावयाचीं व ‘ रात्रीं जेवणखाण झाल्यावर वाचावी ’ अशी सूचना असावयाची. अर्थात् त्यांतील मजकुराची स्पष्ट

कल्पना अगोदरच झालेली असते; तरी प्रत्यक्ष चिठ्ठी वाचीपर्यंत सुतक सुरू झालें असें मानीत नाहींत. ही निव्वळ चुकवाचुकवी व प्रतारणा नव्हे काय ? वास्तविक ' अमुक मृत झाला ' असें कळणें हेंच जर सुतक लागू होण्याचें कारण असेल तर प्रत्यक्ष चिठ्ठी वाचल्याशिवाय तें लागत नाहीं असें कसें मानतां येईल ? या प्रकारें हा अशौचधर्म पूर्वींपासूनच लोकांस नडत आहे. तो आजच नडत आहे असें नाहीं. धर्माच्या दडपणामुळें किंवा खरें म्हणावयाचें तर रूढीच्या दडपणामुळें त्याविरुद्ध आजवर कोणींही ब्र काढला नाहीं इतकेंच ! पण प्रत्यक्ष व्यवहार कसा थांबणार ? व्यवहार व शास्त्र यांचा समन्वय आज कसा केला जातो याबद्दलच्या युक्त्या येथें थोड्या विस्तारानें दाखविल्याच आहेत. आतां प्रश्न असा, कीं ही प्रतारणा धर्माच्या क्षेत्रांत क्षम्य मानावी, कीं अशौचधर्माचें मूळतत्त्व शोधून कांहीं मार्ग निघत असल्यास पहावें ? कोणीही समंजस यांपैकीं दुसराच मार्ग पतकरील. म्हणून आतां या आचाराचें मूळतत्त्व काय याचा विचार करूं.

या सुतकाबद्दल मनुस्मृतीपासूनच्या जवळजवळ सर्व ग्रंथांत विवेचन आहे. अर्थात् या दृष्टीनें हा आचार अलीकडचा आहे असें म्हणतां येणार नाहीं. कोणत्या नात्याच्या मनुष्यास किती सुतक याबद्दल पुष्कळच बारकाव्याचें विवेचन ग्रंथांतरीं सांपडतें. अशौचनिर्णयासारखे केवळ याच विषयास वाहिलेलेही ग्रंथ आहेत. पण या सर्व ग्रंथांत कोठेंही तत्त्वविचाराचा मागमूसही नाहीं. अशा स्थितींत तात्त्विक भूमिका दाखविणारांची टर उडविणें अगदीं सोपें आहे. तथापि तत्त्वशोधनाचें महत्त्व ज्यांस पटलेलें आहे ते प्रस्तुत विवेचनाकडे सहानुभूतीनें पहातील अशा विश्वासावर पुढील विवेचन केलेलें आहे.

आज या संबंधांत ज्या कित्येक रूढि आहेत त्या सर्वांसच परंपरेचा आधार आहे असें नाहीं. कोकणांत सात पिढ्या होऊन गेलेल्यांचेंही दहाच दिवस सुतक पाळतात, पण हें कोणत्याही शास्त्र-ग्रंथास धरून

नाहीं. अर्थात् या दृष्टीनें ज्यांच्या अधिक पिढ्या उलटलेल्या असतील त्यांनीं सुतकाचे दिवस कमी केले पाहिजेत. ' न वर्धयेदघाहानि ' ' पापाचे ( अशौचाचे ) दिवस वाढवूं नयेत ' हा शास्त्रोक्त निषेध पाळूनच ही सुधारणा तावडतोब करतां येण्यासारखी आहे. एखाद्यानें आपल्या कुळांतील मृताविषयीं सुतक न धरणें हा आपला अपमान आहे या कल्पना आतां सोडून दिल्या पाहिजेत ! सुतकी बनून उसन्या शोकाचें प्रदर्शन करणें यांत धार्मिकपणा मुळींच नाहीं. सुतक धरणें यांत खरी सहानुभूति नसून सहसंवेदनेनें आस्थापूर्वक दुःखितांचें सांत्वन करणें यांतच खरी आस्था आहे ही कल्पनाच आतां रूढ केली पाहिजे.

ऐतिहासिक दृष्टीनें पाहिल्यास रामायणकालीं हा आचार आजच्या स्वरूपांत तरी नव्हता असें दिसून येतें. भरत जेव्हां अरण्यांत रामचन्द्रास भेटावयास गेला तेव्हां प्रथमच त्यानें पितृनिधनाची वार्ता रामचन्द्रास निवेदन केली. अर्थात् आजच्या लिखित ग्रंथांप्रमाणें त्यांनीं त्या दिवसापासून बारा दिवस ( द्वादशाहेन भूमिपः मनु. ५.८३ ) सुतक धरून त्यानंतर पिंडदान वगैरे करावयास पाहिजे होतें; परंतु रामचन्द्रांनीं त्याप्रमाणें न करतां थोड्याच वेळानें हें सर्व केल्याचें रामायणांत दाखविलेलें आहे. ( पहा ! वाल्मीकिरामायण अयोध्याकांड सर्ग १०३ ) मोठमोठ्या यज्ञयागांत, सत्रांत, फार काय नित्य अग्निहोत्र वगैरे श्रौत कर्मांतही अशौच पाळीत नाहींत हें सर्वांस ठाऊकच आहे. अर्थात् अशौचधर्म ग्रंथोक्त असला तरी अनादि किंवा सनातन नाहीं हें सहज कळून येण्यासारखें आहे.

तसेंच सर्वच सापिंड्यांतील बांधवांनीं दहाच दिवस तें पाळिलें पाहिजे असेंही नाहीं. कमी दिवसही सुतक पाळण्यास कित्येकांस सांगितलेलें आहे. हीं अशौचाचा संकोच सांगणारीं वचनें मनुस्मृतीपासून तों

तहत निर्णयसिंधूपर्यंतच्या ग्रंथांत दिलेलीं आहेत. त्यांतील कांहीं मुद्दाम येथें उद्धृत करतों.

**दशाहं शावमाशौचं सपिण्डानां विधीयते ।**
**अर्वाक् सञ्चयनादस्थ्नां त्र्यहमेकाहमेव वा ॥** मनु. ५.५९
**एकाहाद्ब्राह्मणः शुद्ध्येत् योऽग्निवेदसमन्वितः ।**
**त्र्यहात् केवलवेदस्तु द्विहीनो दशभिर्दिनैः ।** पराशरः
**पञ्चाहेनाग्निहीनस्तु दशाहाद्ब्राह्मणब्रुवः ।** अग्नि. १५८ अ.

या वचनांत अहिताग्नि वैदिक वगैरे प्रकारच्या ब्राह्मणांस ४, ३ किंवा एक दिवसच सुतक आहे असें सांगितलेलें आहे. शेवटच्या वचनांत फक्त आडनांवी ब्राह्मणालाच दहा दिवस अशौच सांगितलें आहे. अर्थात् हल्लीं आपण सर्वच जें दहा दिवस सुतक पाळतों तें शास्त्रोक्तच आहे असें नाहीं. याही पुढें जाऊन ' राजाला दोष लागत नाहीं, तो ताबडतोब शुद्ध होतो कारण त्यानें प्रजेच्या रक्षणाची जबाबदारी घेतलेली असते.*' स्वतः राजालाच नव्हे तर ' ज्याच्या बाबतींत राजाची इच्छा असेल कीं, अमक्याला दोष लागूं नये त्यालादेखील सुतक लागत नाहीं.' ( मनु. ५.९९ ) अशींही वचनें सापडतात. अर्थात् ज्याच्यावर सामाजिक जबाबदाऱ्या आहेत त्यानें कर्तव्य सोडून देऊन दहा दहा दिवस घरीं बसलेंच पाहिजे असा शास्त्राचा कटाक्ष नाहीं हें सहज दिसून येण्यासारखें आहे.

उद्योगी माणसाला सुतकाची माफी आहे हें आपण पाहिलें. याही पुढें जाऊन जे स्वकर्तव्य करीत असतां मृत झाले त्यांचें सुतक धरण्याचेंच कारण नाहीं, असें सांगणारीं पुढील वचनेंही लक्षांत घेण्याजोगीं आहेत.

---

* राज्ञो माहात्मिके स्थाने सद्यः शौचं विधीयते ।
प्रजानां परिरक्षार्थमासनं चात्र कारणम् । मनु. ५।९४
शौचाशौचं हि मर्त्यानां लोकेशप्रभवाप्ययम् ॥ ५।९७

**डिम्बाहवहतानांच विद्युता पार्थियेनच**
**गोब्राह्मणस्य चैवार्थे............**
**उद्यतैराहवे शस्त्रैः क्षत्रधर्महतस्य च ।**
**सद्यः सन्तिष्ठते यज्ञस्तथा शौचमिति स्थितिः ॥** मनु. ५.९८
**क्षत्रियो निहतः संख्ये न शोच्य इति निश्चयः ।**

हीं सर्व वचनें अगदीं प्रसिद्ध आहेत. यांचा सरळ विचार केला तरी ‘ कर्तव्य–कर्म चालू असतां मृत्यु आल्यास त्यास सद्गति प्राप्त होत असल्यामुळें अशा व्यक्तीबद्दल शोक ( अशौच ) करूं नये.’ हें महत्त्वाचें तत्त्व लक्षांत येतें. आणि तें लक्षांत घेतलें म्हणजे चालू अशौच प्रकरणाचा उलगडा होऊन त्यांतूनच सुधारणेचा मार्ग व्यक्त होतो. म्हणून या दोन दृष्टींनीं आतां विचार करूं.

मृतमनुष्याबद्दल शोक उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. अगदीं गुरांवासरांतदेखील शेजारचें एखादें जनावर कमी होतांच कांहींशी उदासीनता आलेली दिसते. मग मनुष्यास एखादा सोबती कायमचा अंतरल्यावर त्याबद्दल शोक उत्पन्न होऊन त्याचें रोजच्या कार्यक्रमांत लक्ष न लागणें स्वाभाविक नाहीं असें कोण म्हणेल ? प्रिय--वियोग झाल्यास अशी उदासीनता स्वाभाविकच प्राप्त होते. या वस्तुस्थितीचा विचार केल्यास अशौचप्रकरणांतील नियमांची घडण कशी झालेली असेल हें लक्षांत येतें. पितापुत्रांचा परस्परांस शोक जास्त ! फार काय, पूर्वीं जवळ जवळ सगळाच गोतावळा एकत्रच रहात असल्यामुळें कोणत्याही सपिंडाचा मृत्यु फारच तीव्र शोकावेग उत्पन्न करी ! त्या मानानें दूरच्या नातलगांचें दुःख वाटत नसे. म्हणून बाप, चुलता, मुलगा यांपेक्षां मेहुणे वगैरेंच्याबद्दल कमी सुतक सांगितलेलें आहे. यांत स्वाभाविक प्राप्त होणारें वैराग्य व औदासीन्य यांस वाव दिलेला आहे, एवढेंच ( प्रवृत्तिरेषा भूतानाम् । ) दिसून येतें.

शोकग्रस्तास मुद्दाम रोजचीं कार्यें करणें भाग पाडलें तर तो तीं

नीट करणार नाहीं, म्हणून त्यास नित्यकर्मलोप क्षम्य मानून तत्संबंधींचे नियम घालून दिलेले आहेत. याचा अर्थ नित्यकर्मे स्वस्थपणें करतां येण्याइतकें ज्यांचें मन ताब्यांत असेल त्यांनींही त्यांचा त्याग केलाच पाहिजे असा नाहीं. मागें राजा, आहिताग्नि, वैदिक यांस कमी सुतक असल्याचे जे उल्लेख दाखविले आहेत त्यांचें हेंच रहस्य आहे. ज्यांचें स्वतःच्या आप्तेष्टांपेक्षां प्रजारक्षण, अग्न्याराधन, अध्ययन वगैरे विषयांवरच अधिक प्रेम असतें त्यांस आप्तावियोगापेक्षां स्वकर्तव्य-वियोगच अधिक जाणवतो. म्हणून, अशा लोकांस धर्मशास्त्रानें कमी आशौच सांगितलेलें आहे. कारण कर्तव्यत्याग धर्म होऊं शकत नाहीं.

सामान्य दर्जाच्या दुःखीकष्टी मनुष्यास कांहीं दिवस समाजांत न मिसळतां एकांतांत रहावें अशी स्वाभाविकच इच्छा होते. उलटपक्षीं असल्या सुतकी चेहेऱ्याचें प्रदर्शन समाजास घडणें समाजाच्या दृष्टीनेंही ठीक नाहीं. या दोन्ही गोष्टी लक्षांत घेऊन धर्मशास्त्रकारांनीं आशौचाच्या रूढ आचारास मान्यता दिलेली आहे. स्मृतिकार मृताच्या आप्तेष्टांच्या शरीरावर कांहीं दोष उत्पन्न होत असल्याचें मानीत होते असा त्याचा अर्थ नाहीं.

धर्मशास्त्र स्वाभाविकपणें उत्पन्न होणाऱ्या शोकास कालमर्यादा घालून देऊन आळा घालण्याकरितां आहे. शोक करा, मुद्दाम कर्तव्यत्याग करा, असें सांगण्याकरितां नाहीं; हे या संबंधांत प्रत्येकानें लक्षांत ठेवावें. अजूनही कांहीं शंका असेल तर

**'नोपकुर्यान्नरः शोचन् प्रेतस्यात्मन एव वा।'** अग्नि १५७

**'शोचन्तो नोपकुर्वन्ति मृतस्येह जना यतः।**
**अतो न रोदितव्यं हि क्रिया कार्याः स्वशक्तितः।'** विष्णु २०-३०

**मृतस्य बान्धवैः सार्धं कृत्वा तु परिवेदनम्।**
**वर्जयेत्तदहोरात्रं दानं श्राद्धादि कर्मच।** पारस्करः (प्रा. म. १२१)

हीं वचनें लक्षांत घ्यावीं. 'रडणें हा धर्म नव्हे.' 'शोक करण्या-

पासून स्वतःला किंवा मृतालाही कांहीं फायदा होत नाहीं. ' ' रड-णाऱ्या बांधवांबरोबर इतरांनीं रडूं नये.' अशीं स्पष्ट विधानें या वचनांत आहेत. कर्तव्य करीत असतां मृत झालेल्याबद्दल तर सर्वच शास्त्रका-रांनीं एकमुखानें शोकनिषेध सांगितलेला आहे. अर्थात् अशा वीराचा आनंदोत्सवच केला पाहिजे. अशौचप्रकरणाचें तत्त्व याप्रमाणें अत्यन्त उदात्त आहे. त्यांत कर्तव्यपरायणतेचा दिव्य संदेश आहे. समाजांत आपली उद्विग्नता न पसरविण्याविषयीं बजावलेलें आहे. पण हें तत्त्व न समजल्यामुळें रडणें हाच धर्म वाटून गुजराथेंत ' मोलें घातलें रडाया ' असा प्रकार सुरू झाला ! आपल्याकडेही न रडणारा पाषाणहृदयी ठरूं लागला; आणि रडणें व शिवाशिवी यांचें स्तोम माजलें. मृत्यू-विषयीं चुकीची अशुभ कल्पना हेंही एक या आचारांच्या प्रसाराचें कारण आहे. पण मृत्यु हा अशुभ कसा नाहीं हें पुढें एका प्रकरणांत दाखवावयाचेंच आहे. असो.

ज्यांस आशौचाचें वरील तात्त्विक स्वरूप मान्य होईल त्यांस या-संबंधांत कोणतेही नियम घालून देण्याची आवश्यकता नाहीं, हें लक्षांत येईलच ! कारण मीं एखाद्या व्यक्तीबद्दल किती शोक करावा, हा प्रश्न इतरांचा नाहीं. तथापि इतक्या दिवसांच्या रूढि एकदम तोडण्याचें सामान्य लोकांस जमणार नाहीं. त्यांच्याकरितां जुनाच एक नियम येथें पुन्हां चालू करणें आवश्यक आहे. तो नियम ' दहा दिवसांचे तीन भाग करून तिसरा भाग होऊन गेल्यावर ( चौथ्या दिवसापासून ) तत्त्व-द्रष्टे विद्वान् त्या अशौचवाल्यांना स्पर्श करतात ' या अर्थाच्या देवलोक्त नियमांत आहे. अर्थात् अगदींच ज्यांस कसेंसेंच वाटत असेल त्यांनीं तीन दिवस आशौचनिमित्तक अस्पृश्यता पाळावी व चौथ्या दिवसापासून शिवाशिवीचें बंड वाढवूं नये. हीं वचनें निर्णयसिंधूतही आहेत. मात्र तीं त्यांनीं कलिवर्ज्य ठरवून उपेक्षिलीं आहेत. आपण त्यांचा पुन्हां प्रचार सुरू केला पाहिजे.

**न कारुणां कारुकर्मणि ( अशौचम् )** । विष्णु २२–४३
या वचनांत कारागिरांस आपापल्या व्यवसायांत आशौच नाहीं असें म्हटलेलें आहेच !

**शिल्पिनः कारुका वैद्या दासीदासाश्च नापिताः ।**
**श्रोत्रियाश्चैव राजनः सद्यः शौचाः प्रकीर्तिताः ॥** परा. ३–२७

या वचनांत तर वैद्य, न्हावी, दास, दासी यांसही तें नसल्याचें सांगितलेलें आहे. तात्पर्य, आशौच मानूनही इतरांशीं येणाऱ्या व्यवहारांत अडथळा आणण्याचें कारण नाहीं. स्पर्शदोष केवळ काल्पनिक असल्याचें वर दाखविलेंच आहे.

ज्यांना व्यवसायवगैरेंची अडचण नाहीं, तसेंच ज्यांचें मन शोकव्याकुळ आहे त्यांनीं जुने नियम पाळले तर त्याबद्दल इतरांनीं त्यांची अवहेलना करूं नये. अशा लोकांनीं पुराण–वेदान्त–वगैरेंचें श्रवण करून मन शांत करण्याचा प्रयत्न करावा. आशौचामध्यें होम–दान–प्रतिग्रहच फक्त वर्ज्य आहेत. परन्तु संध्या त्याही वेळीं सांगितलेलीच आहे; इतकेंच नव्हे पण आज सार्वत्रिक व निरपवाद समजल्या गेलेल्या या विषयांतील रूढींस इतरही किती अपवाद आहेत हें पहावयाचें असेल तर निर्णयसिन्धु * ( पृष्ठ ५४३ ते ५५४ ) अवश्य पहावा.

नव्या व जुन्या सर्व बांधवांनीं इतर कोणत्याही बाबतींत मतभेद असला तरी अकरावा, बारावा किंवा तेरावा यांपैकीं कोणताही एक दिवस आगाऊ निश्चित करून त्या दिवशीं मृताच्या सद्गतीबद्दल जलदानपूर्वक प्रार्थना एकत्र जमून करण्यास मात्र चुकूं नये. आत्म्याच्या नित्यत्वावर विश्वास नसला तरी मृताच्या हयात कुटुंबीयांची काळजी घेणें त्याचें कर्तव्यच आहे. विशेषतः कुटुंबाच्या पांगापांगीच्या या काळांत हा प्रचार आस्थेनें सुरू ठेवला पाहिजे. कुटुंबीयांची संघटना

* मागें पृ. १४३ वरील टीप पहा.

याच प्रकारानें होऊं शकेल! कोणाचें कांहीं वितुष्ट असलें तरी तें विसरूनच

'मरणान्तानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम्'

हें रामचन्द्राचें वचन सर्व भारतीयांनीं ध्येयभूत समजावें व मृत आप्ताचा तर्पणदिन साजरा करावा. या दिवशीं तर्पण, प्रार्थना, विचारपूस, यांपलीकडे जेवणावळीचा वगैरे कार्यक्रम ठेवूं नये.

मृताशौच अथवा सुतक याबद्दलच्या शास्त्रार्थाचें येथवर निवेदन केलें. आतां जाताशौच किंवा सोहेर याबद्दलही प्रसंगानें विचार करूं. वास्तविक पुत्रजन्म ही आनंदाची गोष्ट असतांना त्याबद्दल असे नियम कां असावे याचें सकृद्दर्शनीं आश्चर्य वाटतें; पण याही बाबतींतील खरें शास्त्र लक्षांत घेतलें म्हणजे हें आश्चर्य नाहींसें होईल! मनुस्मृतींत

'सूतकं मातुरेव स्यात्' (५.६२)

असें स्पष्ट विधान आहे. याज्ञवल्क्यांनींहि 'सूतकं मातुरेव हि' (३.१८) असें म्हणून तेंच सांगितलें आहे. याज्ञवल्क्यांनीं मातेला जननाशौच कां हें सांगतांना त्याचें लौकिक कारणही—

'पित्रोस्तुसूतकं मातुस्तदसृक्दर्शनाद्ध्रुवं॥ ३.१९॥

'मातेचा रक्तस्राव' हें स्पष्टच दिलेलें आहे.

वसिष्ठानें देखील

नाशौचं विद्यते पूंसां संसर्गं चेन्न गच्छति।
रजस्तत्राशुचि ज्ञेयं तच्च पूंसि न विद्यते॥

या वचनांत रक्तस्राव हेंच अशुद्धतेचें कारण असल्यामुळें इतरांस जन्मनिमित्तक अपावित्र्य नाहीं असें सांगून हेंच विवेचिलेलें आहे. अर्थात् आजच्या सोहेरासंबंधींच्या आचारास वचनांचाही आधार नाहीं, हें उघड आहे. म्हणून त्याच्या आधारावर लग्नमुंजींत व्यत्यय आणण्याचें मुळींच कारण नाहीं.

जननाशौचास याप्रमाणें शास्त्राधार नसूनही तें पुढें पुढें रूढ झालें याचें एक कारण आहे. ' जन्म हें पाप आहे ' या कल्पनेनें या रूढीस बरेंच पुढें आणलेलें असावें. अर्थात् देहाची क्षुद्रता व पापमयता दाखविणारें तत्त्वज्ञान जेव्हां या देशांत प्रसृत झालें तेव्हांच जननाशौचाचा आचार विशेष रूढ झाला असावा, व कांहीं अलीकडच्या स्मृतिकारांनीं त्यास मान्यता दिलेली असावी, हें उघड दिसतें. परंतु भगवान् श्रीकृष्णांनीं या कल्पनेस मुळींच वाव दिलेला नाहीं. त्यांनीं स्पष्टच सांगितलें आहे कीं,

' उत्पन्न झालेल्याला मृत्यु व मृताला जन्म हे ठेवलेलेच आहेत. तेव्हां या स्वाभाविक गोष्टीबद्दल तूं शोक करूं नकोस ! ' (गीता २.२७) हिंदु बांधवांनीं जन्ममृत्युनिमित्तक शोक ( अशौच ) या भगवंतांच्या आदेशास अनुसरून टाकून देऊन व धृत्युत्साहसमन्वित होऊन कर्तव्यतत्पर व्हावें हेंच योग्य ! असो. येथपर्यंत या प्रकरणाच्या आरंभीं दिलेल्या तीन विषयांपैकीं दोन विषयांचें विवेचन झालें. आतां श्राद्धविचाराकडे वळूं.

श्राद्धविधि अलीकडे मागें पडत चाललेला असला तरी तो प्राचीन काळापासून चालू आहे. बहुतेक स्मृतींत त्याचें विस्तृत विवेचन सांपडतें. श्राद्धाचे प्रकारही अनेक आहेत. नित्यश्राद्ध, वृद्धिश्राद्ध, सापिंडनश्राद्ध, पार्वण, एकोद्दिष्ट, महालय वगैरे लहानमोठे अनेक प्रकार आहेत. हे सर्वच प्रकार सध्यां रूढ आहेत असें नाहीं. तसेंच सर्वच श्राद्धाचीं सगळींच अंगें सध्यां केलीं जातात असेंही नाहीं.

अलीकडच्या काळांत तर अपराण्हकाळ गैरसोईचा पडत असल्यामुळें दहा वाजतांच पितरांचें आवाहन करण्याचा प्रसंग येतो. शिवाय लांबलचक पिंडदानान्त कर्म कंटाळवाणें व गैरसोईचें वाटत असल्यामुळें चटश्राद्धावरच कार्यभाग उरकून घ्यावा लागतो. कित्येकांनीं तर

श्राद्धदिवशीं एखाद्या उपयुक्त संस्थेस देणगी देण्याचाच रिवाज पाड-लेला आहे.

अशा स्थितींत सांगोपांग विवेचन करून एखादा पक्ष स्थिर करा-वयाचा तर फार विस्तार होईल. शिवाय ही बाब ज्याच्या त्याच्या श्रद्धेवर अवलंबून असलेली, अर्थात् वैयक्तिक असल्यामुळें त्यांत फार कडक नियम घालून देण्याचेंही कारण नाहीं. म्हणून श्राद्धाचें मूळ तत्त्व व कमींत कमी श्राद्धविधि किती केला पाहिजे तेवढ्याचेंच येथें विवेचन करण्याचें योजिलें आहे. श्राद्ध व तर्पण यांची एकच कारण-मीमांसा असल्यामुळें तर्पणाबद्दलही येथेंच विवेचन केलें आहे.

तर्पण म्हणजे मृताच्या तृप्तीकरितां दिलेलें पाणी व श्राद्ध म्हणजे त्याच्या उद्देशानें तयार अन्नाचे पिंड करून ते त्यास दर्भांवर ( किंवा चांगल्या स्थळीं ) अर्पण करणें ! या दोन्ही क्रिया इतक्या साध्या व अर्थपूर्ण आहेत कीं, त्यांचें विस्तृत समर्थन करण्याचें कारणच नाहीं. रामायणांत या दोन्ही क्रियांचें असेंच अगदीं साधें व अर्थपूर्ण वर्णन केलेलें आहे; तेंच पुरावा म्हणून वाचकांस सादर करतों.

भरतानें पित्याच्या मृत्यूची वार्ता ऐकविल्यावर रामचन्द्र बंधूसह-वर्तमान नदीवर गेले. तेथें स्नान केल्यावरः—

> **प्रगृह्य तु महीपालो जलपूरितमञ्जलिम्**
> **दिशं याम्यामभिमुखो रुदन् वचनमब्रवीत् ॥**
> **' एतत्ते राजशार्दूल विमलं तोयमक्षयम् ।**
> **पितृलोकगतस्याद्य मद्दत्तमुपतिष्ठतु '**
> **ततो मन्दाकिनीतीरं प्रत्युत्तीर्य स राघवः ।**
> **पितुश्चकार तेजस्वी निर्वापं बान्धवैः सह ॥**
> **ऐंगुदं बदरैर्मिश्रं पिण्याकं दर्भसंस्तरे ।**
> **न्यस्य रामः सुदुःखार्तो रुदन् वचनमब्रवीत् ॥**

**'इदं भुंक्ष्व महाराज प्रीतो यदशना वयम्।
यदन्नः पुरुषो भवति तदन्नास्तस्य देवताः'**

वा. रा. अयो. सर्ग १०३

अर्थ–रामचंन्द्रांनीं ओंजळींत पाणी घेऊन रडत म्हटलें 'हे राजसिंहा हें विमल जल मी तुला देत आहें तें तुला प्राप्त होवो'. त्यानन्तर मंदाकिनीच्या तीरावर येऊन रामचन्द्रांनीं बोरीचीं फळें घालून पिंड तयार केले व खालीं दर्भ हांतरून त्यावर ते 'जें आम्हीं खातों तें हें अन्न महाराज आपण प्रेमानें खा!' असें म्हणून पित्याच्या उद्देशानें अर्पण केले.

ही रामायणांतील पद्धत अत्यंत साधी व उद्बोधक अशी आहे.

**प्रेतं पितॄंश्च निर्दिश्य भोज्यं यत्प्रियमात्मनः।
श्रद्धया दीयते यत्र तच्छ्राद्धं परिकीर्तितम्॥** मरीचिः॥

या श्लोकांतही स्वतःला आवडणारा खाद्य पदार्थ पितरांच्या उद्देशानें श्रद्धापूर्वक अर्पण करणें हेंच श्राद्ध होय असेंच म्हटलेलें आहे. तेव्हां या प्रकारानें श्राद्धदिन साजरा करणें सहज शक्य आहे. याप्रमाणें अन्त्यविधि, सुतकसोहेर व श्राद्ध–तर्पण यांचा विचार झाला.

## प्रकरण बारावें

# दिनक्रम

मागील प्रकरणापर्यंत आज जे आचार धार्मिक म्हणून रूढ आहेत, त्यांचाच मुख्यतः विचार केला. आतां त्याहीपेक्षां व्यापक स्वरूपाच्या आचारांचा विचार करावयाचा आहे. तत्पूर्वी रोजच्या कार्यक्रमाचें वर्णन देणें आवश्यक असल्यामुळें त्याचाच या प्रकरणांत विचार करूं. जुन्या ग्रंथांमध्यें पहाटे उठल्यापासून तों रात्रीं निद्रावश होईपर्यंत प्रत्येक मनुष्यानें कसें वागलें पाहिजे याचें विस्तृत विवेचन दिलेलें आहे. पण तो दिनक्रम आजच्या जीवनकलहाच्या तीव्रतेमुळें जशाचा तसाच पाळणें शक्य नाहीं. तथापि आजच्या परिस्थितीस अनुसरून योग्य तो फेरफार करून कांहींएक प्रकारचें निश्चित वळण ठरविणें आवश्यक आहे. म्हणून याच दृष्टीनें आतां विचार करूं.

**आजच्या नव्या रूढि**

पूर्वींचे ग्रंथकार एकमतानें पहाटेस उठण्यास सांगतात. तें त्यांचें सांगणें आजही उपयुक्तच आहे. सर्व सृष्टि ज्यावेळीं जागी होते, पक्षीही ज्यावेळीं गाणीं गाऊं लागतात, त्यावेळीं उठून आपणही देह व गृह यांची स्वच्छता करूं लागणें इष्ट नाहीं असें कोण म्हणेल ? पण आमचे या बाबींतील आजचे आचार पाहिले तर ते अगदीं रानटी-पणाचे वाटतात. सूर्योदय झाला तरी निजून राहणें हा आतां शिष्टा-चारच झालेला आहे. सकाळीं आठ वाजतां जरी कोणाकडे जाण्याचा प्रसंग आला तरी तेथें कोणतें दृश्य पहावें लागेल, याचा नेम नसतो. अस्ताव्यस्त अंथरुणें, केरवारा केलेला नसणें, वगैरे गोष्टी याही वेळीं दिसावयाच्याच ! कित्येक ठिकाणीं बाहेरून भेटावयास आलेल्याचा रात्रीं निजलेल्या बिछान्यावरच सत्कार करण्याचा प्रसंग येतो. वसति-

गृहांतील विद्यार्थ्यांमध्यें तर उठल्याबरोबर दुसऱ्याच्या खोलींत जाऊन त्याच्या आंथरुणावर बसून गप्पा मारण्याचा शिष्टाचारच पडलेला आहे. लवकर उठून ईश्वरस्मरण करील तो सनातनी व उशीरां उठून विशेष स्वच्छता वगैरे न करितांच वावरेल तो सुधारक अशी भलतीच प्रथा आपल्यामध्यें रूढ होऊं पहात आहे. विद्यार्थीदेखील पहाटे उठून अभ्यास करणें योग्य समजत नाहींत. मोठमोठे गवई व कवि पहाटेस उठून भैरवीचा किंवा प्रत्यक्ष अरुणोदयाचा आस्वाद न घेतांच रासिक व कलेचे भोक्ते म्हणून मिरवितात ! या नव्या बेशिस्त व गलिच्छ रूढींचें केवळ आळस या पलीकडे दुसरें कोणतेंही कारण नाहीं. म्हणून आजच्या नवतरुणांनीं या अतात्त्विक रूढीस सोडून दिलें पाहिजे.

**भूपाळ्या व प्रातर्विधि**

सर्व हिंदूंनीं सकाळीं ५॥–६ ला तरी जागें होण्याची संवयच लावून घ्यावी. जागें होतांच शान्त मनानें परमेश्वराचें चिन्तन करून 'मला सद्बुद्धी दे' अशी प्रार्थना करून त्यानंतर शरीर व घर यांची स्वच्छता व झाडलोट करण्यास प्रारंभ करावा. भूपाळ्या म्हणण्याची जुनी प्रथाही चांगलीच आहे. या दृष्टीनें एका बाजूनें झाडलोट चालू असतांना तोंडानें भूपाळ्या म्हणण्यास ही हरकत नाहीं.

**' राम सर्वांगीं सावळा हेम–अलंकार पीवळा '**

ही साधीभोळी भूपाळी कोणास रम्य वाटत नसेल तर त्यांनीं

**' हृदय–मंदिरीं प्राणशक्तिंचे झोपाळे डोलवी; ।**
**सुखदुःखांचे देउनि झोके जीवांना खेळवी ॥ '**

असल्या आधुनिक भूपाळ्या म्हणाव्या हें सांगणें नकोच !

शरीरशुद्धीचें महत्त्व व आवश्यकता पटवून देण्याचें कारण नाहीं. प्राचीनकाळीं मातीनें हात वगैरे धुतले जात. पण आतां शहरी वस्तींत

स्वच्छ माती मिळत नाहीं. म्हणून शौचाहून आल्यावर आतां मातीऐवजीं साबणाचा उपयोग करावा. डावा हात नळाजवळच्या जमिनीवर घासून धुण्याची प्रथा त्याज्य आहे. दन्तधावन व स्नान हें सकाळींच करण्याचा रिवाज ठेवावा.

**व्यायाम, स्नान**

सकाळीं व्यायाम घेण्याची प्रथा हल्लीं तरुणांत पडत चाललेली आहे ती इष्टच आहे. पुण्यास पर्वतीच्या बाजूला सकाळीं फिरणारांची हल्लीं जणूं यात्राच भरते, हें अत्यंत अनुकरणीय आहे. मात्र या सकाळच्या फिरण्यांत व्यायामाकडे लक्ष असावें. या दृष्टीनें या वेळीं गप्पा न मारतां सोसेल त्याप्रमाणें जलद चालणें इष्ट आहे. या प्रकारें निरनिराळे कार्यक्रम नियमितपणें केल्यास आरोग्य, सौंदर्य, स्वच्छता वगैरे अनेक फायदे होतील. म्हणून ५॥–६ ला उठून ईशचिंतन, व्यायाम, स्नान वगैरे एक दीड तासांत आटपून ७ च्या सुमारास संध्येस बसावें.

**गृह–केश–शृंगार**

साधारणपणें सात सव्वासातपर्यंत गृहशुद्धि व गृहशृंगार करून सर्व वस्तु टापटिपीनें ठेवण्याची शिस्त सर्व हिंदूंनीं पाळणें इष्ट आहे. स्त्रियांनीं आपला केशशृंगार या वेळांपूर्वींच करावा. सूर्य उगवल्यावर वेणीफणी केल्यास सूर्याच्या तोंडांत केस जातो अशा समजुतीनें पूर्वींच्या महिला सूर्योदयापूर्वींच वेणीफणी करीत. त्यांची समजूत खोटी असली तरी त्यांची पद्धत योग्यच आहे. म्हणून सकाळीं लवकरच वेणीफणी करण्याचा रिवाज महिलांनीं ठेवावा. तसेंच सैंपाकाच्या खोलींतच वेणीफणी न केली जाईल याबद्दल दक्षता बाळगावी. पुरुषांनींही दाढी करणें व केशशृंगार करणें या बाबतींत याचप्रमाणें स्थलंकालविवेक करावा. सूर्य ही आपल्या धर्माची जाज्वल्य देवता ! तिचा उदय होऊन तिचे किरण आपल्या घरांत येतात. एखादा सामान्य जिल्ह्याचा अधिकारी यावयाचा असला तरी आपण किती स्वच्छता व व्यवस्था ठेवतों ?

मग प्रत्यक्ष आपल्या धर्माचा राजा आपल्या घरांत किरणरूपानें येणार तेव्हां आपण आपलें घर व शरीर सिद्ध ठेवावयास नको काय ? असो. याप्रमाणें सात-सव्वासातपर्यंत सर्व कार्यक्रम झाल्यावर संध्येस बसावें.

**संध्येचें महत्त्व**

रोजचे व्यवहार करण्यांतच गढून गेल्यामुळें जिवंत मनुष्य यंत्रवत् बनून जातो. त्याला त्याच्या वर्तनांतील गुण किंवा दोष ओळखण्याचें तारतम्य रहात नाहीं. म्हणून चित्राचें जसें दुरून निरीक्षण करावें लागतें त्याचप्रमाणें आपल्या रोजच्या कार्यक्रमाचें खरें स्वरूप कळावें, एकंदरीनें आपली प्रगति होत आहे कीं, आपण अवनत होत आहों हें नीट लक्षांत यावें, म्हणून कांहीं वेळ त्या सर्व घडामोडींपासून दूर राहिलें पाहिजे. संध्येचा आचार या दृष्टीनें अत्यन्त उपयुक्त आहे. चिन्तन हेंही संध्येचें प्रमुख अंग आहे. दिवसांत एखाद्या ठराविक वेळीं शान्त जागीं बसून चिन्तन करणें अनेक दृष्टींनीं हितावह असतें.

**बैसोनी निवांत शुद्ध करी चित्त ।**
**तया सुखा अंतपार नाहीं ॥**
**येऊनि अंतरीं राहील गोपाळ ।**
**सायासाचें फळ बैसलिया ॥**

या अभंगांत तुकोबांनीं अशा चिन्तनाचें आध्यात्मिक महत्त्व दाखविलेलेंच आहे. अशा प्रकारचें श्रेष्ठ चिंतन हेंच संध्येचें मुख्य अंग आहे. संध्येचीं इतर फळें धर्मस्वरूपनिर्णयाच्या ३१७-१८ पृष्ठांवर दाखविलेलींच आहेत. हें सर्व विवेचन अगदीं बुद्धिग्राह्य असें आहे. या दृष्टीनें संध्येचा प्रचार सुरू होईल तर आजही संध्या प्रचारांत येईल ! पण संध्या केवळ अदृष्टार्थ आहे; तसेंच पळी, ताम्हन, भस्म, दिग्बंध हींच संध्येंतील मुख्य अंगें अशी भ्रामक कल्पना पसरल्यामुळेंच

संध्येचें महत्त्व वाटत नाहींसें झालें आहे. तें दूर व्हावयाचें तर संध्येचें खरें स्वरूपच प्रचारांत आलें पाहिजे.

संध्येचें नांव घेतांच कित्येक लोक घाबरून जातात. पण तसें अवघड त्यांत कांहींच नाहीं. पुढील लघुसंध्या सर्व हिंदूंस करितां येण्यासारखी आहे. अर्थात् ब्राह्मणांपासून हरिजनांपर्यंत सर्वांनीं ती करण्यास हरकत नाहीं. पुढील चार गोष्टी नीटपणें केल्या तरी संध्येचें फळ मिळूं शकेल.

**लघुसंध्या**

१ स्वच्छ पाण्यानें आचमन

२ प्राणायाम

'प्रातः संध्योपास्तिं करिष्ये' किंवा 'प्रातः संध्या करतों' असें म्हणून वाटल्यास पाणी सोडावें.

३ ओंजळींत पाणी घेऊन, गायत्रीमंत्रानें तें अभिमांत्रित करून 'श्रीसूर्याय इदमर्घ्यं दत्तं न मम' असें किंवा 'हें अर्घ्य सूर्याला अर्पण असो' असें म्हणून तें सूर्याकडे उडवावें. असें तीनदां करून नंतर—

४ डोळे मिटून निदान १० वेळां स्वस्थ मनानें गायत्रीमंत्र जपावा. घाई गडबड असतांही शक्यता पाहून १० वेळां असें म्हटलें आहे. तसें नसेल तेव्हां १०८ वेळां जपण्याचा नित्य नेम ठेवावा.

यानंतर सूर्योपस्थान म्हणून एक कार्यक्रम आहे. पण ज्यास तें उपस्थान पाठ येत नाहीं, त्यास तो करतां येणार नाहीं म्हणून येथें दिला नाहीं. वरील चार कार्यक्रम जरी नियमितपणें केले तरी पुष्कळ आहे. गायत्रीमंत्र* मात्र शुद्ध रूपांत शिकून घ्यावा म्हणजे झालें. याप्रमाणें संध्या झाल्यावर शक्तीप्रमाणें कमी अधिक सूर्यनमस्कार किंवा योगासनें करून व्यायाम घेण्याचा परिपाठ ठेवावा. याप्रमाणें सुमारें साडेसातपर्यंत कार्यक्रम झाल्यावर मग प्रातराश किंवा लघुपान घ्यावें.

---

* ज्यांस गायत्रीमंत्र येत नसेल त्यांनीं 'मित्राय नमः'—सूर्याला नमस्कार असो—हा सोपा मन्त्र म्हटला तरी चालेल.

**प्रातराश**

चहा घ्यावा किंवा न घ्यावा याबद्दल येथें कांहींच सांगण्याचें कारण नाहीं. मात्र तो आठाच्या आंतच घेतला गेला पाहिजे. वाटेल तेव्हां चहा घेण्यामुळें वैयक्तिक व सामाजिकदृष्ट्या कसकसे तोटे होतात याचें पुढें चवदाव्या प्रकरणांत विवेचन केलेलेंच आहे. म्हणून ठराविक वेळींच चहा किंवा अल्पाहार घेण्याचा रिवाज पाळावा. ज्यांस चहाची संवय नसेल त्यांनीं चहाच्या आहारीं जाऊं नये. अशांनीं लिंबाचें सरबत अथवा चिनी वाटाण्याची कॉफी घ्यावी. ज्यांना सकाळींच कामावर जावयाचें असतें त्यांनीं अल्पाहारही घ्यावा ! नुसताच चहा झोकूं नये.

मुंबईच्या उपनगरांतील नोकरांनीं-ज्यांना बहुधा ८-८॥ लाच जेवावें लागतें- त्यांनीं सकाळच्या चहाच्या मुळींच भानगडींत पडूं नये. कित्येकांस आमच्या या बारीक-सारीक सूचनांचें हसूं येईल ! पण केवळ अंध अनुकरण म्हणून सकाळीं ८ वाजेपर्यंत दोनदां चहा घेऊन कसेंतरी जेवण आटपून ९ ची लोकल पकडणारे लोक ज्यांनीं पाहिले असतील, त्यांस त्यांतील स्वारस्य कळून आल्यावांचून राहणार नाहीं. असो. याप्रमाणें ८ ला सर्व कार्यक्रम आटोपल्यावर काय करावें ?

**वाचन अथवा अभ्यास**

विद्यार्थ्यांनीं यावेळीं एकचित्तानें अभ्यास करावा. इतरांनीं अर्धा-एक तास भाजीबाजार व वर्तमानपत्रें यांत घालवावा ! हिंदु नागरिकाला जगांत व आपल्या देशांत काय चाललेलें आहे, हें माहीत असलें पाहिजे. वेळ असूनही ‘ काय करायाचें आहे नसत्या पंचायती करून ? आपली नोकरी बरी कीं आपण बरे ! आम्ही तुमचा केसरीही उघडून पहात नाहीं कीं, त्रिकाळ-सकाळ यांच्या मारामाऱ्याही पहात बसत नाहीं. ’ असें मोठ्या तोऱ्यानें सांगणारे ढुढ्ढाचार्य पाहिले म्हणजे मनस्वी खेद होतो. आम्ही जगांत कोठें आहों, हें जाणण्याचीही ज्यांस

इच्छा नाहीं, ते समाजाचें आणि देशाचें तर दूरच पण स्वतःचें तरी हित कसें साधणार? जुन्या ग्रंथकारांस ही बेपर्वाई मुळींच पसंत नाहीं. ते म्हणतातः—

'देशकाल कसे आहेत, (आपले) मित्र कोण, आयव्यय कसे चालले आहेत, आपलें सामर्थ्य काय वगैरे गोष्टींचा विचार करावा.' असो. नुसत्या वर्तमानपत्रांचेंच नव्हे तर तात्त्विक मासिकें व पुस्तकें यांचेंही वाचन होणें आवश्यक आहे. नुसत्या गोष्टी वाचून करमणूक करणें इष्ट नाहीं. शास्त्रसेवा ही प्रत्येक सुशिक्षिताकडून घडलीच पाहिजे.

**ऋषिऋणाची फेड**

आपल्या शास्त्रकारांनीं मनुष्य उत्पन्न होतांच त्याच्या मागें देवांचें, ऋषींचें व पितरांचे ऋण असतें व तें प्रत्येकानें फेडलेंच पाहिजे, असें आज्ञापिलें आहे. या तिन्हीपैकीं ऋषींचें ऋण स्वाध्यायानें म्हणजे वेदाध्ययनानें फेडलें जातें. या स्वाध्यायाचें वेदांत फारच महत्त्व वर्णन केलेलें आहे. वेदाध्यनाप्रमाणेंच इतर शास्त्रांचेंही अध्ययन मनुष्यानें केलें पाहिजे. नोकरीला लागल्यानन्तर नवीन अभ्यास वगैरे सध्यां कोणी करीत नाहीं. पण हें धर्माज्ञेस सोडून आहे. आपस्तंब धर्मसूत्रांत असें स्पष्टपणें म्हटलेलें आहे कीं, विवाह झाल्यावर देखील दर वर्षीं दोन दोन महिने संयमपूर्वक ज्ञानसंपादनार्थ आचार्यगृहीं रहावें ? *

ज्ञानसंपादनाची हेळसांड करणें आधुनिक दृष्टीनें व प्राचीन धर्मशास्त्रांच्या दृष्टीनेंही याप्रमाणें गर्ह्य आहे, हें लक्षांत घेऊन थोडें तात्त्विक वाचन (इतिहास, धर्मशास्त्र, समाजशास्त्र वगैरे विषयांवरील) यथाशक्ति रोज करण्याचा नियमच ठेविला पाहिजे. या दृष्टीनें गांवांतील वाचनालयाचें सभासदत्व स्वीकारणें इष्ट आहे. कारण सर्वच पुस्तकें

* निवेशे वृत्ते, संवत्सरे संवत्सरे द्वौ द्वौ मासौ आचार्यकुले वसेत् भूयः श्रुतमिच्छन् । आप. ध. सू. १.४.

विकत घेणें प्रत्येकास शक्य नसतें. याप्रमाणें ९॥ पर्यंतचा वेळ ज्ञानोपासनेंत घालविला पाहिजे.

**शेजारधर्म**

साडेनऊच्या सुमारास १५–२० मिनिटें शेजाऱ्यांपाजाऱ्यांशीं गप्पा मारून मजेंत घालवावीं. आपलें बिऱ्हाड व ऑफिस यांशिवाय तिसरें ठिकाण वर्ज्य समजणारे अहंमन्य सध्यां फार बोकाळले आहेत. शेजारचें बिऱ्हाड आम्हांस ठाऊक नाहीं, असें सांगणारे लोक पुष्कळ भेटतात; पण हें माणुसकीस सोडून आहे. म्हणून परस्परांकडे जाणें, विचारपूस करणें हें आवश्यक आहे. साडेनऊ वाजल्यापासून पंधरावीस मिनिटें याप्रमाणें घालवावीं. हें करतांना कोणाच्या मनास विनाकारण दुःख न पोंचेल याविषयीं दक्षता बाळगावी, हें सांगणें नकोच !

**सोवळें-ओवळें**

यानंतर भोजनास बसावें. तत्पूर्वी हातपाय धुण्याची चाल आहे ती योग्यच आहे. काय खावें याचा विचार मागें भोजनविवेक या प्रकरणांत केलाच आहे ! येथें फक्त कसें जेवावें याचाच विचार केला म्हणजे झालें. या विचारांत सोवळ्याचा विचार प्रामुख्यानें आज केला जातो. त्याची तत्त्वशुद्धि प्रथम पाहिली पाहिजे. मराठींत सोवळें या शब्दांत जेवढा अर्थ येतो तितका तंतोतंत अर्थ दाखविणारा शब्द संस्कृतांत नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील व मद्रासेकडील या विषयांतील आचार अगदीं विभिन्न आहेत. परंतु तत्त्वदृष्ट्या पाहिलें तर स्वच्छता किंवा शुद्धता यापलीकडे कोणत्याही मोठ्या गहन तत्त्वाचा त्यांत समावेश नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. धाबळींत ‘ दहा बळें ’ असतात म्हणून ती अधिक सोवळी हें विधान जितकें हास्यास्पद तितकेंच रेशमी वस्त्रांत वीज असल्यामुळें अन्नपचनाच्या दृष्टीनें तें अधिक प्रशस्त हें आधुनिक भासणारें विधानही हास्यास्पद होय. पूजेंत निराळें वस्त्र वापरणें बरें म्हणून मूळ नेहमींच्या कापसाच्या वस्त्राहून निराळीं रेशमी व लोक-

रीचीं वस्त्रें देवपूजेंत समाविष्ट झालीं व मागाहून जेवणांतही तीं सोवळें म्हणून वापरलीं जाऊं लागलीं. पण तत्त्वतः रोज धुतल्या जाणाऱ्या कार्पासवस्त्रांहून त्यांस कोणत्याही दृष्टीनें अधिक महत्व नाहीं. धाबळीचें सोवळें तर जेवतांना वास्तविक त्याज्य मानलें गेलें पाहिजे. कारण तिची वीण नीट नसेल तर, तसेंच धाबळी जुनी झालेली असल्यासही तिच्यांतून बारीक बारीक धागे सुटून पडत असतात. ते अन्नांत व पाण्यांत पडण्याचा फार संभव असतो. म्हणून धाबळी जेवणाच्या कामांत वर्ज्य समजावी हे बरें. रेशमी मुकटे निदान आठवड्यास तरी धुतले जाण्याची खबरदारी घ्यावी. तागी मुकटेही वापरण्यास हरकत नाहीं. पण या सर्व सोईच्या गोष्टी आहेत. जेवतांना निराळें वस्त्र वापरणें अनेक दृष्टींनीं सोईचें आहे. व तेवढ्याच दृष्टीनें सोवळ्यास किंमत दिली पाहिजे.

**वस्त्रांतराची रूढि**

जेवतांना व घराबाहेर एकच वस्त्र उपयोगांत आणणें बरें नव्हे. जेवतांना, घरांत व बाहेर निरनिराळीं वस्त्रें वापरण्याची पाश्चात्यांची चाल आपल्या प्राचीन ऋषींसही संमत होती. ' शयनागारांत, रस्त्यांत व देवपूजेंत वेगवेगळीं वस्त्रें वापरावीं* ' असें जुन्या ग्रंथांत विधान आहे. पाश्चात्यांचें बाह्य पोषाखाचे बाबतींत आपण अनुकरण केलें. परंतु निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळे पोषाख वापरण्याची त्यांची पद्धत योग्य फेरफार करून आपण घेतली नाहीं. कांहीं आर्य महिलांत बाहेरून घरांत येतांच वस्त्रांतर करण्याचा प्रघात आहे, तो या दृष्टीनें योग्यच ठरतो. मात्र तो हें तत्त्व समजून केला गेला पाहिजे. याप्रमाणें घरांतील व बाहेरील पोषाख निराळे असतील तर जेवतांना वस्त्रांतराची जरूर नाहीं.

---

* अन्यदेव भवेद्वासः शयनीयेऽन्यदेव तु ।
अन्यद्रथ्यासुदेवानामर्चायामन्यदेव हि ॥ याज्ञ. अपरार्क १।१३१

भोजन कसें करावें याविषयीं आरोग्यशास्त्राचे नियम आहेत. ते नीट समजावून घेऊन त्याप्रमाणें वर्तन ठेवावें.

**जाणिजे यज्ञकर्म** भोजन करतांना तें कसें तरी 'उदरंभरण' किंवा 'खळगी भरणें' या हीन दृष्टीनें करूं नये. तें एक यज्ञकर्म आहे या दृष्टीनें करावें. शरीर हें धर्माचें प्रमुख साधन व अन्न हें त्या शरीराच्या धारणपोषणाचें साधन अशा भावनेनें भोजनाकडे पाहिलें पाहिजे. या दृष्टीनें भोजनास सुरवात करतांना 'वदनिं कवल घेतां' यासारखा मराठी किंवा 'अहं वैश्वानरो भूत्वा' यासारखा संस्कृत श्लोक म्हणण्याचा परिपाठ ठेवावा. स्मृतिकारांनींही भोजनास प्रारंभ करतांना 'त्यास आधीं नमस्कार करावा' * तसेंच 'भोजन आनंदित मनानें करावें'* असें सांगितलें आहे तें याच कारणामुळें.

येथपर्यंत सकाळीं उठल्यापासून भोजनापर्यंतच्या कार्यक्रमांचें विवेचन झालें. भोजनोत्तर ज्यानें त्यानें आपापल्या उद्योगाचा मार्ग धरावा हें सांगणें नकोच! नोकरीवर गेल्यावर कसें वागावें हाही एक महत्त्वाचा विषय आहे, पण त्याचें विवेचन पुढील प्रकरणांत पाहूं. म्हणून आतां मुख्यत्वेंकरून सायंकाळीं कामावरून आल्यावर काय करावें, याचाच विचार करावयाचा म्हणजे हें प्रकरण संपेल! परंतु तत्पूर्वीं माधुकरी, खाणावळ तसेंच घरांतील महिलावर्गाचे कार्यक्रम यांबद्दलही थोडें विवेचन करणें अवश्यक आहे. ज्यांना घरांत जेवावयास मिळतें त्यांचा विचार झाला. त्यानंतर ज्यांचें भोजन परतंत्र आहे त्यांचाही विचार ओघानेंच प्राप्त होतो. हें भोजन दोन तऱ्हेचें असतें. एक विकत व दुसरें फुकट! पैसे देऊन खाणावळींत जेवणें हा पहिला प्रकार असून वार लावून किंवा माधुकरी मागून भोजन संपादन करणें हा दुसरा प्रकार होय. पैकीं दुसऱ्या प्रकाराचा प्रथम विचार करूं.

---

* अन्नमादौ नमस्कृत्य प्रहृष्टेनान्तरात्मना।

जुन्या धर्मशास्त्राप्रमाणें विद्यार्थ्यांनीं मग ते घरचे गरीब असोत किंवा श्रीमंत असोत माधुकरीच मागून निर्वाह केला पाहिजे असें आहे. भुंगे ज्याप्रमाणें नाना फुलांतील मधु सेवन करतात, त्याचप्रमाणें विद्यार्थ्यानें अनेक घरांतून भिक्षारूपानें अन्न आणून सेवन करावें, असें धर्मशास्त्र सांगतें. विद्यार्थ्यांच्या मागें स्वयंपाकाची दगदग नसावी, त्याचा विद्याभ्यास निर्विघ्नपणें व्हावा, म्हणूनच धर्मशास्त्रानें ही आज्ञा घालून दिलेली आहे. अर्थात् माधुकरी मागणारांस त्यांत कमीपणा वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. तसेंच केवळ ब्राह्मणांनींच ती मागावी असेंही नाहीं. कोणत्याही वर्णाच्या विद्यार्थ्यास माधुकरी मागण्याचा हक्क आहे.

**माधुकरी व वारकरी**

मात्र त्याबरोबरच अशा विद्यार्थ्यांकडे ‘ माधुकऱ्या ’ या विशेषणानें द्योतित होणाऱ्या हीन वृत्तीनें इतर लोकांनीं पहावें हें धर्मविरुद्ध आहे, हेंही ध्यानांत घेतलें पाहिजे. पूर्वींप्रमाणें नुसती अन्नाची चिंता दूर होऊन आतां काम भागत नाहीं. विद्यार्थ्यास भोजनाखेरीज कपडालत्ता, पुस्तकें, वह्या, फी वगैरे कित्येक खर्च करावे लागतातच. माधुकऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस कमी होऊं लागलेली आहे. तथापि अजूनही पुण्यासारख्या मोठ्या शहरांत व जिल्ह्याच्या ठिकाणींही माधुकरीची पद्धत चालू आहे. या विद्यार्थ्यांस सन्मानपूर्वक ताबडतोब भिक्षा घालावी असें धर्मशास्त्र आहे. शिळेंपाकें विद्यार्थ्यांस देऊं नये असेंही सांगितलेलें आहे. पण या नियमाचें आचरण आजच्या गृहस्थांकडून तत्परतेनें होत नाहीं, असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. ‘ अवकाश आहे ’ ‘ जेवण आटोपलें ’ अशा उत्तरांनीं माधुकरी टाळले जातात हें अयोग्य आहे. धर्मशास्त्रांत ‘ जर वैश्वदेव* व्हावयाचा असेल तर

---

* अकृते वैश्वदेवेऽपि भिक्षौ च गृहमागते ।
उद्धृत्य वैश्वदेवार्थं भिक्षां दत्वा विसर्जयेत् ॥
भिक्षां च भिक्षवे दद्यात् परिव्राड् ब्रह्मचारिणे ॥ हारीत ४।६०,६१

वैश्वदेवापुरतें अन्न बाजूला काढून ठेवून तावडतोब भिक्षा वाढावी ' असें स्पष्ट सांगितलें असून ' नैवेद्य व्हावयाचा आहे ' या सबबीवर कित्येक धर्मध्वजी माधुकरी घालण्याचें टाळतात, यास काय म्हणावें, हेंच कळत नाहीं. माधुकरी विद्यार्थ्यांची खोटी करणें, त्यास वाईट अन्न घालणें, त्यास भिक्षा घालण्याचें टाळणें किंवा त्यास भिक्षा मागण्यांत लाज वाटेल असें वागणें हें सर्व धर्मशास्त्रदृष्ट्या निषिद्ध आहे.

वारकऱ्याशीं वागतानाही असाच विचार केला पाहिजे. मुंबईसारख्या शहरांत माधुकऱ्यांपेक्षां वारकरीच फार असतात. त्यांच्याशीं वागतांना गृहस्थांनीं विशेष सौजन्यानें वागलें पाहिजे. सात वारीं सात ठिकाणीं जेवणारास सातही गृहस्थ आपला नोकर समजूं लागले तर तो बिचारा वारकरी आपला विद्याभ्यास कसा करूं शकेल ? वारकऱ्यांस वाटेल तेव्हां काम सांगतांना वारकरी म्हणजे नोकर नव्हे हें क्वचितच लक्षांत घेतलें जातें; पण हें योग्य नव्हे. तसेंच वारकऱ्यास एकाच पंक्तींत भिन्न प्रकारचें अन्न वाढणें, त्याची त्याच्या गरीबीबद्दल चेष्टा करणें, घरीं अडचण आली असतां आयत्या वेळीं त्यास नाहीं म्हणून सांगून, स्वतः खाणावळींत जाणें वगैरे कित्येक गर्ह्य प्रकार कोठें कोठें दिसून येतात; ते इतःपर बंद करण्यांत यावे.

सर्वच वारकरी प्रांजल असतात असेंही कोणी मानूं नये. ज्याच्या घरीं आपण जेवतों त्यास आपण होऊन आपल्या अभ्यासाबद्दल माहिती देणें तर दूरच पण ' काय रे अभ्यास कसा काय चालला आहे ? ' अशा साध्या प्रश्नानेंही माथें फिरून जाऊन स्वतःच वार बंद करणारे मानी ( ? ) वारकरीही दिसून येतात. त्यांना त्यांच्या या मूर्ख-पणाबद्दल कोणीही धन्यवाद देणें शक्य नाहीं. असो. आतां खाणा-वळींचा विचार करूं.

अन्न विकणें व विक्रीचें अन्न खाणें या दोन्ही गोष्टी प्राचीन स्मृति

ग्रंथांप्रमाणें सामान्यतः गर्ह्यच ठरविलेल्या आहेत.

**अन्नविक्रय पाप आहे काय ?** पूर्वी अन्न मुबलक होतें यामुळें व अतिथिसत्कारास लोक तत्पर असत म्हणूनही अन्नविक्रय करणाऱ्या भोजनालयांची त्या वेळीं आवश्यकताच नव्हती. अर्थात् त्या वेळच्या धर्मज्ञांपुढें खाणावळींची व्यवस्था कशी ठेवावी हा विषय उपस्थित होणें शक्य नव्हतें. पण आज याबाबतींत परिस्थिति अगदीं बदललेली आहे. अन्न सुखासुखीं प्राप्त होत नाहीं. अशा स्थितींत अन्नदानपूर्वक अतिथिसत्कार कोण करणार ? शिवाय नोकरी-धंद्याच्या निमित्तानें वर्षानुवर्ष बाहेर गांवीं एकट्यानें राहणाऱ्यांनीं काय करावें ? तेव्हां आज खाणावळींत जेवणें व खाणावळ घालणें या दोन्ही गोष्टी अधर्म्य मानून चालणार नाहीं.

खाणावळीच्या मालकांनीं मात्र केवळ धंदा म्हणून वाटेल तसें वागणें धर्मास धरून होणार नाहीं. ते समाजाचे

**खाणावळींची व्यवस्था** अन्नदाते आहेत. त्यांनीं समाजास द्यावयाच्या अन्नाच्या स्वच्छतेकडे लक्ष दिलेंच पाहिजे. केवळ गिऱ्हाईक अडलेलें आहे असें पाहून वाटेल तसलें अन्न त्याच्या पानांत वाढणें किंवा त्यास दुरुत्तरें करणें योग्य नव्हे. धार्मिक, सामाजिक वगैरे कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी खाणावळीच्या मालकांनीं वाढपी, अन्नपात्रें व जागा यांच्या स्वच्छतेकडे कसोशीनें लक्ष दिलेंच पाहिजे. तें कर्तव्य न पाळतां त्यांनीं कितीही देवपूजा केल्या तरी त्या व्यर्थ आहेत. वरील चारांपैकीं वाढपी, अन्न व पात्रें यांच्या स्वच्छतेचे मार्ग सर्वप्रसिद्धच आहेत. पण चवथ्याच्या शुद्धतेच्या प्रकाराबद्दल बराच गैरसमज पसरलेला आहे म्हणून त्याचा येथें विचार केला पाहिजे.

ज्या खाणावळींत जेवणाची जागा फरशीची किंवा लादीची असते त्या जागेवरही जेवणानन्तर भूमिशुद्धि म्हणून शेणच लावण्यांत

**एक गलिच्छ प्रकार** येतें. तें शेण अर्थातच वाळत नाहीं. व त्याची घाण भोजनगृहांत सर्वत्र पसरत असते. अगदीं 'सुग्रास भोजनगृहां'तही या घाणीमुळें डोकें उठून जाण्याचा प्रसंग येत असतो. हा प्रकार कोणाच्या आजपर्यंत लक्षांत आला नसेल असें नाहीं. पण धार्मिक भावना दुखवतील या भीतीनें या प्रकारास आळा घालण्याचें कोणी मनावर घेत नाहीं. पण ही घाण धर्मशास्त्रसंमत मुळींच नाहीं. दगडाच्या जमिनीवरही शेण लावावें असें धर्मशास्त्र सांगत नाहीं. कारण दगडाची शुद्धि राख किंवा माती लावून जलप्रक्षालनानें (पाण्यानें धुऊन) होते असें धर्मशास्त्र सांगतें. (मनु-५·१११) तेव्हां याच *प्रकारानें भूमिशुद्धि करण्याचा प्रघात खाणावळवाल्यांनीं ठेवला तर अंधश्रद्धेच्या भरीस पडून शेणाच्या पुटांनीं उत्पन्न होणाऱ्या दुर्वासास खाणावळींतून हद्दपार करतां येईल ! केवळ खाणावळींतच नव्हे तर घरींहि लादीवरून शेण लावणें बरें नव्हे. हें कित्येक सोवळ्या (?) गृहस्थांनींही लक्षांत घेणें आवश्यक आहे. असो. खाणावळीच्या मालकांनीं काय करावें हें पाहून झाल्यावर, त्यांत, जेवणारांनीं कसें वागावें हेंही पाहिलेंच पाहिजे. म्हणून आतां त्याच-विषयाकडे वळूं.

**जेवणारांचें कर्तव्य** ज्याप्रमाणें खाणावळींत स्वच्छता ठेवणें हें मालकांचें कर्तव्य, त्याचप्रमाणें ती राखणें हें जेवणारांचेंही कर्तव्य आहे. पैसे देऊन तेथील व्यवहार होत असला तरी तेवढ्यावर वाटेल तशी अरेरावी करणें इष्ट नाहीं. कित्येक भूक नसतांही पुष्कळ अन्न मागून घेतात

* माती व राख यांपेक्षांहि आतां शहर वस्तींत सोडा किंवा साबणच या कामीं अधिक सोईचे पडतील. म्हणून खाणावळींच्या मालकांनीं इतःपर सोडा-साबणांचाच याकामीं उपयोग करणें इष्ट होय.

व तसेंच पानांत टाकून देतात हें अत्यंत गर्ह्य आहे. इतक्या संकुचित मनोवृत्तीचा मनुष्य समाजांत वावरणें घातुक आहे. धार्मिक दृष्टीनेंही 'अन्न हें पूर्ण ब्रह्म' असल्यामुळें त्याचा अव्हेर करणें योग्य नव्हे.

**जेवणारांचा पोषाख**

खाणावळींत कित्येक सोवळें नेसून, कित्येक ओवळ्यानें पण उघडेच व कित्येक कपडे चढवून जेवावयास बसतात. ( यांतही नुसता सदरा घालून, फक्त टोपी काढून, तीही घालून असे अनेक प्रकार आहेतच ) पैकीं सोवळ्याबद्दल मागें लिहिलेंच आहे. आठवड्यानें किंवा महिन्यानें धुतल्या जाणाऱ्या सोवळ्यापेक्षां रोज धुतलें जाणारें वस्त्रच अधिक प्रशस्त होय. घर सोडून परक्या ठिकाणीं उघड्यानें बसणें अशिष्टपणाचें गणलें जातें. धर्मशास्त्रांतही एका वस्त्रानिशीं भोजन करूं नये ( **नैकवस्त्रधरो....भुञ्जीत** ) असें सांगितलेलेंच आहे. तेथें दुसरें वस्त्र म्हणजे सदरा असा अर्थ नसून उपरणें असाच आहे. परंतु सध्यां उपरणें फारसें कोणी वापरीत नाहीं. हें लक्षांत घेतां सदरा घालून जेवावयास बसावें हें बरें. तात्पर्य, खाणावळींत उघड्यानें जेवावयास न बसतां सदरा ( स्वच्छ धुतलेला ) घालून बसावें हे चांगलें. कोट-टोपी खुंटीस ठेवावी. सर्वांनीं हातपाय धुऊनच पाटावर बसावें. तोंड व पाय एकाच फडक्यानें पुसूं नयेत. घरांत देखील या दोन अवयवांकरितां दोन निरनिराळीं फडकीं ठेवावीं.

**महिला-वर्गाचें कर्तव्य**

ज्या महिला शाळेंत जात असतील त्यांचा कार्यक्रम विद्यार्थ्यांप्रमाणेंच असणार! अर्थात् अकरानंतर त्या घरांत असणेंच शक्य नाहीं. राहिल्या विवाहित महिला. त्यांनीं बारा साडेबारापर्यंत सर्व कामें आवरून थोडी विश्रांति घ्यावी. नंतर एक दोन तास तरी रामायण, महाभारत, पांडवप्रताप, हरिविजय वगैरे धार्मिक ग्रंथ वाचावे. शेजारीं शेजारीं राहणाऱ्या महिलांनीं एकत्र बसून वाचावयासही हरकत

नाहीं. कोणी अधिक शिकलेली असेल तर तिनें उच्च प्रतीचें वाङ्मय वाचणें व आपल्या सहव्यवसायी भगिनींस अधिक सज्ञान करणें वगैरे कामें हौसेनें करावीं. कोणाला शिवणकाम, भरतकाम वगैरे येत असेल तर तेंही इतरांस शिकवावयास हरकत नाहीं. जुनीं गाणीं अलीकडे मागें पडूं लागलीं आहेत पण हें बरें नाहीं. नव्या छापील गाण्याचा कितीही उदोउदो झाला तरी जुन्या गाण्यांतील खुमारी त्यांत नाहीं, हें चाणाक्ष महिलांनीं लक्षांत घेऊन हें 'जुनें ठेवणें' स्वतःच्या पाठांतरांत आणण्याचा अवश्य प्रयत्न करावा! घरांतील निवडणें, झाडलोट वगैरे कामें करावीं हें सांगणें नकोच! याप्रमाणें सर्व झाल्यावर पांचच्या सुमारास सोबतिणींबरोबर एखाद्या देवळापर्यंत किंवा फिरावयास जावें. येतांना भाजी आणण्याचें कामही स्वतःच करावें. रोजच्या भाजीकरितां पतीला त्रास देऊं नये. याप्रमाणें घरांतील व बाहेरील कामें आटोपून घरांतील पुरुष मंडळी कामावरून परत येण्याच्या वेळेपूर्वीं घरांत हजर व्हावें.

विद्यार्थ्यांच्या शाळा लवकर सुटतात. त्यांनीं नवीन झालेल्या अभ्यासाचें थोडा वेळ चिंतन करून सायंकाळचे वेळीं खेळांचा व्यायाम घ्यावा! इतरांनीं फिरावयास वगैरे जावें. प्रत्येकानें थोडा वेळ मोकळ्या हवेंत जाऊन निसर्गाप्रमाणें आपलें मन विशाल केलें पाहिजे. इमारतींत सारखें बसल्यामुळें तें संकुचित होतें; अशा मनाच्या मनुष्यांत कुकल्पना वास करूं लागतात. अशा मनुष्याला धर्माचें व्यापक ध्येय कळणें शक्य नाहीं. म्हणून प्रत्येकानें उघड्या हवेंत थोडा तरी वेळ घालवावा!

आधीं संध्या नको, त्यांत सायंसंध्येचें नांव कोण काढूं देणार?

**सायंसंध्येचें स्थान**

कोणी म्हणतील 'सकाळीं एक संध्या करावयाला लावलेंत तेवढें नाहीं का पुरे झालें? पुन्हां संध्याकाळीं कां त्रास? चांगलें ऐटींत फिरावायला जावयाचें कीं तुमची संध्या करीत घरांत बसावयाचें?'

यावर आम्हांला एवढेंच सांगावयाचें आहे कीं 'सायंसंध्या बहिर्देशे' 'ततः संध्यामुपासीत बहिर्गत्वा विधानतः' (हारीत: ४.६८) वगैरे धर्मशास्त्रांतील वचनें याचकरितां आलेलीं आहेत. ऋषि सायंकाळीं 'ऐटींत' फिरूं नका असें म्हणत नाहींत. फिरावयास मिळावें म्हणून त्यांनीं वरीलसारख्या वचनांत मुद्दामच 'सायंसंध्या बाहेर जाऊन करावी' असें सांगितलें आहे. तात्पर्य, सायंकाळीं खुशाल फिरावयास जावें. संध्येच्या वेळीं नदी, ओढा, स्वच्छ पाण्याचा तलाव ( किंवा निदान नळ; घरांतही जर नळाचेंच पाणी वापरलें जातें तर बाहेर त्याचें वापरण्यास हरकत वाटण्याचें कारण नाहीं. ) वगैरे ठिकाणीं कांहीं वेळ थांबून स्वच्छ हातपाय धुवून संध्या करावी. त्यांत कोणतीही गैरसोय नाहीं, फक्त मनांत असलें पाहिजे. सायंकाळीं सभा असल्यास संध्येचें काय करावें याबद्दल पुढें विसाव्या प्रकरणांत विवेचन आहेच; तें तेथेंच पहावें.

**स्तोत्रपाठ**

पहाटेस जशा भूपाळ्या तशींच रात्रीं स्तोत्रें म्हणणें उपयुक्त आहे. रामरक्षा, गंगालहरी, महिम्न वगैरे संस्कृत तसेंच मनाचे श्लोक, करुणाष्टकें, केकावली यांसारखीं मराठी स्तोत्रें मधुर आवाजांत म्हणत म्हणत भोजनाचे तयारीस लागावें. या कार्यक्रमांत कुटुंबांतील सर्वांनीं समभावानें* भाग घ्यावा. त्यांत दुजाभाव ठेवूं नये. तसेंच लाजही मानूं नये. कित्येक घराण्यांत मोठीं माणसें स्वतः संध्या किंवा स्तोत्रपाठ न करितां लहानांवर मात्र त्याची सक्ति करतात, पण हें उचित नाहीं. यामुळें विनाकारण मुलांमध्यें प्रतिक्रियेच्या सिद्धान्ताप्रमाणें या धार्मिक आचारांबद्दल

---

* केवळ याच बाबतींत नव्हे तर झाडलोट वगैरे सर्वच बाबतींत समभाव ठेवावा ! अमुक काम बायकांचें व अमुक पुरुषांचें असें ठरवूं नये. ज्याला सवड व शक्यता असेल त्यानें घरांतील कोणतेंहि काम करावें. याच उपायानें घरांतील समान हक्काचा प्रश्न सामोपचारानें मिटूं शकेल !

द्वेष मात्र उत्पन्न होतो. ईश्वरोपासना ( संध्या, स्तोत्रपाठ वगैरे ) सर्वांस सारखीच आवश्यक आहे हें लक्षांत घेऊन घरांतील मोठ्यांनींच हे आचार तत्परतेनें पाळण्याची खबरदारी घ्यावी, म्हणजे न सांगतांच लहान मुलें अनुकरण करूं लागतील !

**तुका म्हणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥**

हें संतांचें महावाक्य अत्यंत मननीय आहे. तरी या सायंकाळच्या स्तोत्रपाठांत सर्वत्रांनीं अगत्यपूर्वक भाग घ्यावा हेंच उचित होय. अलीकडे बहुधा सर्व महिला लिहिण्यावाचण्यांत दक्षच असतात. त्यांस एखादें संस्कृत स्तोत्र म्हणण्यांत अभिमान वाटला पाहिजे.

**रात्रींचें भोजन**

ज्यांना दिवसा कारखाना वगैरे ठिकाणीं काम करण्याचा प्रसंग पडलेला असेल त्यांनीं या वेळीं वस्त्रांतर अवश्य केलेंच पाहिजे. तसेंच दुपारीं कामाच्या गडबडीमुळें सर्वांस स्वस्थपणानें एकाच पंक्तीस भोजन करतां येत नाहीं, त्याचीही दुरुस्ती याच वेळीं करावी. लहान मुलांची कुचंबणा करूं नये. त्यांस लवकर जेऊं घालून अभ्यासास मोकळीक करून द्यावी. मोठ्या ( नोकर ) मंडळींनीं मात्र एकमेकांची वाट पाहून या वेळीं एकदमच जेवावयास बसावें. या वेळीं कौटुंबिक बाबींची चर्चा तारतम्यानें करावयाला हरकत नाहीं. नवराबायको अशीं दोघेंच असतील तर एकमेकांनीं दुपारच्या वेळांत कांहीं विशेष केलें असल्यास त्याबद्दल चर्चा करावी. भोजनोत्तर शेजाऱ्यांची विचारपूस, कांहीं विशेष बातमी असल्यास त्याबद्दल चर्चा, असें करून साडेदहाच्या सुमारास झोपीं जावें.

व्यवसायांत गुंतलेल्या हिंदूचा रोजचा कार्यक्रम कसा असावा याचें सामान्यस्वरूप येथवर पाहून झालें. आतां रोजच्याच कार्यक्रमांपैकीं एका दृष्टीनें महत्त्वाच्या विषयाकडे वळूं.

# प्रकरण तेरावें

## जीवनव्यवसाय

मागील प्रकरणांत रोजच्या कार्यक्रमांचें वर्णन केलें. आर्थिक व्यवसायांचा ऊहापोह त्या प्रकरणांत केला नाहीं. पण रोजच्या कार्यक्रमांत त्याचा अन्तर्भाव नाहीं असें मात्र कोणी समजूं नये. जुन्या भाषेंत सांगावयाचें तर ' पोट लागलें पाठीशीं हिंडवितें देशोदेशीं ' अशी वस्तुस्थिति असल्यामुळें रोजगार किंवा धंदा यांचा विचार निदान आज तरी फार महत्त्वाचा ठरलेला आहे. शिक्षण, विचार, आचार या सर्वांवर आजच्या व्यवसायांचा भरपूर परिणाम झालेला दिसतो. म्हणून समाजाची आचारक्रान्ति घडवून आणावयाची तर व्यावसायिक जीवनाचाही ( धंद्याचाही ) विचार करणें प्राप्त आहे.

कित्येकांस ही प्रस्तावना वाचून आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. स्नान–संध्या–जप–जाप्य म्हणजेच धर्म अशी ज्यांची समजूत असेल त्यांस नोकरीधंद्यांचें विवेचन धर्मशास्त्राच्या नांवाखालीं करणें आवडणार नाहीं. पण या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणांत जें धर्माचें तात्त्विक विवेचन केलेलें आहे तें लक्षांत घेतल्यास हा गैरसमज दूर होईल. व्यक्तीची व समाजाची उन्नति हें धर्माचें ध्येय आहे. आज साधारण व्यक्तीला निदान रोजचे ७–८ तास तरी उदरव्यवसायांत घालवावे लागतात. प्रत्येक दिवशीं इतका वेळ अनिर्बंध आचरणांत घालविणारा इतर वेळांत धार्मिक गुणांच्या वाढीस पोषक वर्तन करूं शकेल असें मानणें म्हणजे मानवी प्रवृत्तीचें अज्ञान प्रगट करणेंच होय ! ज्याकाळीं स्मृतींची रचना झाली तेव्हां आजच्याप्रमाणें जीवनकलह तीव्र स्वरूपाचा नव्हता. यामुळें कोणीं कोणता व्यवसाय करावा हें सांगण्यापलीकडे स्मृतिकारांनीं फारसें विवेचन या बाबतींत केलेलें

नाहीं. पण याचा अभिप्राय ' धंद्याच्या बाबतींत अनिर्बंध वर्तन करावें ' असा नाहीं. किंबहुना याच कल्पनेच्या आहारीं गेल्यामुळें आज बरेच लोक नोकरीधंद्यास नालायक ठरत आहेत. म्हणून या विषयावर या प्रकरणांत स्वतंत्रपणें विवेचन करणें आवश्यक झालें आहे.

आज पोथीजात धंदे कोणीच पाळीत नाहींत. पोथींत नसलेलेही विमा, वकिली यांसारखे अनेक धंदे आज नवीन उत्पन्न झालेले आहेत. त्या सर्वांचें विवेचन येथें करणें शक्य नाहीं. म्हणून आज सुशिक्षितांमध्यें प्रामुख्यानें रूढ असलेल्या कांहीं व्यवसायांचेंच येथें संक्षिप्त विवेचन देण्याचें ठरविलें आहे. त्यावरून तारतम्यानें विचार केल्यास इतर व्यवसायांस अनुकूल अशाही सूचना मिळतीलच. म्हणून आतां प्रथम कारकुनीपेशाचा विचार करूं.

कारकुनीपेशा फार पूर्वींपासून निदान महाराष्ट्रांत तरी रूढ होता असें दिसतें. पण त्याचें तंत्र आतांइतकें तेव्हां भानगडीचें नव्हतें.

**' ब्राह्मणें बाळबोध अक्षर, घडसून करावें सुंदर '**
**' दिसामाजि कांहींतरी तें लिहावें '**

यांसारखीं संतवचनें पाहिलीं म्हणजे केवळ सुंदर लिहिणें किंवा फार झालें तर जमाखर्च ठेवणें यापलीकडे कारकुनीपेशाचें स्वरूप पूर्वीं नव्हतें हें दिसून येतें. पेशवाईत वरपरीक्षा बोरूच्या लेखणीचा स्वतः टाक तोडून अक्षर काढून दाखविणें या बिकट (?) कलेवर होत असे, असें म्हणतात. पण आज चांगल्या अक्षराच्या व जमाखर्चज्ञानाच्या पुण्याईवर बढतीचा स्वर्ग गांठणें अशक्य आहे. आजच्या कारकुनीपेशाचें तंत्र इतकें सुलभ नाहीं.

कित्येक हें तंत्र न समजून घेतांच खुशामतीच्या किंवा परनिंदेच्या कानमंत्रावरच काम भागवीत असतात. पण असल्या प्रकारांचा अवलंब करणें स्वतःच्या चालू व्यवसायास तसेंच वैयक्तिक व सामाजिक

उन्नतीस कसें घातक आहे हें समजून घेणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. म्हणून या त्रिविध घातांचें आतां विवेचन करूं.

खुषमस्कऱ्या आपलें मुख्य काम कारकुनी असून त्या कामाच्या चांगलेपणावर आपली बढती अवलंबून आहे हें लक्षांत घेत नाहीं. या मुख्य मुद्दयाकडे दुर्लक्ष झाल्यामुळें त्याचें स्वतःच्या कामाकडे दिवसेंदिवस लक्ष कमी होत जातें. कामांत कमी असूनही साहेबाच्या मर्जीवर आपलें आसन स्थिर करूं इच्छिणारा इतर प्रामाणिक कामकऱ्यांच्या द्वेषास पात्र होतो. या द्वेषाचें मूळ कारण दृष्टिआड करून खुषमस्कऱ्या उलट त्यांचाच द्वेष करीत वरिष्ठांजवळ त्यांच्या चुगल्या करूं लागतो. हा प्रकार वाढत गेला म्हणजे आत्मनिरीक्षणाचा अभाव, वृथा अभिमान, चहाडखोरी, द्वेषवृत्ति असल्या दुर्गुणांच्या वाढीस कितीसा वेळ लागणार? यामुळें दिवसेंदिवस त्याची अधोगतिच होत जाते. पुढें पुढें मोहांधतेमुळें या दुर्गुणांचें त्यास कांहींच वाटत नाहींसें होतें. ' जगांत पापाला लोक उगाच भितात ' असा एक सिद्धान्त (?) तो उगीच खरा मानूं लागतो. या सर्व गोष्टींमुळें सर्व ऑफिसांत त्याचा अनादर होऊं लागतो, व त्याच्या सामाजिक अवनतीस प्रारंभ होतो. साहेबाच्या मर्जीच्या भरंवशामुळें त्याला प्रथम प्रथम याही अवनतीचे कांहीं वाटत नाहीं. पण साहेबाचें इंद्रपद बदललें म्हणजे याचे एकदम डोळे उघडतात. अशा निराधार स्थितींत त्याच्याकडून एखादी क्षुल्लक चूक झाली तरी इतर त्यावर टपून बसतात, व राईचा पर्वत करण्यासही कचरत नाहींत. आतांपर्यंत स्वकीयांकडे तुच्छतेनें पाहणाऱ्यांची ही स्थिति मोठी केविलवाणी असते. अशावेळीं त्यांचे हाल कुत्राही खात नाहीं. नेटानें काम करण्याची संवय नसल्यामुळें बदलून आलेल्या नव्या अधिकाऱ्याचा वाईट शेरा टाळतां येणें अशक्यप्राय होऊन जातें. ही दुरवस्था ओढवण्याचें मूळ कारण आपल्या कामाकडे लक्ष न देतां खुशामत किंवा परनिंदा यांवर अधिक भर देणें हेंच होय!

असले खुषमस्कऱ्ये कांहींकाळ उत्कर्षास पोचलेले दिसले तरी शेवटीं* संकुचित मनोवृत्ति, द्वेष, कामचुकारपणा, असत्य या दुर्गुणांची वाढ होऊन ते वैयक्तिक व सामाजिक अवनतीचे भागीदार होत असतात. क्वचित् आर्थिक हानि दिसून न आली तरी स्वतःच्या कामाच्या चोखपणावर जगणाऱ्या कारकुनांच्या ठिकाणीं जो आत्मविश्वास व जें तेज दिसून येतें, त्यांचा अशा व्यक्तींत अभाव असतो हें कबूल केलें पाहिजे.

कांहीं अविचारी लोक याच्या अगदीं उलट दिशेनें वागतात. आपल्यावरील कामगाराशीं सरळ न वागणें हेंच त्यांचें ब्रीद असतें. ठराविक कामापलीकडे जरी अनायासानें वरिष्ठास मदत होण्यासारखी असली तरी ती न करण्याचें जणूं काय अशा लोकांनीं व्रतच घेतलेलें असतें. याचें उदाहरण म्हणून पुढील एक संवाद पाहण्यासारखा आहे.

**पो. मास्तर**—अहो, काणे, काल तुम्ही ऑफिसांतून जातांना मला सांगून नाहीं गेलां ?

**काणे**—मग सांगून गेलें पाहिजे असा रूल आहे काय ? ऑफिसची वेळ झाली तेव्हां माझें काम संपवून मी गेलों...........

**पो. मास्तर**–अहो, कायदा म्हणून का मी तुम्हांला म्हणतों आहें ? माझें खाजगी काम होतें.........

**काणे**—मास्तर, तुमचीं खाजगी कामें करण्यास मी बांधलेला नाहीं. तुम्हांला पगार मिळतो, त्यांतून तुम्हांला नोकर ठेवायला काय होतें ?

**पो. मास्तर**—नोकर ठेवायचा कीं काय तें मी पाहीन ! जातांना वाटेवरच एका दुकानांत चिठ्ठी देण्यास सांगणार होतों तुम्हांला.

---

* अधर्मेणैधते तावत् ततो भद्राणि पश्यति ।
ततः सपत्नान् जयति समूलस्तु विनश्यति ।

मनु. ४.१७४

काणे—पण ऑफिसच्या बाहेर मी तुमचें कोणतेंही काम करणार नाहीं.

वरील संवाद काय दाखवितो? वरिष्ठाशीं वेळीं–अवेळीं लांगूल-चालन करून चुगल्या करणें जितकें वाईट तितकेंच याप्रमाणें वेळीं अवेळीं कायद्याचा उद्धार करून उद्धटपणानें वागणेंही गर्ह्यच होय! नोकरी करणें म्हणजे माणुसकीस तिलांजलि देणें नव्हे हें प्रत्येकानें लक्षांत बाळगलें पाहिजे. वरिष्ठ अधिकाऱ्यानींही हें तत्त्व ध्यानांत धरलेंच पाहिजे. आपल्या हाताखालील सर्व कारकून म्हणजे आपले खाजगी नोकर, त्यांनीं आपल्यासमोर अदबीनेंच वागलें पाहिजे असा भलताच चष्मा लावून त्यांनीं हाताखालच्या लोकांकडे पाहूं नये. बरोबरीच्या कामगारांशींही फटकून न वागतां सलोख्यानें वागणें हेंच इष्ट आहे. आपलें काम होऊन वेळ शिल्लक असेल तर दुसऱ्यास मदत करण्यास हौसेनें तयार असावें. वेळ असून व शक्यता असून दुसऱ्यास मदत न करणें यासारखें शोचनीय कृत्य कोणतेंही नाहीं.

आमच्या कारकुनीपेशाच्याच लोकांकडून नव्हे तर सर्वच पेशाच्या लोकांकडून ही चूक होत असते. येथें दिग्दर्शनार्थच कारकुनीपेशा घेतलेला आहे. रोजच्या व्यवसायांत लांगूलचालन किंवा फटकळ वृत्ति या दोन टोकांचा अवलंब करणारेच फार! यामुळें आमच्या समाजांतील उत्कर्षाला व संघटनेला अनुकूल असलेले सर्व गुण लोपत चाललेले आहेत. प्रत्येक ऑफिसांत भांडणें, मत्सर, अनुदारपणा यांचें पीक वाढत असल्याचें दिसून येतें. आपल्या खालचा इसम वरचढ न होतां नेहमीं वचकांतच रहावा याबद्दल खाजगी व सरकारी दोन्ही ठिकाणीं सारखीच काळजी घेण्यांत येते. हाताखालील नोकरांच्या उन्नतीस प्रतिबंध करून त्यांचें जीवन याप्रमाणें अधिक दैन्यमय बनविणें हा माणुसकीचा अपमान आहे. आमचा धर्म अखिल मानवांकरितां आहे असें धर्माभिमानी पुढाऱ्यांनीं सांगावें व त्यांच्या अनुयायांनीं याप्रमाणें माणुसकीसही न

शोभणाऱ्या अनुदार वृत्तीनें वागावें ही विसंगति केव्हांही अभिलषणीय नाहीं. म्हणून यापुढें हिंदु धर्माच्या साऱ्या अनुयायांनीं असल्या क्षुद्र मनोवृत्तीस थारा न देतां बरोबरीच्या, खालच्या व वरच्या कामगारांशीं उदारपणाच्या व संघटनेच्या धोरणानें वागण्यास शिकावें.

कित्येकांची नोकरीकडे पाहण्याची दृष्टि अगदींच कोती असते. ज्या विभागांत काम करावयाचें त्याहून इतर विभागांची माहिती घेण्याचें तर दूरच. पण स्वतःच्या विभागाचेंही भरपूर ज्ञान अशा लोकांस नसतें. आपल्या विभागाचें एकंदर कार्यक्षेत्र किती, त्यासंबंधांत आपणास सवलती कोणकोणत्या आहेत वगैरे कांहींहीं न पाहतां निव्वळ सांगकामेपणानें वागणारेच फार असतात. कित्येक पगार कमी मिळतो म्हणून अंगचुकारपणानें काम करीत असतात. तेही आपलें काम नेटानें करीत नाहींत. त्यांच्या या हलगर्जीपणाचा फायदा घेऊन त्यांच्या मागाहून आलेले लोक जेव्हां त्यांच्या पुढें जातात तेव्हां मात्र या लोकांस आपल्या जुनेपणाच्या हक्काची पायमल्ली केल्याबद्दल राग येतो. पण मूळ चूक लक्षांत येत नाहीं. केवळ हमालीवृत्तीनें वागून दिवसेंदिवस आर्थिक व मानसिक अवनतिच व्हावयाची ! पैसा हेंच नोकरीचें व आयुष्याचें इतिकर्तव्य आहे. हा खोटा सिद्धांत उराशीं बाळगल्यामुळेंच हा अनवस्था प्रसंग येतो. परीक्षा हेंच शिक्षणाचें ध्येय या कल्पनेमुळें विद्यार्थ्यांचें जेवढें नुकसान होत आहे त्याहूनही अधिक नुकसान नोकरीच्या ध्येयाविषयींच्या भ्रान्त कल्पनेमुळें मध्यम वर्गाचें व पर्यायानें राष्ट्राचें आज होत आहे. तें थांबवावयाचें.तर त्यांनीं.नोकरी व पैसा यांच्या बरोबरच कर्तव्यतत्परता, स्वाभिमान वगैरे गुणांचेंही महत्त्व लक्षांत घेतलें पाहिजे. तें न घेतल्यामुळेंच नोकरीपेशांतील शेंकडा ८० लोकांस हमालाचेंही सुख न मिळून 'खर्डेघाशी' या कुत्सितशब्दानें व्यक्त होणाऱ्या दुर्दशेस त्यांस प्राप्त व्हावें लागतें. ही दुर्दशा थांबविण्याकरितां कसें वर्तलें पाहिजे हें वरील विवेचनावरून लक्षांत येईलच !

जनतेशीं वागतांनाही अशीच सावधगिरी बाळगणें आवश्यक आहे. याचें ठळक उदाहरण म्हणजे पोष्ट व रेल्वे यांतील कामगारांचें देतां येईल ! वाढत्या कामाच्या दाबामुळें व वरिष्ठांच्या करड्या नजरेमुळें हे लोक कित्येकवेळां बेजार झालेले असतात हें खरें आहे; पण त्याचा राग खिडकीवर येणाऱ्या जनतेवर काढून काय उपयोग ?

'मास्तर, जरा तिकिट द्या ना ?'

'मी कांहीं रिकामा बसलों नाहीं.'

असले संवाद वळ्याचें तेल वांग्यावर काढण्याच्या वृत्तीखेरीज दुसरें काय दाखवितात बरें ? जनतेशीं नेहमीं सौम्यपणें वागण्यास नोकरवर्गानें शिकलें पाहिजे.

'मास्तर, जरा मनीऑर्डर घेतां का एवढी ?'

'इतका वेळ झोपला होतास वाटतें ? तीन वाजून गेले ! तुला दिसत नाहीं ?'

या संवादांतील हेंच उत्तर निराळ्या भाषेंत देतां येईल, पण एवढा विचार करतो कोण ? पोष्ट व रेल्वे सर्वांच्या परिचयाची म्हणून त्याच खात्यांतील उदाहरणें येथें दिलीं आहेत. त्यावरून इतर ऑफिसांतील नोकरवर्गानेंही योग्य तो बोध घेतला पाहिजे. नोकरवर्गानें नोकरी हेंच आपलें ध्येय असें समजून त्यांतच निमग्न होऊं नये. नोकरीखेरीज व्यायाम, वाचन, सार्वजनिक कामें वगैरे बाबतींत सवडीनुसार हौसेनें भाग घेण्यास त्यांनीं तयार असलें पाहिजे. नोकरीपलीकडे कशाचीहि अभिरुचि नसणारास आठवड्याची सुटीही शिक्षेसारखी वाटते. त्यास वेळ कसा घालवावा हेंच कळत नाहीं. या दुरवस्थेचें कारण दैव नाहीं. 'आपली नोकरी बरी कीं बिऱ्हाड बरें' या घातुक कोत्या समजुतींतच या दुरवस्थेचें बीज आहे. ती नष्ट करावयाची तर रोज नोकरी करून शिल्लक राहिलेल्या वेळांत, आठवड्याच्या सुटींत, वार्षिक हक्काच्या सुटींत, वाचन, जनसेवा, पर्यटन, लोकनिरीक्षण,

व्याख्यानश्रवण किंवा निदान खेळ यांसारख्या गोष्टींत लक्ष घालून त्यांची गोडी लावून घेणें आवश्यक आहे.

व्यापारीवर्गानेंही हेंच तत्त्व ध्यानांत घेऊन व्यापाराबाहेर धर्मदृष्ट्या व समाजदृष्ट्या चाललेल्या चळवळींचा शक्य तितका अधिक परामर्श घेण्यांत तत्पर असलें पाहिजे. तसेंच न्यायनीति व व्यापार यांचें वांकडें आहे हा नसता सिद्धान्त उराशीं बाळगून व्यापाराचें व समाजाचें नुकसान करण्याचा आत्मघातकी प्रयत्न त्यांनीं करूं नये. स्पर्धेच्या नांवाखालीं जनतेस फसविण्याचे प्रयत्न राजरोस केल्यामुळेंही आपल्या व्यापारास बराच धक्का बसलेला आहे, ही गोष्ट दृष्टिआड करून चालणार नाहीं. तसेंच मृदुभाषित्वाचा गुण फार कमी प्रमाणांत असल्यामुळेंच महाराष्ट्रीय व्यापारधंद्यांत मागें राहतात असें कित्येकांचे मत आहे, त्याचाही योग्य विचार करणें आवश्यक आहे.

वकीलीचा धंदा करणारे कज्जेदलाली वाढविण्याचा केव्हांकेव्हां बुद्धिपुरस्सर प्रयत्न करतात. समाजदृष्ट्या हें किती घातुक आहे हें प्रत्येकास माहीत असतेंच; पण

१ धंदा म्हणून कांहींही केलें तरी चालतें,

व २ इतरांच्या खाजगी बाबींची चर्चा करणें अशिष्टपणाचें आहे,

या दोन सिद्धान्तांचा बागुलबुवा उभा करून या बाबतींत दडपादडपी केली जाते. जुगारासारख्या असमर्थनीय प्रकारासही वर्तमानपत्रकर्ते धंद्याच्या नावाखालीं कसा आश्रय देतात हें प्रसिद्धच आहे. पूर्वकाळीं नरकाच्या भीतीनें या प्रकारांस आळा घालतां येत असे. आजच्या चिकित्साप्रधान युगांत तसल्या भीतीनें काम भागणार नाहीं हें उघड आहे. परन्तु समाजघातांचे नरकाएवढें भय आजच्या सुशिक्षितांस वाटत नसेल तर तो आजच्या काळांतील मूर्तिमंत नरकच होय. स्वतःच्या विवेकशक्तीची सत्ता खुशीनें स्वतःवर चालविणारासच जुन्या पौराणिक कल्पनांस हसण्याचा अधिकार आहे. जुनीं नंधनें अतार्किक

म्हणून झुगारावयाचीं व नवीं ‘ तुम्हीं आमचें काय करणार ’ असला किंवा ‘ कळतें पण वळत नाहीं त्यास काय करावें ? ’ असला प्रश्न उपस्थित करून रूढ करण्यास दिरंगाई करावयाची असल्या बेजबाबदार कारभाराचें समर्थन केव्हांही करणें शक्य नाहीं. ज्यांस विवेकानें पटलेल्या गोष्टींचा पुरस्कार करणें शक्य नसेल त्यांनीं दण्ड हाच धर्म या मनुवचनास नाकें मुरडून विवेकवादाचें व्यर्थ अवडंबर माजविण्याचें कारण नाहीं. येथपर्यंतच्या विवेचनावरून उदरव्यवसायाच्या बाबतींतही सत्य, शम, दम, विवेक, तेजस्विता, सहकार, व्यापक दृष्टि वगैरे दैवी ( धार्मिक ) गुणांकडे लक्ष देणें कसें आवश्यक आहे हें कळून येईल अशी आशा आहे. असो, आतां शिक्षकांच्या व्यवसायाकडे वळूं.

शिक्षकांच्या व्यवसायाबद्दल लिहितांना त्यांच्यावर खरमरीत टीका करण्याऐवजीं त्यांची कींवच करावी असें वाटल्यावांचून रहात नाहीं. अर्थात् आमचें हें विधान प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षकांबद्दलचेंच आहे. वेतन अगदीं अल्प. कितीहि चांगलें काम केलें तरी दरमहा रु. ६०, ७० पलीकडे साधारणतः उत्पन्नाची मजल जावयाची नाहीं. प्राथमिक शिक्षणांत ‘ गमभन ’ शीं गांठ तर माध्यमिक शिक्षणांत वह्यांच्या ढिगाशीं प्रसंग ! अशा परिस्थितींत कित्येक शिक्षक चिडखोर तर कित्येक अनुदार व संकुचित मनोवृत्तीचे बनले तर त्यांत चूक कोणाची? मराठी शिक्षकांची तर सर्वांत केविलवाणी स्थिति असते. बिचाऱ्यांचें ज्ञान न वाढतां दृष्टि संकुचित व्हावी म्हणूनच कीं काय मराठी ट्रेनिंग मधून संस्कृत, बीजगणित वगैरे बुद्धीस प्रागल्भ्य देणाऱ्या विषयांची हकालपट्टी होऊन त्याजागीं बागाईत व नांगर आले आहेत. या दुरवस्थेचा उगम ब्राह्मणब्राह्मणेतरवादांतून झालेला आहे. सातवी पास झालेला ब्राह्मण जरी पहिला आला तरी त्यास तिष्ठत ठेवून ५ व्या किंवा ६ व्या नंबरच्या विद्यार्थ्यास–मागासलेल्या जातींस पुढें आणण्याच्या सबबीवर–ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्रवेश द्यावयाचा व त्यास

कठिण विषय पचत नाहींत म्हणून त्यास रुचेल व पचेल असेंच अन्न सर्व शिक्षकांनीं खाल्लें पाहिजे असा धारा पाडावयाचा असा प्रकार आज मराठी शिक्षणांत चालू आहे. या धाऱ्यामुळें मराठी शिक्षकांचा बौद्धिक दर्जा कमी होत असून त्याचा मराठी भाषेवर—मायबोलीवर—अनिष्ट परिणाम होत आहे. तो टाळावयाचा तर निदान अध्यापन-व्यवसायांत तरी जातवारीच्या धोरणास फाटा देणें आवश्यक आहे. ही चूक कित्येकांस कळत असली तरी ते ती ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाचें भूत पुन्हां उठूं नये म्हणून बोलून दाखवीत नाहींत. अशा स्थितींत ब्राह्मणेतरांनींच हा विषय हातीं घेऊन नीट घडी बसविणें आवश्यक आहे. ' नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ' हा श्रीकृष्णाचा संदेश लक्षांत घेऊन ब्राह्मणेतरांनींच ज्ञानसेवक शिक्षकांचा आर्थिक व बौद्धिक दर्जा वाढेल असें केलें पाहिजे. तसें ते न करतील तर पवित्र ज्ञानाची अवहेलना घडून अधर्म बळावल्यावांचून राहणार नाहीं.

प्रत्येक व्यवसायांतील धर्म्य व अधर्म्य वर्तनांचा आढावा घेणें या लहानशा प्रकरणांत शक्य नाहीं. नोकरी व धंदा यांत योग्यप्रकारें वागल्यानेंच धार्मिक उन्नति शक्य आहे एवढेंच येथें प्रामुख्यानें दाखवावयाचें आहे. जीवनांगभूत सर्व क्रियांचें नियमन करणारे धर्मशास्त्री उपजीविकेच्या साधनांच्या बाबतींत सूक्तासूक्तविचार ठेवण्यास सांगत नाहींत अशी जी कित्येकांनीं स्वतःची सोइस्कर गैरसमजूत करून घेतलेली आहे ती कशी चुकीची आहे एवढेंच दाखविण्याकडे येथें आमचा मुख्य कटाक्ष आहे. मनुमहर्षींनीं "पैशाच्या बाबतींत-पैसा कमविण्याच्या नोकरी धंद्यांत—जो शुद्ध वर्तनाचा तोच खरा पवित्र; नुसत्या बाह्य उपचारांनीं शरीर शुद्ध ठेवणारास पवित्र म्हणतां येणार नाहीं" असें जें एकाच श्लोकांत ( मनु. ५.१०६ ) सूत्रमय विधान केलें आहे त्यांतील स्वारस्य हेंच आहे.

कांहीं धंद्यांचें विवेचन या प्रकरणांत केलें आहे. खाणावळींबद्दल

नवव्या प्रकरणांत व मागील प्रकरणांतही विवेचन आहेच. वर्तमानपत्री व्यवसायांबद्दल पुढें १९ व्या प्रकरणांत विवेचन करावयाचेंच आहे. तेव्हां त्याबद्दल येथें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. म्हणून आतां प्रसंगोपात्त बेकारी व निर्वेतनव्यवसाय ( Honorary Service ) या दोन प्रकारांचा विचार करूं.

कामधंदा न मिळाल्यामुळें बेकारी प्राप्त होणें हा दैवाचा खेळ नाहीं. जेव्हां आर्थिक उत्पादन व त्याबद्दलचा अर्थोत्पादन करणाऱ्या मजुरांना मिळणारा मेहेनताना यांत प्रमाणबद्धता नसते, तसेंच काम आणि कामकरी यांच्या संख्येचा मेळ बसविलेला नसतो तेव्हांच बेकारी उत्पन्न होते. अर्थात् या बेकारीचा नायनाट करावयाचा तर प्रचलित अर्थोत्पादनाच्या व विनिमयाच्या पद्धतींत परिवर्तन केलें पाहिजे. या दृष्टीनें बेकारी नष्ट करावयाची तर फार मोठी चळवळ व संघटना यांची आवश्यकता आहे. तशी स्थिति प्राप्त होईल तो सुदिनच ! पण तोंपर्यंत बेकारांनीं स्वस्थ बसून भागणार नाहीं. जोंपर्यंत नोकरी किंवा व्यवसाय लाभत नाहीं तोंपर्यंत स्वतःची योग्यता वाढविण्याचा प्रयत्न करीत राहणें त्यांचें कर्तव्य आहे. सुतारी, हस्तव्यवसाय, टाइपराइटिंग, कागदांचीं चित्रें करणें, कंपोजिंग यांपैकीं किंवा अन्यही व्यवसाय सवेतन किंवा निर्वेतनही शिकत राहणें त्यांचें कर्तव्य आहे. बेकारांमध्यें स्वतः वेळ फुकट घालवून सर्व चळवळींकडे आंबट तोंडानें पाहण्याची व कार्यशून्यतेची वृत्ति वाढत आहे ती समाजास व राष्ट्रास घातक आहे. तरी त्यांनीं स्वस्थ न बसतां दिवसेंदिवस आपली योग्यता वाढेल असें करावें.

निर्वेतन सेवा करणें हें योग्यच आहे. पण अशा व्यक्तींनीं सवेतन सेवा करणारांची हेटाळणी करावी हें योग्य नव्हे. तसेंच सवेतन काम करणारापेक्षां निर्वेतन काम करणारा श्रेष्ठ असतो असेंही मानणें उचित नाहीं. ज्याला अन्यमार्गानें उदरनिर्वाहापुरतें द्रव्य मिळतें तोच या निर्वे-

तन कामगिरीस योग्य होय. पण ज्यास तसें अन्य साधन नसेल तो प्रकृत व्यवसायांतूनच निर्वाहाची अपेक्षा करणार ! तेव्हां श्रेठत्व–कनिष्ठत्व पगार घेण्या न घेण्यावरून ठरविणें बरोबर नाहीं. कामांतील चोखपणावरूनच तें ठरविलें गेलें पाहिजे. पण या तात्त्विक विचाराकडे पाठ फिरवून कित्येक निर्वेतन सेवेचें पुण्य फारच मोठें समजतात व त्याच्या जोरावर अरेरावी, अपमान, अनियमितपणा, नियमभंग वगैरे कित्येक पापांची माफी मिळविण्याचा उजळ माथ्यानें प्रयत्न करतात हें गर्ह्य आहे. जनतेनें असल्या मानभावी निर्वेतन सेवकांस (?) त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे. असो. बेकारी व निर्वेतनव्यवसाय यांबद्दल अनुषंगानें विचार केला. आतां धार्मिक व्यवसायांकडे वळूं.

वास्तविक या प्रकरणाच्या प्रारंभीं दाखविल्याप्रमाणें सर्वच व्यवसाय धार्मिक ठरतात. पण आज जनतेंत तशी समजूत नाहीं. म्हणून जनतेंत ज्यांस हल्लीं ‘ धार्मिक ’ हें विशेषण लावण्यांत येतें अशाच व्यवसायांचा आतां विचार करूं.

या प्रकारच्या व्यवसायांचें वर्गीकरण केल्यास त्यांचे मुख्यतः पुढील प्रकार पडतातः—

१ भिक्षा मागणें

२ गाय किंवा मूर्ति यांचा उपयोग करून त्यांच्या पुढें येणारें द्रव्य स्वीकारणें

३ उपाध्येपण ( याज्ञिक )

४ हरदास, पुराणिक, प्रवचनकार

यांपैकीं पहिल्या दोन प्रकारांच्या त्याज्यतेबद्दल विस्तारानें लिहिण्याचें कारण नाहीं.* त्या प्रकारांमुळें दैन्य व प्रतारणा या तामसी दुर्गुणां-

* दुसऱ्या प्रकाराच्या त्याज्यतेबद्दल स्वतंत्र विवेचन पुढें एकोणिसाव्या प्रकरणांत गोग्रासभिक्षेच्या निमित्तानें केलेलें आहे तें तेथूनच पाहावें.

चेंच पोषण होत असतें. अर्थात् तें धर्मविरोधी आहे. प्राचीन शास्त्रकारांनीं ब्रह्मचारी व संन्यासी यांस भिक्षा मागण्यास सांगितलें आहे. पण त्या भिक्षेचे नियम पाहिले तर त्यांत दैन्याचा संबंध ठेवलेला नाहीं. आदरपूर्वकच भिक्षा घालावी व घेणारानें तसलीच घ्यावी अशा घोरणावर स्मृतिकारांनीं भिक्षा ग्राह्य ठरविलेली आहे. पण आजची 'बाई, भिक्षा वाढा हो' याची तासतास आवृत्ति करून मागितली जाणारी भिक्षा व विशेषतः धट्टयाकट्टया आळशी गलेलठ्ठांनीं मागितलेली भिक्षा शास्त्रकारांना मान्य आहे असें कोणींही समजूं नये.

रामदासस्वामींनीं 'भिक्षामिषें लहानथोरें परीक्षून सोडावीं' अशासारख्या कार्याच्या मिषानेंच 'ब्राह्मणाची मुख्य दीक्षा' भिक्षा ठरविलेली आहे. तें लोकनिरीक्षण कशाशीं खातात हेंही ज्यांस माहीत नाहीं त्यांनीं समर्थांचें वाक्य पुढें करून व रामदासी संप्रदायाची रूढि दाखवून आज भिक्षेचें समर्थन करणें योग्य नव्हे. अशा पोटभरू भिक्षेकऱ्यांनीं 'भिक्षापात्र अवलंबणें जळो जिणें लाजिरवाणें' या संतवचनापासून योग्य तो बोध घेतला पाहिजे. सध्यां स्वतःकरितां नव्हे तर अनाथालयें, गाई, विधवाश्रम, राष्ट्रीय–सामाजिक–संस्था यांचे मदतीकरितां भिक्षा मागितली जाते. अशा प्रकारची स्वार्थनिरपेक्ष भिक्षा मागणें गर्ह्य तर नाहींच उलट उत्तेजनार्ह आहे. म्हणून अशा प्रकारच्या उपयुक्त कार्यास मदत मिळविण्याकरितां भिक्षा मागण्याचा प्रसंग आल्यास त्यांत लाज मानण्याचें कारण नाहीं. मात्र भिक्षा घालणारांनीं संस्थेच्या जमाखर्चाकडे व कार्यप्रणालीकडे लक्ष द्यावें. असो. याप्रमाणें पहिल्या दोन धार्मिक व्यवसायांबद्दल पाहून झालें. आतां तिसऱ्याकडे वळूं.

भिक्षुकी व्यवसायाबद्दल सध्यां बराच गैरसमज पसरलेला आहे. भिक्षुकवर्गातील दोष हें जसें त्याचें एक कारण आहे तसेंच सुशिक्षि-

तांनीं केलेली त्यांची उपेक्षा हें त्याचें दुसरें कारण आहे. अर्थशून्य पाठांतर करून जटा–घनांसह त्याची नित्य आवृत्ति करीत बसावयाचें हें काम इतकें नीरस आणि मेहनतींचें आहे कीं, त्यामुळें अशा मनुष्यांत अप्रबुद्धता व व्यवहारशून्यता येणें अगदीं स्वाभाविक आहे. ज्याची सर्व शक्ति पाठान्तरांत व तें तरतें ठेवण्यांत खर्च होत आहे त्याची त्याला पुराण वाचतां येत नाहीं म्हणून अवहेलना करणें अविचाराचें होईल ! म्हणून सुधारकांनीं त्यांचें पाठान्तराचें काम कमी करण्याचा प्रथम प्रयत्न करून त्याऐवजीं थोडें संस्कृतचें ज्ञान व धर्मशास्त्राचा अभ्यास त्यांच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट केला जाईल अशाबद्दल विधायक प्रयत्न करावयास पाहिजे होता. वेद आतां छापलेलेच असल्या-मुळें त्यांच्या रक्षणाची फारशी काळजी नको ! फक्त वेद म्हणण्याची जुनी पद्धत जिवंत रहावी म्हणून कांहीं वेदभाग तोंडपाठ असला म्हणजे झालें. अशाप्रकारें भिक्षुकवर्गाचें पाठान्तराचें काम कमी करून मगच त्यास नवा अभ्यासक्रम द्यावयास पाहिजे होता. हेकेखोर भिक्षुक-वर्ग हें ऐकत नाहीं असें दिसून येतांच नवा प्रबुद्ध पुरोहितवर्ग तयार करावयास पाहिजे होता. म्हणजे आपोआप जुन्या वेदमूर्तींनीं त्याचें अनुकरण केलें असतें. पण सुधारकांनीं हें विधायक कार्य हातीं न घेतल्यामुळें सामान्य जनतेची या वर्गाबाबत मोठी चमत्कारिक मनो वृत्ति झालेली आहे. घरीं ‘ नमो ब्रह्मण्य देवाय ’ म्हणून वेदमूर्तींस ( भटजींस ) साष्टांग नमस्कार करणारा भाविक त्याच भटजींची नक्कल मोठ्या आनंदानें पाहतो. नाटककादंबऱ्यांत तर भटजीच्या पात्राशिवाय विनोदी पात्रच दिसून येत नाहीं. केवळ नाटकांतच नव्हे तर व्यव-हारांतही या वर्गास नेहमींच मानहानि सहन करावी लागते. असल्या पददलित वर्गाकडून हिंदुधर्मास तेज कसें चढणार ?

आमच्या पुरोहितवर्गास नामोहरम करण्याचा गृहस्थी बाण्याच्या लोकांनीं कळत वा न कळत जणूं विडाच उचललेला आहे. वास्तविक

पूजा, वैश्वदेव वगैरे नित्य कृत्यें तसेंच श्राद्ध-पक्ष वगैरे नैमित्तिक कृत्यें ज्याचीं त्यानेंच करावयाचीं असतात. त्यांचें फळ हस्तकामार्फत तीं कृत्यें केल्यास मिळणें शक्य नाहीं. क्वचित् एखाद्या दिवशीं वेळ न झाल्यास पूजा वगैरे दुसऱ्यावर सोपविणें कदाचित् क्षम्य होईल ! पण घरांत कायमचाच देवपूजेकरितां ब्राह्मण ठेवणें, व पानावर बसल्यावर ' भटजी! देवपूजा झाली काय ? ' असा प्रश्न करणें सर्वस्वीं गर्ह्य आहे. दशरथाचे दरबारीं राजपुरोहित म्हणून वसिष्ठांची योजना होती. पण ते स्वतः तेथें पूजा-अर्चा करीत नव्हते. तर राजवाड्यांतील धार्मिक कृत्यें योग्यरीतीनें कशीं करावीं एवढेंच पहात व समजावीत होते. याचें एक उदाहरण पृ. १३१ वर आलेंलेंच आहे. दुसरें उदाहरण पृ. १६६-१६७ वरील हकीकतीवरून दिसून येईल ! त्या वेळीं स्वतः वसिष्ठ जवळ असूनही त्यांनीं तर्पणाचे व श्राद्धाचे संकल्प व मंत्र रामचंद्रास सांगितले नाहींत. तेव्हां आजची पुरोहितवर्गाची हीनवृत्ति सुधारावयाची तर गृहस्थ-वर्गानें धर्मक्रिया स्वतः केल्या पाहिजेत. व त्यांत स्वतः मनही घातलें पाहिजे. शाळाकॉलेजांत अध्यापनाचें काम करणारे पूर्वतयारी म्हणून भाराभर पुस्तकें वाचून जातील, पण उद्यां श्राद्ध आहे असें कळतांच आदल्या दिवशीं पुस्तकें काढून किंवा उपाध्यायाकडे जाऊन नुसता श्राद्ध संकल्पही पाठ करणार नाहींत ! तसेंच षोडशोपचार व त्यांचे सोळा मंत्रही पाठ करण्याची तसदी न घेतांच सर्व साकडें भटजीवर घाल-ण्यास तयार होतील ! या प्रकारच्या अनेक चुका आज पुढारलेल्या व मागासलेल्या गृहस्थवर्गाकडून होत आहेत.

कित्येक यावर ' अहो ! आम्हांला वेळ आहे कुठें तुमचे श्राद्ध-संकल्प पहायला व षोडशोपचारांचे मन्त्र पाठ करायला ? ' असें म्हणून मोकळे होतात ! पण यावर एवढेंच सांगावेंसें वाटतें कीं, ' मग ही धोंड तुमच्या मानेवर कोणीं दिलेली आहे ? तुम्ही कांहीं न केलें तरी चालेल ! पण ही धर्माची व भिक्षुकवर्गाची विटंबना नको ! ' म्हणून

या बाबतींत खालील तिहींपैकीं कोणताही एक मार्ग स्वीकारावा हेंच आज युक्त होय !

१ नित्य नैमित्तिक धार्मिक कार्यक्रम स्वतःच शिक्षण घेऊन करावे, व वसंतपूजा वगैरे निमित्तानें वैदिकांचा सत्कार करावा.

२ दुसऱ्याकडूनच करवावयाचे असतील तर पुरोहितवर्गाबद्दल कोणताही अनादर व्यक्त न होईल तसेंच त्यास भरपूर दक्षिणा व मान-मरातब मिळेल असें करूनच ते करवावे.

३ वरील दोन्हींपैकीं कोणताही प्रकार शक्य नसेल तर धार्मिक क्रिया करूं नयेत.

गृहस्थवर्गानें याप्रमाणें आपल्या धोरणांत आतां सुधारणा केली पाहिजे.

आमच्या भिक्षुकवर्गानेंही आतां सुधारणेकडे भयचकित दृष्टीनें पाहण्याचें सोडून द्यावें. त्यांच्या खऱ्या अडचणी त्यांनीं समाजास दाखवून तज्ज्ञांकडून त्यांवरील उपाय ठरवून घ्यावे. दिवसेंदिवस ब्राह्मणांत हा वर्ग कमी होत चाललेला आहे. लोकांतही आस्था नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन योग्य त्या सुधारणा केल्या पाहिजेत. याकरितां ‘ पुरोहित-हितवर्धक मंडळ ’ यासारखी एखादी संस्था स्थापून प्रथम नव्या युगास उपयुक्त होईल असा अभ्यासक्रम आखणें जरूर आहे. तसेंच पौरोहित्याचें क्षेत्रही विस्तृत केलें पाहिजे. मराठ्यांच्या घरीं व शूद्रांच्या घरीं वेदोक्त करावयाचें नाहीं व पौरोहित्याचा अधिकार ब्राह्मणांनांच आहे, असल्या संकुचित कल्पनांस आतां थारा देतां नये. या बाबतींत एका क्षुल्लक ( वेदोक्त ) मुद्दयावर मतभेद होऊन महाराष्ट्रांत व्यर्थ धुमाकूळ माजला आहे. व कोणतीही धार्मिक गोष्ट ब्राह्मण-ब्राह्मणेतर एका भूमिकेवर येऊन करण्यास तयार होत नाहींत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

वेदाधिकार व पौरोहित्याचा अधिकार आतां जातिविशिष्ट ठेवून

काम भागणार नाहीं. आतां *बादरि या प्राचीन ऋषीचें मत मान्य करून सर्वांस वेदाध्ययनही मोकळें ठेवलें पाहिजे.

तसेंच पौरोहित्यही आतां तें ज्याला चांगलें करतां येईल त्यास करूं दिलें पाहिजे. जैमिनीनें स्मृतिप्रामाण्य पुढें करून आर्त्विज्य ( अर्थात् तुल्यन्यायानें पौरोहित्यही ) ब्राह्मणांनींच करावें असा §सिद्धान्त केला आहे. पण तो बरोबर नाहीं. स्मृतीनें केवळ याजन म्हणजे यज्ञ चालवणें एवढेंच नव्हे तर त्यावरोबरच अध्यापन म्हणजे शिकविणें हें देखील ब्राह्मणांनींच करावें असें सांगितलें आहे. पण आज तें आपण पाळीत नाहीं. फार काय उपनिषत्कालींही ब्राह्मणांनीं क्षत्रियांपासून विद्याग्रहण केल्याचे दाखले आहेत. †महाभारतांत तर कोणतीही चांगली विद्या हीनमनुष्यापासून देखील श्रद्धेनें ग्रहण करावी असें म्हटलें आहे. शिवाय आज व्यवहारांत इतर कोणत्याही धंद्याच्या बाबतींत जर आपण स्मृति प्रमाण मानीत नाहीं, तर पौरोहित्य–व्यवसायाच्याच बाबतींत तिचा बागुलबोवा कां दाखवावा ? म्हणून पौरोहित्याचा अधिकार कोणाही योग्य हिंदूला दिला जाणें व तो इतरांनीं मान्य करणें हेंच उचित होय !

इतर व्यवसायांप्रमाणेंच भिक्षुकी व्यवसाय हाही एक व्यवसाय कमीपणा न येतां केला जाईल याबद्दल समाजांतील पुढाऱ्यांनीं काळजी घेतली पाहिजे. इतर कामें केलीं तर ज्याप्रमाणें मजुरी किंवा वेतन घेणें हक्काचें आहे, त्यांत मेहेरबानीचा संबंध नाहीं त्याचप्रमाणें भिक्षुकी व्यवसायांतील दक्षिणेचें आहे. दक्षिणा म्हणजे केलेल्या कामाची मजुरी

---

* निमित्तार्थेन बादरिस्तस्मात् सर्वाधिकारं स्यात्। ( पू. मी. सू. ६–१–२७ )

§ स्मृतेर्वा स्याद्ब्राह्मणानाम् । पू. मी. १२–४–३६

† श्रद्दधानः शुभां विद्यां हीनादपि समाप्नुयात् ।
सुवर्णमपि चामेध्यादाददीताविचारयन् ॥ शान्तिप. १६५।३१

होय, ही गोष्ट स्वतः जैमिनीनेंहि मान्य केलेली ( १०-२-२३ ) आहे. असो. याप्रमाणें वरील तिसऱ्या व्यवसायाबद्दल पाहून झालें. या व्यवसायांत स्वतःचा मान कायम ठेवून कसें वागावें याबद्दल विस्तारभयास्तव येथें सूचना देतां येत नाहींत. त्या चाणाक्ष वाचकांनीं जाणून घ्याव्या ! वरीलपैकीं चौथ्या व्यवसायाबद्दल मागें ( पृ. ७२ ) थोडें विवेचन आलेलेंच आहे. व शिवाय पुढें बाविसाव्या प्रकरणांतही त्याविषयीं विवेचन द्यावयाचेंच आहे. म्हणून येथें त्याचा विस्तार करण्याचें कारण नाहीं.

शेवटीं, ज्याला जो व्यवसाय झेपेल तो त्यानें सचोटीनें, तसेंच देश संस्कृति व स्वतःची प्रगति यांस विघातक न होईल अशा रीतीनें करावा एवढें सांगून पुढील विषयाकडे वळूं.

प्रकरण चवदावें

# शिष्टाचार अथवा सामाजिक धर्म

**शिष्टाचार व धर्म**

वैयक्तिक धर्माचें मुख्य अंग म्हणून रोजच्या कार्यक्रमाचा विचार येथपर्यंत केला. हा कार्यक्रम ज्याचा त्यानेंच ठरवावयाचा असतो. कुटुंबाबाहेरील व्यक्तींचा यांत फारसा संबंध येत नाहीं. पण एवढ्यानें आचारधर्म संपूर्ण होत नाहीं. आपण ज्या समाजाचे घटक आहों, त्याच्यांत वावरतांना कोणते नियम अनुसरले पाहिजेत हेंही धार्मिक मनुष्यास अवगत असलें पाहिजे. नुसती स्वत: स्नानसंध्या केली पण सामाजिक नियम किंवा शिष्टाचार न पाळले तर तें योग्य होणार नाहीं. मनुस्मृत्यादि धार्मिक ग्रंथांत संध्येचें आचमन कसें करावें हें जितक्या बारकाईनें सांगितलेलें असतें तितक्याच सूक्ष्मतेनें रस्त्यानें जातांना कोणीं कोणास वाट द्यावी याचेही नियम सांगितलेले असतात, यांतील रहस्य हेंच आहे. प्रत्येकानें आपल्या घरांतच काय पण बाहेर सार्वजनिक ठिकाणींही विशिष्ट पद्धतीनें वागलें पाहिजे असा धर्मशास्त्राचा कटाक्ष आहे. दुसऱ्यांबरोबर योग्यरीतीनें वागणें हें व्यापक धर्मांत समाविष्ट होतें. एके ठिकाणीं वैयक्तिक स्नानसंध्येचें नांवही न घेतां '*दान, दया, सज्जनांची पूजा व व्यवहारांत सरळपणा हा इहपर कल्याणदायी श्रेष्ठ धर्म आहे ' असें सांगितलेलें आहे. त्यांतील मर्म हेंच आहे.

---

* दानं दया सतां पूजा व्यवहारेषु चार्जवम् ।
एष राम परो धर्मो रक्षणात्प्रेत्य चेह च ॥

वा. रा. ७–५९

**एकाचें प्रायश्चित्त दुसऱ्याला**

'जो करील तो भोगील' अशा तत्वज्ञानानें आपण आपल्या व दुसऱ्याच्या आचरणाकडे पाहतों. यामुळें दुसऱ्याला आपल्यापासून उपसर्ग पोंचतो किंवा काय याचा विचारच आपल्या मनांत येत नाहीं. परंतु हें तत्त्वज्ञान सर्वस्वीं खरें नाहीं. 'एकजण चूक करतो ती समाजास भोवते'* हें तत्त्व आतां लक्षांत घेतलें पाहिजे. दुसऱ्यांशीं आपला संबंध येईल तेव्हां त्यास आपल्यापासून त्रास न होईल याविषयीं काळजी घेतली पाहिजे. आज आपण या गोष्टीचा फारसा विचार करीत नाहीं. कारण

'मला काय त्याचें ?'

अशी धर्मविरोधी वृत्ति आपल्यांत बाणलेली आहे. याकरितां दुसऱ्यांशीं कसें वागावें याचा आतां विचार करूं.

**सामाजिक संबंधाचे प्रकार**

एकमेकांच्या घरीं व सार्वजनिक ठिकाणीं आपले इतरांशीं संबंध येतात, दुसऱ्याच्या घरीं गेल्यावर व दुसरा आपल्या घरीं आल्यावर, तसेंच मंदिरें, रस्ता, आगगाड्या, सभा, क्लब वगैरे सार्वजनिक ठिकाणीं येणारे संबंध हे सर्व सामाजिक या सदराखालीं येतात. त्यांपैकीं मंदिरांतील शिष्टाचारांबद्दल मागें ६ व्या प्रकरणांत विचार केलेलाच आहे. क्लबांतील वागणुकीबद्दल पुढील प्रकरणांत विचार करावयाचाच आहे. म्हणून त्यांचा येथें विचार न करतां फक्त घर व सभा या ठिकाणीं येणाऱ्या संबंधाचाच विचार करूं.

**आदरातिथ्य**

दुरून दमूनभागून पान्थस्थ आल्यास त्याचें मनःपूर्वक आसन, पाणी व अन्न देऊन स्वागत करावें असें शास्त्र-कारांनीं सांगितलें आहे. तसेंच गुरु, एखादी थोर व्यक्ति, वगैरे मान्य व्यक्तींचेंही स्वागत करण्याचीं विधानें

---

* एकः पापानि कुरुते फलं भुङ्क्ते महाजनः । म. भा. ५।३३।४२.

आहेत. त्यांचें आदरातिथ्य मनापासून करावें असेंही सांगितलेलें आहे. स्मृत्युक्त हा अतिथि–सत्कार आपल्याकडे रूढच आहे. आर्थिक अडचणीमुळें शहरांत जरी तो पाळतां येत नसला तरी खेडेगांवांत अद्यापही तो पहावयास मिळतो. परगांवाहून आलेल्या पाहुण्यांच्या स्वागताबद्दल येथें विशेष लिहिण्याचेंही कारण नाहीं. त्यांचा यथायोग्य सत्कार कसा करावा हें बहुधा प्रत्येकास माहीत आहेच !

**नव्या रूढि**

परंतु गांवांतल्या गांवांत एकमेकांचे घरीं जाणाऱ्या पाहुण्यांचा ( हा पारिभाषिक शब्द समजावा ) सत्कार करण्याची जी एक नवीन प्रथा पडली आहे तिच्याबद्दल मात्र लिहिलें पाहिजे. स्मृतिग्रंथांत, आलेल्या अतिथीची पूजा करून भोजन द्यावें असा नियम आहे. त्याचा अर्थ ‘ गांवांतील परिचित केव्हांही येवो, त्याचा फराळ अगर जेवण झालेलें असो वा नसो, त्यास, तो येतांच, चहा व चिवडा दिलाच पाहिजे ’ असा मुळींच नाहीं. पण आज कोणीही केव्हांहि कोणाकडे जावो- निदान चहा दिलाच पाहिजे असें होऊन बसलें आहे. याचा परिणाम असा होतो कीं, केव्हां केव्हां दुपारच्या भोजना पूर्वींच चहानें पोट भरून जातें. खाणार तरी किती ! चार ठिकाणीं कामानिमित्त गेलों आणि प्रत्येक ठिकाणीं बशीभरच शिरा किंवा चिवडा घेतला तरीसुद्धां भुकेकंगाल राहण्याइतका प्रदीप्त जठराग्नि किती जणांचा असतो ? या नसत्या शिष्टाचारानें प्रकृति व पैसा, दोहोंचाही नाश होतो. फायदा कशाचाच नाहीं.

**सत्काराची खरी पद्धत**

यावर कोणी असें विचारील कीं मग आम्ही आपल्या आप्तेष्टांचा गोडगोड गप्पा मारूनच सत्कार करावा कीं काय ? या प्रश्नाचें मर्म आमच्या लक्षांत आहे. व तें लक्षांत घेऊनच आम्ही सांगतों कीं, ज्याप्रमाणें बालावल्याशिवाय आपण एकमेकांच्या घरीं जेवणास–

ते कितीही आप्त असले तरी–जात नाहीं त्याचप्रमाणें याही बाबतींत असावें. आपण एखाद्याच्या घरीं गेलों व तेथें पानसुपारी चालू असली तर ती आपणास मिळेलच ! पण तीच आपणास आमंत्रण असून मिळाली तरच त्यांत आपण आनंद मानतों. तसेंच चहाचें कां नसावें ? म्हणून या चहाचिवडा–सत्काराच्या बाबतींत परस्परांना बोलावण्याची पद्धत ठेवावी. जेवणाप्रमाणें याही बाबतींत 'आगंतुकी' निंद्य मानली पाहिजे. म्हणून आमंत्रणपूर्वक आप्तेष्टांस अल्पाहार देणें हाच सत्काराचा खरा मार्ग होय.

हा नवा शिष्टाचार रूढ केल्यानें आजच्या रूढीमुळें उत्पन्न होणारे तोटे टाळतां येतील ते येणेंप्रमाणें:—

**आजच्या रूढीचे तोटे**

१ चहा किती वेळां करावा लागेल याचा सुमार रहात नाहीं.

२ दूध नसतांना किंवा थोडें दूध असतांना मिळेल तसलें किंवा थोडेंच दूध घालून चहा करावा लागतो. तो आरोग्यघातक ठरतो.

३ महिलांच्या रोजच्या कार्यक्रमांत बिघाड होतो.

४ दिवसास किती वेळ चहा घ्यावा याचा सुमार रहात नाहीं

हे सर्व तोटे टाळण्याकरितां आम्हीं वर दिलेला शिष्टाचार तर सुरू केला पाहिजेच, पण त्याबरोबरच पथ्य म्हणून एक शिस्त पाळावी लागेल. ती म्हणजे ठराविक वेळीं चहा घेण्याची. वास्तविक वाटेल तेव्हां चहा किंवा खाद्य घेण्याची रूढि पाश्चात्यांत नाहीं. तेव्हां ती त्यांच्याकडून आपण घेतली असें म्हणतां येत नाहीं. या शिष्टाचाराचें मूळ आपल्या बेशिस्तपणांत आहे.

त्याचें असें होतें; गोविंदराव आपल्या घरीं चहा घेऊन हरि-

**तिचा इतिहास**

भाऊंच्या घरीं कांहीं कामानिमित्त जातात. त्या वेळीं हरिभाऊ चहांत किंवा फराळांत गुंतलेले असतात. आतां हरिभाऊंस पेंच असा पडतो कीं, यांना टाकून कसें खावें ? मग क्रमानेंच पुढील संवाद होतो.

‘ या हो गोविंदराव, थोडा शिरा घ्या ! ’

‘ नको हो हरिभाऊ, आतांच मी फराळ करून आलों आहें. ’

‘ म्हणून काय झालें ? थोडा घ्या. ’

‘ हें पहा, मला आग्रह नको. मी काय पाहुणा कीं आहे ? मी तुमच्या येथें मुळींच संकोच करणार नाहीं. ’

‘ अहो, हा संकोच नाहीं तर काय ? थोडा चहाही घ्यावयाचा नाहीं म्हणजे काय ? ’

‘ बरें बुवा, घेतों चहा ! मग तर झालें ? हें पहा, मात्र थोडा द्या, हां ! ’

या संवादांत विशेष कांहींच नाहीं. रोजच कोठें ना कोठें हा संवाद होतोच ! पण यांत या चालीचा इतिहास सांपडतो तो असा:—

हरिभाऊ चहा घेत असतांना गोविंदराव आले नसते तर हा प्रकार होता ना ! पण कशामुळें कां होईना, गोविंदरावांनीं तो घेतला ! पुढें परतभेट म्हणून गोविंदरावांच्या घरीं हरिभाऊंनाही हेंच करावें लागलें. याच दोघांचा आचार पाहून त्यांच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनींही तीच सुरवात केली. झालें. ‘ पांचा घरीं शिष्टाचार ’ या न्यायानें पुढें ही चाल शिष्टाचार ठरली. मग केव्हांही आपल्या घरीं आलेल्या परिचितास चहा न देणें अशिष्टपणाचें वाटूं लागलें. याच्या पुढील पायरी देऊं केलेला चहा नाकारणें हा अशिष्टपणा आहे असें वाटूं लागण्यांत आहे. आणि या सर्वांचा कळस ‘ अहो सौभाग्यवतीनें कुंकवाला कधीं नाहीं म्हटलें आहे काय ? ’ या प्रश्नगर्भ दृष्टांतांत आहे. अशा क्रमानें हा शिष्टाचार ( ? ) आज आपल्या बोकांडीं बसला आहे. पण त्याचें मूळ

केवळ बेशिस्तपणांत आहे. सकाळीं आठाच्या आंत व मधल्या वेळीं याप्रमाणें दोनदांच चहा किंवा फराळ ठराविक वेळींच करावयाचा असें ठरविल्यास ( पृ. १७३ पहा ! ) हा प्रसंग सहज टळेल. म्हणूनच आम्ही या शिस्तीस वर पथ्य असें म्हटलें आहे. हें पथ्य पाळलें तरच या नव्या रोगाचें निर्मूलन करतां येईल ! येथें परगांवाहून आलेल्यास किंवा थकलेल्यास हा नियम दाखवून व्यर्थ अप्रयोजकपणा पदरीं घेऊं नये हें सांगणें नकोच ! चहाफराळाची व्यर्थ उकळपट्टी करून स्वास्थ्य, वेळ व मेहनत यांचा जो विनाकारण व्यय केला जातो त्याविरुद्ध आमचा हा हल्ला आहे हें लक्षांत ठेवावें. असो. आतां मानमान्यतेचा विचार करूं.

**खेळाडू वृत्तीचें प्रदर्शन**

सध्यां खेळाडू वृत्ति दाखविणें हें आपण अभिनंदनीय समजतों. आपल्यापेक्षां कनिष्ठ दर्जाच्या नायकाच्या नेतृत्वाखालीं क्रिकेट खेळण्यास कोणी तयार झाल्यास त्याच्या खेळाडू वृत्तीची आपण तारीफ करतों. त्यांत कमीपणा समजत नाहीं. तसेंच मानाचेंही आहे. आपल्यापेक्षां श्रेष्ठास तर मान दिलाच पाहिजे; पण प्रसंगीं बरोबरीचा किंवा कमी असला तरीसुद्धां त्याचा सत्कार करणें स्वतःच्या उदारपणाचें द्योतक आहे, म्हणून दुसऱ्याचा सत्कार करण्याची संधि होतां होईतों दवडूं नये.

**मान्यतेचीं साधनें**

मनुस्मृतींत ( २।१३६ ) मान्यता प्राप्त होण्याचीं कारणें दिलेलीं आहेत. त्यांपैकीं संपत्तीमुळें मानसन्मान सध्यां देखील प्राप्त होतच असतो. मात्र मानाच्या बाबतींत वय, कर्म आणि विद्या यांहून त्याचा दर्जा कमी असतो हें नीट लक्षांत घेतलें पाहिजे. आपणापेक्षां वयानें अधिक असणारास जगाचा अनुभव जास्त असण्याचा संभव असतो. म्हणून वयोवृद्धांचा सत्कार केला पाहिजे. अलीकडील शिक्षि-

तांत कित्येकवेळां वृद्धांची थट्टा किंवा टर उडविण्याची वृत्ति दिसून येते. कित्येक वेळां एखादा वृद्ध एखाद्याकडे कांहीं साधी माहिती विचारण्यास आला तर त्याची हेटाळणी करण्याकडे प्रवृत्ति दिसून येते. वर्तमानपत्रांतून तर साठी उलटून गेलेल्या प्रतिस्पर्ध्यावर टीकास्त्र सोडतांना ‘ साठीं बुद्धि नाठी ’ या म्हणीचा पुरावा म्हणून उपयोग केला जातो. पण हें अशिष्टपणाचें आहे. चेष्टा, थट्टा करणें असेल तर बरोबरीच्यांत करावी. परकी, लहान व वृद्ध यांची चेष्टा करण्यांत आनंद मानणें हा मूर्खपणा होय.

**कौशल्याबद्दल आदर**

कोणामध्यें एखादें कौशल्य असेल तरीहि त्याबद्दल योग्य तो आदर दाखविला पाहिजे. कोणत्याही गोष्टींत कौशल्य संपादन करावयाचें तर त्याकरितां अहर्निश झटावें लागतें. या दीर्घोद्योगासच तप असें म्हणतात. एखाद्यानें अशा तपश्चर्येनें एखाद्या विषयांत कौशल्य संपादन केलें असेल तर त्याला योग्य तो मान देणें म्हणजे त्याच्या कष्ट सोसण्याच्या प्रवृत्तीचा ( मनोवृत्तीचा ) गौरवच करणें होय. एखाद्या व्यक्तीच्या अनुषंगानें तपश्चर्येबद्दल आदर दाखविणें म्हणजे तश्चपर्येच्या मनोवृत्तीला उत्तेजन देणेंच होय! राष्ट्राच्या उन्नतीला तपस्व्यांची किती आवश्यकता असते हें मागें अनेकवार दाखविलेलेंच आहे.

**विद्वानांचा सत्कार**

विद्यावंताला तर सर्वांत श्रेष्ठ प्रतीचा मान दिला पाहिजे असें मनूनें सांगितलें आहे. पशु आणि मनुष्य यांमध्यें जें अंतर आहे तें निरनिराळ्या विद्यांच्या योगानेंच आहे. ज्ञान किंवा बुद्धि हेंच राष्ट्राचें बल होय!

‘ बुद्धिर्यस्य बलं तस्य ’

ही म्हण यथार्थ आहे. शस्त्राच्या योगानें एखाद्याचेंच रक्षण किंवा घात करतां येईल. पण बुद्धीचें सामर्थ्य फार मोठें असतें. बुद्धिमान् लोकांनीं

निरनिराळीं शास्त्रें निर्माण केलीं नसतीं तर आज मानवी समाजाची जी प्रगति दिसून येते ती दिसून आलीच नसती. म्हणून कोणत्याही शास्त्रांतील शास्त्रज्ञांचा–त्या शास्त्रांत स्वतःला कळत नसलें तरी–योग्य सन्मान केला पाहिजे. जुन्या परंपरेंत वैदिक व शास्त्रीपंडित यांना घरीं बोलावून त्यांचा योग्य सन्मान करण्याची पद्धत होती. अद्यापही कोठें कोठें ती दिसते. तिचें हेंच रहस्य आहे.

**खरा सज्जन कोण ?**

वर दिलेल्या लोकांस योग्य तो मान द्यावाच; पण आपल्या बरोबरीच्या किंवा प्रसंगीं आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या मनुष्यासही मान देण्याइतकें औदार्य मनांत पाहिजे. आपल्याजवळ असंख्य गुण असूनही त्यांपासून जितका आनंद होत नाहीं तितका दुसऱ्याच्या ठिकाणीं वास करणाऱ्या अल्प गुणांनींही होतो असें सज्जनांचें लक्षण आहे.* म्हणून स्वतःचें एखाद्या बाबतींत श्रेष्ठत्व असलें तरीही एखाद्याचें स्वागत करणें सज्जनपणास शोभणारें आहे. उगीचच्या उगीच आढ्यता व अहंकार यांचें प्रदर्शन करण्याची कित्येकांस संवयच असते. ती योग्य नव्हे !

**व्यवहारेषु चार्जवम्**

केवळ सत्काराच्याच बाबतींत नव्हे तर सर्वच व्यवहारांत सरळपणा असावा ! कित्येकांस साध्या रोजच्या व्यवहारांतही डावपेंच करण्यांत मोठी धन्यता वाटते. नुसतें ‘कां हो, ते रामभाऊ कोठें राहतात ठाऊक आहे का ?’ असें कोणीं अपरिचित मनुष्यानें विचारलें तरी ‘कां हो ? त्यांच्याशीं तुमचा काय संबंध आहे ? तुमचे कोणी ते लागतात कीं काय ?’ अशी चौकशी सुरू होते. त्यांत विचारणारी किंवा जिची

---

* असंख्यैरपि नात्मीयैरल्पैरपि परस्थितैः ।
गुणैः सन्तः प्रहृष्यन्ति चित्रमेषां विचेष्टितम् ॥

चौकशी करावयाची ती यांपैकीं एखादी व्यक्ति स्त्री असल्यावर तर बघावयासच नको ! विनाकारण लोकांच्या धाग्यादोऱ्यांची याप्रमाणें नेहमीं चर्चा करण्यामुळें मनुष्य फाजील संशयी बनून सरळ व्यवहार करीनासा होतो. कित्येक वेळां दगलबाजीचा प्रसंग वारंवार आल्यामुळेंही मनुष्य संशयी बनून 'सोम्याचें प्रायश्चित्त गोम्याला' असें वर्तन करूं लागतो. पण सुसंस्कृत मनुष्यास हें शोभत नाहीं.

**कोकणांतील मनोवृत्ति**

साध्या व्यवहारांतही सरळपणा न ठेवण्याचीं उदाहरणें कोकणांत हरघडी दिसून येतात. कदाचित् तेथील दारिद्र्याचा हा साहजिक परिणाम आहे असें म्हणतां येईल ! पण तेवढ्यावरून तो योग्य ठरणार नाहीं. कोकणांतून चालतां चालतां एखादें चांगलें ठिकाण दिसलें तर बरोबरच्या माहितगारास त्याचा मालक कोण म्हणून विचारण्याची सोय नसते. असा प्रश्न नवागतानें कितीही सहज म्हणून विचारला तरी माहितगार त्याच्याकडे असें पाहील कीं शेवटीं विचारणारास 'रोखुनि मज पाहुं नको' असें म्हणण्याची पाळी येईल. एवढ्यानेंच भागणार नाहीं. कित्येकवेळां एखादा सज्जन तुमच्या हिताकरितां पुढील प्रमाणें फुकट सल्ला देईलः—

**एक प्रसंग**

आमचे एक मोडक नांवाचे मित्र एकदां आपलें मूळगांव पहावें म्हणून चालले होते. वाटेंत एका सत्पुरुषाशीं (?) त्यांचा पुढीलप्रमाणें संवाद झाला.

सत्पुरुष—कांहो, काय तुमचें नांव ?

मित्र—आम्ही मोडक.

सत्पुरुष—मग इकडे कुठें चाललां ?

मित्र—× × गांवीं. आमचें तें मूळ गांव आहे म्हणतात.

सत्पुरुष—म्हणतात म्हणजे ? अहो, मोडकांचें तेंच गांव. तेथें खोती त्यांचीच आहे.

मित्र—असेल. मला त्यांतलें कांहीं माहीत नाहीं. आम्हांला कोकण सोडून तीन पिढ्या लोटल्या. आमचे........

**सत्पुरुष**—हेंच तुमचें चुकतें. तुमचा हक्क तुम्ही बुडवतां कां? पैसा जास्त झाला असला तर दानधर्म करा. पण चोरांची पोळी कां पिकूं देतां?

**मित्र**—अहो, पण किती जुन्या गोष्टी. आतां कागदपत्र तरी कसे मिळणार?

**सत्पुरुष**—हें पहा त्याची काळजी नको. गांवांत जेवढे मोडक असतील त्या सर्वांना प्रतिवादी करून एक फिर्याद द्या गुदरून! म्हणजे आपोआप सर्व बाहेर येईल!

या संवादांतील सत्पुरुषाची (?) भूमिका लक्षांत घेण्याजोगी आहे. फुकटचा सल्ला, हिताची कळकळ, सत्यावरील प्रेम, अनाहूत मैत्री, कलह लावून देण्याची सहज कला वगैरे कित्येक सद्गुण या संवादांत दिसून येतील. असल्या मनोवृत्तीचे लोक जेथें दारू नाहीं तेथेंही भडका उडवून देण्यास समर्थ असतात. मग जेथें द्वेषाग्नि धुमसतच आहे तेथें एक फुंकर घालून सर्वत्र आगीचा डोंब उडविण्यास त्यांस कितीसा वेळ लागणार! रोजच्या व्यवहारांत याप्रमाणें कुटिल नीतीनें वागणें अधर्म्य आहे. (* व्यवहारेषु चार्जवम्) व्यवहारांत सरळपणा हा श्रेष्ठ धर्म आहे हें प्रत्येकानें लक्षांत बाळगून कुटिलतेचा उपयोग केवळ अपवादादाखलच करावा.

**सरळ भाषण**

केवळ वर्तनांतच नव्हे तर बोलण्यांतही सरळपणा असावा. बोलण्यांत शुष्कपणा किंवा तुसडेपणा व्यक्त न होईल याबद्दल काळजी घ्यावी. एवढेंच नव्हे, तर आपलें बोलणें दुसऱ्यास उत्साहप्रद होईल अशाविषयीं दक्ष असावें. या दृष्टीनें कोणी आपल्या घरीं येतांच—

* संपूर्ण श्लोक पृष्ठ २०४ वर दिलेला आहे.

( १ ) ' सुस्वागतम् ' ( सकाळीं )
असें म्हणून त्याचें स्वागत करण्याचा रिवाज पाळावा. तसेंच निरोप देतांना नुसतें ' अच्छा ! ' ' बरें आहे ' असें न म्हणतां

( २ ) ' सुप्रभातम् ' ( सकाळीं )

( ३ ) ' सुदिनम् ' ( दिवसा )

( ४ ) ' सुनिशम् ( रात्रीं )

यांपैकीं वेळेला अनुसरून एखादा वाक्प्रचार उच्चारावा. रस्त्यावर भेट झाल्यास प्रथमही हेच ( २, ३, ४ ) वाक्प्रचार उच्चारण्यास हरकत नाहीं. तसेंच

( ५ ) उपकृतोऽस्मि ( मी आपला आभारी आहें. )

( ६ ) क्षन्तव्यम् ( माफ करा ! )

हेही वाक्प्रचार रूढ करावे. असो. येथपर्यंत सामाजिकसंबंधांपैकीं पहिला प्रकार पाहून झाला. आतां सभेंतील वागणुकीचे नियम पाहूं.

**सभा व सभासद**

मराठींत सभ्य हा शब्द शिष्ट या अर्थानें रूढ आहे. असे सभ्य ज्या ठिकाणीं कांहीं एका उद्देशानें जमलेले असतील तेव्हां त्या जमावास सभा असें म्हणतात. या सभेंत प्रत्येकानें शिष्टाचाराचें अतिक्रमण न करतां वागलें पाहिजे हें सांगणें नकोच ! पण या बाबतींत मुख्य गोष्ट सांगावयास पाहिजे ती वक्तशीरपणाची !

**नियमितपणा**

आपल्याकडील सभा कधींच नियमित सुरू होत नाहींत. एखाद्या समयीं छापलेल्या वेळीं सभास्थानीं जाऊन पहावें तों शुकशुकाट दिसून येतो. केव्हां केव्हां तर व्यवस्थापकदेखील प्रसिद्ध केलेल्या वेळेनंतर येतात. एकदां असा अनुभव आला कीं, श्रोते उशीरां येऊं लागतात व हें रहाटगाडगें चालू राहतें. पण हें टाळलें पाहिजे. दुकानांत आलेल्या गिऱ्हाइकाला प्रथम १० रुपये एखाद्या वस्तूची किंमत सांगून मग घासाघीस केल्या-

वर ५॥ रुपयांस ती वस्तु विकणें हें जसें नादानपणाचें, त्याचप्रमाणें प्रासिद्ध केलेल्या वेळीं सभेस सुरुवात न करणें गर्ह्य मानलें गेलें पाहिजे.

**कांहीं नवे नियम**

आपणच वेळ प्रासिद्ध करावयाची व आपणच तिला हरताळ फासावयाचा, या नादानपणाची स्वतःलाच चीड आली पाहिजे. खालील नियम रूढ केल्यानेंच हा नादानपणा नष्ट होईल.

१ गांवांतील श्रोत्यांचे रोजचे कार्यक्रम, सभास्थानाचा दूर–जवळपणा हीं नीट लक्षांत घेऊनच वेळ जाहीर करावी.

२ जाहीर झालेल्या वेळेपूर्वी -॥- तास सभागृह झाडझूड व बैठका घालून तयार राहील याविषयीं काळजी घ्यावी.

३ सभेपूर्वी निदान पंधरा मिनिटें तरी व्यवस्थापकानें व पांच मिनिटें तरी अध्यक्ष-वक्त्यांनीं हजर व्हावयास पाहिजे.

४ सभेच्या आरंभास एक मिनिट उशीर झाला तरी प्रस्तावकानें (व्यवस्थापकानें) कारणनिर्देशपूर्वक दिलगिरी (वक्त्यांस दिलेल्या आश्वासनाचा भंग घडल्याबद्दल) प्रदर्शित करावी.

५ वक्ता किंवा अध्यक्ष यांस उशीर झालेला असल्यास त्यांनींही याचप्रमाणें दिलगिरी प्रदर्शित करून पुन्हा याप्रमाणें न करण्याची मी शक्य ती खटपट करीन असें सभेस आश्वासन द्यावें.

याप्रमाणें कित्येक नियम सांगतां येतील. थोडक्यांत सांगावयाचें तर सभा हें सामुदायिक नीतीच्या प्रदर्शनाचें ठिकाण असतें, हें लक्षांत घेऊन त्या ठिकाणीं आपापली जबाबदारी ओळखून वागण्यास ज्यानें त्यानें शिकलें पाहिजे. प्रत्येक गांवांत एखाद्या प्रसिद्ध दिवशीं सभा करून त्यांत सर्व नागरिकांनीं भाग घ्यावा व ' यापुढें सभेसंबंधांत या गांवांत असे असे नियम पाळले जातील; तरी आतां मागची अव्यवस्था लक्षांत घेऊन ती कोणीही पुढें चालूं करूं नये ' असा एखादा ठराव

करावा व प्रमुख नागरिकांनीं त्याचें परिपालन करण्याबद्दल कसोशीनें प्रयत्न करावा हेंच उचित होय.

**सभानियमनाची आवश्यकता**

'अति तेथें माती' या न्यायानेंही केव्हां केव्हां सभाधर्माकडे दुर्लक्ष होतें. म्हणून व्यर्थ सभांची निपज बंद करण्याकरितां योग्य ते प्रयत्न नागरिकांनीं केले पाहिजेत.

**कोणाही हिंदूचा न घडो मत्सर**

आपली हिंदूंची दृष्टि सर्व भूतां ठायीं भगवंत पाहण्याइतकी व्यापक आहे ती अर्थातच उत्तम आहे. पण ती सिद्ध होण्यास प्रथम सर्व मानवजात व तत्पूर्वी आपले सर्व धर्मबांधव यांच्या ठिकाणीं प्रेमभावना ठेवून सलोख्यानें वागणें आवश्यक आहे. "दुर्लभं भारते जन्म" म्हणजे या भारतवर्षांत जन्म प्राप्त होणें कठिण आहे असें आपल्या पूर्वजांनीं सांगितलें आहे. तेव्हां या भारतीयांस शक्य ती मदत करणें धर्मदृष्ट्या अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीनें स्वदेशी व्रताचें कसोशीनें परिपालन करून भारताची सुस्थिति राखणें प्रत्येक हिंदूचें कर्तव्य आहे. तसेंच सर्व मानवजाति ही आपली बंधुसम आहे हें आपलें ब्रीदवाक्य आहे. त्यालाही बाध न येईल असें आपलें प्रत्यक्ष आचरण पाहिजे. केवळ समतेच्या गप्पा मारून आतां काम भागणार नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां सार्वजनिक ठिकाणीं आपणच आपल्या धर्मबांधवांचा–ते केवळ पूर्वास्पृश्य म्हणून-विरोध करणें हें कसें अविचाराचें व अधर्म्य आहे हें सहज कळून येण्यासारखें आहे. आज वस्तुस्थिति अशी आहे कीं, सार्वजनिक ठिकाणींच काय पण घरांतदेखील आपणांस इतर धर्मीयांशीं वागतांना सामोपचारानेंच वागावें लागतें. मग केवळ तत्त्वहीन रूढीचा बागुलबोवा पुढें करून स्वधर्मीयांविषयीं तिरस्कार द्योतित होईल असें वागण्यांत पुरुषार्थ कोणता? मनुष्यानें मनुष्याचा सार्वजनिक ठिकाणीं मुद्दाम संबंध टाळणें

हें माणुसकीस सोडून आहे. करितां अशा ठिकाणीं पूर्वास्पृश्यांचा स्पर्श टाळणें धर्मसंमत असणेंच शक्य नाहीं. एखादा अस्वच्छ किंवा संसर्गरोगी असेल तर त्यास टाळणें यांत अर्थातच अधर्म नाहीं. पण या सबबी स्पृश्यांनाही लागू आहेत हें या ठिकाणीं लक्षांत बाळगावें लागेल. असो.

येथपर्यंत पृ. २०५ वर दाखविलेल्या प्रकारांपैकीं दोन प्रकारच्या सामाजिक आचारांचें वर्णन पाहून झालें. आतां व्यसनांचे बाबतींत तसेंच करमणुकीचे वेळीं कसें शिष्टाचारपालन करावें याच्या विचाराकडे वळूं.

## प्रकरण पंधरावें

# व्यसन आणि करमणूक

नित्य व्यवहारांत व्यसनी लोकांशीं संबंध येतो. तसेंच निरनिराळ्या प्रकारच्या करमणुकींतही मधूनमधून भाग घेण्याचा प्रसंग येतो. अशा वेळीं कसें वागावें, तसेंच व्यसनी मनुष्यानें स्वत: लोकांशीं कसें वर्तन ठेवावें त्याचप्रमाणें व्यसनें चांगलीं कीं वाईट वगैरे प्रश्नांचा विचार करणें आवश्यक आहे. जुन्या धर्मग्रंथांत या दोन्ही विषयांबद्दल विस्तृत विवेचन आढळत नाहीं. तथापि आजच्या परिस्थितींत तें आवश्यक आहे. म्हणून या दोन्ही विषयांचा आतां विचार करूं.

दारू पिणें, जुगार खेळणें, भांग, गांजा अफू यांचें सेवन करणें येथपासून तमाखू पिणें, पान खाणें, तपकीर ओढणें, चहा पिणें येथ-पर्यंतच्या सर्व प्रकारांस व्यसन असें म्हणतात. या सर्वांस एकाच माळेचे मणि समजणें योग्य नव्हे. कारण या सर्वांचे परिणाम सारखेच घातक नाहींत. करमणुकीच्या खेळांचे प्रकार तर फारच वाढले आहेत. त्यांच्या उपयुक्ततेकडे आमचें जावें तसें लक्ष गेलेलें नाहीं म्हणून त्यांचाही विचार करून ग्राह्याग्राह्यता ठरविणेंच इष्ट आहे.

व्यसनें काय किंवा करमणुकी काय सर्वांसच आवश्यक असतात असें नाहीं. पूर्वकाळांतील आश्रमवासी तत्त्वचिंतक ऋषि तसेंच आधु-निक काळांतील संशोधन कार्यांत गढून गेलेले संशोधक व लेखक यांचा सर्व वेळ त्यांच्या अंगीकृत कर्तव्यांतच जात असल्यामुळें व त्यांतच त्यांस आनंद होत असल्यामुळें त्यांच्यापुढें करमणुकीचा प्रश्नच उभा रहात नाहीं. जेव्हां मनुष्यास विचारसृष्टि किंवा आत्मचिंतन यांत आनंद अनुभवितां येत नाहीं तेव्हां त्यास बाह्य कष्टाचा विरंगुळा

पडावा म्हणून, तसेंच नवा उत्साह प्राप्त व्हावा म्हणून व्यसनें किंवा करमणुकी यांचा आश्रय करावा लागतो.

जगांत एकंदरीनें वर दाखविलेल्या वृत्तीचे आत्मतुष्ट (गी. ३-१७) क्वचितच असतात. सृष्टिसौंदर्य किंवा काव्यानंद यांचाही आस्वाद प्रत्येकास घेणें शक्य नसतें. अशा लोकांना बाह्य आनंदसाधनापासून वंचित करणें म्हणजे त्यांस जिवंतपणीं केवळ दुःखयातनाच भोगावयास लावणें होय. वेदांत 'आनन्देन जातानि जीवन्ति' म्हणजे 'प्राणिमात्र आनंदाच्या जोरावर जगतो' असें म्हटलेलें आहे. अर्थात् आनंद हें जीवितास आवश्यक असें अन्न आहे. बाह्य शरीरपोषणास ज्याप्रमाणें बाह्य अन्न अत्यंत जरुरीचें त्याचप्रमाणें प्रत्येकाच्या मनाचें पोषण होण्यास या आनंदमय अन्नांची जरुरी असते. आनंदाचें हें तत्त्वज्ञान लक्षांत घेतलें म्हणजे सांसारिक लोकांस व्यसनें व करमणुकी कां आवश्यक आहेत याचें इंगित लक्षांत येईल!

येथपर्यंत व्यसनें व करमणुकी यांचें बरोबरीनें केलेलें वर्णन पाहून कित्येकांस हे दोन्ही प्रकार आम्ही सारखेच मानतों असें वाटण्याचा संभव आहे. पण तसें नाहीं. या दोहोंमध्यें फारच मोठा फरक आहे. शीण घालविण्याकरितां व बाह्यसाधनांनीं आनंदाचा उपभोग घेतां यावा म्हणून या दोघांचा अवलंब केला जातो हें त्यांचें सादृश्य व ही उपपत्ति दाखविण्याकरितांच त्यांचें येथपर्यंत एकात्म्यानें विवेचन केलें. आतां प्रथम व्यसनांचा स्वतंत्र विचार करूं.

व्यसनांचे अनेक प्रकार आहेत. त्यांत दारू—माडी यांसारखीं पेयें, अफू—चरस यांसारखीं खाद्यें, तमाखू—गांजा यांसारखीं धूम्रपानें, व याशिवाय जुगार, सट्टा, लॉटरी यांसारख्या नादांचाही समावेश होतो. यांपैकीं कित्येक मादक आहेत. तीं मनुष्याचा स्वतःवरील ताबा उडवून त्यास पशु बनवितात. जुगार, सट्टे यांसारख्या संवयी मनुष्यास

भलत्याच प्रमाणांत आशावादी बनवून कर्तव्यपराङ्मुख बनवितात. हे प्रकार मनुष्याच्या चालू कार्यासच बाधा घालणारे असल्यामुळें ते त्याच्या उन्नतीस विरोधी असतात हें निराळें सांगावयास नकोच ! निशेचें सुख (?) भोगून चालू परिस्थितीचा विसर पाडण्याच्या इच्छेनें कित्येक व्यसनांच्या आहारीं जातात. पण गाफील व निःसंवेदन बनून अनुभवास येणारें सुख हें खरें सुख नसून तो मूर्तिमंत तमोगुण आहे. एखाद्या प्याल्यानें मनुष्य गाफील अतएव दारूबाज होत नाहीं हें खरें आहे; पण अनेक 'एकां'चेच शंभर पेले होतात व विशेषतः ज्याला दुसऱ्या कोणत्याही चांगल्या गोष्टींचा नाद नाहीं तो तर या तामस-सुखाकडे तत्काळ ओढला जातो असा अनुभव आहे. मद्याचें बोट म्हणतात तें यालाच ! धर्मशास्त्रांतही मद्यपानच नव्हे तर नुसतें मद्याचें भांडेंही अपवित्र मानलेलें आहे तें केवळ याच मनुष्यस्वभावाकडे लक्ष देऊन ! तेव्हां असल्या मोठ्या व्यसनांचे आहारीं जाऊन स्वतःचें स्वातन्त्र्य गमावून बसणें केव्हांही योग्य नाहीं.

मोठमोठ्या घातक व्यसनांचें येथपर्यंत वर्णन झालें. आतां तमाखू, तपकीर, पान, व चहा यांच्याकडे वळूं. हीं सर्वच व्यसनें घातुक आहेत असें नाहीं. फार काय विडा खाणें व धूम्रपान करणें हें प्रकृतीस हितावह आहे असें आयुर्वेदांत सांगितलेलें आहे. तेव्हां यांपैकीं एखाद्या पदार्थाचें आरोग्यशास्त्रास अनुसरून प्रमाणांत सेवन करण्याची संवय असेल तर त्यांत वाईट कांहींच नाहीं. एखाद्यानें एखाद्या वस्तूचें सेवन केलें तर तेवढ्यानें तो व्यसनी आहे असें होत नाहीं. तो पदार्थ प्रमाणा-बाहेर सेवन केला जाणें व एखाद्या वेळीं तो न मिळाल्यास बेचैन वाटणें हीं व्यसनाधीनतेचीं लक्षणें आहेत. हीं दोन लक्षणें जोंपर्यंत दिसून येत नाहींत तोंपर्यंत तशा मनुष्यास व्यसनी म्हणणें बरोबर होणार नाहीं. पुष्कळ वेळां दिवसांतून दहा दहा वेळां चहा तमाखूचें पान करूनही आपण व्यसनासक्त नाहीं अशी कित्येक स्वतःची व

लोकांची फसवणूक करीत असतात. त्यांनीं वरील दोन लक्षणांच्या द्वारानें वास्तविक सत्याचा उमज पाडून घ्यावा !

वरीलपैकीं एखादें व्यसन असलें तर तेवढ्याकरितां त्याचा सर्वस्वीं द्वेषच केला पाहिजे असें मात्र नाहीं. कारण हीं व्यसनें दारू-सट्टेबाजी-इतकीं समाजघातुक नाहींत.

पण अशा निर्जीव पदार्थांच्या आहारीं जाऊन स्वतःचें स्वातंत्र्य गमावणें मात्र योग्य नव्हे. या पारतंत्र्याची जाणीव ठेवून अशा व्यसनांच्या आहारीं न जाण्याविषयीं ज्याची त्यानेंच खबरदारी घ्यावी. इतरांनीं निषेध न केला तरी ज्याला स्वतःच्या स्वातंत्र्याचा योग्य अभिमान असेल तो असल्या निर्जीव पदार्थांच्या स्वाधीन स्वतःचें स्वातंत्र्य कधींही करणार नाहीं. व्याख्यान ऐन रंगांत आलेलें असूनही केवळ तलफ झाली म्हणून तें सोडून बाहेर येऊन दोन झुरके ओढणारे, सदैव तोंडांत अग्निहोत्र चालू रहावें म्हणून सिगारेट्चें डबडें बरोबर घेऊन हिंडणारे, गर्दीच्या ठिकाणीं इतरांस धुराचा त्रास होत आहे हें पहात असूनही त्याकडे केवळ तलफीखातर दुर्लक्ष करणारे, हे सर्व तमाखुपरतंत्र आहेत असें खुशाल समजावें. प्रवासांत चहाची वेळ येतांच स्टेशनवर मिळेल तसला चहा घेऊन मोकळे होणारेही याच वर्गांतील समजावे. तमाखु पिणारांनीं बाकी कोणताही संयम न दाखविला तरी त्यामुळें—स्वतःच्या काय किंवा दुसऱ्याच्या काय—घरांत किंवा घराबाहेर सर्वत्र विड्याकाड्यांचा सडा न पसरविण्याची खबरदारी घ्यावी. ‘ रक्षापात्र ’ ( Ash-tray ) असेल तर ठीकच; पण नसल तरी सुद्धां एखाद्या रद्दी कागदावर किंवा डबड्यांत सर्व कचरा करावा म्हणजे तो स्वच्छतेस विघातक होत नाहीं. पान खाणाऱ्यांनींही स्वच्छतेकडे लक्ष कसें दिलें पाहिजे याचें दुसरीकडे ( प्र. १८ पहा ) विवेचन केलेलें आहेच ! असो. आतां करमणूक विचारांत घेऊं.

करमणुकीचे अनेक प्रकार आहेत. बुद्धिबळें, पत्ते, केरम, सोंगट्या

यांसारखे बैठे व आट्यापाट्या, हुतुतू, टेनिस, बॅडमिंटन् यांसारखे घराबाहेर खेळण्याचे खेळ हा करमणुकीचा पहिला प्रकार होय. नाटक-सिनेमा पाहणें, गायनाचे जलसे ऐकणें वगैरे दुसऱ्या प्रकारांत येतील! तिसरा प्रकार बाहेरगांवीं प्रवास करणें किंवा गांवाच्या बाहेर फिरावयास जाणें हा होय. या तिन्ही प्रकारच्या करमणुकींपैकीं कित्येक प्रकारांचा प्रत्येकानें अनुभव घ्यावयास हरकत नाहीं. कित्येकांस तर कांहीं प्रकार आवश्यकच आहेत. त्यांचें सविस्तर वर्णन करतां येणार नाहीं. तथापि बैठे खेळ व फिरणें ( मोकळ्या हवेंत ) हे दोन प्रकार मध्यम वर्गांतील पांढरपेशांनीं अवश्य अवलंबावे असें वाटतें. त्यांतल्या-त्यांत मोकळ्या हवेंत खेळणें किंवा फिरणें प्रत्येकास आवश्यक आहे. तरुण विद्यार्थ्यांनीं फिरणें किंवा बैठे खेळ यांपेक्षां रोज उघड्या हवेंत व्यायाम देणारे खेळ खेळावे. विद्यार्थ्यांनीं केरम, पत्ते यांच्या नादीं फारसें लागूं नये. बुद्धिबळें खेळून बुद्धि वाढते असली खोटी समजूत करून घेऊं नये. नोकरीपेशाच्या लोकांनीं मात्र बैठे खेळ खेळण्यास हरकत नाहीं.

पांढरपेशांमध्यें खेळून करमणूक करून घेण्याच्या बाबतींत परस्पर विरुद्ध दोन टोकें दिसून येतात. कित्येक शहरांतून वकील-डॉक्टर वगैरे वर्गांतील लोक रोज नियमानें पत्ते खेळत असतात. हे लोक आपला हा कार्यक्रम इतक्या निष्ठेनें पाळतात कीं त्यापुढें जुन्या कर्मठ ब्राह्मणां-नाही लाज वाटावी. गांवांत कोणतीही सभा असो कीं व्याख्यानांचे कार्यक्रम असोत हे आपले पत्ते सोडण्यास तयार होणार नाहींत. कदाचित् एखाद्यानें व्याख्यानाचा विषय काढलाच तर ‘ कां देशभक्ति आवडूं लागली वाटतें ? ’ ‘ आम्ही बुवा प्रापंचिक लोक, आमच्या नशिबीं पुराणप्रवचनें कोठून ? ’ ‘ अहो एवढें ज्ञान सांठवून तुम्ही ठेवणार तरी कोठें ? ’ असलीं उपरोधिक भाषणें सुरू होतात. देशभक्ति, धर्म, ज्ञान असल्या गंभीर विषयांची करमणुकीच्या जागीं याप्रमाणें कुचेष्टा

व्हावी हें दुर्दैव होय. खेळापुढें दुसरें कांहींही न आवडण्याइतकें खेळाचें वेड असणें म्हणजे तें एकप्रकारें व्यसनच समजावयास हरकत नाहीं. आम्हीं क्लबांच्या व खेळांच्या विरुद्ध नाहीं. पण त्याबरोबरच क्लबांतील लोकांनींही इतर चळवळींचा विरोध किंवा हेटाळणी करूं नये असें आमचें म्हणणें आहे.

नव्या लोकांत केव्हां केव्हां वरील अतिरेक दिसतो तर कित्येक जुन्या परंपरेचा भलताच अर्थ घेऊन अजिबात खेळ टाळतात. ‘ आपलें ऑफिस बरें कीं बिऱ्हाड बरें ! आम्हीं तिसऱ्या भानगडींत पडत नाहीं. ’ असें उत्तर पुष्कळांच्या तोंडून ऐकूं येतें. एखाद्या तत्त्वज्ञान्याला किंवा दीर्घ व्यासंग्याला शोभेल असें हें उत्तर एखाद्या सामान्य र ट फ करणाऱ्याच्या तोंडून ऐकलें म्हणजे नवल वाटतें. शेजारीपाजारी खेळतात, एकमेकांत मिसळतात तर आपण त्यांपैकीं कांहींच करीत नाहीं हेंच आपलें वैशिष्ट्य असें अशा एकलकोंड्यांना वाटतें. पण यांत कोणताच पुरुषार्थ नाहीं. शेजाऱ्यांशीं गोडीगुलाबीनें व मिळूनमिसळून वागणें यांतच माणुसकी आहे. खेळांत करमणुकीबरोबरच शेजारधर्मही साधतां येतो. म्हणून आठवड्यांतून एकाद्या दिवशीं तरी शेजाऱ्यांत मिसळून बैठे खेळ खेळण्याचा परिपाठ ठेवावा.

कित्येकांस एकलकोंडेपणाची व चालू व्यवसायाची इतकी संवय लागून जाते कीं सुट्टी असली तरी ऑफिसचें काम हे लोक घरीं घेऊन येतात. त्यांस दुसऱ्या कशांत करमतच नाहीं. अशा लोकांस पेन्शन् घेतल्यावर मरणप्राय दुःख होतें. त्यांचा वेळच जात नाहीं. नोकरीच्या पायीं याप्रमाणें स्वत्वास गमावून बसणें फारच भयंकर नव्हे काय ? यास उपाय म्हणून नोकरी चालू असतांनाच नोकरीखेरीज इतर गोष्टींत मन रमविण्याचा अभ्यास केला पाहिजे. त्याचा प्रारंभ म्हणून सुट्टीचा दिवस अगदीं निराळ्या तऱ्हेनें वाचन, व्याख्यान, खेळ, फिरणें वगैरेंत घाल-

विण्याचा परिपाठ ठेवावा. नेहमींच्या चकारींतून त्या दिवशीं तरी न जाण्याचा आटोकाट प्रयत्न करावा.

सवड असेल त्याप्रमाणें वर्षांतून ८–१५ दिवस तरी प्रवासांत घालवावे. प्रवासानें भोंवतालच्या परिस्थितीचेंही निरीक्षण करतां येतें. जीवनाचा विकास या दृष्टीनेंही प्रेक्षणीय स्थळें पाहणें व निरनिराळ्या समाजांचें प्रत्यक्ष अवलोकन करणें आवश्यक आहे.

येथपर्यंत मनोरंजनाचे मुख्यत्वेंकरून दोन उपाय सांगितले. एक व्यसनें व दुसरा खेळ, फिरणें वगैरे. या दोहोंतही इतरांचा संबंध आणतां येतोच. तेव्हां सामाजिक धर्म किंवा शेजारधर्म या दृष्टीनेंही या दोन प्रकारच्या साधनांचा उपयोग करतां येतो हें सांगावयास नकोच ! पण याहीपेक्षां एक तिसरा व सर्वश्रेष्ठ असा मनोरंजनाचा प्रकार आहे. त्यांत ललितवाङ्मयाचें वाचन, इतिहास व निरनिराळ्या प्रदेशांची माहिती करून घेणें, तसेंच निरनिराळ्या प्राचीन व अर्वाचिन विषयांवरील चर्चा यांचा समावेश होतो. आधुनिक सुशिक्षितांत हा तिसरा प्रकार जवळजवळ मुळींच रूढ नाहीं असें म्हटलें तरी चालेल. क्लब पाहिजेत. पण तेथें सुशिक्षितांनीं एकत्र जमल्यावर केवळ गांवांतील कुटाळक्यांचे विषय हाताशीं घेणें किंवा पत्ते कुटणें एवढेंच न करतां वरील प्रकारची चर्चाही मधून मधून करीत गेले पाहिजे. अशा चर्चा कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश न ठेवतां केल्या जातील तर सहजासहजीं ज्ञानाची देवघेव होऊन करमणूक, सहकारिता व ज्ञानवृद्धि होईल ! कित्येक ठिकाणीं चर्चामंडळें स्थापन झालेलीं आहेत. पण याचा अर्थ असा नाहीं कीं खेळण्याकरितां असलेल्या क्लबांत जमलेल्या सद्गृहस्थांनीं चर्चेचें वावडें समजावें. केवळ क्लबांतच नव्हे तर चाळींचाळींतूनही सुशिक्षितांनीं वाचन व संवाद यांचा करमणूक म्हणून अवश्य उपयोग करावा. श्रेष्ठ प्रकारची करमणूक हीच आहे. मधून मधून प्रवास करून सृष्टीचें व समाजाचें प्रत्यक्ष निरीक्षण करणें हाही

प्रकार यांतच समाविष्ट करावयास हरकत नाहीं. हाच मनोरंजनाचा सर्वश्रेष्ठ उपाय कसा आहे हें नीट लक्षांत यावें म्हणून मनोरंजनाचे तिन्ही मार्ग येथें एकाखालीं एक दाखवितों.

**श्रेष्ठ**—काव्यशास्त्रविनोद, वाचन, लोक-सृष्टिनिरीक्षण.

**मध्यम**—सर्व प्रकारचे खेळ.

**कनिष्ठ**—भाण्डण, व्यसन व गुंगी.

भांडणें हीं करमणुकीचीं साधनें कशीं आहेत हें पाहणें असेल तर आजच्या कित्येक साप्ताहिकांची वाङ्मयसेवा (?) पहावी.

वरीलपैकीं तिसरा प्रकार सर्वस्वीं त्याज्य होय यांत शंका नाहीं. दुसरा प्रकार निरनिराळ्या सणावारीं अवलंबावा. दिवाळी, कोजागिरी यांसारख्या प्रसंगीं खेळावें असें ग्रंथांतरीं सांगितलेलेंच आहे. त्यांतील मर्म हेंच आहे कीं, स्वतः खेळाच्या ताब्यांत न जातां केवळ खेळच ज्यांस माहीत आहे त्यांच्यांत मिसळून त्यांच्याशीं कांहीं काळ समरस होतां यावें. अर्थातच येथें खेळ शब्दानें बैठे खेळ घ्यावे. शारीरिक खेळ (व्यायाम देणारे) हे केव्हांही चांगलेच! पहिला प्रकार कसा उच्च आहे हें वर दाखविलेंच आहे.

कित्येक पांढरपेशांमध्यें सहकुटुंब बाहेरगांवीं फिरण्याची व राहण्याची सध्यां आवड उत्पन्न होत आहे हें अभिनंदनीय आहे. पण अशा स्थलांतरांचा आमच्या महिलावर्गास कांहींच फायदा होत नाहीं. त्यांची चूल प्रवासांतही त्यांच्या मागें लागलेलीच असते. बाहेरून फिरून आल्यावर पुन्हा चुलीशीं बसून काम करण्याचा प्रसंग आल्यानें त्यांस दुप्पट श्रम होतात. तेव्हां ही अडचण दूर झाली पाहिजे. प्रवासांत कुकरचा उपयोग सार्वत्रिक होईल, तसेंच भट्टीवर भाजलेले ब्रेड वगैरे पदार्थ उपयोजिले जातील तरच हे श्रम चुकवितां येणें शक्य आहे. तरी प्रवासांत या दोन आधुनिक सुखसोयींचा अवश्य उपयोग करावा. रोजदेखील याच प्रकारानें श्रम व वेळ यांची बचत केली

जाईल तर महिलांस इतर व्यायाम, वाचन वगैरेंचा आस्वाद घेणें सोईचें जाऊन ' विवाहोत्तर शिक्षणाचा कांहींही उपयोग होत नाहीं, ' अशी ओरड करण्याची पाळी येणार नाहीं. तरी या मुद्द्याचा सहकुटुंब प्रवास करणाऱ्यांनीं अवश्य विचार करावा. हिंदु भट्ट्या फारच कमी आहेत. पण वरील प्रकार जसजसा रूढ होत जाईल तसतसें त्यांस उत्तेजन मिळून आमच्या सैंपाकघरांतही त्यामुळें बराच सुटसुटीतपणा येईल. भट्टींत भाजलेल्या पदार्थांस कन्दुपक्व अशी प्राचीन संज्ञा आहे. असले शूद्रानें केलेले पदार्थही दोषावह नाहींत असें स्मृतिकार सांगतात ( आरनालं तथा क्षीरं ' कन्दुकं ' दधि .... शूद्रस्यापि न दुष्यति । अत्रि २४६ ). तरी योग्य प्रमाणांत या प्राचीन प्रथेचा स्वीकार करून पर्यटनाचें खरें सुख अनुभवावें हें उचित होय. असो.

या प्रकरणांतील सर्व विवेचन प्राचीन वचनांचा आधार न दाखवितांच केलेलें आहे. यावरून त्यास प्राचीन आधारच नाहीं असें मात्र समजूं नये. पुढील सुभाषितांत वरीलपैकीं पहिल्या व शेवटच्या प्रकारांचें स्पष्ट विवेचन आहे, तें सुभाषित असें–

**काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।**
**व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥**

व्यसनें व करमणुकी यांचे बाबतींत शिष्टाचारांचें परिपालन कसें करावें याचा विचार झाला. कित्येक वेळां शुभाशुभ कल्पनांस बळी पडूनही शिष्टाचाराचा अतिक्रम होतो. त्याची योग्यायोग्यता कळावी म्हणून पुढील प्रकरणांत त्यांचाच विचार करूं.

## प्रकरण सोळावें

# शुभाशुभविचार

हिंदुधर्मास आजचें हीनदीन स्वरूप ज्या कित्येक भ्रान्त कल्पनांमुळें प्राप्त झालेलें आहे, त्यांत शुभाशुभाच्या व शुद्धाशुद्धतेच्या कल्पनांस प्रामुख्य द्यावें लागेल. यांपैकीं शुद्धाशुद्धतेच्या कल्पना अतिरेकास जाऊन विघटना व तुसडेपणा यांचें पीक आलें व हिंदुसमाज बाह्यांचा प्रतिकार करण्यास असमर्थ झाला ! उलटपक्षीं शुभाशुभांच्या कल्पनांमुळें भय, शंका, निरुत्साह असल्या दुर्बल मनोवृत्तींसच उत्तेजन मिळून अधोगति पदरीं आली. साध्या शिष्टाचारावरही या दोन्हींचा परिणाम झालेलाच आहे. म्हणून या दोहोंपैकीं शुद्धाशुद्धतेचा विचार पुढील प्रकरणावर ठेवून या प्रकरणांत शुभाशुभ विचार करण्याचें ठरविलें आहे. त्यांतही प्रामुख्यानें अशुभविचारच केला पाहिजे.

प्रामुख्यानें अशुभ कल्पनांचा विचार केला तर त्यांचे पुढीलप्रमाणें वर्ग पडतीलः—

( १ ) अशुभ वस्तु—प्रेत, विधवा, गर्दभ इ०

( २ ) अशुभ क्रिया—डोळा लवणें, पाल पडणें, शिंक इ०

( ३ ) अशुभ शब्द—घुबडाचा, भालूचा, कावळ्याचा ( विशिष्ट दिशेस )

( ४ ) अशुभ अवस्था—( गमनसमयीं ) बोडका ब्राह्मण, रिकामी घागर, रांगोळी नसलेलें सारवण इ०

( ५ ) अशुभ काल—अमावास्या, व्यतिपात, मूळ ( जन्मसमयीं ) घातवार इ० इ०

वरील पांच प्रकारांपैकीं शेवटचा प्रकार फलज्योतिषाच्या सिद्धान्तावर आधारलेला आहे. पण त्या त्या काळीं आरंभिलेलें कार्य सिद्धीस

ात नाहीं ही फलज्योतिषोक्त समजूत अनुभवानें खोटी ठरलेली
ाहे. गमनास शुभमुहूर्त मोठ्या कसोशीनें पाहूनहीं कार्यव्याघात
ाल्याचीं उदाहरणें पुष्कळच आहेत. शिवाय पूर्वी प्रवासाचे प्रसंग
गदीं क्वचित् येत यामुळें प्रस्थानाचा मुहूर्त ठरविणें शक्य तरी होत
से. आतां वारंवार प्रवास करावा लागतो. यामुळें हा विचार आतां
शक्यही आहे. अमावास्येच्या दिवशीं प्रवास सुरू केल्यास ' मार्गी
ास ' भोगावा लागतो अशी समजूत आहे. पण अमावास्येच्या दिवशीं
ोकणभागांतील बोटींतून प्रवास केल्यास उलटी भरपूर जागा मिळून
त्नागिरीगोव्याकडील प्रवास सुखाचा होतो असा अनुभव आहे.

ज्योतिषशास्त्राकडे लक्ष दिलें तरी "ज्यांच्या मनांत शंकाभाव असेल
यांसच हे मुहूर्त होत. तसें नसून मन प्रसन्न असेल तर सर्व वेळा
नुकूलच असतात* " हाच सिद्धान्त प्रत्ययास येतो. अर्थात् फल-
ज्योतिषांतील गमनमुहूर्त निरुत्साही व शंकित यांस उत्साहसंपन्न करून
कार्यास प्रवृत्त करण्याकरितां आहेत. उत्साहिताला व्यतिपात दाखवून
खचावण्याकरितां नाहींत. म्हणून अमावास्येच्या व व्यतिपाताच्या
भीतीनें गर्भगळित होण्याचें कारण नाहीं. सर्वव्यापी ईश्वराचें स्मरण
केलें म्हणजे सर्व कुयोग नष्ट होतात.¶ तरी त्याचें स्मरण करून कोण-
त्याही कार्यास लागावें. उगाच तिथिवारनक्षत्रांच्या बेरीज वजाबाक्यां-
च्या भानगडींत पडूं नये. याप्रमाणें वरील अशुभांपैकीं पांचवा प्रकार
पाहून झाला. आतां चौथ्याकडे वळूं.

---

* मनसस्तुष्टिरेवात्र परं व्रजनकारणम् ।
एकतः सर्व लिङ्गानि मनसस्तुष्टिरेकतः ॥ या. अ. १.१३३

¶ तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चन्द्रबलं तदेव ।
विद्याबलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेंघ्रियुगं स्मरामि ॥

याच श्लोकास अनुसरून लग्नमुंजींचे मुहूर्त केव्हांहि कसे ठरवितां येतात
याचें विवेचन मागें ( पृ. १३० ) केलेलेंच आहे.

चवथ्या प्रकारांतील अशुभांचा–' रिकामी घागर सोडून '–पूर्वींच्या विशिष्ट चालीशीं संबंध आहे. प्रेतयात्रेच्याच वेळीं बोडक्यानें जाण्याचा रिवाज होता. तसेंच मृताशौचप्रसंगीं सारवणावर रांगोळी घातली जात नसे. पण आतां केशकलाप ठेवण्याचीच पद्धत प्रचारांत असल्यामुळें व टोपी न घालतां जाणेंही अशिष्टपणाचें गणलें जात नसल्यामुळें ती अशुभकल्पना सोडून दिली पाहिजे. सारवणें व रांगोळी या दोहोंचेंही आतां उच्चाटनच होत असल्यामुळें त्यांचें अशुभत्व आतां फारसें जाणवत नाहींच. शिवाय रांगोळी बाह्यशोभेकरितां घालावयाची असते हें तत्त्व ज्यांस मान्य असेल त्यांस रांगोळी नसणें अशुभ नाहीं, हें सहज कळून येईल.

वरील दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारांतील अशुभें केवळ काल्पनिक आहेत. केव्हांतरी हीं व नुकसान यांची काकतालीयन्यायानें गांठ पडून या समजुती रूढ झालेल्या असाव्या. यांपैकीं डोळा स्फुरणें वगैरे दुश्चिन्हें मानण्याचा प्रघात प्राचीनकालापासून आहे. रामायणांतही झंझावात, विद्युद्घोष, पक्ष्यांचे आवाज वगैरे दुश्चिन्हांचा उल्लेख आढळतो. मांजराचें आडवें जाणें याच वर्गांतील समजावें. या सर्व गोष्टी कारणपरत्वें घडत असल्यामुळें त्यांचा स्वतःच्या भवितव्याशीं बादरायण संबंध लावणें सर्वथा अशास्त्रीयपणाचेंच होय. तरी असल्या दुश्चिन्हांनीं घाबरून जाणें यांत कोणत्याही धार्मिकवृत्तीचा समावेश नाहीं हें निश्चित समजावें.

आतां पहिला प्रकार लक्षांत घेऊं. या प्रकाराचा अम्मल फारच विलक्षण तऱ्हेनें हिंदु मनावर झाल्याचें दिसून येतें. मृत्यु अशुभ, मृताचें दर्शन अशुभ, रडण्याचा ध्वनि ऐकणें अशुभ, मृताची पत्नी ( विधवा ) अशुभ व त्याबरोबरच तिचें दर्शनही अशुभ, अशी ही अशुभाची परंपरा आहे. या सर्व कल्पनांची आद्यजननी मृत्यु अशुभ, हीच कल्पना आहे. याच कल्पनेनें मृतापासून दूर राहण्याचा आपण प्रयत्न

करतों. मृताशीं कोणताही संबंध ठेवणें म्हणजे जाणून बुजून उघड्या डोळ्यांनीं अशुभाच्या आगींत उडीच घेणें होय अशी कित्येकांची समजूत असते. या समजुतीमुळें मृत्यूविषयीं फार मोठी दहशत हिंदूंच्या मनांत बसलेली दिसून येते. प्रेतयात्रेच्या प्रसंगीं शेजारचे हिंदु जी टाळाटाळी करतात ( पृष्ठ १५२–५३ पहा ! ) तिचाही उगम याच कल्पनेंतून आहे.

परंतु यांपैकीं एकही कल्पना हिंदुधर्माच्या मूळ तत्त्वास धरून नाहीं. आत्म्याचें अमरत्व तसेंच शरीर हा केवळ त्याचा पोषाख आहे या गोष्टी हिंदुधर्मांत सर्वमान्य आहेत.

**अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च**

ही आत्म्याविषयींची भगवन्तांची घोषणा प्रसिद्धच आहे. अर्थात् खऱ्या हिंदूनें मृत्यूला घाबरण्याचें कारण नाहीं.

मृत्यूमुळें याप्रमाणें आत्मनाश होत नसल्यामुळें त्याला भिणें हा आत्मस्वरूपाचें अज्ञान व विद्यमान शरीरावरील आसक्तीमुळें उत्पन्न होणारा मोह यांचा परिणाम आहे. तो प्रत्येकानें नष्ट केला पाहिजे. मृत्यूनेंच खरें तत्त्वज्ञान जगांत उत्पन्न केलें आहे. मृत्यु नसता तर जगाची काय अवस्था झाली असती याचा क्षणभर विचार करून पहावा. झाडाचीं पिकलीं पानें गळून पडतात व त्यांच्या जागीं नवीं तजेलदार उत्पन्न होतात हें चांगलें कीं वाईट ? मग क्षीणबल, हतवीर्य, परतन्त्र असा गलित देह पडून नवा घेण्याची पाळी आली तर त्यांत आनंदच वाटावयास नको काय ? अशा दृष्टीनें पाहिल्यास मृत्यूमध्यें अमंगल कांहींच नसून तोच जगतांत नवचैतन्य व पराक्रम उत्पन्न करीत आहे हें लक्षांत येईल.

नचिकेतस् नांवाचा मुलगा मृत्यूपाशीं धैर्यानें गेला व आत्म्याचें तत्त्वज्ञान शिकून आला अशी हकिकत कठोपनिषदांत आहे. यमाला

पाहून तो घाबरला नाहीं. तेव्हां मरणाविषयीं भयभीत होणें व त्या दृष्टीनें मृत मनुष्यापासून दूर दूर राहण्याचा प्रयत्न करणें यांत मुळींच धार्मिकता नसून केवळ अधर्मप्रवर्तक भ्याडपणाच आहे. ‘ मूर्खा ! मृत्यूला काय भितोस ? भ्यालास तर तुला मृत्यु सोडील असें तुला वाटतें काय ?* ’ असा मार्मिक प्रश्न एकानें केलेला आहे तो याच दृष्टीनें. म्हणून मृत्यूमध्यें कांहींही अमंगल नाहीं हें निश्चित समजावें. ईश्वराच्या किंवा निसर्गाच्या नियमाप्रमाणेंच मृत्यु प्राप्त होत असतो, तेव्हां त्यास अशुभ मानणें म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराचाच अपमान करण्यासारखें आहे हें पक्कें ध्यानांत धरावें.

ज्याप्रमाणें मृत्यूंत कांहींही अशुभ नाहीं त्याचप्रमाण मृतामुळें त्याच्या नातलगांतही कांहीं अशुभ उत्पन्न होतें असें नाहीं. अर्थात् विधवेला अशुभ मानणें यांत कोणतेंही तत्त्व नाहीं. मंगलप्रसंगींच नव्हे तर इतर वेळींही विधवेचें दर्शन टाळण्याचा प्रयत्न केला जातो. त्याच्या मुळाशीं विधवेच्या दर्शनामुळें आपणास अपयश येईल अशी कल्पना असते. पण यशापयश हें स्वतःची कर्तबगारी व अनुकूल परिस्थिति यांवर अवलंबून असतें. त्यांचा कोणाच्या दर्शनाशीं किंवा कोणाच्या पुढें येण्याशीं कांहींही संबंध नसतो.

अशुभांच्या पहिल्या प्रकारांत गाढवांसारख्या पशूंचाही अन्तर्भाव आहे. तोही निर्मूलच होय. धुळींत लोळणें वगैरे प्रकारांमुळें हा पशु मलिन असतो हें खरें आहे. पण तसा असला तरी त्यास अस्वच्छ म्हणतां येईल; परंतु अशुभ म्हणतां येणार नाहीं. पूर्वीं यज्ञांत गर्दभांचा संबंध असतच होता ! दक्षिणा म्हणून गाईघोड्यांबरोबरच गाढवांचाही उल्लेख दिसून येतो. तरी या नसत्या कल्पना आतां सोडून द्याव्या.

संस्कृत वाङ्मयाकडे पाहिलें तर शुभ व अशुभ यांचे पर्याय शब्द

---

* मृत्योर्बिभेषि किं मूढ भीतं मुञ्चति किं यमः ?

अनुक्रमें मंगल व अमंगल असे सांपडतात. या दृष्टीनें पाहिल्यास शुभाशुभाच्या व मंगलामंगलाच्या कल्पना कशा उद्भूत झाल्या हें ठरवितां येतें. चांगलें, स्वच्छ जल दृष्टीस पडतांच मन प्रसन्न होतें. उलट घाणेरडें डबकें किंवा सडणारे पदार्थ पाहिले म्हणजे मन अप्रसन्न बनतें. आंबा, केळ वगैरे झाडें त्यांच्या सौंदर्यामुळें व उपयुक्ततेमुळें मंगल ठरलीं. याच्या उलट कांट्याकुट्यांनीं भरलेलीं अल्प छाया देणारीं दुर्गंधियुक्त झाडें अशुभ म्हणून गणलीं गेलेलीं आहेत. धर्मशास्त्रांतील शुभाशुभाच्या कल्पना याप्रमाणें सौंदर्य व स्वच्छता या तत्त्वांवरच उभारलेल्या आहेत. धर्मशास्त्रांत शुभ वस्तूंचा अंगीकार करावा असें सांगितलें आहे. त्याचा अर्थ मनुष्यानें स्वच्छता व सौंदर्य यांवर कटाक्ष ठेवावा एवढाच आहे.

गंध, कुंकू, मंगळसूत्र, पोत, नथ, बांगड्या, पायांतील जोडवीं वगैरे प्रकार मूळ सौंदर्यवर्धक म्हणूनच मान्य केले गेलेले आहेत. त्या त्या काळच्या सौंदर्यकल्पनांप्रमाणें ते शुभ ठरून रूढ झाले. पुढें सौंदर्यकल्पना बदलतांच कांहींचें रूप बदललें, कांहीं नष्ट झाले तर कांहीं केवळ धार्मिक ( ? ) प्रसंगींच वापरावे अशी तडजोड निघाली. स्त्रियांचा केसांची वेणी घालण्याचा प्रकार मागें पडल्याबद्दल कित्येक वृद्धांस आज हळहळ वाटते. पण केशकलापाचा सौंदर्याशीं संबंध आहे व सौंदर्यकल्पना बदलत्या असतात, हें त्यांनीं लक्षांत घेतल्यास त्यांस तसें वाटणार नाहीं. पुरुषांचें गंध गेलें तरी त्यांस आतां कोणी अशुभ समजत नाहीं. पण बायकांचें कुंकू थोडें विस्कटलें तर कांहीं तरी मोठें भय येणार असें वाटून कित्येक आर्यमहिलांचा जीव आजही घाबरा-घुबरा होऊन जातो. पण हें केवळ अज्ञान आहे. हातांतील बांगडी वाढवली तर हाताचें सौंदर्य खुलविणारी दुसरी घालावी. पण त्यांत कांहीं अशुभ झालें असें मानून घाबरून जाऊं नये. याचप्रमाणें इतर वस्तूंबद्दलही समजावें. स्वच्छता व सौंदर्य यांची जोपासना तत्परतेनें

करावी एवढेंच धर्मशास्त्र सांगतें. त्याचा तपशील तत्तत्कालीन अभिरुचि लक्षांत घेऊन ठरवावा. धर्मशास्त्रांतील शुभ विचार हेंच सांगतो. त्याचप्रमाणें अशुभाचा परित्याग करावा असें सांगण्यांत धर्मशास्त्राचा अस्वच्छता व सौंदर्यविरोधी आचारांस आळा पडावा एवढाच उद्देश असतो. यांपैकीं अस्वच्छतेबद्दल पुढील प्रकरणांत विवेचन दिलेलेंच आहे.

सौंदर्याविषयीं मात्र येथें लिहिणें अवश्य आहे. कारण घरांत किंवा बाहेर टापटीप व नीटनेटकेपणा असणें या गोष्टीकडे आम्हां हिंदूंचें अगदींच दुर्लक्ष दिसून येतें. पण हें परंपरेस सोडून आहे. रामायणांत अयोध्येचें जें वर्णन आहे, त्यांत रस्त्यांचें वर्णन करतांना त्यांवर फुलांचा सडा पडलेला होता असें वर्णन आहे. सध्यांच्या नगरसंस्था केवळ झाडलोट करून पाणी शिंपणें एवढेंच आपलें कर्तव्य समजतात. प्राचीन नगरसंस्था यापलीकडे जाऊन सौंदर्य व सुगंध अशा दोन्ही दृष्टींनीं रस्त्याचें सौख्य वाढवीत असत. पण आतां हीं पुराणांतील वांगीं पुराणांत राहिलीं आहेत. शोभा या पदार्थाचा मागमूसही आमच्या आचारांत दिसून येत नाहीं. फार काय गबाळेपणा हाच हिंदूपणा असा आम्ही जगाचा ग्रह करून दिलेला आहे. मूळ घर व आंगण यांचें सौंदर्य वाढविण्याकरितां निघालेली रांगोळी आज कोणत्या स्वरूपांत आहे याचा विचार केला म्हणजे याचें प्रत्यंतर येईल, पण आतां हिंदूंनीं ही सौंदर्यपराङ्मुखता आपल्या कृतीनें खोडून काढली पाहिजे.

रस्ते, आंगण, घर या सर्वांचें सौंदर्य खुलून दिसेल अशाविषयीं हिंदूंनीं तत्पर असलें पाहिजे. घरांत त्याच वस्तूंची मांडणी कशी केली असतां तें अधिक आकर्षक दिसेल याचा विचार मनांत वागवला पाहिजे. घरांतील वस्तूंप्रमाणेंच पोषाखांतही नीटनेटकेपणा व सौंदर्य असणें इष्ट आहे. थोडक्या खर्चांत अधिक सौंदर्य कसें उत्पन्न करावें हें अनुभवानेंच कळणें शक्य आहे.

येथें एवढें मात्र प्रत्येक हिंदूनें लक्षांत बाळगलें पाहिजे कीं, गबाळेपणा आमच्या धर्मास संमत नाहीं. सहजसौंदर्यास टापटिपीच्या कोंदणांत बसवून जागेची मंगलता व शुभता वाढविणें या बाबीकडे प्रत्येक हिंदूनें काळजीपूर्वक लक्ष दिलें पाहिजे. असो.

या प्रकरणांत दिलेल्या निर्मूल अशुभ कल्पना आतां हिंदूंनीं सोडून देऊन मनाची प्रसन्नता बिघडेल अशा अशुभांचा यथायोग्य प्रतिकार करून मनःप्रसाद वाढविणाऱ्या शुभ व मंगल प्रसंगांचा अंगीकार करावा एवढेंच या बाबतींत आमचें म्हणणें आहे. गौ. ध. सूत्रांतही याच तत्त्वावर गृहस्थानें नेहमीं स्वच्छ, सुगन्धयुक्त व स्नानशील असावें. ( नित्यं शुचिः सुगन्धः स्नानशीलः । ९·२ ) असें सांगितलेलें आहे.

शिष्टाचारांच्या अनुषंगानें शुभाशुभविचार या प्रकरणांत केला. आतां शुद्धाशुद्धतेच्या विचाराकडे वळूं.

## प्रकरण सतरावें

# शुद्धिविवेक आणि प्रायश्चित्त

हिंदूंच्या मनावर शुद्धाशुद्धतेच्या कल्पनांचा फारच मोठा पगडा बसलेला आहे. या कल्पनाही पिढ्यान् पिढ्या तपासल्या न गेल्यामुळें त्यांचीं मूळ शुद्धरूपें नष्ट होऊन आज कित्येक समजुती तापदायक तर कित्येक वेडगळ झालेल्या आहेत. अशुद्धि नष्ट करण्याचे जे उपाय त्यांस प्रायश्चित्त असें म्हणतात. त्यांचेंही विवेचन याच प्रकरणांत पाहूं.

शुद्धता या तत्त्वास धर्मांत फारच महत्त्वाचें स्थान आहे. जेथें जेथें धर्माच्या तात्त्विक स्वरूपाचें विवेचन येतें तेथें शुद्धता किंवा 'शौच' याची गणना केलेली दिसून येते. यज्ञवल्क्यांनींही याचकरितां

अहिंसासत्यमस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।
दानं दया दमः क्षान्तिः सर्वेषां धर्मसाधनम् ॥ १ १२२

या वचनांत १ सत्य, २ अस्तेय, ३ शौच, ४ अहिंसा, ५ दया, ६ इन्द्रियनिग्रह, ७ दम, ८ क्षान्ति व ९ दान हीं मनुष्यमात्रास धर्मसाधनें आहेत असें सांगितलें आहे. यांपैकीं पहिलीं तीन तत्त्वें 'शौच' या एकाच तत्त्वाखालीं येतात. वाणीच्या शुद्धतेस सत्य असें म्हणतात, तर अर्थशौचास अस्तेय असें नांव आहे. म्हणून आचारधर्माचें विवेचन झाल्यावर मूलभूत व्यापक धर्मतत्त्वांपैकीं या तिन्ही तत्त्वांचा आतां या एकाच प्रकरणांत विचार करूं.

शुद्धतेचे मुख्य दोन प्रकार आहेत. एक बाह्यशुद्धि व दुसरी अन्तःशुद्धि. धार्मिक मनुष्यानें या दोन्ही शुद्धींबद्दल सारखीच काळजी घेतली पाहिजे. शरीर, त्यावरील कपडे व इतरही बाह्य वस्तु या झाडून सारवून स्वच्छ ठेविल्या पाहिजेत. यांत आरोग्य व मनःप्रसन्नता हे दोन

मुख्य हेतु आहेत. घामट राहणीनें आरोग्य व मनःस्वास्थ्य यांचा बिघाड होतो हें कोणासही पटण्यासारखें आहे. पण या साध्या बाबतींतही जुन्यांचें व नव्यांचें सारखेंच दुर्लक्ष दिसून येतें.

जुने पूजापाठ करणारे देवघरांत जी शुद्धि पाळतात ती इतरत्र आवश्यक समजत नाहींत. आजीबाई उंबरठा धुतांना व रांगोळी काढतांना बाजूच्या केरकचऱ्याकडे पहात नाहींत. अगदीं उच्चवर्णीयांतसुद्धां भांडींकुंडीं, वस्त्रें-प्रावरणें यांच्या शुद्धतेकडे असावें तसें लक्ष असत नाहीं; गबाळेपणाबरोबरच गलिच्छपणाही दिसून येतो. पण जुने कित्येक आचार असे आहेत कीं, त्यांमुळें घरांतील झाडसारव तरी वेळच्या वेळीं होते. घरांतील भांडीं केव्हां घासावीं, वेणीफणी केव्हां करावी, वगैरेबद्दलच्या रूढी आजवर पाळल्या जात होत्या. यामुळें गृहाची अन्तर्गत शुद्धि बहुधा रहात असे. पण सार्वजनिक स्थळांच्या स्वच्छतेकडे याही लोकांचें दुर्लक्षच असे. अजूनही नवी सुधारणा अंगीं न बाणलेल्यांच्या हातून याच चुका होतात. त्यांतील कित्येकांचें वर्णन मागील एक दोन प्रकरणांत आलेलेंच असून काहींचें पुढील प्रकरणांत येणार आहे; म्हणून त्यांचा विस्तार येथें करीत नाहीं. सर्व धर्मबांधवांनीं विशेषतः नव्यांनीं जरा डोळे उघडून परीक्षण केलें तर त्यांस शुद्धाशुद्धीचा विचार कोठेंकोठें आवश्यक आहे हें कळण्यासारखेंच* आहे.

---

* नवीनांनीं जोडे, बूट घालून घरांत कोठपर्यंत जावें, खिशांतील हातरुमाल किती दिवसांनीं धुवावा, जेवणाखाणापूर्वीं हात धुणें व नंतर तोंड धुणें जरुरीचें आहे कीं नाहीं, टेनिस खेळल्यावर डाळेंचुरमुऱ्यांचा भत्ता कालवतांना काय पहावें, हजामाच्या दुकानांतून घरीं आल्यावर किती वेळानें स्नान करावें व मध्यन्तरीं खानपान करावें कीं नाहीं, वगैरे गोष्टींचा विचार करावा. लेखकावर न रागावतां व नवरूढींचा अंधपणा न स्वीकारतां हा विचार करावा म्हणजे झालें.

अनारोग्यकारक अशुद्धीशिवाय ओवळें व विटाळ या नांवाच्या दोन अशुद्धि आज रूढ आहेत त्यांचा आतां विचार करूं. ओवळें याचा पर्याय शब्द संस्कृतांत सांपडत नाहीं. सोंवळ्याबद्दल तर मागें ( पृ. १७५ ) बाराव्या प्रकरणांत सांगितलेंच आहे, तेव्हां ओवळें नांवाच्या अशुद्धतेचा निराळा विचार करण्याचें कारण नाहीं. राहिला विटाळ ! त्याचा आतां विचार करूं.

रजस्वलेचा व चांडाळादि जातींचा स्पर्श अशुद्धता उत्पन्न करणारा आहे अशी समजूत आहे. पैकीं पहिला विटाळ शास्त्रमान्य आहे व तो सर्वांनीं आरोग्य वगैरे दृष्टींनीं पाळलाच पाहिजे. दुसऱ्या प्रकाराबद्दल म्हणजे जातिविशिष्ट अस्पृश्यतेबद्दल सध्यां बराच वादविवाद माजलेला आहे. त्यांत कोणाचें कांहींही मत असलें तरी मनुष्याला मनुष्यानें अपवित्र समजणें हा माणुसकीचाच नव्हे तर सर्वांच्या हृदेशाच्या ठिकाणीं असलेल्या ईश्वराचाच अपमान आहे. अनेक ग्रंथांतून जीं अस्पृश्यतेला अनुकूल वचनें दिसतात, त्यांचा खरा अभिप्राय कसा सुधारणेला व मानव्याला धरून आहे हें आजच्या विद्वन्मान्य म. म. श्रीधरशास्त्री पाठकांसारख्या धार्मिकांनीं व श्रीमच्छंकराचार्य डॉ. कुर्तकोटीसारख्या धर्मगुरूंनीं दाखविलेलाच आहे. म्हणून, तसेंच कोणालाही दूर लोटणें हिंदुधर्माच्या ब्रीदाला सोडून असल्यामुळें असला विटाळ मानणें अधर्म्य समजावें. वास्तविक इतर धर्मीयांपेक्षां या धर्मबांधवांस आपण अधिक ममतेनें वागविलें पाहिजे; पण अधिक तर दूरच पण त्यांच्याबरोबरीनेंही आपण अस्पृश्यांस वागवीत नाहीं यांत आपणच आपल्या धर्माचा अपमान करीत आहों. प्रत्येक धर्माभिमान्यानें हा अपमान धुऊन काढला पाहिजे. ‘ आम्हीं त्यांना अस्पृश्य समजतों तसें रजस्वलांनाही समजतों मग यांत त्यांचा अपमान कोठें ? ’ ‘ आज अस्पृश्यतेचें बंधन गेलें तर उद्यां रोटीबंदीचें व परवां बेटीबंदीचेंही जाऊन सबगोलंकार होईल त्याची वाट काय ? ’ असले तर्कदुष्ट कोटिक्रम

रूढीच्या समर्थनार्थ मोठमोठ्या विद्वानांकडून केले जातात व रूढिप्रिय जनता त्यांस बळी पडते याचें सखेद आश्चर्य वाटतें. बोलायला लागला तर उद्यां मुलगा शिव्या देईल किंवा चालू लागला तर पळून जाईल किंवा दुसऱ्यांच्या घरांत शिरेल या भयानें मुलाचें बोलणें चालणेंच बंद होईल असा उपाय आपण करीत नाहींना ? मग अस्पृश्यांच्याच बाबतींत ही बेपर्वाईची भाषा कां ? त्यांच्या न्याय्य मागण्या मान्य केल्या तर अन्याय्यही मान्य कराव्याच लागतील हा व्यवहार कोठला ? असो. या कोटिक्रमावर पुष्कळ लिहिण्यासारखें आहे; परंतु मुख्य विषय बाजूला राहील म्हणून तो मोह आवरून धरला पाहिजे. तथापि जातां जातां अस्पृश्यांना व अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांना एक विनंति करावीशी वाटते ती ही कीं, त्यांनीं अस्पृश्यतेच्या प्रश्नाशीं जातिभेदाच्या प्रश्नाचा संबंध ठेवूं नये. जातिभेदाचें उन्मूलन असल्या आततायी चळवळींनीं होणार नाहीं. त्याचा योग्यमार्ग मागें पृ. ५५ वर दाखविलेलाच आहे.

बाह्यशुद्धीचें स्वरूप याप्रमाणें पाहून झाल्यावर आतां अन्तःशुद्धि किंवा मनाची शुद्धि विचारांत घेऊं. शास्त्रकारांनीं मनःशुद्धीचें फारच महत्त्व सांगितलेलें आहे. अपवित्रवासना, अनुदारवृत्ति, असत्य व्यवहार, फसविण्याचा प्रयत्न हीं सर्व मनाला मालिन्य आणणारीं असल्यामुळें असल्या मलिन मनाच्या मनुष्यानें बाह्य सोवळें–ओवळें व स्नानशुद्धीचें अवडंबर कितीही केलें तरी तें व्यर्थ आहे असें शास्त्रकारांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. या दृष्टीनें सार्वजनिक फंड गडप करून संध्यास्नान करणारा अत्यन्त अपवित्र होय. अर्थशुद्धि म्हणजे पैशाच्या व्यवहारांत प्रामाणिकपणा ठेवणें ही सर्वांत श्रेष्ठ प्रकारची शुद्धता आहे असें मनूनें* सांगितलें आहे तें याचकरितां.

* सर्वेषामेव शौचानामर्थशौचं परं स्मृतम् ।
योऽर्थे शुचिः स शुचिर्न मृद्वारि शुचिः शुचिः ॥ मनु. ५.१०६

मन शुद्ध असेल तरच अन्यायाची व असत्याची चीड उत्पन्न होते. धर्मेच्छूनें अन्याय व असत्य यांच्या कधींही आहारीं जाऊं नये. सत्यधर्म पाळणें हें याप्रमाणें मनःशुद्धीचेंच कसें परिणत रूप आहे हें लक्षांत येईल !

**नास्ति सत्यात् परो धर्मः ।**
**सत्यापरता नाहीं धर्म ।**

हीं वचनें उगाच अर्थवाद नाहींत हें येथें विशेष रूपानें लक्षांत घेतलें पाहिजे.

एखाद्याची नीट माहिती न घेतां पूर्वग्रह बनवणें, त्या पूर्वग्रहास अनुसरून त्याच्या वर्तनाचा व भाषणाचा विपर्यास करणें, ही सर्व सत्यधर्माची पायमल्ली आहे. अशा स्थितींत जाणूनबुजून खोटया बातम्या छापून, वर्तमानपत्रकर्ते जो अधर्म माजवीत आहेत त्याचें कोणत्याही प्रकारें समर्थन करतां येणें शक्य नाहीं.

योगशास्त्राचे आचार्य व्यास यांनीं आपल्या योगभाष्यांत सत्य आणि समाजहित यांचा कसा निकट संबंध आहे हें पुढील वाक्यांत अगदीं स्पष्टपणें दाखविलेलें आहेः—

**" यदि चैवमप्याभिधीयमाना भूतोपघातपरैव स्यात् न सत्यं भवेत्, पापमेव भवेत्, तेन पुण्याभासेन पुण्यप्रतिरूपकेन कष्टंतमः प्राप्नुयात्। तस्मात् परीक्ष्य सर्वभूतहितं सत्यं ब्रूयात्।**

व्यास. भा. २·३०

योग्यानें देखील प्राण्यांचें हित ध्यानांत घेऊन त्यास पोषक असेंच बोलावें; तेंच सत्य होय असें त्यांत निक्षून सांगितलेलें आहे.

**' यद्भूतहितमत्यन्तमेतत्सत्यं मतं मम '**

या महाभारतीय वचनांत हीच सत्याची व्याख्या मान्य केलेली आहे. पण आज खोटा वैद्यकीय किंवा कायद्यासंबंधीं सल्ला देऊन आमच्यां-

तील वैद्य व वकील जी सत्याची हत्या करीत आहेत-जें सामाजिक नुकसान करीत आहेत–त्यास काय म्हणावें हेंच कळत नाहीं. जाहि-रातींत तर असत्याची परमावधीच झालेली दिसून येते. कित्येक वेळां 'पंचानृतान्याहुरपाकानि' या शास्त्र-(?) वचनाचा आधार घेऊन या असत्य व्यवहारांचें समर्थन केलें जातें तेव्हां तर मनस्वी दुःख होतें. थट्टेंत, प्राणांतिक प्रसंगांत खोटें बोलणें व चार पैसे अधिक फायदा व्हावा म्हणून धंद्यांत खोटें बोलणें यांतील अंतर न कळण्या-इतकें सूक्ष्म आहे काय? पण सत्याची ओळख नसली किंवा त्याचें महत्त्व वाटत नसलें म्हणजे असत्याचें साम्राज्य निर्वेध व्हावयाचें हा नियमच आहे. शास्त्रकारांनींही

**नानृतात् पातकं परम्**

'अनृतासारखें भयंकर पाप नाहीं' असें कंठरवानें सांगितलें आहे. पण मूळ मनोभूमिकाच शुद्ध नसल्यानें या पातकाचें कांहीं वाटत नाहींसें झालें आहे.

केवळ असत्यच नव्हे तर सर्वच पापें याप्रमाणें मनाच्या मलिनते-मुळें घडत असतात. विष्णुसंहितेंत पुढीलप्रमाणें सर्व पापांची उपपत्ति दिलेली आहे.

> **अथ पुरुषस्य कामक्रोधलोभाख्यं रिपुत्रयं सुघोरं भवति। तेनायमाक्रान्तोऽतिपातकमहापातकानुपातकोपपातकेषु प्रवर्तते।**
> विष्णुसंहिता ३३.१

या वाक्यांत सर्व प्रकारच्या पापांचें मूळ काम, क्रोध व लोभ हेच मनोविकार असल्यामुळें ते मनुष्याचे शत्रु होत असें सांगितलेलें आहे. या त्रिदोषांच्या तावडींत सांपडल्यामुळेंच मन व त्याबरोबर बुद्धि मलिन होऊन कुमार्गावर जात असतात. म्हणून पापभीरूनें हे तीन दोष प्रमाणाबाहेर वाढूं देतां कामा नयेत.

या तीन दोषांचें मूळ काम हाच कसा आहे हें गीतेंत मोठ्या विस्तारानें व कौशल्यानें दाखविलें आहे. गीतेच्या तिसऱ्या अध्यायाच्या ३६ व्या श्लोकांत अर्जुनानें मनुष्य पापाचरण कां करतो असा प्रश्न केला आहे. या प्रश्नास भगवंतांनीं जें उत्तर दिलें आहे त्यांत कामाचे दुष्ट परिणाम दाखवून ( आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ) हा दोष मनुष्याच्या ज्ञानशक्तीस झाकून टाकतो असें महत्त्वाचें विधान केलें आहे. काम, क्रोध, लोभ यांचा अजी नायनाट न करतां ते विवेकावर आवरण न घालतील अशा बेतांत ठेवावे असा व्यावहारिक उपदेश या विधानानें भगवंतांनीं सूचित केलेला आहे. पापाचरणाची ही मीमांसा मान्य केली, म्हणजे

इंद्रियें मन व बुद्धि यांवर कामाचें प्राबल्य

|

ज्ञान—विवेकावरण

|

मोहाचा आवेश

|

विपरीत ज्ञान

|

विपरीत ध्येयाची निवड

|

त्याकरितां आटोकाट प्रयत्न

या क्रमानें कामक्रोध लोभाचें पर्यवसान मानवाच्या अधोगतींत कसें होतें हें लक्षांत येईल. तेव्हां पाप होऊं न देण्याचा खरा उपाय विवेक जागृत ठेवून या विकारांचा मनावर ताबा न येईल असें करणें हाच होय. प्रायश्चित्ताचें हेंच रहस्य आहे.

एखादे वेळीं मनावर या विकारांचा ताबा होऊन कांहीं पापकृत्य

घडलें तर त्यास पायश्चित्त बाह्यक्षौर वगैरे कांहींच उपयोगीं पडणार नाहीं. परस्त्रीवर चुंबनास्त्राचा प्रयोग केल्याबद्दल न्यायाधीशानें आरोपीस १० रुपये दण्ड ठोठावला. आरोपीनें २० रुपये हजर करून फिरून तोच गुन्हा केला अशी एक गोष्ट सांगतात. त्यांतील रहस्य हेंच आहे कीं, नुसत्या बाह्य क्रियांनीं खरें प्रायश्चित्त होत नाहीं; तर मनांत फरक व्हावा लागतो. 'मूर्खास टोणप्याचा मार' या न्यायाप्रमाणें कित्येकांस बाह्य दण्डाशिवाय चूक कळतच नाहीं. म्हणून शास्त्रकारांनीं अशा लोकांकरितां तप्तकृच्छ्र, चांद्रायण वगैरे प्रायश्चित्तें सांगितलेलीं आहेत. असल्या खडतर देहदण्डानें तरी ( भीतीनें ) अद्दल घडून पुन्हा पापकर्म घडूं नये हाच त्यांतील हेतु आहे. पण हा धाकदपटशाचा मार्ग केवळ गौण आहे. खरें प्रायश्चित्त म्हणजे,

## पश्चात्ताप ! !

'पश्चात्तापेन शुद्ध्यति' असें म्हटलेलें आहे तें याचकरितां. खरा पश्चात्ताप झाला, चूक कळून आली कीं तीव्र आत्मपरीक्षणाचें महत्त्व पटून विवेकाचें साम्राज्य पुन्हा चालू होतें. आणि हें चालू असेल तोंपर्यंत पापाचें भयच नाहीं.

विवेक

|

आत्मपरीक्षण

|

संयम

ही त्रयी सुदृढ असली कीं पापाचें भय नाहीं. खरें प्रायश्चित्त तें कीं जें या त्रयीस चालना देतें. केवळ अंतरींच्या पश्चात्तापानेंच हें साध्य असल्यामुळें खरा पश्चात्ताप हेंच खरें प्रायश्चित्त होय ! तुकाराम महाराजांनीं

पुढील अभंगांत याच तत्त्वावर बाह्य प्रायश्चित्तांची निंदा केली आहे. ते म्हणतात

> आली सिंहस्थपर्वणी । न्हाव्यां भटां झाली धणी ।
> अंतरीं पापाच्या कोडी । वरिवरी बोडी डोई दाढी ।
> बोडिलें तें निघालें । काय पालटलें सांग वहिलें ।

स्वतः कर्त्यानेंच घेतलेलें केवळ बाह्य प्रायश्चित्तही जर याप्रमाणें तत्त्व-शून्य ठरतें, तर ब्राह्मणद्वारा व प्रत्याम्नायानें प्रायश्चित घेणें किती तत्त्व-शून्य असेल याचा ज्याचा त्यानेंच विचार करावा.

एखाद्यानें एखादा सामाजिक कायदा मोडला तर त्याच्याविरुद्ध ग्रामण्य पुकारण्यांत येतें, तेंही एक प्रकारचें प्रायश्चित्तच होय. आणि याच्याही बाबतींत प्रायश्चित्तांप्रमाणेंच कित्येक तत्त्वशून्य गैरसमज पसरलेले आहेत. म्हणून या ग्रामण्याचें मूळ तत्त्व लक्षांत घेतलें पाहिजे. ज्याच्यावर ग्रामण्य टाकावयाचें त्याच्याशीं इतरांनीं सर्व व्यवहार बंद करून त्यास शरण आणणें हें ग्रामण्याचें मूळ तत्त्व आहे. केवळ एकांगी नव्हे तर याप्रकारचा सर्वांगीण बहिष्कार म्हणजेच ग्रामण्य होय. या बहिष्कारास भिऊन पूर्वकालीन बाहिष्कृत शक्य तितक्या लवकर गांवगंगेस प्रसन्न करून घेण्याचा प्रयत्न करीत. पण आजच्या ग्रामण्यांत हें तत्त्व राहिलेलें नाहीं. एखाद्या वकिलानें सहभोजन केलें तर त्याच्याशीं वकील या नात्यानें वागतांना कोणताही दोष मानला जात नाहीं. फक्त जेवणाचे बाबतींतच दोष मानण्यांत येतो. असलें एकांगी ग्रामण्य (?) हें खरें ग्रामण्यच नव्हे. ग्रामण्याचें वर दाखविलेलें तत्त्व लक्षांत घेतल्यास असल्या एकांगी बहिष्काराचा आतां कांहींही उपयोग नाहीं हें दिसून येईल ! पूर्वींप्रमाणें आतां व्यक्ति ज्ञातिपरतंत्र राहिलेली नाहीं. म्हणून ज्यांस ग्रामण्याचें शस्त्र उगारणें असेल त्यांनीं प्रथम आज बोकाळलेल्या व्यक्तिस्वातंत्र्यास आळा घालून

समाजसत्तेचें सिंहासन स्थिर करण्याचा प्रथम प्रयत्न केला पाहिजे. तसें न होईल तर चालू एकांगी ग्रामण्यानें संख्याबलाचा ऱ्हास व विघटना यांपलीकडे कशाचाही लाभ होणार नाहीं.

पाप आणि प्रायश्चित्त यांची येथें केलेली मीमांसा आज अनेक दृष्टींनीं उपयुक्त आहे. ही मीमांसा लक्षांत घेऊन वर्णन केल्यानेंच अंतःशुद्धि शक्य आहे. काम केवळ स्त्रीविषयकच असतो असें नाहीं.

१ धनकाम

२मानकाम

३ सत्ताकाम

४ बढाईकाम

असे कित्येक त्याचे प्रकार आहेत. हे सर्व मर्यादेंत असतात तोंपर्यंत त्यांची कोणासच बाधा होत नाहीं; पण त्यांचा पारा ठराविक अंशांच्या वर गेला म्हणजे कार्यव्याघात ठरलेलाच ! अलीकडे कोणतीही संस्था फार वेळ टिकत नाहीं याचें कारण हे कामच ! मोठी देणगी देऊन एखादा सामान्य मनुष्य संस्थेचा सभासद होतो. त्याच्या औदार्याबद्दल योग्य त्या मानाची त्यानें अपेक्षा करणें व इतरांनीं तो त्यास देणें यांत गैरवाजवी कांहींच नाहीं; पण नुसत्या मानानें पुढें पुढें त्याचें समाधान होत नाहीं. व्याख्याते कोण बोलवावे, कार्यक्रम कसे ठरवावे, अध्यक्ष कोणास करावें वगैरे प्रत्येक बाबतींत आपलेंच मत इतरांनीं मान्य केलें पाहिजे अशी इच्छा त्यास उत्पन्न होते. पुढें पुढें या इच्छेचें पर्यवसान ' हम् करे सो कायदा ' मध्यें होतें. हाच सत्ताकाम होय. आपलें महत्त्व वाढावें, आपली प्रतिष्ठा वाढावी म्हणून इतरांची वेळींअवेळीं कुचेष्टा करणें यास बढाईकाम असें म्हणतां येईल ! अशा प्रकारचे कामाचे अनन्त अवतार आहेत. आत्मपरीक्षण, सत्यनिष्ठा, विवेक यांचें या कामापुढें कांहींही चालत नाहीं. म्हणून पश्चात्तापपूर्वक मनःसंयमाकडे लक्ष दिल्याशिवाय गत्यन्तर नाहीं.

**तस्मात् त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ।**
**पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥**

या श्लोकांत भगवन्तांनीं हेंच सांगितलें आहे. यावरून १ कामाच्या प्राबल्यामुळें मन अशुद्ध होऊन पाप घडतें व २ पश्चात्तापानें मन शुद्ध झाल्यास पाप घडत नाहीं. हे महत्त्वाचे नियम लक्षांत घेऊन त्यामुळें अन्तःशुद्धि व इंद्रियसंयम यांचा खरा मार्ग लक्षांत येतो.

मागें ( पृ. १४१ पहा ) तपाचे जे तीन प्रकार दिले आहेत त्यांपैकीं मानसतपाचें वैयक्तिकच नव्हे तर सामाजिक दृष्टीनेंही कसें महत्त्व आहे हें आतां वाचकांच्या लक्षांत येऊन व्रतांचें सामाजिक महत्त्व पटल्यावांचून राहणार नाहीं.

पाप आणि प्रायश्चित्त यांचा याप्रमाणें विचार होऊन तात्त्विक शुद्धिविचार संपला. आतां ग्रंथोक्त पापांचा व प्रायश्चित्तांचा विचार करूं. जुन्या ग्रंथांत सांगितलेलीं कित्येक पापें आज प्रत्यहीं घडत असतात.

पतित व चाण्डाल यांनीं पाहिलेलें खाऊं नये.
त्यांच्याशीं व म्लेंच्छाशीं संभाषण करूं नये.
त्यांची भाषा बोलूं नये.
ब्राह्मणानें तूपदूध वगैरे विकूं नये.
ब्राह्मणानें सिद्धान्नविक्रय करूं नये ( खाणावळ घालूं नये ).

असें कित्येक ग्रंथोक्त निषेध आज नेहमीं मोडले जातात. अर्थात् त्यांबद्दल प्रायश्चित्त घेणें शक्यही नाहीं व तात्त्विक दृष्ट्या त्या प्रायश्चित्ताच्या नाटकांत अर्थही नाहीं. पण हीं पापें आहेत, हा ग्रह नष्ट न झाल्यामुळें धर्मभोळ्यांच्या मनावर ‘ काय मी पापी ? ’

**‘ पापोऽहं पापकर्माहम् ’**

असला स्वतःच्या अपावित्र्याचा प्रत्यय वाढत जातो. भगवद्गीतेंत ‘ नात्मानमवसादयेत् ’ असें सांगितलें आहे; त्याच्या उलट तो स्वतःचा तिरस्कार करीत राहतो.

कित्येकांची मनोवृत्ति या बाबतींत अगदीं विरुद्ध दिशेला जाते. एवींतेवीं पापें होतातच, मग आणखी कां करूं नयेत ? असें म्हणून असे लोक धर्माधर्म, पापपुण्य गुंडाळून ठेवून बेछूट बनतात. थोड्या ग्राम्य भाषेंत सांगावयाचें तर त्यांचीं मनें निर्ढावतात किंवा निगरंगट्ट बनतात. पहिल्या प्रकारांत भीरुतेचा अतिरेक आहे तर दुसऱ्यांत बेपर्वाईचा आहे. ह्या दोन्ही मनोवृत्ति धर्मदृष्ट्या सारख्याच त्याज्य आहेत. या दोन्ही प्रकारांनीं मन अधिक मलिनच होत असतें. म्हणून अन्तःकरणावरील हे गैरसमजुतीचे मळ नष्ट करण्याकरितां धर्मग्रंथांतील पापांचें तात्त्विक स्पष्टीकरण लक्षांत घेणें जरूर आहे.

पापांचे मुख्य प्रकार दोन ! जाणूनबुजून केलेलीं व न कळत झालेलीं. सिनेमा चालू असतां मुद्दाम दुसऱ्याचें फाऊंट्न्पेन खुबीनें काढून घेणें हें पहिल्या प्रकारचें तर जातां जातां दुसऱ्यास धक्का लावून त्याच्या हातांतील काचेचें भांडें फोडणें हें दुसऱ्या प्रकारचें होय. दुसरी क्रिया दुष्ट हेतूनें केलेली नाहीं, हें खरें; तरी रस्त्यानें चालतांना रस्ता केवळ आपलाच नाहीं, चार लोकांत आपण वागत आहों तेव्हां आपल्या चालण्याचा उपसर्ग दुसऱ्यास न होईल अशा विषयीं काळजी घेणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. कोणत्याही मनोविकाराच्या भरांत असल्याखेरीज असला अतिक्रम होत नाहीं. अर्थात् सार्वजनिक ठिकाणीं जी जागरूकता पाहिजे तिचा त्याग केल्याबद्दल अशा न कळत झालेल्या चुकांचीही पापांतच गणना होत असते.

बुद्धिपुरःसर केलेल्या कर्मांचेही दोन भाग असतात. एक कामतः ( इच्छापूर्वक ) व दुसरा अकामतः ( अनिच्छेनें ). या दोन्ही प्रकारांबद्दल जुन्या निबंधकारांनींही बराच घोटाळा केलेला आहे. बहुधा ज्ञानतः व कामतः तसेंच अज्ञानतः व अकामतः यांस एकरूपच समजण्याचा त्यांचा प्रघात आहे. पण तो चूक आहे.

पतितांच्या घरांत त्यांस उपदेश करण्याकरितां गेलेला व त्यांच्या बरोबर खेळण्याकरितां गेलेला हे दोघे त्या ठिकाणीं ज्ञानतः ( जाणून-बुजूनच ) जातात. पण त्यांच्या मनोवृत्तींत किती फरक असतो बरें ? एक त्यांची सुधारणा करण्यास जातो तर दुसरा त्यांच्या संगतीनें स्वतःच्या अवनतीची न कळत तरतूद करीत असतो. परदेश गमना-च्या बाबतींतही असाच विवेक केला पाहिजे. स्वदेशीय संपत्तीची राखरांगोळी करण्याकरितां किंवा चैनीखातर परदेशास जाणारा, अधार्मिक गणला गेला पाहिजे. परंतु विद्यासंपादन, मतप्रसार यांसारख्या हेतूंनीं प्रेरित होऊन परदेशांत जाणारास प्रोत्साहनच दिलें पाहिजे. पण आज हा विवेक न ठेवतां दोघांचीही सारखीच बोळवण केली जाते हें योग्य आहे काय ? देवावर भक्ति नसून उगाच दुसऱ्यांच्या कामांत व्यत्यय आणण्याकरितां देवळांत प्रवेश करणारा व भक्तिभावानें दर्शनाकरितां प्रविष्ट होणारा यांत फरक न करणें म्हणजे मानसिक सद्‌गुणांकडे दुर्लक्ष करून एक तऱ्हेनें त्याचा उपमर्दच करणें नव्हे काय ? म्हणून बुद्धि-पुरस्सर केलेल्या कर्मांतही कर्त्याच्या हेतूची विचिकित्सा करून त्यानें तीं स्वतःच्या कामक्रोधांच्या अधीन होऊन केलीं असतील तरच त्यांची पापांत गणना केली जावी, हें इष्ट होय. कर्मांचें हें वर्गीकरण पुढील आकृतीवरून लक्षांत येईल. ( पान २४८ पहा. )

हें वर्गीकरण आज फारच उपयुक्त आहे. निर्वाहार्थ ब्राह्मणानें दूध विकलें तर त्या कर्माचा वरील तिसऱ्या प्रकारांत समावेश होत असल्या-मुळें तो त्याचा प्राप्तधर्मच ठरून त्यास पाप लागणार नाहीं. पण ज्याच्या घरीं चांगली श्रीमंती आहे व केवळ उरतें म्हणून दूध विकून पैसे कमविण्याची इच्छा होते त्यास तो निषेध आहे. कारण अशा मनुष्यास लोभाशिवाय दुसरा कोणताही मनोविकार या कामीं प्रवृत्त करीत नसतो.

आपल्यावर एखाद्याचें अत्यन्त प्रेम असलें व त्याची शबरीप्रमाणें

- कर्में
  - बुद्धिपूर्वक ( ज्ञानतः )
    - दुसऱ्याच्या घाताकरितां ( १ ) किंवा वैयक्तिक स्वार्थाकरितां ( २ ) ( कामतः )
    - ( ३ ) स्वतःच्या किंवा ( ४ ) दुसऱ्याच्या जीवरक्षणाकरितां किंवा ( ५ ) परोपकारार्थ* ( अकामतः )
  - अबुद्धिपूर्वक ( अज्ञानतः )

आपल्या घरीं जेवावें अशी इच्छा असली तरीही आपण जातीपातीचा विचार मनांत घेऊन तें टाळतों; यांत सहानुभूतीचा उपमर्द होतो. याचें आपण वास्तविक पाप मानलें पाहिजे; पण उलट त्याच्या सदिच्छेचा उपमर्द करण्यांतच बरें वाटतें, हा केवळ पापमीमांसेचा विपर्यास आहे. या विपर्यासाचा आजपर्यंत कोणताही तोटा दिसला नाहीं; पण आतां हा तुसडेपणास वाढविणारा व स्वतःच्या ठिकाणीं नसत्या उच्चत्वाचा बडेजाव दाखविणारा प्रकार बंद केला पाहिजे. आपल्याकडे जेवण्यास दुसऱ्यांनीं आलेंच पाहिजे असा आग्रह धरणारानें दुसऱ्याच्या घरीं अन्न न घेण्याचा कायदा दाखवणें म्हणजे स्वतःच्या मोठेपणाची व शुद्धतेची मूकपणानें जाहिरात देणेंच आहे. रूढ समजुतीप्रमाणें असल्या भोजनांचा कामतःमध्येंच समावेश होतो. पण वास्तविक तो अकामतः-हि कसा आहे हें आतां समजून येईल.

असो. पापाची ही मीमांसा लक्षांत घेतल्यास स्मृत्युक्त बऱ्याच

---

* याच प्रकारच्या कर्मांस यज्ञार्थ अशी गीतेंत संज्ञा असून तसल्या कर्मापासून पाप लागत नाहीं, असेंही तेथेंच सांगितलेलें आहे.

पापांचा उलगडा होतो. आधुनिक कित्येक नव्या पापांचीही याच मार्गानें उपपत्ति लावतां येईल ! तसेंच पापाचरण न होण्याविषयीं कशी काळजी घ्यावी, अन्तर्बाह्य शुद्धता कशी राखावी हें कळून येईल अशी आशा आहे.

या प्रकरणाच्या आरंभीं दाखविलेल्या नऊ व्यापक धर्मतत्त्वांपैकीं पहिल्या तीन तत्त्वांचें या प्रकरणांत विवेचन झालें. ६, ७ व ८ यांचेंही या व मागील कित्येक प्रकरणांत विवेचन केलेलेंच आहे. तेव्हां अहिंसा, दया व दान यांचें विवेचन बाकी रहातें. त्यांपैकीं अहिंसा व दया यांचें विवेचन पुढील प्रकरणांत करून त्यापुढील प्रकरणांत दानाचें स्वरूप निश्चित करूं.

## प्रकरण अठरावें

# दयाधर्माचें रहस्य

**हिंदुधर्म आणि दया**

हिंदुधर्मांत दयेचें फारच महत्त्व वर्णिलेलें आहे. 'प्राणिमात्रावर दया करा' असा संत उपदेश करतात, तुलसीदासांनीं तर

**' दया धर्मका मूल है ।'**

असें निक्षून सांगितलें आहे. या दयेचा खरा अर्थ काय व धर्मांत या दयेस खरोखरीच महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे काय याचा आतां विचार करूं.

**दया आणि अहिंसा**

दया आणि अहिंसा हे शब्द साधारणतः पर्याय म्हणूनच वापरतात. ' सोडून देरे त्याला; दया कर जाऊं दे ' यांसारखे प्रयोग लक्षांत घेतले म्हणजे दया याचा अर्थ हिंसा न करणें असा दिसून येतो. दिसण्यांत दया शब्द भाववाचक आहे. व अहिंसा हा अभाववाचक आहे. तथापि त्यांच्या शास्त्रीय व्याख्या जवळजवळ सारख्याच आहेत. म्हणून हे दोन्ही शब्द एकमेकांचे पर्याय म्हणूनच या प्रकणांत वापरले आहेत. शास्त्रकारांनीं कोणी पांच विभागांत तर कोणी दहा विभागांत यमांचे परिगण केलेले असले तरी ' यम सतत पाळावे ' असें एकमतानें सांगितलेलें असून त्या सर्वांचा अहिंसेंतच तात्पर्यतः अन्तर्भाव होतो असें म्हटलेलें आहे. अत्रिसंहितेंत याच अहिंसेला दया असें म्हटलेलें आहे. अर्थात् दया धार्मिकदृष्ट्या महत्त्वाची गणली गेलेली आहे हें उघड आहे. भगवन्तांनीं दयेची दैवी संपत्तींत गणना केलेली आहे हें पाहिलें म्हणजे शेक्सपीयरचें

It blesseth him that gives and him that takes.

हें दयेवरील भाष्य योग्यच वाटतें.

पण नित्शेचें याविरुद्ध मत आहे. तो म्हणतो ' दया अधर्मका मूल है। पराक्रमी होणें, पराक्रम गाजवणें हेंच चांगलेपणाचें लक्षण असून अशक्तपणापासून उत्पन्न होणारें सर्व वाईट म्हणजेच त्याज्य होय. '§

**नित्शेचें मत**

दया, क्षमा, शान्ति वगैरे झाडून सर्व गुण दुर्बलतेस उत्तेजन देणारे असल्यामुळें त्याच्या मतानें ते भयंकर दोष ठरतात.

नुसतें जगणें हें मनुष्याचें ध्येयच नव्हे. इतरांबरोबर झगडून त्यांत टिकाव धरून राहणें, हेंच सज्जनाचें कर्तव्य होय असा त्याचा कर्तव्य निर्णय आहे. वर वर दिसण्यांत हा आक्षेप योग्य दिसतो. सामर्थ्य, तेज, बल, शौर्य, पराक्रम या गुणांनीं राष्ट्र उत्कर्षास चढतें. या गुणांचा उत्कर्ष जिकडे तिकडे सामसूम असतांना होणेंच शक्य नाहीं. त्याकरितां स्पर्धा मारामारी यांची धुमश्चक्री चालू असली पाहिजे; अर्थात् कोठें भांडण होतांच शांततेचे भोक्ते तें मिटावेण्याचा प्रयत्न करूं लागले तर हें कसें साध्य होणार ? दीनांवर दया करून दीनोद्धार साधण्यांत राष्ट्राचें सामर्थ्य वेचणें म्हणजे पराक्रमाची खच्ची करून दौर्बल्याचें पीक वाढविणेंच होय असें कोणीही म्हणेल ! याच दृष्टीनें नित्शे दयाधर्माची निन्दा करतो. शेक्स्पीयरनें दया करणाराचें व दया करून घेणाराचें दोघांचेंही कल्याण होतें असें म्हटलें आहे. पण नित्शे त्या गुणाची पुढीलप्रमाणें स्पष्ट शब्दांत निंदा करीत आहे. नित्शे म्हणतो.—

' It ( pity ) injures him that gives and him that takes, it weakens both the strong and the weak '

---

§ What is good ?...To be brave is good. What is bad ? All that comes from weakness.

The Story of Philosophy P. 463

परन्तु अशा प्रकारें उठसोट्या तुझें राज्य करणारे लोक भगवन्तांनीं व आर्यशास्त्रकारांनीं आसुरी संपत्तीचे ठरविलेले

**आसुरी संपत्ति**

असून अशा क्रौर्यानें वागणारे लोक अधोगतीला जातात असें म्हटलेलें आहे. ' तेज ' या गुणाबरोबरच ' क्षमा ' ' शान्ति ' ' दया , हेही दैवी संपत्तीचे गुण आहेत असें म्हटलेलें आहे. वर धर्मशास्त्रांतील ' यमान् सेवेत सततम् ' हा नियम सांगून त्यांत अहिंसा किंवा दया यांचा अन्तर्भाव होतो हें सांगितलेंच आहे. तेव्हां धर्मशास्त्रकारांनीं दयेचें एवढें स्तोम कां माजविलें हें पाहिल्याशिवाय गत्यन्तर नाहीं.

अत्रिसंहितेंत दयेचें लक्षण पुढीलप्रमाणें दिलेलें आहे.

**परस्मिन् बन्धुवर्गे वा मित्रे द्वेष्ये रिपौ तथा।**
**आत्मवद्वर्तितव्यं हि दयैषा परिकीर्तिता ॥** अत्रि. ४१.

या श्लोकांत सर्वांशीं आत्मौपम्य बुद्धीनें वागणें म्हणजे दया होय असें म्हटलेलें आहे. दुसऱ्याला त्रास न देणें, कितीही

**दया म्हणजे काय ?**

अपराध केलेले असले तरी त्यास क्षमा करणें यास दया म्हणावें असें त्यांत म्हटलेलें नाहीं. स्वतःप्रमाणें सर्वांशीं वागणें अर्थात् आपण स्वतःच्यावर जितकें प्रेम करतों तितकें उत्कट प्रेम ठेवून दुसऱ्याशीं वागणें एवढाच याचा अर्थ आहे. तसेंच वरील श्लोकांत फक्त मनुष्यांचाच संबंध आहे प्राणिमात्रचा नाहीं, हेंही ध्यानांत घेतलें पाहिजे. आपण स्वतःचें अकल्याण व्हावें असें कधींच चिन्तीत नाहीं त्याचप्रमाणें दुसऱ्याचें अकल्याण न चिन्तणें, त्याचा द्वेष न करणें म्हणजेच दया होय.

वर नित्शेचें मत देतांना स्पर्धेचें महत्त्व सांगून दयेचे दोष दाखविले आहेत, पण तें मत एकांगी आहे. स्पर्धेत

**दयेचा उपयोग**

गुणोत्कर्ष असला तरी आत्यन्तिक स्पर्धा ही घातकच ठरते. नित्शेच्या मताप्रमाणें जरी पाहिलें तरी सत्ता

गाजविणें हें ध्येय साध्य होण्याकरितां तरी कांही मेंढरें पाहिजेतच ! हीं मेंढरें नसतील तर परस्पर सत्ताधारीच एकमेकांस धारेवर धरून शेवटीं सुंदोपसुंदन्यायानें सर्वच नष्ट होतील. तेव्हां आत्यन्तिक स्पर्धा वाईटच होय !

**दया आणि मानवी जीवन**

शिवाय मानवी प्रवृत्तिही अशान्तिप्रिय नाहीं. कांहीं काळ क्रौर्याचे खेळ खेळल्यावर तहनाम्याचें भरतवाक्य केव्हां ऐकूं येईल याकडे कित्येक आतुरतेनें पाहूं लागतात. मनुष्यास शान्तताच मुख्यतः पाहिजे असते. त्या शान्ततेचा भंग होऊं नये म्हणून शान्ततेचा भंग करणाऱ्याचा नाश करण्याकरितांच तो क्रूर बनत असतो असें वास्तविक मानवी मानसशास्त्र आहे. मनुष्याला सत्तेची आकांक्षा स्वतःच्या शान्तते करितांच असते. नुसत्या सत्तेला तो हपापलेला नसतो. ‘ महापुरें झाडें जाती, तेथें लव्हाळे वांचती ’ हा सृष्टीचा न्याय लक्षांत घेतां दुर्बलांच्या जगण्यास सृष्टि विरोधी आहे असें दिसून येत नाहीं. तात्पर्य, दयाभाव हा निसर्गास धरून आहे. इतकेंच नव्हे तर ‘ अपत्यवात्सल्य’ वगैरे मनोवृत्तींमुळेंच प्रथम अशक्त असलेलीं बालकें पुढें सशक्त होत असतात, हें लक्षांत घेतल्यास दयेचा खरा उपयोग लक्षांत येईल !

**दया कोणावर करावी ?**

तर मग शत्रूवर देखील दया करावी काय ? असा प्रश्न येईल. त्यास शास्त्रकारांचें ‘ नाहीं ’ असें उत्तर आहे. जैन व बौद्ध यांनीं आत्यन्तिक अहिंसेचें स्तोम माजविलें. पण तें आर्यशास्त्रकारांस संमत नाहीं. तुकारामासारख्या निवृत्तिपर साधूनें देखील

**परपीडक तो आम्हां दावेदार। विश्वीं विश्वंभर म्हणवोनी।**

असें स्पष्ट म्हटलेलें आहे. अर्थात् समाजकंटकांचा नाश केलाच पाहिजे. फार काय अशा कण्टकांचा नाश करणें हें दयेच्या व्याख्येतेंच येतें. तुकाराममहाराज हेंच सांगतातः—

‘ दया तिचें नांव भूतांचें पाळण ।
आणिक निर्दाळण कंटकांचें ॥ ’
दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥
लात हाणोनिया वरी । गुंडा वाट शुद्ध करी ॥
बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥

या संतवचनांपेक्षां श्रीकृष्णांचें पुढील वचन अधिक महत्त्वाचें व मार्मिक आहे.

परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय............

यांत भगवन्तांनीं धर्म संस्थापनेचीं दोन प्राथमिक अंगें सांगितलीं आहेत. साधूंचें ( सज्जनांचें ) रक्षण व दुराचाऱ्यांचें दण्डण हीं तीं दोन प्राथमिक अंगें होत. हीं सिद्ध झाल्याशिवाय धर्मसंस्थापना होणार नाहीं. हीं दोन्हीं अंगें म्हणजे संपूर्ण दया होय ! अर्थात् मानवी प्राण्यावर या प्रकारची दया करणें हें धर्माचें मूळ आहे ही गोष्ट पूर्णपणें सिद्ध झाली.

**धार्मिक मनुष्याचें कर्तव्य**

प्रत्येक धार्मिक मनुष्यानें या दयेचें अनुष्ठान केलें पाहिजे. सज्जनांच्या ( दैवी संपत्तीच्या ) रक्षणाबरोबरच दुर्जनांचें दण्डन हेंही धार्मिक मनुष्याचें कर्तव्यच होय ! हिंसा होते म्हणून किंवा भ्याडपणानें हिंसा टाळणें धर्माच्या विरुद्ध आहे. दुष्टांची उपेक्षा न करतां त्यांचें योग्य तें शासन करून त्यांस वठणीवर आणणें म्हणजे त्यांवर दयाच करणें होय. कारण अशा माथेफिरूस फटका मारल्याखेरीज ताळ्यावर आणतां येणें शक्य नाहीं. म्हणून पाशवी संस्कृतीच्या लोकांच्या बाबतींत दण्ड हीच दया होय. अज्ञान मुलाला प्रसंगीं आपण कठोर बनून शिक्षा करतों. पण मनांतून त्याचें हितचें पहात असतो.

त्याप्रमाणें दयेचा व कठोरपणाचा हितदृष्टीनें उपयोग करील नोच खरा धार्मिक होय.

**' मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास,**
**कठिण वज्रास भेदूं ऐसे '**

( वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि । )

अशी दोन्ही तऱ्हेची वर्तणूक ठेवणाराच खरा सत्पुरुष होय. अनुग्रहाबरोबरच निग्रह असेल तरच तसलें सामर्थ्य समाजास कल्याणप्रद होईल ! म्हणून धार्मिक मनुष्यानें आत्यन्तिक न बनतां दयेच्या दोन्ही अंगांचें परिपालन केलें पाहिजे. * अवध्याचा वध करणें व वध्यास सोडून देणें हीं धर्मवेत्त्यांच्या मताप्रमाणें सारखींच गर्ह्य आहेत.

**दयेचें रहस्य**

जीवनाच्या झगड्यांत कांहीं सत्पुरुष सद्गुणांची वृद्धि करीत असतात. दुर्जन या सद्गुणांचा नाश करण्यास टपलेले असतात. तिसरे दुबळे व दीन या झगड्यांत भाग घेण्यास असमर्थ असतात. हा तिसरा वर्ग तसाच राहूं शकत नाहीं. दुर्जनांच्या हल्लयास तो बळी पडत असतो. दुर्जन पहिल्या वर्गावरही हल्ला करीतच असतात. त्यामुळें त्यांच्यावर देखील या हल्लयांचा अनिष्ट परिणाम होऊन संस्कृतिसंपन्न समाजास क्षय लागतो. अशावेळीं दयेचें अमृत पाजून दुर्बल व दीन यांतून ताजेतवाने झालेले वीर वरचेवर पहिल्या वर्गांत येऊन मिळण्याची सोय नसेल तर सज्जनांचा संख्याबलाच्या अभावीं दुर्जनांपुढें टिकाव लागणें अशक्य आहे. बलवान् मनुष्याशीं एखाद्या दुर्बलाचा टिकाव न लागला

---

* यथाऽवध्ये वध्यमाने भवेद्दोषो जनार्दन ।
स वध्यस्यावधे दृष्ट इति धर्मविदो विदुः ॥ मा. भा. ५।८२।१८

तरी संघशक्तीनें एकजीव झालेल्या दुर्बलांचा पाडाव करणें कठिण असतें. ( बहूनामप्यसाराणां समवायो हि दुर्जयः ) सर्व ठिकाणीं आपुलकीनें पहावयास शिकविणारी दया मानवांत संघटन वाढविते. आत्मभाव उत्पन्न होतांच शत्रुत्व नाहींसें होऊन सहानुभूति वाढते. वसिष्ठावरील विश्वामित्राचें वैर या आत्मभावानेंच नष्ट केलें. या सर्व गोष्टी नीट लक्षांत घेतल्या तर दया दौर्बल्य वाढविणारी नसून दीन दुबळ्यांस संघटनानें सामर्थ्यसंपन्न करून जागतिक स्पर्धेत टिकाव धरून राहावयास उपयोगीं पडणारी श्रेष्ठ संजीवनी आहे हें दिसून येईल. दीनांतील शक्ति व्यर्थ न घालवितां तिचा उपयोग करून घेण्यांत आर्यशास्त्रकारांनीं याप्रमाणें मोठें कौशल्य दाखविलें आहे.

**ख्रिश्चन धर्म आणि दया**

ख्रिश्चन धर्मांतील दया एकांगी असल्यामुळें ती याप्रमाणें दुर्बलांस सबल करीत नाहीं. ख्रिश्चन धर्मांतील ' शत्रूवर देखील दया करा ( Luke 35 ) ही आज्ञा केव्हांही उदात्तच आहे. सर्व मानवांचे ठायीं दयाभाव ठेवणें हें केव्हांही मोठ्या अन्तःकरणाचेंच लक्षण आहे. पण जर शत्रूचा दुष्टपणा प्रेम केल्यानें अधिकाधिक वाढत असेल तर काय करावें ? तरीसुद्धां त्यास मदत करावी काय ? प्रेमानें जग जिंकतां येईल तर अवश्य जिंकावें; पण कांहीं मानव प्रेमाचा उपदेश जाणण्यास व अनुसरण्यास अपात्र असतात. त्यांची वाट काय ? अशा समाजघातक दुर्गुणी लोकांचें कोडकौतुक पुरविणें हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दयेखालीं येत नाहीं. अशा लोकांना शासन करणें हेंच त्यांच्यावर प्रेम करणाराचें कर्तव्य होय. दुर्गुण व पाप यांस सहानुभूति दाखविणें केव्हांही हितकर नाहीं. पण ख्रिश्चनधर्म सांगतो कीं, ' विश्वासघात व पाप यांवरही परमेश्वराचें कृपाछत्र आहे. ' [ He ( God ) is kind even to the ungrateful and the evil ] श्रीकृष्णांनीं अत्यन्त दुराचारी मनुष्यासही साधुत्व देऊं केलेलें आहे. पण त्याला अट ' भजते माम-

नन्यभाक् ' म्हणजे ' अनन्यभावानें भजन करणें ' ही आहे. अर्थात् दुर्गुणी लोकांस जशाच्या तशाच स्वरूपांत भगवान् आश्रय देण्यास तयार नाहींत. ते आपले दुर्गुण न सोडतील तर भगवान् त्यांना अधोगतिच देतात. पण ख्रिश्चन धर्मात हें स्पष्टपणें सांगितलेलें नसल्यामुळें दुर्गुणी लोकांचें प्राबल्य कमी करण्याच्या कामीं त्या धर्माचा उपयोग होणें शक्य नाहीं.

दुष्टांप्रमाणेंच दीनांच्या बाबतींतही ख्रिश्चन धर्मानें योग्य ती खबरदारी घेतल्याचें दिसून येत नाहीं.

" Blessed are you poor !
the realm of God is yours.
Blessed are you weep to-day !
you shall laugh. " ( S. Luke VI )

असा उपदेश गरीबांस व दुःखितांस करून त्यांमध्यें उत्साह उत्पन्न करणें हें केव्हांही स्तुत्यच आहे. पण याच्याच जोडीला जेव्हां हसणें, श्रीमंती, लोकप्रियता वगैरे गुणांस दोष दिलेला आढळतो तेव्हां गरिबांना व दुःखितांना शेवटपर्यंत त्याच स्थितींत राहणें श्रेयस्कर वाटून ते दैन्यनाशाचा प्रयत्न न करणेंच योग्य समजतात. अशा दैन्यावस्थेंत ( आत्मसंकोचयुक्त स्थितींत ) दिवस काढणारांस " Rich is your reward in heaven " असें म्हणून मेल्यावर स्वर्गांत बक्षीस मिळण्याचें आमिषही दाखविलेलें आहे. अर्थात् धार्मिक मनोवृत्तीच्या मनुष्यानें स्वतःच्या प्रयत्नानें दैन्यांतून उद्धार करून न घेतां

मुकीं बिचारीं कुणीं हका।

अशा तऱ्हेनें चिरडलें जाणेंच ख्रिश्चन धर्माप्रमाणें योग्य ठरल्यावर दुर्गुणांचें साम्राज्य माजलें तर त्यांत आश्चर्य काय? ख्रिश्चन व कांहीं अंशीं

बौद्ध धर्मांत याप्रमाणें दयेचा दुरुपयोग केलेला असल्यामुळेंच नित्शेनें* धर्माची नालस्ती केलेली आहे.

येथपर्यंतचें विवेचन करतांना मनुष्यानें मनुष्याची हिंसा न करणें एवढ्याच अर्थानें अहिंसेचें महत्त्व वर्णिलें. पण

**आत्यान्तिक अहिंसेची अशक्यता**

आमचें आजचें सर्व जुनें वाङ्मय पाहिलें तर त्यांत दुसराही एक अहिंसेचा अर्थ दिलेला दिसून येतो. तो म्हणजे कोणत्याही प्राण्याची ( किडामुंगीचीही ) हिंसा न करणें हाच होय. बौद्धांनीं व जैनांनीं या प्रकारच्या अहिंसेस विशेष पुढें आणलें व नंतरच्या वैदिक ग्रंथकारांनींही त्यास मान तुकविली असें इतिहासज्ञांचें म्हणणें आहे. या ऐतिहासिकांच्या खरेखोटेपणाचा छडा लावण्याचें येथें प्रयोजन नाहीं. पण या तऱ्हेची अहिंसा धर्मशास्त्रसंमत आहे काय याचा मात्र विचार केला पाहिजे. असा विचार करावयाचा तर प्रथम सृष्टिनियम लक्षांत घ्यावा लागेल. त्याप्रमाणें पाहिल्यास

'जीवो जीवस्य जीवनम्'

'एका प्राण्याला मारूनच दुसरा प्राणी जगतो' असें दिसून येईल. साक्षात् मोठा पशु न मारला तरी ढेकूण, पिसा, उंदीर यांची हत्या करावीच लागते. याही पलीकडे जाऊन विचार केल्यास धान्य खाणें ही हत्याच ठरेल. कारण प्रत्येक धान्यांतील बीजशक्तीचा ( गर्भाचा ) तें खाण्यानें आपण नाशच करीत असतों. आजचें जन्तुशास्त्र लक्षांत घेतल्यासही हेंच दिसून येतें. तेव्हां असली आत्यंतिक अहिंसा अशक्य असल्यामुळें धर्मशास्त्रसंमत असणें शक्यच नाहीं.

---

* Our traditional morality is also rejected by Nietzsche because it is based on pity and favours ...... Religion, too particularly **Christianity** is repudiated for the same reason. ( History of Philosophy By Thilly P. 576 )

आत्यंतिक अहिंसा अशक्य आहे म्हणून वाटेल तेव्हां जीवजंतूंचा संहार करीत सुटावें असेंही नाहीं. जीवोजीवस्य जीवनम्' या सृष्टिनियमावरून 'जीवनार्थ आवश्यक असलेली हिंसाच समर्थनीय ठरते. या दृष्टीनें हिंस्र पशु, रोगवर्धक जंतु, पिसवा, ढेंकूण वगैरेंची हिंसा दोषास्पद नाहीं. तसेंच परंपरेनें जीवरक्षणाशीं संबद्ध असलेली बेडूक वगैरे प्राण्यांची हत्याही (इंद्रियविज्ञानार्थ) आवश्यकच ठरते. कनिष्ठ प्रतींच्या जीवांची हत्या वरिष्ठ प्रतींच्या जीवांकरितां केली जाणेंही योग्यच आहे. याच दृष्टीनें मांसाहाराचें समर्थन मागें नवव्या प्रकरणांत आम्ही केलेलें आहे. याप्रमाणें विचार केल्यास जीवरक्षणार्थ, ज्ञानार्थ तसेंच बल व आरोग्य यांच्या अभिवृद्ध्यर्थ केलेली कनिष्ठ प्रतीच्या जीवांची हिंसा धर्म्यच होय! केवळ चैनीकरितां तसेंच निष्प्रयोजन हिंसा मात्र समर्थनीय नाहीं. आत्यन्तिक अहिंसा व आत्यन्तिक हिंसा हीं दोन टोकें वर्ज्य करून याप्रमाणें मध्यमार्गाचा अवलंब करणेंच धर्मशास्त्रसंमत आहे.

**मध्यमार्ग**

रोजच्या हिंसा व्यवहारांत ज्याप्रमाणें मध्यम मार्गाचा अवलंब करणें श्रेयस्कर त्याचप्रमाणें यज्ञीय हिंसाच्या बाबतींतही धोरण ठेवलें पाहिजे. या विषयासंबंधानें गेल्यावर्षीं कुरुंदवाड-यज्ञाचे वेळीं एक लेख प्रस्तुत लेखकानें केसरीवृत पत्रांत (ता. १९-२-३९) दिलेला होता तोच येथें आवश्यक तेवढी भर घालून वाचकांस सादर करतों:—

**यज्ञ आणि पशुहिंसा**

यज्ञांत पशुहिंसा करावी किंवा नाहीं याविषयीं तज्ज्ञांमध्यें मतभेद आहे. सध्या कुरुंदवाड येथेंहि याच मतभेदामुळें तेथील यज्ञसंचालकांस जनतेकडून विरोध होत आहे. अशा वेळीं या वादांत मुख्य मुख्य कोणते मतभेद आहेत व त्यांत शास्त्रीय व अशास्त्रीय भाग किती हें जाणणें आवश्यक आहे.

यज्ञांतील पशुहिंसेबद्दल सध्या चार मतें प्रचलित आहेत तीं अशीं--

१ वेदामध्यें पशुहिंसा ( यज्ञनिमित्तानें ) सांगितलेली नसल्यामुळें ती करणें सर्वस्वीं वेदविरुद्ध आहे.

२ पशुहिंसापूर्वक यज्ञच वेदोक्त असल्यामुळें तो तसाच केला पाहिजे. हिंसा करावयाची नसेल तर यज्ञच करूं नये.

३ प्रत्यक्ष पशूऐवजीं पिष्टपशु करून काम भागवावें. यायोगें हिंसा टाळतां येऊन शास्त्रहि पाळतां येतें.

४ वेदांमध्यें पशुहिंसा विहित आहे; पण उपाकरणापर्यन्तचे विधि प्रत्यक्ष पशूवर करून पश्वंगहवनाचें काम आज्याहुतींवर भागवून शास्त्रमर्यादारक्षण व लोकक्षोभनिवारण करणें शक्य आहे. अर्थात् प्रत्यक्ष पशूची हिंसा केलीच पाहिजे असें नाहीं.

वरील चार मतांमध्यें यज्ञांतील हिंसाविषयक सर्व मतभेदांचा समावेश होतो. ' यज्ञच काय करायचा आहे ? ' ' यज्ञांत हिंसा झाली म्हणून बिघडलें काय ? ' ' व्यवहारांत आपण थोडी का हिंसा करतों ' वगैरे प्रश्न येथें विचारांत घेण्याचें कारण नाहीं. कारण असे प्रश्न करणारांस मूळ मुद्दाच ठाऊक नसतो. घरांत आपण पुष्कळ आचरटपणा करतों म्हणून सभेंत किंवा मंदिरांतही तो करावा असें कोणी समर्थील काय ? तसेंच व्यवहारांत प्रत्यहीं हिंसा होत असली तरी ती देवाच्या नांवानें बुद्ध्या करावी काय असा प्रश्न आहे. या प्रश्नामागें जी भावना आहे तीकडे लक्ष दिल्यास अशी हिंसा न करणें बरें असेंच कोणीहि समंजस मनुष्य कबूल करील. इन्द्रियविज्ञानार्थ यज्ञीय पशुहत्येचें समर्थन करणें यासारखा हास्यास्पद प्रकार तर दुसरा कोणताच नसेल ! कोणत्याही खाटिकखान्यांत असल्या जिज्ञासेची तृप्ति अनायासानें होऊं शकेल ! शिवाय बोकडाचें शरीरविज्ञान माणसास कोणत्या प्रकारें उपयुक्त ठरेल हाही एक प्रश्नच आहे. तेव्हां असल्या गैरलागू प्रश्नांचा विचार उपस्थित करून मूळ विषयास बगल देणें आम्ही योग्य समजत नाहीं.

यज्ञसंस्था लोकादरास पात्र कशी होईल एवढेंच या ठिकाणीं पाहावयाचें आहे. म्हणून शास्त्रमर्यादा व लोकादर या दोन्हीं दृष्टींनी विचार करून वरीलपैकीं कोणतें मत ग्राह्य ठरतें तें पाहूं.

पहिला पक्ष वेदांत हिंसाच नाहीं असें म्हणून मोकळा होतो. पण हें वेदांवरून सिद्ध करणें किती कठिण आहे याची कल्पना वेद पाहिल्या-वांचून कशी येणार ? 'आग्नीषोमीयं पशुमालभेत ' यासारखीं वाक्यें तैत्तिरीय संहितेंत जागोजाग आढळतात त्यांची वाट काय ? कांहीं आर्यसमाजी थाटाचे पंडित असल्या वाक्यांतील ' आलभेत ' या क्रियापदाचा ' स्पर्श करावा ' असा अर्थ करून वेळ मारून नेतात. वास्तविक हा अर्थ अगदीं चूक आहे. पण तो बरोबर आहे असें गृहीत धरलें तरी ' परागावर्ततेऽध्वर्युः पशोः संज्ञप्यमानात् ' अशा वाक्यांचें काय करणार ? अध्रिगुप्रैष या नांवाचा जो आज्ञासमुच्चय कृष्णयजुर्वेदांत दिलेला आहे तो पाहिल्यावर तर कोणतीच शंका शिल्लक राहात नाहीं. त्यांत पशूचे पाय कोणत्या बाजूस करून त्यास पाडावें, पुढचे मागचे पाय कसे छाटावे, बरगडया कशा उचकाव्या, निरनिराळे अवयव कसे कापून काढावे वगैरे विषयांचें इतकें खुलासेवार वर्णन आहे कीं, तें पाहिल्यावर वेदांत हिंसा विहित नाहीं असें म्हणण्यास कोणींही धजणार नाही. असें विशेष रूपाचे पुरावे विद्यमान असतां ' अहिंसा परमो धर्मः ' यांसारखीं वाक्यें पुढें करून वेदांत हिंसाच नाहीं असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा अपलाप करणें होय ! एवंच वर दिलेल्या चार पक्षांपैकीं पहिला पक्ष प्रमाण सिद्ध नाहीं हें सिद्ध होतें.

आतां कांहीं वेळ वरीलपैकीं दुसरें मत बाजूला ठेवून तिसऱ्या मताचा प्रथम विचार करूं. जुन्या वैष्णव सांप्रदायिकांनीं पिष्टपशूची प्रथा प्रस्थापित केलेली आहे. आर्यसमाजीयांपेक्षां एकापरी हें मत बरें आहे यांत शंका नाहीं. कारण त्यांनीं वेदांत पशुहिंसाच नाहीं असें विपर्यस्त विधान केलेलें नाहीं. त्यांचें म्हणणें एवढेंच कीं, खऱ्या पशूवर जें जें करावयाचें तें पिठाचा

पशु करून त्यावर करून जर भागतें तर उगाच हिंसा कां करा? भूत-दयेच्या व अहिंसा या परम धर्मतत्त्वाच्या दृष्टीनें वैष्णवांचें हें म्हणणें केव्हांहि योग्यच आहे. पण देवाला पशु बळी देऊं करून पिठाची प्रतिमा अर्पण करावयाची व विच्छेदनप्रसंगीं कांहीं तरी कृत्रिम भावना स्वीकारून चीर-फाडीचा देखावा करावयाचा ही निव्वळ प्रतारणा नव्हे काय? इंद्र, सोम यांसारख्या प्रतापी देवांच्या उद्देशानें असले प्रकार खेळणें म्हणजे त्या देवांचा उपमर्दच करण्यासारखें नव्हे काय? या दृष्टीनें विचार केल्यास हाहि पक्ष गौण स्वरूपाचाच ठरतो.

आतां दुसऱ्या पक्षाचा ऊर्फ चालू रूढीचा विचार करूं. हा पक्ष वेदोक्त आहे यांत शंकाच नाहीं. पण वेदोक्त कर्म सुद्धां लोकक्षोभकारक झालें तरी तसेंच करावें हा त्यांचा आग्रह बरा नव्हे. एका बाजूनें 'यज्ञो वै श्रेष्ठतमं कर्म' असें म्हणत यज्ञाचें अनुष्ठान सुरू ठेवावयाचें आणि दुसरीकडे लोकांची त्याविरुद्ध ओरड चाललेली असावयाची हें कोणीहि योग्य समजणार नाहीं. आज जे हट्टानें हिंसा करतात त्यांसहि हें बरें वाटत नसावें. पण ते शास्त्र-परतन्त्र! वेदांत जें लिहिलें त्याचें अतिक्रमण करणें त्यांस गर्ह्य वाटतें. लोकांकडे लक्ष द्यावें तर वेदाज्ञेस खो बसतो; उलटपक्षीं वेदाज्ञा पाळावी तर लोकक्षोभ सहन करावा लागतो. अशा पेचांत सांपडल्यावर वेदाज्ञेस मान देऊन लोकांच्या आरडाओरड्याकडे कानाडोळा करणेंच श्रेयस्कर असें रूढ पक्षाचे अभिमानी समजतात. परंतु लौकिक आरडाओरडीकडे मुळींच पाहूं नका असा शास्त्राचा अभिप्राय मानणें हा या पक्षाकडून फार मोठा प्रमाद घडतो व त्यावर आपलें शास्त्र लौकिक सोयीकडे पाहणारें नाहीं या मताची उभारणी आहे. पण ही मूळ समजूतच चुकीची आहे. 'लोकविद्विष्ट धर्माचें आचरण करूं नये' अशी स्पष्ट शास्त्राज्ञा आहे. गोमेध स्मृतिकारांनीं निषिद्ध ठरविला, नित्य सोमयाग देखील गरीब मनुष्यानें करूं नये अशी शास्त्रकारांची सांगी आहे. मग पशुहत्येला लोक विरोध करीत असतांहि ती कराच असें शास्त्र कसें सांगेल?

वरील तीन पक्षांतील दोष वर्ज करून व शास्त्रसंमतपद्धतीनें वै. व. ३०, १८५२ सालीं सध्यां कुरुंदवाडांत चालू असलेलाच याग श्रौताचार्य धुंडिराजशास्त्री बापट यांनीं केला होता. सदर यज्ञाचे वेळीं वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे व सदाशिवशास्त्री भिडे यांनीं मोठ्या कसोशीनें शास्त्र-संमति पाहून एक नवी प्रथा चालू केली.

'यदि पशोरवदानं नश्येत्, आज्यस्य प्रत्याख्यायमवद्येत्' यांसारखीं स्पष्ट वाक्यें त्यांनीं मार्मिकपणें ध्यानांत घेतलीं. पशु न मिळाल्यास पयस्येनें याग करावा यासारखीं जीं कित्येक वाक्यें वेदांत दिसून येतात त्यांचें मार्मिक विवेचन करून श्रौताचार्यांनीं जो एक नवा मार्ग काढला त्याबद्दल सद-रील यज्ञांत त्यांस अनेकांनीं धन्यवाद दिल्याचें कित्येकांस माहीत असेलच.

आरंभीं जे चार पक्ष दाखविले आहेत त्यांपैकीं हा चौथा पक्षच या दृष्टीनें आज महत्त्वाचा ठरतो हें कोणीहि विचारी मनुष्य कबूल करील. कुरुंदवाड येथील यज्ञाच्या चालकांनीं या प्रथेकडे दुर्लक्ष करून अट्टाहास कायम ठेवल्यामुळें त्यांस तर त्रास होतच आहे पण यज्ञसंस्थेचा विनाकारण दुर्लौकिक होत आहे, असें आमच्या अल्प मतीला वाटतें.

प्रत्यक्ष पशु मारण्यापर्यंत न जातां तोंपर्यंतचीं सर्व कर्में करून पशूचें उत्सर्जन करावें व पुढील अंगहवनाचें काम आज्याहुति देऊन करावें हा पक्ष कसा इतर पक्षसंमत होऊं शकतो तें पाहाण्यासारखें आहे. आर्यसमा-जीय यज्ञांत पशुहिंसा नको असें म्हणतात. या चवथ्या पक्षांत ती नाहींच, अर्थात् या यज्ञास त्यांचा विरोध येण्याचें कारण नाहीं; तात्त्विक विरोध राहील. ते म्हणतील हिंसा वेदोक्त नाहीं तर हे म्हणतील ती वेदोक्त आहे. पण प्रत्यक्ष व्यवहारांत हिंसा करावयाचीच नसल्यामुळें 'तपशील मान्य पण तत्त्व अमान्य' असें होईल. पिष्टपशूवाले वैष्णव घेतले तरी त्यांचाहि यास विरोध येण्यासारखा नाहीं. यज्ञांत पशुहिंसा करूं नये हें त्यांचें मुख्य ब्रीद चवथ्या पक्षानें मान्य केलेलें आहे. पिष्टपशूच्या कृत्रिम शरीरावर सर्व प्रयोग

करावे कीं प्रत्यक्ष पशूवर जेवढे करतां येतील तेवढे करून बाकीचे आज्याहुतीनें करावे हा अगदीं अल्प महत्त्वाचा प्रश्न आहे. अर्थात् वरीलपैकीं तिसऱ्या पक्षाचाहि या पक्षास पाठिंबा मिळण्यासारखा आहे ही गोष्ट सिद्ध आहे. राहतां राहिला दुसरा पक्ष !

या दुसऱ्या पक्षांत स्वतः श्रौताचार्यच होते व आहेत ही गोष्ट प्रसिद्धच आहे. इंदुरास श्रौताचार्य धुंडीराजशास्त्री यांनीं जरी पशुरहित याग केला असला तरी त्यांनीं आपलें मत बदललें नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. यज्ञांतील एका अंगाबद्दलची लोकमनोवृत्ति लक्षांत घेऊन त्यांनीं प्रातीनिधि सुचविला एवढेंच ! त्या अंगाबद्दल हट्ट धरून अजीबात यज्ञसंस्थाच बुडवावयाची कीं ' अंगलोपः सह्यः ' या न्यायाचा अवलंब करून यज्ञसंस्था लोकप्रिय करावयाची याचा कोणींहि विचार करावा. ' लोकविद्विष्टं धर्ममप्याचरेन्न तु ' हें शास्त्रवचन या ठिकाणीं सर्वांनीं लक्षांत घेण्यासारखें आहे. अस्तु !

वरील विचारसरणी ज्यांस पसंत असेल त्यांचें इंदुरास घालून दिलेल्या प्रथेचें उज्जीवन करणें हें कर्तव्य आहे. सध्यां यज्ञ फारसे होत नाहींत; झाले तरी लोकविरोधामुळें लोकांत यज्ञसंस्थेबद्दल आदर उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें ते निरुपयोगी ठरतात हें कुरुंदवाडच्या उदाहरणावरून सिद्ध आहे. अशा स्थितींत जो एखादाच याग करावयाचा तो आज्याहुतीचा उपयोग करून करणेंच इष्ट होय, म्हणून इतःपर वैदिक धर्माभिमान्यांनीं हिंसायुक्त यज्ञास मदत न करण्याचेंच धोरण ठेवावें. प्रत्यक्ष इंद्राच्या यज्ञांत ' नायं धर्मो ह्यधर्मोयं न हिंसा धर्म उच्यते ' हिंसा हा धर्म होऊं शकत नाहीं असें महर्षींनीं बजावून त्याच्या यज्ञाचा निषेध केला होता. तसेंच आतां जनतेनें याज्ञिकांस बजावलें पाहिजे. जनतेनें महर्षींच्या मतानुसार आम्हांस यज्ञांत हिंसा नको असें म्हणावें व श्रौताचार्यांच्या प्रथेनुसार याज्ञिकांनीं त्यास मान द्यावा हेंच आतां योग्य होईल ! म्हणून जनतेनें असल्याच यज्ञांस मदत करण्याचा यापुढें निश्चय ठेवावा.

सध्याची आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतां वरचेवर यज्ञाचे योग येतील असें वाटत नाहीं; पण अहोरात्रसत्यनारायणासारखे समारंभ सहजगत्या पार पडतात तेथें अशा वैदिक यज्ञास पैसा मिळणार नाहीं हें शक्य दिसत नाहीं. तसा यज्ञ झाल्यास वरील चारी पक्षांच्या पंडितांस विनंति एवढीच कीं, त्यांनीं आपापले किरकोळ मतभेद विसरून एकमतानें त्यांत भाग घ्यावा !

**आजचे धार्मिक प्रश्न व दया**

दयेचें तात्त्विक स्वरूप येथवर पाहून झालें. आतां या तात्त्विक विवेचनाचा उपयोग लक्षांत येण्याकरितां आजच्या एका वादग्रस्त प्रश्नाचा निर्णय त्यायोगें कसा करतां येतो हें पाहूं. सर्वांशीं आत्मीय भावनेनें ( प्रेमपूर्वक ) वागावें असें दयाधर्म सांगतो. दया हें धर्माचें मूळ आहे. अर्थात् अस्पृश्यवर्गाशीं वागतांनाही आत्मीय भावना द्योतित होईल असेंच आपलें वर्तन असलें पाहिजे हें उघड आहे. पण आजचे आपले अस्पृश्यांबाबतचे आचार पाहिले तर याविरुद्ध अनुभव येतो. अर्थात् आपले हे आचार मूळ तत्त्वास सोडून असल्यामुळें अधर्म्य ठरतात. कित्येक स्मृतिग्रंथांतही अशा आचारांस प्रोत्साहन देणारीं जीं वचनें सांपडतात त्यांसही हाच न्याय लागू केला पाहिजे. अस्पृश्य दुष्ट बुद्धीचे व समाजघातक असतील तरच त्यांजवर कडक निर्बंध घालणें आहिंसातत्त्वास धरून होईल, पण वस्तुस्थिति तशी नाहीं. या एकाच उदाहरणावरून दया या श्रेष्ठ तत्त्वाचा कित्येक वादग्रस्त प्रश्न सोडविण्याच्या कामीं कसा उपयोग करतां येईल हें कळून येण्यासारखें आहे.

**अहिंसा आणि रोजचा व्यवहार**

केवळ वादग्रस्त प्रश्नांचा निर्णय करतांनाच नव्हे तर रोजच्या सामान्य व्यवहारांतही या श्रेष्ठ तत्त्वाचा उपयोग केला पाहिजे. हिंसा म्हणजे केवळ ठार मारणेंच नव्हे; त्रास देऊन दुसऱ्याला बेजार करणें हीही हिंसाच होय. म्हणून दुसऱ्याशीं वागतांना हरघडी

त्याला आपल्यापासून विनाकारण उपसर्ग न पोंचेल याविषयीं प्रत्येकानें काळजी घेतली पाहिजे. प्रत्येकानें कळत किंवा न कळत आपल्याकडून दुसऱ्यास उपद्रव तर होत नाहीं ना, याचा नेहमीं विचार मनांत बाळगला पाहिजे. उठतां, बसतां, चालतांना बोलतांना सर्वकाळीं या अधर्मापासून बचाव होईल असेंच वर्तन ठेवलें पाहिजे. केर, पाणी टाकतांना किंवा थुंकतांना आपण हे प्रकार कोठें करीत आहों, त्यापासून कोणास त्रास होईल काय याचा विचार केला पाहिजे. पण असा विचार कोणी करीत नाहीं. 'क' नें आपला केर 'ख'च्या दारासमोर टाकावा उलट 'ख'नें तो 'क'च्या दारासमोर टाकावा असा प्रकार दिसून येतो. म्युनिसिपालटीच्या कचऱ्याच्या पेटीचीही हीच अवस्था! कोणी त्या पेटीपर्यंत जातच नाहींत. पण कोणी गेलेच तर केर नीट पेटींत न टाकतां बाहेरच टाकून पसार होतात. या प्रकारानें रस्त्याभर केर होऊन वाटसरूंना त्रास होतो याचें कोणाला भानच नसतें. मुंबईसारख्या शहरांत फूटपाथवरून चालतांना केळ्यांच्या सालीवरून पाय घसरून किती अपघात होतात ? पण हें माहीत असूनही त्या टाकतांना बाजूला टाकण्याची खबरदारी कोणीच घेत नाहीं. आगगाडीच्या डब्यांत तर पहावयासच नको! खिडकीजवळ बसलेले वाटसरूही केव्हां केव्हां डब्यांतच थुंकून घाण करतात यास काय म्हणावें ? या घाणेरडेपणाचा स्वतःला व लोकांनाही त्रास होतो याची फारच थोड्या लोकांस कल्पना असते.

**पान व धूम्रपान**

पान खाणारे व विड्या ओढणारे यांनीं तर दुसऱ्यास त्रास देण्याचा जणूं मक्ताच घेतलेला असतो. पान खाल्ल्यावर पिचकारी कोठें मारावी याचें तारतम्य फारच क्वचित् दिसून येतें. रस्त्याच्या कांठच्या इमारतींवर कितीही सुंदर रंगाची खुलावट करून ठेवा! हे पिचकारीबहाद्दर एकतरी पिचकारी मारल्याशिवाय पुढें जाणारच नाहींत. आगगाडीच्या

डब्यांत हे महाशय बसल्यावर तर विचारायची सोयच नाहीं. ' अहो, जरा बाहेर तोंड करून थुंका कीं ' असें कोणी सुचविलेंच तर तोंडाप्रमाणेंच डोळे लाल करून ' कां मेहेरबान् ? कंपनीचे आपण कोणी लागतां-वाटतें ? तुमच्या सामानावर तर नाहींना उडत ? ' अशी सरबत्ती सुरू होते. क्वचित् सामान भिजल्याचा पुरावा पुढें केला तरी त्याचा कांहींच उपयोग होत नाहीं. ' बाकाखालीं तुम्हीं सामान ठेवलेंच कां ? वर आहे कीं सामानाची सोय ! ' असें मासलेवाईक उत्तर मिळतें. क्वचित् तोंडानें रामनामाचा जप सतत चालू ठेवणारे महात्मेही याप्रमाणें लोकांना त्रास देत असतात. ' परपीडक तो आम्हां दावेदार ' असें बजावणाऱ्या तुकारामाचे भक्तही याप्रमाणें आपल्या व्यसनापायीं लोकांस व्यर्थ त्रास देतात, हें सर्वस्वीं निंद्य आहे.

पानापेक्षां धूम्रपानाचे प्रताप फारच मोठे आहेत. पानवाला एकावेळीं तीन-चार इंच जागाच खराब करील पण विडीबहाद्दर सर्व वातावरण क्षणांत धूम्रमय करून टाकील ? अलीकडे पानें मागें पडून धूम्रपान फारच बोकाळलें आहे. थंडीच्या दिवसांत रात्रीं आगगाडींतून प्रवास करण्याचा प्रसंग यावा ! थंडीचा त्रास होऊं नये म्हणून दारें व खिडक्या बंद असतात, डब्यांत शेंदीडशें लोक खेचलेले, अशा स्थितींत आधींच जीव गुदमरण्याची पाळी येते. त्यांतून त्या डब्यांत एखादा विडीबहाद्दर असला म्हणजे विचारावयासच नको. व्यसनें व्यक्तिदृष्ट्या कशीं घातुक आहेत हें मागें ( प्र. १५ वें ) दाखविलेलेंच आहे. येथें त्याचे इतरांवर होणारे दुष्परिणामच तेवढे दाखवावयाचे आहेत. त्याचा हेतु एवढाच कीं, धूम्रपान ज्या ठिकाणीं करावयाचें असेल त्या ठिकाणीं तें केल्यापासून इतरांस त्रास होतो किंवा काय याचा विचार करून मगच करण्याची प्रथा आपल्या लोकांत रूढ व्हावी. सार्वजनिक ठिकाणीं धूम्रपान करतांना शेजारच्या लोकांची नम्रपणें परवानगी घेऊन मगच धूम्रपान करण्याची पद्धत आपण पाडली पाहिजे. ही पद्धत

पाश्चात्यांत आहे. शेजारीं बसलेल्या मनुष्याची—औपचारिक कां होईना—परवानगी घेतल्यावांचून धूम्रपान करणें तिकडे अशिष्टपणाचें समजलें जातें. तोच शिष्टाचार इकडेही रूढ करणें जरूर आहे.

**शान्ततेचा भंग आणि अहिंसा**

अस्वच्छतेप्रमाणेंच शांततेच्या भंगामुळेंही दुसऱ्यास त्रास होत असतो. रात्रीं विशिष्ट कालावधींत कोणत्याही कारणास्तव शांतताभंग करणें हा कायद्याप्रमाणें-ही गुन्हा आहे. म्हणून आपल्या आचरणानें दुसऱ्यास आवश्यक असलेल्या शांततेचा भंग न करण्याची प्रत्येकानें खबरदारी घेतली पाहिजे. सभा, वाचनालयें या ठिकाणीं गोंगाट करणें गर्ह्य होय. फार काय स्वतःच्या खोलींत बसून शेजाऱ्यांस त्रास होईल इतक्या मोठ्यानें बोलणें किंवा गाणें हेंही गर्ह्य आहे. विशेषतः रात्रीं या प्रकारामुळें झोंपमोड होऊन त्रास होण्याचा संभव फार असतो. म्हणून साधारणतः रात्रीं १० च्या पुढें अशा प्रकारचा गोंगाट करूंच नये. एखाद्या वेळीं खेळ, मेजवानी वगैरे नैमित्तिक कारणानें तसा गोंगाट होणार असेल तर शेजाऱ्याची—औपचारिक कां होईना—परवानगी घ्यावी. बहुधा अशा प्रसंगीं शेजाऱ्यास वगळलें जातच नाहीं. तथापि हाही शिष्टाचार रूढ करणें आवश्यक आहे.

**लहान मुलांचा गोंगाट**

ज्या घरांत लहान मुलें आहेत. तेथें तीं रात्रीं अपरात्रीं रडणारच व त्यांचें रडणें थांबणेंही शक्य नाहीं. अशा वेळीं घरांतील मंडळीप्रमाणेंच शेजाऱ्यांनींही निमूटपणें तो त्रास सोसला पाहिजे. कारण लहान मुलें हीं सर्वांस सारखींच असतात हें एक व त्याच्या रडण्यास प्रतिबंध करणें शक्य नसतें हें दुसरें; म्हणून फार झालें तर 'आमचा रामू काल फारच रडत होता; तुम्हांला त्रास झाला असेल नाहीं ?' असें एकानें शेजाऱ्यास म्हणावें. व शेजाऱ्यांनींही 'अहो, चालायचेंच, मुलें का कोणाच्या हातचीं आहेत. आमच्या घरांत रडलीं

तर आम्ही काय करतों ? ' असें म्हणून आपल्या मनाचा मोठेपणा व्यक्त करावा. हीं दोन्ही वाक्यें औपचारिक तर खरींच पण त्यामुळें जी परस्परांबद्दलची परस्परांची आपुलकी व्यक्त होते ती मात्र दया या मूलभूत धर्मतत्त्वाशीं संबद्ध असल्यामुळें औपचारिक नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

या मुलांच्या रडण्याच्या बाबतींत पुढील दोन गोष्टी मात्र लक्षांत घेतल्या पाहिजेत.

१ रात्रीं मुलें रडूं लागलीं म्हणजे त्यांस शिव्या हांसडीत व मोठमोठ्यानें धबकीत निजविण्याचा प्रयत्न करून गोंगाटांत व स्वतःच्या तामसीवृत्तींत भर घालूं नये. रडण्याच्या कारणाचा शोध करण्याचा प्रयत्न करावा !

२ सिनेमा, नाटक, गणेशोत्सवांतील कार्यक्रम अशा कार्यक्रमांत लेकुरवाळीनें प्रेक्षक म्हणून भाग घेऊं नये हें उत्तम. पण घेतलाच तर मूल रडूं लागतांच तडक उठून घरीं यावें. पण चालू कार्यक्रमांत व्यत्यय आणूं नये.

दुसऱ्या गोष्टीबद्दल नवविवाहित भगिनीवर्ग लेखकावर क्रुद्ध होण्याचा संभव आहे. पण त्यांनीं शांत डोक्यानें विचार केल्यास त्यांची चूक त्यांस कळून येईल. स्वच्छता व शांतता यांचें पालन करणें हें याप्रमाणें अहिंसातत्त्वास धरूनच आहे. म्हणून कोणत्याही तऱ्हेनें दुसऱ्यास मुद्दाम त्रास देणें हें अहिंसेशीं अत्यंत विरुद्ध आहे ही गोष्ट नेहमीं लक्षांत बाळगून स्वतः धार्मिक मनुष्यानें वागलें पाहिजे.

**दयेचीं दोन अंगें**

अहिंसा या शब्दानें दयेचें एक अंग द्योतित होतें. तें म्हणजे दुसऱ्यास उपद्रव न देणें हेंच होय. पण याशिवाय दुसरें अंग म्हणजे प्रयत्नपूर्वक दुसऱ्याचें दुःख कमी करण्याचा प्रयत्न करणें हें होय. स्वतः

दुसऱ्याच्या दुःखांत भर तर घालावयाची नाहींच पण खटपट करून दुसऱ्याचें दुःख कमी करावयाचें हेंही दयेंतच मोडतें.

**यत्नादपि परक्लेशं हर्तुं या हृदि जायते ।**
**इच्छा भूमिसुरश्रेष्ठा सा दया परिकीर्तिता ॥**

या श्लोकांत हेंच दयेचें दुसरें अंग प्राधान्यानें सांगितलेलें आहे. प्रत्येकानें याप्रमाणें समाजांत आपण होऊन दुःखाची भर न घालतां असलेलीं दुःखें कमी करण्याचा प्रयत्न केला; खऱ्या दयेचें अनुष्ठान केलें, तर समाजांत सुख व शांति नांदण्यास किती मदत होईल ?

**पोकळ आश्वासनें**

कित्येक धनिकांस एखाद्या सार्वजनिक फंडास किंवा कोणासही आश्वासन देण्याचें जणूं व्यसनच असतें. हें आश्वासन पुरें होईल कीं नाहीं याची त्यास क्षितिच नसते. शेवटीं कित्येक लोक या आश्वासनास फसून जातात हें सांगावयास नकोच ! यांत सर्वस्वीं धनिकवर्गाकडेच चूक आहे असें नाहीं. प्रचारकांचा ससेमिरा चुकविण्याकरितांही कित्येक वेळां असें करावें लागतें. पण यामुळें असत्य व हिंसा यांची जोड होते याची त्यांस कल्पना नसते. ‘ *एखाद्याला आश्वासन देऊन मागाहून नाहीं म्हणणारा मूर्ख नरकास जातो ’ असें म्हटलें आहे तें याचकरितां

**दयेचें व्यापक स्वरूप**

दयेचीं दोन ( अभावात्मक व भावात्मक ) अंगें वर दाखविलींच आहेत. या शेवटच्या उदाहरणावरून सत्य हेंही त्यांतच अन्तर्भूत होतें हें दिसून येईल. फंडगुंड खाबूपणा करून सार्वजनिक फंडांची जी वाताहत लावतात ती चौर्यांत येते. म्हणजे अस्तेय

---

* ब्राह्मणं स्वयमाहूय याचमानमकिञ्चनम् ।
पश्चान्नास्तीति यो ब्रूयात्स मूढो नरकं व्रजेत् ॥

व्रताचाही या दयेंत किंवा अहिंसेंतच अन्तर्भाव होतो असें दिसून येईल. शुद्धि ( शौच ) व शांतता यांचा अंतर्भाव याच अहिंसेंत कसा होतो हें वर दाखविलेंच आहे. हें सर्व लक्षांत घेतल्यास अहिंसा किंवा दया किती व्यापक स्वरूपाची आहे हें लक्षांत येईल. अहिंसेचें हें व्यापक स्वरूप व्यासांच्या भाषेंत ज्यांस पहावयाचें असेल त्यांनीं त्यांचें पुढील वाक्य वाचावें—

**" तत्राहिंसा सर्वथा सर्वदा सर्वभूतानामनभिद्रोहः। उत्तरे च यमनियमास्तन्मूलास्तत्सिद्धिपरतया तत्प्रतिपादनाय प्रतिपाद्यन्ते। "**

यो. सू. भाष्य. २.३०

या वाक्यांत कोणत्याही प्रकारानें कोणत्याही प्राण्याचा द्वेष न करणें अशी अहिंसेची व्याख्या प्रथम देऊन सर्व यम व नियम या अहिंसेपासूनच उत्पन्न होत असून त्यांच्या योगानें अहिंसेचेंच व्यापक स्वरूप दाखविलें जातें असें म्हटलेलें आहे. म्हणून सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, शौच, सन्तोष वगैरे सर्व यमनियम अहिंसेकरितांच आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

अहिंसेचें विवेचन एवढ्यानेंच संपत नाहीं. शारीरिक, वाचिक व मानसिक अशी मुख्यतः तीन प्रकारची अहिंसा असून प्रत्येकीचे पुन्हां स्वतः केलेली, दुसऱ्यांकडून करविलेली व अनुमोदन दिलेली असे भेद आहेतच ! त्या सर्वांचें येथें विवेचन देण्याचें कारण नाहीं. अहिंसाव्रत किती व्यापक स्वरूपाचें आहे हें लक्षांत घेऊन साक्षात् किंवा परंपरेनें कायेनें, वाचेनें किंवा मनानें दुसऱ्याचा घात करणें किंवा त्यास त्रास देणें कसें अधर्म्य आहे हें लक्षांत यावयास एवढें विवेचन पुरे आहे. असो.

वर दाखविल्याप्रमाणें दुसऱ्याचे क्लेश निवारण करण्याचा प्रयत्न करणेंही दयेचेंच एक अंग आहे. स्वतःजवळची एखादी वस्तु दिल्याशिवाय—दान केल्याशिवाय—हें शक्य नाहीं. म्हणून या दानाचा आतां

विचार करूं. एखादा मनुष्य दयेचें सोंग करील व सामर्थ्य असून दुसऱ्यास प्रसंगीं दान करून मदत करणार नाहीं तर ती खरी दयाच नव्हे. सर्वांभूतीं समदृष्टिरूप दया जर वास्तव्य करीत असेल तर स्वतःच्या पायांत बोचलेला कांटा काढून टाकण्याची ज्याप्रमाणें आपण खटपट करतों त्याचप्रमाणें दुसऱ्याचें दुःख पाहूनही तें नाहींसें करण्याची खटपट होणारच. अर्थात् दान हें दयेचें बाह्य रूपच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. त्या दानाचाच आतां विचार करूं.



## प्रकरण एकोणिसावें

# दानविवेक

**संपत्तीची विभागणी व दान**

संपत्तीची समविभागणी जेव्हां खरोखरच सुरू होईल तेव्हां ' निर्वाहापुरतेंच अन्न आच्छादन ' प्रत्येकास मिळणारच! अर्थात् अशा कृतयुगांत ' तपः परं कृतयुगे ' ( परा. १.२२ ) या वचनाप्रमाणें तप म्हणजे श्रम ( Labour* ) हाच श्रेष्ठ धर्म राहणार! अशा वेळीं दान द्यावयास देणाराजवळ संपत्ति व घेणाराजवळ अन्न–आच्छादनांची वाण हीं दोन्ही संभवणें शक्य नसल्यामुळें ' दान ' अशक्य आहे. पण जोंपर्यंत ती स्थिति प्राप्त झालेली नाहीं; जोंपर्यंत कोठें संपत्तीचे पर्वत तर कोठें दारिद्र्याचे खड्डे दिसून येतात तोंपर्यंत ' दान ' करण्याची आवश्यकता सिद्ध होते. समाजांतील व्यक्तींमध्यें जेव्हां संपत्तीची विषम विभागणी दिसून येईल तेव्हां दानाखेरीज दुसरा कोणताही उपाय बहुजनसमाजास कल्याणप्रद होणें शक्य नाहीं.

**वेदकालीन दान**

प्राचीन शास्त्रकारांनीं याचकरितां दानाचें महत्त्व ठिकठिकाणीं वर्णन केलेलें आहे. सर्वांत प्राचीन ऋग्वेद पाहिला तरी त्यांत ' अन्नादि वस्तूंचें दान करावें, देणाराची संपत्ति कमी होत नाहीं ( उलट ) न देणाऱ्या कृपणास कोणी मदत करीत नाहीं ' असें सांगितलें आहे. फार काय, ' चांगल्या श्रेष्ठ मनुष्यांस व मित्रांस न देतां जो एकट्यानेंच खातो तो अन्न खात नसून पापच खातो ' असें म्हणून कंजूषपणाच्या मनोवृत्तीची निंदा केली आहे. नारायणोपनिषदांत ' सर्व यज्ञांत दान हेंच श्रेष्ठ आहे '

---

* येथें श्रम किंवा Labour यांचा केवळ अंगमेहनत असा अर्थ नसून बौद्धिक कार्याचाही त्यांत अन्तर्भाव होतो हें वाचकांनीं नीट लक्षांत घ्यावें.

असें सांगितलेलें असून पुढें ' दानानें शत्रु मित्र बनतात किंवा त्यांचा नाश करतां येतो. ' असेंही सांगितलेलें आहे. या सर्वांचा विचार केल्यास समाजांतील संपत्तीच्या विषमविभागणीमुळें कित्येकांची जी उपासमार होते त्याकडे श्रुतिवाङ्मयाचें लक्ष होतें असें दिसून येतें. व त्यावरील त्यांचा उपायही आजपर्यंत प्रभावीच ठरलेला आहे. श्रीमंतांवर कर बसवून त्यांतून गरीब बेकारांना रोजमुरा देण्याची जी इंग्लंड वगैरे देशांत चाल आहे ती या वैदिक आज्ञांचेंच कायद्यांतील रूपान्तर आहे असें म्हटल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. वैदिक वाङ्मयांत याप्रमाणें दानाचा उपदेश दिसून येतो.

**स्मृतिकारांचें मत**

आर्यस्मृतिकारांनीं किंवा आर्यधर्मशास्त्रकारांनीं या दानास अधिक महत्त्वाचें स्पष्ट स्थान दिलें आहे. भुकेलेल्यास अन्न द्यावें वगैरे त्यांस मान्य आहेच. पण समाजांतील विशिष्ट व्यक्तींस द्रव्य दान करावें हें स्मृतिकारांनीं विशेष जोरानें प्रतिपादिलें आहे. ' जें विशिष्ट लोकांना दिलें जातें, तेंच तुझें द्रव्य होय ' असें शास्त्र निक्षून सांगत आहे. कलियुगांत दान हाच श्रेष्ठ धर्म आहे असें पराशरस्मृतींत स्पष्ट सांगितलें आहे. ( परा. १.२२ ) अर्थात् समाजांतील विशिष्ट व्यक्तींस द्रव्यदान करून त्यांच्या विशिष्ट कार्यास मदत करणें हें हिंदु धर्माप्रमाणें प्रत्येक धनिकाचें कर्तव्य होय. ' विद्वान् ब्राह्मण जरी दूर असला तरी त्यास दान द्यावें पण मूर्खास देऊं नये* ' फार काय ' अध्ययनरहित अशा ब्राह्मणाला दान दिल्यास कुलनाश होतो ' ( हारीत १.२३ ) असेंही कित्येक ठिकाणीं विधान आहे. स्मृतिकारांचें हें विवेचन लक्षांत घेतलें म्हणजे त्यांनीं दानाकडे केवळ जीवरक्षण ( अहिंसा, धारण )

---

* समीपे यस्य मूर्खःस्याद्दूरे यस्य बहुश्रुतः ।
बहुश्रुताय दातव्यं नास्ति मूर्खे व्यतिक्रमः ॥

या दृष्टीनें पाहिलेलें नसून समाजोत्कर्षाच्या (प्रभवाच्या; ध. स्व. निर्णय पृ. २३७ पहा!) दृष्टीनें पाहिलेलें आहे हें दिसून येईल. स्मृतिकारांची ही दृष्टि पुढें पुराणकालांत न राहून आमच्या दानधर्मास भलतेंच रूप प्राप्त झालें हें आमचें दुर्दैव होय.

**आजचा आंधळा दानधर्म**

आज आपल्या दानधर्माला कोणतेंच ऐहिक ध्येय राहिलेलें नाहीं. यामुळें कोणाला दान करावें याचा विचारच होत नाहीं. याचा परिणाम समाजनाशांत होत आहे. कित्येक भिकाऱ्यांच्या पोतडींत पांच-पांचशें रुपये सांपडत असून ते बिनवारशी म्हणून सरकारजमा होत आहेत. कित्येक अनाचारी साधुसंत याच दानधर्मावर जगून अंधश्रद्धेचें पीक माजवीत आहेत. कित्येक साधु (?) स्वतः अविवाहित राहूनही वंशपरंपरेनें गाद्या चालवीत असून वारसाहक्काबद्दल लाख लाख रुपयांचे दावे लावींत आहे. स्मृतिकारांचे नियम झुगारून देऊन दानधर्म हा केवळ पारलौकिक आहे ही पौराण वाङ्मयांतील समजूत बोकाळल्यामुळेंच हा सर्व अनर्थ ओढवत आहे.

**खरें दान**

यांतून सुटावयाचें तर दान करतांना देश, काल, परिस्थिति व पात्रता यांचा विचार करूनच दान केलें पाहिजे. नाहींतर गीतेनें सांगितल्याप्रमाणें (गी. १७.२२) तें तामस ठरेल! खरें सात्त्विक दान करणें असेल तर तें काय द्यावें, कोणीं द्यावें, किती द्यावें, कोणास व केव्हां द्यावें, तसेंच कसें द्यावें इतक्या प्रश्नांचा विचार करून दिलें गेलें पाहिजे. म्हणून आतां या प्रश्नांचीं उत्तरें पाहूं.

**काय द्यावें?**

पहिल्या प्रश्नाचें उत्तर उघडच आहे असें कित्येकांस वाटेल! संपत्ति द्यावी हें सांगायला मोठें विवेचन कशाला पाहिजे असें कोणी म्हणेल. पण संपत्ति म्हणजे काय हें नीट समजलें पाहिजे. संपत्ति म्हणजे नुसता पैसा

नव्हे. श्रम, पैसा, ज्ञान व मत इतक्या प्रकारची संपत्ति असून त्यांपैकीं प्रत्येकाचें दान योग्यप्रकारें करतां आलें पाहिजे. केवळ पैसेवानासच दानाची आवश्यकता आहे असें नाहीं. ज्याच्याजवळ पैसा नाहीं त्यानें अंगमेहनतरूपी ( श्रमरूपी ) संपत्तीचें दान केलें पाहिजे. आमच्याजवळ पैसा नाहीं, आम्ही गरीब आहों असें म्हणून स्वस्थ बसणें योग्य नाहीं. ' *न देणाऱ्या श्रीमंताला व कष्ट न करणाऱ्या दरिद्र्याला गळ्यांत घट्ट धोंडा बांधून पाण्यांत बुडवावें ' असें शास्त्र सांगतें. त्यांतील रहस्य हेंच होय. तात्पर्य, पैशाप्रमाणेंच मेहनत ही देण्याचीच वस्तु आहे. हीं दोन्ही नसलीं तरी ' ज्ञान ' हीही एक संपत्तिच आहे. निरनिराळे शोध लावून राष्ट्राच्या ज्ञानसंपत्तींत भर घालणें कमी महत्त्वाचें नाहीं. ज्ञानसंपन्न विद्वानांनीं ज्ञानाचें दान करण्यास शिकलें पाहिजे. ' मत ' या विषयाची संपत्तींत गणना अलीकडेच झालेली आहे. म्युनिसिपालटी, कायदेमंडळें वगैरे संस्थांकरितां उमेदवार उभे राहतात तेव्हां या संपत्तीचा उपयोग करावयाचा असतो. पूर्वीं लोकमतावर राज्यशासन अवलंबून नव्हतें म्हणून पूर्वींच्या शास्त्रकारांनीं या संपत्तीचा विचार केलेला नाहीं.

**कोणीं द्यावें ?**

वरील संपत्तीचे प्रकार ज्यांचेपाशीं असतील त्यांनीं ती ती संपत्ति द्यावी हें उघड आहे. पण ती दिलीच पाहिजे असें शास्त्रकारांचें सांगणें आहे. मनुष्य आपल्या जीवनांत हरघडी समाजाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उपयोग करून घेत असतो. त्याची फेड करणें हें त्याचें कर्तव्य आहे. ( कृते च प्रतिकर्तव्यं एष धर्मः सनातनः ) तो तें न करील तर तें योग्य होणार नाहीं. अगदीं संन्यास घेणाऱ्यानेंसुद्धां संन्यास घेण्या-

---

* द्वावम्भसि निवेष्टव्यौ गले बध्वा दृढां शिलाम् ।
धनवन्तमदातारं दरिद्रं चातपस्विनम् ॥

पूर्वी स्वतःवरील ऋणांतून ( जबाबदाऱ्यांतून ) मुक्त होऊनच तो घेतला पाहिजे असा स्मृतिकारांचा कटाक्ष आहे. मागें सांगितल्यापैकीं एखाद्या तरी प्रकारची संपत्ति मनुष्याजवळ असतेच हें लक्षांत घेतलें म्हणजे लक्ष्मीपुत्र, बलपुत्र, सरस्वतीकुमार अशा प्रत्येकास दान सारखेंच आवश्यक आहे हें सिद्ध होतें.

**पात्रापात्रविचार**

आतां कोणास द्यावें व केव्हां द्यावें या प्रश्नांचा एकदमच विचार करूं. या दोन्हींचा विचार दानास पात्र कोण या एकाच प्रश्नांत अन्तर्भूत होतो. म्हणून पात्रापात्रविचाराकडेच आतां वळूं. दिसायला या विचारांत गूढ असें कांहींच दिसत नाहीं. पण जरा लक्ष देऊन पाहिलें म्हणजे त्याची आवश्यकता दिसून येईल !

**गोभक्तीचे विलक्षण प्रकार**

हल्लीं गोशाळा सर्वत्र दिसून येतात. त्यांची आवश्यकताही आहेच. पण या गाईंस केव्हां केव्हां गूळपोळीचा नैवेद्य देण्यांत येतो तेव्हां आश्चर्य वाटतें. कितीही कोंवळें व हिरवेंचार गवत दिसलें तरी मनुष्याच्या तोंडाला पाणी सुटतें काय ? मग गाईवर ही जबरदस्ती करणें म्हणजे मूर्खपणाचें प्रदर्शनच नव्हे काय ? पण एवढें तारतम्यही कित्येक लोक ठेवीत नाहींत. निदान गोशाळेच्या समंजस चालकांनीं तरी या प्रकारांस आळा घातला पाहिजे. पण तेच या प्रकारास उत्तेजन देतात ही दुःखाची गोष्ट आहे. गोशाळेस मिळणाऱ्या पैशाचा व्यय खाटकापासून वाटेल ती किंमत देऊन गाई सोडविण्यांत व्हावा कीं नाहीं हाही एक विचारणीय प्रश्न आहे. किती केलें तरी सर्व जगांतील गोहत्या थांबविणें शक्य नाहीं. दर बुधवारीं मुंबई-पुणें रस्त्यावरून शेंकडों गाई-बैल वांद्र्याकडे रवाना होतात त्यास प्रतिबंध करणें अशक्य आहे. तेव्हां खरें सांगावयाचें तर गोरक्षणाच्या चळवळीचें ध्येय गोवधास प्रतिबंध हें होऊंच शकत नाहीं. चांगल्या जनावरांची

जोपासना करून दूध-तुपाची विपुलता करणें हेंच गोरक्षण–चळवळीचें ध्येय असलें पाहिजे व याच कामीं संपत्तीचा व्यय करणें दान या संज्ञेस धरून होईल.

रविवारीं मुंबईसारख्या शहरांतून कित्येक गोसेवक ‘ गोग्रास ’ मागत हिंडतात. या संचारांत पैसा व तांदूळ जें मिळेल तें ते जमा करितात. पैसा देणें यांत कांहींच गैर नाहीं. पण तांबड्या पटणीपासून जिरेसाळसारख्या उंची तांदुळांपर्यंतची ही मिसळ कोठें जाते याचा देणारानें विचार करावयास नको काय ? गाईचें तांदूळ हें अन्न नव्हे, तसेंच आपापल्या घरीं जेवणारे स्वसंसेवकही तें खात नाहींत. शेवटीं येईल त्या भावानें हे तांदूळ विकून पैसेच करावे लागतात. मग या द्राविडीप्राणायामापेक्षां सरळ पैसाच दिला तर काय वाईट ? पण हा विचार देणारे तर करीत नाहींतच, परंतु गोशाळेचे सुज्ञ चालकही याकडे कानाडोळाच करितात हें रास्त नव्हे. गोरक्षण–चळवळीच्या पुरस्कर्त्यांनीं नीट विचार करून हे प्रकार ताबडतोब बंद केले पाहिजेत. ‘ गाईला घास द्या ’ असें म्हणून गाय घेऊन हिंडणाऱ्यांसही मदत करूं नये. त्यापेक्षां गोशाळेस देणगी द्यावी. गाईला पुढें करून भिक्षा मागणें हा सोंगाड्या धर्म ( व्याजधर्म ) आहे. असला धर्म आचरूं नये ( न व्याजेन चरेद्धर्मम् ) अशी शास्त्राज्ञा असल्यामुळें या अधर्मास कोणीही मदत करूं नये. ‘ माझ्या पोटाला द्या ’ असें म्हणून कोणी भिक्षा मागेल तर त्यास त्याची गरिबी पाहून भिक्षा अवश्य घालावी. पण दुसऱ्याच्या नांवानें भिक्षा मागून स्वतःचें पोट भरणारास मुळींच भीक घालूं नये.

पूर्वीं सहस्रभोजनें घालण्यांत धनिकवर्ग धन्यता मानीत असे. पण आज त्यांनीं आपल्या संपत्तीचा व्यय निराळ्या तऱ्हेनें करण्याची वेळ आलेली आहे. भोजन हें क्षणिक सुख देणारें आहे. त्यापेक्षां अधिक

**धनिकांचें कर्तव्य**

काळ ज्यायोगें सुख मिळेल अशा योजनांस त्यांनीं आतां मदत केली पाहिजे. या दृष्टीनें पाहिल्यास विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या देणें, अनाथालयें, ऋग्णालयें, विधवाश्रम यांस मदत करणें, ज्ञान, बल, उद्योगवर्धक संस्थांस मदत करणें, हेंच योग्य ठरेल ! वैयक्तिक तात्पुरत्या दानापेक्षां सामुदायिक दीर्घकालीन दानासच आतां अधिक महत्त्व दिलें पाहिजे. जीवनकलहाच्या तीव्रतेमुळें सर्वच धनिकांना पात्रापात्रविचार करण्यास पुरेशी सवड मिळणें शक्य नाहीं. अशा स्थितींत अपात्रीं दान होण्याचा संभव फार ! तो टाळण्याकरितां धनिकांनीं सामुदायिक संस्थांस साह्य देऊन पात्रापात्रविचार संस्थेच्या सभासदांवर सोपवावा हें अधिक सोईचें.

**दानाचें व्यापक क्षेत्र**

आज आंधळे-पांगळे व भट-भिक्षुक यांस दिलें जातें तेंच दान अशी समजूत रूढ आहे; पण ती चुकीची आहे. उपनिषदांत कोणाकोणास दान करावें हें सांगतांना **'श्रिया देयम्, ह्रिया देयम्, संविदा देयम्'** असें सांगितलेलें आहे. या वाक्यांत दाखविलेल्या दानप्रकारांस शुक्रनीतींत अनुक्रमें श्रियादत्त, ऱ्हीदत्त आणि संविद्दत्त अशीं नांवें दिलेलीं असून त्यांचीं लक्षणें पुढीलप्रमाणें दाखविलीं आहेत.

**बन्दिमागधमल्लादिनटनार्थं च दीयते ।**
**पारितोष्यं यशोर्थं यत् श्रिया दत्तं तदुच्यते ॥**

**उपायनीकृतं यत्तु सुहृद्सम्बन्धि बन्धुषु ।**
**विवाहादिषु वाचारदत्तं ऱ्हीदत्तमेव तत् ॥**

**देवतार्थंच यज्ञार्थं ब्राह्मणार्थं गवार्थकम् ।**
**यद् दत्तं तत् पारलोक्यं संविद्दत्तं तदुच्यते ॥**

यावरून देवता, यज्ञ, ब्राह्मण, गाई यांकरितां जो दानाचा प्रकार तेवढाच शास्त्रसंमत नसून निरनिराळ्या प्रकारें वायनें किंवा नजराणे देणें ( ऱ्हीदत्त ) तसेंच भाट, पहिलवान, नट यांसारख्या कलावान् लोकांस-

बक्षिशी देणें (श्रिया दत्त) हेंही आवश्यक ठरतें. देवता-यज्ञ-गो-ब्राह्मणार्थ दानास संविद्दत्त असें म्हणतात. यावरून दानाचें क्षेत्र किती व्यापक आहे हें लक्षांत येईल! वरील कार्यें करण्याऱ्या सर्व संस्थांस मदत करणें धनिकांचें कर्तव्य आहे.

**फंडगुंडशाही**

अलीकडे पुष्कळ संस्थांस फंडगुंडगिरीचा रोग जडलेला दिसून येतो. मोठमोठे फंड गिळंकृत केले जातात ही गोष्ट अत्यंत खेदकारक आहे. पण या भीतीमुळें फंड देण्याचें बंद न करतां ज्या मंडळाच्या ताब्यांत निधि द्यावयाचा त्याची निवड करताना अधिक सावधगिरी बाळगावी म्हणजे झालें. भिन्न ठिकाणचे, भिन्न मनोवृत्तीचे लोक असले म्हणजे लबाडी छपून रहात नाहीं. तात्पर्य या अडचणी व्यवस्थापद्धतींत बदल केल्यानें दूर होऊं शकतील. त्यांना भिऊन फंड काढण्याचें किंवा देण्याचेंच बंद करणें इष्ट नाहीं! एखाद्या सार्वजनिक संस्थेच्या कामांत कोणीं पैसे खाणें किंवा मुद्दाम पक्षपात करणें असले निंद्य प्रकार केल्यास त्यावर सामाजिक शासनाचा प्रहार करण्यांत हयगय करूं नये. अशा लोकांवर दया करणें ही दयेची बदनामी होय. (पृ. २५३-५४ पहा).

**स्वयंसेवकांचें कर्तव्य**

ज्याप्रमाणें धनिकांनीं त्याचप्रमाणें शक्तिसंपन्न उत्साही तरुणांनींही स्वतःच्या अंगमेहनतीनें निरनिराळ्या संस्थांस मदत केली पाहिजे. कोणतेंही सार्वजनिक कार्य असो, त्यांत मनोभावानें मदत करण्याचें कार्य तरुणांनीं करणें हें त्यांस भूषणावह आहे. निरनिराळ्या सार्वजनिक प्रसंगीं स्वयंसेवकाचें काम करण्यास सध्यां तरुण पुढें येतात हें या दृष्टीनें अत्यंत स्तुत्य आहे. धनिकाला त्याच्या देणगीबद्दल जितका मान दिला जातो तितकाच किंबहुना त्याहूनही जास्त या श्रमदान करणाऱ्या स्वयंसेवकांस दिला पाहिजे. पण स्वतः स्वयंसेवक व कित्येक वेळां ज्यांच्या उपयोगीं पडावयाचें त्या प्रतिनिधींसही त्यांच्या

खऱ्या योग्यतेची जाणीव नसते. यामुळें कित्येक गर्हणीय प्रकार होतात. साहित्यसंमेलनांतील स्वयंसेवकांस रात्रीं विड्या आणावयास लावणें हें प्रतिनिधींस अत्यंत लाजिरवाणें आहे. तसेंच स्वयंसेवकांनीं एकमेकांवर ढकलाढकल करून प्रतिनिधींची वेळच्या वेळीं जाण्यायेण्याची व्यवस्था न करणें हें स्वयंसेवकाच्या ब्रीदास सोडून आहे. कित्येक वेळां सभेस फुकट जातां यावें म्हणून कित्येक स्वयंसेवक होतात व आयत्या वेळीं कोणी काम सांगेल म्हणून स्वयंसेवकीचें दर्शक चिन्ह लपवून प्रेक्षकांत विलीन होतात. कित्येक भोजनबहाद्दर जेवण्याच्या व खाण्याच्या वेळा तेवढ्या बरोबर साधून इतर वेळीं गुंगारा देतात हें केव्हांही अभिनंदनीय नाहीं एखाद्याला एखादी वस्तु देण्याचें कबूल करून मागाहून ती नाकारल्यास नरक प्राप्त होतो असें शास्त्र सांगतें. सेवकानेंही श्रमदानाची प्रतिज्ञा करूनच तें काम स्वीकारलेलें असतें. तेव्हां आयत्यावेळीं प्रतिज्ञेचा भंग करणें हें पाप आहे. असो. परिषदेंत, जत्रेच्या प्रसंगीं, सार्वजनिक उत्सवांत फार काय एकट्या दुकट्यावर प्रसंग असेल तेव्हांही याप्रमाणें श्रमदान करणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. सध्यां स्वस्तिक-लीग, बॉयस्काउट वगैरेंच्या रूपानें सामाजिक सेवेचें शिक्षण दिलें जातें तें प्रत्येकानें घेणें आवश्यक आहे. कारण त्यायोगें आपल्या शक्तीचा दुसऱ्यास कसा उपयोग करून द्यावा हें कळून येतें.

**ज्ञानदानाचें महत्त्व**

पशु आणि मनुष्य यांमध्यें मनुष्याचें ज्ञान वजा केल्यास कांहींही फरक नाहीं असें एकानें म्हटलें आहे. ज्या ज्ञानामुळें मनुष्यास माणुसकी प्राप्त होते त्या ज्ञानाचें दान किती महत्त्वाचें असेल याचा ज्याचा त्यानेंच विचार करावा. एखाद्याला पैसा उचलून देण्यापेक्षां ज्ञान देणें ( एखादी कला शिकविणें ) हें या दृष्टीनें महत्त्वाचें दिसतें. भगवद्गीतेंतही ( ४.३३ ) ' द्रव्यमय यज्ञापेक्षां ज्ञानमय यज्ञ श्रेष्ठ

होय ' असें याचकरितां म्हटलें नसेल ना ? या ज्ञानदानाचें महत्त्व प्राचीन शास्त्रांत फारच विस्तारानें सांगितलेलें आहे. मनूनें तर ज्ञान— मग तें लौकिक, वैदिक, आध्यात्मिक कोणतेंही असो—देणारास प्रथम नमस्कार करावा असें सांगितलें आहे (२.११७). शिष्यानें नम्रतेनें अध्ययन करावें हें जसें त्याचें कर्म त्याचप्रमाणें विशिष्ट वय होतांच अज्ञ बालकाचें उपनयन करणें हें ज्ञात्याचें कर्तव्य होय असें शास्त्र सांगतें. त्यावरून हल्लीं सक्तीचें शिक्षण देण्यांतील तत्त्व स्मृतिकारांस मान्य होतें असें दिसतें.

या बाबतींत समर्थांचा पुढील उपदेश महत्त्वाचा आहे. समर्थ म्हणतात—

**समर्थांचा आदेश**

**जें जें आपणासि ठावें।**
**तें तें हळुहळु शिकवावें॥**
**शाहणें करूनि सोडावें**
**सकळजनां॥**

नेहमीं व्यवहारांत वागतांना लोकांस शहाणें करण्याची खटपट चालू ठेवावी असा या उपदेशाचा मथितार्थ आहे. शेजारीं, रजेंत, खेडेगांवांत गेल्यावर आपले ग्रामबंधु वगैरे सर्वांस यथाशक्ति ज्ञानामृत पाजणें हें ज्ञात्याचें कर्तव्य होय.

**मासिकें व वृत्तपत्रें**

तोंडी किंवा ग्रंथरूपाचें ज्ञान देण्याची पद्धत पूर्वीं होतीच. पण आतां मासिकें व वृत्तपत्रेंही तेंच काम करूं लागलीं आहेत. पूर्वींच्यापेक्षां यांचें ज्ञानदानाचें क्षेत्रही फार मोठें आहे. तीन चार हजार ग्राहकांशिवाय कोणतेंही नियतकालिक चालू शकत नाहीं, हें लक्षांत घेतलें तर नियतकालिकांच्या संपादकाचें सामर्थ्य किती मोठें आहे हें सहज कळून येईल ! या सामर्थ्याचा बरावाईट उपयोग करणें संपा-

दकाच्या इच्छेवर असल्यामुळें संपादकानें आपली जबाबदारी योग्य प्रकारें ओळखून वागलें पाहिजे. परन्तु ज्ञानदानाची भूमिका बाजूस राहून जेव्हां अर्थप्राधान्य संपादकांत उत्पन्न होतें, तेव्हां त्याच्या ज्ञानदानांत दोष उत्पन्न होतात. प्रथम प्रथम खर्च भागत नाहीं या सबबीवर संपादक वर्ग जाहिरातींच्या मागें लागतो. पण अधिक प्रसाराशिवाय जाहिराती मिळत नाहींत म्हणून लोकांना काय आवडतें याचा विचार सुरू होतो. शेवटीं याचा परिणाम ध्येय बाजूस राहून 'लोकांस जें आवडतें तें आम्ही देतों. ज्यांना आमचें धोरण (?) पसंत नसेल त्यांनीं लोकमत बदलण्याचा प्रयत्न करावा! उगाच आम्हांला उपदेश करूं नये' असें आत्मसमर्थन देण्यांत होतो. समाजाला पवित्र ज्ञानदान देणाऱ्या कुंपणांनींच याप्रमाणें सदभिरुचीचा चारा खाऊन टाकून वृक्ष छायारहित करण्याचा सपाटा लाविल्यावर इतर लोक काय करणार? असो. संपादकांनीं अशा तऱ्हेचें लोकाराधनध्येय न ठेवतां सात्त्विक मनोरञ्जन व ज्ञानदान हींच ध्येयें ठेविलीं पाहिजेत. अन्यथा त्यांस ज्ञानदानाचें श्रेय लाभणें शक्य नाहीं.

**संपादक व लेखक**

संपादकांप्रमाणेंच लेखकवर्गही ज्ञानदाताच असतो. अर्थात् त्याच्याशीं संपादकाचें वर्तन सहव्यवसायाच्या नात्याचें असलें पाहिजे. लेख पसंत करण्यास १०–१५ दिवसांहून अधिक दिवस लावणें, लेखाची पसंती–नापसंती न कळविणें, तिकिटें पाठविलेलीं असूनही लेख परत पाठविण्यांत हलगर्जीपणा करणें, लेख छापल्यावर लेखकांस अंकही न पाठविणें अशीं कृत्यें संपादकानें करणें योग्य नव्हे.

**लेखनस्वातंत्र्याच्या मर्यादा**

लेखनस्वातंत्र्यावर राजकीय दृष्टीनें जो आज घाला घातला जातो तो सर्वस्वीं निंद्य आहे यांत शंकाच नाहीं. पण याचा अर्थ लेखकांनीं सर्वदा अनिर्बंध असावें असा नाहीं. ज्ञानप्रसाराच्या नांवाखालीं कित्येक लैंगिक

भावनांस विकृत वळण लागेल असें लेखन करतात तर कित्येक सत्यसंशोधनाच्या नांवाखालीं हिंदुमातास पूज्य ठरलेल्या व्यक्तीं-वर टीकास्त्र सोडतात. पण हें तत्त्वास सोडून आहे. गेल्या प्रकर-णांत आत्यन्तिक अहिंसा ही धर्मशास्त्रास सोडून आहे हें दाखविलेंच आहे. तसेंच सत्याचेंही आहे. 'नागडें सत्य' म्हणून ज्याचा आज वेळीं अवेळीं पुरस्कार केला जातो त्यास विरोध करणारा व्यासभाष्यां-तील उतारा मागें ( पृ. २७१ ) दिलेलाच आहे. 'ज्ञानासारखें दुसरें कांहीं पवित्र नाहीं' असें सांगणारेच शास्त्रकार याप्रमाणें उपदेश-स्वातंत्र्यास बंधनें घालीत आहेत. अर्थात् समाजघातास कारणीभूत होणारें आजचें लेखन त्यांच्या सत्याच्या कक्षेंत येणें शक्य नाहीं. लेखकांना केवळ सत्यप्रकाशनच करावयाचें असेल तर विद्वान्-वर्गा-पुढें जाईल अशा प्रकारच्या ग्रंथांत तें अवश्य करावें. पण सामान्य अपरिपक्व समुदायास तें बुद्ध्या पाजून त्यांची हिंसा करूं नये. इतक्या-ही उपर एखाद्या लेखकाची सत्यभक्ति पराकाष्ठेस पोचलेली असेल तर त्यानें प्रथम नव्या भावना व नवीं मूल्यें उत्पन्न करण्याचा प्रयत्न करावा; मग खुशाल प्राचीन सर्व तत्त्वशून्य तसेंच असत्य समजुतींचा विध्वंस करावा. पण हें विधायक कार्य मुळींच लक्षांत न घेतां कित्येक लेखक केवळ जुनीं मूल्यें नष्ट करण्याचाच तेवढा प्रयत्न करीत आहेत हें सर्वथा अधर्म्य आहे. ( पृ. १७ नियम ३ पाहा ! ) ज्ञानदानाचें पुण्य या प्रकारानें लाभणें शक्य नाहीं.

**पुस्तकपरीक्षणें**

ज्ञानप्रसारांत ग्रंथपरीक्षणांचेंही फार महत्त्व आहे. या दृष्टीनें ग्रंथ हातीं येतांच संपादकवर्गानें विशेष आस्थेनें त्याबद्दलचें योग्य मत वाचकांपुढें ठेवलें जाईल अशा विषयींचा योग्य तो प्रयत्न सुरू केला पाहिजे. पण कित्येक संपादक तसें करीत नाहींत. कांहींच्या ऑफिसांत इतका गोंधळ असतो कीं परीक्षणार्थ येणाऱ्या पुस्तकांची नोंदच ठेविली

या हातांत पुस्तक पडलें त्यानें तें लांबवावें अशी
क ठिकाणीं दिसून येते. कित्येकांस पुस्तक पोचलें
ा ठाऊक नसतें. ' आमच्याकडे या विषयावर परी-
ाणी नाहीं, तथापि लवकरच एखाद्या तज्ज्ञाची गांठ
होईल असें करतों. ' असें प्राञ्जल उत्तर देणारा
भेटतो. पण बाकीचे बहुधा सर्वज्ञच असतात ! असो.
ाक यांचीं कर्तव्यें पाहून झाल्यावर वाचकांचें कर्तव्य
पाहणें ओघानेंच येतें. म्हणून त्याबद्दलही थोडें
्य विवेचन करणें आवश्यक आहे. ज्ञानदानाचें
महत्त्व वर दिलेंच आहे. लेखक व संपादक हें
कार्य करीत असतां वाचकांनीं त्यांस मदत करणें
अशी मदत केल्यानें त्यांच्या ज्ञानदानाचें पुण्य अंशतः
केंवा हेंच आधुनिक भाषेंत सांगावयाचें तर राष्ट्रीय
य खरेदी करून हातभार लावणें हें प्रत्येक नाग-
हे असें सांगतां येईल. भाषा कोणतीही असो,
भार लावणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे एवढें खरें.
उत्पन्न लक्षांत घेऊन प्रत्येकानें त्याचा कांहीं अंश
ला पाहिजे. ज्यांना विकत घेण्याची ऐपत नसेल
चनालयें व ग्रंथालयांचे वर्गणीदार होऊन तरी ज्ञान-
ी पाहिजे. असें केल्यानें सामाजिक दृष्ट्या हित
ाचनाचे वैयक्तिक फायदे ' दिनक्रम ' या प्रकरणांत
याप्रमाणें ज्ञानदानाचें* आधुनिक स्वरूप आहे.
द्धतीच निराळी होती यामुळें मतदानाचे नियम पूर्वी-

---

ा ' व ' ज्ञानाकरितां दान ' अशा द्विविध अर्थानें हा शब्द

**मतदान** च्या शास्त्रांत दिलेले नाहींत. या बाबतींत आधुनिक नियमच पाळले पाहिजेत. म्हणजे पैशाच्या किंवा दुसऱ्या कसल्याही लोभाला बळी न पडतां ज्या कार्याकरितां उमेदवार निवडून द्यावयाचा त्याविषयीं उत्सुकता व पात्रता कोणांत अधिक आहे याचा तारतम्यानें विचार करून मगच मत द्यावें. आळसानें मत देण्याचें टाळूं नये किंवा उगाच कोणाच्या भुलथापांवर विश्वास ठेवूं नये. तसेंच 'तुला मी मत देईनच' असें प्रतिज्ञेवर सांगूं नये. ज्याला आपण मत देण्याचें एकदां कबूल केलें असेल त्यावरील विश्वास प्रत्यक्ष मत देण्याच्या वेळेपर्यंत कायम न राहिला तर केवळ दिलेल्या अभिवचनाच्या भंगाकडे लक्ष लागून मनःप्रवृत्तीच्या विरुद्ध कृत्य करण्याचा प्रसङ्ग येतो. म्हणून अगोदर कोणास वचन देऊं नये हा उत्तम मार्ग. गरीब व श्रीमंत उमेदवारांची लढाई चालू असली म्हणजे कित्येक वेळां श्रीमंताच्या मोटारींतून गेलेले लोक गरिबास मत देतात. या प्रकारांत कांहीं एक गर्ह्य नाहीं. तेव्हां प्रत्यक्ष मत देतांना आपण कोणाच्या मोटारींतून आलों किंवा कोणाला वचन दिलें याचा मतदारानें विचारच करूं नये, हा उत्तम मार्ग ! याप्रमाणें या प्रकरणाच्या आरंभीं उपस्थित केलेल्या बहुतेक सर्व प्रश्नांचीं उत्तरें पाहून झालीं.

आतां दान कसें करावें या शेवटच्या प्रश्नाचा विचार करूं. दुसऱ्याला जी मदत करावयाची ती त्याची जरूर **दान कसें करावें ?** लक्षांत येतांच आपण होऊन करणें हा उत्तम मार्ग ! '* कृत युगांत दाता स्वतः जाऊन दान करीत असे' असें स्मृतिकार सांगतात. या दृष्टीनें एखाद्या संस्थेची योजना प्रसिद्ध होतांच आपण होऊन दान देणें हा श्रेष्ठ मार्ग होय. तथापि प्रत्येकास सर्व समाजाच्या गरजा अवगत असणें शक्य नाहीं. म्हणून एखाद्यानें

---

* अभिगम्य कृते दानम् । पराशर १.२७
अभिगम्योत्तमं दानम् । पराशर १.२८

प्रत्यक्ष येऊन मागणी करतांच योग्य ती चौकशी करून खात्री होतांच आदरपूर्वक देणगी देणें हाही मार्ग आज उत्तमच समजला पाहिजे. परन्तु प्रचारकाशीं तास दोनतास हुजत घालून शेवटीं ‘ मला हें पटत नाहीं ’ असें म्हणत नकार देणें हें मात्र बरोबर नव्हे. तसेंच प्रचारकाच्या अंगावर खेकसून ‘ तुम्हा लोकांना उद्योग नाहींत काय ? उगाच आमचें डोकें उठवितां कां ? ’ अशीं दुरुत्तरें करणेंही अयोग्य होय. वेळ किंवा पैशाची सवड नसल्यास ‘ हें पहा ! आतां मी जरा गडबडींत आहें. आपण फिरून केव्हां तरी या ! ’ असें किंवा ‘ तूर्त माझी आर्थिक स्थिति बरोबर नाहीं पण तुमच्या संस्थेची हकीकत मात्र मला ऐकण्याची इच्छा आहे ’ असें उत्तर दिल्यानें काय बिघडतें ? पण एवढेंही तारतम्य कित्येकांस रहात नाहीं. तात्पर्य, दान देणें किंवा नाकारणें या दोन्ही गोष्टी अत्यंत शान्तपणानें केल्या पाहिजेत. ‘ दान दिल्यानन्तर त्याचें स्मरण केलें तर देणारा नरकास जातो* ’ असें एक शास्त्रवचन आहे. त्याचा तात्पर्यार्थ लक्षांत घेतला पाहिजे. ‘ मीं अमक्याला अमुक दिलें ’ असा डंका करू नये, एवढेंच त्या वचनाचें तात्पर्य होय. आपण ज्याला दान दिलें त्यानें त्याचा काय उपयोग केला हेंही पाहूं नये असा त्याचा अर्थ नाहीं.

**प्रचारकांचें कर्तव्य**

दान घेणाऱ्या प्रचारकांनींही सौजन्य सोडून वागूं नये. पैसे मिळविण्यापेक्षां आपल्या कार्याची माहिती देणें हेंच त्यांनीं आपलें कर्तव्य समजावें. कोणी आक्षेप घेतल्यास चिडून न जातां शांत डोक्यानें विचार करून उत्तर द्यावें. उत्तर न सुचल्यास संस्थेच्या चालकांस विचारून सांगतों असें उत्तर द्यावें. जी गोष्ट पैशाच्या दानाची तीच थोड्याफार अंशानें

* दत्वा योऽनुस्मरेद्दानं प्रतिगृह्य च याचते ।
तावुभौ नरकं यातः प्रतिग्राहकयाचकौ ॥

मराठी ग्रंथ ...

इतर दानांसही लागू आहे. त्यांचा विचार तारतम्यानें वाचकांस सहज करितां येईल म्हणून येथें त्याचा विस्तार करीत नाहीं.

दानधर्माचें या प्रकरणांत विवेचन झालें. व याच प्रकरणांत चवदाव्या प्रकरणापासून सुरू केलेल्या व्यापक धर्माचें विवेचनही संपूर्ण झालें. ( पृ. २०४ पहा ) आतां या सर्व धर्मांच्या अपवादांबद्दल थोडासा विचार करूं.



# प्रकरण विसावें

## अपवादसमीक्षा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

येथपर्यंत वैयक्तिक, सामुदायिक व व्यापक आचारांत कोणकोणते बदल पाहिजेत याबद्दलचे नियम पाहून झाले. आतां या नियमांच्या अपवादांबद्दल विचार करूं. नियमांबरोबरच अपवादांचेंही ज्ञान आवश्यक आहे. अपवाद न जाणतां कोणताही नियम पाळणें बरोबर नाहीं. 'कर्मठ' हें निंदाव्यंजक विशेषण अशा अविचारी लोकांसच लावतात. हलक्यासलक्या निमित्तानें सुरू केलेला नियम मोडणें हें जसें निंद्य, त्याचप्रमाणें महत्त्वाच्या अडचणी आलेल्या असतांही त्यांकडे दुर्लक्ष करून आपल्या नियमांचें घोडें पुढें दामटणें हेंही गर्ह्य होय.

**अपवादविचाराची आवश्यकता**

इहलोकीं त्याचप्रमाणें मरणानंतर अशा दोन्ही ठिकाणीं सुख व शांति लाभावी या हेतूनें आपला आचारधर्म ठरविलेला आहे. इतर धर्मांप्रमाणें हा धर्म केवळ परलोकप्रधान किंवा अदृष्टप्रधान नाहीं. अर्थात् व्यवहारांतील योग्य व विचारणीय अडचणींकडे दुर्लक्ष करून आचरलेला धर्म फलद्रूप होणें शक्य नाहीं (पृ. २२-२३ पहा!) हें प्रत्येक धर्मानुयायानें पक्कें ध्यानांत धरलें पाहिजे. म्हणून कोणताही नियम आचरतांना नीट अपवाद जाणूनच आचरला पाहिजे असा शास्त्रकारांचा* अभिप्राय आहे. परिस्थितीचा कोणत्याही प्रकारें विचार न करितां एखादा नियम सतत पाळणें हा शुद्ध वेडेपणा होय. (गीता. १८.२५)

**धर्म आणि परिस्थिति**

---

* अन्यो धर्मः समर्थानामापत्स्वन्यश्च भारत ॥ शांतिपर्व १३०-१४

**खरे अपवाद कोणते ?**

कित्येकांस हें विवेचन पाहून 'तर मग ज्यानें त्यानें आपल्या मर्जीप्रमाणें धर्म ठरवावा' असा ग्रंथकर्त्याचा अभिप्राय आहे असा भास होईल. कित्येकांस 'बरी सोय निघाली' असेंही वाटण्याचा संभव आहे. पण हें बरोबर नाहीं. ठरलेला नियम केव्हां मोडावा याचें शास्त्र आहे. तें पाहिलें म्हणजे या शंका निवृत्त होतील. शास्त्रकारांनीं अशक्ताकरितां किंवा असमर्थाकरितांच अपवाद सांगितलेले आहेत. ही असमर्थता अनेक कारणांनीं येऊं शकते.

१ आळसामुळें
२ अनवधानामुळें
३ मानसिक अस्वस्थतेमुळें
४ प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें
५ इतर कार्यांच्या व्यवधानामुळें
६ सांपत्तिक प्रतिकूलतेमुळें
७ वृत्तिच्छेदाच्या भयामुळें
८ प्राणान्तिक प्रसंगामुळें
९ इतरांच्या जबरदस्तीमुळें
१० सामुदायिक आपत्तीमुळ

हीं दहा त्यांतील प्रमुख कारणें होत. या सर्वांस शास्त्रकार सारखेंच समजत नाहींत.

**योग्य व अयोग्य कारणें**

वरील कारणांपैकीं पहिलीं दोन कारणें शास्त्रकारांनीं मुळींच योग्य ठरविलेलीं नाहींत. आळस व दुर्लक्ष हे फारच मोठे शत्रु होत. त्यांच्या ताब्यांत न जाण्याकरितांच आचारधर्म पाळणें हा उपाय आहे. म्हणून असल्या सबबीवर नियम चुकवणें क्षम्य नाहीं. तिसऱ्या कारणासंबंधानें दोन भेद आहेत. कोणाच्या मृत्यूमुळें मन अस्वस्थ झालें असेल तर कांहीं दिवस ( आशौच असेतोपर्यंत ) नियमत्याग दोषावह नाहीं. परन्तु इतर बाह्य कारणांनीं मन अस्वस्थ झालेलें असेल तर—संध्याजप हे त्यावरीलच उपाय असल्यामुळें—नित्य नियमांचा लोप क्षम्य होणार नाहीं.

प्रकृतीच्या अस्वस्थतेबद्दलही असाच तारतम्यानें विचार केला पाहिजे. ज्वर असेल तर स्नानाचा लोप केलाच पाहिजे. पण कपाळ किंवा पोटच दुखत असेल तर तें–वैद्यानें संमति दिलेली नसल्यास–टाळणें योग्य नाहीं. तात्पर्य प्रकृतीस अपाय न पोचेल अशा बेतानें जेवढे नियम पाळतां येतील तेवढे पाळलेच पाहिजेत. सहा व सात या अंकांपुढें दिलेल्या कारणांच्या बाबतींतही असेंच तारतम्य बाळगलें पाहिजे. त्या त्या प्रतिकुलतेमुळें जेवढा भाग करणें शक्य नसेल तेवढाच गाळून बाकीचा भाग तत्परतेनें पाळावा. सातव्या बाबतींतही हेंच तत्त्व ध्यानांत ठेवावें. नोकरीधंदा टिकविण्याकरितां एकादा नियम सोडावा लागला म्हणून बाकीचे सोडूं नयेत. उ० दूधविक्यास सकाळीं भूपाळ्या न म्हणतां आल्या तरी त्यानें दूध विकून आल्यावर स्नानसंध्या किंवा ग्रंथवाचन करूं नये असें नाहीं.

प्राणान्तिक प्रसंग असतां व जबरदस्तीमुळें एखाद्या नियमाचा भंग झाला तर त्याबद्दल मुळींच प्रायश्चित्तही घेण्याचें कारण नाहीं. या दृष्टीनें कोणीं जबरदस्तीनें तोंडांत आपण त्याज्य ठरविलेले पदार्थ कोंबले तर त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याचें कारणच नाहीं.

**बलाद्दत्तं बलाद्भुक्तं बलाद्यच्चापि लेखितम् ।**
**सर्वान् बलकृतानर्थानकृतान् मनुरब्रवीत् ॥**

मनु. ८. १६८

या श्लोकांत जबरदस्तीमुळें झालेलें दान, भक्षण व लेखन हें सर्व न झालेलेंच समजावें असें मनूनें सांगितलें आहे तें याचकरितां. आतां एखादा अपवित्र पदार्थच तोंडांत टाकला गेला तर शरीरशुद्धि योग्य त्या वैद्यशास्त्रोक्त उपायांनीं केलीच पाहिजे. पण तें प्रायश्चित्त नव्हे. सर्व समाजावर परचक्र आलें असेल किंवा गांवांत रोगाची साथ वगैरे आलेली असेल तर अर्थातच आपत्तिनिवारणाचा प्रयत्न प्रथम

केला पाहिजे. त्या योगानें कांहीं नियमांचा लोप होत असला तरी त्याबद्दल खंत बाळगण्याचें कारण नाहीं.

कित्येक वेळां नित्यक्रमाच्या वेळीं दुसरें एखादें काम येतें. तेव्हां तें काम कोणत्या प्रकारचें आहे याचा विचार करावा. त्यांत परोपकार, सेवा, ज्ञानार्जन असल्या प्रकारच्या उच्च तत्त्वांचा समावेश असेल तर त्यामुळें नित्य नियम लुप्त झाल्यास हरकत नाहीं. तेव्हां अशा विशेष स्वरूपाचीं कामें आल्यामुळें एखादा नियम पाळतां न आला तर त्यांत कांहींच वाईट नाहीं. येथपर्यंतचें हें दहा कारणांतील तारतम्य लक्षांत घेतलें तर वाटेल ती सबब दाखवून नियमभंगाचें समर्थन करणें कसें सुलभ नाहीं हें समजून येऊन या अपवादसमीक्षेचे खरें धोरण ध्यानांत येईल !

**कांहीं अपवाद-भूत व्यक्ति**

योगी, संन्यासी, तपस्वी अशा आध्यात्मिक कार्यक्रमांस वाहिलेल्या व्यक्ति तसेंच निरनिराळ्या संशोधनांत गर्क असलेल्या व्यक्ति यांस कांहीं दैनिक व कांहीं सामुदायिक आचार माफ असतात. पण अशा व्यक्ति समाजांत थोड्या असल्यामुळें त्यांचें विवेचन येथें देण्याचें कारण नाहीं. तथापि अहिंसा, अव्यभिचार, सत्य, स्वच्छता वगैरे सामान्य नियम त्यांसही लागू आहेतच! हें मुद्दाम सांगण्याचें कारण एवढेंच कीं, कित्येक संशोधन किंवा समाजनिरीक्षण यांचें निमित्त पुढें करून तसेंच कित्येक आपण मुक्त आहों असें भासवून अनीतीचें आचरण व उपदेश करतात, त्यास धर्मशास्त्राचा आधार नाहीं हें जनतेच्या लक्षांत यावें.

**कांहीं उदाहरणें**

येथपर्यंतच्या विवेचनावरून अपवादाचें तात्त्विक स्वरूप लक्षांत येईलच; तथापि त्यास परंपरेचा आधार कसा आहे हें स्पष्ट लक्षांत यावें व विशेष आचारांच्या बाबतींत

अपवादाचें तत्त्व कसें लावावें हें विशेष रूपानें कळावें म्हणून आतां दोन तीन उदाहरणें पाहूं.

**शुद्धतेचे अपवाद**

प्रातःकालीन शरीरशुद्धीच्या बाबतींत अपवाद फार निघतील असें वाटत नाहीं. आजारांत किंवा विशेषतः लांबच्या प्रवासांत जेथें लांबलचक कार्यक्रम शक्य नसेल तेथें ते विधि थोडक्यांत आवरावे. शास्त्रकारांनींहि हेंच सांगितलें आहे.

**दिवोदितस्य शौचस्य रात्रावर्धं विधीयते ।**
**तदर्धमातुरस्याहुस्त्वरायामर्धमध्वनि ॥** दक्ष. ५.१२

या श्लोकांत रात्रीं, आजारीपणांत, घाई असेल तेव्हां व प्रवासांत शुद्धतेचें काम थोडक्यांत आटपावें असें दक्षानें सांगितलें आहे. यापुढें अशा वेळीं जास्त वेळ शुद्धतेंत घालविल्यास तसेंच अशी आपत्ति नसतां शुद्धीकडे कमी लक्ष दिल्यास दोषही *( दक्ष. ५. १३ ) सांगितलेला आहेच! तेव्हां त्या सोईकडे अवश्य दृष्टि दिलीच पाहिजे. परंतु कित्येक कर्मठ प्रवासांतही या सवलतींचा फायदा घेणें वाईट समजतात; तर कित्येक रोजच कांहीं कारण नसतां सकाळीं ९–९॥ ला जागे होऊन 'त्वरायाम्' या सबबीवर अपवादासच नियम बनवूं पहातात. हें दोन्ही अतिक्रम खऱ्या धर्मशास्त्राच्या अज्ञानामुळेंच योग्य भासतात. याप्रमाणें शुद्धीच्या बाबतींत अपवादाचें शास्त्र कसें पाळावें याचें उदाहरण पाहिलें. आतां संध्येकडे वळूं.

संध्येबद्दलही जुन्या शास्त्रकारांनींच अपवाद घालून दिलेले आहेत.

---

* या अभिप्रायाचा मूळ दक्षाचा श्लोक धर्मस्वरूपनिर्णयाच्या पृ. २३० वर आहे. तेथेंच या श्लोकावर अलीकडील निबंधकारांनी व्यर्थ पांडित्य कसें खर्च केलें तेंही दाखविलेलेंच आहे. तें वाचकांनीं अवश्य पहावें. म्हणजे समन्वय-पद्धतीच्या चष्यांतून मूळ सरळ वचन कसें विपर्यस्त दिसतें याचा प्रत्यय येईल!

**संध्येचे अपवाद**

' राष्ट्रक्षोभ, नृपक्षोभ, रोगपीडा, भयप्राप्ति, देव, अग्नि, द्विज आणि राजा यांचें काम करीत असतां संध्या अंतरल्यास दोष नाहीं '* असें शास्त्रकारांनीं सांगितलेलें आहे. कारण आपत्तिनिवारण व महतांची सेवा हीं पुण्यकारक असल्याचें शास्त्रकारांस मान्य आहे. अशा स्थितींत सध्यां कित्येक धर्माभिमानी म्हणविणारे संध्येची वेळ होतांच सभेचें अध्यक्षत्व सोडून चालते होतात त्यांस काय म्हणावें हेंच समजत नाहीं. या बाबतींत असें स्पष्ट म्हणावेंसें वाटतें कीं, हा प्रकार मुसलमानांचें अंधानुकरण व स्वधर्माच्या तत्त्वाचें अज्ञान यांतून उद्भवलेला आहे. मुसलमानी धर्म परलोकप्रधान आहे. त्यास कोणत्याही ऐहिक कार्यापेक्षां नमाजाची वेळ साधणेंच अधिक महत्त्वाचें वाटणें स्वाभाविक आहे. पण आमचा धर्म तसा एकांगी नाहीं. देशकार्य व संध्या हीं दोन्ही आमच्या धर्माप्रमाणें पुण्यकर्मेंच आहेत. अर्थात् सभेच्या अध्यक्षांनीं किंवा सभासदांनीं संध्येच्या वेळीं सभागृह सोडून जाणें म्हणजे आमच्या धर्मास कमीपणाच आणणें होय.

**सायंसभा व सायंसंध्या**

प्रातःसंध्या व सभा यांचा विरोध येतच नाहीं. संध्याकाळीं मात्र तो प्रसंग येतो. कारण सभांची वेळ सायंकाळीं ६–६॥ ची असते व तीच संध्येचीहि वेळ असते. क्वचित् लागोपाठही १०।१२ दिवस अशा सभा भरत असतात. तेव्हां लागोपाठ इतके दिवस संध्या बुडवावी काय असा येथें प्रश्न येतो; त्याचा आतां विचार करूं.

---

* राष्ट्रक्षोभे नृपक्षोभे रोगार्तौ भय आगते ।
देवाग्निद्विजभूपानां कार्ये महति संस्थिते ।
सन्ध्याहानौ न दोषोऽस्ति यतस्तत्पुण्यसाधनम् ।
(जमदग्निः)

वर जो आम्हीं अध्यक्षांच्या सभात्यागावर कटाक्ष ठेविला आहे त्याचा अर्थ त्यांनीं संध्या करूंच नये असा नाहीं. त्या दिवशीं ती सभेपूर्वीं किंवा नंतर करावी एवढाच आमच्या म्हणण्याचा अर्थ आहे. त्यांतहि शक्य असेल तर अगोदर संध्या करून मगच सभेस जाणें चांगलें. कारण ‘ सूर्य असतांना केलेली सायंसंध्या उत्तम होय.’* असें खुद्द स्मृतिकारांनींच सांगितलेलें आहे. तेव्हां सहा साडेसहालाच सभा सुरू असेल तेव्हां संध्या करून जाणें बरें. परंतु जेव्हां एखाद्या परिषदेचें काम सुरू असेल व तीन चार वाजल्यापासून तों तहत रात्रीं दहाबारा वाजेपर्यंत सभाच चालू असेल तेव्हां संध्या करण्याचें कारणच नाहीं. मात्र असा प्रसंग क्वचितच येत असतो हें लक्षांत घ्यावें. म्हणजे धर्मशास्त्रांतील सवलतींचा अवास्तव फायदा घेण्याची प्रवृत्ति होणार नाहीं.

**जपयज्ञाचें महत्त्व**

संध्येसारखे जे कित्येक वैयक्तिक आचार आम्हीं या ग्रंथांत अवश्यक म्हणून सांगितले आहेत ते एकंदर धर्मशास्त्रांतील नित्यकर्मांच्या मानानें अगदींच अल्प आहेत. अर्थात् याहूनहि कमी करणें शक्य नाहीं. तथापि ठराविक संध्येंत ज्यांस गोडी वाटणार नाहीं त्यांनीं त्या जागीं आवडीप्रमाणें गीता—उपनिषदें, तुकारामरामदासाचे अभंगही म्हणावयास हरकत नाहीं. अशा तऱ्हेचा वैयक्तिक आचारांतील फरक आम्हांस मान्य आहे. पण मन सुसंस्कृत करणारा या प्रकारचा दुसरा कोणताही आचार न स्वीकारतां केवळ पटत नाहीं या सबबीवर कोणी संध्येचा त्याग करून स्वस्थ बसेल तर तें मात्र मान्य होणार नाहीं.

या बाबतींत जपयज्ञाचें महत्त्व फारच मोठें आहे. पंचमहायज्ञ,

* उत्तमा सूर्यसहिता मध्यमा लुप्तभास्करा ।
अधमा तारकोपेता सायंसंध्या त्रिधा मता ॥

संध्या वगैरे जे कित्येक रोजचे म्हणून आचार सांगितले आहेत ते परिस्थितीच्या बिकटतेमुळें होत नसले तरी जर एखादा जपयज्ञाचें तंत्र सांभाळील तर त्यास तीं कर्मे न केल्याचा दोष लागत नाहीं असें

> **जप्येनैव तु संसिद्धयेद् ब्राह्मणो नात्र संशयः ।**
> **कुर्यादन्यन्न वा कुर्यान्मैत्रो ब्राह्मण उच्यते ॥**
>
> विष्णु. ५५.२१

यांसारख्या कित्येक वचनांत सांगितलें आहे. गायत्रीमंत्र या दृष्टीनें सर्वोत्कृष्टच आहे. पण तोच मंत्र सर्वांस आवडेल असें नाहीं. कोणताही मंत्र पसंत करावा. त्याचा जप अर्थ लक्षांत घेऊन व हळूहळू किंवा मनांतल्या मनांत शांत चित्तानें करावा. 'उपांशुस्याच्छतगुणः साहस्रो मानसः स्मृतः' या वचनांत उपांशु जप केल्यास शंभरपट तर मानस ( मनांतल्या मनांत ) जप केल्यास हजारपट फळ मिळतें असें सांगितलेलें आहे तें याचकरितां. जपाचें हें महत्त्व ( यज्ञानां जपयज्ञोऽस्मि ) लक्षांत घेऊन रोजच्या कार्यक्रमांत त्याचा समावेश करावा अशी सर्व धर्मबांधवास नम्र विनंति आहे. बाकीच्या कौटुंबिक, सामाजिक तसेंच नैतिक आचारांच्या अपवादांबद्दल त्या त्या ठिकाणीं कल्पना दिलेलीच आहे. या अपवादमीमांसेचा नीट विचार बाळगणें आवश्यक आहे.

येथपर्यंत आज आवश्यक असलेल्या आचारांचें अपवादांसहित सोपपत्तिक विवेचन पाहून झालें. आतां आज सर्वत्र गाजलेल्या हिंदूंच्या व्याख्येच्या प्रश्नाचा विचार करून मग या सुधारणा अमलांत कशा आणाव्या याबद्दलची योजना विचारांत घेऊं.

## प्रकरण एकविसावें

# हिंदुधर्माचें लक्षण व भवितव्य

येथपर्यंत आज हिंदूंत प्रचलित असलेल्या आचारांचें संक्षेपानें निरीक्षण केलें. आतां या सुधारणा रूढ होण्याकरितां काय करावें याबद्दल विचार करावयाचा ! परंतु तत्पूर्वी आज उपस्थित झालेल्या दोन नव्या प्रश्नांचें उत्तर देणें आवश्यक झालें आहे. हिंदु कोणास म्हणावें व हिंदुधर्माचें लक्षण कोणतें हेच ते प्रश्न होत. म्हणून आतां या प्रश्नांचा विचार करूं.

हिंदु किंवा हिंदुधर्म यांचीं लक्षणें ठरविण्याचा आजपर्यंत अनेकांनीं प्रयत्न केला. परंतु अद्याप एकही निर्दोष लक्षण सांपडलेलें नाहीं हें कबूल केलें पाहिजे. त्यांतल्या त्यांत 'हिंदुस्थानांत उत्पन्न झालेल्या कोणत्याही धर्माचें पालन करणारा तो हिंदु' ही हिंदु महासभेनें मान्य केलेली हिंदूंची व्याख्या बरीच निर्दोष आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. बरीच म्हणण्याचें कारण 'मी स्वतः हिंदु नाहीं' किंवा 'मला हिंदुत्वाचा अभिमान नाहीं' असें प्रतिपादण्यांत भूषण मानणाऱ्यावर या व्याख्येचा अम्मल होऊं शकणार नाहीं हेंच होय ! परंतु यामुळें घाबरून जाण्याचें कारण नाहीं. मनुष्यामनुष्यांत जे भेद होणार ते कल्पनाधिष्ठित असल्यामुळें विशिष्ट भावनेस मान न देणारे त्यांत समाविष्ट होऊं शकणार नाहींत हें उघड आहे. तात्पर्य, जे स्वतःस हिंदु म्हणवीत नाहींत त्यांचा हिंदूंच्या कोणत्याही व्याख्येंत समावेश होणें शक्यच नसल्यामुळें हिंदूंच्या व्याख्येंत अशा व्यक्तींचा समावेश न झाल्यास त्यांत कोणताही अशास्त्रीयपणा नाहीं. तरी यापुढें हिंदुसभेनें मान्य केलेलीच व्याख्या चालू व्हावी हें योग्य दिसतें. मात्र ही व्याख्या सामाजिक दृष्टीची आहे हें लक्षांत घ्यावें. सामाजिक दृष्ट्या हिंदु कोणास म्हणावें हें या व्याख्येनें ठरवितां येईल.

आतां हिंदुधर्माच्या व्याख्येकडे वळूं. या धर्माची व्याख्या नसणें हेंच या धर्माचें भूषण आहे. या धर्माची घटना इतकी स्वाभाविक आहे कीं, इतर संप्रदायांप्रमाणें एखाद्या व्यक्तीच्या किंवा एखाद्या ग्रंथाच्या आश्रयानें या धर्माचें लक्षण करणें अशास्त्रीय आहे.

'धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा'

'यः स्याद्धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चयः।'

'अद्रोहश्चाप्यलोभश्च दमो भूतदया तपः।
ब्रह्मचर्यं तथा सत्यमनुक्रोशः क्षमा धृतिः।
सनातनस्य धर्मस्य मूलमेतदुदाहृतम् ॥' वायुपु.

'इज्याऽध्ययनदानानि तपः सत्यं क्षमा दमः'
अलोभ इति मार्गोऽयं धर्मस्याष्टविधः स्मृतः ॥'
महाभारत

अद्रोहः सर्व भूतेषु कर्मणा मनसा गिरा।
अनुग्रहश्च दानं च सतां धर्मः सनातनः ॥ महाभारत.

'दानं दया सतां पूजा व्यवहारेषु चार्जवम्।
एष राम परो धर्मः प्रेत्य चेह च शाश्वतः।' रामायण

'नास्ति सत्यात्परो धर्मः'

'आनृशस्यं परो धर्मः।'

वगैरे प्राचीन वाङ्मयांतील कितीही लक्षणें पाहिलीं तरी त्यांत अखिल मानवजातीचें कल्याण साधणारा मार्ग हाच धर्म शब्दाचा अर्थ दिसून येतो. अर्थात् मानवजातींतील एखाद्या विशिष्ट समुदायासच लागू पडणारे नियम सांगणें हें या धर्माचें ध्येयच नाहीं. जगांत जितके मानव आहेत ( मनु. २.२० ) त्यांच्या करितां इहपरकल्याणसाधक-परस्पर-विरुद्ध दोन मार्ग असूं शकतील असें आर्य ऋषींस वाटत नव्हतें. म्हणूनच त्यांनीं धर्म शब्दाची व्याख्या करतांना जगांत धर्म एकच असूं शकतो या कल्पनेवर भर दिलेला दिसून येतो. जुन्या ग्रंथांतून केव्हां केव्हां 'सनातन' असें एक विशेषण या धर्मास लावण्यांत

आलेलें आहे. तें केवळ प्राचीनता दाखविण्याकारितांच आहे. इतर कांहीं ' असनातन ' धर्म आहेत व त्याहून वेगळेपणा दाखविण्याकरितां हें विशेषण त्यांनीं दिलें असें मानण्याचें कारण नाहीं.

नुसत्या परलोकविषयक आचारांवर मनुष्य जगत नाहीं. प्रत्येक क्षणीं त्यास इहलोकांतील परिस्थितीशीं मुकाबला करावा लागतो. अर्थात् ज्या मार्गानें इहपरकल्याणाचें साधन करतां येईल तोच मानवाच्या उन्नतीचा खरा मार्ग होय हें उघड आहे. या दोन कल्याणांपैकीं ऐहिक उन्नतीचा मार्ग परिस्थितीनें बदलला तरी एकाच परिस्थितींतील मानवांकरितां तो फारसा विभिन्न असणार नाहीं हें उघड आहे. अर्थात् या मोक्षसाधक कर्मयोगरूपी अंगाबद्दल कोणासच मतस्वातंत्र्य नाहीं. पण या कर्मयोगाच्या अंगभूत उपासनेच्या बाबतींत मात्र मतस्वातंत्र्य मान्य आहे. म्हणजे कोणी कोणत्या प्रतीकाची उपासना करावी या बाबतींत बंधन नाहीं. आमच्या शास्त्रकारांच्या मताप्रमाणें पाहिल्यास कोणत्याही विभूतीची उपासना धर्मविरोधी होऊंच शकत नाहीं. ( गी. ९–२३, १०–४१ ) कोणतीही विभूति परमात्म्यांच्या अंशानेंच प्रभावशाली बनते यामुळें त्या त्या विभूतीची उपासना म्हणजे अंशतः परमात्म्याचीच उपासना होय ! या प्रकारानेंच आर्यऋषींनीं अनंत विभूतींस मान्यता दिलेली आहे. वैदिकधर्मविरोधी बुद्धही वैदिकांसच पूज्य ठरून अवतार ठरला तो याचमुळें. ' अहिंसा परमो धर्मः ' या श्रेष्ठ व दिव्य संदेशाचा त्यानें पुरस्कार केला ! ' ईश्वर नाहीं ' असें कंठरवानें प्रतिपादणारा कपिल, महर्षि म्हणून मान्य केला गेला तो अशाच कारणामुळें. याप्रमाणें कोणत्याही प्रकारचा उपासनामार्ग या धर्मास अमान्य नसल्यामुळें कोणत्याही ' संप्रदाया ' चा हा ' धर्म ' द्वेष करीत नाहीं. अशाप्रकारें जगांत ' धर्म ' या संज्ञेस पात्र असा एकच मार्ग असल्यामुळें त्याचें लक्षण ( इतर व्यावर्तक ) करण्याचें कारण नाहीं.

केवळ हेंच तत्त्व लक्षांत घेऊन आम्हीं या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणांत 'धर्म' असा सामान्य शब्द वापरलेला आहे. 'धर्म–स्वरूप–निर्णय' या पहिल्या ग्रंथाच्या नांवांतही याच धोरणानें 'धर्म' असाच शब्द योजिलेला होता. केव्हां केव्हां हिंदुधर्म किंवा आर्यधर्म असे शब्द आम्हीं योजिले आहेत. पण त्याचा अर्थ हिंदूमध्यें किंवा आर्यांमध्यें* आज प्रचलित असलेला एवढाच समजावा. केवळ त्यांच्याचकरितां हा धर्म असून इतरांकरितां तो नाहीं असा याचा अभिप्राय घेऊं नये. कारण या धर्माचें मूळचें स्वरूप फारच व्यापक आहे.

१ मनुष्य स्वतःच्या कर्तबगारीनें नराचा नारायण होऊं शकतो. ( उद्धरेदात्मनात्मानम्, आत्मैव ह्यात्मनो बन्धुः )

२ मध्यस्थ, ईश्वर किंवा गुरु यांच्यावर सर्वस्वीं भिस्त ठेवून त्याची उन्नति होत नाहीं ( सर्व परवशं दुःखम् )

३ प्राप्त कर्तव्यांचें योग्यप्रकारें परिपालन केल्यानेंच मोक्ष मिळणें शक्य आहे. ( स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः, कर्मण्येवाधिकारस्ते )

४ ज्ञान, सामर्थ्य, निर्भयता, दया, निर्लोभता, मोहराहित्य वगैरे गुणच मनुष्याचें इहपर कल्याण साधून त्यास मुक्त करितात. ( दैवी संपद्विमोक्षाय )

अशासारख्या व्यापक सिद्धांतांवर अधिष्ठित झालेला व 'सर्वेत सुखिनः

---

* स्वतःस हिंदु म्हणवावें कीं आर्य म्हणवावें याबद्दलही सध्यां मतभेद पडलेला आहे. तथापि हिंदु हें नांव निंदाव्यंजक असून तें परकीयांनीं दिलेलें आहे असें जें मानलें जातें तें बरोबर नाहीं. सिंधुवरूनच हें नांव पडलेलें आहे. मात्र हें नांव प्रादेशिक असल्यामुळें 'आर्य' या गुणबोधक नांवापेक्षां कमी महत्त्वाचें आहे यांत शंका नाहीं.

सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ' अशी मनोभावानें प्रार्थना करणारा असा हा सर्वसंग्राहक एकच एक धर्म आहे.

आपला धर्म कसा सर्वसंग्राहक आहे हें अधिक स्पष्टपणें कळावें म्हणून येथें पुढील लेख* वाचकांस सादर करणें योग्य वाटतें.

या विसाव्या शतकांत ज्या कित्येक नवीन आकांक्षा उत्पन्न झालेल्या आहेत, त्यांपैकींच ' एकधर्म ' ही एक आहे. शासनैक्य, भाषैक्य त्याचप्रमाणें धर्मैक्यहि अस्तित्वांत यावें असें कित्येकांस वाटतें. सर्व जगाचा एक धर्म कसा होईल याबद्दल अनेक तऱ्हेनें विचार चालू आहे. कांहीं लोक तर या विचारास मूर्तस्वरूपही देण्याचा प्रयत्न करूं लागले आहेत. विचारतरंगांवर हेलकावे खाणारा विषय मूर्तस्वरूप धारण करून आचारांत आला तर त्याबद्दल कोणास हर्ष वाटणार नाहीं ? जागतिक धर्माची स्थापना झाली तर कोणालाहि झाला तरी आनंदच होईल; पण या हर्षातिरेकांत एक गोष्ट विसरून चालणार नाहीं. ज्या धर्माचा ' जागतिक धर्म' म्हणून सत्कार करावयाचा असेल तो धर्म खरोखरीच त्या संज्ञेस पात्र आहे किंवा नाहीं हें डोळ्यांत तेल घालून पाहिलें पाहिजे. नाहींतर तुकारामानें पांडुरंगाचे बाबतींत म्हटलें त्याचप्रमाणें थोडा फरक करून

**विश्वधर्म हें नांव ऐकुनी आलों शेजारा ।**
**विश्वधर्म परि नाहिंस म्हणुनि जातो माघारा ॥**

असें म्हणून निराशेनें परत फिरण्याची पाळी येईल. तसें व्हावयास नको असेल तर प्रथमच परीक्षा होणें बाजवी आहे. आणि म्हणूनच ज्यांच्यावर सध्यां विश्वधर्म किंवा जागतिक धर्म असा शिक्का मारण्याचा प्रयत्न करण्यांत येतो त्यांची खरी योग्यता काय आहे हें थोडक्यांत पाहूं.

प्रत्येक धर्मांतील चांगलीं तत्त्वें घेऊन त्यांचा एक गठ्ठा बांधून त्यांवर

---

* पुरुषार्थाच्या भगवद्गीतांकांतील ' भगवद्गीता आणि जागतिक धर्म ' या लेखामध्यें, थोडा फेरफार करून.

' जागतिक धर्म ' असा शिक्का मारण्यांत कांहीं लोक गुंग होऊन गेलेले दिसून येतात. पण असें करण्यानें आपण जगांतील धर्मांच्या संख्येंत एका नवीन धर्माची भर टाकीत आहों हें त्यांच्या कसें लक्षांत येत नाहीं कोण जाणे ! ज्याची येशूहून दुसऱ्या कोणावरही श्रद्धा नाहीं किंवा बायबला-खेरीज दुसरा धर्मग्रंथहि ज्यास प्रमाण नाहीं त्याच्यापुढें हें अनेक धर्मांतील मेवामिठाईचें ताट ठेवल्यास तो त्यांतून येशूला संमत तेवढाच पदार्थ उचलून घेईल. बाकीच्या पदार्थांकडे तो ढुंकूनही पाहणार नाहीं. याचप्रमाणें इतर धर्मांतील श्रद्धाळूंचीही स्थिति होणार ! मग हा सर्वसंग्रहाचा खटाटोप करून फायदा कोणता ? तसेंच वचनावर श्रद्धा बसण्यास त्या त्या वचनांच्या प्रणेत्यावर श्रद्धा असणें आवश्यक असतें. कारण वक्त्यावर श्रद्धा नसेल तर त्याचीं वचनें कःपदार्थ होत. तेव्हां या ' खिचडी–धर्मग्रंथा'वर श्रद्धा बसावयाची तर त्यांत ज्यांच्या ज्यांच्या वचनांचा समावेश केला गेलेला असेल अशा–मनु, महंमद, झरथुष्ट्र वगैरे सर्व महात्म्यांवर श्रद्धा बसणें आवश्यक आहे; परंतु एका व्यक्तीची इतक्या व्यक्तींवर श्रद्धा असणें शक्य आहे काय ? केव्हांही तें शक्य नाहीं. म्हणून अशा प्रकारें जागतिक धर्म निर्माण करण्याची आशा धरणें म्हणजे मृगजळामागें धांवत सुटण्या-प्रमाणें होय !

अलीकडे पुष्कळ मिशनरी स्वतःच्या धर्माची तारीफ करून ' हाच धर्म सर्व जगाचा उद्धार करण्यास समर्थ असल्यामुळें यासच तो मान मिळावा ' असें प्रतिपादून ' तमेव शरणं गच्छ सर्वभावेन ' असा सर्वांस जणू उपदेश करीत असतात. कांहींच्या मतें बौद्धधर्माच्या मस्तकावर ही पूजा बांधणेंच रास्त होईल. कोणी महंमदाचा चांद हाच अवनितलवर्तिपरितापनाशक आहे, असें कंठरवानें प्रतिपादीत आहेत परंतु हे धर्महि या मानास लायक असल्याचें दिसून येत नाहीं. ' पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ' अथवा व्यक्ति तितक्या प्रकृति अशी मानवी मनाची ठेवण असल्यामुळें येशूनें किंवा बुद्धानें सांगितलेला

मार्ग सर्वांस रुचेल अथवा पचेल हें शक्य नाहीं. येशू कितीहि मोठा महात्मा असला तरी ' रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ?' असें म्हणणाऱ्या रजोगुणी प्रवृत्तीच्या मनुष्यास ' एका गालावर मारलें तर दुसरा गाल पुढें कर ' ही त्याची शिकवण रुचणें शक्य आहे काय ? आणि यदाकदाचित् वक्तृत्वाच्या मोहिनीनें ती क्षणभर त्यास रुचली तरी ती पचणें शक्य आहे काय ? भगवंतांनीं असल्या धर्माची अपूर्णता दाखविण्याकरितांच कीं काय " प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ' असें अर्जुनास बजाविलें आहे. येशूच्या वरील आज्ञेंत या गोष्टीकडे मुळींच लक्ष पुरविलें गेलेलें नाहीं. कांहीं विशिष्ट मनोवृत्तीच्या लोकांस ती आज्ञा रुचेल एवढेंच नाहीं तर पचेल याबद्दल मतभेद होण्याचें कारणच नाहीं, पण कांहींचा समावेश करणारा धर्म सर्वांचा समावेश करीत नसल्यामुळें जागतिक होण्यास पात्र नाहीं हें मात्र पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे.

येथपर्यंतच्या विवेचनावरून विद्यमान कोणताही धर्म किंवा धर्मांची खिचडी जागतिक होण्यास पात्र नाहीं हें कळून आलेंच असेल. तेव्हां आतां साहजिकपणेंच येथें असा प्रश्न उपस्थित होईल कीं, ' खरा जागतिक धर्म कोणता ? ' या प्रश्नाचें उत्तर नीटपणें देतां यावें म्हणून जागतिक धर्म कसा असावा याचा प्रथम विचार करूं. ( १ ) जागतिक धर्म सर्व जगांतील लोकांस लागू पडेल असा असावा. ( २ ) विशिष्ट व्यक्ति किंवा विशिष्ट समाज एवढ्यांपुरतीच त्याची व्याप्ति नसावी. हे दोन सिद्धान्त दिसण्यांत जरी साधे दिसत असले तरी त्यांचें महत्त्व किती आहे हे पुढें ओघाओघानें कळून येईलच ! हे दोन सिद्धान्त लक्षांत घेतले म्हणजे खऱ्या जागतिक धर्माची कल्पना येईल ! कारण वरील सिद्धान्त मान्य केल्यावर विशिष्ट परिस्थितींत उत्पन्न झालेला किंवा विशिष्ट मनोवृत्तीच्या लोकांसच आचरतां येण्यासारखा धर्म जागतिक होऊं शकणार नाहीं हें पटेल. येशूचा किंवा बुद्धाचा धर्म जागतिक होण्यास अपात्र आहे

असें जें आम्ही वर म्हटलें आहे तें याच कारणास्तव ! त्याचप्रमाणें जो धर्म विशिष्ट व्यक्तीवर किंवा विशिष्ट ग्रंथावर प्रामाण्यबुद्धि ठेविण्याविषयीं आग्रह धरील तोहि जागतिक होण्यास पात्र नाहीं; म्हणूनच 'काफरांस ते मुसलमान होईपर्यंत स्वर्गाचें द्वार खुलें केलें जाणार नाहीं' असें प्रतिपादणारा महंमदाचा धर्महि जागतिक ठरू शकत नाहीं. अनेकविध मनोवृत्तींच्या अनन्त मानवांस एकाच ग्रंथाच्या दावणीस बांधणें केवळ हास्यास्पदच नव्हे तर * अशक्यहि आहे. एकाच ग्रंथरूपी फडक्यांत—मग ते कितीहि मोठें असो—सर्व जगांतील धर्मबुद्धीचें गवाळें बांधून टाकणें शक्य नाहीं. जो धर्म व्यक्तीच्या ऐहिक व पारलौकिक उत्कर्षांचा मार्ग कोणत्याही व्यक्तीचा किंवा ग्रंथाचा आश्रय न करितां—त्यांबद्दल अभिनिवेशरहित राहून—उपदेशील तोच खरा जागतिक धर्म होय............

धर्माचरण दोन प्रकारचें असतें. मानसिक व शारीरिक. पहिल्या प्रकारांत उपासना वगैरेंचा अंतर्भाव होतो तर दुसऱ्यांत निरनिराळे संस्कार व विधि यांचा समावेश होतो, पहिला प्रकार विशेषेंकरून वैयक्तिक अथवा पारलौकिक हित साधणारा असतो तर दुसरा सामाजिक किंवा ऐहिक उत्कर्षाचें साधन होतो. पहिल्यास श्रद्धेची आवश्यकता असते तर दुसऱ्यास समाजशास्त्र, नीतीशास्त्र, मानसशास्त्र वगैरे शास्त्रांची कास धरावी लागते. असो. जागतिक धर्माचें लक्षणें व धर्माचरणाचे दोन प्रकार पाहून झाले. आतां या द्विविध धर्माचरणाविषयीं गीतेचे सिद्धांत काय आहेत हें पाहूं ! ते पाहिल्यास गीतोक्त धर्माची ही व्यापकता सर्वांस पटावी म्हणून वरील दोन्ही अंगांविषयीं गीतेचें काय मत आहे हें क्रमानें येथें दाखविण्याचा विचार आहे.

---

* इतर धर्मांस एक ईश्वर, एकच प्रेषित आणि एकच धर्मग्रंथ यांचा आधार आहे. परंतु वैदिक धर्माचें तसें नाहीं. या धर्मांत अनंत देव, अनंत प्रेषित व अनंत ग्रंथ प्रमाणभूत मानले जातात याचें खरें कारण यावरून कळून येईल.

वरीलपैकीं पहिलें धर्मांग उपासना! या उपासनेस प्रतीकाची आवश्यकता पडते. हें प्रतीक अमुकच असलें पाहिजे असा अन्य धर्मांचा कटाक्ष आहे. अमुक प्रकारचा ईश्वर व त्याचा अमुक प्रेषित यांवर श्रद्धा न ठेविली तर सद्गति मिळणार नाहीं असा इतर धर्मांचा दंडक आहे. परन्तु गीता अशा संकुचित वृत्तीस थारा देत नाहीं. कोणत्याही विभूतीची उपासना करा! गीतेस ती सर्वथा मान्य आहे. फार काय ज्या व्यक्तीवर साधकाची श्रद्धा असेल त्या ठिकाणींच ती दृढ करण्याचा प्रयत्न करण्यांत गीतेस कांहीं प्रत्यवाय वाटत नाहीं.

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ ७-२१ ॥**

असें भगवान् स्वतःच सांगत आहेत. मुसलमान हिंदूंच्या देवतांस भजूं लागेल तर तो लगेच काफर ठरतो. पण एकादा हिंदु स्वधर्मांत न सांगितलेल्या देवतांची किंवा व्यक्तीची उपासना करूं लागेल तर तेवढ्यानेंच तो बारळगला असें म्हणण्यास गीता तयार होणार नाहीं. गीता स्पष्टपणें सांगत आहे—

**येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।**
**तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥ ९-२३ ॥**

येशू, महंमद, बुद्ध वगैरे कोणत्याही व्यक्तीची तुम्ही उपासना केली तरी ती मला मान्य आहे असेंच या श्लोकांत स्पष्ट शब्दानें गीता सांगत आहे. प्रतीकोपासनेबद्दल इतकी उदारता धारण करणारा दुसरा कोणता धर्म आहे बरें? गीतेची ही निराग्रही वृत्ति होण्याचें कारण गीतेंतच दिलेलें आहे. गीता सर्वत्र परमात्म्याचें अस्तित्व मानणारी असल्यामुळें परमेश्वर नाहीं असें ठिकाणच तिला दिसत नाहीं. मग विभूतींत—मग ती कोणत्याही देशांतील किंवा कोणत्याही काळांतील असो—देव पाहण्यास ती माघार कशी घेईल? गीतेनें हेंही स्पष्टपणेंच सांगितलें आहे—

यद् यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ॥ १०-४१ ॥

गीतेस कोणत्याही प्रतीकाचा तिरस्कार नाहीं. सर्व प्रतीकें, सर्व बिभूती गीतोक्त धर्ममंदिरांत गुण्यागोविंदानें नांदूं शकतात. दुसऱ्या कोणत्या धर्माच्या अंगीं असलें औदार्य व गांभीर्य दिसून येईल ?

गीतोक्त धर्मांतील उपासनारूपी आन्तर अंगास ज्याप्रमाणें विशिष्ट व्यक्तीचें बंधन नाहीं त्याचप्रमाणें बाह्याचरणासही विशिष्ट ग्रंथाचें पारतन्त्र्य नाहीं. धर्मग्रंथांतील आचारांचें पालन करा असें गीताही सांगणारच; पण तें परिपालन करित असतां केवल ग्रंथाचाच विचार करून भागणार नाहीं. तें तें कर्म करण्यापूर्वीं त्याचा परिणाम, स्वतःचें सामर्थ्य वगैरे गोष्टींचा अवश्य विचार झाला पाहिजे. अशा तऱ्हेचा विचार न करितां केलेलें कर्म गीतेनें तामस म्हणून निन्द्य ठरविलें आहे--

अनुबन्धं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम्।
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥ १८-२५

गीतेला ‘ वचनात्प्रवृत्तिः ’ ‘ वचनान्निवृत्तिः ’ असल्या प्रवृत्तिनिवृत्ती पसंत नाहींत. डोळस श्रद्धेनेंच कर्म करा असें गीतेचें सांगणें आहे. म्हणूनच गीता धर्माधर्मनिर्णय करीत असतां ग्रंथवचनांकडे लक्ष न देतां अभ्युदयाकडे अधीक लक्ष पुरवीत असते. दुर्दैवानें हा गीतेचा विशेष उपेक्षिला जात आहे. मीमांसापद्धतीनें पाणी घालून वाढविलेल्या वचनप्रामाण्यरूपी वृक्षावर आरूढ होऊन आणि समन्वयपद्धतीचा चष्मा लावूनच प्रत्येक ग्रंथाकडे पाहण्याची संवय लागल्यामुळें गीतेचें हें वैशिष्ट्य धर्ममार्तण्डांच्या गळीं उतरत नाहीं, ही गोष्ट निराळी. परन्तु त्यामुळें वस्तुस्थिति लपवितां येणार नाहीं. बाह्याचरणरूपी धर्माधर्मांचा निर्णय कसा करावा, याविषयीं गीतेची पद्धति अगदीं निराळी आहे. व त्यामुळेंच गीतोक्त धर्म जागतिक होण्यास सदैव पात्र आहे.

गीतोक्त आचरणात्मक धर्माचा पाया इतका विस्तृत आणि दृढ आहे कीं, कोणत्याही आघातास तो दाद देणारा नाहीं. बाप्तिस्मा घेतल्यावर सर्व पापें नाहींशीं होतात कशावरून ? या प्रश्नानें पाद्री जितका घाबरतो तितकाच आपल्याकडील धर्म—मार्तंडही कित्येक धार्मिक प्रश्नांस आज घाबरून जात आहे. संध्या कां करावी ? पुरुषांनीं दोन विवाह केले तरी हरकत नाहीं मग स्त्रियांनींच काय घोडें मारलें आहे ? घाणेरड्या ब्राह्मणानें ( ? ) केलेला सैंपाक पवित्र, पण स्वच्छ शूद्रानें केलेला स्वयंपाक तसा कां नाहीं ? हिंदूखेरीज इतर लोक गोत्रव्यवस्था पाळीत नाहींत मग हिंदूंनांच ही पाळण्याची अवश्यकता काय आहे ? असे किंवा अशा तऱ्हेचे प्रश्न उपस्थित होतांच धर्ममार्तण्डांचें उष्णतामान भडकून जातें. त्या भडक्यांत ज्वालामुखीचा स्फोट होतो आणि त्यांतून ‘ नास्तिक आहे ’ असें उत्तर बाहेर पडतें. वास्तविक वरील प्रश्नांचा नास्तिकपणाशीं कांहींएक संबंध *नाहीं. पण इतका विवेक जागृत असेल तर ना ? हा क्रोध, हा संताप, हें भय थोड्याफार अंशानें प्रत्येक धर्मात दिसून येतें. हें भय ज्या धर्मास नाहींसें करतां येत नाहीं तो निर्भयपणें व उजळ माथ्यानें वावरणें शक्य नाहीं. हें भय ज्यानें नाहींसें

---

* प्रश्न विचारणारास नास्तिक म्हणावें असें कोणत्याहि आर्यशास्त्रांत सांगितलेलें नाहीं. प्रश्न विचारणाराकडे कोणतेंहि शास्त्र संतापानें पहात नाहीं, उलट कृपादृष्टीनेंच पहात असतें. कारण शास्त्रें अशाच लोकांकरितां लिहिलीं गेलेलीं आहेत. कोणताहि विषय प्रतिपादणें झाल्यास प्राचीन पद्धतीप्रमाणें तो एकाद्या अधिकरणांत मांडून सांगावा लागतो. या अधिकरणाचे पांच अवयव असतात ते असे. विषय, संदेह, संगति, पूर्वपक्ष व सिद्धान्त. यांपैकीं दुसरा अवयव संदेह हा असून त्याच्याशिवाय कोणत्याहि विषयाच्या विवेचनाचा प्रारंभ होऊंच शकत नाहीं, याविषयीं भारतीय सर्व शास्त्रकार एकाच मताचे आहेत. प्रत्येक संशयाचें नीट निवारण केल्याखेरीज शास्त्र परिपूर्ण व परिणामकारी होणार नाहीं, असा त्यांचा पूर्ण विश्वास होता.

केलें; असले प्रश्न कानावर येतांच संतापानें जो लाल होऊन जात नाहीं, उलट अशा प्रश्नांमुळें व्यक्त होणारें पृच्छकाचें अज्ञान पाहून ज्यास वात्सल्याचा पान्हा फुटतो व मग स्नेहपूर्ण कृपादृष्टीनें प्रसन्न आणि ‘ प्रहसन्निव’ जो धर्म असल्या प्रश्नाचीं उत्तरें देऊं शकतो तोच खरा जागतिक धर्म होय !

गीतेचे धार्मिक सिद्धान्त शास्त्रीय पायावर उभारलेले आहेत. मानसशास्त्र, मानवी प्रवृत्ति, विश्वाचें अन्तिम तत्त्व या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन भरभक्कम नैसर्गिक पायावर गीताधर्ममंदिर उभारलेलें आहे. थोडक्यांत उदाहरण अर्जुनाचेंच देतां येईल ! ‘ किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ’ असें वैराग्य प्राप्त झालें असतां श्रीकृष्णानें त्यास रुकार दिला नाहीं. याच जागीं खिस्त किंवा बुद्ध असता तर त्यानें सांगितलें असतें “ शाबास ! तुला वैराग्य प्राप्त झालें ही गोष्ट फार उत्तम झाली ! सर्व आश्रमांमध्यें श्रेष्ठ अशा संन्यासाश्रमाची दीक्षा मी तुला देतों. जगांत खरें सुख नसल्यामुळें तें सोडण्यांतच प्रत्येक मानवी प्राण्याचें खरें कल्याण आहे. आतां हें खरें आहे कीं, तुला सध्यां क्षणिक वैराग्य प्राप्त झालेलें आहे. तथापि चिन्ता नाहीं. अरणींतून बाहेर आलेल्या चारपांच ठिणग्या नीट इन्धन घालून वाढविल्यास ज्याप्रमाणें सर्व अरण्य जाळून टाकण्यास समर्थ होतात, त्याचप्रमाणें ही वैराग्याची ठिणगी आध्यात्मिक ग्रंथादिकांच्या श्रवणानें वाढविशील तर संसाररूपी महारण्यही त्यामुळें बेचिराख होऊन जाईल. इत्यादि ” पण भगवन्तांनीं असा उपदेश दिला नाहीं. त्यांनीं ‘ पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ’ हें जाणून निक्षून सांगितलें !

**‘ मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ’**

मानवी प्रवृत्तीचा, तसेंच मानसशास्त्राचा विचार करून ‘ अधिकार तैसा ’ उपदेश करणें हें अखिल आर्यसंस्कृतीचें ब्रीद आहे. परंतु दुर्दैवानें आज कित्येक वर्षें आम्ही हीं अमोल तत्त्वें फेकून देऊन सरसहा बार

टक्के व्यवहार करूं लागलों आहोंत. यामुळें समाजाची अपरिमित हानी झालेली आहे.

‘ वित्ते रमस्व बहु मन्यमानः ’

ही वैदिक आज्ञा झिडकारून सर्वांनींच ‘ अर्थमनर्थं भावय नित्यं ’चा जप सुरू केला. पण सर्वांस तो मानवणें शक्य नव्हतें म्हणून ‘ अल्प संतोषाची ’ तोड सुचविण्यांत आली. संन्यासाश्रमाचें पीक तर इतकें बेसुमार वाढूं लागलें कीं, उत्तर हिंदुस्थानांत उदासीसंप्रदायासारखे संप्रदाय भरमसाट फोफावूं लागले आहेत. कुठें तें ‘ यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति ’ सारखें उच्च सात्त्विक ध्येय आणि कुठें ही अपात्रतेमुळें प्रवृत्त होणारी तामसी वृत्ती ! ‘ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत्’ हा केवळ आद्य शंकराचार्यांसारख्यांकरितां असलेला नियम आज ८-१० वर्षांच्या बालकांस केवळ सांप्रदायिक आंधळेपणानें लाविला जात आहे. या सर्व चुका धर्माच्या गीतोक्त व्यापक स्वरूपाकडे दुर्लक्ष केल्यामुळेंच घडून आल्या !

धर्माचार्य शब्दमय व्यासपीठावरून उपदेश करण्याचें सोडून देऊन पुरुषबुद्धीचा आश्रय करतील, शास्त्रीय व्यासपीठावर आरूढ होऊन धर्मनिर्णय जाहीर करतील तर सांप्रत चालू असलेला मतमतांतरांचा गलबला शांत होऊन भारताला आनंदाचे दिवस पहावयास मिळतील ? इंग्रजी शिक्षण कितीही बोकाळलें तरी त्याची भीती वाटणार नाहीं. कारण शास्त्रीय पायावर अधिष्ठित झालेली धर्मश्रद्धा जुजबी वाऱ्याच्या वावटळींनीं उडून जाणें शक्य नाहीं. तात्पर्य, या सर्वोत्कृष्ट धर्मास जागतिक स्वरूप आणावयाचें तर तें भारतीयांच्याच हातीं आहे. भारतवर्षावर परमात्म्याची कृपा म्हणूनच त्यास या जागतिक धर्माची प्राप्ति झाली ! त्यास धर्माकरितां दुसऱ्याच्या तोंडाकडे आशाळभूतपणानें पहाण्याचें कारण नाहीं. खरोखर भारतीयानें दुसऱ्या धर्मांची अपेक्षा करणें म्हणजे घरीं कामधेनु असून दुसरीकडे ताक मागत हिंडण्यासारखेंच मूर्खपणाचें आहे. म्हणून सर्व

भारतीयांस आग्रहाची विनन्ति आहे, ती एवढीच कीं, स्वतः आचरून व दुसऱ्यास स्वाचरणानें उदाहरण घालून देऊन या गीतोक्त धर्मास जागतिक स्वरूप देण्याच्या कामीं त्यांनीं मदत करावी! जागतिक धर्म होण्यास गीता-धर्मच समर्थ आहे. कारण भगवन्तांप्रमाणेंच गीतेसही खालीलप्रमाणें प्रतिज्ञापूर्वक सांगण्याचा अधिकार आहे, इतरांस नाहीं. तो श्लोक ( जणूं गीतेनें स्वतः–कारितांच म्हटलेला ) असा––

**सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥**

( १८।६६. )

म्हणूनच सर्व भारतवर्षास त्याचप्रमाणें सर्व जगास एकच धर्म पाहिजे असें म्हणून कोणी अशा धर्मास शरण जाण्यास तयार असेल तर त्यास आम्हीं गीतेच्याच शब्दांत ( १८।६२ ) सांगूं––

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।**
**तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्॥**

सर्वांच्या अन्तःकरणांत या खऱ्या धर्माच्या जागृतीविषयीं प्रेम उत्पन्न होवो, एवढीच इच्छा आहे.

मूळ हिंदुधर्म कसा सर्वव्यापी होता हें आपण येथवर पाहिलें. वेदांत ‘ पंचजन ’ असा शब्द येतो तो तत्कालीन पांच समाजांचा बोधक होता. पुढें पुढें या पंचजन शब्दाचा अर्थ बदलत गेला व चार वर्ण आणि पांचवा निषाद यांचा तो वाचक झाला. यामुळें शक–यवन वगैरे समाज या धर्मास पारखे झाले. त्यानंतर या पांचांपैकीं फक्त ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्य–शूद्र यांचाच संग्रह करून अंत्यजांस या धर्मांतून दूर लोटण्यांत आलें. उपनिषत्कालांत शूद्रांस इतर वर्णांच्या बरोबरीनें स्थान होतें. तें पुढें कसें लयास गेलें याचें वर्णन मागें ( पृष्ठ ५४ पहा ! ) दिलेलेंच आहे. त्याप्रमाणें चातुर्वर्ण्य लयास जाऊन आपला

धर्म त्रैवर्णिकांपुरताच आहे ही संकुचित कल्पना उदयास आली. पुढें या तिन्हींतून वैश्य व सर्व स्त्रिया गळून जाऊन ( गीता ९–३२ पहा ! ) ब्राह्मण व क्षत्रिय वर्णांतील फक्त पुरुषांकरितांच हा धर्म आहे ही समजूत रूढ झाली. एवढ्यानेंच भागलें नाहीं. ‘ कलियुगांत क्षत्रियांचें अस्तित्व नाहीं ’ असा खोटा सिद्धान्त पुढें येऊन शेवटीं ब्राह्मण तेवढेच या धर्माचे अधिकारी अशी कल्पना प्रसृत होऊं लागली. आजचें धर्मशास्त्र असल्या एकांगी, संकुचित व विपर्यस्त ग्रहानें लिहिलें गेलेलें असल्यामुळें तें जसेंच्या तसेंच कायम ठेवून अखिल हिंदूंचा पुनरुद्धार होणेंच शक्य नाहीं. त्याकरितां गेल्या दीड दोन हजार वर्षांतील कित्येक दृढमूल झालेल्या अशास्त्रीय कल्पनांचें प्रयत्नपूर्वक उच्चाटन केलें पाहिजे. ब्राह्मण पुरुषांकरितांच धर्म ही कल्पना टाकून देऊनच आतां धर्मशास्त्राचा विचार केला गेला पाहिजे. आपला धर्म मूळ सर्व मानवांकरितां होता. दुर्दैवानें तो आज

अखिल मानव
|
पंचजन ( चार वर्ण + निषाद )
|
ब्राह्मण + क्षत्रिय + वैश्य + शूद्र
|
ब्राह्मण + क्षत्रिय + वैश्य
|
ब्राह्मण + क्षत्रिय ( फक्त पुरुष )
|
ब्राह्मण पुरुष

अशा परंपरेनें अगदीं संकुचित होत आलेला आहे. त्यास त्याचें मूळचें व्यापक स्वरूप प्राप्त व्हावयाचें तर प्रथम तो अखिल हिंदूंस आपलासा

वाटेल अशाबद्दल तावडतोब प्रयत्न सुरू केले पाहिजेत. हिंदुधर्माची व्याख्या ठरविण्यांत जें बुद्धिसामर्थ्य आज खर्च होत आहे तें अशा प्रयत्नांत खर्च होईल तर हिंदुधर्म जागतिक होण्यास फारसा :वेळ लागणार नाहीं.

हिंदुधर्म हा याप्रमाणें जागतिक धर्म आहे हें एकदां कबूल केलें म्हणजे धर्मांतर या शब्दास कांहीं अर्थच रहात नाहीं. कारण जगांत परस्परविरुद्ध दोन धर्म असूंच शकत नाहींत. असें आपल्या शास्त्रकारांचें मत दिसून येतें. आज ज्याला आपण धर्मान्तर म्हणतों तें वास्तविक संप्रदायांतरच होय ! जगताच्या उद्धारार्थ आजपर्यंत अनेक महात्मे उत्पन्न झाले. त्यांतील एखाद्यावरच एखाद्याची श्रद्धा बसली तर त्यांत काय बिघडलें ? एखादा मनुष्य नीतीनें वागतो व आपलें कर्तव्य योग्य दक्षतेनें बजावतो. अशा स्थितींत तो हिंदु नाहीं असें कसें म्हणतां येईल ? दत्ताला शरण गेल्यानें आपलें कल्याण होईल असें कोणास वाटेल तर कित्येकांस येशूख्रिस्तास शरण गेल्यानें तें शक्य आहे असें वाटेल ! हा भावनेचा प्रश्न आहे. बाह्य कर्तव्यास बाध न येईल, इतर संप्रदायांशीं तेढ उत्पन्न न होईल अशा तऱ्हेनें वर्तन करण्याबद्दल हिंदुधर्माचा कटाक्ष आहे. पण उपासनेचें प्रतीक किंवा विश्वासार्ह विभूति अमुकच असावी असा हिंदुधर्माचा आग्रह नाहीं. हिंदुधर्म विश्वधर्म होण्यास पात्र आहे तो याच उदार धोरणामुळें. तिकडे जुन्याची थोडी सुधारणा करून नवा करार प्रसृत करणारा येशू जुन्या ज्यूंस वधार्ह वाटतो. तर वैदिकधर्मविरोधी बुद्ध विष्णूचा अवतार ठरतो हें या उदारतेचें ठळक उदाहरण नव्हे काय ? खरोखर ही प्राचीन प्रथा गेल्या शतकापर्यंत जिवंत असती तर येशूच्या माहात्म्याचाही हिंदुधर्मीयांनीं योग्य तो गौरव केला असता व रेव्हरंड टिळकांसारख्या सात्त्विक मनोवृत्तींच्या धर्मबांधवास हा धर्म सोडून जाण्याचा प्रसंग आला नसता.

मनुस्मृतीकडे* पाहिलें तर त्यांत शक, यवन, वगैरे लोक पूर्वीं हिंदूच होते असें मानलेलें असल्याचें दिसून येतें. कोणी क्रियाभ्रष्ट होऊन तर कोणी अन्य तऱ्हेनें या धर्मापासून च्युत होऊन आज हिंदुधर्मीयांहून इतरांचा समाज बनलेला आहे. पण मुळांत सर्व हिंदूच होते. तेव्हां प्राचीन संप्रदायाप्रमाणेंही अहिंदु हा अहिंदुच रहावा, त्याला कधींही हिंदुत्व प्राप्त होणें शक्य नाहीं असें मानणें बरोबर नाहीं.

या ठिकाणीं कोणी असा प्रश्न उपस्थित करील कीं तरमग जन्मतः अहिंदूची किंवा हिंदूतून इतर संप्रदायांत गेलेल्यांची शुद्धि करून मगच त्यांस आपल्या धर्मांत समाविष्ट करून घेण्याचें कारण काय? पण हा प्रश्न बरोबर नाहीं. शुद्धीकरण-समारंभाची आवश्यकता नेहमींच राहणार. तत्त्वतः प्रत्येक मानव जरी हिंदु असला तरी आज हिंदूंच्या म्हणून ज्या संस्था आहेत त्यांचा फायदा घेऊं इच्छिणाऱ्या व्यक्तीनें जाहीरपणें हिंदुत्वाची किंवा आर्यत्वाची घोषणा केलीच पाहिजे. अशी जाहीर घोषणा करणें हाच या समारंभाचा खरा अर्थ आहे. सामाजिक व्यवस्थेच्या दृष्टीनें अशा जाहीर समारंभानंतरच त्या त्या व्यक्तींचा हिंदूंनीं अंगीकार करावा हेंच इष्ट आहे. शुद्धीकरणाचा विधि मात्र एकरूपीच असणें आवश्यक आहे. या दृष्टीनें आर्यसमाजी, हिंदु महासभा यांनीं इतर पंडितांचे सहाय्यानें जुन्या व्रात्यस्तोमविधीचें योग्य प्रकारें पुनरुज्जीवन करणें आवश्यक आहे. सुलभतेच्या दृष्टीनें त्यांत योग्य तें परिवर्तन करून एक निश्चित बाह्य विधि ठरवितां आल्यास या समारंभाचें बाह्य स्वरूप अधिक परिणामकारी होईल यांत शंका नाहीं.

शुद्धीकरणसमारंभाचें तात्त्विक स्वरूप "इहलोक व परलोक यांतील कल्याणाचीं साधनें पृथक् असून त्यांकरितां पृथक् प्रयत्न करणें आव-

* शनकैस्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ॥ मनु. १०-४३.

श्यक आहे ही खोटी समजूत टाकून देऊन, ‘ स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ’ या श्रीकृष्णवचनाप्रमाणें स्वकर्तव्यद्वारा परमात्म्याची पूजा केल्यानेंच परमकल्याण प्राप्त होतें, अभ्युदय व निःश्रेयस यांमध्यें विरोध नाहीं, या परमश्रेष्ठ तत्त्वाचा मीं अंगीकार केलेला असून त्याला अनुसरून व्यापक धोरणानें वागण्याचा मी शक्य तों प्रयत्न करण्याचें ठरविलें आहे ” असें जाहीर करणें हेंच असावें. हिंदुधर्माचीं श्रेष्ठ तत्त्वें शुद्धीच्छूस कळलेलीं आहेत किंवा नाहींत याचें परीक्षण होणें आवश्यक आहे. ज्या कित्येकांस एवढें कठिण तत्त्व आकळण्यासारखें नसेल त्यांस गीतेसारख्या ग्रंथाचें वाचन, सवित्याची ( सूर्याची ) उपासना अशा बाह्य कर्मकांडाचें आचरण करण्यास प्रवृत्त करावें. शुद्धीकृताची शुद्धीकरणानंतर निदान वर्षभर तरी वास्तपुस्त केली जाईल अशाविषयीं काळजी घेणें जरूर आहे. अशा तत्त्वनिष्ठ पद्धतीनें शुद्धीकरण केलें जाईल तरच तें यापुढें प्रभावी होईल ! अशा शुद्धीकृतांची विशिष्ट समाजाशीं आचाराविचारांनीं समरसता केली जाईल अशाविषयीं खटपट करावी. म्हणजे शुद्धीकृतांच्या विवाहाचाही प्रश्न सुटेल !

हें शुद्धीकरणाविषयीं झालें. पण या समारंभाशिवायही कित्येक धर्मबाह्य समजले गेलेले गट पुन्हा हिंदुधर्माच्या छत्राखालीं आणून हिंदूंचें संख्याबल सहज वाढवितां येण्याजोगें आहे. हिंदुसमाजानें आजपर्यंत मूर्खपणानें असल्या गटांची उपेक्षा केली असली तरी त्या धर्मबाह्य समजल्या गेलेल्या गटांनीं मात्र तत्परतेनें कित्येक हिंदु आचार कायम ठेविलेले आहेत. हिंदुधर्मातून बलात्कारामुळें इतर धर्मांत गेलेल्या अनेक जाति आज अशा विद्यमान आहेत कीं त्यांच्यामध्यें गणपति, सत्यनारायण, तुळस वगैरेंची पूजा अद्यापि चालू आहे. त्यांचे रोटीबेटीव्यवहारही आपापसांतच असल्यामुळें इतर धर्मीयांशीं त्यांचें रक्तमिश्रणही झालेलें नाहीं. कोणत्याही कारणामुळें असो, पण ज्यांनीं आज इतक्या पिढ्या हिंदु आचारांवरील आपली निष्ठा व्यक्त केली

त्यांस शुद्धीकरणाशिवायच हिंदु मानून घेऊन हिंदूंच्या सणामंदिरांतून भाग घेण्यास प्रोत्साहन दिलें गेलें पाहिजे. विद्यमान हिंदु समाजानें जरा डोळे उघडून नीट लक्ष दिलें तर असे धर्मबाह्य धर्मबांधवांचे गट त्यांस जवळपासच दिसून येतील ! अशा गटांच्या बिनबोभाट समावेशनानें हिंदूंचें संख्याबल सहजासहजीं वाढीस लागेल व त्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा मार्ग मोकळा होईल !

कित्येक हिंदु आत्मविश्वास नसल्यामुळें म्हणा किंवा अदूरदृष्टीमुळें म्हणा, हिंदुधर्माच्या भवितव्याविषयीं निराशेचे उद्गार काढीत असतात. पण वस्तुस्थिति तशी नाहीं.

आज जैन व बौद्ध हिंदूंशीं समरस*झालेच आहेत ! थोडासा प्रयत्न योग्य मार्गानें केला जाईल तर पारशी समाजही असाच समरस होऊन जाण्यास वेळ लागणार नाहीं. पारशांचे धर्मग्रंथ व वेद यांचा निकट संबंध आतां सर्वमान्य झालेला आहे. वैदिक धर्मीयांचा मुख्य देव जो अग्नि त्याची पूजा आज आपण सोडून दिली आहे, पण त्यांच्यांत ती अद्याप कायम आहे. या दृष्टीनें परंपरेच्या अभिमान्यांनीं तर त्यांच्या-बद्दल अधिक आदर दाखविला पाहिजे. दिवाळीसारखे सण साजरे करणें, गुजराथी भाषा, हिंदु पद्धतीचा वेष निदान विवाहादिप्रसंगीं धारण करणें, रांगोळ्या, कुंकूं लावणें वगैरे कित्येक हिंदु आचार पारशी-महिला-वर्गांत रूढ झालेलेच आहेत. मनानेंहि पाहिलें तर त्यांच्या मनोवृत्ति फारशा आमच्याशीं विसंगत नाहींत. मुसलमानांपैकीं बोहरी समाजही याचप्रमाणें हिंदूंशीं लवकर समरस होण्यासारखा आहे. कोकणांतील ब्राह्मणीमुसलमान तर आचारानें हिंदूच आहेत असें दिसून येईल !

* येथें समरस शब्दाचा अर्थ विवाहसंबंधव्यापी घेण्याचें कारण नाहीं. विवाहाखेरीजहि एकमेकांच्या सामाजिक स्वरूपांच्या सणांत भाग घेऊन वगैरे समरसता व्यक्त होऊं शकते. हिंदूकरणाचा संस्कार न करतां या प्रकारची सम-रसता वाढवावयाचा प्रयत्न हिंदूंनीं करावा एवढेंच सुचविण्याचा येथें उद्देश आहे.

कच्छी मेमन हे कांहींसा हिंदु कायद्याचा भागहि पाळतात. या सर्वांशीं समरसतेनें वागण्याचा प्रयत्न करणें एकंदरीनें हिंदूंच्या भवितव्यास उज्ज्वलच करील यांत शंका नाहीं.

रे. टिळकांसारखे ख्रिश्चन हिंदूच गणले जावे अशी योजना दिसते. खि. वा. श्री. लक्ष्मीबाई टिळक यांचा नाशिक येथील सत्कार व सर्वांची लक्ष्मीबाईबद्दलची 'आजी' ही संज्ञा याच तत्त्वाचा पाठपुरावा करीत आहे. असो. याप्रमाणें 'विवेकें विचारें विवंचून' चालल्यास हिंदूंचें भवितव्य किती उज्ज्वल आहे हें दिसून येण्यासारखें आहे.

पण हीं सर्व मनोराज्यें सत्यसृष्टींत आणावयाचीं तर विद्यमान हिंदूंनीं प्रथम स्वतःच्या धर्माची व धार्मिक कल्पनांची नीट तपासणी केली पाहिजे. या तपासणीनंतर जो हिणकस भाग दिसेल तो फेंकून देण्यास तयार झाले पाहिजे. तसला नासका-कुसका व निरुपयोगी भाग फेंकून न दिला गेल्यामुळेंच आज आम्हांस आमचा धर्म जगद्व्यापी आहे हें छातीठोक सांगण्याची लाज वाटत आहे.* याच अंगचुकारपणामुळें आमच्या धर्माचें उज्ज्वल लक्षण बनावट ठरून भलतेंच लक्षण आमच्या धर्माच्या माथीं मारलें जात आहे.

आज कित्येक शतकांपासून आपल्या धर्माचें व्यापक स्वरूप आपण विसरलों आहों. आमचा धर्म केवळ अदृष्टप्रधान आहे व त्यास प्राचीन श्रुतिस्मृतींतील वचनांबाहेर वावरण्यास परवानगी नाहीं, असली घातक संकुचित कल्पना उराशीं बाळगून आम्हींच आमच्या धर्माचा ऱ्हास

* या प्रकरणांत हिंदुधर्माचें जें श्रेष्ठत्व व जगद्व्यापित्व वाणलेलें आहे तें आजच्या हिंदूंत आत्मविश्वास जागृत व्हावा एवढ्याच उद्देशानें आहे. परधर्मीयांसमोर हें महत्त्व आज गाऊन दाखविणें म्हणजे 'सांगे वडिलांची कीर्ति। तो एक मूर्ख' या न्यायानें मूर्खपणाच पदरीं घेणें आहे. आपला धर्म श्रेष्ठ आहे हें प्रत्यक्ष कृतीनें पटवून दिलें पाहिजे. या दृष्टीनें आत्मपरीक्षणपूर्वक आत्मोद्धारार्थ प्रयत्न करणें हेंच आज शहाणपणाचें ठरेल!

केला आहे. आम्हांला सद्गुणांबद्दल आदर व दुर्गुणांबद्दल द्वेष नाहीं तो याच अशास्त्रीय कल्पनांमुळें! दैवी संपत्तीच्या उत्कर्षाकरितां मूळ स्थापन झालेल्या या धर्माचे अनुयायी आपण हिंदु लोक आज सर्वस्वीं हीन झालेले आहों ते यामुळेंच ! अहिंसा, सत्य, शुद्धता हे दैवी गुण आपणांस केव्हांच पारखे झालेले आहेत. गलिच्छपणा, भित्रेपणा, तुसडेपणा, दैववादीपणा, स्वार्थी दृष्टि, संकुचितपणा, कष्ट करण्याची तयारी नसणें, अप्रामाणिकपणा, तत्त्वनिष्ठेचा अभाव, भोंदूपणा व भोळसटपणा या आसुरी दुर्गुणांचें माहेरघर बनलेल्या आम्हां हिंदूंत या सर्वश्रेष्ठ मानवधर्माचें तेज न दिसलें तर तो दोष मूळ धर्माचा नसून आमचा आहे. खरीं धर्माचीं मूळ तत्त्वें दृष्टीआड करून आम्ही गतानुगतिक बनलों आहों. आमचें हें अज्ञान वास्तविक तिरस्करणीय असून त्याचा आम्ही तिरस्कार करीत नाहीं; पण चिकित्सक दृष्टीनें कोणीं प्रश्न विचारला तर मात्र आम्ही त्याचा तिरस्कार करतों; हा उलटा व्यवहार आतां बंद केलाच पाहिजे.

ही आत्मशुद्धीची चळवळ उपेक्षणीय ठरवून केवळ सामाजिक व राजकीय उत्कर्षसंपादनाच्या दृष्टीनें आपण कितीहि प्रयत्न केले तरी ते सफळ होणार नाहींत. आज हिंदु शब्दाच्या व्याख्येचा परिघ एका बाजूनें बौद्ध–जैनां–पर्यंत विस्तारत आहे पण दुसरीकडे हिंदुधर्मावर रागावून व रुसून कित्येक त्याची रजा घेत आहेत. अशा स्थितींत खऱ्या सुधारकावर किती मोठी जबाबदारी पडते हें नीट ध्यानांत घेऊनच चळवळीची दिशा ठरविणें आवश्यक झालें आहे. तसें केल्याशिवाय आजचें या धर्माचें हीन-दीन स्वरूप नष्ट होऊन त्यास त्याचें खरें प्राचीन उज्ज्वल स्वरूप प्राप्त होणार नाहीं.

आजच्या हिंदु धर्माचें–खरें बोलावयाचें तर–' भित्रेपणा व तुसडेपणा वाढविणारा मार्ग ' असें कोणी लक्षण केल्यास तें अगदीं यथार्थच म्हणावें लागेल ! पण मूळ सर्व मानवजातीच्या उद्धारार्थ निघालेल्या

धर्मास अशी निकृष्ट अवस्था प्राप्त व्हावी हें उचित नाहीं. म्हणून ज्यांना या धर्माचा खरा अभिमान असेल त्यांनीं आतां व्याख्येची चर्चा करण्यांत कालक्षेप न करतां मूळ उच्च स्वरूपाची जागृति होईल अशी चळवळ सुरू केली पाहिजे तशी चळवळ सुरू केल्यानेंच हिंदूंचें भवितव्य उज्ज्वल होणें शक्य आहे.

गेल्या ६०।७० वर्षांत अनेकांनीं या उद्देशानें अनेक प्रयत्न केले. पण त्यांस यावें तसें यश आलें नाहीं. त्याचें कारण प्रथम लक्षांत घेऊन मगच नवा मार्ग आंखला पाहिजे. म्हणून आतां प्रथम गेल्या ५०।६० वर्षांतील धर्मसुधारणेच्या चळवळींचें समीक्षण करून त्यानंतर आज धर्म सुधारणेची चळवळ कशी चालविली पाहिजे या व्यावहारिक प्रश्नाकडे वळूं.

## प्रकरण बाविसावें

# धर्मसुधारणेचा अभिनव मार्ग

महाराष्ट्रांत धर्मसुधारणेचे विचार पुष्कळ वर्षांपासून सुरू आहेत. त्यांचा उच्चारही मधूनमधून होत असतो. तसेंच कित्येक सुधारणा आचारांत आणण्याचाही प्रयत्न जारीनें सुरू आहे. तथापि सर्वसामान्य हिंदूंच्या आचाराची सुधारणा हा विषय आजपर्यंत फारशा गंभीरतेनें विचारांतच न घेतला गेल्यामुळें त्याचा उच्चार व आचारही फारसा आस्थेनें झालेला नाहीं. या ग्रंथानें त्या महत्त्वाच्या विषयाचा विचार व उच्चार होईल यांत शंकाच नाहीं. पण त्याबरोबरच ही सुधारणा रूढ होण्यास कोणते उपाय केले पाहिजेत हें दाखविणें जरूर वाटल्यावरून त्याविषयीं दोन शब्द या प्रकरणांत लिहिण्याचा विचार आहे.

गेल्या पिढींतील सुधारकांचा कार्यनिष्ठेवरच विशेष भर होता. सामान्य जनतेंत धर्मविषयक ज्ञान अगदींच अल्प असल्यामुळें कोठलींहि एकदोन वचनें पुढें करून प्राचीन शास्त्राचा (?) सुधारणेस पाठिंबा दाखविणें शक्य होतें. पण तेव्हांहि सुधारकांस थोडाबहुत बुद्धिवाद करावा लागलाच! आज मात्र बुद्धिवाद व क्रियाशक्ति या दोन्ही चक्रांच्या सहाय्याशिवाय सुधारणेचें गाडें पुढें जाणार नाहीं, हें पक्कें ध्यानांत धरलें पाहिजे. अर्थात् आजच्या धर्मसुधारकांवर विचारांचा व आचारांचाहि प्रसार करण्याची जबाबदारी आहे हें विसरून चालणार नाहीं. यांपैकीं विचारांचा प्रसार करावयाचा तर आज धर्मसुधारणेबद्दल जीं कित्येक मतें समाजांत पसरलेलीं आहेत त्यांच्या गुणदोषांचें आकलन होणें जरूर आहे. म्हणून धर्मसुधारणेविषयीं जीं कित्येक मतें आज प्रचलित आहेत त्यांचें प्रथम गुणदोषविवेचन करूं.

सांप्रत धर्मसुधारणेबद्दल परस्परविरुद्ध मतांचें इतकें काहूर माजलें आहे कीं; त्या सर्वांचा एकत्र विचार थोडक्यांत देणें अशक्य आहे. तथापि वर्गवारीच करूं लागलें तर खालील तीन मतांत त्यांचा समावेश करतां येईल ! तीं तीन मतें अशीं :—

१ सर्वज्ञ, अनुभवी व रागद्वेषरहित अशा ऋषींनीं जुन्या धर्मग्रंथांत सार्वकालिकधर्म सांगून टाकलेला असल्यामुळें त्यांत कोणासही फेरबदल करण्याचा अधिकार नाहीं.

२ देशकाल पाहून धर्माच्या कांहीं भागांत फेरफार करून बाकीचा तसाच ठेवावा.

३ ज्या काळीं सनातनधर्माची घडण झाली त्या काळच्या परिस्थितींत व या विसाव्या शतकांतील परिस्थितींत जमीनअस्मानाचें अंतर पडलेलें असल्यामुळें प्राचीन बंधनें झुगारून देऊनच उन्नतीचा मार्ग अनुसरला पाहिजे. तेव्हां प्राचीन मढीं उकरून काढण्यांत कालाचा व शक्तीचा अपव्यय करण्याचें कारण नाहीं.

वरील तीन मतांपैकीं पहिलें मत आजच्या नवतरुणांस अगदीं अग्राह्य वाटतें. ‘ ज्या अडचणी आज तुम्हांस भासत आहेत, त्या नवीन नसून त्यांतून सहीसलामत कसें पार पडावें याचें विवेचन प्राचीन ऋषींनीं केलेलेंच आहे. अर्थात् नव्या मार्गाची आवश्यकता नाहीं. ग्रंथोक्त मार्गानेंच आपली प्रगति होईल ’ असा उपदेश (?) सनातन्यांनीं कितीहि केला तरी नवीनांस तो रुचत नाहीं. या मतांत शास्त्रीयपणा कसा नाहीं हें प्रस्तुत ग्रंथकर्त्यानें धर्मस्वरूपनिर्णय या ग्रंथांत विस्तारानें दाखविलेलेंच आहे. अर्थात् नव्या धर्मसुधारकानें तें प्रथम नीट समजावून घेतलें पाहिजे. पण याबरोबरच आजच्या सुधारकांवर दुसरी जबाबदारी पडते, ती त्या पक्षांची मनोभूमिका समजावून घेण्याची !

सनातन्यांचें मत आम्हांस पटत नाहीं एवढेंच म्हणून आज भागणार नाहीं. कारण त्यांचा अनुयायिवर्ग फारच मोठा आहे. त्यांचे पुढारी जरी हठवादीपणामुळें वगळले तरी त्यांच्या अनुयायांस अनुकूल करून घेण्याकरितां त्यांच्या मनोभूमिकेचा अभ्यास सुधारकानें मोठ्या आस्थेनें केला पाहिजे. म्हणून त्या पक्षांतील ग्राह्यांशाचाच आतां विचार करूं.

आज सनातन्यांचे पुढारी धर्मास केवळ वचनप्रधान समजतात. कुमारिलभट्ट, शंकराचार्य यांसारख्या दिग्गजपंडितांनीं त्याच मताचा पुरस्कार केलेला आहे. पण त्याचें मूळ कारण मात्र आजच्या सनातन्यांस माहीत नाहीं. ज्या काळांत चिकित्सेचा उगमच नव्हता व बौद्धासारखे प्रतिपक्षी विभूतिमाहात्म्य किंवा ग्रंथमाहात्म्य यांच्या आश्रयानेंच जेव्हां सनातनधर्मावर हल्ला चढवीत होते तेव्हां स्वधर्मसंरक्षणार्थ या उपायाची ( वचनप्रामाण्याच्या ) धर्मरक्षकांस विशेष आवश्यकता भासली ( ध. स्वरूप निर्णयांतील प्रकरण ११ वें पहा ! ). पण तत्पूर्वी हा धर्म शब्दप्रामाण्यावरच अवलंबून होता असें नाहीं. त्यावेळीं विशिष्ट सिद्धांतांवर या धर्माची उभारणी होती व आजहि ते सिद्धांत सामान्य जनतेंत प्रसृत केले जातील तर सनातन्यांच्या मागें असलेला बहुजनसमाज आजहि सुधारणेस अनुकूल बनल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून हे मूलभूत सिद्धांत प्रत्येक सुधारकानें ध्यानांत घेणें आवश्यक आहे.

त्यांपैकीं पहिला सिद्धांत असा कीं, मनुष्य केवळ इंद्रियांच्याच कलानें वागूं लागेल तर त्याची अवनतीच होईल. इंद्रियांप्रमाणेंच काम-क्रोध हेहि मनुष्याचे शत्रूच आहेत. गीतेंत काम व क्रोध यांस एकरूपीच समजून त्यांस महाशन म्हणजे खादाड व अत्यंत पापमय असें म्हटलेलें आहे. तेव्हां विचारी मनुष्यानें या इंद्रियांच्या व कामक्रोधांच्या तावडींत न सांपडणें आवश्यक आहे.

प्राचीनांचा दुसरा सिद्धांत असा कीं, मानवी प्रवृत्तीचा तर्क हा गौण

आधार असून श्रेष्ठांचें आचरण व त्यांचे उपदेश हेच प्रामुख्यानें प्रवर्तक आहेत. आजच्या चिकित्साप्रधान म्हणविल्या जाणाऱ्या युगांतही हा सिद्धांत प्रत्ययास येतो. नव्या स्मृतीची आवश्यकता या पुस्तकांत '( धर्माच्या चतुःप्रमाणांत ) क्रम लावावयाचाच तर प्रथम सदसद्विवेकबुद्धि, नंतर सदाचार व नंतर श्रुतिस्मृति असाच वास्तविक क्रम लावावयास पाहिजे.' असें मीमांसकांचा क्रम उलटवून म्हटलें आहे. परंतु हा क्रम ज्यांच्या संबंधानें योग्य ठरेल असे लोक समाजांत किती असतात याचा लेखकानें विचार केला असता तर मीमांसकांचें मत त्यास विपरीत भासलें नसतें. ' बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः ' हाही मानसशास्त्राचा नियम लक्षांत घेतला पाहिजे. याच दृष्टीनें प्राचीनांचा ग्रंथप्रामाण्यावर विशेष भर असतो. कारण हे ग्रंथ आपल्यापेक्षां अधिक योग्यतेच्या ऋषींनीं लिहिले अशी त्यांची श्रद्धा असते. आजही राजकीय स्वातंत्र्याच्या मार्गाची युक्तायुक्तता ठरवितांना रानडे व लोकमान्य टिळक यांच्या वचनांचा आधारादाखल उपयोग केला जातो तो याचमुळें.

प्राचीनांचा तिसरा सिद्धान्त असा कीं, मनुष्य स्वभावतः चांगला किंवा वाईट नसला तरी तो कांहीं नियमबंधनें न पाळतां निस्तंत्रपणें वागेल तर त्याची उन्नति होणार नाहीं. प्रमाद, आलस्य वगैरे मनुष्यस्वभावांतील कांहीं स्वाभाविक दोष असे आहेत कीं ते कायम राहिल्यानें पशु आणि मानव यांमध्यें कांहींच तफावत दिसून येणार नाहीं.

प्राचीन विचारपरंपरा या तीन सिद्धान्तांवर उभारलेली आहे. त्यांतही संयम व बंधनाची आवश्यकता यांवर त्यांचा विशेष भर असतो. विधवाकेशवपन मूळ कशामुळेंही रूढ झालेलें असो, आज त्यास उचलून धरणारांना जें खरें भय वाटतें तें हेंच कीं, विधवेला संयम न राहून ती नीतिभ्रष्ट होईल ! एका काळीं स्त्रियांनीं वहाणा

घालणें हें छचोरपणाचें गणलें जाई. अजूनही बूट घालणें व शेपटा सोडून रस्त्यानें जाणें त्याच वर्गांतील समजलें जातें. या प्रकारास सनातनी जनता निषिद्ध मानते ती ग्रंथप्रामाण्याच्या तत्त्वावर नव्हे तर 'आज यांनीं हें बंधन झुगारून दिलें त्याचप्रमाणें उद्यां दुसरींही झुगारून देतील' या भीतीमुळें. प्राचीनांचे पुढारी ग्रंथप्रामाण्याच्या जोरावर रूढींचें समर्थन करीत असले तरी त्यांचे अनुयायी त्याच तत्त्वावर रूढीची आवश्यकता समजत नाहींत. हा सूक्ष्म भेद आजच्या अभिनव सुधारकांनीं दृष्टीआड करून चालणार नाहीं. आपल्या सुधारणेंत संयम व बंधनें यांची योग्य काळजी घेतली जात आहे हें त्यांनीं सनातनी अनुयायांस पटवून दिलें तर पुढाऱ्यांस सोडून देखील त्यांचे अनुयायी त्यांच्या गोटांत येतील हें त्यांनीं ध्यानांत घेतलें पाहिजे.

या मुद्याचें प्रत्यंतर स्त्रियांच्या शिक्षणांतच मिळेल ! जेव्हां स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न मूळ पुढें आला तेव्हां 'ध' च्या 'मा' ची गोष्ट पुढें करून सनातनी अनुयायांनीं त्याबद्दल नापसंती दर्शविली. पण जेव्हां शिकूनही मुली नीतिभ्रष्ट होत नाहींत असें दिसून आलें तेव्हां पुष्कळ जुन्या वळणाच्या घराण्यांतही आवडीनें स्त्रीशिक्षण सुरू झालें. पुरुषांतही केस राखण्याची व पायजमा घालण्याची पद्धत मूळ सुरू झाली तेव्हां त्यांस अपवित्र मानण्यापर्यंत गेलेली मजल आज कशी लुप्त झालेली आहे हें दिसतच आहे.

वरीलसारख्या कित्येक उदाहरणांवरून बहुजनसमाजाचा विरोध सुधारकांस कां होत असतो याचें कारण लक्षांत येतें. तसेंच त्यावरील उपाययोजनाही समजून येते. संयम व बंधनें यांचें यथायोग्य वर्चस्व कायम राहील, या विषयीं प्रत्येक सुधारकानें तत्परता दाखविली पाहिजे. तसेंच प्राचीन अपकारक बंधनें नाहींशीं करण्याबरोबरच नवीं रूढ करण्याचा प्रयत्न तितक्याच उत्साहानें अंगावर घेतला पाहिजे. हीच त्या विरोधावरील उपाययोजना होय.

मागें जे सुधारकांचे तीन वर्ग केले आहेत त्यांपैकीं मधल्या पक्षास बहुजनांचा पाठिंबा केव्हांच मिळाला असता; पण त्यांनीं बंधनोच्छेदावर जसा जोर दिला तसा नवीं रूढ करण्यावर दिला नाहीं. यामुळें सनातनी अनुयायांचा त्यांच्या हेतूबद्दल गैरसमज झाला. त्यांच्या एकांगी चळवळीच्या धोरणामुळें " सुधारक=धर्मबुडवे " (पृ. २६ पहा !) हें समीकरण दृढ झालें. असली एकांगी सुधारणा चालू राहिल्यामुळेंच आगरकराची न्हाव्याच्या फडक्यापासून विधवेच्या कुंकवापर्यंत सर्वत्र लक्ष देणारी सुधारकदृष्टि आतां अबलोद्धार व पतितोद्धार यांवरच खिळलेली आहे. 'आमची सुधारणेंत आत्मवंचना आहे. अनाथ बालविधवेची दया येण्याबद्दलही आम्हांला चांगल्या चेहऱ्याचा आधार लागतो. आमची सुधारणा अद्याप डोळ्यांपुरतीच आहे.' (एकच प्याला—रामलाल) ही सुधारणेची दुरवस्था याच एकांगी चळवळीचें फळ आहे.

कै. आगरकर यांनीं या बंधनांच्या आवश्यकतेबद्दल क्वचित् सामान्य रूपानें विवेचन केलेलें आहे; पण त्यांचाहि विशेष भर रूढ बंधनांच्या उच्छेदाकडेच कसा होता हें पुढील उताऱ्यांवरून दिसून येईल ! कै० आगरकर म्हणतातः—" समाजाची सुस्थिति असावी, आणि त्यास हळहळू उन्नतावस्था येत जावी यासाठीं प्रत्येक अवस्थेंत त्याला कांहीं बंधनें असणें अवश्य आहे व त्याच्या घटकांनीं त्यांचा प्रतिपाल केला पाहिजे, हें सामान्य विधान ज्याप्रमाणें आम्ही कबूल करतों, त्याप्रमाणें अनेक कारणांनीं प्रत्येक समाजाच्या स्थितींत फेरफार एकसारखा होत असतो म्हणून त्याच्या बंधनांतही फेरफार होत गेला पाहिजे, हें विधान आमच्या प्रतिपक्ष्यांनींहीं कबूल केलें पाहिजे. " अशी प्रस्तावना करून पुढें तेच कोणत्या बंधनांत फेरफार होणें आवश्यक आहे हें पुढीलप्रमाणें सांगत आहेतः—

" मूर्तिपूजा अजिबात बंद करणें, यज्ञयागाचें थोतांड क्रमाक्रमानें

शिथिल होत जाणें, वर्णसंकर होऊन पाहिजे त्याला पाहिजे त्याशीं अन्नोदकव्यवहार करण्याची किंवा लग्न लावण्याची सदर परवानगी असणें, पाहिजे त्यानें पाहिजे त्या शास्त्रांचा किंवा धर्मग्रंथांचा अभ्यास करणें, स्त्री–पुरुषांनीं हव्या त्या वयापर्यंत किंवा मुळींच अविवाहित राहणें, स्त्रियांस हवी ती विद्या संपादूं देणें किंवा हवा तो धंदा करूं देणें, ज्यानें त्यानें आपल्या तब्यतीप्रमाणें लग्न करणें, अशौचादि कोणत्याही प्रकारच्या कारणानें कोणासही कुरूपता न येणें, और्ध्व-देहिकादि गलिच्छ व अमंगल संस्कार बंद करणें वगैरे वगैरे गोष्टी प्रचारांत आल्यास कोणत्याही प्रकारची धर्महानि होईल असें आम्हांस वाटत नाहीं. ”

या उताऱ्यांत ‘ बंद करणें ’ ‘ परवानगी असणें ’ ‘ करूं देणें ’ अशीच भाषा सर्वत्र ऐकूं येतें. परन्तु एकाही ठिकाणीं ‘ अमुक करूं नये ’ किंवा ‘ अमुक करण्यास हरकत आहे ’ असा वाक्यप्रयोग त्यांत नाहीं, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. या उताऱ्यापुढें ‘ तें ( शिक्षण ) मिळून त्यांचीं मनें सुसंस्कृत होईपर्यंत सर्वसामान्य अशीं कांहीं बंधनें करून घेण्यास आम्ही राजी आहों ’ असें कै० आगरकरांनीं एक विधान केलेलें आहे. त्यावरून आमचा मुद्दा त्यांच्या लक्षांत होता हें व्यक्त होतें. परन्तु ‘ पण तीं आज ठरविणार कोण व त्यांचा अंमल करणार कोण हें मात्र कळत नाहीं. ’ हें वाक्य वाचून मात्र साश्चर्य दुःख वाटतें. बंधनोच्छेदाची सविस्तर यादी देणारास एकाही बंधनाची सूचना करतां येऊं नये व त्यास रूढ करण्याचा मार्गही दिसूं नये व अशा परिस्थितींतही असलेल्या बंधनांच्या उच्छेदास त्यानें पुढें सर-सवावें या कारभारास सनातनी अनुयायांनीं बेजबाबदार समजून त्याची उपेक्षा व प्रतिकार केला तर त्यांत त्यांस फारसा दोष देण्यास जागा नाहीं हीं गोष्ट कोणीही प्रांजल वाचकानें मान्य केली पाहिजे.

वर दिलेल्यापैकीं दुसऱ्या पक्षाची सुधारणा कशी सदोष आहे याचें विवेचन केलें. त्यावरून तिसऱ्या पक्षाबद्दलचा सनातन्यांचा रोष तीव्र स्वरूपाचा कां आहे हें समजून येतें. त्यांनींही नवीं बंधनें रूढ करण्याचा मार्ग शोधून काढलेला नाहीं. फार काय, बंधनें पाहिजेत याही गोष्टीबद्दल त्यांच्यांत एकमत नाहीं. उ० ' बंधनापलीकडे ' जाण्याकरितां एकजीवानें धडपडणाऱ्या प्रभाकर–मैनांच्या मतांतीलच अंतर पहा ! ' समाजाविरुद्ध किंवा समाजांतील सर्व संस्थांविरुद्ध माझें बंड नाहीं. मला समाज हवा आहे व सामाजिक संस्थाही हव्या आहेत. ' असें म्हणून प्रभाकर कांहीं बंधनांस तरी मान तुकविण्यास तयार दिसतो. तर मैना ' जोंपर्यंत मनुष्याच्या बुद्धीचा विकास व ज्ञानाचें क्षेत्र परिमितावस्थेंतच आहे, तोंपर्यंत आकस्मिक कोसळणारे प्रसंग टाळतां येणें शक्य नाहीं. ते टाळण्याकरितां कृत्रिम बंधनांची योजना करणें शहाणपणाचें आहे असें मला वाटत नाहीं....शिवाय बंधनांस एकदां सुरवात झाली म्हणजे एकाकरितां दुसरं, दुसऱ्याकरितां तिसरं, असं अगणित बंधनाचं जाळं सारखं वाढतच जातं ' असें म्हणून सर्व बंधनें कुचकामाची ठरविणारी याप्रमाणें ' कांहीं बंधनें ' पाहिजेत असें नुसतें म्हणणारे पण प्रत्यक्ष चळवळींत विध्वंसक भागावर जोर देणारे व कोणतींच बंधनें नकोत असें प्रतिपादणारे तिसऱ्या वर्गांतील सुधारक यांस सनातनी अनुयायांनीं सारखेंच लेखलें तर त्यांत त्यांचा तरी अपराध कोणता ?

दोन्ही प्रकारच्या सुधारकांबद्दल सामान्य जनतेंत कांहींसा असंतोष आहे तो या कारणामुळें. तो घालविणें असल्यास बंधनांच्या ग्राह्या-ग्राह्यतेचा विचार होणें आवश्यक आहे. असलेल्या बंधनांच्या केवळ कुचेष्टेनें नैसर्गिक (?) बंधनांची प्रतिष्ठा वाढणार नाहीं. बंधनराहित्याची प्रतिष्ठा वाढावी अशी इच्छा असेल तर मानवी समाजाची प्रगति कशानें होईल हें नव्या पक्षानें स्पष्टपणें दाखविलें पाहिजे. अन्तःकरणें

सुसंस्कृत व निर्मळ झाल्यानें ती होईल हें खरें, पण बंधनें सोडून दिल्यास अन्तःकरणें शुद्ध व सुसंस्कृत करणारें दुसरें साधन नाहीं असा आजपर्यंतचा अनुभव आहे. सदर अनुभव चूक असेल तर दुसऱ्या कोणत्या सुलभ साधनांनीं वरील गोष्ट साध्य होईल हें जनतेस त्यांनीं उदाहरणानें दाखविलें पाहिजे. तेव्हां नव्या जगांतील नव्या शोधांचा विचार करून ते आमच्या या हवामानांत ज्या तऱ्हेनें पसरावितां येतील त्या मानानें पसराविण्याचा नवीनांनीं प्रयत्न करावा. त्यांचा ( त्या सत्य नैसर्गिक व सुलभ मार्गांचा ) प्रसार सुरू झाला म्हणजे जुनीं बंधनें आपोआप नाहिंशीं होतील त्याकरितां एवढें अकांडतांडव नको. अस्तु.

येथपर्यंतच्या विवेचनाचें सार एवढेंच कीं, सुधारकांनीं केवळ गतानुगतिक बनून समाजास शिव्या देणें व जुन्या रूढींवर तोंडसुख घेणें हें आतां प्रभावी ठरणार नाहीं. कै. आगरकर व टिळक यांच्या काळीं समाज रूढ बंधनांनीं अगदीं जखडलेला होता, म्हणूनच त्यांनीं बंधनोच्छेदाच्या भाषेवर जोर दिला. अर्थात् यांत त्यांस फारसा दोष देण्यास जागा नाहीं. पण आजची परिस्थिति अगदीं निराळी आहे. आज सुक्यांबरोबर ओलीं बंधनेंहि जळून गेलीं आहेत. आज समाजास कोणताच धरबंध राहिलेला नाहीं. आम्हांस कसलीहि चीड नाहीं किंवा वेड नाहीं. आमचा समाज निराळ्याच अर्थानें स्थितप्रज्ञ बनलेला आहे. तेव्हां आतां सर्वांनाच अप्रिय वाटणाऱ्या बंधनांचा पुन्हा प्रचार करण्यावांचून खरी सुधारणा अशक्य आहे.

अभिनव सुधारकाचें काम किती कठिण आहे हें यावरून ध्यानांत येईल. घर पाडण्यापेक्षां तें बांधणेंच कठिण असतें. फार काय, शेजारीं अत्यंत सोईचें घर दिसून येईल तर पहिलें न पाडतांही लोक त्याकडे धाव घेतील ! अशा वेळीं एखादा त्या जुन्या घरांत ‘ चौथ्यावर दिवा लागावा ’ या भावनेनें राहिलाच तर राहील ! पण तोही नव्या प्रासादाकडे कौतुकानेंच पाहील ! अभिनव सुधारकांस हा नाना

प्रासाद तयार करण्याचें अवघड काम करावयाचें आहे. अर्थात् एकदोन माणसांनीं होणारें हें काम नव्हे. त्यास अनेकांनी मनोभावानें साह्य केलें पाहिजे. प्राचीनांचा पक्ष या प्रकरणांत उत्तम रीतीनें मांडलेला आहे तो एवढ्याच करितां कीं, या सुधारणेंत त्यांची हेटाळणी आहे असें त्यांस वाटूं नये.

नवीनांस तर हा मार्ग पटण्यास कांहींच हरकत नाहीं. कारण त्यांना ज्यांचें भय वाटतें त्या रूढिप्रामाण्याचा किंवा शब्दप्रामाण्याचा आधार घेऊन आम्हीं या आमच्या अभिनव बंधनांची उभारणी केलेलीच नाहीं. त्यांत कित्येक त्यांस निरुपयोगी वाटतील, पण अवनतिकारक खास वाटणार नाहींत. प्राचीन व नवीन दोन्ही प्रकारच्या जनसमुदायास याप्रमाणें सांभाळून धरूनच यापुढील सुधारकांनीं आपले विचार, उच्चार व आचार ठरविले पाहिजेत.

यांपैकीं विचारांबद्दल लिहावयाचें तर धर्मसुधारकानें जुन्या धर्मशास्त्राचें योग्य परिशीलन करणें आवश्यक आहे. निर्णयसिंधु, मनुस्मृति असल्या ग्रंथांचीं मराठी भाषांतरें आतां झालेलींच आहेत. शिवाय गेल्या दोन अडीच वर्षांत धर्मावर चिकित्साप्रधान व ऐतिहासिक दृष्टीनें लिहिलेलेहि अनेक ग्रंथ मराठींत प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या मदतीनें प्राचीन अध्ययनप्रणालीचा परिचय नसतांही धर्मशास्त्राची ओळख करून घेतां येईल. धर्मशास्त्राची इतपत ओळख प्रत्येक कार्यकर्त्यानें अवश्य ठेविलीच पाहिजे. ती न ठेविल्यामुळें " मला धर्मशास्त्र ठाऊक नाहीं; मी धर्मशास्त्राचे मोठे मोठे ग्रंथ वाचलेले नाहींत. पण माझें हृदय धर्म जाणूं शकतें. त्यास साक्षी ठेवून मी....इ. " असे किंवा " प्रत्यक्ष प्रगतीच्या आड येणारें चोपडें मी फेंकून देतों ! असलें धर्मशास्त्र मी मानीत नाहीं. " असे उद्गार बाहेर पडतात. या उद्गारांत जी एक मनोवृत्ति व्यक्त होत असते ती सामान्य जनतेंत धार्मिक

सुधारणा प्रसृत करण्यास कशी अडचणीची आहे हें मागें पृ. २३ वर दाखविलेलेंच आहे. म्हणून आजच्या सुधारकानें जुन्या नव्या शक्य तेवढ्या धर्मशास्त्रीय ग्रंथांचें आस्थापूर्वक अभ्यसन करावें. या सर्व ग्रंथांतील सर्वच विचार त्यानें मान्य केले पाहिजेत असा आग्रह नाहीं. पण—या विशेषतः नव्या चिकित्साप्रधान पद्धतीनें लिहिलेल्या—ग्रंथांचें परिशीलन त्यानें अवश्य केलें पाहिजे. त्याशिवाय त्याचा बुद्धिवाद प्रभावी ठरणार नाहीं. या नव्या ग्रंथांपैकीं कित्येक ग्रंथ शास्त्रीपंडितांनीं लिहिलेले असल्यामुळें त्यांचें ज्ञान असल्यास सनातनी पंडितांच्या कोणत्याही कोटिक्रमाचें दडपण पडण्याचा प्रसंग सुधारकांवर येणार नाहीं हा त्या वाचनाचा आणखी एक फायदा आहे.

हिंदुमहासभा प्रचारार्थ पुष्कळच पैसा खर्च करते! पण त्याचा योग्य तो परिणाम होत नाहीं. याचें कारण तिच्या उपदेशप्रणालींत आहे. हिंदूंची मनोवृत्ति ‘ सर्वांभूतीं भगवंत ’ पाहणारी असल्यामुळें दुर्दैवानें ती सहिष्णु बनलेली आहे. यामुळें केवळ इतरधर्मद्वेषावर उभारलेला उपदेश व कार्यव्यापार त्यांस संघटित करूं शकणार नाहीं. मुसलमानांच्या आक्रमणाचें आंकडेवारीनें दिलेलें वर्णन त्यांस चेव आणण्याऐवजीं हताश करण्यासच अधिक कारणीभूत होणार! हें तत्त्व हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांस अजून फारसें अवगत झालेलें नसल्यामुळें आमचे धर्मग्रंथ पाहण्याची त्यांस आवश्यकता भासत नाहीं. यामुळें आमच्या धर्माचें वास्तविक स्वरूप त्यांस अवगत होत नाहीं. प्रचाराच्या वेळीं याच कारणास्तव एक तर या महत्त्वाच्या विषयाबद्दल मुग्धता स्वीकारण्याचा प्रसंग प्रचारकावर येतो किंवा भलतेच सिद्धांत दडपून देऊन किंवा प्राचीन शास्त्रांस शिव्या देऊन वेळ मारून न्यावी लागते. हिंदुमहासभेनें या गोष्टींचा नीट विचार करून हिंदुधर्माचें तत्त्वशोधन, तत्त्वप्रसार व आचारधर्माची विधायक सुधारणा हे विषय विशेष रूपानें आपल्या कार्यप्रणालींत समाविष्ट करून घेतले पाहिजेत;

म्हणजेच प्रचारकांस धर्मविचाराची आवश्यकता प्रतीत होऊन त्यांचें विचारसामर्थ्य वाढीस लागेल.

अभिनव सुधारकानें उपदेश ( उच्चार ) करतांनांहि अधिक सावधगिरीनें वागलें पाहिजे. जुन्या आचारविचारांबद्दल सरसकट तिरस्कार, किंवा फाजील प्रामाण्यग्रह उत्पन्न न होईल अशाविषयीं त्यानें खबरदारी घेतली पाहिजे. कोणत्याही एकाच पक्षाचे दोष न दाखवितां त्याबरोबर शक्य तों दुसऱ्याही पक्षांतील अडचणी दाखवाव्या. तसेंच केवळ दोषाविष्करण न करतां गुणांचेंही त्याबरोबरच आविष्करण करण्यास विसरूं नये. सुधारणेस अनुकूल असे प्राचीन आधार मिळतील तर ते अवश्य दाखवावे.

हा उपदेश केवळ व्याख्यानांनींच करावा असें नाहीं. कीर्तन, पुराण, प्रवचन, निरूपण वगैरे जुन्या साधनांचाही यांत समावेश असावा. रोजच्या आचारसुधारणेचें मूळ खोल रुजण्यास या नित्यव्यवसायी धर्मोपदेशकांचीच आवश्यकता आहे. मात्र या उपदेशकांनीं जुन्या पठडींत योग्य ते फेरफार केले पाहिजेत. या दृष्टीनें या जुन्या उपदेशकवर्गाचें पुनरुज्जीवन होणें आवश्यक आहे.

वास्तविक हें काम शंकराचार्य, मध्वाचार्य इत्यादि आचार्यांचीं पीठें व सन्तमहन्त यांचें आहे. धर्मोपदेशक व पुरोहितवर्ग यांची योग्य प्रकारें संघटना करून त्यांच्या साह्यानें सुधारणा दृढमूल करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. तें ते बजावतील तरच त्यांस आतां जनतेचा पाठिंबा मिळेल.

पण दुःखाची गोष्ट अशी कीं, आमच्या धर्मगुरूंस या त्यांच्या कर्तव्याची जाणीवच नाहीं. गेल्या चातुर्मास्यांत महाराष्ट्राच्या राजधानींत श्रींचा मुक्काम होता. त्यावेळीं पुण्यांतील जवळजवळ सर्व

लहान मोठ्या संस्थांनीं त्यांच्या पाद्यपूजा * केल्या ! रोज लहानमोठे कार्यक्रम मठांत झडतच होते. शिवाय श्रींचीं प्रवचनें व कोटिलिङ्गार्चनेंहि झालीं तीं वेगळींच ! याप्रमाणें पुण्याच्या जनतेनें श्रींचें कोडकौतुक पुष्कळच केलें. पण स्वतः धर्मगुरूंनीं जनतेकरितां किंवा धर्माकरितां काय केलें ? आमचा मोडकळीस आलेला धर्म सावरण्याकरितां हिंदूंत नवचैतन्य उत्पन्न होण्याकरितां त्यांनीं काय केलें ? अखिल हिंदु तर राहोतच; पण निदान सर्व स्पृश्य, फार काय त्रैवर्णिकांचेंहि ऐक्य घडवून आणण्याचा योग्य तो प्रयत्न श्रींनीं केला नाहीं. असल्या कर्तव्यपराङ्मुख धर्मगुरूंपासून काय फायदा होणार ?

श्रींनीं पुण्याच्या मुक्कामांत धर्मोद्धाराचा तर प्रयत्न केला नाहींच. पण सकेशा, अस्पृश्य वगैरे हिंदूंतीलच कित्येकांस जवळजवळ धर्मबाह्य ठरवून हिंदूंचें संख्याबल मात्र कमी करण्याचा प्रयत्न केला. असले प्रकार पाहिले म्हणजे खरोखरच खेद उत्पन्न होतो. हिंदुसंघटनेपेक्षां कोटिलिंगार्चनाचेंच ज्यांस अधिक महत्त्व वाटतें, तसेंच अस्पृश्यांच्या वस्तींत मठ जाऊं शकत नाहीं हें सांगण्यांत ज्यांस फुशारकी वाटते, त्यांस हिंदुधर्माचा अर्थच कळलेला नसतो. मग त्यांस धर्मगुरु कसें म्हणतां येईल ? सर्व हिंदूंसहि जे जवळ करण्यास असमर्थ आहेत त्यांच्या जगद्गुरु या पदवींत अर्थ तरी कोणता ? म्हणून या खऱ्या धर्मसुधारणेस वर्तमान जगद्गुरूंकडून प्रोत्साहन मिळून

---

* केवळ पाद्यपूजेबद्दल तत्पर असणाऱ्या गुरूंची व चेल्यांचीहि श्रीतुकाराममहाराजांनीं पुढीलप्रमाणें पाद्यपूजा केलेली आहेः—

जळो जळो तें गुरुपण । जळो जळो तें चेलेपण ॥
गुरु आला वेशीद्वारीं । शिष्य पळतो खिडोरीं ॥
काशासाठीं जालें येणें । त्याचें आलें वर्षासन ॥
तुका म्हणे चेला । गुरु दोघे नरकाला ॥

त्याकरितां उपदेशकवर्गाची संघटना होणें अशक्य असलें तरी निराश होण्याचें कारण नाहीं. उपदेशकवर्ग व पुरोहितवर्ग उत्तम तऱ्हेचा निर्माण होईल याविषयींची योग्य ती तजवीज सुधारकांनींच हातीं घेतली पाहिजे. या अभिनव सुधारणेचा प्रसार याप्रमाणें व्यापक धोरणावर झाला पाहिजे.

नव्या नियमांच्या अम्मलबजावणीबद्दलचें धोरणहि आतां बदललें पाहिजे. आज कोणतेच नियम सर्वसामान्य नसले तरी कार्यकर्त्यांनीं व्यक्तिशः प्रयत्न करून पांचपांच दहादहांचे गट बनवून संघटना कशी साधावी याचे नियम पुढील प्रकरणांत ( पृ. ३४० पहा ! ) दिलेले आहेतच ! प्रत्येक हिंदूनें त्यांचा अवलंब करणें आवश्यक आहे.

सनातनधर्माखालीं जे अनन्त आचार चालू आहेत त्यांपैकीं आवश्यक तेवढ्यांचाच या ग्रंथांत विचार केलेला आहे. तेवढ्या बाबतींत नीट विचार करून जरी—थोड्या फार फरकानें कां होईना—सर्वसामान्य धोरण ठरवितां आलें तरी ' स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' या न्यायानें मोठेंच कार्य होणार आहे. म्हणून या विशेष प्रकारच्या स्वयंशासनाचे पुढील प्रकरणांत जे नियम दिलेले आहेत त्यांकडे प्रत्येक वाचकानें लक्ष द्यावें असें सुचवून येथें सुधारकांस आवश्यक असलेल्या दोन गोष्टींचें विवेचन करतों.

त्यांपैकीं पहिली ही कीं, आजच्या धर्मसुधारकांनीं परधर्मांतील चांगल्या तत्त्वांचा अभ्यास करावा, व आपल्या धर्मांतील लोक परधर्मांत कां जातात याचा गंभीरतेनें विचार करावा. मूळ धर्मस्वरूप कितीहि उच्च असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत जर संकुचितपणाचा कळस होऊं लागला तर कित्येक सात्त्विक वृत्तीच्या भाविकांस तो धर्म नकोसा वाटतो. सर्वच द्रव्याच्या किंवा सबगोलंकाराच्या इच्छेनें परधर्म स्वीकारतात अशी वेडी समजूत बाळगणें चुकीचें होय !

" टिळक ख्रिस्ती होणार असें पेंडशांना कळलें तेव्हां त्यांचें पत्र

आलें कीं, तुम्ही मजजवळ येऊन रहा. मी तुम्हांला जन्मभर पोशीन व दत्तूची विद्या करीन. तुम्ही माझ्या येथें मांसमच्छर खा. वाटेल ते प्या, मी तुम्हांला मुळींच मना करणार नाहीं. पण तुम्ही ख्रिस्ती होऊं नका. " ( स्मृतिचित्रें १६३ ) हा उतारा यादृष्टीनें लक्षांत ठेवण्यासारखा आहे. पेंडशांना रे. टिळक ख्रिस्ती कां होत आहेत याचें बरोबर निदानच झालें नाहीं. पेंडशांनीं दाखविलेल्या अडचणींमुळें ते ख्रिस्तीधर्म स्वीकारणार नव्हते. रे. टिळकांनीं याच कारणास्तव त्यांस " मी ख्रिस्ती होत नाहीं. आणि झालोंच तर पैशासाठीं होणार नाहीं." ( स्मृतिचित्रें पृ. १६२ ) असें मार्मिक उत्तर दिलेलें होतें.

रे. टिळकांनींच नव्हे तर त्याबरोबरच सावरकर मोडक वगैरे ज्या कित्येक उच्च घराण्यांनीं स्वधर्मत्याग केला त्यांचें मनोविश्लेषण करून त्यांची समजूत त्यावेळच्या हिंदुधर्माभिमान्यांनीं काढली असती तर त्यांनीं धर्मान्तर न करतां याच धर्मांत राहून हिंदुधर्मसुधारणेचें काम फारच चांगल्या प्रकारें बजावलें असतें. पण दुर्दैवानें तसें घडून आलें नाहीं. आध्यात्मिक उन्नतीच्या केवळ गप्पा मारावयाच्या व प्रत्यक्ष व्यवहारांत अगदीं मानव्याला न शोभणारे प्रकार करावयाचे हें जितकें निंद्य तितकेंच केवळ ऐहिक किंवा सामाजिक उत्कर्षाचें ध्येय पुढें ठेवून धर्मसुधारणा करूं पाहणें अविचाराचें होय. रे. टिळकांस आध्यात्मिक शान्ततेची क्षुधा होती व ती शमविण्याचें साधन हिंदुधर्मांत नाहीं असें त्यांस प्रामाणिकपणें वाटत होतें " ख्रिस्ती धर्माकडे माझ्या मनाची प्रवृत्ति होत आहे. मनुष्याच्या मनास शांति, भक्ति, नीति, धृति, मुक्ति देणारा हा धर्म दिसतो ! कांटे, झाडें, खोल दऱ्या, भयंकर पर्वत भयाण वाळवंटें व मनोरम आंबराई यांनीं गजबजलेल्या अमर्याद हिंदुधर्मापेक्षां ह्या लहानशा ख्रिस्तीधर्मरूप सदाप्रफुल्ल व सुफलित बगीच्यांत राहणें बरें असें वाटत आहे. " ( डायरी १८–२–९४ स्मृतिचित्रें पृ. १४२ )

" मनुष्यास इहपर सुखदायक, पूर्णपणें सुसाध्य व आनंददायक धर्म म्हणजे क्रिश्चियानिटी असा माझा विश्वास बनत आहे. जीझस यास परमेश्वराचा पुत्र मी मानीत नाहीं. पण अत्यंत उदार महात्मा मानतों ! हें मी प्रांजलपणें कबूल करतों. " ( डायरी १३–२–९४ स्मृतिचित्रें पृ. १४३ )

हे रे. टिळकांच्या डायरींतील उतारे या दृष्टीनें मननीय नाहींत, असें कोण म्हणेल ? हिंदुधर्म सर्वसंग्राहक आहे, हें ज्या सुधारकांस पटवून द्यावयाचें असेल त्यांनीं यापुढें तरी परधर्माच्या कुचेष्टेनें स्वतःच्या धर्माची प्रतिष्ठा वाढविण्याचा मोह आवरावा. दोन्ही धर्मांचा तात्त्विक अभ्यास हाच यापुढें प्रभावी ठरू शकेल. म्हणून आजच्या सुधारकांनीं परधर्मनिंदेवर भर देऊं नये. परधर्मीयानें मर्यादातिक्रमण करून आपल्या धर्माची निंदा केली किंवा स्वधर्मीयांस व्यर्थ उपद्रव केला तर तोडीस तोड म्हणून योग्य तो इलाज करणें प्राप्तच आहे. अशावेळीं नसती दया दाखविणें धर्म्य नाहीं. नुकताच पुण्यांत दंगा झाला, त्या नंतर शांतताकमिटीनें मशिदी दुरुस्त करण्याचा उद्योग हातीं घेण्याचा घाट घातला आहे. पण मुसलमानांनींच मूळ आगळीक केली असून तशी त्यांच्या पुढाऱ्यांकडून निदान कबूली तरी घेतली पाहिजे याची वास्तपुस्तहि कोणी करीत नाहीं. अशा प्रसंगीं औदार्य दाखविणें रास्त नाहीं. अशासारखा प्रसंग नसेल तेव्हां मात्र उगाच परधर्मीयांची निंदा करू नये. कारण मागील प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें हिंदुधर्म हा व्यापक असल्यामुळें त्यास सर्व संप्रदाय स्वतःमध्यें समाविष्ट करून घेण्याचें सामर्थ्य आहे हें विसरून चालणार नाहीं. संघटन विरोधाच्याच बळावर टिकून राहतें ही समजूत चुकीची आहे. म्हणून धर्मोपदेशकांनीं या बाबतींत विशेष काळजी घ्यावी.

दुसरी गोष्ट आचरणाच्या शुद्धीची ! विशेषतः व्यभिचार व पैशाची अफरातफर यांपासून सुधारकानें अगदीं दूर राहिलें पाहिजे. कित्येक

वेळां दुसरा कोणी पुढारी न मिळाल्यामुळें हे दोष ठाऊक असूनहि लोक अनन्यगतिकपणें त्यासच पुढारी मानतात. पण स्वतः दुराचारी असलेल्यास दिवसेंदिवस दुर्गुणांचा द्वेष कमी कमी वाटत जाऊन शेवटीं तो कोणत्याहि दुर्गुणाविरुद्ध तीव्र रणसंग्राम माजवीनासा होतो. यामुळें समाजांतील गुणवृद्धीस आळा बसून शेवटीं समाजाचा ऱ्हास होतो. वैयक्तिक दुर्गुणांचा याप्रमाणें सामाजिक परिणाम होतो. सर्वच दुर्गुण बाधक होत नाहींत. म्हणून वर दोनच मुख्य दुर्गुणांचा उल्लेख केलेला आहे. असो. उपदेशक व पुढारी यांनीं याप्रकारें दोन गोष्टी लक्षांत बाळगून सुधारणेचा प्रसार कसा व्यापक धोरणावर केला पाहिजे, हें पाहून झालें. आतां प्रत्येक समंजस धर्मबांधवानें या सुधारणेस कशी मदत करावी हें जाणण्याकरितां उपसंहाराकडे वळूं.

## प्रकरण तेविसावें

# उपसंहार

येथपर्यंत पूर्वसंकल्पाप्रमाणें हिंदूंमध्यें आज रूढ असलेल्या आचार-धर्मांचें तात्त्विक व व्यावहारिक दृष्टींनीं परीक्षण केलें. आज अनेक दृष्टींनीं या प्रकारच्या विवेचनाची आवश्यकता आहे. केवळ धार्मिक क्षेत्रांतच नव्हे तर राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक वगैरे इतर क्षेत्रांतही आज रूढिवाद किंवा वचनवाद यांस इतकें महत्त्व प्राप्त झालेलें आहे, कीं त्यामुळें तत्त्ववादास सर्वत्र माघार घ्यावी लागत आहे. कांहीं एका मर्यादेपर्यंत रूढिवाद व वचनवाद यांस मान देणें युक्तच आहे. पण तत्त्ववादाकडे सर्वस्वीं पाठ फिरवून मात्र कधींही प्रगति होणार नाहीं. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस याप्रमाणें त्या त्या क्षेत्रांत तत्ववादाच पुरस्कार अत्यंत आवश्यक आहे. या ग्रंथांत समाजसुधारक व धर्म-सुधारक यांस तत्ववादाचा पुरस्कार करून आपापला कार्यक्रम ठरविणें कसें आवश्यक आहे हें विस्तारानें दाखविलें आहे. त्यावरून इतर क्षेत्रांतील कार्यकर्त्यांसही योग्य तो बोध होईल अशी अपेक्षा आहे. तत्त्ववादाच्या पुरस्काराची याप्रमाणें सार्वात्रिक अपेक्षा सूचित व्हावी हा या ग्रंथाचा प्राथमिक हेतु आहे.

हा ग्रंथ लिहिण्याचा दुसराही एक उद्देश आहे. तो म्हणजे धर्म-विचाराच्या खऱ्या प्राचीन व तर्कशुद्ध पद्धतीचा प्रचार हाच होय. वास्तविक या तात्त्विक धर्मनिर्णयपद्धतींचें विवेचन धर्मस्वरूपनिर्ण-याच्या १२, १३ व १४ या प्रकरणांत केलेलेंच आहे. तथापि तें फारच तात्त्विक व सामान्य स्वरूपाचें असल्यामुळें विशेष स्वरूपाच्या आचारधर्मांचा निर्णय करतांना कसें उपयोजावें ही आकांक्षा शिल्लक राहतेच ! त्या आकांक्षेची पूर्ति या ग्रंथानें होईल. वचनांचा कस धर्म-

तत्त्वांवर घासूनच कसा ठरवावा हें या ग्रंथांतील विवेचनावरून चांगलें लक्षांत येईल असा विश्वास वाटतो. या पद्धतीस ' तात्त्विकपद्धति ' असें म्हणावयास हरकत नाहीं. मीमांसापद्धतीप्रमाणें या पद्धतींत धर्मग्रंथांचा विचार केला जात नाहीं. धर्मग्रंथ निरनिराळ्या परिस्थितींत व निरनिराळ्या ग्रंथकारांनीं केले हें तत्त्व मीमांसापद्धतीस संमत नाहीं. धर्मास व धर्मग्रंथांस इतिहास नाहीं असें त्या पद्धतींत गृहीत धरलें आहे. या गृहीतकृत्याशीं स्पष्ट विरोध व्यक्त व्हावा म्हणून याच पद्धतीस ' ऐतिहासिकपद्धति ' असेंही नांव केव्हां केव्हां योजिलेलें आहे. ( पहा ! सातारा विद्वत्परिषदेचें इतिवृत्त पृ. ९५ ) या ऐतिहासिकपद्धतीचा किंवा तात्त्विक पद्धतीचा धर्मनिर्णयाच्या कामीं कसा उपयोग करावा हें दाखविणें हा या ग्रंथाचा दुसरा उद्देश आहे.

गेल्या अडीच वर्षांत तत्त्ववादी किंवा तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी पक्षाची भूमिका व्यक्त करणारे जे कित्येक ग्रंथ महाराष्ट्रांत प्रसिद्ध झाले त्यामुळें तत्त्ववाद्यांच्या मताबद्दल सर्वत्र चर्चा सुरू झालेली आहे हें सुचिन्हच आहे. अशा प्रकारच्या चर्चेंत प्रतिपक्ष्यांकडून तत्त्ववाद्यांवर जे कित्येक आरोप केले जातात त्यांत ' यांना असलेला धर्म बुडविण्यांत पुरुषार्थ वाटतो ' या आक्षेपाची प्रामुख्यानें गणना केली जाते. हा आक्षेप जरी विशेष पुरावे न देतां केवळ कुचेष्टेनेंच मांडला जातो तरी वारंवार तोच तोच आक्षेप अनेक वक्त्यांच्या तोंडून बाहेर पडत असल्यामुळें सामान्य जनता तत्त्ववादी पक्षाच्या सद्धेतूबद्दल साशंक झालेली आहे, ही गोष्ट नाकबूल करून चालणार नाहीं. तत्त्ववादी पंडितांस अद्यापि संख्याबल कमीच असल्यामुळें, तसेंच प्रत्येक धार्मिक क्रियाकलापाबद्दलचें त्यांचें विवेचन केवळ शब्दप्रधान न होतां तत्त्वप्रधान होत असल्यामुळें तर ही साशंकता अधिक फैलावण्यास मदतच होत आहे. अशा वेळीं रूढ आचारांतील किती भाग तत्त्ववादी पंडितांस मान्य व किती अमान्य आहे हें स्पष्ट केल्यांवाचून गत्यन्तर नाहीं हें लक्षांत घेऊन या ग्रंथांत रूढ

आचारधर्माचें समीक्षण करून अखिल हिंदूंच्या अभिवृद्धीच्या दृष्टीनें आज उपयुक्त दिसणाऱ्या विधायक आचारधर्माचें स्पष्ट चित्र वाचकांसमोर ठेविलेलें आहे. याप्रमाणें तत्वनिष्ठ परिवर्तनवादी पक्षाबद्दलचे गैरसमज दूर करून त्या पक्षाचा विधायक कार्यक्रम *दिग्दर्शित करणें हा या ग्रंथाचा तिसरा हेतु होय.

या ग्रंथाची आजच्या सर्वांगीण राष्ट्रोन्नतीस कशी आवश्यकता आहे हें या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणांत विस्तारानें दाखविलेलेंच आहे. त्याकडे लक्ष देऊन समाजनेत्यांनीं धर्मकारणाची उपेक्षा सोडून उत्साहपूर्वक धर्मसुधारणेच्या कामास सिद्ध व्हावें हाही हा ग्रंथ लिहिण्यांतील एक प्रमुख उद्देश आहे.

हिंदुमहासभा, ब्राह्मणसभा वगैरे खास हिंदुधर्मीयांकरितां स्थापन झालेल्या संस्थाही धर्मोन्नतीस अत्यंत आवश्यक असलेल्या विचारांस व आचारांस चालना देऊं शकत नाहींत. हिंदुसमाजांतील शेंकडो ज्ञातीय सभांचे कार्यक्रम पाहिले तरी त्यांत धार्मिक उन्नतीच्या दृष्टीनें कांहींही कार्य चालल्याचें दिसून येत नाहीं. आज विधायक धार्मिक कार्यक्रम कोणता असावा याचा नुसता विचारही या संस्थांचे चालक करीत नाहींत असें दिसून येतें. ही दुरवस्था नष्ट व्हावी म्हणून धर्मोन्नतीस पोषक असा विधायक कार्यक्रम या ग्रंथांत वर्णिलेला आहे.

---

* या ग्रंथांतलि सर्वच विधानें तत्ववादी पक्षांतील प्रत्येक पंडितास अक्षरशः पसंत आहेत असें आज तरी म्हणतां येणार नाहीं. कारण हा ग्रंथ प्रसिद्धीपूर्वी सर्वच पंडितांस दाखविलेला नाहीं. तथापि या पक्षांतील दोनतीन पंडितांस या ग्रंथाचें हस्तलिखित वाचून पाहिलेलें आहे. तसेंच नुकताच या पक्षाची जी नगर येथें परिषद भरली होती तीमध्येंही या ग्रंथांतलि कित्येक विधानें मान्य केलीं गेलेलींच आहेत. यावरून या ग्रंथांतलि आचारधर्म या पक्षांतलि सर्व पंडितास मान्य होण्याजोगा आहे असें सामान्यतः म्हणावयास आज तरी फारसा प्रत्यवाय नाहीं.

अखिल हिंदूंची धार्मिक उन्नति लक्षांत घेऊनच हा मार्ग आंखण्यांत आलेला असल्यामुळें ब्राह्मणांपासून हरिजनांपर्यंतच्या सर्व ज्ञातीय संस्थांस तो उपयुक्त होईल अशी आशा आहे. हिंदूंतील ज्ञातीय संस्थांस तसेंच प्रत्यक्ष हिंदुमहासभेसही याप्रमाणें धर्मोन्नतीचा विधायक कार्यक्रम दाखवून देणें हा या ग्रंथाचा आणखी एक प्रमुख उद्देश आहे.

सर्वांत प्रमुख व अत्यंत महत्त्वाचा जर कोणता उद्देश हा ग्रंथ लिहितांना प्रस्तुत ग्रंथकर्त्यानें सतत डोळ्यांपुढें ठेविलेला असेल तर तो सर्वसामान्य हिंदु बांधवांस धर्माबद्दल अधिक आस्थेवाईक बनाविणें हाच होय! बाह्यतः जरी आज हिंदु बांधव आपल्या धर्माबद्दल उदासीन दिसत असले तरी हिंदु समाजाचें अंतरंग मात्र हिंदुधर्मास पारखें झालेलें नाहीं. त्याला आंतून धर्म जगावा अशी तीव्र इच्छा आहे. पण योग्य मार्गाचें ज्ञान नसल्यामुळें तो किंकर्तव्यतामूढ बनलेला आहे. हिंदु समाजाच्या पुढाऱ्यांनीं हें हिंदु समाजाचें अंतरंग ओळखलेलें नसल्यामुळें आचारसुधारणेचा विषय ते टाळीत आहेत. नवा आचार रूढ करणें म्हणजे नवीं बंधनें घालणेंच होय! पण सत्तेच्या अभावीं तीं पाळलीं कशीं जाणार अशा शंकेनें पुढारी तो विषय टाळू पाहतात. ( मागील पृ. ३२५ पहा! ) सत्तेच्या अभावीं आपले अनुयायी एकही बंधन मानण्यास तयार होणार नाहींत मग उगाच हात दाखवून अवलक्षण करून घेण्यांत फायदा कोणता? असा आज पुढाऱ्यांचा ग्रह झालेला असून त्यामुळेंच समाजाचे नेते या विषयाची उपेक्षा करीत आहेत. अशा वेळीं सामान्यजनतेनेंच आपलें अंतरंग व धर्मप्रेम सक्रिय व संघटितरूपानें व्यक्त केल्याखेरीज पुढाऱ्यांचें लक्ष या विषयाकडे वळणार नाहीं. म्हणून सामान्य जनतेनेंच हें काम आंगावर घेतल्यावांचून आतां गत्यंतर नाहीं.

धर्माच्या मागें आज सत्ता नाहीं ही गोष्ट खरी. पण ती स्वतःच

उत्पन्न करतां येणार नाहीं असें नाहीं. भोवतालच्या जनतेस सोडून एकट्यानेंच एखादा आचार पाळावयाचें म्हटलें तर तें आजच्या बेबंदशाहीच्या युगांत फारवेळ टिकणार नाहीं. उलटपक्षीं सर्वांचें मतैक्य होईपर्यंत थांबणें म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखेंच आहे. परंतु पुढील प्रणालीनें सुरवात केल्यास या दोन्ही अशक्यकोटींस बगल देऊन काम सुरू करणें शक्य आहे. ती प्रणाली अशीः—

१ प्रस्तुत ग्रंथ समग्र वाचून त्यांत पसंत किती व नापसंत किती याची स्पष्ट नोंद करावी.

२ आपल्या मित्रमंडळीस ग्रंथ वाचण्याचा आग्रह करून त्यांच्याशीं विचारविनिमय करावा.

३ विचारविनिमयानंतर पसंत, नापसंत भागाची स्पष्ट नोंद करावी व तसें प्रस्तुत ग्रंथकर्त्याकडे कळवावें. (निदान पांच पांच जणांच्या गटांनीं आपलें मत संघटितरूपानें एकदमच कळवावें अशी अपेक्षा आहे. तसें न जमेल तर कमी संख्येच्या गटानें व तितकेंही जमण्यासारखें नसेल तर व्यक्तिशः एकेकट्यानेंहि कळविण्यास हरकत नाहीं.)

४ नापसंत भागाबद्दल दुसरे कोणते विधायक आचार पसंत पडण्यासारखे वाटतात तेंहि कळवावें.

या प्रक्रियेचा अवलंब करून वाचकांनीं ठिकठिकाणीं सध्यां केवळ विचारचालनेच्या धोरणानें गटस्थापना करणें अनेक दृष्टींनीं योग्य आहे. नव्या सुधारणामंदिराची हीच पहिली पायरी होय. आज अगदींच बेबंद भासणाऱ्या जनसमूहांत एका विचाराचे व एकाच प्रकारच्या आचारार्थ झटणार किती लोक आहेत हें प्रथम जाणून घेतलें पाहिजे. तरी श्रेष्ठ-कनिष्ठ-भाव व जात्यभिमान सोडून देऊन प्रत्येकानें या दृष्टीनें प्रयत्न करून निरनिराळ्या ठिकाणीं याप्रमाणें गट (गण) स्थापन करण्याचा उद्योग आरंभिला पाहिजे. प्रथमपासून या चळवळीस जाहीर

स्वरूप देऊन कांहीं फायदा होईल असें दिसत नाहीं. आपापल्या परिचितांत व सहव्यवसायांत या मतांची चर्चा खाजगी रीतीनें करून वरील तिसऱ्या नियमांत दाखविल्याप्रमाणें तिचें वृत्त आमच्याकडे पाठवावें एवढेंच तूर्त हितकर आहे. गटांचें प्रसिद्धीकरण किंवा प्रत्यक्ष सुधारणा मागाहून हातीं घेतां येईल. त्याची एकदम घाई करून कांहीही फायदा होणार नाहीं. असो. याप्रमाणें स्वतःच आतां स्वतःवर शासन लादून घेण्याचा समय आलेला आहे. अशा तऱ्हेच्या स्वयंशासनाची आवश्यकता सामान्य जनतेस स्पष्ट व्हावी, इतकेंच नव्हे तर त्या दिशेनें जनतेनें कार्यास लागावें हा या ग्रंथाचा सर्वांत प्रमुख उद्देश आहे.

धर्मशासनाच्या या पद्धतीस आम्ही "स्वयंशासनाची पद्धति" असें नांव देतों. ही पद्धत सकृद्दर्शनीं वेडगळ आहे असें वाटण्याचा संभव आहे. परंतु कै. लोकमान्य टिळकांनींच या पद्धतीचा अवलंब केला जावा असा प्रयत्न केला होता. ता. २६ आक्टोबर १८९० इसवी या दिवशीं पुण्यांत तुळशीबागेंत संमतिवयाच्या बिलाचा विचार करण्याकरितां भरलेल्या सभेस ज्या अनेक सूचना पाठविलेल्या होत्या त्यांत लोकमान्यांनींहि एक सूचना पाठविली होती. 'कायद्याच्या जोरावर सुधारणा सर्वांवर लादली जावी' व 'कायदा करूं नये' या त्या वेळच्या दोन परस्पर विरुद्ध मतांचा योग्य विचार करून 'ज्यांस या सुधारणा मान्य असतील त्यांनीं तेवढ्यापुरता सरकारांतून कायदा मागून घ्यावा' असा स्वयंशासनाचा मध्यम व युक्त मार्ग लोकमान्यांनीं त्यावेळीं सुचविला होता. लोकमान्य सदर सूचनेंत म्हणतातः—

"कायद्याची मदत घेऊन साऱ्या समाजावर एकदम सुधारणा लादण्यापासून फायदा न होतां गैरफायदाच होण्याचा संभव आहे. तेव्हां ज्यांना सुधारणेची खरी कळकळ आहे त्यांनीं सुधारणा अमलांत आणण्याबद्दल स्वतःस बांधून घ्यावें. या बंधनांप्रमाणें

वर्तन न घडल्यास.......त्याबद्दल कडक शिक्षा ठेवण्याविषयीं सरकारास विनंति करावी....२०० लोकांच्या सह्या मिळाल्या म्हणजे तेवढ्यांपुरताच सरकारापाशीं कायदा मागण्याची तजवीज करतां येईल........सह्या कुटुंबवत्सल व ब्राह्मण जातीच्या लोकांच्याच मुख्यतः पाहिजेत. समाजाच्या सुधारणेस कायदा पाहिजे असें प्रतिपादणाऱ्या लोकांपैकीं अशा रीतीनें स्वतःस कायद्यानें बांधून घेणारे किती आहेत हें कळण्यास हा उत्तम मार्ग आहे. ”
( श्री. केळकरकृत लो. टिळक यांचें चरित्र पूर्वार्ध पृ. २९३ )

हा उतारा अनेक दृष्टींनीं महत्त्वाचा आहे. लोकमान्यांच्या इच्छेप्रमाणें त्याचवेळीं सह्या घेतल्या गेल्या असत्या तर सुधारणा म्हणजे बेजबाबदारपणा असा प्रकार झाला नसता. पण दुर्दैवानें त्यावेळीं ती गोष्ट झाली नाहीं. त्यावेळच्या मानानें लोकमान्यांनीं तेव्हां एकंदर ८ सुधारणा सुचविल्या होत्या ( टिळकचरित्र पृ. २६२ पहा ! ) आज त्याहून अधिक किती पाहिजेत याचें वर्णन आम्ही या ग्रंथांत केलेंच आहे. तसेंच आजच्या विचित्र परिस्थितींत कायद्याचें बंधन लादून घेण्यास कोणी तयार होणार नाहीं हेंही आम्ही जाणून आहों. तथापि वरील उताऱ्याच्या शेवटीं द्योतित केल्याप्रमाणें खरे धर्मसुधारक किती आहेत हें जाणण्याची आमची इच्छा आहे. तसेंच आजचा काळ पुढें गेलेला आहे असें आपण समजतों. तेव्हां केवळ २०० सह्यांवर आमचें समाधान होणार नाहीं. ब्राह्मणवर्गाप्रमाणेंच इतर वर्गही आज पुढारलेले आहेत. अर्थात् आमच्या सुधारणेंत ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सर्वांनीं प्रामुख्यानें भाग घ्यावा अशी आम्हीं इच्छा केल्यास तीही वावगी होणार नाहीं. म्हणून लो. टिळकांनींच घालून दिलेली स्वयंशासनाची पद्धत आवश्यक तेवढे फेरफार करून आम्ही जनतेस सादर करीत आहों. तिला अनुसरून निदान १००० धर्मबांधवांच्या योजना आमच्याकडे आल्या म्हणजे एखाद्या सुमुहूर्तावर त्या सर्वांचा विचार

करून व सर्व धर्मसेवकांच्या साह्यानें स्पष्ट नियम बनवून सुधारणेस आरंभ करणें सहज शक्य आहे.

याप्रकारें या ग्रंथाचा विचार, उच्चार व आचार या क्रमानें त्वरित प्रसार करण्याचें कार्य वाचकवर्ग हातीं घेईल तर आज असंघटित किंकर्तव्यमूढ व दीन दिसणाऱ्या हिंदूंत नवचैतन्य उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. तरी वाचकांनीं ' धृत्युत्साहसमन्वितः ' हें गीतोक्त सात्त्विक कर्त्याचें लक्षण अंगीं बाणवून घेऊन तसेंच ' उद्धरेदात्मनात्मानम् ' या स्वयंशासनाच्या सर्वोत्कृष्ट पद्धतीनें आत्मोद्धार साधून ग्रंथपरिश्रम सफल करावे अशी प्रार्थना आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

॥ समाप्तिश्लोकाः ॥

धर्मस्यास्य तु सिद्धान्ताः पूर्वैरेव निरूपिताः ।
त एवात्र मया प्रोक्तास्तत्त्वदत्तैकदृष्टिना ॥
न मानं न धनं कीर्तिं पाण्डित्योल्लासमुत्तमम् ।
नार्थयामि यतः प्रोक्तं ' कृपणाः फलहेतवः ' ॥
इच्छामि समुद्धरणं दुस्तरकुनिबन्धपङ्कमग्नानाम् ।
पूर्वाचार्यचितानां गूढानां धर्मतत्त्वानाम् ॥
अत्र धर्मो वैदिकस्य संक्षेपेणैव दर्शितः ।
य एवं श्रद्धया कुर्यात् ध्रुवं स सुखमाप्नुयात् ॥
विदुषां निवहैस्तु रूढिवादात् ।
यददुष्टं निरटङ्कियच्च दुष्टम् ॥
मयि जल्पति तत्त्ववादगाथे ।
रघुनाथे मनुता तदन्यथैव ॥

# सूचि

( ही सूचि घाईनें तयार केलेली असल्यामुळें असावी तितकी परिपूर्ण नाहीं. वेद, उपनिषदें, महाभारत, रामायण, गीता, मनु, याज्ञवल्क्य वगैरेंचे उल्लेख मूळ ग्रंथांत वारंवार आलेले असल्यामुळें त्यांचीं नांवें सूचींतून अजी गाळावीं लागलीं आहेत. तथापि मुख्य मुख्य विषय कोठें कसकसे आलेले आहेत हें सूचित होण्यास या सूचीचा बराच उपयोग होईल असें वाटतें. )


अग्नि ४८
अतिथिसत्कार २०६
अधर्माची कसोटी १७
अनवधान २४६, २९०
अनाथालयें १९८
अन्तःसमाधान १४
अन्त्यज ३१०
अन्त्यविधि १५५
अपवाद २८९,२९०,२९६
अमंगल २३०
अमावास्या ८२,२२८
अल्बेरुनी ३६
अशुभकल्पना २२७, २३१, २३२
अश्लीलता ९१
अस्पृश्य ( ता ) ७६, ९१, २१६, २१७, २३७, २३८, २६५
अहिंदु ३१३
अहिंसा १६, २३५, २५०, २६९, २७१, २७४
आगरकर ३२४,३२५
आचारधर्म ३, ३३६
आचार्यपीठें ३३०
आत्मतुष्टि १४
आत्मा १५०,२३०
आनंद २१९
आपस्तंब ८३, १०३,१०४,१७४
आभ्यंतर पूजा ४२
आर्य ३००
आर्यसमाज ( जीय ) ३८,२६१, ३१३
आशौच ( सुतक, सोहेर पहा. )
आश्रमधर्म ५१
आहारशास्त्र ११४
आळस २९०, ३२२
इहलोक ३१३
उच्चनीचत्वकल्पना ५४
उत्सव ४९, ८८, १०६
उपनयन ६२, ९२, ९३
उपवास १३०, १३१, १३३, १४७
उपवास व मुलें १४४
उपवास व स्त्रिया १४४
उपासना ४२, ४३, ४५, ३१२
ऋषि–ऋण १७४
ऋषिपंचमी १३०, १४५
एकादशी १३२
एप्रिलफूल ९१

ऐतिहासिक पद्धति ३३७
ऐहिक उत्कर्ष १५,१६
ओवळें १७५,२३७
कच्छी मेमन् ३१६
कपिल २९९
करमणूक २१८,२२१
कर्तव्यमार्ग ७
कऱ्हाडे २९,१०२
कलियुग ३२
कलिवर्ज्य ३३,१६२
कवि १६९
कात्यायन ४८
कारकुनी १८७
कार्ल मार्क्स ५
काव्यानंद २१९
काशीविश्वेश्वर ४५,६८
कुंकू १५५, २३२, ३१५
कुमारिलभट्ट ३२१
कुर्तकोटी ( डॉ. शंकराचार्य ) २३७
केशश्रृंगार १७०
केळकर ( तात्यासाहेब ) ७
खाणावळ ११५,१७७,१८०,१९५
खांडेकर ८
ख्रिस्ती ( ख्रिश्चन ) धर्म ७९,१५०, २५६,२५७,३०३,३३३
गंध २३२
गणपति ३१४
गणेशोत्सव ७९, ८८, १०३, १०५, १०७,१११
गायत्रीमंत्र ४६, १७२, २९६
गृहश्रृंगार १७०
गृहस्थवर्ग २००,२०१
गोरक्षण ६८, २७८
गोरा कुंभार ४०
गोभक्ति २७७
गोशाळा ६७, २७७
ग्रंथप्रामाण्य २१
ग्रामण्य २४३
घटस्फोट ९७
चहा १४२,१४३,१७३, २०७, २२१
चातुर्वर्ण्य ५४, ३१०
चित्तस्थैर्य ४३
चित्पावन २९,१०२
( जन्म ) पत्रिका १०४
जप ( यज्ञ ) ४७,७९,२९५,२९६
जयन्युत्सव १०६
जागतिक धर्म ( विश्वधर्म ) ३०१, ३०२, ३०३, ३१२
जुगार २१९
जैन ३१५
जैमिनि २०२,२०३
जोशी ( वा. म. ) ८
ज्ञान २७६,२८१
ज्ञानदान २८१, २८५
ज्ञानेश्वर ४०
ज्योतिषशास्त्र १०३, २२८
झारशाही ५
टागोर ( रवींद्रनाथ ) १२८

टिळक ( लोकमान्य ) ३२७, ३४१, ३४२
टिळक ( रेव्हरंड ) ३१२,३१६ ३३२, ३३३
डॉक्टर ८७, १५५,२२२
तत्वनिष्ठ परिवर्तनवादी ३३७, ३३८
तत्त्ववादी ३०,३३८
तप ५६,१३४,१३५,१४०,१४७, २१०, २४५
तपस्वी २९२
तर्पण ( दिन ) १६४,१६६
तात्त्विकपद्धति ३३७
तुकाराम ४०,४५, १३५, १४७, १७१, ३३१
तुळस ३१४
दक्षिणा २०१,२०२
दन्तधावन १७०
दप्तरी ( विद्वद्रत्न ) ३३
दया २०४,२३५,२५०,२५२, २६५, २७२
दर्श ( पूर्णमास ) ८२
दसरा ७९, ८८, ९२
दान ७९,२०४,२३५,२७२,२७३, २७९
दिनक्रम १६८
दिवाळी ७९,८८,८९,१११, ३:५
देवघर ४३
देवरुखे २९,१०२
देवालय ( मंदिर पहा ! )
देशकार्य २९४
देशस्थ २९,१०२
धर्म ११
धर्मकारण ३,५
धर्म आणि तर्क २२
धर्म आणि परिस्थिति २२,२८९
धर्म व कायदा २०
धर्मशास्त्र १०,१०३,१५२,३११,३२८
धर्मशिक्षण ६९,७०
धर्म व समाजशास्त्र १९
धर्माचा अधिकारी २४
धर्माची कसोटी १६,१७
धर्माची व्याख्या ( लक्षण ) ११, २९८,२९९, ३१६, ३१७
धर्माचें फळ ( ध्येय ) १२,१८६
धर्मोपदेश ( क ) ७१,७२,३३०
धारण १६,४३,२७४
धार्मिक दिवस ७९
धार्मिक व्यवसाय १९७
धूम्रपान १४३,२६६,२६७
नक्षत्र ( शुभाशुभ ) १०३
नचिकेतस् २३०
नथ २३२
नवनीति ९४
नवस १४६
नवें युग ४६
नास्तिक व धर्म १९
नित्शे २५१,२५८
निमन्त्रण ( भोजनाचें ) १२४

निरशनाचे पदार्थ १३८
निर्वेतन व्यवसाय ( सेवा ) १९६, १९७
परधर्म ४०
परम ( श्रेष्ठ ) धर्म ५२,२०४
परंपरा ३३,३४,३७,४७,७८, २९२, ३१५
पंचजन ३१०, ३११
पंक्तिव्यवहार ११७
पंचहौद मिशन ११५
परदेशगमन २४७
परलोक ३१३
परिस्थितींतिल बदल २८
परिवर्तन ( विकासरूपी ) ३१
परिवर्तन ( संकोचरूपी ) ३१, ९८
परिवर्तनाचें तत्त्व ३०
पलुसकर ( वि. दि. ) ६७
पवित्र १९५
पाप २४०,२४४
पारशी समाज ३१५
पिष्टपशु २६०
पुनर्विवाह १०१
पुं ( नरक ) १०१
पुरोहितवर्ग २००,३३०
पूजा ७९,२००
पूर्णिमा ८२
पाठक ( म. म. ) ७८,२३७
पाडवा ८८,९२
पात्रापात्र २७७
पारलौकिक उत्कर्ष १७
पौरोहित्य २०१
पावित्र्य ७७
प्रचारक २८७
प्रतिमा ३८,४१
प्रतीक ४२,४४,४५
प्रभव १६
प्रमाद ३२२
प्रवास २२४,२२५,२९३
प्राणप्रतिष्ठा ४४
प्राणायाम ४८, १७२
प्रार्थनासमाज ३८,५०
प्रायश्चित्त २४२,२४३,२४४
प्रेतयात्रा ( श्रृंगार ) १५४, २२९, २३०
फडके ( ना. सि. ) १२७
बंधनाची आवश्यकता ४,३२२,३२३
बादरि २०२
बायबल ८०,२५६,२५७
बेकार ( री ) १९६
बेटीबंदी ५५,२३७
बेटीव्यवहार ११७, ३१४
बौधायन ३६,१०३
ब्राह्मण–ब्राह्मणेतरवाद १९४,१९५
ब्राह्मणसभा ४,३३८
बुद्ध २९९
बोहरी ३१५
बौद्धधर्म ३०२ ३१५
भक्त ( जिज्ञासु, ज्ञानी इ० ) २

भाऊबीज ९२
भांडारकर ( य. वा. ) ५०
भिक्षा १९७,१९८
भिक्षावळ ६२,९३
भिक्षुक ( की ) १९८, २०१, २०२
भूपाळ्या १६९
भोजन ११३
भोजनसमारंभ ११८,१२२,१२३
मंगळसूत्र १५४,१५५,२३२
मत ( दान ) २७६,२८६
मंत्र ४५
मंदिर ३९,४९,६२,६३,७७
मंदिर–हिंदुधर्म ६२
मध्वाचार्य ३३०
मनुष्याचे शत्रु ११,३२१
महिलांचें कर्तव्य १८२,१८३
माधुकरी १७८
मानसमंथन १३७
मार्गांतर १३७
मांसाहार १२५
मांसनिवृत्त १२६
मासिकें २८२
मीमांसापद्धति ३३७
मुसलमान ८९,१५०
मुसलमानी धर्म ४०,२९४,३०४
मुहूर्त १०३,१५६,२२८
मूर्तिपूजा ३५,४३,४६,३२४
मृत्यु १४९,२२९,२३०
मेळेबाजी १११
मोक्ष १७,३००
मोक्षाचें साधन १८
यज्ञीय हिंसा २५९
यहुदी ७९
योगशास्त्र ( सूत्र + भाष्य ) ४३,४४, २७१
योगासनें १७९
योगी २९२
रसेल ४,९४
रांगोळ्या ३१५
रात्रिजागर १४१
रामदास ४०,१९८,२८२
रामनवमी ७९
रोटीबंदी ५५,२३७
रोटीव्यवहार ११७, ३१४
लक्ष्मीपूजन ८९
लेखकवर्ग २८३
लेखनस्वातंत्र्य २८३,२८४
वकील १५५,१९३,२२२,२४०
वधूपरीक्षा १०४
वरात ९६
वर्णधर्म ४९,५१,५३
वर्तमानपत्रकर्ते २३९
वासिष्ठ २००
वाचक २८५
वाचन १७३
वात्स्य १०३
वाद्यें ९६
वायु ४८

वारकरी १७९
विधवा ( श्रम ) १९८,२२९,२३१
विधवाकेशवपन ३२२
विवाह ४८,६२,९२,९४
वृत्तपत्रें २८२
वेदोक्त २०१
वैद्य ८७
वैयक्तिक धर्म ५५
वैराग्य ९६
व्यवसाय ( धंदा ) ५३
व्यवसायबंदी ५५
व्यसन १४२,१४३,२१८
व्यापारी ८७,१९३
व्यायाम १७२
व्रत १३०,१४७,२४५
व्रात्यस्तोम ३१३
शंकराचार्य ३२१
शरीर १५०,२३०
शिक्षक ८७,१९४
शिमगा ९०
शिवाशिवी १६२
शिष्टाचार २०४,२२६
शुक्ल यजुर्वेदी १०३
शुद्धि ( द्धता ) २३५, २७१
शुद्धीकरण ३१३, ३१४
शुभ २३१, २३२
शूद्र ( वर्ण ) ५४, २२६, ३१०
शेजारधर्म १७५,२२३
श्रम २७३,२७६
श्राद्ध १६६,१६७,२००
षोडशोपचार ४२,४३,४९,२००
संक्रांत ७९,८८,९२
संध्या ४७,७९,१७१,२९३,२९४
संन्यासी २९२
संयम ४,१२,१३६,१४२,३२२,३२३
संयमाचा मार्ग १४,१३७
संशय ३०७
संस्कार ४९,६२,८८
सट्टे २१९
सण ८८
सत्य २३५,२३९,२७१,२८४
सत्यनारायण २११, ३१४
सन्मान ७९
समता २१६
समाजसत्तावाद ५,७
समाधि ४३
सम्पत्ति २७५
सम्पत्तीची विभागणी २७३
संपादक २८३
समान हक्क ९५,१८४
सभा २१५
सरस्वत्युत्सव ११०
सरळपणा २११,२१३
सहस्रभोजन ११९,२७८
सामुदायिक आचार ३,८८
साम्यवाद ६
सुतक ( आशौच ) १०४,१५५,१६१
सुधारणा २६,३४३

कर्तव्य ९,१९९,३३०,

ंस्कार ) ९३

र १७२

४७, ४८, ३१४

समावर्तन ) ९३,१०२

८५

४, १७५,२३७

४,१६५

५५

१६३

स्मशान १५१
स्वदेशीव्रत २१६
स्वर्ग १८
स्वयंशासन ३३२, ३४१
स्वयंसेवक ( की ) ११०,२८०
हॉटेल ११५
हिंदु २९७
हिंदुधर्म २९७
हिंदुमहासभा ४,३१३, ३२९, ३३८,
३३९
हिंदूंचा ध्वज ८९
होळी ८८

REFBK-0005429